Digitized with financial assistance from
Dr. Devangana J. Desai
on 14 February, 2019

श्री

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

शक १६८३—शक १७३९

संपादक

वि॰ का॰ राजवाडे बी॰ ए.

प्रकाशक

वासुदेव गोविंद आपटे बी.ए. व कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर बी.ए.

महाराष्ट्र साहित्यपरिषदेचे चिटणीस, पुणें.

मुद्रक

रावजी श्रीधर गोंधळेकर जगद्धितेच्छु छा॰ शनवार पेठ, पुणें.

१९०९

श्री.

प्रस्तावना.

१ राष्ट्राच्या सर्व तऱ्हेच्या गतचरित्राचें कालानुक्रमिक व संगतवार स्मरण ह्मणजे इतिहास. तो दोन प्रकारचा. तोंडी व लेखी. पैकीं दुसऱ्या प्रकारच्या इतिहासाच्या तयारीकरितां साधनांचा हा दहावा खंड आहे.

२ ज्या लोकांची स्वचरित्राची स्मृति हारपली, ते लोक मृतवत् असून पहावें तेव्हां सदाच मूढावस्थेंत असल्यासारखे दिसतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील भिल्ल, खोंड, कातकरी वगैरे लोक घ्या. हिंदुस्थानांत ह्या लोकांची वस्ती आपणां आर्यांच्याही पूर्वींची आहे. तेव्हां ते ज्या मूढावस्थेंत होते त्याच अवस्थेंत ते सध्यांही बहुतेक आहेत. कारण, आपल्या गतचरित्राची स्मृति त्यांना नाहीं. स्मृति जाज्वल्य तऱ्हेनें जागृत असली, ह्मणजे गतचरित्राचा आढावा घेतां येतो; आढावा घेतां आला, ह्मणजे आपले राष्ट्रीय गुणदोष कळूं लागतात; आणि गुणदोष कळले, ह्मणजे दोषांचा बींमोड करून गुणांचा परिपोष करण्याकडे सहज प्रवृत्ति होते.

३ राष्ट्राचा इतिहास ह्मणजे राष्ट्रांतील सर्व लोकांच्या संकलित चरित्राची हकीकत. ती लोकांपुढें मांडिली असतां, सर्व लोकांना समानस्मृतित्वामुळें ऐक्याची व बंधुप्रेमाची भावना होते. ती उत्कटत्वानें व्हावी, एतदर्थ प्रस्तुत खंड प्रसिद्ध करण्याचें ग्रंथकारांच्या संमेलनानें ठरविलें.

४ ह्या खंडांतील अर्धीं अधिक पत्रें इंदूरचे श्री. माधवराव किबे व रा. आठल्ये ह्या दोन सद्‌गृहस्थांनीं पांच सहा वर्षांपूर्वीं प्रसिद्ध करण्याचें मनांत आणिलें होतें. परंतु व्यवसायबाहुल्यामुळें पत्रांच्या नकला करण्यापलीकडे त्यांच्या हातून प्रसिद्धीचें काम रेटेना. सबब, मूळ पत्रें व नकला घेऊन व त्यांत आणीक बऱ्याच पत्रांची भर घालून, प्रस्तुत खंड बनवला आहे. पैकीं पांच पन्नास पत्रें रा. आठल्ये यांनीं स्वतः मिळविलेलीं आहेत.

५ येथें पानिपतच्या प्रसंगापासून दुसऱ्या बाजीरावाच्या अखेरीच्या पर्यंतच्या काळांतील पत्रें घेतलीं आहेत. पांच दहा पत्रें तदनंतरचीं आहेत. त्यांचा उद्देश, सरदार घराण्यांचा ऱ्हास उत्तरोत्तर होऊन तो कोणत्या थरास पोहोंचला, तें स्पष्ट करण्याचा आहे. अर्धीं अधिक पत्रें वाई येथील रा. रा. नानासाहेब वैद्य यांच्या दप्तरांतील असून, बाकीचीं इतरत्र किरकोळ मिळविलेलीं आहेत.

६ ग्रांट डफ्च्या बखरींतल्या तारखा, प्रसंग व तपशील प्रस्तुत खंडांतील मित्यांशीं, प्रसंगांशीं व तपशिलाशीं ताडून पाहिला असतां स्थलोस्थलीं चुकीचा व विपरीत दिसेल, हें महाराष्ट्रांतील लोकांस तरी सांगण्याचें आतां कारण उरलें नाहीं. रा. खरे, रा. पारसनीस व मी ह्यांनीं ही बाब आजपर्यंत इतक्या वेळां सांगितली आहे व स्वजनांनीं इतक्या वेळां ऐकिली आहे कीं तिचा पुनरुच्चार करणें ह्यापुढें केवळ कंटाळवाणें होणार आहे. ग्रांट डफला ह्या देशांत आतां कोणी प्रमाण मानीत नाहींत. इंग्लिश लोक मात्र त्याला अद्याप प्रमाण ह्मणून समजतात. परंतु, तो निव्वळ अज्ञानाचा प्रकार होय. निदान ह्या एका बातींत तरी इंग्रजांच्या आपण पुढें आहोंत, ही समाधानाची गोष्ट आहे.

७ तारखा, प्रसंग व तपशील ह्यासंबंधानें ग्रांट डफ्नें ज्या चुक्या केल्या व जे विपरीत ग्रह उत्पन्न केले, त्याहून निराळ्या तऱ्हेच्या विपरीत ग्रहांचा बींमोड करण्याचा काळ आतां आला आहे. हे विपरीत ग्रह जाणूनबुजून केलेले असोत किंवा अज्ञानतः केलेले असोत, त्यांमुळें पुष्कळ जाणतेसरवते लोक देखील वारंवार फसतात; मग अजाण लोक फसले तर त्यांत कांहीं नवल नाहीं. अशा एक दोन दुष्ट ग्रहांचा स्पष्टीकरणार्थ येथें उल्लेख करतों. रजपूत व जाट लोकांतील कांहीं किंवा सर्व कुळ्या अहिंदु जे शक व तुरुष्क लोक ते हिंदु बनून त्यांच्यापासून झाल्या, असा विपरीत सिद्धांत गेलीं पन्नासपाऊणशें वर्षे बहुतेक सर्व इंग्रज व युरोपियन लोक ठोकून देत. इंग्रज व युरोपियन लोक पडले चौकसपणानें सशास्त्र विवेचन करणारे. तेव्हां, त्यांचे विपरीत दिसणारेही सिद्धांत प्रमाणवत् मानून, आपल्या इकडील कित्येक विद्वन्मन्य हवे तसे बरळावयाला लागले. हे विद्वन्मन्य आपल्या साध्याभोळ्या परंतु कुलधर्मनिष्ठ स्वजनांना असा उद्धट सवाल करूं लागले कीं, 'शहाणे हो! पूर्वीं अहिंदु जे शक लोक ते हिंदु बनून जातिवंत रजपूत ह्मणजे क्षत्रिय समजले जात व त्यांचें पुरोहितत्व सोंवळ्यांतले सोंवळे जे कोणी ब्राह्मण असत ते करीत, अशी सशास्त्र वस्तुस्थिति आहे; तेव्हां शुद्धजातित्वाच्या गप्पा कशाला मारतां?' विद्वन्मन्यांचे हे उच्छिष्ट व निरर्गल प्रलाप धर्मनिष्ठांना कवडीमोल भासत, हें सांगावयाला नकोच. परंतु, ते कवडीमोल आहेत अशी खात्री ह्या विद्वन्मन्य लोकांची कशी व्हावी? कोण्या युरोपियन शास्त्रयानें तसें सांगितल्याशिवाय त्यांच्या मूर्ख मतांचा कवडीमोलपणा त्यांना कधीं पटावयाचाच नाहीं. हें जाणून एका इंग्रज मानववंशशास्त्रयाचें रजपूतवंशासंबंधानें शास्त्रविचारान्तीं आतां काय मत झालेलें आहे तें देतों. तो म्हणतोः—

Of the Scythian people themselves all traces seem to have vanished, and the student who inquires what

ıas become of them finds nothing more tangible than 'he modern conjecture that they are represented by the Jats and Rajputs. But the grounds for this opinion re of the flimsiest description. and consist mainly of he questionable assumption that the people who are illed Jats or Jāts at the present day must have someiing to do with the people who were known to Herootus as Getae. Now apart from the fact that resemlances of names are often misleading—witness the Roman identification of these very Getae with the oths—we have good historical reasons for believing iat the Scythian invaders of India came from a reion occupied exclusively by broad-headed races and ust themselves have belonged to the type. It seems, erefore, unlikely that their descendents should be und among tribes who are essentially of the long-eaded type. Still less probable is it that waves of reign conquerors, entering India at a date when the ido-Aryans had long been absorbed by them so mpletely as to take rank among their most typical presentatives, while the form of their heads, the most ersistent of racial distinctions, was transformed om the extreme of one type to the extreme of anher without leaving any trace of transitional forms the process. Such are the contradictions which beset e attempt to identify the Scythian with the Jats d Rajputs.

Chap. VI, Ethnology and Caste, pp. 306–307.
y Mr. H. S. Risley.(Imperial Gazetteer of India, Vol I.)

ज्याच्या आधारावरतीं हिंदूंच्या शुद्ध जातीला वर सांगितलेले विद्वान् ं ठेवीत होते व सबगोलंकार करण्यास उत्तेजन देत होते, तो सिद्धान्त msy, self-contradictory व कवडीमोल आहे, असें सर रिझ्ले ातात. हे सर रिझ्ले मानववंशशास्त्राचे व जातिशानाचे मोठे शाते आहेत, ं हिंदुस्थान सरकार समजतें. त्या सरकारच्या आज्ञेवरून प्रसिद्ध केलेल्या ांत रजपुतांचें शाकवंशयित्व ज्याअर्थी अशास्त्र व असत्य ठरविलेलें आहे, अर्थी तें तसें मानणें उच्छिष्ट विचार व सिद्धान्त यांवर स्वजनांच्या उरावर

पाय देऊन उपजीविका करणाऱ्या लोकांना अत्यंत अपरिहार्य आहे. बाक
धर्मनिष्ठ जे आहेत त्यांना शाकवंशजत्वाची व लंबशिरस्कत्वाची अशा दोन्ही
उपपत्त्या एकाच किंमतीच्या वाटतात. रजपूत वंशानें हिंदु आहेत, क्षत्रि
आहेत व आर्य आहेत, हा सिद्धान्त, कितीही पोषक किंवा मारक अशा पा
कळ उपपत्त्या निघाल्या तत्रापि, धर्मनिष्ठांना त्रिकालाबाधित वाटत राही
ह्यांत संशय नाहीं.

८ आतां दुसऱ्या एका कवडीमोल दुष्ट ग्रहाचा उल्लेख करतों. तो व
च्याच्या सारखा जुना नाहीं; अगदीं अलीकडला कोराकरकरीत आहे.
कालपर्यंत रजपूत Scythians आहेत, अशी कंडी पिकवून, अनेक अ
वट लोकांना यानें माकडचेष्टा करावयास लावल्या. आतां रजपुतांवरची सं
उठून मराठ्यांवर ती बसूं पहात आहे, नव्हे साक्षात् बसलीच आहे. आ
असें मत निघालें आहे कीं, महाराष्ट्रांतील मराठे लोक वंशानें शाक ह्मण
Scythian आहेत. सर रिझ्ले ह्मणतातः—

Is it not conceivable that the Scythians, who fir
occupied the great grazing country of the Weste
Punjab, and then, pressed upon by later invaders a
finding their progress eastwards blocked by the Ind
Aryans, turned towards the south, mingled wlth t
Dravidian population, and became the ancestors
the Marathas ? The physical type of the people
this region accords well with this theory, while t
arguments derived from language and religion do n
seem to comflict with it. For, after entering India, t
Scythians readily adopted an Aryan language, writt
in the Kharosthi character, and accepted Buddhism
their religion. Their Prakrit speech would have dev
loped into Marathi, while their Buddhistic doctrin
would have been absorbed in that fusion of magic a
metaphysics which has resulted in popular Hinduis
On this view the wide-raging forays of the Marath
their guerilla methods of warfare, their unscrupulo
dealings with friend and foe, their genius for intrig
and their consequent failure to build up an enduri
dominion, might well be regarded as inherited fro
their Scythian ancestors.

Chap. VI, Ethnology and Caste, pp. 307-308.
by H. S Risley. Imperial Gazetteer of India, Vol I.

मराठ्यांना शाक ऊर्फ Scythians ठरविल्यावर रिस्ले पुढें ह्मणतात:—

The highest class of Marathas is supposed to consist of ninety-six families, who profess to be of Rajput descent and to represent the Kshattriyas of the traditional system. They wear the sacred thread, marry their daughters before puberty, and forbid widows to marry again. But their claim to kinship with the Rajputs is effectually refuted by the anthropometric data now published &c.

येणेंप्रमाणें, महाराष्ट्रांतील मराठे आर्य नाहींत, असा रिझ्लेचा नवीन शोध आहे. महाराष्ट्रांतील ब्राह्मण आर्य नाहींत, असें बरळण्यापर्यंत अद्याप मजल पोहोंचली नाहीं. परंतु, तोही प्रसंग पुढें मागें आल्याशिवाय रहाणार नाहीं. असो. सध्यां ब्राह्मणांशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. फक्त मराठ्यांच्या वंशाचा विचार करावयाचा आहे. सर रिस्ले यांना आमचा असा सवाल आहे कीं, रजपूत Scythians नाहींत, हें ठरविण्याला जीं प्रमाणें त्यांनीं नमूद केलीं आहेत, तींच प्रमाणें मराठे Scythians नाहींत, हें ठरविण्याला समर्पक आहेत. Scythians उर्फ शक काठेवाड, गुजराथ व जुन्नर ह्या स्थलीं केव्हां आले व किती दिवस राहिले, हें इतिहासप्रसिद्ध आहे. ते जुन्नरास राज्य करीत होते, त्या वेळीं व त्यांच्या पूर्वीं महाराष्ट्रांतील समाज चातुर्वर्ण्यघटित होऊन पूर्ण सुयंत्र झाला होता. अशा समाजांत अहिंदु जे शक ते (हिंदु ह्मणून) समावले जाऊन, महाराष्ट्रांत ज्यांना क्षत्रिय ह्मणतात, त्यांच्यांत प्रमुखत्वानें मोडले जावे, हें रजपुतस्थानांतल्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतही सर्वस्वीं अशक्य आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांतील मराठ्यांना शककुलोत्पन्न करून टाकण्यांत रिस्ले यांचें तर्कशास्त्र सपशेल तोंडघशीं पडलें आहे.

९ अशा नाना प्रकारच्या विपरीत कल्पना इंग्रज व युरोपियन लेखकांनीं वेळोवेळीं प्रपादल्या आहेत. त्यांच्या मुळाशीं एक मनोविकृति असते. ती ही. इंग्रज, फ्रेंच, जर्मन, वगैरे पाश्चात्य समाजांत शरीरसंबंध वाटेल त्या धर्मबाह्य व लोकबाह्य समाजाशीं होत असल्यामुळें, त्या समाजांतील लोकांचें बीज व रक्त अत्यंत भेसळ झालेलें आहे. त्यामुळें होतें काय कीं, हिंदुस्थानांतील चातुर्वर्ण्यघटित समाजांतही आपल्यासारखेंच रक्ताची व बीजाची खिचडी झाली असली पाहिजे, हें यद्वातद्वा सिद्ध करण्याचा मोह ह्या लोकांतील विद्वानांना साहजिक पडतो. परंतु त्यांनीं हें पक्कें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील जातिबद्ध लोक शरीरसंबंध करण्याच्या कामांत बौद्धधर्म प्रचलित होण्याच्या पूर्वींपासून फार चिकित्सक आहेत. तेव्हां त्यांच्या वंशासंबंधानें बोलतांना फार जपून बोललें पाहिजे. युरोपांतील उपमानें हिंदुस्था-

नाला लावण्यांत बिलकुल अर्थ नाहीं. शक, यवन, किरात, पल्हव, पुंड्र वगैरे अनार्य कुलांशीं आर्यांचा शरीरसंबंध होणें केवळ असंभाव्य आहे. उदाहरणार्थ, प्रस्तुतचा मुसलमानांचा—अस्सल व बाट्ये—समाज घ्या. हा समाज आज कमींत कमी बाराशें वर्षें हिंदुस्थानांत वावरत आहे. परंतु, कोणी मुसलमान शरीरसंबंधानें किंवा धर्मांतरानें हिंदु झाला व तो क्षत्रियांत मोडूं लागला, असा एकही दाखला नवसालासुद्धां मिळावयाचा नाहीं. तात्पर्य, युरोपियनांचे एतद्विषयक प्रलाप निव्वळ बाष्कळ आहेत.

१० वांशिक पद्धतीनें इतिहास लिहावयाचा ह्मटला ह्मणजे त्या त्या देशांतील लोकांची वंशपरीक्षा करणें अपरिहार्य होतें. मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे मराठ्यांचा वंश कोणता, तें ठरविणें अवश्य होतें. मराठे शकवंशीय आहेत, असें रिस्ले प्रपादतात. तें खोटें व निराधार आहे, असें मी ह्मणतों. रिस्लेचा प्रत्येक शब्द असत्य व डळमळीत आहे, असें मला वाटतें. मराठे कोठून आले, केव्हां आले, कसे आले, एतत्संबंधीं रिस्लेची माहिती कोती, असंबद्ध, निराधार, पोरकट व शास्त्रशून्यतेला साजेल अशी आहे. शकांनीं आपली मूळ शाक भाषा टाकून दिली, आर्य प्राकृत भाषा स्वीकारली व तिच्यापासून वर्तमान मराठी झाली, असा रिस्लेचा विचित्र कोटिक्रम आहे. बोलण्याला आधार कशाचाही नाहीं. नुसता wild and ignorant conjecture आहे. ह्याला सशास्त्र पद्धत ह्मणतात ! व हिंदुस्थान सरकार हें भारूड छापण्याकरितां पैसे खर्चतें ! लेखकाच्या सशास्त्र पद्धतीचें कौतुक विशेष करावें किंवा हिंदुस्थान सरकारच्या पारखेचें कौतुक विशेष करावें, ह्याचें मला गूढ पडलें आहे!

११ असो. असले विपरीत सिद्धांत युरोपियन लेखकांच्या लेखांत पदोपदीं आढळतात. जशी वेळ पडेल व लहर लागेल, त्याप्रमाणें हे सिद्धांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत बदलत असतात. मोगलांना चिरडून हिंदुस्थान इंग्रजांनीं मिळविलें, असें एक लेखक लिहितो; तर मराठ्यांपासून हिंदुस्थान इंग्रजांनीं हिसकून घेतलें, असें दुसरा लेखक प्रपादतो. हिंदुस्थानच्या विचित्र हवेंत शारीर व मानासिक श्रम युरोपांतल्याप्रमाणें होत नाहींत, असें एक शहाणा बरळतो, तर दुसरा होतात ह्मणून त्याचा निषेध करतो. असे नाना प्रकारचे परस्परविरुद्ध ग्रह युरोपीयन लोक आपल्या सुपीक डोक्यांतून, मन मानेल तसे, प्रसवत असतात. त्यामुळें होत आहे काय कीं, ह्या पाश्चात्यांच्या कोणत्याच बोलावर इकडील विचारी लोकांचा विश्वास बसत नाहींसा झालेला आहे. अशा स्थितींत एकच मार्ग सुरक्षित भासतो. आपलीं मतें यथासत्य बनविण्यास आपणच उद्योग केला पाहिजे; दुसऱ्याच्या दुटप्पी बोलण्यावर भिस्त ठेवून बसण्यांत तात्पर्य नाहीं, हीच

गोष्ट लक्ष्यांत घेऊन, मराठ्यांचा यथासत्य इतिहास निपजण्याकरितां, मराठ्यांच्या इतिहासाचीं अस्सल साधनें प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत लेखकानें उपक्रम केला आहे. त्या कामीं प्रस्तुत प्रसंगीं महाराष्ट्र साहित्य परिषदेनें साहाय्य केलें, ही बाब मतैक्याची सूचक आहे.

१२ ह्या दहाव्या खंडांत माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, सवाई माधवराव व बाजीराव रघुनाथ ह्या चार पेशव्यांच्या कारकीर्दींतील पत्रव्यवहार आला आहे. पैकीं माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दींतील ७९ लेख आहेत. त्यांतला २१वा लेखांक शक १६८५ श्रावण शुद्ध ५ चा असून, त्यांत दोन्हीं सैन्यें मिळून पांच सहा हजार लोक रणास आले, असें खुद्द माधवराव लिहितो. ह्या राक्षसभुवनाच्या लढाईंत मोगलांचे दहा हजार लोक पडले, असें डफ ह्मणतो व आधार बखरींचा देतो. कोणत्याही बखरीपेक्षां खुद्द माधवरावाच्या पत्रावर जास्त विश्वास ठेवला पाहिजे, हें उघड आहे. अस्सल पत्रापेक्षां बखरीवरच डफनें विशेष निर्वाह केला होता, हें सांगावयाला नकोच. ही तपशीलासंबंधाची बाब झाली. परंतु, निजामाशीं चाललेल्या ह्या मोहिमेंत दुसरीच एक बाब इतिहासदृष्ट्या व राजनीतिदृष्ट्या महत्वाची आहे. ती बाब ही. मोरोबा फडणवीस, गोपाळराव पटवर्धन, सदोबा शेणवी, गमाजी मुतालिक, भवानराव प्रतिनिधी, वगैरे मराठे मुख्यसत्तेला सोडून शत्रुपक्षाला मिळाले, तें राजनीतीच्या दृष्टीनें कितपत न्याय्य होतें ? स्वतंत्र संस्थानांतील कोणीही माणूस युद्धप्रसंगीं किंवा शांततेच्या कालीं शत्रूच्या संस्थानाच्या विरुद्ध कोणत्याहि प्रकारें संस्थानाच्या जाणून उपयोगीं पडल्यास, तो संस्थानद्रोही होऊन देहान्तशिक्षेस पात्र होतो, असा सर्व राष्ट्रांचा नियम आहे. त्या नियमाच्या दृष्टीनें पहातां गोपाळराव पटवर्धन वगैरे सरदार संस्थानद्रोही ठरतात. हा नियम त्या कालीं महाराष्ट्रांत प्रचलित नव्हता, असेंहि नाहीं. तोतयाचें बंड झालें तेव्हां नाना फडणिसांनीं हजारों लोकांचीं त्यांच्या त्यांच्या अपराधांच्या मानानें शासनें केलेलीं आहेत (पत्रांक ३०७). संस्थानांतील सामान्य माणसें शत्रूच्या सेवेस गेलीं असतां, त्यांचीं घरें दारें जप्त करण्याचीहि वहिवाट त्या कालीं होती (पत्रांक ६६ वगैरे). शिवाजी तर, अशा माणसांना शत्रु समजून शासन करीत असे (म. इ. सा. खंड ८). रघुनाथरावाचें व माधवरावाचें इतकें बिनसलें असतां, रघुनाथरावाच्या विरुद्ध माधवराव निजामाला जाऊन कधींहि मिळालेला नाहीं. असा दंडक त्या वेळीं प्रचलित होता. मुख्य सत्ता शिरजोर असतां हा नियम लागू असतो, व कमजोर झाली असतां नसतो, असें तर बिलकूलच ह्मणतां येत नाहीं. मुख्य सत्ता कोणत्याही कारणानें कमजोर होऊं लागली असतां, तिच्याशीं एकनिष्ठेनें रहाणें इतकेंच नव्हे, तर तिला शिरजोर करण्याकरितां जिवापाड मेहनत करणें संस्थानांतील प्रत्येक माणसाचा स्वभावसिद्ध धर्म आहे.

तो धर्म न पाळला, तर संस्थानाचें स्वातंत्र्य त्या मानानें नष्ट होतें संस्थानाचें स्वातंत्र्य जसजसें नष्ट होतें, तसतसें ज्या धर्म, नीति, व संस्कृति यांच्या संरक्षणाकरितां स्वतंत्र संस्थान निर्माण झालेलें असतें, त्यांचा नाश होतो. त्या नाशाबरोबर संस्थानांतील प्रत्येक व्यक्तीचेंही स्वातंत्र्य नष्ट होतें. अशी भयंकर आपत्ति संस्थानद्रोहानें येते. तेव्हां, संस्थानद्रोह्यांना मोठी शिक्षाच योग्य असते. अशी शिक्षा न देणारा संस्थानाधिकारीही संस्थानाच्या नाशास कारण होतो. ह्या दृष्टीनें पहातां, संस्थानहितार्थ माधवराव बल्लाळानें गोपाळराव पटवर्धनादि मंडळींचें यथायोग्य शासन केलें पाहिजे होतें. गोपाळरावादि मंडळी फौजबंद पडल्यामुळें व संस्थानाधिकारी कमजोर पेंचांत पडल्यामुळें, माधवरावाच्या हातून शासन करण्याचा धर्म यथास्थित अमलात आला नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, देशांतील राजधर्म व प्रजाधर्म ढिला पडला; ह्यापुढें प्रत्येक सरदार हरहमेष संस्थानच्या शत्रूंशीं कधीं गुप्तपणें व कधीं उघडपणें मित्रत्व करूं लागला. पानिपतच्या लढाईनंतर संस्थानद्रोहाचें पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे हें गोपाळरावादि मंडळींचें होय. ह्याचा कडक बंदोबस्त तावडतोब व्यवस्थित रीतीनें त्याच वेळीं झाला असता, तर सर्व सरदारांना भयंकर वचक बसला असता व मराठ्यांचें स्वतंत्र संस्थान अजरामर झालें असतें. ह्या प्रकरणाचा येथें विशेष उल्लेख करण्याचें कारण असें कीं मराठ्यांचें पुढील सर्व चरित्र ह्या एका संस्थानद्रोहाच्या पातकानें लिप्त होऊन गेलेलें आहे. ह्या संस्थानद्रोहाचा मूळ उगम रघुनाथराव पेशवा होता. त्याचा निकाल यथायोग्य शासनानें माधवरावानें लावून टाकिला असता, म्हणचे द्रोहाचें बीजच नष्ट झालें असतें. शक १६९० च्या ज्येष्ठ शुद्ध १० स धोडपच्या लढाईत रघुनाथरावदादाचा माधवरावानें रेच मात्र उतरला (पत्रांक ४९), परंतु, संस्थानद्रोहाबद्दल त्याचें करावें तसें शासन न करतां, कीड तशीच राहूं दिली. ह्या किडीच्या आश्रयानें संस्थानांतील सरदारांना संस्थानाच्या विरुद्ध वागण्यास अवसर मिळाला. ही कीड नाहींशी केली असती, म्हणजे सरदारांचें पृथक होण्याचें एकच साधें खूळ राहिलें असतें, व तें कालांतरानें जमीनदोस्त करतां आलें असतें.

१३ नारायणराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील पत्रें थोडीं म्हणजे फक्त ४ आहेत. माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील पत्रें ३०२ आहेत. पैकीं पत्रांक २७४ पर्यंतचीं पत्रें रघुनाथरावदादांच्या संस्थानद्रोहाच्या हकीकतीनें भरलीं आहेत. शक १६८३ पासून शक १७०४ पर्यंत जीं २१ वर्षे गेलीं, त्यांचा इतिहास म्हणजे रघुनाथरावदादांच्या संस्थानद्रोहाचा इतिहास. त्याची समाप्ति पत्रांक २७४ त झाली आहे. रघुनाथरावाच्या द्रोहाचा सांसर्गिक झटका गायकवाड, पटवर्धन, भोसले, होळकर, शिंदे, कोल्हापूरकर वगैरे

अनेक सरदारांस बसल्या कारणानें पत्रांक २७४ पर्यंतच्या पत्रांत ह्या सरदारांच्याही संस्थानद्रोहाची हकीकत आलेली आहे. शक १७०४ पासून शक १७१८ पर्यंतचीं ह्मणजे सवाई माधवरावांच्या मृत्यूपर्यंतचीं जीं पत्रें आहेत, त्यांत, सर्व मराठा सरदारांचें एकीकरण करण्याचा जो नाना फडणिसानें प्रयत्न केला, त्याची हकीकत पहावयास सांपडेल. ह्या एकीकरणाच्या हकीकतीची समाप्ति पत्रांक ४१५ त झाली आहे. तदनंतर रावबाजींच्या कारकीर्दीची पत्रें लागतात. त्यांत, बाजीरावाचा कमकुवतपणा, सरदारांचा द्रोह, पेंढाऱ्यांचे दंगे, स्त्रियांची नागवण, व लोकांची दैना, ह्यांचीं वर्णनें वाचावयास मिळतील. शक १६८३ पासून रघुनाथराव व गोपाळराव यांनीं जो संस्थानद्रोह सुरू केला व ज्याचें पारिपत्य यथास्थित झालें नाहीं, तो परिपाकास येऊन, सत्ताधीश, सरदार, सामान्य प्रजा, स्त्रिया, व धर्माधिकारी यांस कसा भोंवला, तें शक १७२२, शक १७२३ व शक १७२४ या तीन सालांतील पत्रांवरून तपशीलवार कळेल. स्वतंत्र संस्थान ह्मणजे काय, संस्थानद्रोह ह्मणजे काय, स्वसंस्थानाला सोडून शत्रूची सेवा करणें ह्मणजे केवढें पातक आहे, प्रत्येक जाणत्या माणसाला राजकीय भावना किती जाज्वल्य असली पाहिजे, वगैरे गोष्टी ज्या वाचकांना माहीत असतील, ते ह्या तीन सालांतील पत्रांचें बहुत मनन करतील. शक १७२४ नंतरचीं रावबाजीच्या कारकीर्दीतील पत्रें आपापली हकीकत सांगतच आहेत. तेव्हां, त्यासंबंधानें येथें जास्त लिहीत नाहीं.

वि० का० राजवाडे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाचे कामीं ज्या उदार गृहस्थांनीं द्रव्यद्वारें अथवा अन्य-रूपानें साह्य केलें त्यांचे त्याबद्दल प्रकाशक फार आभारी आहेत.

सूचना—पृ० २४८ पत्रांक ३१२ पासून पृ० २५९ पत्रांक ३२९ पर्यंतचीं पत्रें चुकून मध्येंच भलत्या जागीं लागलीं आहेत. पत्रांक ३११ नंतर पत्रांक ३२९ हें वाचावें.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

पत्रांक १

पौा छ १८ जिल्हेज. श्री. १६८३ ज्येष्ठ वद्य १२

राजश्री मोराजी शिंदे नामजाद, जजीरे रत्नागिरी गोसावी यासीः— अखंडितलक्ष्मी राजमान्य श्रीा रघुनाथ बाजीराव. सुा। इसन्ने सितैन मया व अलफ. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. अनानासें शंभर पाठविलीं आहेत, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, शंभर अनानास, पैा अठावीस येथें आलीं, तींहि नासलीं. असला नासका जिन्नस दुरून न पाठवीत जाणें, असें पूर्वी लिहिलें असतां, हालीं रयतीस हैराण करून अनानासें प्रजंनकालाचीं पाठविलीत, हे गोष्ट कामाची नसे. या उपरी पाठवीत न जाणें. जाणिजे. छ २५ जिल्काद. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

श्री
राजा शाहु नरपति हर्ष-
निधान बाळाजी बाजी-
राव प्रधान.

पत्रांक २ श्री १६८३ पौष शुद्ध १०

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिवदीक्षित स्वामींचे सेवेसी:— विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. निजामअल्लीखान यासी लढाई होत असतां जेर होऊन, त्यांणीं सल्याचा संदर्भ लाविला. तेव्हां, नबाब मोगलअल्ली व राजश्री रामचंद्र जाधवराव तिकडून फुटोन आले. त्याची जागीर चाळीस लक्षाची निजामअल्लीखान याजपासून घेऊन सला केला. ते—विसीचें वर्तमान राजश्री स्वामीस सविस्तर विनंतिपत्रीं लिहिलें आहे. पत्रें प्रविष्ट करावें. जाणिजे. छ ९ जमादिलाखर[१] बहुतकाय लिहिणें ? हे विनंति.

---

१ येथून हस्ताक्षर माधवराव बल्लाळाचें.

पत्रांक ३ श्रीलक्ष्मीव्यंकटेश. १६८३ फाल्गुन शुा ४

कर्जरोखा शके १६८३ वृशानाम छंवछरे फाल्गुन शुध पंचमी ते दिणीं खत लिखीते धनको नाम रा बाबूराव विश्वनाथ यासीं रिणको नाम साबाजी भोसले. सुा इसन्ने सितैन मया व अलफ. ऐसाजे. आत्मकार्यास कर्ज घेतले मुद्दल रुपये ९५० अक्षरीं नवसें पन्नास. यासीं व्याज दर सद्दे २ दुहोत्रा प्रांा देऊन. हे रुपये दीढा महिन्यांनीं देऊन. रुा जाल्हन्यांत देऊन; अगर जाल्हन्याची हुंडणावळ देऊन. ता। छ ३ माहे शाबान. रोखा लिहिला. सही. मोर्तबसूद.

सदरहू उगणी धनी महादजी कृष्ण काणे. मुदतीं न दिले तर आपण खुद्द देऊं. यजमानाप्रों देऊन. दोन महिन्यानें देऊन.

श्री
रघुविर चरणीं तत्पर।
साबाजी भोसले निरंतर॥

पत्रांक ४

पो छ १९ सफर आश्विन शु० १ श्री. १६८४ श्रावण वद्य ७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव कोनेर स्वामीचे सेवेसीः—पो माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र यमुनापलिकडचे मुकामचें पाठविलें तें प्रविष्ट जालें. सुजातदौलाकडील वगैरे कित्तेक मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. ऐशियास, तुह्मीं प्रस्तुत सुजातदौलाजवळ आहा, हें उत्तमच केलेंत. सारांश, सरकारचीं ठाणीं गेलीं आहेत तीं हस्तगत...... ऊन, राजेरजवाडे वगैरे संस्थानिक यांस साहित्यपत्र व तुमच्या पत्राचें समर्पक उत्तरहि पाठविलें जाईल. जाणिजे. छ २१ मोहरम, सुा सल्लास सितैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें? हे विनंति.

पत्रांक ५ श्री. १६८४ भाद्रपद वद्य ९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री लक्षुमणपंत स्वामी गोसावी यासिः—सेवक महादजीराम बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता। भाद्रपद वाा ९ मुा पुणें कुशल असों. विशेष........इ-

कडील मजकूर तर राजश्री रामभटबावा व राजश्री बाबूराव व राजश्री रामचंद्रपंत ऐसें पुणियास आले आहेत. श्रीमंताची भेट जाहली. अद्यापि जाबसाल कांहीं नाहीं. रा पंतसचिव यांजकडीलहि प्रकार पूर्ववत्प्रमाणेंच आहे. × × × येथील मजकूर तर राजकीः—राजश्री त्रिंबकराव मामा कारभार करीत असेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब नाशकास गेले आहेत. समागमें फौज दोन हजार असे. अविंध बेदरीं आहे. अधिकोत्तर लिहावें ऐसें नाहीं. यानंतरीः तुह्मांकडून रा पिराजीनाईक निंबाळकर यानीं रुपये साहा हजार चैत्रमासींच देविले आणि आपण लिहिलें, गडकरी यांची वीस हजार रुपयाची रा नाईक निंबाळकर यांनीं चिठी पाठवून दिल्ही. × ××××. रा निंबाळकर यांची......श्रीमंताकडे च्यार हजार फौजेनिशीं जाहली. आणि बारा लक्ष रुपये घ्यावे ऐसा करार जाहला. प्रस्तुत हालीं दोन लक्ष रुपये दिल्हे व लाख रुपयांचा सरंजाम देणार. येणेंप्रमाणें करारांत आलें आहे. रा नाईक निंबाळकर दोन हजार फोजनिशीं येथें आहेत. यानंतरी रा रघोजी करांडे याजकडे ऐवज येणें. त्यास, ते प्रांतीं अनंतशेट कोलकरीहि गेला असे. इ. ई. इ.

पत्रांक ६ श्री. १६८४ कार्तिक वद्य ४

राजश्री आपाजी पायगुंडे गोसावी यांसि:—

आशीर्वाद. सुा सलास सितैन मयावअलफ. तुमचे फौजेचा पैका पावला असतां अद्यापि येत नाहीं ! तीर्थरूप राजश्री दादासाहेबांचे कूच नगराहून होऊन चारोळ्यास मुा आले. आम्हांस त्यांस दाहा कोसांची तफावत आहे. या प्रसंगीं तुम्हीं जवळ असावें. हल्लीं पत्र लिहिलें असे. देखत आज्ञापत्र जितके लोक जवळ असतील तितक्यांनशीं जलदीनें येणें. नालबंदी घेऊन लोक गेले असतील, त्यांसहि बोलाऊं पाठवणें. तुम्हीं पत्रदर्शनीं निघोन हुजूर येणें. एक क्षणाचा दिरंग न लावणें. जाणिजे. छ १८ राखर-लेखनसीमा.

पो छ. १९ राखर, सायंकाळ.

पत्रांक ७

पो छ १७ जिल्हेज,अर्बा श्री. १६८४ माघवद्य ९

राजश्री मोरोजी शिंदे नामजाद तालुके रत्नागिरी गोसावी यांसीः— अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुा सल्लास सितैन मया व अलफ. विसाजी केशव मुकादम, ताा फुणगुस, यांणीं हुजूर विदित केलें कीं:—मौजे डावखोल, ताा मजकूर, येथील खोतीच्या वतनाचा कजिया पेशजीं मांजरेकर सांवत यांचा व आमचा लागला. त्याचा निवाडा च्यारी दिवाणांत होऊन आह्मीं खरें जाहलों. त्या प्रों कागदपत्र

---

१ येथें मूळांतील मजकूर अप्रस्तुतत्वार्थ गाळला आहे.

करावयास हरकी व खर्चवेंच जाहला. तो आमच्या भाऊबंदांनीं व आह्मीं यथाविभागें पैका देऊन आपापला विभाग खोतीचा अणभाऊं लागलों. त्या तक्षीमदारांपैकीं रामाजी नारायण मुकादम आपल्या सदरहू विभागाप्रों पैका न देतां खोतीचा उपभोग विभागाप्रमाणें करितों. त्यास पैका देवावयाची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन, त्यावरून, तुह्मांस हें पत्र सादर केलें असें. तरी सदरहू मजकूर मनास आणून, वाजवी त्याचे विभागास पैसा आला, तो न देतां वांटा खातो, या प्रमाणें असलियास रामजी नारायण यास ताकीद करून विभागा प्रमाणें पैका देवणें. जाणिजे. छ २२ रजब. बहुत काय लिहिणें? लेखनसीमा.

श्री शिव
राजा शाहु नरपति हर्ष-
निधान माधवराव
बल्लाळ प्रधान.

पत्रांक ८ श्रीशंकर १६८५ ज्येष्ठ शुद्ध ५

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री दीक्षित स्वामीचे सेवेसीः—चरणरज मेघःशाम कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ता ज्येष्ठ शुद्ध ५ पावेतों मुकाम पुणें सुखरूप असों. विशेष. बहुत दिवस जाले, स्वामीकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी ऐसें न करावें. सदैव आज्ञापत्र पाठवून सेवकाचा परामृश करीत असावें. यानंतरी इकडलि राजकी वर्तमान तरीः श्रीमंत राजश्री पंत प्रधान मिरजेवरी आले आहेत. मिरजेस वेढा च्यार रोज बसवून, चौथे रोजीं फत्ते करून, आपलें ठाणें बसविलें, ऐसें वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय, ह्मणून लिा आहे. पुढें जें वर्तमान होईल त्याप्रमाणें सेवेसी लिा पाठऊं. वरकड वर्तमान यथास्थित असे. सर्व प्रकारें अभिमान स्वामीस आहे. बहुत काय लिहिणें? कृपा असों दिजे. हे विनंति.

हेंच पत्रीं श्रीमंत रा गोविंद दीक्षित व ता रा रामचंद्र दीक्षित स्वामीचे सेवेसीं साष्टांग विनंति लिा परीसिजे. कृपा लोभ असों दिजे, हे विनंति.

पत्रांक ९ श्री. १६८५ श्रावण वद्य ९

तीर्थस्वरूप राजश्री लक्षुमणपंत दादा स्वामी वडिलांचे सेवेसी:—
अपत्यें बाबूराव विश्वनाथ वैद्य चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ता॥ श्रावण वद्य ९ पावेतों मु॥ वांई समस्त सुखरूप असों. यानंतर. तुह्मांकडून बहुत दिवस कागदपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. आह्मीं रघोजी पांड्या याजबा॥ पत्रें पाठविलीं, त्यांचे प्रतिउत्तर येत नाहीं. तर, ऐसें नसावें. सदैव पत्रीं संतोषवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान तर: तीर्थरूप राजश्री नाना व मातुश्री काकी श्रीगणपतीस सेवेबद्दल आहेत. त्यास कांहीं गूण अद्याप नाहीं. सुखरूप आहेत. वरकड मार तर: या प्रांतें दंगा जाला. त्यामुळें कोणाकडील पैसा येत नाहीं. राजकी वर्तमान तर: श्रीमंतासीं व मोंगलासीं लढाई राक्षसभुवनापासीं जाली. मोगलास बुडविला. मोंगल पळोन आवरंगाबादेस गेला आहे. त्याजपाशीं च्यार हजार फौज आहे. त्याजकडील विठ्ठल सुंदर वगैरे मातबर सरदार पांच सात असाम्या पडल्या. श्रीमंत पैठणापाशीं आहेत. वरकड इकडील वर्तमान अधिकोत्तर ल्याहावें, ऐसें नाहीं. सालगुदस्त येथून हुंड्या केल्या होत्या. यमाजी कारंजकर व लक्ष्मण शेट कारंजकर यांच्या. त्यास, त्यांनीं रु॥ येथें थोडेबहुत वारले. त्याचा हिशेब करावा लागतो. त्यास, त्यांना कोणे मित्तीस रु॥ पावलें तें येथें लिहिलें आलें नाहीं. तर, ते मित्ती लिहून पाठवणें. तीर्थस्वरूप राजश्री नारोपंतकाका यांचे विद्यमानचे रु॥ हजार, रा॥ गंगाधर भट चिपळूणकर यांचें देणें होतें तें, आह्मीं येथें व्याजसुद्धां त्यांस प्रविष्ठ केलें. तुह्मांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. त्या प्रांतीं कोणाकडील ऐवज येतो कीं नाहीं, हें कांहीं कळत नाहीं. तें सविस्तर लिहणें. तुमचे घरीं समस्त सुखरूप आहेत. सविस्तर वर्तमान मुखवचनें बाबू सांगतां कळों येईल. मोहरीच्या देवालयाचे काम समाप्त जाहलें. शिखरास अस्तरगिरी होत आहे. दोन तीन महिन्यांत तयार होईल. राजश्री गमाजी यमाजी यांची व नरसिंगराव पागा यांची लढाई कराडावर जाहली. गमाजीचा मोड जाहला. दांतेगडावर पळून गेला आहे. वरकड पुणेंयांत छपरें व कांहीं घरें लोक बांधत आहेत. वाईची खंडणी लोकांनीं दिल्ही. परंतु आम्हांस पैसा देणें पडला नाहीं. तुमच्या घरास खर्चास रुपये शंभर देविले आहेत. कळलें पा. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असों दिजे. हे विनंति. नारो गणेश दामले यांचे हुंडीचे रु॥ तेथें कोणे मित्तीस पावले, हें सविस्तर मित्या लिहून पा., हे विनंति.

पत्रांक १०   श्री.   १६८५ श्रावण वद्य ११

पोा श्रावण वद्य १४ मंगळवार सवाप्रहर दिवस.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित स्वामींचे सेवेसीः—

विद्यार्थी कृष्णराव बल्लाळ सां नमस्कार विनंति उपरी येथील वर्तमान श्रावण वाा११ मुक्काम वरवाडी खुर्द, पोा पैठण, जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. कृपा करून पत्र पाा तें पावलें. मोंगलाई लढाई होऊन मोंगलांचा पराभव जाहल्याचा संतोष जाहला, ह्मणून विस्तारें लिहिलें. ऐसियास, सर्व आपले व देवब्राह्मणांचे आशीर्वादाचें फळ! पुढेंहि जें होणें तेंही आपलेंच कृपेनें होईल. भेडालें व काठीपिंपळगावाविषयीं लिा. ऐसीयासीं प्रस्तुत गांडापुरास कोणी कमावीसदार नेमिला नाहीं. त्रिंबकपंत तूर्त मोंगलांचे अमिलास धरावयाकरितां पाा होते. त्याणीं त्याचें पारपत्य केलें. मार्निलेस बलाऊं गेलें आहे. तेहि लौकरीच येतील. आणि मार्निलेसही पत्र राा बापूचे लिहून पाठविलें आहे. तें त्यास प्रविष्ट करावें. ह्मणजे ते आपले गांवास उपसर्ग लागों देणार नाहीं. श्रीमंतांचेंहि पत्र स्वामीस आहे. त्यांत श्रीमंताच्या हातच्या वळीं आहेत. बहुत काय लिहिणें? लोभ असो दिजे. हे विनंति.

पत्रांक ११   श्री.   १६८५ श्रावणवद्य १४

राजश्री मोरोजी शिंदे तालुके रत्नागिरी गोसावी यांसिः—अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुाा अर्बासितैन मया व अलफ. मौजे कडवाब, ताा संगमेश्वर, प्रां राजापूर, हा गांव राजश्री नारो पंडित प्रतिनिधि यांचा खासगीचा गांव. तेथें मोरो गोविंद कमावीसदार पंडित मारनिलेनीं पाठविला आहे. त्यास, किल्ले प्रचीतगडचा उपसर्ग लागतो. याजकरितां कमाविसदारमाार यांस किल्ले भवानगडीं जागा देणें व हरएकविषीं कमाविसदारास व मौजेमास किल्ले प्रचितगडकरी यांचा उपसर्ग लागों न देणें. जाणिजे.. छ २७ सफर. बहुत काय लिहिणे? लेखनसीमा.

श्री

राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव
बल्लाळ प्रधान.

पत्रांक १२

पो। १५ जिल्काद. श्री. १६८५ भाद्रपद वद्य ८

राजश्री मोरोजी शिंदे नामज़ाद तालुके रत्नागिरी गो। यांसि:—

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुा। अर्बा सितैन मया व अलफ. बा। देणें धर्मादाव. वो। केशव भट गोखले, वास्तव्य मौजे सोमेश्वर, ता। हरचिरी, यांजकडून मौजे मजकुरीं श्री सोमेश्वरास नित्य एक एकादशनी करविली. त्याबा। दक्षणा साल गुा। ची रु ७५ पाउणसे एक सालाची तुह्मांकडून देविले असे. तरी तालुकेमजकूरपैकीं पावे तें करून, पावलियाचें कब्रज घेणें. जाणिजे. छ २२ रबिलावल. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

श्री शिव
राजा शाहु नरपति हर्ष-
निधान माधवराव
बल्लाळ प्रधान.

पत्रांक १३ श्री (नकल) १६८५ पौष शुद्ध १ *

राजश्री सोमाजी काळे गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुा। अर्बा सितैन मया व अलफ. विजापूरप्रांतीं सरंजाम राजश्री नरसिंगराव जनार्दन यांस दिल्हा आहे. त्याचा बंदोबस्त राहणें. त्यास, मशारनिल्हेस ते प्रांतीं रवाना केला असे. तरी तुह्मीं त्यास सामील होऊन, ठाणें बसवून देणें. जाणिजे. छ २९ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक १४ श्री (नकल) १६८५ पौष शुा। १

राजश्री रामभाऊ डफळे गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. सुा। अर्बा सितैन मया व अलफ. राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे यांस सरंजाम दिल्हा आहे. त्याचा बंदोबस्त होणें. याजकरितां मशारनिल्हेची रवानगी केली असे. त्यास, तुह्मीं त्यांस सामील होऊन विजापूरप्रांतीं त्यास महाल दिल्हे ते ठाणीं बसवून देणें. जाणिजे. छ २९ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक १५ श्री. १६८५ पौष शुा १

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव ब-
ल्लाळ मुख्य प्रधान.

दस्तक सरकार राजश्री पंत प्रधान बताा कमाविसदारान व चौकीदारान व रहदारान व बाजेलोकान व जकाती महालानिहाय. सुा अर्बा सितैन मया व अलफ. राजश्री बाळाजी जनार्दन यांचे बैल सर १५० दीडसें मौजे धामणगांव, पाा अकोले, येथून गल्ला कैली खंडी १५ भरोन पुणियास आणितील. त्यास आणूं देणें. हांसिलाचा तगादा न लावणें. जाणिजे. छ २९ जमादिलाखर. आज्ञाप्रमाण लेखनसीमा. बार.

पत्रांक १६ श्री. १६८५ पौष शुा १

राजमान्य राजश्री गणेश व अंताजी मल्हार दिा रामजी पवार गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा अर्बा सितैन मया व अलफ. राजश्री बाळाजी जनार्दन यांचे इमारतीचे रायवळ लांकडांचे गाडे घांटाखालून पुण्यास येत होते. ते तुह्मीं मौजे वडगांव येथें अटकाविले आहेत, ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्यावरोन लिहिलें असे. तरी, तुह्मीं मशारनिलेचे गाडे लांकडाचे अटकावले आहेत. ते व आणिही घांटाखालीं लांकडे तोडिलीं आहेत तीं दस्तकाप्रमाणें पुणियास आणितील. त्यांस आणूं देणें. अडथळा न करणें. जाणिजे. छ २९ जमादिलाखर. आज्ञा प्रमाण. लेखनसीमा.

पत्रांक १७ श्रीशंकर. १६८५ फाल्गुन वद्य ११.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री
बाळकृष्ण दीक्षित स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी नारो कृष्ण जोशी कृतानेक नमस्कार विनंति येथील कुशल ताा फाल्गुन वाा ११ मुक्काम लष्कर नजीक मनोली जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. आपलीं एकदोन पत्रें आलीं कीं, ऐवज वेऊन जावा.

आणि राजश्री धोंड जोशी यांसीं भाषण केलें. त्यांनीं आह्मांस लिहिलें. त्यांत मजकूर त्यांनीं सुचविला कीं, तीर्थरूप राजश्री भाऊचें पत्र पाठविणें कीं, ऐवज देणें. ह्मणोन, त्यावरून, तीर्थरुपाचें पत्र पाठविलें आहे. पावेल. ऐवजाचा मजकुर तरी. श्रींत देविला असतां तरीं उतरून घेतों. हा मजकूर राजश्री जोशी यांनीं आपणांसी केला. आपण उत्तर केलें कीं, येते समयीं बरोबर आणिला. बरें! उत्तम! हालीं मशारनिल्हेचें आपलें भाषण जाहालें आहे, त्याप्रमाणें ऐवज पुणियांत उतरून द्यावा, सोनें व रुपें याचे दागीने आणिले असतील ते दागीने यादी बरहुकूम द्यावे, नख्त ऐवज पुणीयांत उतरे तें करावें· याजखेरीज चौकडा व आणखीं कांहीं मोतेंयाचे दागीने असल्यास, तेहीं त्यांचेच हवालीं करावें. राजकी वर्तमान तरी: हैदरनाइक बिदनूरची झाडी धरून बसला आहे. बाहेर निघत नाहीं. श्रीमंत मनोलीस लागले होते. आठ रोज ठाणें मांडलें. हस्तगत करून धारवाडास जाणार. तो कांहीं यांसी सन्मुख येऊन भांडतां दिसत नाहीं. फौज यांजबराबर वीसपंचवीस हजार जमा जाहाली. मागाहून आणखी येत आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें? लोभ किजे. हे विनंति,

पौ. चैत्र वद्य ६ शनवार शके १६८६

पत्रांक १८ श्री १६८५ फाल्गुन वद्य १३

राजश्री सर्वोत्तमपंत गोसावी यांसीः——

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माधराव शिंदे दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री नारायणजीनाइक सरपाटील, प्रांत साष्टी, यांस रुपये ५००० पांच हजार द्यावे, ह्मणोन छ ५ रजबचें पत्र पाठविलें. त्यावरून पुणेंकर सावकाराचें कर्ज घेऊन दिल्हें. त्यास, हालीं रा चिंतो माहारुद्र पाठविले आहेत. यांसमागमें सदरहू रुो पाठवावे, ह्मणोन लिहिलें. ऐशियास, आठंपधरा रोजीं नालबंदीचें काम चालीस लागलें ह्मणजे ऐवजाची तर्तूद करून पाठवून देऊं. वरकड वर्तमान रा चिंतो माहारुद्र सांगतां कळे-

ल. रा छ २६ रमजान, सुा अर्बा सितैन. बहुत काय लिहिणें? हे विनंति. मोर्तबसुद.

श्रीजोतिस्वरूप चरणि तत्पर जयाजीसुत जनकोजी सिंदे निरंतर

पत्रांक १९ श्री. १६८६ चैत्र शुद्ध ३

राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे. विशेष. प्रगणें सारवाड येथील जाहागिर सरंजाम सालमजकुरीं फौजेचे बेगमीस सरंजाम राजश्री नरसिंगराव जनार्दन यांजकडे दिले आहे. त्यास, त्यांचे ठाणें अद्यापि महालांत बसले नाहीं, ह्मणोन मानिल्हेनीं अवगत केलें. त्याजवरून पत्र लिहिलें असे. तरी, तुमची फौज ते प्रांतीं आली असेल. त्यास सांगून ठाणें सारवाडांत बसतें करावें. रा छ २ सवाल. बहुत काय लिहीणें ? लोभ किजे. हे विनंती.

श्री राजाराम नरपति हर्षनिधान माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान.

पत्रांक २० श्री. १६८६ चैत्र वद्य १४

राजश्री मोरोजी शिंदे नामजाद ता। रत्नागिरी गोसावी यांसी:--

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। रघुनाथ बाजीराव आशिर्वाद. सु॥ आर्बा सितैन मया व अलफ. रा। अंताजी नारायण याजकडून पेठ बंदर ता। हरचिरी येथून आंबसोल आणविलें असे. तरी, च्यार बेगारे देऊन, आंबसोल पोहोचाऊन देणें. जाणिजे. छ २८ सवाल. बहुत काय लिहिणें ?



*ह्या शिक्याला पांच वर्तुलें आहेत. हा रघुनाथरावदादांचा शिक्का ! बिचाऱ्याचें सर्वच कांहीं आचरट!

पत्रांक २१ ॥ श्री ॥ १६८६ श्रावण शुद्ध ३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव-दिक्षित स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. शहरास जावयाकरितां निजामअल्लीखान गंगा राक्षसभुवनांनजीक उतरूं लागले. कांहीं फौज व बाहिरबुणगे पलीकडे गेले. नावपिना व सरदार व विठ्ठलदास दाहापंधरा हजार फौजेनिशीं इकडे होते. त्याचें पारिपत्यास जाऊन, छ २९ मोहरमीं गाठ घातली. मातबर लढाई झाली. विठ्ठलदास व विनायक दास, गोपाळसिंग खंदारकर वगैरे ठार जाले. मुरादखान व रघुपतराव पिंगळे, मालोजि घोरपडे, बाबूराव जंगी वगैरे पाडाव जाले. त्यास, माणूस पाचसास हजार रणास आले. श्रीकृपेनें मोठी फत्ते जाली. तोफा, हत्ती सापडले. निजाम अल्लीखान पडतीरास होते. ते मध्यें रात्रीं कूच करून, तोफा व डेरे टाकून, पळोन गेले. संतोषाचें वर्तमान तुह्मांस कळावें, याजकरितां लिहिलें असे. र॥ छ ३ सफर. * बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

* येथून अक्षर खाशाचें.

पत्रांक २२ श्री. १६८६ कार्तिक शुा ५

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य . राजश्री
रामचंद्र बसवंत गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा खमस सितैन मया व अलफ. राजश्री दमाजी गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर यांजवर राजश्री रामचंद्र महादेव परांजपे व मार्तंड नाईक तासके साहुकार यांस राजश्री मल्हारजी होळकर यांचे ऐवेजीं दोन लाख रुपयाची वरात रदकर्जाची पेशजीं दिल्ही आहे. त्यापैा कृष्णाजी नाईक लाडू यांजवळ एक लाख रुपयांच्या मात्र वराता कमाविसदारांवर दिल्यात. बाकी लाख रुपये राहिले ते देत नाहींत. सरकारांत इस्ताफा ऐवज पावला आहे, म्हणोन नाईकमानिले यांजवळ सांगितलें. त्याजवरून, सुा सन सलास ताा सन अर्बा दुसालां गाइकवाडाकडील ऐवजाचे वसूलबाकीचा हिशेब अलाहिदा पाठविला आहे. त्या हिसेबीं रुा ८७७६।– आठ हजार सातसें सवा शाहात्तर रुा आणा मात्र फाजिल आहे. त्यास, सालाचे सालांत मुदतीप्रमाणें ऐवज यावा तो न आला. त्याचें व्याजहि होणें आहे. व सालमजकूरचा ऐवजहि येणें आहे. असें असोन, होळकराचे ऐवजास हिसका द्यावा, यास कारण काय ? हा ऐवज सालगुदस्तांच द्यावा, तो न दिला. होळकराकडील कारकून गंगाधर येशवंत याचे पुत्र व राऊजी माहादेव ऐसे तीर्थरूप राजश्री दादासाहेब यांजवळ आहेत. त्यास, दोन लाख रुपयांचा निर्गम झाल्याशिवाय निरोप होत नाहीं. सरकारांत ऐवजाची निकड. याजकरितां नाईक मारनिलेपासून ऐवज घेऊन वरात दिल्ही, त्यास ऐवज जरूर पावला पाहिजे. याजकरितां हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी पत्रदर्शनीं लाख रुपयांच्या पुण्याच्या हुंड्या नाईकमारनिलेस देऊन, पावल्याचें कबज घेऊन, हुजूर पाठवणें. फिरोन बोभाट हुजूर येऊं न देणें. जाणिजे. छ ३ जमादिलावल.*

पत्रांक २३ श्री. १६८६ कार्तिक वद्य ६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र बसवंत स्वामी गोसावी यांसी—

पो माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. राजश्री दमाजी गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर याजकडे सरकारचा ऐवज येणें. त्याचे वसुलास हुजुरून

---

* असलेंच ह्या तारखेचें पत्र दमाजी गायकवाडास माधवराव बल्लाळकडून गेलेलें आहे.

राजश्री बाळाजी अनंत कारकून यांस पेशजीं पाठविलें होतें. त्याजबराबर गायकवाडाकडील ऐवजाचे वसूलबाकीचा झाडा पाठविला तो सरकारांत दाखल जाहाला. त्यांत सवा लाख रुपयांच्या हुंड्या राजश्री आबाजी नाईक कापरस व कृष्णाजी नाईक लाडू यांचे गुजारतीनें सरकारांत हुजूर भरणा जाला. ह्मणोन झाड्यांत वसुल घातले आहेत. त्यापैकीं परभारें वरातदारांस ऐवज पावला. वराता व कबजें येणें आहेत, रु॥ ५९२२५. बाकी ऐवज राहिला रुपये ६५७७५, पांसष्ट हजार सातशें पंचाहत्तर रुपये राहिले. हा ऐवज तुह्मांकडे खुद निसबत राहिला. त्यास, सरकारांत ऐवजाची निकड, हें पुर्ते तुह्मांस ठावकें असोन, गायकवाडापासोन ऐवज घेतला असतां, सरकारांत भरणा केला नाहीं, हें अपूर्व आहे! असो! हालीं हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी सदरहू पांसष्ट हजार सातशें पंचाहत्तर रुपये ज्या मित्तीनें घेतले असतलि, त्या मित्तीपासून व्याजसुद्धां ऐवजाच्या हुंड्या साहुकारी पुण्याच्या पत्रदर्शनीं राजश्री रामचंद्र माहादेव परांजपे व मार्तंड नाईक तासेके यांस देऊन, पावल्याचें कबज घेऊन, हुजूर पाठवणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ ४ जमादिलावल, सु॥ खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक २४ श्री १६८६ माघ वद्य १३ सह १४

वेदमूर्ती शास्त्रसंपन्न राजश्री दीक्षितबावा स्वामी महाराजांचे सेवेसी—

चरणरज खंडोजी अरगडे, मु॥ लष्कर तुंगभद्रा, नजीक हरहरेश्वर, साष्टांग दंडवत विनंति उपरी येथील कुशल ता॥ माघ वा॥ १४ चतुर्दशी सोमवार पावेतों तुमचे आशिर्वादें करून सुखरूप असो. यानंतर तुह्मांपासून स्वार जालें. त्यास, तुह्मीं माणूस बराबर दिल्हें होतें तें फलटणपर्यंत आलें. तेथून न पुसतां माघारा गेला. तुह्मीं बाबूजीनाईकास व कृष्णराव बल्लाळ यांस पत्रें दिल्हीं होतीं. त्यास, बाबूजी नाईक बारामतीस गेले. त्याजपाशीं बारामतीस मीहि पत्रें घेऊन गेलों. त्यांस पत्र प्रविष्ट केलें. त्यांनीं उत्तर दिल्हें कीं, तुह्मीं पुढें चला, मीहि मागाऊन येतों. त्याजवरून, लष्करांत आलों. कृष्णा रावजीसही पत्र प्रविष्ट केलें. व श्रीमंत साहेबांसही पत्र प्रविष्ट केलें. श्रीमंतांनीं चिटणिसांस ताकीद केली कीं, दीक्षितांच्या नांवाच्या सनदा करून देणें. त्याजवरून सनदा करून आणिल्या. तारीख, विनंति, करावी इतकाच गुंता होता. तों मोरोबा फडणवीस बोलिले कीं, महाराज! दिक्षितांत दोहीं चुलत्या पुतण्यांचें पटत नाहीं. त्यास, देणें तर विचारून द्यावें. बाबादीक्षितांचें तालुकियांत गांव यावा, ऐसाहि अर्थ नाहीं. यांजवरून, तारखा व विनंति पत्रावर जाहली नाहीं! आबाजी माहादेव यांनींहि साहित्य केलें. परंतु सखारामबापू

व कृष्णराव बल्लाळ व फडणवीस वगैरे, लक्ष्मण अनंत यांच्या पल्यांत आहेत. त्यांचा पक्ष बहुत करितात. याजमुळें कामास अडथळा पडला आहे. इतकियावर स्वामीचे आशिर्वादेकरून प्रयत्नास चुकत नाहीं. पुढें जे वर्तमान होईल तें लिहून पाठवूं. कळावें. इकडील वर्तमान तरः श्रीमंत दादासाहेब आलियावर, हरपनाळीची व चित्रदुर्गची खंडणी घेऊन, हरिहर किल्ला घेतला. येथून हैदरनाईकाकडे चालिलें. पुढें हरवळीस निळकंठराव आठ दहा हजार फौज घेऊन व तोफखाना घेऊन पाठविले. हेहि मागाऊन जातात. हैदरनाईकाचे वकील आले आहेत कीं, खंडणी तीस लाख रुा घ्यावे आणि सल्ला करावा. त्यास, हे ऐकत नाहींत. झुंज करून आपला मुलूख घ्यावा आणि त्यानें आपल्या देशास जावें. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें ? लोभ किजे, हे विज्ञापना. खर्चाची बहुत आबळ आहे. माहागाई बहुत आहे. सो माहादाजीनाीचा द्वारें यांचा साष्टांग नमस्कार. विनंती कीं, लिा परिसोन माया असो द्यावी, व घरीं मुलांलेकरांचा समाचार घेत जावा. तुमच्या छायेखालीं आहेत. हे विनंती.

हें पत्र पहिलें लिहिलें होतें, परंतु कोण्ही माणूस वळखीचें तिकडें न आलें, ह्मणून आतां पाठविलें असे.

पत्रांक २५ (नकल) १६८६ फाल्गुन वद्य ९

पो। चैत्र शुद्ध ९ रवीवारीं पावणेदोन प्रहरां पत्र आलें, काशिदास अर्ध रुपया दिल्हा असे, } श्रीराम,

श्री वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित स्वामीचे सेवेसीं:—

चरणरज खंडोजी अरगडे दंडवत विनंति उपरी येथील क्षेम ता फाल्गुन वद्य ९ पावेतों श्रीमंत साहेबांचे सैन्यांत सुखरूप असें. आपली आज्ञा घेऊन स्वार जालों तों सैन्यांत पावलों. आपलीं पत्रें श्रीमंतास प्रविष्ट केलीं. परंतु कोणी आपले जाबसालांत कारभारी मन घालीनात! आपण नित्य घरोघर फिरोन राहिलों. लक्ष्मणपंतीं रा गुरुजी, माहादाजीपंत मुरब्बी केलेत. त्यांनीं श्रीमंतांस समजाविलें कीं:—उभयतां राजश्री दीक्षित स्वामी आपले आपल्यांत कळा कादितात. गांव सुधा नांदूं देईनात. ह्मणोन सालमजकूरीं यांजकडून कमावीस दूर करून नारो बाबूजी भिडे यांजकडे कमावीस सांगितली आहे. ऐवज मौजे मजकूरचा वेदमूर्ती स्वामीकडे जमला आहे. पैकीं देवविला आहे, सांप्रत हें पत्र त्याचें आलें. उत्तर दिल्हें पाहिजे. याजवरून, उत्तर दिल्हें कीं, यांस पत्र लिहितों जे, हालीं नवा कमावीसदार केला आहे, तो उत्तमच आहे, ऐवज तुह्मांस पावतां करील. हें उत्तर रा रामाजी

बाबा चिटणीस यांणीं लिहिलें. तेथें सदाशीवपंत वैजनापुरकर कार्यामुळें आले होते. त्यांणीं पत्र पाहून आह्मांस ह्मणालें कीं, हें उत्तर काय कामाचें आहे? मग, त्यांनीं रामाजीबाबास लक्ष्मणपंताचा स्तुतिवाद सविस्तर केला, तो पत्रीं लिहितां विस्तार आहे. त्याजवरून रामाजीबावांनीं एकान्तीं सविस्तर वर्तमान श्री राजश्री रावसाहेबांस विदित केलें. त्याजवरून आज्ञा जाली कीं, पहिले प्रमाणें सनद करून देणें. हे परवानगी फडणिसांकडे पोंचविली. परंतु गुरुजी-बावांनीं न मानितां टाळा दिल्हा! उपरांत रा सदाशिवपंत वैजनाथपुरकर व आपण रामाजीबावांस सांगून, दुसरी परवानगी मोरोबा फडणीस यांजला पावती केली. निदान गुरुजींनीं रा मोरोबादादास सांगून रा नारो बाबाजी सुभेदार यांचे नांवें सनद देवविली. ते सनद तयार जाली. आपण घेऊन येत होतों. तों त्यास रा सदाशिवपंत पाळंदे यांनीं बोलावून वर्तमान पुसलें. जालें वर्तमान यांस विदित केलें. ते ह्मणालेत कीं, मजलाहि याविषयीं पत्र आलें आहे, च्यार रोज राहतां नव्या सनदा भेंडाळियाच्या व नळकियाच्या करून देतों. याजकरितां गुंता जाला आहे. राजश्री बाबूजी नाईकहि आले आहेत. हैदरनाईकाचा जाबसाल लागला आहे. यामुळें गुंता दिसतो. सविस्तर वर्तमान सदाशिवपंत वैजनाथपुरकर यांनीं लिहिलें आहे. विदित होईल. आपले आशीर्वादेंकरून बोलबाला आहे. श्रुत होय हे विनंती.

पत्रांक २६ श्री. १६८७ आषाढ वद्य २

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यासीः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सुा सित सितैन मया व अलफ. खासा स्वारी श्रावण वद्य पक्षीं बाहेर निघणार. तर तुह्मीं आपले पथकाचे लोकांची तयारी ऐव्हांपासून करून, भाद्रपद शुद्धांत हुजूर येणें. विलंब न लावणें. जाणिजे. छ १५ मोहरम. बहुत काय लिहिणें?

पत्रांक २७ श्री. १६८७ आषाढ वद्य ५

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसीः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुा सित सितैन मया व अलफ. खासा स्वारी श्रावण वद्यांत बाहेर निघणार, तर तुह्मीं आपली एव्हां पासून तयारी करून भाद्रपद शुद्धांत येणें, जाणिजे, छ १८ मोहरम बहुत काय लिहिणें?

पत्रांक २८ श्री. १६८७ आषाढ वद्य ३०

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा सित सितैन मया व अलफ. तुमचे सरंजामांत महाल:—

१ प्रां गुंजोटी.
१ प्रां सारबाड.
१ प्रां घाट-नांदूर.

———
३

तीन महाल सरंजामांत आहेत. परंतु अमल बसला नाहीं. नबाब निजाम अलीखान याजकडील अमिलांनीं महाल दाबिले आहेत, याजकरितां नबाबास लिहिलें होतें. त्यावरून त्यांनीं सदहू तीन महालचे अमिलांस तीन पत्रें व जमीदारांस तीन पत्रें, एकूण सहा पत्रें, पाठविलीं आहेत कीं, अमल सुरळीत देणें. तीं तुह्मांकडे पाठविलीं आहेत. सनदा महालीं रवाना करून, ठाणीं आपले हवालीं करून घेऊन, महालचा बंदोबस्त करणें. सनदा पावल्याचा जाब पाठऊन देणें. जाणिजे. छ २८ मोहरम. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक २९ श्री १६८७ भाद्रपद वद्य ९

राजश्री खंडेराव जाधव यांसी:—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद सुा सितैन मया व मया व अलफ. बद्दल देणें राजश्री सदाशिव दिक्षित व पुत्र नारायण दिक्षित ठकार आश्रित हुजुरात सन ईदिदेसितैनले वेतन प्रमाणें बाकी राहिली. तेव्हां ३९०० तीन हजार नऊशें रुपये देविचे असते. तरी तुह्मांकडे पो गाडापूर वगैरे महाल येथील बाबतीचा ऐवज सालमजकूरचा येणें त्या मैा सदरहू एकुणचाळीस शें पावते करून पावलि-

याचें कबज घेणें. सदरहू ऐवज माघ-मासीं पावता करणें. जाणिजे छ २१ रबिलावल. बहुत काय लिहिणें ?

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव
बल्लाळ मुख्य प्रधान.

लेखन
सीमा

पत्रांक ३०

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव बल्ला-
ळ मुख्य प्रधान.

श्री. १६८७ आश्विन शुा ६

राजश्री हवालदार व कारकून किले
वंदन गोसावी यांसी

अखंडित-लक्ष्मी-आलंकृत राजमान्य स्नो माधवराव बल्लाळ प्रधान आसीर्वाद व नमस्कार. सुा सीतैन मया व अलफ. वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दिक्षित ठकार यांनीं विदित केलें कीं किल्ले मजकुरीं सभासदीची असामी आपल्याकडे च्यारशें रुपयाची चाळीस वर्षें चालली. अलीकडे दोनशें रुपये करार करून दिल्हे. त्याप्रमाणें चालत असतां, वर्षासन रुपये १२ बारा किल्याकडील पावत असोन, किल्ला राजश्री बाबूराव सदाशिव याजकडे जालियापासून सदरहू असामीचे रुपये व वर्षासन पावत नाहीं. ह्मणून ऐशास दरसाल दोनशे रुा पावत असतां हालीं न पावयास कारण काये ? तरी, याजउपरी सदरहू दोनसे रुपये सालाबाद पावत आलिया

प्रो पाववीत जाणें व चाळीस वर्षें बारा रुपये वर्षासन पावत आल्याबमोजीब पाववीत जाणें. जाणिजे. छ ४ रावर. आज्ञाप्रमाण.

लेखन सीमा

पत्रांक ३१ श्री. १६८७ कार्तिक वद्य १

रोखा राजश्री येशवंतराव दामोदर हवालदार तो सोंदळ ता कमावीसदार व मौजे कल्या......ता मार सुा सीत सितैन मया व अलफ. भिकाजीराम कुळकर्णी मौजे मार यांनीं माहालीं येऊन विनंति केली कीं, मौजे मारचें कुळकर्ण आपणाकडे चालत आहे त्यास, खोतीचा गांव खो बाजेगांव खोतीचे शिरस्तेप्रमाणें दुसाला कुळकर्ण मुा शिरोळी खंडी अज शेत पिकास एक कुडव व वजनी जिन्नस दर मणें अज पिकास एक शेरप्रमाणें पावत आलें असतां गुदस्तां सन खमसांत मौजे मारेच का दार यांणीं आरमाराकडेस सुभां जाऊन गैरवांका समजाऊन ऐन जिन्नस दूर करून नक्त मुशाहिरा घेणें ह्मणोन सनद आणिली; त्याजवरून भिकाजीराम हुजूर जाऊन आपली पूर्व हकीकत सांगितल्यावरून बाजेगांवचें खोतीचे शिरस्त्याप्रमाणें शिरोळी दर खंडीस एक कुडव व वजनी जिनसास एक शेरप्रमाणें ऐन जिन्नस मुशाहिरा देत जाणें. अशी सुभा सनद सादर जाहाली. त्याजवरून [व] सुभांची माहाली जाहाल्यावरून हे रोखा सादर केला असे. तरी भोंवरगांव खोतीचे आहेत. त्यास शिरस्त्याप्रमाणें मार निल्हेचा मुा ऐन जिन्नस देवणें. कजिया असल्यास माहालीं येणें जाणिजे. छ. १३ माहे जावल. मोर्तब सुद. बार.

पत्रांक. ३२.

श्री. (असल बमोजिब नकल.)

१६८७ कार्तिक वद्य. ६

(शिक्का थोरले माधवराव साहेबांचा)

यादी. पथक व पागा निा राजश्री विसाजी कृष्ण. सुा सीत सितैन मया व अलफ. सरंजाम त्रि तपशील:—

किता पा वगैरे.

१ पो आलद.
१ पो गुंजोटी.
१ पो शाहापूर.
१ पो माचनूर.
१ पो मौजे पुलंज पो माहोल.
१ पो आलमेल.
=
६

निंबाळकराकडील रांजणगांव वगैरे देशचेमोबदले याचे सुटतील ते दरोबस्त सरकारचा अमल मारनिल्हेकडे करार करून द्यावा. येणेंप्रमाणें निंबाळकराचा करार जालियावर सनदा देणें.

पांच परगणे, एक गांव, येणें प्रो मारनिल्हेकडे फौजेचे बेगमीस करार करून देऊन सनदा देणें. पो सागोलें द्यावयाचा करार केला आहे. त्यास, राजश्री दादासाहेबांची भेट जालियावर तिकडून सोडून मारनिल्हेकडे देविला जाईल. येणेंप्रमाणें करार. कदाचित् न सुटल्यास, त्याचे मोबदला याच प्रो. दुसरा माहाल नेमून देविला जाईल. येणेंप्रो करार.

त्यांनीं क्षेप निक्षेप पावावे. येणें प्रो करार.

विठल कृष्ण यांस पालखी सालमारीं देऊन तैनात पालखीस बारमाही १००० एक हजार रुा नेमला ऐवज याशिवाय हरएक ऐवजीं पावते करावें. येणेंप्रो करार.

पा बीड येथील दिगरजाहागिरीचे गांव रामचंद्र गणेश यांचा ऐवज व दुमाले वजा करून, बाकी दरोबस्त सरकाच्या अमलाची सनद देणें. पो शाहापुरची सनद सालमजकुरीं दिल्ही परंतु रा गोपाळराव गोविंद यांची भेट जाहलीयावर त्यांची सोय करून परगणा तुह्मांकडे सोडून देविला जाईल. तूर्त तुह्मी अमलास पो मजकूरीं खलेल करूं नये. येणेंप्रो करार. बिनी रखवालीचा ऐवज आकारेल तो सालमजकुरीं पथकाकडे पंधरा हजार द्यावे. बाकी सरकारांत जमा करावे. येणेंप्रो करार.

निंबाळकराकडील गांव न सुटले तरी त्यांचे मोबदला दुसरे परगणे नेमून द्यावे येणेंप्रो स्वदेशीं नेमून द्यावे. येणें प्रो करार.

छ १५ जमादिलावल, सीत, कार्तिकमास, सनदा लिहिणें.
असल दप्तरीं असे. छ २५ जोवल.

पत्रांक ३३ श्रीरामचंद्र. १६८७ कार्तिक वद्य ७

राजश्री कृष्णाजी नाईक........कापडकरी साहुकार वगैरे निा पंतप्रधान गोसावी यांसी:—

अखंडित लक्ष्मीअलंकृतराजमान्य स्नो दमाजी गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादुर. सुहुरसन सित सितैन मया व अलफ. तुमच्या......जकातदार यांजवर सादर.........स वरातांपैकीं निमे ऐवजपौष अखेर घेणें. बाकी राहिला ऐवज निम्मे तो फाल्गुन अखेर घेणें. करारशिवाय जासती उपद्रव मेदत मजकूरास न देणें. खर्चवेंच जो घ्याल तो वरातेपैकीं मजरा असे. जाणिजे, छ २० माहे जमादिलावल. मोर्तबसुद.

—श्री—
श्रीराजाराम छत्रपति अ-
खिल प्रौढप्रताप पुरंदर
दमाजी गायकवाड सेना-
खासखेल समशेर ब-
हादर

पत्रांक ३४ श्री १६८८

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री संक्राजपिंत पराडकर स्वामीचे सेवेसीं:—

पो राघो केशव भट सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत असावा (इकडील वर्त-) मान तरी राजश्री अंताजीपंत जादा हिंदुस्तानांत श्रीमंत दादाबरावर सुखरूप आहेत. हमेशा पत्रें येत असतात. मी लष्करांतून आलों ते समयीं मजला भेटले होते. त्यांस पत्र पाठविणें तरी आह्मांकडे पाठवीत जावें. पोहोंचतील. राजश्री संक्राजीपंत दाजीस गुलाबी चंदनाविशीं लिहिलें आहे. ते चंदन देतील तो घेऊन आह्मांकडे पाठऊन द्यावा. पैका पडेल तो तुह्मीं देऊन आह्मांस लिहून पाठवावें. रुपया पाठऊन देऊं. इ०इ०इ०

पत्रांक ३५. श्री. १६८८ वैशाख वद्य ७

तीर्थस्वरूप राजश्री गणेशभट दादा वडिलांचे सेवेशीं:—

अपत्यें दामोदरानें चरणांवर मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंति येथील क्षेम ता. वैशाख वा ७ मंदवार, मुक्काम पुणें, सुखरूप असों. विशेष. आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन सविस्तर वर्तमान कळों येत नाहीं. तरी ऐसें न करावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करीत जावें. यानंतरीं येथून हुंडी साडे तेरा रुपयांची मुंजावर केली आहे. त्यास मुंजाकडून साडे तेरा रुपये घेऊन वो बाळोपाध्ये हर्डीकर खिणगिणी यांस पावते करावे. पूर्वीं माणसाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. शरीरास समाधान नाहीं ह्मणोन माणसानें सांगितलें. त्यास, औषधीउपाय करून शरीरास आरोग्य होय तें करावें. इकडील वर्तमान तरी, श्रीमंत राजश्री दादा हिंदुस्तानांत नर्मदा उतरोन गेले. बळवंतराव थोरले श्रीमंतांसमागमें पुण्यास आले. श्रीमंत राजश्री तात्या वडील माणसें सर्व सुखरूप आहेत. कळावें ह्मणोन लिहिलें आहे. येजमानाविशीं देवास प्रार्थना करीत जावी. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा, हे विनंति.

पत्रांक ३६. श्री १६८८ आषाढ शुद्ध ९

पो आषाढ वा १ शके १६८८ व्ययनाम संवत्सरे.

श्रीमंत राजश्री बाबूराव साहेबांचे सेवेसीं:—

सवक बयाजी बागडे दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असावें. विशेष. तुमचे रुा आह्मांकडे आहेत. त्यांपैकीं रा विसाजीपंत गोळवलकर यांजवर चिठी रुा ७०० अक्षरीं सातशें, गंजी कोट–आरकाट, यांची चिठी राजश्री रामाजी गोविंद वल्हेकर यांणीं दिली आहे. सदर्हु चिठीचे रुा घेऊन पावलियाचें उत्तर पाठऊन दिल्हें पाहिजे. मिति शके १६८८ व्ययनामं संवत्सरे आषाढ शुा ९. सदर्हु ऐवज आपण येथें अंताजीपंतनाना यांजजवळ देत होतां. एक महिना जाहाला. परंतु ते न घेत. याजकरितां तुह्मांकडे ऐवज पाठविला असे. तुमची बाकी राहिली तेहि पंधरा दिवसां घेऊन येतों. बहुत काय लिहिणें ? कृपा करीत असावें. हे विनंति.

पत्रांक ३७ श्री. १६८८ आषाढ वा ३

राजश्री आनंदराव धुळप गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधव बल्लाळ प्रधान अशिर्वाद. सुरसन सबासितैन मया व अलफ. विठ्ठलराम कुळकर्णी मौजे केळवली ता

सौंदळ यांणीं विदित केलें कीं, मौजे मजकूरची खोती कृष्णप्रभु देसाई, ता मजकूर यांजकडे आहे. त्यांणी गांवचीं भुतें आह्मांवर घातलीं. त्यामुळें आपला नाश बहुत जाहाला तेव्हां आनंदराव धुळप यांणीं त्याचें व आमचें वर्तमान मनास आणून, गांवकरी यांचे गुजारतीनें भुतें आपणावरी देसाई यांनीं घातलीं हें खरें जाहालें ! त्याप्रमाणें भुतें वारा (वया) विषीं देसाई यांणीं कतबा दिल्हा. परंतु मुदतीस वारलीं नाहीं ! आणि बाळाजी कृष्ण माईणकर यास देसाई यांणीं खोती सांगितली. त्याजवर मागती पडधळे बाळानें, भुतें देसाई यांचे शद्वें पडलीं. ऐसें निवडलें ! त्याप्रमाणें वारितों ह्मणून बाळाजी कृष्ण माईणकर यानें कबूल केलें. परंतु वारिलीं नाहीं ! आह्मांस भुतें उपद्रव करितात ! त्यास येविषींची आज्ञा करावी. ह्मणोन, त्याजवरून, तुह्मांस पत्र सादर केलें असे. तरी कृष्ण-प्रभु देसाई, बाळाजी कृष्ण यांस व त्याचे कजाचे कागद तुह्मांपाशीं असतील ते हुजूर पाठविणें हरदु वादियांचें वर्तमान मनास आणून ज्याकडे अपराध लागेल त्याचें पारिपत्य केलें जाईल. जाणिजे. छ १६ सफर. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक ३८. श्री. १६८८ श्रावण शुद्ध ५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव कोनेर गोसावी यासी:—

पो माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणे. विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ठ जाहालें. वऱ्हाडांतून येतां स्वामीचें दर्शन करून घरास यावें. त्यास मोंगलाचें सैन्य मध्यें होतें. यास्तव अनुकूल न पडलें—याचा अर्थ लिहिला तो सविस्तर कळला. घरीं गेला, उत्तम केलें ! तूर्त कांहीं नवीन प्रकार नाहीं. पुढें जसा प्रकार दृष्टीस पडेल तदनुरूप तुह्मांस लिहिलें जाईल. जाणिजे. छ. ३ रबिलावल. सुा सबा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंति.

पत्रांक ३९. श्री सांब. १६८८ भाद्रपद.

आशीर्वाद उपरी. आपणासी करार केल्यावरी त्यांत तफावत करावयाची नसतां, आपणांस विश्वास नसे. असो ! अत:पर तऱ्ही खातरजमा जाहली असेल. लाखोटीयावर मोर्तबें करून देववितों. दोन प्रहरीं रवाना करावें. *

---

* हें पत्र खुद रघुनाथराव दादा यांच्या हातचें आहे.

पत्रांक ४०. श्री १६८८ भाद्रपद शुद्ध ५

सेवेसी गोविंद शिवराम व चिंतो अनंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. स्वामीची आज्ञा घेऊन निघालें तो मंगळवारीं संध्याकाळीं श्रीमंतांजवळ आलों. सर्व वर्तमान निवेदन केलें. त्यास, गुरुवारीं भेटावयाचा मुहूर्त पाहिला होता तो निवेदन केला. त्यास, येथील मर्जी कीं बुधवारीं संध्याकाळींच भेट जाहली पाहिजे. येथील पंच्यांगीं गुरुवारीं दिनक्षय आहे. रेवती नक्षत्र श्रीमंतांचें घात नक्षत्र आहे. यास्तव बुधवारींच भेटावें हाच निश्चय केला पाहिजे. संध्याकाळपर्यंत सुमारें सत्वर यावें. फौज बराबरील सारीच आणावी, अशी येथील मर्जी आहे. जर फौज मागें ठेविली, तरी फौजेची वाट न पाहतां बुधवारीं संध्याकाळींच यावें. हत्ती अंबारिया आणाव्या. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ४१. श्री १६८८ भाद्रपद शुद्ध ५

सेवेसी गोविंद शिवराम सां नमस्कार विज्ञापना. आज्ञा घेऊन आलें. श्रीमंतांचें दर्शन जाहलें. बोलणें बहुत जाहलें. गुरुवारचा मुहूर्त वाईट आहे. दादासाहेबांचें घातनक्षत्र आहे. यास्तव बुधवारींच भेटी व्हाव्या, हा निश्चय ठरला. गंगा उतरून शें दोनशें राउतांनिशीं येणार. वरकड कांहीं गुंता नाहीं. बेवसवास यावें. हे विज्ञापना.

पत्रांक ४२. श्री १६८८ भाद्रपद शुद्ध ६

शिक्का नकल.

इ मा अनाम देशमुख व देशपांडे, प्रो पडदूर, सरकार जालनापूर, यांसीः— माधवराव बल्लाळ प्रधान. सुा सबा सितैन मया व अलफ. प्रो मजकूर येथील देहे,

१ मौजे सुगाणे	१ मौजे तरवडें	१ मौजे वरफळ
१ मौजे लिखितदरी	१ मौजे वैजोडें	१ मौजे लिगसे
१ मौजे पाकणी शरामत	१ मौजे टाकळी	१ मौजे शिराळें
१ मौजे गेवराई	१ मौजे डोलार.	१ मौजे कर्जखेडें
१ मौजे गुळखेडें	१ मौजे सृष्टी	१ मौजे देवळें
१ मौजे कोटाची सळई	१ मौजे खडेले	१ मौजे कोळोलदेवरुख
१ मौजे वडसी	१ मौजे खांडरी	१ मौजे मंगरुळ
१ मौजे आगलगांव	१ मौजे म्हसले	१ मौजे चाकीं
१ मौजे रायपूर	१ मौजे पांडोरे	१ मौजे केदारवाडी
१ मौजे बाबई	१ मौजे थरीठाणे	१ मौजे ठाणें
१ मौजे देरनाबाद	१ पिंपळखेडें	

येकूण ३२ गांव मुकासा व बाबती व सरदेशमुखी व इनामगांव व जमिनी खेरीज करून जहागिरीचा अंमल नरसिंगराव जनार्दन धायगुडे यांजकडे फौजेचे सरंजामास सालमजकूरपासून करार करून दिला असे. तरी सदरहू ३२ गांवचा जहागिरीचा अंमल मशारनिल्हेशीं रुजू होऊन सुरळीत देणें जाणिजे. रा छ. ५ रबिलाखर आज्ञा प्रमाण.

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव बल्लाळ
मुख्य प्रधान.

पत्रांक ४३ श्री. १६८८ भाद्रपद शुद्ध ७

चिरंजीव राजश्री राव यांसीं रघुनाथ बाजीराव आशीर्वाद. उरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. श्री गोकर्ण महाबळेश्वर व श्री स्वामी कार्तिक यांचें पुजानैवेद्यास वगैरे खर्चास पांच हजार होनाचे गांव द्यावे ऐसा हैदर नाईक यांणी पेशजी करार केला होता. परंतु त्यांणीं कराराप्रमाणें गांव दिले नाहींत. पांच हजार रुपयाचें मात्र गांव, इकडून रा रघुनाथ शामजी कारकून पाठविले आहेत, त्याचे स्वाधीन केले, ह्मणोन कळोन आलें. ऐशियास, आपण हैदर नाईकास पत्रें पाठवून कराराप्रमाणें पांच हजार होनाचे गांव कारकुनाचे स्वाधीन करीत तें करावें. येविसीं ताकीदपत्रें लागतील तीं वो रा व्यंकटशास्त्री यांस द्यावीं. रा छ ६ रबिलाखर. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

पत्रांक ४४ श्री. १६८८ आश्विन शुद्ध ७

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसीः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा सबा सीतैन मया व अलफ. तुमचें प्रयोजन असे. तरी देखत पत्र विजयादशमीस हुजूर येणें. दिरंग एक घडीचा न लावणें. सत्वर येणें. जाणिजे छ ५ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लेखन सीमा.

पत्रांक ४५. श्री १६८९ माघ शुद्ध १३

नकल.

राजश्री गोविंदराव कृष्ण, कादार पा शाहाजांपूर, गोसावी यांसीः— अखंडित लक्ष्मी राजमान्य स्नो महादजी शिंदे दंडवत. सुा समान सितैन मया व अलफ. तुह्मांकडून पेस्तर सालचे ऐवजीं खरेदी कापड गुा अबाजी नाईक कांबरस व रामचंद्र नाईक परांजपे, साहुकार पुणेकर, रदकर्ज रुा ७५००० पाऊण लाख रुपये देविले असेत. तरी पा मजकूरचे ऐवजीं रसदेच्या भरण्याबाा ऐवज श्रावण मासीं पावता करून कबज घेणें. दुसऱ्या वराता तुह्मांवर जालियास हा ऐवज अगोदर देऊन मग दुसरी वराताचा ऐवज देणें. जाणिजे. छ १० माहे रमजान. बहुत काय लिहिणें? हे विनंति. सदरहू ऐवज वायद्याप्रमाणें पुण्यास पावता करूं. हे विनंति.

सदरहू वरात तुको शामजी याजबाा पाठविली असे.

पत्रांक ४६. श्री १६९० चैत्र शुद्ध ११

(नकल बमोजिब अस्सल.)

अज सरकार राजश्री गंगाधर यशवंत, दिम्त राजश्री तुकोजी होळकर सुभेदार, ताा तुळाजी पाटील मोकदम मौजे हस्त पोखरी, परगणे आंबड सुा समान सितैन मया व अलफ. राजश्री सटवाजी गायकवाड व वासुदेव संभाजी यांच्या अमलांत सन ११७३ मध्यें ज्याहानखान्यांत व मोसम कलाल वगैरे काा मजकूर यांची चोरी झाली. त्याचा ऐवज नगदी–यांत तहकीक करून सटवाजी गायकवाड यांचे विद्यमानें सरकारांत घेतला. तुह्मांकडे कलाल मजकूर याचा कझ्या राहिला नाहीं. तुह्मीं मौजे मजकुरीं आपली खातर जमा राखून, मौजे मजकूरचे कीर्द आबादी करून, सुखरूप राहणें. कलाल मजकूर कोणेविशीं कथळा करील तर त्यास सरकारांतून ताकीद केली जाईल. जाणिजे. छ. ९ जिल्काद.

पत्रांक ४७.

पो जेष्ठ वद्य ५ शनीवार. श्रीशंकर १६९० ज्येष्ठ वद्य २

वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित स्वामीचे सेवेसीः— विद्यार्थी कृष्णराव बल्लाळ कृतानेक. सां विनंति उपरी येथील कुशल ताा जेष्ठ वद्य २ पावेतों आपले कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. कृपा करून पत्र पा तें पावलें. रा सदाशीव रामचंद्र यांची बातनी व राजाराम पंत यांचें वर्तमान कळलें. व श्रीमंतांस आपण पत्र लिहिलें होतें त्याचें उत्तर घेऊन पा आहे. आपण लिहिलें कीं, आह्मांस विचार काय लिा तो लिहावा.

त्यास आपण उभय पक्षीं मान्य. कोणी कडूनही उपसर्ग लागणार नाहीं स्वस्थ असावें. आज श्रीमंताचा मुकाम घांटावर आहे. उदईक कूच करून घांटाखालीं वोकरी इतकें पाणी पाहून मुकाम होईल. लौकरीच गंगेवर टोकें तीन कोस पूर्वेस टाकून मुकाम होणार आहे. तेव्हां आपणासहि विदित होईल. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ४८.

पो जेष्ठ वद्य ७ मंगळवार. श्रीशंकर १६९० ज्येष्ठ वद्य ५

वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दिक्षित स्वामींचे सेवेसीः—

विद्यार्थी कृष्णराव बल्लाळ कृतानेक सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. कृपा करून पत्र पा तें पावलें. गंगातीरीं मुकाम किती होणार, हें ल्याहावें ह्मणोन लिा. त्यास, अद्याप कूच्य मुकामाचा निश्चय ठरला नाहीं. परंतु बहुतकरून कूच्यच होईल. मुकाम व्हावयाचें कारण नाहीं. आपणास कळावें ह्मणोन लिा आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब चांदवडाहून कूच जाहल्याचें वर्तमान आलें नाहीं. आज सायंकाळ पो येईल. श्रीमंताचें कूच पुणतांबियाचेच रोखें होईल. युद्ध–प्रसंग संभव आहे, ऐसें दिसोन येतें. पहावें. ईश्वर इच्छा प्रमाण! बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक. ४९.

पो जेष्ठ वद्य ३० मंगळवार. श्री. १६९० ज्येष्ठ वद्य १३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री कृष्णराव दिक्षित स्वामींचे शेवेसीः—

विद्यार्थी बाळकृष्ण बल्लाळ सांा नमस्कार विनंति उपरी येथील वर्तमान ताा छ २६ मोहरम मुा धोडप सुखरूप असों. विशेष. छ. २४ मीनहूस श्रीमंतांची फौज मुक्काम मजकुरीं तयार होऊन उभी होती. तों राजश्री गोपाळराव गोविंद यांची फौज पुढें आली होती. गांठ पडोन फौज मोडोन पळोन गेली. श्रीमंताचे हत्ती अकरा व सदाशीव रामचंद्र यांचे हत्ती च्यार व अवधूतराव केशव याचा हत्ती एक वगैरे किरकोळ मिळोन, अठरा वीस हत्ती व तमाम तोफखाना पाडाव करून घेतला. पांच सातशें उंट, च्यार पांचशें घोडीं, डेरे, दांडे कुल लुटून गेले. श्रीमंत दादासाहेब धोडपचे माचीस गेले. चिंतो विठ्ठल जखम होऊन पाडाव आला. त्यांचा भाऊ मोरो विठ्ठल ठार जाहला. आज छ २६ मीनहूस किल्याभोंवत्या फौजा उतरल्या आहेत. तो सरंजाम माफकच आहे. पहावें. आपणास कळावें ह्मणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ५०.

पो आषाढ शुा ६ सोमवार. श्रीशंकर १६९० आषाढ शुा ५

वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी कृष्णराव बल्लाळ सां नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ताा छ ३ सफर मुा माडवे येथें आपले कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. इकडील वर्तमानः श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांच्या व श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या भेटी जाहल्या. मजल दर मजल पुणियास जात आहेत. दादासाहेबांनीं त्रिंबक व धोडप वगैरे किल्ले होते त्यांच्या चिठ्या दिल्या. किल्ले हस्तगत व्हावयाकरितां राा रामचंद्र गणेश व राा विसाजी कृष्ण उभयतां दोन हजार फौज घेऊन मदनेस्वरचें नांदूर येथें राहिले आहेत. किल्ले हस्तगत होऊन लवकरच पुणियास येतील. श्रीमंतांस पत्र पाा होतें. त्याचें उत्तर पाठविलें आहे- ऐवज पोहोंचेल. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ५१. श्रीलक्ष्मीकांत. १६९० श्रावण शुद्ध ७

राजश्री माधवराव पंडित प्रधान गोसावी यांसी:—

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो जानोजी भोंसले सेनासाहेब—सुभा दंडवत विनंति येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. गोसावी यांनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. राणोजी करांडे याचा करार राजश्री दादासाहेब यांसी केला आहे कीं, पूर्ववत् प्रों त्याचा सरंजाम देऊन, मारनिलेस पदरीं बाळगून, पहिल्याप्रों सेवा घ्यावी ह्मणोन. त्यास हालीं मारनिलेस फक्त कांहीं न देतां दिल्हा ह्मणोन विदित जाहलें. त्याजवरून हे पत्र लिहिलें आहे. तरी करारप्रमाणें त्याचा सरंजाम देऊन त्याची रसीद केशो शामजी व खिजमतगार पाठविले आहेत, त्याज समागमें पाठवावी, ह्मणोन लिहिलें. ऐसियास, करांडे मजकूरास सोडिलें ते समयीं त्याणें करार केला कीं, आपण नरनाळा खालीं करून देतों, गोंडवानचा सरंजाम किल्ले जातीचा नलगे, वराडांत सरंजाम आहे त्यापैकीं जो कृपा करून देतील तो घेऊन एकनिष्ठेनें चाकरी करून दाखऊन उर्जित करून घेईन. याप्रमाणें करार करून, शपथेचें पत्र लिहून सरकारचे ऐवजाचे भरण्याबद्दल निरोप घेऊन, त्याजनंतर महिनाभर पर्यंत सेवेसीं येतों, बेईमानी कदापि करणार नाहीं, ऐसें लिहित आला. त्याज अलिकडे तो सर्व प्रकार टाकून मनस्वीपणाची वर्तणूक मांडली आहे. वराडांत रोखे करावे, स्वाऱ्या कराव्या, सरदार मारावे, मुलूख खराब करावा, हा विचार मांडला आहे. यास्तव त्यासच

निक्षून आज्ञा होऊन यथास्थित रीतीनें वर्ते, आणि येथें येऊन करारप्रों॥ चाले असें जालिया येथूनहि अंतर होणार नाहीं. एतद्विशई अर्थ सर्वज्ञतेचे ठाई विस्तारें ल्याहावेंसें नाहीं. रा छ ६ माहे रबिलाखर. सुज्ञप्रति विशेष काय लिहिणें ? कृपालोभ असूं दिला पाहिजे. हे विनंति. मोर्तबसूद

श्री
शाहुराज पदांभोज भ्र-
मरायितचेतसः । बिंबा-
त्मजस्य मुद्रेषां राघवस्य
विराजते.

पत्रांक ५२ (शिक्का) श्री. (नक्कल.) १६९० भाद्रपद वद्य ७

राजमान्य राजश्री बाबूराव नरसी, उपनाम खेर, गोत्र गौतम, सूत्र आश्वलायन, वास्तव्य कसबा बावधन, प्रांत वाई, यांसीं भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार. सुा तिसा सितैन मया व अलफ. दिल्हें इनामपत्र ऐसीजे:— तुह्मीं हुजुर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली जे:— आपण राज्यांत एकनिष्ठेनें सेवा केली आहे. याजकरितां कैलासवासी यमाजी पंत यांणीं आपणावर कृपाळू होऊन मौजे कणुर, संमत हवेली, प्रांा वाई, हा गांव सुभाकडे होता, तो दूर करून जिल्हेकडून कुलबाब, कुलकानू इनाम करून देऊन इनामपत्रें करून दिलीं आहेत, त्या प्रों॥ चालत आहे. त्यास, तीं पत्रें मनास आणून, आपलीं पत्रें भोगवटीयास करून देऊन, पूर्ववत्प्रों इनाम चालविला पाहिजे. ह्मणून, त्यांवरून, तीं पत्रें मनास आणून, तुमचें चालविणें आवश्यक जाणून, तुह्मांवर कृपाळु होऊन हालीं मौजे मार हा गांव जिल्हे कडून पूर्ववत् प्रों कुलबाब कुलकानू हाली पट्टी व पेस्तर पट्टी देखील इनाम तिजाई खेरीज हक्कदार करून दरोबस्त इनाम दिल्हा असे. तरी तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप राहणें. जाणिजे. छ २० जमादिलावल. बहुत काय लिहिणें? मोर्तबसूद.

पत्रांक ५३

पो छ १ साबान. श्री (नक्कल.) १६९० आश्विन शुद्ध ११

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव विश्वनाथ गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुाा तिसा सितैन मया व अलफ. राजश्री विसाजी कृष्ण हे मौजे तिरवणी प्राा राजापूर येथें देवालय व घर बांधितात. त्यास, मौजे भांबेड व मौजे हरदखले व मौजे आरगांव वगैरे प्राा मजकुरी येथील रानांतून लांकडें सागवानी तुळया व खांब व आटववांसे व गजया वगैरे मिळोन सुमारें ४३८५ च्यार हजार तिनसें पंच्याऐसीं लांकडें तोडून मौजे मजकुरीं आणितील. त्यास आणूं देणें. कोणेविशीं अडथळा न करणें. जाणिजे. छ १० जाखर. आज्ञा प्रमाण.

पत्रांक ५४. श्री (नक्कल.) १६९० मार्गशीर्ष वद्य ५

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव विश्वनाथ गोसावी यांसीं:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा तिसा सितैन मया व अलफ. बाजीरुद्र पेशर्जी सनसमान खमसेनांत कडप्याचे लढाईत सरकारकामास आले. सबब तीर्थरुप कैलासवासी नानासाहेब यांणीं तीनसें रुपयांचा गांव इनाम द्यावयाचा करार केला. परंतु गांवची नेमणूक होऊन आली नाहीं. याजकरितां तीर्थरुप यांणीं तीनसें रुपयांचे तनख्याचा इनाम द्यावयाचा यादीवर करार केला होता तो पाहून त्यांचे बंधु राजश्री आपाजी रुद्र व बाळाजी रुद्र यांसी मौजे आघलगांव ताा बेलहे प्राा जुन्नर येथील जाहागीर व फौजदारी तुह्मांकडून दूर करून दोन्ही अंमल दरोबस्त इनाम करार करून देऊन भोगवटीबांस पत्रें करून दिल्हीं आहेत. त्याप्राा हरदू अंमल यांजकडे इनाम सुरळीत चालविणें. जाणिजे. छ १८ शाबान. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक ५५. श्री १६९० पौष शुा १

वेदमूर्ति राजश्री गणेशभट हरडीकर स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी विठ्ठल कृष्ण साां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ताा पौष शुद्ध १ जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. सरकारची सनद सायली लांकडाची राजश्री महादजी रघुनाथ सुभेदार यांस पेशर्जी घेऊन बे-

दमूर्ति महादेव पाध्ये नाटेकर यांजवरावर पाठविलीच आहे. व सुभेदारांनीं सरसुभांच्या सनदेचा आक्षेप केला ह्मणून लिहिलें होतें. त्यावरोन राजश्री विसाजीपंत सर सुभेदार यांचें पत्र घेऊन पाठविलें आहे. या उपरी लांकडें तोडून देवालयाचें व घराचें काम सत्वर सिद्धीस न्यावें. लांकडें तोडावयास तो तुह्मीं राजश्री शंकराजी केशव यांस पाठविलें आहे. लांकडें तोडलीं असतील. सरसुभांची सनद विजयदुर्गास पाठऊन, तेथील पत्र आणून, याउपरी लांकडें जलदीनें आणवणें. आणि घराचें काम निकडीनें करून, देवळाचें काम सांगितलें आहे त्याप्रमाणें त्वरेनें करून घेणें. घराचें काम फार न वाढवणें. आटोपतें धरून वैशाख मासाकारणें शाकारून टाकणें. कौलें करून अगोदर ठेवणें. जें साहित्य लागेल तें अजिपासून लगटानें काम करून घेणें. रिकामा फैलाव कराल तरी पैसा मिळणार नाहीं. लांकडें सनदेप्रों आणावयाचीं आहेत. जितकीं लागतीलशीं असतील तितकीं लागलींच आणून ठेवणें. लांकडें पैका खर्चून आणाल आणि राहतील तीं व्यर्थ जातील ऐसें न करणें. अथवा पाहिजेत तीं पुरीं न आणलीं आणि मग तीं आणावयास गेलां तेव्हां त्यांणीं अडथळा केला. मागतीं सुभाचे किल्याचें अथवा सरकारचें पत्र मागूं लागले तरी पुनः वारंवार खटपट होणार नाहीं. यास्तव, सूचनार्थ तपशीलवार लि॥ आहे. पाहिजेत तीं आणून काम शेवटास नेणें. वैशाखा पुढें काम न ठेवणें. ऐवजाविषीं लि॥ त्यास तूर्त ऐवजाची वोढी आहे. तुह्मांपाशील ऐवज खर्च करणें. मग पाठऊं. खर्च वावगा न करणें. श्रीमंतांसी व भोसलियांसीं विघाड जाला आहे. यास्तव वराडप्रांते श्रीमंत फौज सुद्धां गेले. कळावें. बहुत काय लिहिणें? लोभ असो दिजे हे विनंति. राजश्री शंकराजी पंतास नमस्कार. सांगितल्या प्रों करावें. वाढऊं नये. हे विनंति.

पत्रांक ५६ श्री (नकल) १६९० पौष शुद्ध १०

रा बाबूराव नरसी, उपनाम खेर, गोत्र गौतम, सूत्र आश्वलायन, कसबें बावधन, प्रांत वांई, गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा (तिसा) सितैन मया व अलफ. शके १६९० सर्वधारी नाम संवत्सरे. तुह्मीं हुजुर कसबे पुणे येथिल मुक्कामीं येऊन विनंती केली कीं:—राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधी यांणीं आपणास मौजे कणूर संमेत हवेली प्रां वांई हा गांव स्वराज्य तर्फेनें आपले कडील अमल, खेरीज हक्कदार व इनामदार करून दरोबस्त कुल बाब कुलकानू देखील इनाम तिजाई इनाम करार करून देऊन भोगवटीयास पत्रें करून दिल्हीं आहेत. त्याप्रों गांव इनाम चालत आहे. त्यास, स्वामींनीं कृपाळू होऊन, आपणाजवळ पत्रें आहेत तीं पाहून, त्या प्रों सरकारांतून करार

करून दिल्हीं पाहिजेत. ह्मणून, त्याजवरून तुह्मी स्वामीचे राज्यांतील पुरातन सेवक; यास्तव तुमचें चालवणें आवश्यक जाणून, तुह्मांवरी कृपाळु होऊन, मौजे मार येथील रा भगवंतराव पंडित यांणीं स्वराज्यतर्फेचा आपले वडील अमल, देखील इनाम, तिजाई देखील खेरीज हक्कदार व इनामदार करून दरोबस्त कुलबाब, कलकानू, इनाम देऊन पत्रें करून दिलीं आहेत तीं पाहून त्याजप्रों सरकारांतून करार करून दिल्हा असे. तरी, सदरहु लिहिल्याप्रमाणें मौजे माचा अंमल आपले दुमाला करून घेऊन, तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनभऊन, सुखरूप राहणें. जाणिजे. छ ८ रमजान. आज्ञा प्रमाण. (मोर्तब व शिक्का असे.)

पत्रांक ५७ श्री १६९० माघ शुा ४

वेदमूर्ति राजश्री गणेशभट हारर्डाकर व राजश्री शंकराजी केशव स्वामीचे सेवेसीः—

पो विठ्ठल कृष्ण सां नमस्कार विनंति. उपरी येथील कुशल ता माघ शुा ४ भृगुवार जाणून स्वकीय लिहित असावें. विशेष. इकडील वर्तमान तरीः—श्रीमंत फौजेसुद्धां नागपुरानजीक आहेत. श्रीमंतांच्या फौजेस व भोंसल्यास साठसत्तर कोसांची तफावत आहे. अद्याप कांहीं तहरह नाहीं. पुढें काय होतें पहावें. घरचे कामास लांकडें तोडावयाविशीं रा विसाजीपंत लेले यांची सनद घेऊन मागें पाठविली ती पावलीच असेल. लांकडें घराच्या बेगमीचींच तोडावीं. देवालयाचे कामापैकीं शिल्लक राहिलीं असेल तीं खर्च करून जीं लागतील तितकींच तोडून खर्च करणें. लांकडें राहिल्यानें उपयोग पडणार नाहीं. याकरितां लिा आहे. घराचें काम आटोपल्यावर चांगलें. बळकट, मजुबूत भिंती चांगल्या घालून आटोपशीर करावें. पैका विशेष खर्च न करणें. रिकामा कारभार न वाढवणें. चैत्र मासांत घर तयार करून शंकराजी केशव यांस पुण्यास पाठवून देणें. येथून शिवराम महादेव यांसीं निरोप द्यावा लागतो. याकरितां घराचें काम आटोपून घेऊन शंकरोबास पाठविणें. वरकड इकडील सविस्तर वर्तमान वेदमूर्ती पद्माकर पाध्ये सांगतां कळों येईल. आजिता काम कोठवर आलें तें लिहिलें पाहिजे. श्री सिद्धेश्वर व श्री मुगादेवीचें काम सांगितल्याप्रमाणें तयार केलें असेल. राहिलें असेल तें सांगितल्याप्रमाणें तयार करणें. काम जलदीनें करावें. फार दिवस न लावणें. बहुत काय लिहिणें ? कृपा किजे. हे विनंति आडिवरेकर त्रिवर्ग भटजी यांचे घरीं नमस्कार सांगणें.

पत्रांक ५८ श्री १६९०.फाल्गुन शुद्ध ४

वेदमूर्ती राजश्री गणेशभट हरडीकर स्वामीचे सेवेसी::—

विद्यार्थी विठ्ठल कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय ता। फाल्गुन शुद्ध ४ रविवार जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष तुह्मांकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. देवालयाचें काम सिद्धिस गेलें कीं नाहीं ? घराचें काम कोठवर आलें ? काय करितां हें कांहींच कळत नाहीं. तरी सविस्तर लेहून पाठवणें. घराचे कामाचा बखेडा फार न वाढवणें. सत्वर काम करून घेऊन, राजश्री शंकराजी केशव यांसी पुण्यास पाठवून द्यावयाविशीं तुह्मांस पेशजीं लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें घराचें काम सत्वर उरकून घेऊन शंकराजी केशव यांसी पाठवून देणें. सारांश, खर्च वावगा न करणें. काम सत्वर आटोपून घेणें. चिरंजीव केशो उद्धव, विसो उद्धव यांचें वर्तमान काय तें लेहून पाठविणें. पुणियांत भोंसले येतात ह्मणून भारी गडबड जाली होती. पुणें पळालें होतें. आमचींही बायकामुलें पुरंधरीं गेलीं आहेत. पांचा सातारेजांनीं आणविणार आहें. कळावें. अद्याप भोंसलिया कडील कजिया तुटलासा जाला नाहीं. लांबला आहे. पुढें किती दिवस लागतील पाहावें. सारांश, तुह्मीं श्रीचें व देवीच्या देवालयांतील काम सांगितलें होतें त्याप्रा, झाडून करणें. घराचें काम मध्यम रीतीचें लौकर करून घेणें. फार थोर कराल, काम वाढवाल [तरी] पैसा मिळणार नाहीं. जें काम कराल तें चांगलें करणें. आपले कडील सविस्तर वर्तमान लि॥ पाहिजे. बहुत काय लिहिणें ? कृपा करावी, हे विनंति. इ. इ.

पत्रांक ५९.

पौ छ ७ जिल्हेज चैत्र श्री १६९० फाल्गुन बहुल ३

तीर्थस्वरूप राजश्री दादा व तथा राजश्री बाजीपंत दादा वडिलांचे सेवेसीः——

अपत्यें गणेशानें दोन्ही कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना . ता। फाल्गुन बहुल त्रितीया, म॥ ब्रह्मेश्वर गंगातीर, नजीक निर्मल, समस्त सुखरूप असों विशेष. आपली दोन्ही पत्रें एक सांडणी स्वाराबा। व एक जासूदाबा। ऐशीं दोन पत्रें पो तीं पावलीं. लि॥ मजकूर कळला. इकडूनहि पेशजी सडी स्वारी जालिया उपरी सांडणी स्वाराबराबर व जासूदाबा। ऐसीं व कलेश्वरा वरून ऐशीं तीन पत्रें पो तीं पावलींच असतील. किंवा न पावलीं हें कांहींच कळत नाहीं. तरी सविस्तर लि॥ पाहिजे. यानंतर इकडील मजकूर तरीः चांदे याजकडे होतों ते समई बातमी आली कीं, भोंसले पुण्यास चालिले. त्याजवरून राजश्री गोपाळ रावजी व रामचंद्र गणेश व शास्त्रीची.

भोंसले वगैरे पथकें ऐसीं सडी करून पाठीवरी रवाना केलीं. ते माहुराहून दर-मजल वीस वीस कोस मजली करून खंदारानजीक भालकीचे मैदानांत भोंसले यांची आमची विसा कोसांची (तफावत राहिली). एक मजलीचें अंतर राहिलें. तदनंतर भालकीवरून पुणियाकडील वोढ सोडून, बेदरावरून भवानगर उजवें टाकून, संगारडीमंगारडी पेठेवरून दररोज पांच गांवें सा गांवें येणेंप्रों, तो पुढें, आमच्या फौजा पाठीमागें, ऐशा झाडींतून पंधरा वीस रोज याप्रों चालिलों. त्याणें फारच गणिमाई केली! तीन च्यार रोज भाकरी नाहीं. बकरीयाजवरीच जीव धरून फारच निकड करून निघोन गेले. अखेर गांठ न पडली. महिनाभर पर्यंत आमचे फौजेस पांच गांवें सा गांवें दौड पडली. शेवटीं मंथनकालेश्वराजवळ गंगा उतरलों. भोंसले तसेच पुढें झाडींतून चांदे याजकडे गेले. पुढें मागें जावें तरी, मुलुख त्यांचा, झाडी फार. याजकरितां गंगातीरानेंच मुकाम मजकुरीं श्रीमंतांस येऊन मिळालों. सहा दिवस जाहले. घोडियांत व माणसांत कांहीं बाकी राहिली नाहीं. फौज अगदीं सडून गेली, दोन अडीच हजार पावेतों घोडे राहिले. झाडींत पांच सहा लंघनें घोडियांस जालीं. याजप्रों स्वारी जाली. या मागेंहि येणें-प्रमाणें स्वारी जाली नाहीं व पुढेंहि होणें नाहीं. कळलें पाहिजे. येथें श्रीमंतांचे मुकाम दाहा बारा जाले. सल्ला मामला होत आहे. बोली चाली आहे. पुढें काय मजकूर होईल तो सेवेसीं मागाहून लिहून पाठवून देऊं. सारांश, आपणाकडील सविस्तर मजकूर लिहून पाठवावे. वेदशास्त्र संपन्न रा॥ जगन्नाथ देव बाबा व राजश्री मथुनाथ देव बाबा स्वामीस सिरसाष्टांग नमस्कार लि॥ परिसोन आपण माघ मासाचें आशिर्वाद पत्र पो तें या मुकामीं पावलें. दर्शनतुल्य संतोष जाहला. सदैव आशीर्वादपत्र पाठविलें पा. लोभ असो दिजे. हे विज्ञप्ति.

पत्रांक ६०. श्रीगजानन. १६९१ चैत्र.

पु॥ तीर्थरूपांचे सेवेसी:—

शिरसां॥ नमस्कार विज्ञापना. आह्मीं वडिलांचे आशीर्वादें चिरंजीव सुद्धां घोडींपिडीं निभाऊन आलों! कळलें पाहिजे. बुणग्यांत लिंगभट होता. सिवरें व सभरा घोड्या बुनग्यांत होत्या. महतापघोडी व खोसरी दोन्ही सभर आहेत. परंतु कौलीरान आहे. याजकरितां वैरणीची फार ताकीद. वैरण मिळत नाहीं. सालवण लागलें आहे. याजमुळें लोकांच्या घोड्या फार गांजलिडतात. परंतु आपले आशीर्वादें करून सर्व ईश्वर निभाऊन आणील. कळलें पाहिजे. प्रस्तुत देशीं गडबड नाहीं. जें होणें तें ह्याच प्रमाणें होईल. वडिलीं काळजी न करावी. आपणाकडील साकल्य लेहून पाठविलें पो. अद्यापि मोगलमुधा

सारेच एकत्र आहेत. सल्ला होतो अगर काय होईल तें मागाहून लेहून सेवेसीं पाठवितों. यंदा निष्ठुरपणा काय निमित्य ह्मणोन पुण्याहून वडिलांचीं पत्रें एक दोन आलीं ! त्यास ये सालीं स्वारींत आनंद ! ता चाकरी पडिली ती लिहितां पुरवत नाहीं ! आणि निदानीं भोंसल्यामागें सडी स्वारी सवा महिना पडली. त्याणें पाणपतास राहा म्हणविलें ! यलगंधचे झाडींत पंधरा रोज सूर्यदर्शन नाहीं, दाणावैरण नाहीं ! प्राणाशीं गांठी पडल्या ! फार लोक बुडाले. परंतु वडिलांचे आशीर्वादें चिरंजीव सुद्धां क्षेमरूप आलों. आपल्या कडील पुणें व वाई व किल्ले व राजकी वृत्त ता लिहिलें प्रो श्रीमंतांसमागमें चाकरी निमित्य नाहीं, यास्तव आपलें पत्र पावोन आमचेंहि उत्तर न गेलें. वरकड वडिलांचे पायाशिवाय आह्मांस जोड काय आहे ? रात्रींदिवस लक्ष वडिलांचे चरणाशीं आहे. ईश्वर साक्ष. पौष वद्य ३ पत्र वडिलीं पों तें आजी पावलें. सविस्तर कळलें. मौजे चातुस व बोरीचा वसूल बेमुरवत करवावा. सदाशिव नारायण यासीं आणून वसूल घेतला पो. सदैव आशीर्वादपत्र पाठवावें. लोभ असावा. हे विज्ञापना,

तीः॥ सौ॥ संपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री वहिनीबाई व उमाबाईस शिरसाष्टांग नमस्कार. चिरंजीव रा तात्या व बाळाजी हरी व अंताजीपंत यांसीं आशीर्वाद. लोभ करावा. हे आशीर्वाद. इ. इ.

पत्रांक ६१ श्री. १६९१ चैत्र शुद्ध १० मंदवार

पु॥ वेदमूर्ती राजश्री गणेश भट हरडीकर स्वामींचे सेवेसीः—

विनंती उपरी श्रीमंतांचे लष्करचा मुक्काम वंजिरा (वाइनगंगा) तीर येथें आहे. तेथून फाल्गुन शुद्ध ११ चीं पत्रें आलीं. त्यांत मजकूर कीं भोंसले चांद्यास गेले. सड्या फौजा पाठीवर होत्या. त्यांस तफावत फार पडली. याकरितां श्रीमंतांनीं बोलाऊन आणिल्या. बुनगें मनरथा जवळ ठेविलें होतें. तेंहि वंजिरा संगमीं बोलावून नेलें. तोफखाना उंबरखेडावर होता. तोहि आणविला. सारे सरदार, फाजा एक जागां आल्या. या उपरी मनसबा करून, चांद्यास जाऊन, मोर्चे लवावे, ऐसा प्रकार आहे. देवाजीपंत, भोसले याकडील दिवाण, श्रीमंतांचे लष्करांत आहेत. त्यांनीं सांडणी भोंसल्याकडे पाठविली आहे. सल्याचा प्रकार घडोन आला तरी उत्तम; नाहीं तरी पुढें चांद्यास जावें; ऐसें आहे. याप्रों वर्तमान लिहिलें आलें. पुढें येईल तें लिहून पाठऊं. पिराजी नाईक निंबाळकर बुनगियांत होते. ते पळून भोसल्याकडे गेले. श्रीमंत फौजेसुद्धां एकवेळ चांद्यापावेतों जाऊन, भो निर्मळेकडे आले. पुणियास येणार असें जालें, तेव्हां माघारे फिरून पाटीस सडे होऊन लागले. ते बालेघाटास आल. भोंसले भालकीहून बेदराहून मागती झाडींत शिरोन, झाडीच्या वाटेनें

च्यांस गेले. तेव्हां श्रीमंतही भागानगरापासून मेदकाहून माघारे फिरोन प्रस्तुत गंगातीरास आले. दोन्ही फौजा धांवतां थकल्या ! तीन महिने याप्रो झालें. अद्यापि प्रथम दिवस आहे ! मुलकाचा आईत भारी जाला आहे. रुकनत दौले, जाधवराऊ देखील समागमें आहेत. चिरंजीव विसाजीपंत व रामचंद्रपंत, गोपाळराऊ, रास्ते, ऐसे सडी फौज पंचवीस हजार भो मागें होती. त्याचे मागें श्रीमंत होते. थोरले बुणगें पाथरीकडे पा होतें. चिरंजीव बळवंतराऊ श्रीमंताबराबर आहेत. फार हैराण प्रथम जाले. तुर्हीं श्रीस प्रार्थना करून उभयतांचे संरक्षाविशीं आंगारा टाकवणें. लोभ कीजे हे विनंति.‡

पत्रांक ६२.

पो ज्येष्ठ वा १३ शनवार श्रीशंकर. १६९१ वैशाख.

चिरंजीव राजश्री बाबूराव यांसी प्रति विठ्ठल नरसिंह आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. इकडील वर्तमान तरी मातुश्री अहिल्याबाई साल मजकूरीची रसद मागत आहे. व राजश्री तुकोजी होळकर यांणीं वराता ब सरंजाम ह्मणून पंधरा सोळा हजार रुपये घेतले. नजीक वीस कोसांवरी खेचिवाडियांत आहेत. याप्रमाणें वर्तमान मामलेतीचें आहे! जकात तों अगदीं पडली. कारण ज्या मार्गानें वाणी येणार त्या मार्गावरी आजि तीन महिने फौज होळकर याची आहे. दोन वण जारेहि लुटून घेतले! त्यामुळें मार्ग राहिला. गल्ला स्वस्त ! पावणेदोन मण हरभरे व गहूंन* सवामण प्रमाणें कोण घेत नाहींत! खिचि वाडियांत दोन महिने फौज आहे. त्यामुळें तमाम जागा मारून लुटून फस्त केली. सल्ला जाहला नाहीं. रा नारो गणेश फौजेंत आहेत. रा तुकोजी होळकर उदेपुरीं आहेत. शिंदेही उदेपुरीं आहेत. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. (यापुढें फाटलें आहे.)...........चिरंजीव राजश्री दिनकरपंत यांसीं आशिर्वाद. देशींचें वर्तमान लिहित जाणें. हे आशिर्वाद.

रा विसाजीपंत यांसी नमस्कार. विनंति उपरी सदैव कुशल वर्तमान लिहित जाणें. इकडील वर्तमान उत्तम आहे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

पत्रांक ६३ श्री. १६९१ भाद्रपद वद्य १

सेवेसी हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १५ जमादिलावल पावेतों मुक्काम मौजे तारगव्हासी पा पाथरी: वर्तमान तर निजाम-

---

‡ हें पुरवणी पत्र आहे. मूळ मुख्य पत्र क्षुल्लक असल्यामुळें छापलें नाहीं. मुख्य पत्राची मित्ती चैत्र शुद्ध १० मंदवार आहे.

*गहूं शब्दांतील अनुनासिकाबद्दल हा न आहे.

अल्लीचीं पत्रें आलीं होतीं कीं, हिंदुस्थानची मसलत आहे, तर आपण पुढें बराणपूरपर्यंत जावें, आह्मीं मागाहून येतों. वकिलांचीं पत्रें आलीं जे, निजामअल्ली निश्चयें येतात, मुरादखान आले ह्मणजे येथून निघणार. त्यास, मुरादखान व कृष्णराव बल्लाळ लवकरच जाऊन पोंहचतील. हे तेथें गेलियावर पत्रें येतील ते स्वामीस लेहून पाठऊं. श्रीमंत नांदेड वसमत पर्यंत जाणार असें आहे. सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञापना. तीर्थरूप राजश्री आबा लष्करांत आले आहेत. त्यांचे कामकाजाचा उलगडा लवकर होय, ते गोष्ट केली पाहिजे. हे विज्ञापना.

पत्रांक ६४ श्री. १६९१ माघ वद्य ६

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यराजश्री नारो वासुदेव का। दार पो गोसावी यांसी:—

सेवक नारायणराव बल्लाळ नमस्कार सु॥ सबैन मया व अल्लफ. रघोजी आंभोऱ्या मौजे धामणगांव, पो॰......डि येथें राहत होता. तो मौजे मजकुराहून गैर हजर होऊन मौजे मा॥ र......गांव पो॥ आंबाड येथें जाऊन राहिला आहे. त्याणें धामणगांवकर गा......याचा गाडा मठ पिंपळगांव येथला होता, तो अटकाविला आहे; आणि ह्मणतो कीं, माझी वस्तभाव धामणगांवीं राहिली आहे ते द्यावी, ह्मणजे गाडा देईन. त्यावरून पेशजीचे कमाविसदारास पत्र सादर केलें होतें कीं, रघोजी मजकूर यांस व धामणगांवकरांस मौजे गोलटगांव पाहिजे, जालनापूर येथें पंचाईत नेमून दिल्ही, तेथें रघोजी मजकूर यांस पाठवणें, धामणगांवकर यांस दाभाऊ परगणेयाचे कमाविदार पाठवितील. त्यावरून धामणगांवकर गोलटगांवास गेले. रघोजी मा॥र पंचाईतीस गेला नाहीं. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी......... मा॥र याचे वस्तभावेचा धामणगांवकरांकडे लढा असेल तरी, त्यांस...... विपंचाईतांत ताकीद करून पा......लढा नसतां लबाडी करून गाडा दाबून ठेविला असेल तरी बरें वजेनें ताकीद करून गाडा देवणें. येविशीं फिरून बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ२९ सवाल. बहुत काय लिहिणें ? मोर्तबसुद.

पत्रांक. ६५ श्री. १६९२

सेवेसीं विज्ञापना. कोंकणचें वर्तमान तरी तुळाजी आंगऱ्याचे लेक दोघाजण परांगदा होऊन सिद्दीगडास गेले होते. ते हालीं विजेदुर्गावर येणार ऐशी बातमी विजेदुर्गाहून आली आहे. विजेदुर्गाचे आरमारासीं लढाई जाहली, ऐसेंहि बोलतात. त्याजपाशीं आरमारहि फार आहे. दाहा हजार फौज आहे. इंग्रज सामील आहे. व समागमें हैदरअल्लीचीहि फौज आहे. राजश्री

विसाजीपंत सुभेदार काल एकादशीस रात्रीस मुहुर्तानें पुण्यास गेले. राजश्री बाबुराव राजवाडे गांवाची फारच चौकशी करीत आहे ज्या गांवाची एकदां पाहाणी जाहली व चौकशी जाहली. त्या गांवची आतां चौकशी होत आहे. सेवेसी कळावें ह्मणोन लिहिलें आहे. राजश्री विसाजीपंत सुभेदार यांजपाशीं येथें हरएक कामकाज पुसिलें तरी ह्मणत कीं त्रिंबकपंतांस दूर करावें. मग पूर्ववत प्रों आबाचा आमचा घरोबा आहे त्याप्रों चालों. सेवेसी कळावें ह्मणोन लिा आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ६६. श्री. १६९२ श्रावण वद्य १४

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसी.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुा इहिदे सबैन मया व अल्लफ. तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. हैदरनाईकाकडे लोक चाकरीस व पुढें जाणार त्यांची चौकशी करीतच आहों, येविशीं तालुकंदारांसहि आज्ञा करावी, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, तालुकदारांस पत्रें पाठविलीं आहेत. ते व तुह्मी मिळून चौकशी करणें. गेले असतील त्यांचीं घरें, कबिले, जप्त करणें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहित जाणें. जाणिजे. छ २८ रबिलाखर बहुत काय लिहिणें. लेखन सीमा.

पत्रांक ६७ श्री नकल १६९२ भाद्रपद शुद्ध १३

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यराजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यांसीः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इहिदे सबैन मया व अल्लफ. तुह्मीं विनंतीपत्र छ ९ रबिलाखरचें पाठविलें तें छ ११ जमादिलावलीं प्रविष्ट झालें. हैदरखान पट्टणासच आहे. टिपू हल्लीं होन्नुरावर दक्षणतीरीं आहे. अलीकडे उतरला. ऐशी बातमी सावनूरकरांची आली. त्यावरून आह्मी सर्वांनीं तयारी करून त्यास गांठावें ऐशी तजवीज तयारी केली. तों फिरून सावनूरकरांची बातमी आली कीं, दक्षिणतीरींच आहे. त्यास गांठावें फार सर्वांच्या चित्तांत आहे. गांठ पडिलियावर होणें तें होईल. सोंधे प्रांतीं धामधूम करावी तरी तिकडे पर्जन्य. त्याहिमध्यें धारवाडचे तालुकियाचीं सरकारचीं खेडीं व सोंधेकरांचीं खेडीं एकास एक लगतीं. एकाचे आश्रयानें एक आहे. तीं मारावीं न मारावीं येविसी आज्ञा असावी. ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐसीयास, हैदरखान व टिपूची बातमी लिहिली व टिपूस गांठावयाचा मजकूर. तर तो नदी उतरून उत्तरतीरीं आल्यास, तुह्मी पार-

पत्य करावें हें उचित. तुह्मीं, राजश्री शाहाजी भोंसले, व जनार्दनराम मातबर सरदार तिकडे असतां, कांहींच काम न जाहालें तर कसें ? याउपर चांगली बातनी राखून त्यास नतीजा देणें. सोंधे प्रांताचे गांव मारावयाचा मजकूर लिहिला. तर हैदरनाईक पट्टणास आहे. टिपू तुंगभद्रापार चेनगिरीस आहे. तुह्मीं तिघे सरदार तीन चार हजार फौज आहे. सोंध्यांत त्याची फौज नाहीं, असें असतां सोंध्याचे गांव मारावयाचा तुह्मांस विचार पडला. अपूर्व आहे ! आपले गांव राखून त्याचे गांव मारावे तर तारीफ. अतःपर तुह्मी लिहिलेप्रमाणेंच कराल. करावें. जाणिजे. छ. १२ जमादिलावल. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक ६८. श्री (नकल.) १६९२ भाद्रपद शुद्ध १४

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इहिदे सबैन मया व अल्लफ. राजश्री जनार्दनराम यांचें हुजूर प्रयोजन आहे, तर मा निल्हे पथकसुद्धां पत्रदर्शनीं हुजूर पाटवून देणें. जाणिजे. छ १३ जमादिलावल. बहुत काय लिहिणें ? लेखन सीमा.

पत्रांक ६९ श्री (नकल.) १६९२ भाद्रपद वद्य ३०

अखंडितलक्ष्मीअलंकृत. राजमान्यराजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुा इहिदे सबैन मयावअल्लफ टिपू चेनगिरीस होता. तो श्रीरंगपट्टणच्या रानांत गेला. कांहीं पांच सातशें राऊत जडे अन्वटीकडे आले ह्मणोन बातमी आली. व जडे अन्वटीचे राऊतांचे तोंडावरी नबाबाचेहि राऊत व हशम गेलेच आहेत. तूर्त तिकडे विशेष गडबड नाहीं. तथापि तुह्मीं पांचशें राऊत त्या शहरावर बंकापूरसमीप ठेवणें. राजश्री भिवराव* यशवंत यांस तोफखान्यासहित मनोळीच्या पारपत्यास जावयाची आज्ञा केली असे. तर तुह्मी पांचशें राऊन बंकापुराकडे पाठवून बाकी जमावानिसी भिवराव याजपाशीं येऊन, मनोळीचें ठाणें हस्तगत करणें. जाणिजे. छ २८ जमादिलावल. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

---

* पानशी.

पत्रांक ७० श्री (नकल) १६९२ आश्विन शुद्ध ११

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यांसीः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इहिदे सबैन मया व अल्लफ. राजश्री भिवराव यशवंत तोफखानासुद्धां मनोळीस पाठविलें. तुह्मी हैदरखानाचे फौजेच्या तोंडातर ५०० पांचशें राऊत बंकापुराजवळ ठेऊन तुह्मी व राजश्री शाहाजी भोंसले मनोळीस येऊन, मारनिले व तुह्मी एकत्र होऊन, मनोळी हस्तगत करणें ह्मणोन तुह्मांस पत्रें मुजरत जासुदाबरोबर पाठविलीं तीं पावलींच असतील. तिकडील बंदोबस्त करून, तुह्मीं मनोळीस यावयाचें केलेंच असेल नसेल तर करणें. भिवराव यशवंत निरोप घेऊन येथून गेले. तुह्मीं जलद येऊन यांस सामील होणें. जाणिजे. छ १० जमादिलाखर. बहुत काय लिहिणें ! लेखन सीमा.

पत्रांक ७१ श्री (नकल.) १६९२ आश्विन शुद्ध १३.

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे गोसावी यासीः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इहिदे सबैन मया व अल्लफ. धरमहट्टीस बाबूराव अनंद राहून मवासगरी करितो, सेठाणें वगैरे ठाणीं त्यांणीं बळाविलीं तीं घेतलीं पाहिजेत, ह्मणोन राजश्री नारो बाबाजी याणीं हुजूर लिहिलें. ऐसियास, मनोळीचें काम मातबर. तें घ्यावयाची आज्ञा तुह्मांकडे आहे. मनोळीस जातां सहजांत धरमहट्टी वगैरे ठाणीं जातां जातां सुटतील तर सोडवून जरीं दोन च्यार दिवस गुंता पडेसा असेल तरी आधीं मनोळीस जाऊन मनोळी घेऊन उपरान्त येतां धरमहट्टी वगैरे.नारो बाबाजी सांगतील त्याप्रमाणें ठाणीं घेणें. जाणिजे. छ १२ जमादिलाखर बहुत काय लिहिणें ! लेखन सीमा.

पत्रांक ७२ श्री लक्ष्मीकांत. १६९३ आश्विनशुद्ध ३

राजश्री गोसावी यांसः—

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो जानोजी भोंसलें सेनासाहेब सुभा सुा इसने सबैन मया व अलफ. पा आंबड हा माहाल राजश्री पंतप्रधान याकडून राजश्री तुकोजी होळकर यांसी आहे. तेथें नजर घांसदाणा घेऊं नये, ऐसा करार असे. मेजवानीचा फडशा राजश्री रामाजी बल्लाळ यांचे विद्यमानें नामपूरचे मुक्कामी हुजूर जाला आहे. तरीं सालमजकुरीं तुह्मीं थाल

मजकुरास घांस दाणा वगैरे काडी इतका उपसर्ग न देणें. जाणिजे. छ २ माहे रजब. बहुत काय लिहिणें ? मोर्तबसूद.

पत्रांक ७३. श्री. १६९३ आश्विन शु॥ ५

(असल प्रा नकल.)

राजश्री रामचंद्र नाईक परांजपे व आबाजी नाईक कात्रस, सावकार पुणेकर, गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो महादजी शिंदे दंडवत. सु॥ इसन्ने सबैस मया व अलफ. तुह्मांपासून पुणियांचे मुकामी सन समानांत व सन तिसांत व जवाहीर वगैरे घेतले त्याचा हिशेब छ १ साबान कार्तिक शु॥ २ सन मजकूर पो रुो

११९५२२॥।≶ ऐन मुद्दल.
३५९३४ व्याज.
७२०० हुंडणावळ.

१६२६५६॥।≥

पैकीं आदा रुपये.

३१५६९॥।≶ कोव्या बा॥ ऐन व व्याज.

१००००० रामचंद्र काशी कादार प्रा॥ अंतरवेद याजकडून घेतले.

बाकी देणें राहिले ३१०८७ रुा आके (आंख) एकतीस हजार सत्यांशीं रु॥. यांसी व्याज दरमाहे दरसदे दर १ एकोत्रा प्रमाणें. कार्तिक शु॥ शके १६९३ खरनाम संवत्सरेपासून दिल्हे जाईल. जाणिजे. छ ४. माहे रजब. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तब.

पत्रांक ७४ श्री (नकल) १६९३ आश्विनशुद्ध ६

राजश्री बाळाजीपंत लेले स्वामीसः—

विनंती उपरी. किल्ले बेळगांव पै॥ पंन्नास माणूस राजश्री त्र्यंबकराव मामाकडे कर्नाटकांत रवाना करावयाची नेमणूक पुणियांत केली आहे. त्यास, किल्ले मजकुरीं माणसाची भरती थोडी आहे ह्मणोन राजश्री महिपतराव विश्वनाथ यांणीं सांगितलें. त्याजवरून रजबदलीमुळें पंचवीस माणुस मना करून बाकी पंचवीसासच रवाना करावयाची नेमणूक केली आहे. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें किल्ले मजकुरांतून पंचवीस माणसांची रवानगी कर्नाटकांत करवणे. रा॥ छ ५ रज्जब, सन इसन्ने. हे विनंति.

पत्रांक ७५ श्री. १६९३ आश्विन वद्य १४

राजश्री नारो आबाजी गोसावी यांसी:—

सुा इसन्ने सबैन मया व अलफ. किल्ले पुरंधर व किल्ले वज्रगड देखील सरंजामाचे गांव येथील सालमजकूरचा बेहेडा जाला पाहिजे. तरी सालगुदस्त सन इहिदे सबैनचा हिशेब तपशीलवार व सालमजकूर अंवल सालची हजिरी ठिकाणवार व सरंजामाचे गांवची जमाबंदी वगैरे कागद बेहेड्याचे उपयोगी दरकदार कारकुनाबराबर पाठवून देणें. जाणिजे. छ २७ रजब.

पत्रांक ७६ श्री. १६९३ आश्विन वद्य

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महादजी नारायण गोसावी यांसी:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इसन्ने सबैन मया व अलफ. तालुके अमदानगर येथील सालमजकुरींचा बेहेडा जाला आहे. तरी सालगुदस्त सन इहिदे सबैनचा हिशेब गांवगन्ना जमाबंदीसुधां व सालमजकुरीं अवल सालची लोकांची हजीरी वगैरे कागद बेहेड्याचे उपयोगी दरकदार कारकुनाबराबर देखतपत हुजूर पाठवून देणें.

पत्रांक ७७. श्री. १६९४ वैशाख शुद्ध १२

निळकंठराव गोविंद शिवराम यांचे पुत्र यांस वस्त्रें वगैरे विा राजश्री रावसाहेब रुबरु पाहून दिल्हीं. सुा इसन्ने सबैन मया व अल्लफ. जामदारखाना पैकीं छ १० सफर पोषाख खासगी राजश्री नारायणरावपैकीं कापड आंख.

११८	तिवट छिटी बापुरी	१
४००	दुपटा पैठणी	१
६७॥'	झगा छिटी मुलतानी	१
११३	तुंबा किनखापी	१
६९८॥		४

जवाहीरखानापैकीं छ १२ सफर वस्त्रें दिल्हीं ते समई चौकडा मोत्याचा एक एकूण किंमत रुा ३२१५।'॥

मोत्यें रति २७ वजन तोळे ·।१॥।'॥

एकूण किंमत रुपये ३२०० मोत्यें ४. सोनें दर तोळा रुपये १५८= प्रमाणें किंमत रुो १५।·॥ सोनें तोळे १८८१

जिन्नसखानापैकीं छ १० सफर यांस पोषाख दिल्हा त्यास विजारेस दाल रेशमी निरुख गज २॥

पत्रांक ७८ श्री. १६९४ भाद्रपद वद्य २

सेवेसी आबाजी बाजी कांवरस व रामचंद्र महादेव परांजपे. विज्ञप्ती. श्रीमंत महाराज राजश्री शिवाजी महाराज स्वामी यांसी तालुके चिवोडी व मनोळी दिल्हे आणि त्यांजकडोन ऐवज घ्यावयाचा करार केला रु॥१२५०००१ बारालक्ष पन्नास हजार एक. सदरहु रुपये यांचा हवाला आह्मीं घेऊन ऐवज भरिला आणि दोन्ही तालुके ठाणींसुद्धां राजश्री आपाजी शामराव यांचे निसबतीस सावकारींत श्रीमंत महाराज स्वामी यांणीं ठेवून करार करून दिल्हे आहेत. त्याप्रों मुद्दल व व्याज, मनोती व दरबार सर्व सुद्धां ऐवज फिटे तों दोन्ही तालुके आह्मांकडे असावे. मधें महाराजांनीं आपाजी शामराव यांसीं व आह्मासीं हरएक गोष्टीविषयीं दिक्कत आणून तालुकेयाची घालमेल करितील किंवा सरकारांत आणखी मध्यस्ताचे हातून हरएकविशीं लोभ दाखवून संधान करितील आणि तालुक्याची घालमेल करवितील; किंवा भगवंत आपाजी व राजश्री शेषो नारायण यांचे कर्जाचा फडशा महाराजांकडून होणें आहे, तो सुरळीत न केल्यास सरकारांतून मानिल्हे तालुक्यांत उपद्रव करवितील; तर आमचा पैका कराराप्रों अगोदर देवावा. मग कर्तव्य तें करावें. अथवा आमचा पैका फिटे तों पुस्त पुन्हां करून घालमेल होऊं देऊं नये. भगवंत आपाजी व शेषो नारायण यांचा कांहीं पैका निघाला; आणि सरकारांतून देवणें; तरी परभारें महाराजांकडून देवावा. आमच्या दोन्ही तालुक्यांस उपद्रव लागों नये. येणेंप्रमाणें करार करून अभयवचन दिल्यास सेवक या कामांत येतील. कलम. सदरहुप्रमाणें तुम्हीं विनंती केली. त्यास तुह्मी बेवसवास या कामांत येऊन ऐवजाचा भरणा करणें. तुह्मास श्रीमंत महाराज छत्रपती स्वामी यांनीं दोनी तालुक्यांचा ऐवज अपाजी शामराव यांचे विद्यमानें लाऊन दिल्हा आहे. त्याजप्रमाणें घेत जाणें. सरकारांतून दोन्ही तालुकियांस उपद्रव होणार नाहीं. कदाचित महाराज स्वामीकडून तालुकियास उपद्रव जाला, तर सरकारांतून पुस्तपुन्हा राखून तुमचा पैका व्याजसुद्धां फिटे तोंपर्यंत तालुकियाची घालमेल होऊं देणार नाहीं. येणेंप्रमाणें करार छ १६ जमादिलाखर, भाद्रपद मास, सन सल्लास सबैन.

पत्रांक ७९ श्री. १६९४ आश्विन वद्य १२

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान । माधवराव बल्लाळ
मुख्य प्रधान. ॥

दस्तक सरकार राजश्री पंत प्रधान ता कमावीसदारान व चौकी-दारान व रहदारान व जकाती देहाय. सुा सलास सबैन मया व अलफ. राजश्री बाळाजी जनार्दन फडनिवीस यांचे तांदूळ खंडी १० दाहा खालोन फिरंगाण कल्याण प्रांतांतून पुणियास आणितील. त्यास, आणूं देणें. जकातीचा तगादा न लावणें. जाणिजे. छ २५ रजब. आज्ञा प्रमाण. लेखन-सिमा. बार.

पैा छ २४ जिल्काद.

पत्रांक ८० श्री. १६९४ मार्गशीर्ष वद्य ११.

राजश्री बिरोजी गारे गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोसले सेनासाहेबसुभा रामराम. सुा सलास सबैन मया व अल्लफ. मौजे पेद पेठ पोरलावल हा गांव कृष्णाजी वामन यांजकडे मोकासा सुदामतपासून चालत होता. त्यांस देव-आज्ञा जाली. याजकरितां त्यांचे पुत्र रा केशवराव कृष्ण यांजकडे पेसर्जी प्रों करार करून दिल्हे असे. येविषयीं पेसजीं सनदा सादर जाल्या आहेत. तर मौजे मजकूराचा मोकासा दरोबस्त मारनिलेकडे चालवणें. सालमजकुरींचा वसूल तुह्मीं घ्याल तर देणें येईल. जाणिजे. छ. २४ माहे रमजान.

पत्रांक ८१ श्री. १६९४ माघ शुद्ध ८.

राजश्री संभाजी जाधवराव गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री नारायणराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणें. विशेष. तुमच्या

लोकांनीं तुह्मासीं गवगवा केला आहे, ह्मणोन कळलें. तरी तुह्मीं लोकांसह वर्तमान हुजूर येणें. येथें लग्नाचा प्रकार आहे. तरी सत्वर येणें. जाणिजे. छ. ७ जिलकाद. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान नारायणराव
बल्लाळ मुख्य प्रधान.

पत्रांक ८२. श्री. (नकल) १६९४ फाल्गुन शुद्ध १

शिक्का.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारायणराव पंडित प्रधान ता. कादरखान वल्लद सादुल्लखान वाँ कसबें वाई समत हवेली प्रांत वाई. सुा सलास सबैन मया व अल्लफ. तुह्मीं हुजूर पुणें येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, कसबें मार येथील कोतवाली पेशजीपासून आपला आजा मियानखान त्याजकडे होती, तो हल्लीं मयत झाला, याजकरितां साहेबीं कृपाळु होऊन आपल्याकडे कोतवाली करार करून सनद करून दिल्ही पाहिजे. ह्मणोन त्याजवरोन मनास आणितां, काा मारची कोतवाली तुझा आजा मियनखान त्याजकडे चालत होती. त्यास, तो मयत जाहला. सबब हल्लीं तुजकडे कोतवाली करार करून दिली असे. कोतवाली संमंधें जमीन मळ्यासुद्धां व हक्कलाजिमा, सुदामत चालत आल्याप्रमाणें दुवा घेत जाऊन पूर्ववत्प्रमाणें कोतवालीचें कामकाज करीत जाणें. जाणिजे. छ २९ जिलकाद. आज्ञा प्रमाण. लेखनसीमा. मोर्तब.

पत्रांक ८३ श्री १६९५ भाद्रपद वद्य अखेर.

श्रीमंतास पत्र लिहिलें आहे त्यांतील अन्वय.

विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें सादर जाहालें. छ ११ जमादिलाखरीं दोन प्रहरां दिवसानंतर गाड्यांची तलबेमुळें दिवाणखान्यांत कटकट जाहली. त्यांत नारायणराव मारले गेले. त्यास, तुह्मीं किल्ले मजकूर येथील चौकशी पाहारियाचा बंदोबस्त चांगला करणें. तिकडे तुह्मांस शत्रू

संनिध. ते आपली संधी पाहत असतील. याजकरितां बातमी राखोन बहुत खबर (दार) राहणें ह्मणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखला आहे. सांप्रत, नबाब हैदरअल्लीखान पट्टणासच आहेत. चित्रदुर्गकरांकडे जमाव पाठविला होता. त्यास, तेथील तह करून जमाव पट्टणास आणविला........जागा कोडगाकडे वगैरे जमाव पाठविला होता. सर्व...पट्टणास जमा केला आहे. विजयादशमी जाहल्यावर चंदावरची कुमक करणार ह्मणोन बातनी आली आहे. याउपरी काय मनसबा करतील कळत नाहीं. बातनीस नेहमीं पांच जोड्या पाठवून वरचेवर बातनी आणवित असतों. त्याचा उपद्रव इकडे द्यावयाचा डौल दिसोन आलिया ठाण्याच्या बंदोबस्तास शिबंदी जाजती ठेवावी लागेल. गुदस्तां नबाबांनीं श्रीनिवासराव बरकी फौजसुद्धां पाठवून पुंगनुर व घटक वगैरे तालुक्या खालील पाली येथील खंडणी तीसाला करून ऐवज घेऊन गेले. व गुमनाड पालें घेऊन, तेथें ठाणें आपलें घालून, चिमणाजी बाळाजी यांस ठेऊन, तेथें पांचशें स्वार व पांचशें गारदी ठेविले आहेत. त्याचा उपद्रव तालुक्यास होत आहे. इकडे आरद्राचा परज्यने जुजबी पडला होता. शेतें पेरलीं होतीं. मध्यें परज्यने पडला नाहीं याजमुळें वाळून गेलीं. कार्तिकांत साळीचें पीक यावें तें बुडालें हल्लीं हस्ताचा परज्यने लागला आहे. स्वामीचे पुण्यप्रभावें (पीक) सर्व तालुक्यांत होईल. वैशाखचें साळीचें पिक होईल. नबाब महमंद अल्लीखान यांणीं चंदावरास मोर्चे देऊन तें स्थळ घेणार. धर्म—संस्थान आहे. स्वामींच्या पुण्यप्रतापें राहिल. कळेना. येंदा फौजा याप्रान्तीं आल्या तर प्रांताचा बच्याव आहे. बरकड वर्तमान राजश्री रामचंद्र माहादेव शेवेसीं विनंती. (कर) तां निवेदन होईल.

पत्रांक ८४ श्री.

यादी बळवंतराव महादेव भानु. विज्ञापना. आमची वहीण कैलासवासी श्रीमंत भाऊ साहेब यास प्रथम संमंधास दिल्ही होती. सबब सरकारांतून आह्मांस तो बेलापूर येथील दिवाणगिरीची असामी दरकी अडीच हजार रुपये यांची कैलासवासी श्रीमंत नानासाहेब यांणीं करार करून दिल्ही. ती आजपर्यंत निर्वेध चालत आली. ती स्वामी कृपाळू होऊन, असामी पूर्ववत आह्मी सरकारचे पदरचे, आमचें चालवणें अवश्यक जाणोन, असामी चालविली पाहिजे.

पत्रांक ८५ श्री. १६९५ आषाढ-श्रावण

श्रिया सहस्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री भाऊ यांसीं प्रति काशीराव भास्कर आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत

असिलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें न करावें. सदैव पत्रीं कुशलार्थ लिहित जाणें. यानंतर इकडील अर्थ तरी: चिरंजीव राा तात्या, श्रीमंत मातुश्री दर्याबाईसमागमें श्रीमंत आपासाहेबांसहित आहेत. आकोटावर आले. इस्माईलखान अलजपुरास आहेत. श्रीमंत नानासाहेब व नबाबाचे दिवाण रुकनद्दौला व जंग व धौसा ऐसे मिळून पंधरा हजार कंबेश फौज, शिवाय पन्नास साठ तोफा, शिवाय जेजाला, बाण व गारदी ऐसे सामानानशीं नजीक अलजपुरास गेले. पाहावें. इस्माईलखान झुंजावयासी लागेल. शहरांतून लागले तरी आपा बाहेरून लाग करतील. नाहीं तरी, इस्माईलखान याचे विचारें जाबसाल होणें तो होईल. ह्या आठ दिवसांत हरएक गोष्ट घडते, ऐसें आहे. आह्मी उभयतां श्रीमंताचे कटाक्षामुळें बेसरंजामीस्तव घरींच आहों. चिरंजीव तात्या मातुश्रीचे मर्जीत सुखरूप आहेत. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पत्रांक ८६. श्री नकल. १६९५ पौष वद्य १

याद. राजश्री बाळाजी नाईक भिडे यांचा हिशोब एकंदर, सुा अर्बा सबैन मया व अल्लफ, माहे रमजान, अखेर मार्गशीर्ष पावेतों सरकारचा शिक्यानशीं दिल्हा. त्याजशिवाय मारानिलेचें देणें तफावत कलम रुा

३०००० कित्ता रकमा.

१५००० सन इसन्नेंत सरकार भरण्यास नाईक मारानिले व नारो आपाजी व रामचंद्र नाईक परांजपे यांजकडून रुपये ५००००० पांच लक्ष देविले. त्यापैकीं रद्‌कर्ज हुंड्या परभारें दिल्हे ४८५०००. बाकी देणें रुा.

१५००० दरबारचा खर्च व शिलेदाराचे समजाविशी बाा वगैरे हिशेब रुा २२६५६७॥॰ पैकीं भरणा परभारा २११५६७॥॰ बाकी देणें.

३००००.

२००० त्रिंबकराव हरी परचुरे यांणीं बंदर सुरतची मामलत करून रसदेचा भरणा केला असतां, त्याजकडून मामलत काढून रसदेचा ऐवज घेतला; तो माघारे दिल्हा. साा खर्चाचे रुपये मारानिलेस देणें पडिले.

ते रुा १५२५ माहाल मार कमाविसदार व कारकून याचे मुशाहिरे देणें पडिले ते रुा ४७५ व्याजाबा.

३२०००

सदरहु बत्तीस हजार रुपये पेशजींचे हिशेबाशिवाय मारनिलेचें देणें. शिवाय व्याज सदरहु ऐवजाचें मित्या पाहून देणें असे. जाणिजे. छ १५ माहे सवाल.

पत्रांक ८७ श्री. १६९५ माघ वद्य ४—वद्य ३०

पुा. सेवेसी सां नमस्कार. विनंति. येथील वर्तमानः श्रीमंत उभयता* बाई पुरंधरास गेली. राजश्री नाना फडणीस व राजश्री सखारामपंत बापू व हरीपंत फडके ऐसे त्रिवर्ग तेथें आहेत. राजश्री मोरोबादादा फडणीस पुणेयांत आपल्या बागांत राहिले आहेत. काम कारभार सर्व बाईच्या नांवें पत्रें होतात. सरकारी कारखाने पुरंधरास नेतात. लोकहि सावध जाले आहेत. जिकडे ज्यांचा थारा तिकडे ते थारियास लावितात. ऐशास, राजश्री तात्यास घरास पाठवावें ह्मणोन दोन तीन पत्रांनीं लिहिलें आहे. त्यास, आपण लिा कीं, काका त्रिंबकराव मामाच्या लष्करीं गेले आहेत, ते आले ह्मणजे तात्यास लौकर पाठवितों, ह्मणोन लिहिले. तरी, तात्यांच्या येण्यास बहुत दिवस लागतील. तरी च्यार उंटें, दोन तट्टें सत्वर पाठवावीं. दोन उंटें राजश्री रावजीस दिलीं पाहिजेत. यास्तव उंटें, तट्टें जरूर आधीं पाठवावीं. दिवसगत न करावी. कृपा किजे. हे विनंति. इ० इ० इ०

पत्रांक ८८ श्री. १६९५ फाल्गुन शुद्ध १२

राजश्रियाविराजित राजमान्यराजश्री नरसिंगराव स्वामीचे सेवेसीं:—

पो सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून लिहित जावें. विशेष. राजश्री विष्णु नरहर लष्करांतून आले. त्यांणीं सविस्तर मजकूर सांगितला तो कळला. त्यास तुमचें लक्ष इकडचें पुरतें आहे व हाली मारनिले यांणीं खातरजमा केली. त्यास, राजश्री भवानराव प्रतिनिधी व राजश्री बामनराव गोविंद हे उभयतां तुह्मांस सांगतील त्याप्रों ते व तुह्मी मिळोन कर्तव्य तें करावें. सर्व गोष्टी तुह्मांस समजल्याच आहेत. मेहनतीचे, कारस्थानीचे दिवस हेच आहेत. सर्व एकदिल होऊन कर्तव्यार्थ करावा. रा छ ११ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंति.

---

*गंगाबाई व पार्वतीबाई.

पत्रांक. ८९ श्री. १६९५ फाल्गुन वद्य ५

राजश्री नानाजी कृष्ण व राजश्री बाबूराव विश्वनाथ गोसावी यांसीः–

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. इकडील वर्तमान वरचेवर लेखन होतच आहे. नांदेडच्या मुकामीं राजश्री कृष्णराव आह्मांजवळ पोंचल्यावर तैसेंच दरकूच येत आहों. तांब्रांकडील राजकारण पहिलेंच आहे. त्याजकडील ज्ञानराव गिरधर आला होता. त्यास रवाने केला. ज्याबितजंग यासीं आणावयाबद्दल राजश्री दिवाकर पुरुषोत्तम पा आणि दर मजल आलों. नबाबाकडून पत्रें आलीं कीं, आपण कलबुर्गियाचे सुमारें येत असों. त्याजवरून, छ १६ जिल्हेजीं राजश्री भवानी शिवराम नबाबाकडे पा. रा मामाच्या तर्फेनें रा शिवाजी विठ्ठल यांजकडील चिमणाजीपंत त्या समागमें दिल्हे. काल छ १८ जिल्हेजीं बुधवार फाग वद्य पंचमी प्रहर रात्रीस रुकनद्दौला व शर्फुद्दौला व बीरबाहदर यांच्या भेटी जाहाल्या. दोन कोस ते अलीकडे आले. आह्मीं व राजश्री मामा इकडून दोन कोस गेलों. भेटी होऊन आपापले गोटास आलों. नबाब निजाम उद्दौला यांच्या भेटी उदईक होऊन, पुढील चालीचा प्रकार होणें आहे. राजश्री रघुनाथराव दादा यांजकडून भिवुणखान मेवाती व राजाराम गोविंद ऐसे नबाबाकडे आले आहेत. त्यांसहि नबाब उदईक बिदा करणार. दादा माघारे फिरले. इतकें मात्र वर्तमान आहे. ठिकाणबंद कोठें आले, मजकूर काय, हा प्रकार नाहीं. बातमीस माणसें गेलीं आहेत. आलियावर लेहूं. दादांचीं पत्रें आलिकडे आह्मांस दोन तीन आलीं कीं, तुमचे मतलब होऊन येतील, तुह्मीं रा त्रिंबक विश्वनाथ यांसीं भेटला हें उत्तम केलें, तरी अती सत्वर येणें. त्यास, आह्मीं साफ उत्तर दिल्हें. त्याचा मसोदाही आहे. सारांश, अतःपर लांबण होऊं नये. येविशीं राजश्री तात्यांनीं लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. येथें तो रुा अगत्य पाहिजे. व आमच्या लोकांचा गवगवा मिटोन आदा होणें. दोन चार लाख रुा कोणत्याहि प्रकारें जरूर आहे. आह्मीं कायावाचामनें सर्व प्रकारें तुह्मांजवळ आहों. तुह्मीं मुरबीयांस प्रांजल सांगावें. निशा केलीच आहे. तत्रापि, साहित्यप्रकार अमलांत यावा. हें जाहलें पाहिजे. रा छ १९ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ९०

पो छ २६ जिल्हेज. श्री. १६९५ फाल्गुन वद्य ५

राजश्री हरीपंत गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. छ १६ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून कळलें असेल. राजश्री भवानी शिवराम व राजश्री त्रिंबकरावमामाकडून राजश्री शिवराम विठल यांजकडील चिमणाजीपंत मोगलांकडे पाठविले होते. छ १७ जिल्हेजीं आमचा व तांब्राच्या सैन्याचा चौं कोसांचा तफावत राहिला. मौजे कवठे पा कलबुर्गे येथें आले. राजश्री रघुनाथरावदादा यांजकडून भिकणखान मेवाती व राजाराम गोविंद कोणी मोंगलांकडे आले होते. त्यास, छ १८ जिल्हेजीं फाग वद्य पंचमी सौम्यवारीं प्रहर रात्रीस रुकनद्दौला व शर्फुद्दौला व वीरबाहादर दोन कोस अलिकडे आले. आह्मी व मामा दोन कोस पुढें गेलों. भेटी जाहल्या. नवाब निजामुद्दौला यांच्या भेटी होऊन चाल ठहरावी हा प्रकार मात्र आहे. याउपरी व्हावी ते त्वराच व्हावी. लांबण होऊं नये. सर्व तुमच्या ध्यानांत आहे. राजश्री कृष्णराव नारायण यांच्या पत्रावरून कळेल. अत:पर कर्तव्य कामास दिवस लागों नयेत. रा १९... माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति. मोर्तबसूद.

श्री

शाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतस: । त्रिंबा-त्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते.

पत्रांक ९१.

पौ छ २६ जिल्हेज. श्री १६९५ फाल्गुन वद्य ५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरीपंत तात्या स्वामीचे सेवेसीं:—

सेवक भवानी शिवराम सा। नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल ता। छ १९ माहे जिल्हेज गुरुवार मुकाम मोजे इदरगांव, पा। गुंजोटी, जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. दोन तीन पत्रें आपणाकडून

आलीं पाहोन आल्हाद जाहला. उत्तरें पाठविलीं ते पोंहचून सविस्तर कळलेंच असेल. प्रस्तुत वर्तमान कीं: संकेताप्रमाणें लांब लांब सोळा सतरा कोसांच्या मजली करीत, मजल दरमजल छ १७ रोजीं गुंजोटीवर मुा केला. इतकियांत मदारुलमहाम यांचीं पत्रें एकामागें एक कीं, तुह्मीं सत्वर येणें. त्याजवरून राजश्री मामा यांच्या तर्फेनें राजश्री बापू शिवदेव यांजकडील चिमणाजीपंत आह्मी दोन प्रहर रात्रीस लष्कर दाखल जाहलों. दुसरे रोजीं मदारुलमहाम यांचे पुत्र डावरजंग डेरीयास आले. भेटी जाहल्या. तदोत्तर आपणहि गेलों. भेटी होऊन कित्तेक मजकूर बोलण्यांत आले. त्याजकडील लक्ष आपणाकडे आहे. श्रीमंत दादासाहेब यांजकडून राजारामपंत नामें एक गृहस्थ व भिकणखान ऐसे आले आहेत. मजकूर कीं, आपणास साह्य व्हावें, एक दोन किल्ले व दाहा कोसांची जाहागिर देतों. त्यास अमान्य करून, लक्ष आपणाकडे ठेविलें आहे. याउपरी होईल वर्तमान तें लिहित असों. छ १८ रोजीं सेनासाहेबसुभा व राजश्री मामा यांचे भेटी जाहल्या. आज छ मजकुरीं बंदगानअलीच्या मुजामतीस आह्मांस मदारउलमहाम नेणार. राजश्री मामाच्याहि भेटी होतील. तदोत्तर घडेल तें वर्तमान लिहिलें जाईल. सारांश, याजकडील लक्ष एकनिष्ठपणें आपणांकडे आहे. दुसरियाकडे किमपिहि नाहीं. कळावें ह्मणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें? कृपालोभ करावा हे विनंती.

पत्रांक ९२

पौ छ २६ जिल्हेज श्री. १६९५ फाल्गुन वद्य ५

श्रीमंत राजश्री बापू स्वामींचे सेवेसीः—

सेवक भवानी शिवराम सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ताा छ १९ माहे जिल्हेज गुरुवासर मुकाम मौजे इदरगांव गुंजोटी जाणोन कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आह्मांकडील एक दोन पत्रें सेनासाहेब सुभा व सेवकांचे नांवे आलीं तीं पोंहचून संतोषवाप्ती जाहली. उत्तरें पाठविलीं तें पाहोन वर्तमान ध्यानास आलेंच असेल. प्रस्तुत इकडील वर्तमान तरी: आपले लिहिल्याप्रमाणें लांब लांब सोळा सतरा कोसांच्या मजली करीत मजल दर मजल छ १७ रोज भौम्य-वासरीं गुंजोटीवर मुकाम केला. तों पत्रामागें पत्रें दोन तीन मदारुलमहाम यांची आलींत कीं, तुह्मीं सत्वर येणें. त्याजवरोन तेच दिवशीं राजश्री मामा यांच्या तर्फेनें राजश्री शिवाजी विठल यांजकडील चिमणाजीपंत व आह्मी स्वार होऊन दोन प्रहर रात्रीस लष्कर दाखल जाहलों. दुसरे रोजीं मदारुलमहाम यांचे पुत्र डावरजंग डेऱ्यास आले. भेटी जाहल्या. तदोत्तर आपण नबाबाच्या भेटीस गेलों. भेटी

होऊन कित्तेक भाषण जाहलें. याजकडील लक्ष आपलेशिवाय दुसरेकडे नाहीं. छ १८ रोजीं सेनासाहेबसुभा व राजश्री मामा यांच्याही भेटी बारा घटिका रात्रीस जाहाल्या. छ मजकूर आज आह्मांस बंदगानअलीच्या मुलाजमतीस मदारुलमहाम नेणार. सेनासाहेबसुभा व राजश्री मामा यांचेहि भेटी घडतील. तदोत्तर होईल वर्तमान सेवेसी लिहित असों. श्रीमंत दादासाहेब यांजकडोन राजारामपंत नामें व भिकणखान आले. एक दोन किल्ले व दाहा वीस लक्षांची जहागिर देतों, साह्य व्हावें. त्यास याणीं अमान्य केलें; व लक्ष आपल्याकडे ठेविलें आहे. दुसरीकडे नाहींच नाहीं. बहुत काय लिहिणें? कृपालोभ असों द्यावा. हे विनंती.

पत्रांक ९३.

पौ छ. २६ जिल्हेज श्रीशंकर. १६९५ फाल्गुन वद्य ५.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरीपंत तात्या स्वामीचे सेवेसीं—

पो कृष्णराव नारायण कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. राजश्री त्रिंबकराव मामा व राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांच्या व रुकनुद्दौले यांच्या भेटी बुधवारीं रात्रौ जाहाल्या. बोलणें ममतेचें जाहलें. आज उद्यां नवाब बंदगानअली यांच्या भेटी होतील. येविशीं राजश्री सेनासाहेबसुभा यांनीं लिहिलें आहे, व तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री बापूरावजी सविस्तर सांगतील. त्यावरून कळेल. निरंतर पत्रीं कुशलार्थ लिहून संतोषवीत असावें. बहुत काय लिहिणें? लोभाची वृद्धी करीत जावी. हे विनंती.

सेवेसीं लक्ष्मण बल्लाळ जोशी सांा नमस्कार. विनंती लिा परिसोन सदैव परामृश करीत जावें. हे विनंती.

पत्रांक ९४.

पौ. छ. २६ जिल्हेज. श्री. १६९५ फाल्गुन वद्य ५.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापू स्वामीचे सेवेसीं:—

पो कृष्णराव नारायण जोशी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करित असिलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान तरी राजश्री त्रिंबकराव मामा राजश्री साबाजी भों सेनासाहेबसुभा यांच्या व रुकनुद्दौले यांच्या भेटीं बुधवारीं रात्रौ जाहाल्या. भाषण ममतापुरस्कर जाहलें. आज उद्यां नबाब बंदगानअली यांच्या भेटी होतील. सविस्तर वृत्त राजश्री सेनासाहेबसुभा यांनीं लिहिलें आहे. व तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री बापूरावजी निवेदन करितील. तिकडून पत्रें

वरचेवर येत असावीं. बहुत काय लिहिणें? लोभ करावा हे विनंती. सेवेसीं विनंती सेवक लक्ष्मण बल्लाळ साष्टांग नमस्कार विज्ञापना. जाहलें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. नबाबाच्या भेटी जाहल्यानंतर सविस्तर लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय.

पत्रांक ९५ श्री. १६९५ फाल्गुन वद्य ५

आशिर्वाद उपरी. मुख्याकडून आज चार दिवसांत चार अनुसंधानें चौघांचे हातून याजकडे आलीं. त्यातील अर्थ जे, प्रथम सेनाखासखेल हें पद देतों, तुमच्या सरंजामाइतका सरंजाम देतों, आणि दोन किल्ले मातबर देतों, व दर्म्यानें मातबर माणूस देतों, आणि तुह्मी यावें. हें अनुसंधान योसिता व शिशु येथें आहेत त्यांचे विद्यमानेंच यांणीं त्याणीं एक होऊन जावें, ऐसें प्रथम आलें. याणीं साफ उत्तर दिलें. त्यावर दुसरें सूत्र आलें कीं, तुमचें पद तुह्मांस देतों, आणखी दोन किल्ले व जहागीर देतों. तेंहि यांनीं अमान्य केलें. त्याजवर, तिसरें सूत्र आलें कीं, जें जाहलें तें समर्थ, तुमचे मुद्दई आह्माजवळ आहेत, यामुळें तुह्मांस विश्वास पटत नाहीं, तरी त्यास ज्ञानकंटी बसवून पाहिजे तरी तुह्मांकडे पाठवितों. त्यानंतर चवथें सूत्र आलें कीं, आपण एकले तुमच्या डेऱ्यांत येऊन बसतों, तुमच्या वंशजपणास उत्तम दिसेल तें करावें; तुह्मी ह्मणाल कीं, राज्य एकीकडे व आह्मी एकीकडे कैसें बनेल, तरी तुह्मांस सोवर्ती आणखी करून देतों, मुद्दईयाचे खावंद तुह्मी व्हावें म्हणजे चिंता नाहीं. याणीं नावें पुसिलीं. त्याणीं आपले सरदार मातबर यांचीं नांवें घेतात. वृध नकार—नामक सकार—नामक येथें आहेत. हे व मुद्दई यांची चमू यांचीं नांवें घेतलीं. तेव्हां त्यासहि संशय प्राप्त जाहला. परंतु परस्परें विक्षेप वाढावे या अर्थी नांवें घेतात किंवा कसें, हेंहि समजत नाहीं. यांणीं उत्तर केलें कीं, तुह्मी गोष्टी सांगतां त्या आमच्या निदर्शनास कशा येतील, व तुह्मी ज्याचे अभिमान धरिलें त्यांच्या गोष्टी तुह्मीच ऐशा सांगतां तेव्हां पुढें परिणाम कैसा ? ऐसीं याजकडे अनुसंधानें येतात. यांचा आमचा प्रकार दुसरा नाहीं, यामुळें आम्हांस कळतात. त्यास, याप्रो सर्वत्राकडेच असतील, ऐसें वाटतें. राजश्री मामांनींहि बोलण्यांत आणिलें कीं, श्रीमंतांचीं सूत्रें येतात यामुळें कोणी कचेपके होतील कीं हे काय कळत नाहीं, खुद्द आह्माकडेच नित्य सूत्रें येतात, ऐसींच सर्वांकडे येत असतील. यांनीं उत्तर केलें कीं, ज्यांच्या वंशांत खतरा असेल त्याचें कळेना, एक बाप असेल त्याजकडून तरी दुसरी गोष्ट घडणार नाहीं, ऐसें वाटतें. तेव्हां मामा उगेच राहिले. त्यास, त्यांचा खबीरदार दुसरा नाहीं, परंतु फौजेस पोटास नाहीं यामुळें सर्व मनुष्य मात्र आजुर्दे आहे. व मामाचें भाषण रुक्ष

विक्षेपास कारण होतें. मामा यासींच रुक्ष भाषण करितात, ऐसें नाहीं. त्यास सल्लागार दकारपूर्वक. त्यास कोणेहि प्रकारें हितशत्रुत्व करणें प्राप्त. मामास मात्र आप्त वाटतात. अविंधहि फार अजुर्दा आहे. पदोपदीं भाषणांत नाशितात. व सर्व अध्यकता आपणाकडे असावी वरकडाकडे कोणाचें लक्ष नसावें, एतद्विषयीं प्रेत्नही केले आणि करितात. अविंधानें तर सुब्रकपणा ठराविला. त्याचे मानस कीं, राजश्री बापूनीं व नानानीं फौजेंत यावें तरच ठीक पडेल, एरवीं ठीक पडणार नाहीं. येविसीं त्यांचीं व जिवाजी रघुनाथ यांचीं पत्रेंहि गेलीं असतील. परंतु उघड लिहिलें न लिहिलें हें न कळलें. सारांश, मसलत थोर. या दिवसांत सर्वांचें मनोधारण रक्षून दाबहि राखावा तरच उत्तम. नाहीं तरी कल खाईल. मग सुधरणार नाहीं. पिघी अविंधानें लुटली. ब्राह्मण व मराठे यांचे कबिले तेथें होते त्यांच्या अबरू गेल्या. यामुळें मराठे अजुर्दा फार आहेत. अविंधांकडून सहजांत जाहलें. जाणोन न जाहलें. परंतु वाईट फारच जाहलें. त्यामुळें मराठे यांस विक्षेप जाहला. जे गनिमाई जबरेंत आली, यामुळें या गोष्टी घडल्या.' राजा बाहादर याचे वेळेस ऐसेच विक्षेप वाढले. त्यास, हें नसावें. हें पत्र वाचून फाडून टाकावें. यांतील भावार्थ मात्र यजमानास समजावा. हरवख्त सूचना असावी हे आशिर्वाद.

आज श्रीमंतांकडून कराराची यादी व पत्र यांस आलें. त्यांत लिहिलें आहे कीं, जानोजी भोंसले यांच्या तहाप्रों तुमचे तुह्मांकडे करार आहे. मुधोजी भोंसले, जानोजी भोंा यांचे समई चंद्रपूर मात्र घेऊन ताबेदारी करीत होते, त्याप्रों करतील. याप्रों पत्र व यादी आलीं. टोपीवाले यांचीच पाठविलीं. नामनिर्देस उच्चार न करावा. परंतु वर्तमान असें आहे. यांस नकल दाखविली. ती त्यांनीं आपणाजवळ घेतली आहे. परंतु यास पुर्तेपणीं समजलें आहे. एक दोन गृहस्थहि यास बोध करीत होते. परंतु यांणीं ते गोष्ट अमान्य केली जे, आपणास हे गोष्ट उचित नाहीं, प्राणहि जाऊ, परंतु विपरीत गोष्ट घडणार नाहीं, आमचे वृत्तीस क्षणक्षणा पालट न करावा. ऐसें उत्तर साफ केलें. परंतु ऐसे फंद आहेत ! यांत सावधता असावी. उभयतांनीं यावें. हे मोटी सला आहे. हे आशिर्वाद.

पत्रांक ९६

पौ छ २६ जिल्हेज श्री. १६९५ फाल्गून वद्य ६

आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता फाल्गुन वद्य ६ भृगुवासर पावेतों मुा नजीक गुंजोटी वर्तमान यथास्थित असे. विशेष. रुकनतद्दोले यांची भेट बुधवारीं रात्रौ राजश्री मामासाहेब व सेनासाहेबसुभा यांची जाहली. भाषण ममतापुरस्कर जाहलें. आज उद्यां निजामअल्ली याची भेट होईल. उपरांत

चालीचा प्रकार ठरोन कूच होईल. रा भवानी शिवराम व चिमणाजीपंत दिा राजश्री शिवाजी विठल हे नबाबाच्या लष्करांतच आहेत. देवाजीपंत धौसे यांस आणावयास गेले ते लवकरच येतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब कोणे ठिकाणीं आले हें तहकीक बातमी नाहीं. त्यांजकडून राजारामपंत व भिकणखान आले आहेत. त्यांनीं नबाब निजामअली यास जहागिर वीस लक्षांची व दोन किल्ले देतों, ह्मणोन सूत्र लाविलें आहे. परंतु लक्ष मिळालें नाहीं. मामाच्या बोलण्यांत आलें आहे कीं, त्यास निरोप द्यावा; ठेऊं देतों, ह्मणून मदारुलमहाल यांनीं करार केला आहे. आजउद्यां निजामअली यांच्या भेटी होतील. उपरांत मसलतीचा विचार ठराऊन इतकियांत बातमीहि पक्केपणाची येईल. मग रोख कोणीकडे होणें तो देतील ऐसें आहे. भवानीपंतांच्या व रुकनतदौलांच्या बोलण्यांत त्यांणीं दर्शविलें कीं, तुह्मांविसीं राजश्री बापूंस व राजश्री नानांस आह्मीं लिहिलें होतें. त्याचीं उत्तरें आलीं तीं दाखविलीं. यांनींहि दर्शविलें कीं, आह्मींहि आपला स्नेहच असावा, ह्मणोन लिहिलें होतें. त्याचींहि उत्तरें आलीं आहेत. त्यास पत्रें पाहों ह्मटल्यास असावीं याजकरितां पुरवणीं पत्रें लिहून दिल्हीं आहेत. त्याच्या नकला पाहत आहें. पेंच पडावयाचा नाहीं. परंतु इतल्ला असावी याजकरितां लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचीं पत्रें सेनासाहेब यांस आलीं होतीं. त्यांचीं उत्तरें राजश्री मामांचे सल्लेनें लिहून दिलीं. त्यांत अर्थ जे: आजपर्यंत लोभयुक्त पत्रें यावीं ह्मणोन प्रतिज्ञा होती. याजकरितां उपासीतपासी मामासमागमें चार मास क्रमिले. निरुपाय जाणोन चारी घरें मोकलीं. ये गोष्टीस अनुसरलों. त्यास हालींहि पत्रें आलीं. त्यास गुह्य लिहिलें, आह्मीं मराठे, उर्मी–काय जाणो, त्यास प्रगट ल्याहावें, ह्मणजे समजण्यांत येईल. ऐसें लिहून दिल्हें आहे. सेनासाहेबसुभा यांचे विचारें कीं, मातुश्री बाईसाहेबांस घेऊन श्रीमंत राजश्री बापू व श्रीमंत राजश्री नानांनीं फौजेस यावें, ह्मणजे उत्तम, कोणे गोष्टीचा पेंच पडणार नाहीं, सर्व सरदार आज्ञेंत राहतील, कामकाज जीव वाढऊन करतील, व कोणेहिविसीं पुढें पेंच पडणार नाहीं. बाईसाहेबांचें येणें नघडे, तरी तेथें एकाजणानें राहिलें पाहिजे, त्यास राजश्री बापूंनीं तेथें रहावें आणि राजश्री नानांनीं फौजेंत यावें, ह्मणजे बंदोबस्त नीट होऊन कामकाज उत्तम प्रकारें होईल, पुढें पेंच पडणार नाहीं, दिवस हेच आहेत; आणि पाहतां सल्लाहि हेंच आहे, उभयतांतून एकजण आले, एकजण तेथें राहिले, तरी आपण अगर आपले नाना यांतून एकजणानें तेथें रहावें, एकाजणानें समागमें यावें. ऐसें यांचे मानस आहे. आणि ऐसेंच घडलेंही पाहिजे. श्रीमंत राजश्री नानांचें पत्र देखील आह्मांस नाहीं. विस्मरण पडलें कीं नाहीं? राजश्री मामांनीं बोलणें अगर खर्चास यास देणें तें आमचे विद्यमानें द्यावें, ऐसें तेथून यास परस्परें पत्रें आल्यास उपयोगीं आहे, परस्परें काम जाहल्यास

आह्मी श्रम केले, त्याचें फल काय? तरी पुर्तेपणीं समजोन लिहविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें? हे आशिर्वाद.

राजश्री रावजी स्वामीस तात्यांचे सां नमस्कार. लि॥ परिसोन लोभ किजे हे विनंति.

पत्रांक ९७

पौ छ २ मोहरम. श्री. १६९५ फाल्गुन वद्य ११

राजश्री नानाजी कृष्ण जोशी व बाबूराव विश्वनाथ वैद्य गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. छ १७ जिल्हेजीं रुकनद्दौला व शर्फुदौला यांच्या भेटी जाहल्याचें वर्तमान लिा आहे. जावितजंग यासीं आणावयाबद्दल राजश्री दिवाकर पुरुषोत्तम यांस पाा होतें. तेही काल छ २२ जिल्हेजीं दाखल जाहले. या उपरी कांहीं गुंता नाहीं. नेमलेल्या कामासच जावें. आणखी प्रकार नाहीं. वरकड राजश्री कृष्णराव व लक्ष्मणपंत यांणीं लिहिलें आहे, त्याजवरोन कळों येईल. दोन चार पत्रीं राजश्री सखारामपंत व राजश्री बाळाजीपंत यांच्या पत्रीं मजकूर कीं, स्वार पो खर्चास पाठऊं. त्यास, राजश्री तिंबकराव मामा यांची मर्जी आह्मांस दरकार. या मसलतीस मुख्य उपयोग. तिढण नसावी. त्यांणीं पत्र लिहून मागितलें. तें आह्मी दिलें. त्याजवरोन कळलें असेल. त्यास, पोटाचा गवगवा लोकांस मोठा आहे. कामाची मुनासद बारीक आणि पैसा नाहीं. मामाकडेसच ऐवज आला नाहीं. हा मजकूर एक व प्रसंगीं एक असावें. ऐसें दोन मजकूर आहे. येविपर्यीचा सिद्धांत तेथें उभयतांचे विचारें काय तरतूद हें कळावें. रवाना छ २४ माहे जिल्हेज. आह्माकडील सर्व अभिमान राजश्री बापूनीं व नानांनीं धरिला. तेथें अधिक लिहिणें ऐसें नाहीं. तुह्मी जवळ असा. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसूद.

श्री

श्रीशाहूराजपदांभोजभ्रमरायितचेतसः। बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते.

पत्रांक ९८.

पो छ २ माहे मोहरम. श्री १५ फाल्गुन वद्य ११

आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता। छ २४ जिल्हेज भौमवार पावेतों लष्करांत सुखरूप असो. विशेष. इकडील वर्तमान तरीः रुकनुद्दौलाच्या भेटीचा मा।र पेशजीं लिहिलाच आहे. मंदवासरीं बंदगानअलीच्या भेटी जाह्ल्या. भेटीचे समंई मामांनीं सेनासाहेबसुभा यांजकडील सरदार व लोक भेटीस न आणावे ह्मणोन सांगितलें आणि आपले सरदार व लोक भेटीस बहुत नेले. असो. ते भेटी झाल्यानंतर सेनासाहेबसुभा यांस टाकून खलबत मामांनीं करणें उत्तम नाहीं. पहिल्यापासोन ऐसें जाह्लें नाहीं. ऐसें असोन, तेथें मामांनीं उपक्रम केला. तेव्हां यांनीं ह्मटलें कीं, आह्मांस निरोप देणें, आह्मीं डेरेयास जातों, तुह्मीं खलबत करावें. ऐसें ह्मणोन नबाबाचा निरोप घेऊन आले. यांस तर वाईट वाटलें व नबाबास व रुकनतद्दौला यांसहि ते गोष्ट मानली नाहीं. यांनीं, मसलतींवर नजर, या करितां मर्जी राखितात. परंतु, समयीं मामा मानभंग या रीतीनें करतात. आपण लिहिलें कीं, मर्जी सांभाळावी. त्यास. मर्जी सांभाळण्यास कसूर करीत नाहींत. परंतु, समयीं ऐसें परस्थळीं करितात. हें उचित कीं काय ? तेहि हे मोजीत नाहीं. परंतु विरुद्ध दिसतें. यास काय करावें? खर्चाचा प्रकार तरीः आपण लिहिलें कीं, मामाकडे लाख रुपये पाठविले आहेत, ते देतील न देतील तरी तेथें राहून पाठवणें, भरती करून पाठवूं. ह्मणोन लिहिलें. त्यास, मामास नित्य उठोन खर्चास मागतात. दोन चार रुपयांचे निर्खे देतात. त्याचे पावणेतीन रु॥ घडतात. तेहि एकदां देत नाहींत. हजार दोन हजार ऐसे देतात. त्याणें त्यांचें कांहीं होत नाहीं. यांस जर करतां पांचलक्ष रु॥ तूर्त मिळतात, तरी दोन महिने निसूर राहून मसलतीवर कायम राहतील. दोन गोष्टी अडचणीच्या संभाळत नाहीं. रुबकार लढाई प्राप्त. या दिवसांत पोटाची रड नसावी. व फंद नसावा. त्यास पोटास नाहीं; व दर्याबाई मामांनीं बगलेस मारली. यामुळें बखेडे होतात. यास, कोठपर्यंत सांभाळावें ? मामा तरी परिछिन्न घातावर. त्यास साह्य देवजीपंत. युक्तीप्रयुक्तीनें पेंच पडोत यांत्री कमी पडावी, राजश्री बापूंची व नानांची मर्जी याजवर कडवी व्हावी, हें ध्यान आहे! हे तर आपल्याकडून बहुताप्रकारें सांभाळितात. मानअपमान ध्यानांत न आणितां, मामांचे मर्जीप्रमाणें वर्तणूक करून, समयीं काम करून दाखवावें, आणि आपले मनोरथ सिद्धीस जावे. त्यास, या गोष्टीस मुख्यत्वें करून द्रव्य अनुकूलता पाहिजे. लोकांस पोटास मिळालें ह्मणजे मग हे कांहीं भीत नाहींत. त्यास श्रीमंत राजश्री नानांस विनंती करावी कीं, हे सरदारी आपली, पदरी पडलियांचें उणें तें आपणास पूर्ण करावें लागेल. याजकरितां सरकारांतून अगर हरकेसेंकरून यांस पांच लक्ष रु॥ कर्ज मेळवून द्यावें. आणि यांची

पोटाची संस्था करावी. मसलत सिद्धिस गेल्यावर कर्जाच्या ऐवजास मुलूख परगणे लाऊन देतात. ह्या व्याज सुद्धां आदीं देतील. आज सनदा करून देतात. परंतु हा समय आहे. लढाईचें काम. या दिवसांत पोटास न मिळे तेव्हां लोक चाकरी बेउजूर कैसी करितील! आणि त्यास, बेमुरवत, अर्ध-रात्रीं प्रसंग पडल्या जीन ठेवा असें कैसें ह्मणावें? याजकरितां कोणेंहि प्रकारें पांच लक्षांची तरतूद जाहली पाहिजे दर्याबाईस खर्चास मामा देतात. त्यांच्या लष्करांत व मामांच्या अविंधांच्या लष्करांत पोटाचें धरणें नाहीं. आणि यांचे लष्करांत पोटाचें संकटीं! या अर्थी बहुत संकटांत आहेत. हें संकट श्रीमंत राजश्री नाना दूर करतील तर होईल. आणख्यांच्यानें होत नाहीं. याजकरितां सविस्तरें ल्याहावयाची आज्ञा जाहली. त्यास, त्यांचा अर्थ ध्यानांत आणून पुर्तेपणीं विनंती करून माणसांची बेगमी करून देऊन लिहून पाठवावें. मागाहून एक दो रोजां राऊत व गणोबास ऐवजाकरितां पाठवितों. बातमीचें वर्तमान सविस्तर राजश्री भावानी शिवराम यांनीं लिा आहे. कळेल. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे आशिर्वाद.

पत्रांक ९९ श्री. १६९५ फाल्गुन वद्य १२

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव स्वामीचे सेवेसी:—

पोष्य सखाराम भगवंत सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री त्रिंबकराव मामाच्या व नबाबाच्या भेटी गुंजोटीच्या मुकामीं जाहल्या. तेथून फौज सुद्धां दर मजल त्याच रोखें येत आहेत. त्यास, तुह्मी राजश्री मामाकडे पथकसुद्धां जाऊन पोंहचणें.' बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे. हे विनंती.

पत्रांक १०० श्री. १६९५ फाल्गुन वद्य १२

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसी प्रति मातुश्री गंगाबाई आशिर्वाद. सुा अर्बा सबैन मया व अल्लफ. राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांच्या व नबाबाच्या भेटी गुंजोटीच्या मुकामीं जाल्या. दर मजल फौजसुद्धां त्याच रोखें येत आहेत. त्यास, तुह्मीं पथकसुद्धां त्रिंबकराव यांजकडे जाऊन पोंहचणें. जाणिजे. छ २५ जिल्हेज. बहुत काय लिहिणें? लेखनसीमा.

पत्रांक १०१

पैा छ २ मोहरम. श्री. १६९६ चैत्रशुद्ध ३.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामींचे सेवेसीः—
सेवक कृष्णराव नारायण जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असावें.. विशेष. इकडील वर्तमान तरी अलाहिदा पत्रीं लिा त्यावरून कळों येईल. सारांश, यांची खर्चाची बेजमी उत्तम रीतीची करून दिल्ही पो. त्याशिवाय आजपावेतों श्रम केले ते व्यर्थ होतात. तरी चित्तावर धरून अगत्य कार्य केलें पाहिजे. येथें नानांनीं किंवा बापूनीं यावें. त्याखेरीज केवळ रा मामांशींच संबंध असलिया उत्तम नाहीं. येविशींचे सविस्तर अर्थ पुर्ते मनन करून, काय विचार करणें तो करावा. आह्मांस सुचलें तें आह्मीं लिहिलें आहे. कळावें. बहुत काय लिहिणें ? लोभ करीत असावा हे विनंती.

राजश्री भवानी शिवराम यांनीं दोन पुरवण्या* वर्तमानाच्या वगैरे बंद सात, लिा आहेत. ते अक्षरशाहा वाचून पाहून करणें तें करावें. हे विनंती.

पत्रांक १०२ श्री १६९६ चैत्र शुद्ध ३

विशेष. इकडिल वर्तमान वारंवार दिनचर्येचें वारंवार लिहित गेलों, त्याजवरून कळलेंच असेल. दरपत्रीं मजकूर कीं, पंढरपुराच्या सुमारें लौकर यावें. त्यास, गंगातिरींहून लांब मजलींनीं दर मजल बारा गांव चढोन आलों. त्यास मसलत लहान नव्हे. तोरा असावा. तो प्रकार नाहीं. जर या कामास रा नाना अगर रा बापू असते तरी तोरा होय. ते प्रसंगीं नाहींत. रा मामाचा फडदा उघडूं नव्हे. विश्वास कोणास पडतो, कोणास पडत नाहीं. भोंसले यांच्या घराचा प्रकार विज्वर. या प्रकरणीं मोंगल तरी असावा. मोंगलांकडील राजकारण येथें. आह्मांकडील ममता पुर्तेपणीं पाहिलीच आहे. आणि तिकडेहि खचीत. मित्राचा मित्र ह्मणजे आपला मित्र सहजेंच होतो. या प्रकारें सोयरेपण होतें. पत्रीं दोरा अनुसंधान लागलेलेंच होतें. त्या अर्थी ज्यावितजंग, धौंशे यांसी आणावे या अर्थी खंदारापासोन रा दिवाकरपंत त्यास आणावयासी पा. आणि मोंगलांकडील ज्ञानराव गिरधर मोंगलाकडे पाठविला. त्यास मोंगलास पत्रें जातांच दरमजल कलबुर्गेयाच्या सुमारें दर कूच पांच सात मजलींनीं आला. आपण व ते एक जालियासीं निमें काम जाहलें. ऐसें जाणून या अर्थी तुळजापुरापासोन सदरहू कलबुर्गीयाचा रोख धरिला. रा मामाच्या बाणेकारीनें काम जाहलें पाहिजे. याजकरितां त्याजकडील चिमणाजीपंत निा रा शिवाजी विठल बापू हे समागमें घेऊन

---

* पुढील दोन लांबलचक पत्रें ह्या पुरवण्या होत.

तांब्राच्या सैन्यांत गेलों. आपलें लष्कर साहा कोसांच्या अंतरयानें आणिलें. रकनुद्दौला व शर्फुद्दौला दोन तीन कोस इकडून नेले. तिकडून मामास व आपले यजमानास आणिलें. आणि छ १७ जिल्हेजीं दीड प्रहर रात्रीस भेटी केल्या. भिकणखान मेवाती व राजाराम गोविंद श्रीमंत दादासाहेबीं मोंगलांकडे पाा होते. त्यांचें राजकारण विध्वंस जाहलें. त्यांचा होश गेला. मोंगलासहि आशंका कीं, दर मजल दादासाहेब आले तरी आपण काय करावें ? कोणी नमूद होत नाहींत, भिकणखानासीं उत्तर काय करावें. हे आशंका त्याची उडाली. प्रांजल जाहलें. हे अर्थ बातमीच्या पत्रीं गेलेच आहेत. अलिकडे छ २० जिल्हेजीं शुक्रवारी कोसाच्या अंतरानें लष्कर मोंगलासंन्निध करवून, छ २१ रोज शनीवारीं दोन प्रहरां नवाब बंदगानअली यांच्या भेटी जाहल्या. यापुढें आतां निमे मसलत राहिली. ज्यावितजंग, बारा तोफा, तीन गरनाळा समागमें घेऊन येऊन चौकोसांवर दिवाकरपंत आले. आज भेटतील. सवासें तोफ मोंगलाजवळ आहे. या उपरी योजिली मसलत सिद्धीस नेऊन बंदोबस्त करावा, इतका अर्थ राहिला. त्यास मुख्यार्थ कीं, लांबण पडों नये, मामा प्रसंगीं आहेत. त्यांचा मानस होसला, उत्तम आहे. श्रीमंत दर्याबाई व रघोजी भोंसले पांच हजार फौजेनिसी बगलेंत बाळगावे. आह्मांस तरी वडिलच आहेत. मोंगलानें त्याचे आज्ञेंत चालावें. तुह्मांकडील सर्वांनीं त्यांच्या धोरण आज्ञेंत असावें. याप्रमाणें आवरणशक्त त्यांची आहे ! चिंता नाहीं. परंतु जागां जागां प्रस्तें ! आणि समय या प्रकारचा ! याविसी कित्तेक व्यतिरेक गोष्टी पडतात. त्या अर्थीं येथें राा बापू व नाना व तात्या उभयतांहीं यावें. अगर तात्या तरी असावेच. उभयतांतून एकजण तरी असावे. हा सिद्धांत पहिला असेलच. लौकर घडला पाहिजे. वरकड एक दोन मजकूर अलाहिदा पत्रीं आहेत. त्याजवरून कळणार. श्रीमंतास पुर्तेपनें उमजलें. आतां बाकीस राहिलेंच नाहीं. त्यांनीं विचार करून मसलत टैरविली. खर्चास नाहीं. त्याची तजविज, सीरें, बालापूर व गुरंकुडा इत्यादी तालुका हैदरनाईक याजकडे देऊन त्याजपासून कांहीं खर्चास घ्यावें. सनदा करून अपाजीराम यांसी विदा केलें असे. तेवा नित्यांनीं ऐवज घ्यावा हा तह. त्यासीं वांजिरे याचा बंदोबस्ती तर असेलच. दुसरी मसलत तोफखाना राा भिऊराऊ पानसे याज कडोन काहाडोन सुमरसिंग व माा ईसब याजकडे द्यावा. बेंडा भोंवती गारद तोफा देऊन मुस्तकीमी करावी. हैदर नाईकांसी जेमियतीविसी लिहिलें होतें कीं, दाहा हजार स्वार व वीस तोफा, चार हजार फौज, ऐसी कुमक द्यावी. त्याचें उत्तर आलें कीं, कृष्णे पलीकडे येणार नाहीं, ऐल तिरीं काम असलिया सरंजाम येईल. तिकडोन निश्चंतीच आहे. श्रीमंत सेनाधुरंधर आव भरनार, त्यासी, त्याची नड अटकली. याजमुळें कांहीं सौदेयास कारन

जालेंच असेलच. सेनाधुरंधर रात्रौ एक दिवस पादचाली होऊन, रा वामन राऊजिचे घरीं गेले. बहुत ममता युक्त भासनें केलीं. खुलासा, सरलपन दाखवून, करावा हें मानस ! ते दिवसीं रायानीं समाधानपूर्वक गोष्टी घालून विदा केला. आतां नित्यानित्ये त्या छंदीं पडल. चित्त मेळवून घेईल. कालबोलीया आहे. चित्त मेळलियास हरएक संधी पाहून घात करील. येवीसी तिकडोन रायास सूचना व्हावी कीं, त्यासी भासन देखील न करीत. ऐसें घडावें. सुचलें आणि कळलें इतकें आपनास आह्मीं त्याहावेंच. दर्याबाईचा मुधोजीचा विचार. त्यास, त्यांत अंतर नाहीं. परंतु या प्रसंगीं आह्मी. तेव्हां निवळ मुधोजी भोंा याचा गिल्लाही करितां येत नाहीं. तिनें दोन मसलती ठहराविल्या. हरएक मामाचें अर्थ व ममतापूर्वक निखालस सरळपन दाखवून करावें. ये गोष्ट कोठेंही दिसों नये. XXX गळीत, गरिबी भासनें, मरयादयुक्त करून कृपेस पात्र व्हावें, आनीं जालेच आहेत.त्याचे पोटीं अर्थलाभ आपा सा नाना सा यासीं विफिकिरपनें पूर्ववत स्थळें आहेत तेथें ठेवून, आपण जातीनें मुलास नमूद करून करावें, येविसीं वचेन प्रमाण मामाचें घेतलें. बळकटपणें घ्यावें. दुसरी चाल. आपासासीं सुसंधान पकेंपनें केलें. आन सपतक्रिया त्यांची आली कीं, वाडिलासी आमरयादा आतां करीत नाहीं, चित्तास येईल तैसें करावें, ताबेदार राहीन. रा दादा—सास संकट पडलें. हें आपले अभिमानी, हे इमानी माझे, तुमचे पद्रीं पडतील. त्यासी, तेथें हरयुक्त करून ममता वाढवून विश्वास दाखवून अविश्वास कांहीं घडालिया बहुत उपयोगी. दादा सा ही समाधान पावतील. पुढेंहि दिवसांदिवस आपली ब्रीद होईल. ऐसेंही भाव आहे. संकलित. लिहिलें आहे. परंतु याचे पोटीं महत् अर्थ आहे. कळल्यास अपनास सूचना असावी. मामास विनंती केल्यानें पथें पडत नाहीं. कारण कीं· आमचें त्याचें सत्रुत्व मोजितात. आमचे भान सत्रुत्वावर किंवा मसलतीवर हें ध्यानास आनावें. आमचा साहकारी राव. मसलतींत अनुसरून मारिलें. घात केला. कृपेस पात्र. त्याअर्थीं कांहीं देऊन पदाधिकारी चिरंजीवास केलें. परभू शाहाना किती? त्याचा हिसाब काय? परंतु घातक. मसलतींत वाकफ. या अर्थीं कांहीं देऊन आह्मीं आपली कार्यसिद्धी केली. ऐसी वार्ता पाठविली. आह्मी रायासी एकनिष्ट. प्रानही गेला तरी दुसरी गोष्ट होऊंच नये. मृत्येच, अंगिकारिला. नाहीं तर दादासाहेबासीं अनुसरितां कृपा करिते. अस्तु! ऐसें असतां श्रीनें आमच्या पक्षे उभा केला. त्यापक्षीं याचा उतकर्श पाहावा, हें घडूंच नये. यांसीं पुढें काय करतव्यें ! भारी सेत्रूपासून सूड घेन, या लक्षावर द्रीष्टी यजमानाची होऊन, तींत कांहीं अभिमान अंगिकारिला. सर्वांनीं कृपा पूर्ववत करून, मागती पदयुक्त तें लिहितात. मामा प्रियकर मानितात. आह्मांस मसलतीवर सांगतात. अस्तु! ती चित्तांत आह्मी तिलभर आनीत नाहीं एक निष्ठता घडावी. हा देहे रायाचे कार्यानर लागलिया उपयोग. चांगला

श्रीनें लक्षिल्यास सर्वांच्या ममतेंत आहोंच. दुसरीयाचा संचार किती ! आमचें पद सेत्रुत्वानें नेलियास त्याचें कैसें घढल ? आमचे भाव या रितीचे. तेथें आमचे कामावर काय द्रीस्टी ! याजकरितां सर्व आंगेजून मसलतीवर असो. एक या काळीं हालत नाहींत किंवा ते आपले जागीं मोजतात कीं, आह्मीं आहोंच. असो. आह्मीं वर्तमान सांगितल्या मग खरें कैसें वाटेल ? या अर्थी ऐकिलें तितका इतल्ला आपनास असावाच, ह्मणोन लिहिलेंच लिहितों. त्रास न मानावा. हे विनंती.

पो छ २ मोहरम.

पत्रांक १०३ श्री. १६९६ चैत्र शुा २.

विनंती उपरी. इकडील वर्तमान व राा मामांची मर्जीचा प्रकार एकदां पत्रीं लिहिला आहे. आह्मी लेहूंच नये. 'परंतु तुह्मांस कसा कळावा ? आणि प्रसंगीं कामास उणें तरी पडलियास घात. ह्मणोन लिा आहे. प्रविष्ट जाहाला असेल. तुह्मीं मुरबियांसी दाखविला असेल. त्यांच्या चित्तांत संकल्पविकल्प काय येतील, हें मात्र आह्मांस साशंकता. त्यास, हे प्रकार असोत. तुह्मीं प्रसंगीं आहां. तुम्हांस वाकफ आहेच कीं, आम्हांस गती दुसरी नाहीं. व सूक्तअसूक्त कोणी अर्थ आपले मुरब्बीयांसीं निवेदावे, आणि आपली वेधना दूर होणें, मनोरथ पूर्ण करणें, हे जागा आमची एक, दुसरी नाहीं, हेच निश्चय प्रांजल आहेत. तेथें चिंता काय ? त्यांत आमच्या अर्थाच्या दोन गोष्टी. एक गोष्ट ऐसीजे, आमचे पदरीं रुपया नाहीं. आणि पोटावांचून तरी अर्थ सरेना. चार लोक एकचित्त जूट राहिना. यांसी द्रव्य पाहिजे. दुसरी गोष्ट. हे मसलत जाहालिवर अलंकारयुक्त आम्हीं निर्वेधपणें लौकिक बरा करून सौख्यानें भाकर खावी. लक्ष निजध्यास आपले मुरबियांजकडे ठेवावें; देव स्मरोन राहावें; दूवा देत जावी; अहिर्निशीं परस्परें स्मरण राहावें. जर आम्हांस कांटा मोडला तरीं वेधना मुरबियांसीं राहावी. " देवा " ! " देवा " ! मात्र म्हणणें हा प्रकार आम्हांकडे. ऐशा प्रकारें दोन गोष्टी. त्यांत मसोदा राा मामांनीं लेहून देऊन आमचें पत्र लेहून घेऊन पाठविलें. त्याजवरून अर्थ सारे कळले असतील. या निमित्य आम्हीं तपशीलवार नालिशी सारखें वर्तमान लिा. सारांश हे दोन्ही मतलब आमचे गळित करून दिल्हे. त्यास, या अलिकडे क्षणक्षणां क्षुल्लक गोष्टी काय ल्याहाव्या ? याची पैरवी काय केलीत हें कळावें. राा तात्यासमागमें याद पाठविलीत, त्यांत हेच दोनी मुद्दे आहेत. मग चिंता काय ? ऐसेंच उत्तर अन्वय आपल्या चित्तांत येईल. त्यास, लाख रुा मुद्दा लेहून घेतला. तेव्हां मजुरी मात्र

जाहली. मेहनत सारा दिवस करावी आणि सायंकाळीं आपली मजुरी घ्यावी! हा कांहीं प्रकार आम्हांस बरा दिसत नाहीं. लोभ करून करोडों रुा देतील ते आम्हांस थोडे. परंतु हे गोष्ट कांहींच नाहीं. आमचा काळ चालिला पा. याजनिमित्त पांच चार लाख रुा आम्हांस कर्ज सरकारांतून अगर कोणी सावकार करून द्यावा. आणि हे दुर्बलता आमची दूर करून सबळ करावें. हा मजकूर एक. मात्र होऊन मनोरथ पूर्ण व्हावे. त्या अर्थांत आमचे अर्थ, बंदोबस्त, सौख्य, साऱ्या गोष्टी आहेत. हा पूर्ण भरंवसा आह्मांस आहे या अर्थीं येथें तोरा कोणी यावा. येविसीं लांबण होऊं नये. हे दोन्ही अर्थ चित्तांत येऊन जें करणें तें करावें. एक कामांत लाख कामें होणार. कित्येक जन सौख्य पावून आशिर्वाद देतील. तें काम जलदी देवानें करावें आणि तुह्मी साधन राखावें. निव्वळ मुद्दा घालून लाख रुपये दरमहा घ्यावा. अथवा कार्यावर दृष्टी घालनें ती न घालून अधिक करून घ्यावेत. हें मानस किमपि नाहीं. ज्या विचारें आमचें बरेंच होणें, आनी आपना वेगळें वर्तनेंच नाहीं, त्याअर्थीं हा करार करून घेऊन पुढें एकनिष्टपन्नास लागल कीं रायाच्या पक्षीं एकनिष्ठताहि केली कीं लाख रुपये दरमहा करून घेतील. हा दुरारोप हरगीज नसावा. याच्या पोटीं कल्पनेस येईल कीं, पाय पसराया विद्या करितात. तर हे भाव चित्तांत आमुच न येत. जेथें जीवच समर्पिला तेथें दौलत काय चीज ? हे मनोभाव. निस्छेयास गुंतलेत ++ हें खरें नाहीं. ही निशी पुर्तपनें आपनास आहे. चवथे, आनिक रीतीचे भाव आह्मांविसी निघतील. त्याची खातरजमा आपनच करतील. दरमहा न घेतील. काळ तरी कैसा चालल ? याविसीं चिंतेत राहील तर न राहावें. आखर दरमहा देनेंच निस्छयांत नेमिलें तेव्हां घालच. आलबते ! जेथें ऊनें पडलें त्याविसीं सल्लाहांत तुह्मांसच घालनें प्राप्त होईल. याअर्थीं सासातां लाखांचें कार्य एक येळच बर. कोन्हांस सांगून करून देवावें. परभारें कर्ज घेतलें ऐसें मामासही दिसेल. आह्मांसही सब्द परिनामीं लागनार नाहीं. बरेंच देनें. त्या पोटीं हा ऐवज राहिल. ऐसें वढनार नाहीं. आह्मी सारेधानें कल्पनेस आलें तें वारंवार आपनास लिहितों. याचें कारन कीं, या दौलतींत सेनासाहेबांजवळ वडिलपन आपलें. माझी गोष्टी तर कायावाचामनें मी आपनास तात्याप्रमानें मानितों. ऐसें लिहिलें याचेहि (म) नन करावें. श्रीकृपें हें मी स्थापित आपला यास्थळीं आहे. तेव्हां निभलच निभल. कांहीं येक वर्तमान आपनास लिहीन. त्यास, वसवास तर नाहींच. मसलतीच्या पोटीं जे जाहिरात सांगणें तेच मुरब्बियांस सांगतील. मामाचे व आमचे मुरब्बी यांची ऐकतांच असल. त्यासीं, हर गोष्टीचा सब्द आम्हांकडे लागू नये. पत्रें आमचीं आपनाजवळ ते घरींच आहेत. अस्तावेस्त राहतील. याजकरतां पाठवून द्यावीं, किंवा फाडित जावीं. येथून राजश्री सदोबा दादास व गनोबास श्रीमंतांनीं आपनाकडेस

पाठविलें आहे. हें सर्व निवेदन करतील. त्याप्रमाणें घडऊन त्यांसीं लवकर बिदा करावें. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक १०४

पैा छ २ मोहरम श्री. १६९६ चैत्र शुद्ध ३

वडिलांचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विनंती.

राजश्री मोरोबादादास पत्र ल्याहावयाविसीं यजमानांही दोन च्यार वेळां आक्षेप केला. त्यासी, त्याजकडून पत्र आलें नाहीं, आणि तेथेंहि नव्हतें, यामुळें न लिहिलीं. आतां वडिलांची आज्ञा येईल त्याप्रो घडेल. पेंच न पडे, ऐसें असावें. पत्राचें उत्तर त्वरेनें द्यावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक १०५

पैा छ २ मोहरम श्री. १६९६ चैत्रशुद्ध ३

विनंती उपरी. राजश्री मोरोबादादा यांस पत्रें यांनीं ल्याहावीं किंवा न ल्याहावें हें कळावें याजकरितां पेशजीं आपणांस लिहिलें होतें. तेहि वृतबंधास गेले होते. त्यास, हल्लीं आलेच असतील. त्यांस पत्रें ल्याहावीं किंवा न ल्याहावीं हें लिहिलें पाहिजे. यजमानाची मर्जी त्यांस पत्रें ल्याहावीं. परंतु ते नव्हते याजकरितां लिहिलीं नाहींत. त्यास, आले न आले, हें कळलें नाहीं. तर ल्याहावें हे विनंती.

पत्रांक १०६ श्री. १६९६ चैत्र शुद्ध ५.

आशीर्वाद, उपरी, येथील क्षेम ताा चैत्र शुध पंचमी मुा नजीक सांगोलें लष्करांत सुखरूप असों. विशेष. आपण राणू खोपडा याजबराबर पत्रें पाठविलीं तीं सुरक्षित पावलीं. सविस्तर कळलें. व अलिकडे जासुदबरोबर पत्रें पाठविलीं तींही पावलीं. वर्तमान कळलें. राजश्री हरीपंत तात्या फाल्गुन वद्य चतुर्दशीस लष्करांत आले. भेटी जाहाल्या. सविस्तर वृत्त येथील.त्यांस निवेदन केलें. त्यांनींही आपल्या नजरेनें पाहिलें; व राजश्री मामांनींही कित्तेक सांगितलें तेंहि भावार्थ कळला. तात्यांची मर्जी बोलण्यांत बरीच आहे. यांस खर्चाची निकड. रोज धरणींपारणीं. कूचास अडथळा. समई कूच होऊं न द्यावें. ऐसे कित्तेक प्रकार पोटाचे रडीमुळें. तो अर्थ तात्यांस आह्मीं उभयतांनीं व राजश्री भवानी शिवराम यांणीं साध्यांत निवेदन केला. व मामांनीं आजपर्यंत सत्तर हजारावर दिल्हे, तेंहि सांगितलें. पुढें खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा, ऐसें बोलिलों. त्यांनीं उत्तर केलें कीं, रा-

जश्री मामासीं बोलतों आणि देवितों. त्यांचें मामुंचें. भाषण देवाजीपंताचे विद्यमानें होणें तें जाहालें. तेव्हां निश्चयांत आलें कीं, फालगुन मासपैकीं तीस हजार रुपये बाकी राहिली ते व चैत्र मासाचे ऐवजीं पंचवीस हजार एकूण पंचावन हजार द्यावे, तितकेयांत यांनीं आपला बंदोबस्त करून चालावें. ऐसें भवानी शिवराम यांस म्हणों लागले. तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, सर्व अर्थ आपणांस उमजले आहेत, मसलतीचे दिवसांत आम्हीं अडोन पोटास मागतों ऐसा अर्थ नाहीं, आमच्या लष्करांत कोणी सावकार नाहीं, पतपातेज राहिला नाहीं, मुलुखाचा पैसा यावा ऐसाहि आमचा प्रांत राहिला नाहीं, लाचारीस्तव आपणास विनंती करीतों, आम्हांस कर्ज द्यावें, एक मासाची पोटाची बेगमी पुरतेंच द्यावें, अधिकोत्तर न द्यावें, एक मास आह्मांस निर्वेद लोकांपासून करावें, प्रसंगोपात आम्हीं उपयोगीं कैसे पडतों हें पाहावें. तेव्हां तात्यांनीं रदबदल केली. त्यास, आणखी वीस हजार रुपये द्यावे, एकूण पाऊण लक्ष द्यावें, ऐसें जाहालें. मामांनीं रुक्ष भाषणेंहि केलीं. उपाय काय? त्यास, पाऊण लक्षानें यांचा परिणाम कैसा लागतो? यांस निदानीं दोन तरी कृताकृत पाहिजेत. तात्या आले. हे बंदोबस्त करतील. याअर्थीं काल लोकांचा गवगवा भारी जाहाला. मामांचें कूच जाहालें. यांचें कूच न होई. डेरा पडों न देत. लोकांस पदर पसरून मिनत केली. कांहीं समजविलें; कांहीं समजणें राहिलें. तों मामांस व तात्यांस वर्तमान कळलें कीं, लोक अडले आहेत. तेव्हां तात्या आले. त्यांनींहि लोकांस च्यार गोष्टी सांगितल्या. त्रितीय प्रहर जाहला. तेव्हां कूच करावें ऐसें जाहालें! त्यास मामांचा मुकाम सांगोलेंयापलीकडे दोन तीन कोस. अविंधाचा मुकाम दोन तीन कोस अलीकडे. मामांजवळ जावें. परंतु दिवस थोडका राहिला. पोंहचणें कैसें होतें? तेव्हां तात्यांजवळ करार केला कीं, आज कूच करून अविंधाजवळ राहतों, उदईक लांब मजल करून तुम्हांजवळ येतों. ऐसा निश्चय करून, तात्या आपल्या मुकामास गेले. तात्यांच्या बोलण्याचा अर्थ पाहतां मामांची मर्जी राखावी. ते देतील तेंच घ्यावें. त्याणें तर त्यांचा अर्थ सरत नाहीं. यजमानांनीं तात्यांस म्हटलें जे, आम्हांजवळ कांहीं जवाहीर आहे व चार पांच हत्ती नामी आहेत, हे गाहाण ठेऊन तूर्त दोन लक्ष रुा आम्हांस द्यावे, म्हणजे एक महिन्याचा बंदोबस्त होतो, एका महिनेयांत मसलतहि सिद्धीस जाते, चिंता नाहीं. त्याचें उत्तर तात्यांनीं केलें कीं, हें बोलणें ऐइकोन संकोच वाटतो. परंतु देतों, न देतों, हें बोलले नाहींत. निदानीं यांचा मनोदय होता कीं, या महिन्याचे लाख रुपये व बाकी मागील तीस हजार, एकूण एक लक्ष तीस हजारांनीं पाऊण महिनेयाचा तरी बंदोबस्त होईल. तोहि प्रकार दिसत नाहीं! त्यास, लोक फुटतात ऐसा प्रकार नाहीं; व लढाईस कमी करतील ऐसेंहि नाहीं. परंतु पोटाची रड.

यामुळें हटकून काम घेणें, हुकमत करणें हें कमी पडेल. आपणास दोन चार वेळां लिहिलें कीं, लाख रुा महिना द्यावा ऐसा करार जाहाला आहे, तो देतीलच, परंतु आणखी कांहीं कर्जवाम देतील कीं न देतील, काय मर्जी आहे ? त्याचा अर्थ किमपि लिहिलाच नाहीं ! त्यास, मर्जी मनास आणून लिहून पाठवावें. सरकारच्या पत्रांचा मार लिहिला. त्यास, यांचें मानस जें, आह्मीं कार्यावर पड होऊन मसलत सिद्धीस नेली तर सर्व गोष्टी आमच्या नीटच आहेत, सेनासाहेब सुभा हें पद आमचें कोण नेतो, चाकरी करून दाखविणें हेंच मनोमानसीं आहे, दुसरा अर्थ नाहीं. अविंधाकडील मजकूर तरीः यांचे ठाईं ममता फार आहे. तोहि मसलतीवर कायम आहे. ज्याबित-जंग यास हरोल केलें आहे. दोन तीन कोस पुढें चालतो. आपण मागें चालतों. लांब मजली करितो. त्याचा मनोदय कीं, ज्याबीतजंग मामाचेहि पुढें हरोळीस असावा, त्याचे मागें ही फौज असावी. त्याचे मागें मामांनीं व त्याचे मागें आपण असावें. परंतु, मामा एक मजल लांब करितात. एक मुक्काम करितात. त्यामुळें त्यांच्या चालण्याची सोय बनत नाहीं. परंतु, लढाईचे समई कवातीनें चालावें, हा भाव त्यांचा आहे. मामांची मर्जी पाऊणलक्ष खेरीज न द्यावें, ऐसी पाहिली. तेव्हां, कांहीं बोलिलों नाहीं. तात्यास मात्र पुसिलें कीं, याणें ठीक पडत नाहीं, पुरंधरास कांहीं चिठ्या करून देऊन समजावास पाडितों. त्यांनीं उत्तर केलें कीं, पंचवीसपर्यंत करा, आह्मींही लिहून पाठवितों. त्यास, घाटगे यांची वगैरे पंचवीसपर्यंत चिठ्या होतील. सूचना असावी. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे आशिर्वाद.

पत्रांक १०७ श्री. १६९६ चैत्रशुद्ध ५

अपत्यें तात्यानें दोनीकर जोडून सां नमस्कार विज्ञापना ताा चैत्र शुद्ध पंचमी मुा नजीक सांगोलें क्षेम असों विशेष. वडिलीं राणोजी खोपडे व जासूद व कासीद यांजबरोबर तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तरीः सर्व यथास्थित आहे. राजश्री हरीपंततात्याची भेट जाहाली. सविस्तर त्यांस सांगितलें; व त्यांनींही दृष्टीनें येथील अडचणीचा प्रकार पाहिलाच आहे. पुढें कांहीं बंदोबस्त करून देतात कीं नाहीं, तें पाहावें. सविस्तर राजश्री लक्ष्मणपंत यांच्या पत्रावरून कळेल. श्रीमंत दादासाहेब फौजसुद्धां सत्पऋषीच्या रोखें जात आहेत. आईनापुरावर होते. त्यास हेही आडवे जातच आहेत, एक दों रोजां गांठही पडेल. सातारेयाकडील वर्तमान कळावें याजकरितां जासूद जोडी पाठविली आहे. राजश्री नानासाहेब यांसीं एक पालखी बसावयास पाहिजे. त्यास, दांडी उत्तम, फार चांगली, परिक्षेनें घेऊन, पालखी पडदेसुद्धां तयार, खासेयास बसावयास तयार करून

लिहून पाठवावें. येथें आह्मांजवळ भोईयांची पांबडी आहे, ती ठीक नाहीं, याजकरितां एक पांबडी, भोई तेथें आहेत, दोदु नाईक याची, ते पालखी देऊन पाठवावे. येथें पांबडी आहे ही पाठऊन देऊं. राजश्री चिमणाजीपंत लेले यांजपासून पांचशें रुा घेतले आहेत, व राजश्री दिनकरपंत राजवाडकर यांजपासून हजार रुा घेतले आहेत, एकूण दीड हजार रुा घेऊन सरकारांत किरकोळ खर्चास दिले आहेत. व राजश्री सदाशीव सोनदेव यांजपासून हजार रुा घेऊन सरकारचे मुदबक दिले आहेत. एकूण अडीच हजारांच्या चिठ्या केल्या आहेत. चिठ्यांप्रमाणें रुा पावते करून उत्तरें घेऊन पाठवावीं. राजश्री सदोबादादा यांजबद्दल हजार रुा घेऊन जमा करावे. सातारियास गंजीकोट प्रतीचे रुा त्याचे कागद व जिन्नस पाा आहेत, त्याप्रों पोंचते करून जाबसाल पाा द्यावा. तुरकी घोडा किंवा घोडी राजश्री नानास पाा द्यावी म्हणून आज्ञा. त्यास, तुरकी घोडे, सौदागर आले आहेत, त्यांजपाशीं आहेत. ते घेतले म्हणजे पाठवून देवितों. घोडी गरीब, चालणार, खूप-सूरत पाा द्यावी. ऐसी, तूर्त यांजवळ राहिली नाहीं. कोठें घेऊन तेहि पाठवून देवितों. तेथून याजकारणें कांहीं पोशाख एकादा किंवा कांहीं पैसे पाठवुन द्यावें. येणेंकरून ममता विशेषशी वाटेल. तूर्त गणोबास पाा नाहीं. त्या फौजेचा मोकाबला समीप राहिला. ऐवज राजश्री मामा देतील तोच घेऊं. आणखी कोठें कर्ज-वाम मिळाल्यास पाहतच आहेत. अडचण मोठी ! उपाय नाहीं ! आणखीही येथून वीस पंचवीसपर्यंत चिठ्या करितों. लाख रुा यांस द्यावयाचा करार. त्याशिवाय ऐवज जास्त होईल तो त्यांजकडे. कर्ज सरकारचें जाहालें. यांस कर्ज, कांहीं ऐवज पाहिजे. येविशीं पेशर्जी दोन चार पत्रें लिहिलीं असतां उत्तर आलें नाहीं. यांसी लाख रुा अधिक ऐवज देऊंच नये. कशी मर्जी आहे तो शोध घ्यावा. बिना कर्ज कांहीं मिळाल्याखेरीज चरितार्थ होतच नाहीं. पुढें कर्जाचे ऐवजास एक दोन महाल लावून देतील. वसूल करून ऐवज घ्यावा. पत्राचें उत्तर सत्वर पाा द्यावें. त्याप्रमाणें करूं. नबाब व रुकनुद्दौला यांनीं पत्रें राजश्री बापूंस व राजश्री नानांस लिाा आहेत. तेही लाखोटे पाठविले आहेत. त्यांस पावते करावे. तेथून पत्रें उभयतांचीं व श्रीमंत बाईचीं वरचेवर येत जावीं. विशेष वारंवार काय लिहूं ? दृष्टीस येतें तें लिहितों. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना. पाणक्या ब्राह्मण चांगला, पंगतीस जेवी असा ठेऊन पाा द्यावा. हे विज्ञापना.

सेवेसी गणेस नारायण सांा नमस्कार विनंती.

पत्रांक. १०८

पै।। छा। ७ मोहरम श्री. १६९६ चैत्र शुद्ध ८

सेवेसी सदाशिव सोनदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. सांकल्य राजश्री तात्या व दादांनीं लिावरून कळों येईल. लक्ष दुसरें नाहींच. श्री-सत्तेनें गांठ थोडियाच दिवसांत पडावी ऐसें आहे. तिडण म्हणावयासीं यासीं भक्षावयाची. वरकड काया–वांग–मनसा आपले लक्षीं आहेत. कळावें. सदैव पत्रद्वारा सेवकाचा* सांभाळास विस्मरण नसावें. राजश्री तात्यांनीं हजार रुा। येथें सरकारांत आह्मांकडून घेऊन दिल्हे. त्याची चिठी तेथें आपणाकडे दिली आहे. हा ऐवज चिरंजीव राजश्री सदाशिव विश्वनाथ याजपाशीं द्यावें म्हणजे प्रविष्ट होईल. लोभ करावा हे विनंती.

पत्रांक १०९

पौ। छ ११ मोहरम श्री. १६९६ चैत्र शुद्ध ८

आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता। चैत्र शुध ८ रविवार मुा। नजीक ह्मसवड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें शुध प्रतीपदेचीं पाठविलीं तीं आजच पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें व सरकारचे पत्राची नकल पाठविली ती पावली. इकडील वर्तमान तरी: नबाबसुद्धां च्यारी फौजा मुा। मारीं आज आल्या. नबाबाचा मुकाम मौजे दिघी, पा। अडफली, येथें जाहला. त्यास, तो गांव मातबर. माने यांची पाटिलकी. तेथें चौ फौजेचे रखवालीस राऊत होते. त्यास, तो गांव मोंगलाचें फौजेनें लुटला. नाश बहुत जाहला. मराठे व ब्राह्मण बाइकांची अब्रू घेतली. याजकरिता नागोजी यादव वगैरे सरदार मामाकडे गेले होते. त्यांनीं सांगितलें.कीं, देशांत हा प्रकार जाहलियावर पुढें गत काय, त्यास विचारें करोन सांगोन पुन्हां कोणे गांवीं उपद्रव न होय तें करावें. त्यावरून मामांनीं, अविंधाकडील वकील मामांच्या लष्करांत ज्ञानराव होते त्यास बोलाऊन आणून, मनमानें तैशीं भाषणें केलीं. त्यास लष्करांतून काढोन दिल्हे. हे गोष्ट उचित न केली ? त्यावरून नबाब अजुर्दा आहेत. आधींच त्यांचें यांचें चित्त मिळत नव्हतें. त्यांत दिवसें दिवस विक्षेप पडत जालिले. मामांनीं आज कूच करून पुढें गेले. राजश्री साबाजी बावा यास काल चिठी आली कीं, तुह्मीं मुकाम करणें. आज चिठी आली कीं "दोन प्रहरा उपरांत कूच करणें." त्यास, कूच कैसें होतें ? नबाबानें आज कूच करून येथें यावें ऐसा करार होता. त्यास, कूच करून आले. आमचे पुढें तीन कोसावर आहेत. दर्याबाई फौजसुद्धां अविंधाचे डावे बाजूस कालपासून राहतात. मामानीं यास काल बोलाऊन नेलें होतें. त्यास, भाशन

---

*'च्या' बद्दल चा. 'चा' चा संस्कृत उच्चार केला आहे.

ममतापूर्वक नोकेनेंच केलें. समय आहे, हा समय तुह्मी पुढें असावें. यांनीं उत्तर केलें कीं, आम्हांस आज्ञा कराल त्याप्रमाणें करूं, आह्मी चुकणार नाहीं, परंतु फौजेस पोटास पाहिजे यामुळें गवगवा होतो, चाकरीचे दिवस आहेत, या दिवसांत आम्हीं चाकरी करून दाखऊं. तेव्हां मामांनीं समाधान केलें कीं, फाल्गुनपैकीं सवालक्ष देतों, व या महिनेया पैकीं सवालक्ष देऊं. एकूण आडीचलक्ष दों महिनेयाचे होतात. त्यांत तुम्हांस पावलें तें वजा करून बाकी राहिलें तें दोन च्यार वेळ करून देतों, ऐसा करार केला आहे. आजपर्यंत एकलक्ष दाहापंधरा हजारपर्यंत पावले आहेत. बाकी एकलक्ष तीस चाळीस राहिले. ते एक वेळ देतील तरी त्याचा गवगवा महिना पंधरा दिवस राहतां निर्वेध होतो. तें होईल तेव्हां होऊ. सारांश, मामांचें भापण रुक्ष, यामुळें पेंच पडतात. कामाचे दिवस. या दिवसांत राजश्री बापूंनीं व राजश्री नानांनीं फौजेंत असावें. ते असलियानें सर्वांवर दाब बसोन, मुलुखाचा नाश न होतां, मसलत सिद्धीस निर्वेवपणें जाईल. उभयतां येत नाहीं तर विक्षेप वाढतील, ऐसें दिसतें. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडून सर्वांकडे अनुसंधानें येतात. त्यास, या दिवसांत कोणाची अजुर्दगी नसावी. याजकरितां उभयतांनीं यावें. राजश्री हरीपंततात्या येथें आले होते. त्यांस मातारेयास मामांनीं रवाना केलें. ते गेले. ते जरी असते तरी उत्तमच होतें. कित्येक कळ संभाळिते. तेहि नाहींत. श्रीमंतांचा मुकाम कुरंडवाडावर आहे. यांस त्यांस पंचवीस कोसांची तफावत आहे. गांठ सत्वरच पडावी ऐसें आहे. बहुत काय लिहिणें ? लोभ किजे, हे आशिर्वाद.

पत्रांक ११०

पौ छ ११ मोहरम श्री १६९६ चैत्र शुद्ध ९,

आपत्यें तात्यांनीं दोन्ही कर जोडून चरणावर मस्तक ठेवून सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता चैत्र शुद्ध नवमी रविवार मुा नजीक मासवड वडिलांचे आसिर्वादेंकरून सुखरूप असों. विशेप. शुद्ध प्रतिपदेचीं पत्रें आलीं तीं काल मंदवारीं पावलीं. अक्षरशा अवलोकनीं साकल्य लेखनाभिप्राय कळों आला. मातुश्रीच्या पत्राची नकल पाठविली. उत्तम आहे. अस्सल ठेऊन घेतलें. पूर्वी यादी व पुरवणीपत्रें दस्ताऐवजी आहेत. ती जतन असावी. या पत्रांत उभयतांचे लेख आहेत, यास्तव ठेविलीं. त्यास, त्यांचीं भापणें पक्केपणाचीं दस्तऐवजीं. तेव्हां पत्राचे अगाध नाहीं. यजमानाची अस्ता शब्दगौरवी हस्ताक्षर अलंकृतांतच. ऐसियास, तें पत्र पाठविल्यास फारच संतोष आहे. वारंवार पुसतात. नकल दाखविल्यानें एक प्रकार भासतें. ऐसें आहे. वरकड कित्तेक प्रकार सुचाविले ते यथार्थच. प्रसंगोपात

आज्ञेप्रमाणें घडवीत असों. पोतदारांची सरंजामाची बंदोबस्त येईल. हत्ती–विषयीं आज्ञा. त्यासी, येथें मोठे खासे तीन आहेत. वरकड तैसेच आणीक आणविले आहेत. आल्यानंतर चांगला पाहोन घेतों. पदें येथें नाहींत. दारव्यास आहेत. रहवळ तुर्कीविषयीं लिा त्यासीं एकदोन रोजीं मागाहून पाठवितात. एकच पाठविल्यानें विपर्यास दिसेल. यास्तव दोन पाठविणार. 'याशिवाय आपला सत्वरच पोहोंचेल. त्याच्या खर्चाचा प्रकार वारंवार लिहित गेलों. त्याचा भार आभार सर्व राा हरीपंत तात्याकडेच घालून लिा, त्याजकडील साधन रक्षावें, राा मामाकडील तिडन पडों देणार नाहीं. त्यासीं यजमानाचें त्यांचें पूर्ण संधान होतेंच. हालीं पत्रापत्रीं वळख पुर्ती पुरली. कित्येक ममतेचीं भाषणें परस्परें जाहलीं. तीं आमचें विद्यमानेंच घडलीं. मामासही त्यांणीं याजविसीं तेथील लक्ष उमजविलें. तात्याचें पूर्वीं सत्तरपर्यंत ऐवज यांस दिला होता. हे आल्यानंतर पाऊण दिल्हा. यांस तों दरमहा साडेतीन पर्यंत लागतात. रोज धरणीं, कटकटी, रुसवे मारनिल्हेनींही येऊन पाहिलें. आणिकही कांहीं कर्जदाखल तजवीज करून महिन्याची समजूती करावी, ऐसें होतें. तों त्यांस मामांनीं दोन हजार फौज समागमें देऊन सातान्यासीं रवाना केलें. त्याच दिवशीं मामा, व दकार नामक, धवसे यांच्या गोटास जाऊन त्यासीं भाषण केलें जें, लक्ष तें आह्मांकडे असावें, नबाबाच्या आमच्या विचारें होईल तें करावें. त्याणें उत्तर केलें कीं, सारी नजर मसलतीवर, त्यांत दर्याबाईची फौज आपली करून ठेविली, तें उपयोगास येणार नाहीं. त्याची सल्ला काय? ·याणीं उत्तर केलें उभयतांचें समाधान करून द्यावें, वडीलपण तिचें रक्षावें, मुलाचें लेंकुरपण चालवावें, दोन्ही फौजा एकदम कामावर सादर असाव्या.· याप्राा घाट घालून डेऱ्यास आले. दुसरे दिवशीं धंवसे सेनासाहेब सुभे यांच्या डेऱ्यांत कूच समयीं आलीं. दकार नामक तिराईत ऐसे आले. भाषणांत त्याप्राा आणिलें. याणीं मान्य केलें, मामाच्या व नबाबाच्या विचारास आलें तें आह्मांस मान्यच आहे. जातीनीं शपथ वाहिली, मी दुसऱ्याची सेवा करणार नाहीं. सारांश, हें सौष्ठाई आपसांत करून योशीतेस सांगावें. याणीं हातीं धरून जाऊन आणावी. ऐसें बोल्येन गेले. परवां शुक्रवारीं कूच जाहलें. तों बाई यवनाचे पिछाडीस फौजसह राहिली. आतां तुळस आपले दरम्यान मामा. त्या गोष्टीची वार्ता नाहीं. वृद्ध व दकार नामक जिवाजी रघुनाथ यांसीं भाषण केलें जें, तुह्मीं आमचे, ऐसीयासी यवनास सांगावें, एक लक्ष आमशींच असावें, तिकडील लक्षासीं गरज नाहीं, त्यांणीं दातृत्व मान्य केलें असेल त्याची सवाई दिढी आह्मांस मान्य, भोंसले यांजकडीलही पक्ष न करावा, कृतकार्य सिद्धीस गेलियानंतर जसें विचारास येईल तैसें करूं. जिवाजी पंतांनीं उत्तर केलें कीं, आह्मीं आपलेच, परंतु या जाबसालांत आजच पेंच पडतो. त्याचें प्रत्योत्तर सांगितलें,

होईल तैसें करीतच आहों. दिवसें दिवस मसलत जवळ येत चालली. मामांचा विचार उमजांत येत नाहीं. यवनाचें लक्ष तेथें परिछिन्न दिसतें. मामासीं चित्त शुद्धता नाहीं. येविसीं यवनांचीं पत्रें तेथें गेलींच आहेत. ध्यानांत येईल. श्रीमंत दादासाहेबांकडून संधान आलें होतें. सेनाखासकीली तिसा लक्षांची जहागीर द्यावी, आपले लक्षीं असावें. पाणी ठिकाण लागों न दिल्हें. त्याजवर प्रस्तुत हस्ताक्षरीं पुर्जा कोणा ग्रहस्थाजवळ आला. पद, जागा किल्ला देतों. तेंही उपेक्षिलें. आणिकही सूत्र ·आहेच. सेवट एकले तुह्माजवळ येऊं, निखालसपणाचें उत्तर यावें, आपलीकडील खातरजमा जशी पाहिजे तैसी देतों, मुधोजीस कैदहि ह्मणाल तर करितों, एक माझें वचन गुंतलें ह्मणोन असें केलें होतें, पद किल्ले जागा ह्मणाल तें देतों. ऐसे जाबसाल आहेत. यांचा खबीर कायम इस्तकबील बाहाल आहे. लक्ष मातुश्री आणि उभयतां पाशींच आहे. यवनही तेथील संधानावरून आणि याणीं सिल-सिला ठेविल्यावरून त्यांचेच लक्षीं त्यांचे मसलतीवर दृढतर दिसतो. मामांचे मर्जीस मात्र बेभार. कोणीही प्रकार कूच-मुकाम सल्ला मसलत येक विचारें असावीं. श्रद्धाच तरी आपलेंच करणें जरूर, ऐसें आहे. दर्याबाईची दिवाणगिरी व फडणनिसी आपलीकडे करून घेतली. वार्तक कामकाज करितात. मल्हारपंत वगैरे पांच चार असामी त्यांचे होते. त्याजवर आरोप आणून आपले गोटांत आणून ठेवणें, ऐसेंहि आहे. घडेल तें खरें. जितकें जाहलें वर्तमान तें लिहिलें असे. हल्लीं येथून चिठ्या रा। जोत्याजी घाटगे रु॥ ७॥ हजार व रा। चिमणाजी घाटगे रु॥ पांच हजार एकूण साडेबारा हजार रुपयांच्या चिठ्या केल्या आहेत. कित्ता रा। बाळाजी गणेश यांचा* चिठी रु॥ पांच हजार साडे अठराशाच्या चिठ्या गेल्या आहेत. ऐवज दिक्कत न पडतां द्यावा. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवितों. कळावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

सेवेसी सदाशिव सोनदेव कृतानेक सां नमस्कार विनंति लि॥ परिसोन कृपालोभ करावा. भेट होईल तो सुदीन. हे विनंति.

पत्रांक १११

पै॥ छ ११ मोहरम श्री. (नकल) १६९६ चैत्र शुद्ध ८

यादी करार सरकार राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा सु॥ अर्बा सबैन मया व अल्लफ. राजश्री बाबूराव विश्वनाथ वैद्य. तुह्मीं पुरातन पदरचे. कैलासवासी तीर्थरूप बाबासाहेब यांणीं तुमचें व वडिलांचें चालविलें. आलिकडे तुमचा सरंजाम चालत नव्हता. त्यास, हालीं तुह्मीं दौलतीचे उपयोगीं

---

* 'च्या' बद्दल 'चा'

पडलां. तुमचें चालवणें आवश्यक. याजकरतां तुह्मांस वतन रुपये १५००० पंधरा हजार करार केले असे. तरी, याचा सरंजाम तुमचा पेशजी आहे तो अगर त्याचे मुबदला आणखी लाऊन देऊं. व पां रामटेक येथील देशपांडे-पण वतनी तुमचें आहे, तें तुमचें तुह्मांकडे चालेल. छ, ७ मोहरम. सदरहूप्रों करार करून द्यावयाविशीं आज्ञा देणें.

पत्रांक ११२ श्री. १६९६ चैत्र शुद्ध ९

अपत्यें तात्यानें दोनी कर जोडून सां नमस्कार. विज्ञापना. राजश्री सेनासाहेबसुभा यांनीं आह्मांस साल गुा चे ऐवजीं खर्चाबद्दल तेथून रुा पांच हजार साडेआठशांची चिठी देविली आहे. त्यावरून राजश्री बाळाजी गणेश यांचे नांवाची चिठी पा आहे. तर, सदरहू ऐवज घ्यावा. एकूण ऐवज सारा आठावीस हजार साडे आठशांच्या चिठ्या जाहल्या. येणेंप्रमाणें ऐवज दिलाच असेल. व हालींहि लिहिल्याप्रमाणें द्यावा. हा अर्ज कर्ज दाखल द्यावासें असल्यास लिा पाठवावें. त्याचे नांवचें खत लिा पा द्यावें. कदाचित् कर्ज नच द्यावेंसें असलें, तरी ऐवज पुढें सफरचें ऐवज घ्यावयास येईल. सारांश, चिठ्या माघाऱ्या न फिरत तो अर्थ करावा. राजश्री बाबूरावजीची यादी कराराची तैनात रुपये पंधरा हजार रुपयांची करून घेतली आहे. देणें मात्र व्हायचें आहे. आज करून घेतों. वकिलियाचे तुर्फेची त्या दरबारीं करार जाहली आहे. पूर्वीचा दाखला नाहीं. सांप्रत उपयोगीं पडिलें सा, ह्मणून यादी करून घेतली आहे. सदरहू ऐवजाचा सरंजाम लाऊन घ्यावा. याप्रमाणें करार आहे. कळावें. यादीची नकलही पाठविली आहे. कळावें. बहुत काय लिहिणें ? पोद्दारीचें भापणांत आलें आहे. ऐवज आपणाकडे घेऊन चिट्या आपणावर करून घेणें ठीक नाहीं. याजवरी पोद्दारी ऐवज मात्र कराराप्रों घेतों. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

पत्रांक ११३

पौ छ ११ मोहरम. श्री. १६९६ चैत्र शुा १२

आशिर्वाद उपरी. याचे फौजेंत पोटाचा गवगवा तीन लक्षपर्यंत दरमहा लागतात. त्यास, लक्ष रुानें काय होतें ? हालीं मामांनीं सव्वालक्ष द्यावयाचा करार केला आहे. त्यांस निदानीं दोन तरी पाहिजेत. त्याविषयीं दोन तीन वेळ लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, दरमहा नेमावें, तेव्हां पन्नास हजार देऊं ह्मणतात. ह्मणोन लिहिलें. त्यास मसलत भारी. करारप्रों विभागणी होईल, ह्मटल्यास कैसें होतें ? प्रसंगोपात्त खर्च केल्यास कैसें होईल ? आपण दरमाहा नेमावें ऐसा लाभ आपणास कोणता ? आपण चाकरी करावी तें

करित असतों. दरमहा नेमावें ह्मणतात. तेव्हां अपूर्व आहे. एवढी सरदारी त्यांचें लक्षीं असतां आणि ते जबरदस्त असोन दरमाहानें मागतात, हें काय आहे ? त्यांनींच द्यावी, हें त्यांस उचित. दोन लक्ष रुपये दिल्यानें कांहीं बुडतात ऐसें नाहीं. आणि दिल्याखेरीज यांचे नीट पडणार नाहीं. याजकरितां एक-दोन वेळ मर्जीनुरूप ह्मणोन पहावें. न देतील तरी उपाय काय ? हर कैसें तरी चालेल. परंतु वाईट दिसेल याजकरितां वरचेवर लिहितों. उत्तर निविष्ट पाठवावें. बहुत काय लिहिणें ? लोभ किजे. हे आशिर्वाद. कराराची यादी संरजामाची पाठविली आहे. त्यावरून कळेल. हे आशिर्वाद.

राजश्री नाना स्वामीस साष्टांग नमस्कार. विनंती. राजश्री तात्यांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. हे विनंती. मामाच्या भाषणेंकरून नबाब अजुर्दा व हेहि अजुर्दा ! हें ठीक नाहीं. आपण ह्मणतील कीं, मामा राज्यांत शहाणे त्यास हें खरें. परंतु सत्तेचें शहाणपण आहे ! प्रसंगोपात विचारणा दिसत नाहीं. हे दिवस जबरेचे नाहींत. समाधानानेंच करून सर्व गोष्टी नीट पडतील. त्यास, ती गोष्ट येथें नाहीं. कळावें, हे विनंती.

पत्रांक ११४ श्रीशंकर १६९६ चैत्र शुद्ध १३

तीर्थरूप राजश्री नानाजोशी व बापूराव वैद्य स्वामींचे सेवेसीं:—

अपत्यें कृष्णराव नारायण जोशी सां नमस्कार, विनंती उपरी. राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांनीं अजम शादीखान पन्ही सौदागर यांस रुा ३००० तीन हजार देविले आहेत. त्यास, खान मारानिल्हे यांनीं सदरहू तीन हजार रुपये नवनीतखान पन्ही सौदागर यांस देविले आहेत. तरी चिठी पावलिया रोजां जा जा उत्तरीं ठावठिकाणा चौकस करून पावलियाचें कबज घेउन सदरहू तीन हजार रुा द्यावे. मिती शके १६९६ जयनाम संवत्सर चैत्र शुध १३ बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक ११५

पौ चैत्र वा २ मंगळवार. श्री. १६९६ चैत्र शुद्ध १५

राजश्री नानाजी कृष्ण जोशी व बापूराव वैद्य गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री रघुनाथराव दादा मागें पंढरपुरच्या सुमारें चालिले ह्मणोन त्रिंबकराव मामा सडे होऊन त्यांजमागें गेले. पंधराची संप. मुसलमान लोकांचा गुंता. याजबद्दल एक दिवस आह्मी मागें राहिलों. छ १३ मोहरम शनिवारीं वेणूनाद गोपाळपुरावर दादांचा मुकाम होता. कासेगांवीं सेनाधुरंधराची फौज होती. मामा तेथें गेले. दादा तोफखाना व फौजमुद्धां

कासेगांवास आले. इकडून उतावळी जाहली. सारांश, झुंझाचा प्रसंग न बनला. मामा जखमी पाडाऊ गेले. आह्मी वीस कोस मजल करून माणेवर नाझरे याखालीं दोन कोस मुकाम केला. तों संध्याकाळीं हें वर्तमान व फौज व राजश्री हरीपंत तात्या आले. एक मामा मात्र निशाण हत्ती वगैरे समेत गेले. वरकड वामनराव व रास्ते, नारोशंकर यांचें पथक व शिवराम विठल अवघ्र फौज आह्मांजवळ आली. नबाबही सा चौ घटकांनीं येथें येत आहेत. दादांनीं आज मुकाम करावा. वरकड देव सर्व घडवील. राजश्री बापू व नाना यासीं आपण खातरजमा करून सांगावें. आह्मींही त्यांस लिहिलें आहे. व रा। हरीपंत तात्या व तात्या यांणीं लि। आहे. त्याजवरून कळेल. चिंता न करावी. मामा कांहीं घेऊन गेले नांहींत. रा। छ १४ मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसूद.

श्री

श्रीशाहूराजपदांभोजभ्रमरायितचेतसः। बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते॥

पत्रांक ११६.

पौ चैत्र वद्य २ मंगळवार. श्री. १६९६ चैत्र शुद्ध १४

आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता। चैत्र शुद्ध १४ रविवासर मुकाम नजीक नाझरें वर्तमान यथास्थित असें. विशेष. इकडील सविस्तर वृत्त राजश्री हरीपंत तात्यांच्या पत्रावरून कळेल. श्रीमंत राजश्री सेनासाहेबसुभा काल वीस कोस मजल करून आले. कारण जे मामाची गांठ पडावी. त्यास, मामांनीं उतावळी केली. यामुळें यश त्यास आलें. नबाबाकडे दोन तीन सांडणीस्वार रात्रौ पाठविले. त्यांनीं अकरा कोसांचें कूच करून ये फौजे शेजारीं येऊन आज उतरतील. सर्व सरदार एकत्र होऊन उदईक त्यांचे तोंडावर जातील. सर्व गोष्टी मनोदयानुरूपच घडतील. चिंता नाहीं. नबाबाची व आपले यजमानाची कायमता आहे. चिंता नाहीं. राजश्री हरीपंत तात्या व सरदार सर्व येथें आले. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दिजे. हे आशीर्वाद.

पत्रांक ११७

पौ चैत्र वा २ मंगळवार श्री. १६९६ चैत्रशुद्ध १४

अपत्यें तात्यानें चरणावर मस्तक ठेवून सां नमस्कार विज्ञापना. ता चैत्र शुध १४ रविवासर मुक्काम नजीक नाझरें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची व रा॥ मामांची गांठ काल मंदवारीं दोन प्रहरां पडली. होणाराप्रों उतावळीनें हा प्रकार जाहला. सविस्तर वृत्त राजश्री हरिपंत तात्यांनीं लिहिलें आहे त्यावरोन कळेल. श्रीमंत राजश्री साबाजी भोंसले, सेनासाहेबसुभा, मंदवारीं वीस कोस नाझरेयानजीक माणेवर संध्याकाळच्या साहा घटका दिवसास आले. मामांनीं माणेच्या व भिंवरेच्या संगमीं मुकाम करावा तो न केला. याजकरितां येथें मुक्काम केला. तों सूर्यास्तीं लढाई होऊन फौजा निघाल्याचें वर्तमान आलें. तेव्हां मुस्तकीम होऊन राहिले. रात्रौ मामाकडील बुणगे वगैरे आले. ते आपणाजवळ उतरविले. आज तात्या व सर्व सरदार येथें आले. फौजेजवळ फौजेचा मुकाम जाहला. नबाबाकडे रात्रौ दोन तीन पत्रें पाठविलीं. त्यांनीं अकरा कोशांचें कूच केलें. चौ घटकांनीं एथें येतील उपरान्त सर्व एकत्र होऊन उदईक श्रीमंताच्या तोंडावर जातील. मामांनीं उतावळी केली. इतक्यानें त्यास यश आलें. कांहीं लढाई चांगली जाहलीच नाहीं. ईश्वरीकृपेनें चिंता नाहीं. सर्व गोष्टी मनोदयानुरूपच घडतील. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दिजे. हे विज्ञापना.

पत्रांक ११८ श्री. १६९६ चैत्र वद्य ६

आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता चैत्र वा ६ मंदवासर मुकाम मोहोळ क्षेम असों. विशेष. आपण पत्रें शुद्ध एकादशीचीं व पौर्णिमेचीं पाठविलीं तीं काल परवां पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें. मुकारनामक व मातुश्रीच्या सूत्राचा प्रकार लिहिला तो कळला. येथें सूत्रें पाटणकर वगैरे यांचे विद्यमानें आहेत. ह्मणून बातमी आली आहे. त्याचा शोध करून वरचेवर बंदोबस्त करीत जावा. म्हणोन लिहिलें. त्यास सूत्रें बहुत. नानाप्रकारें येतात. परंतु यांची कायम मिजाज आहे. आणि पुर्तेपणीं समजलें आहे कीं, क्षणभंगुर कारभार; व आह्मीही वरचेवर सावध करीतच आहों. तेणेंकरून सूत्रें लागत नाहीं व समजलेंही आहे कीं जर करितां अविलंबीली मसलत सिद्धीस जात नाहीं, तरी परिणाम लागत नाहीं. प्राण वांचणें होणें कठीण. अपकीर्तीस पात्र याजकरितां कोणेंही प्रकारें मसलत सिद्धीस जांवी हाच मनोमानसीं भाव आहे. दुसरा अर्थ किमपि नाहीं. यांचा कारकून तिकडे गेला म्हणून आइकितों, ह्मणून लिहिलें. त्यास, यांजकडून कोणी तिकडे गेला नाहीं व सूत्रें येतात त्यांसही साफ उत्तरें देतात. लाऊन ठेवीत नाहींत. इकडील बंदोबस्त आहेच. गुंता नाहीं. राजश्री मामांनीं उतावळी करून यश त्यांस दिलें. ईश्वरास

करणें! उपाय नाहीं! एक दिवस गांठ घातली, नसती तर दुसरे दिवशीं हे पोंचले असते. मग गांठ घातल्यास चिंता नव्हती. व दुसरें, निजामअली यांचा जांवई बसालतजंग याचा लेक आदवानी कडून नबाबाकडे येत असतां मोहलेवर आला. श्रीमंतांस बातमी लागली. त्यांजवर धांवले. हें वर्तमान नबाबास कळलें. लांब मजल केली. जाऊन आटोपावें तों त्यांच्यानें दम धरवला नाहीं. एक दिवस झुंजला. निदानीं हस्तगत जाहला. हेंहि काम वाईट जाहलें. त्याजवर गुरुवारीं जाबीतजंग, धोंसे, राजश्री हरीपंत तात्याचे डेरेयास आले होते. सरदार इकडील सर्व एकत्र होऊन निश्चय ठरविला जे, मामा गेले ह्मणोन कांहीं गेलें नाहीं. अविलंबिली मसलत सिद्धीस न्यावीच न्यावी. एतद्विषयीं इमानप्रमाणपूर्वक भाषणें परस्परें होऊन मुकाम मजकुरीं आले. आज कूच होऊन पुढें जात आहेत. श्रीमंतांनीं काल कूच करून मोड्याहून पुढें गेले. यांस त्यांस वीसा कोसांची तफावत आहे. गांठ लवकरच पडावी, ऐसें आहे. बहुत काय लिहिणें! लोभ कीजे हे आशिर्वाद.

पत्रांक ११९

पौ चैत्र वद्य ११ गुरुवार श्री १६९६ चैत्र वद्य ६

आशिर्वाद. उपरी. राजश्री भवानराव प्रतिनिधी चतुर्थीचे दिवशीं रात्रौ श्रीमंताच्या लष्करांतून निघोन इकडे यावयाचे उद्देशें आले. त्यांचेमागें राजश्री सखाराम हरी धांवले होते. परंतु त्यांची यांची गांठ पडली नाहीं. सखाराम हरी माघारे गेले. प्रतिनिधी अद्यापि या लष्करांत पोहोंचले नाहीं. त्यांचा ब्राह्मण व खिजमतगार काल रात्रीं लष्करांत आले. तेही आज येतील. राजश्री मामा तिकडे गेल्यावर तात्या वगैरे सर्व सरदार नाझरेयाचे मुकामीं एकत्र जाहले. उपरांतीक पत्रें तात्यांचीं व येथील देऊन प्रातःकाळीं सांडणीस्वार आपणाकडे रवाना केला. त्याचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. सांडणीस्वार पोंहचला न पोंहचला हें कळत नाहीं. मामांचें वर्तमान तेथें कळल्यानंतर पुढें मसलत काय जाहली, हें सविस्तर ल्याहावीं. येथील प्रकार तरीः मामा गेले ह्मणून कोणी आंव टाकिला नाहीं. मुस्तकीम आहे. चिंता न करावी. या उपरी गांठ पडेल ते दिवशीं काम कैसें होतें हें प्रत्यास येईल. भगवंतास ऐसें करणें होतें. याजकरितां ते दिवशीं सेना—साहेबसुभा समयास नव्हते. जर करतां असते तरी मामांस उतावळी करूं न देते. इतकेंही असोन गांठ पडती, तर निघाले नसते. ईश्वरसत्तेनें होणें तें होतें. ते दिवशीं वीस कोसांची मजल करून नाझरेयावर आले. रात्रौ मामांस मेळवावें. तें सूर्यास्तीं मामाचा पळ येऊं लागला. तेव्हां तयार होऊन उभे राहिले आणि मामाकडील पळ आला त्यास धीर भरंवसा देऊन पाठीसी उतरविलें. ते दिवशीं ही फौज तेथें नसती तर मामाकडील पळाचा बहुत नाश

होता. ईश्वरें कृपा केली. दुसरे दिवशीं मामाकडील फौज जमली. अर्विधही आला त्या दिवसापासून सर्व संनिधच राहतात. एका दों रोजां गांठ पडेल, ऐसें दिसतें. मार्गानें जासूद निभावत नाहींत. याजकरितां पत्रें लिहिणें तीं नांवें करून न ल्याहावीं. ' विनंती उपरी ' म्हणून ल्याहावीं. लखोटयावर मात्र नांव ल्याहावें ह्मणजे ठीक पडेल. बहुत काय लिहिणें ? लोभ किजे. हे आशिर्वाद.

राजश्री नाना स्वामीस सां। नमस्कार विनंती. सविस्तर अर्थ लिहिलाच आहे. त्यावरून कळेल. तिकडील अर्थ इत्तंभूत लिहिला पाहिजे. येथील चिंता न करावी. मुस्तकीम आहे. हे विनंती.

पत्रांक १२० श्रीशंकर. (नकल) १६९६ चैत्र वद्य ६

वडिलांचे सेवेसीं. साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता। चैत्र वा। ६ मंदवासर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें दोन जासुदाबराबर पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान कळलें. पाटणकर वगैरे यांचे विद्यमानें सूत्रें लागलीं आहेत व तेथून सरकारचा कोणी कारकूनही गेला आहे ह्मणोन येथें बातमी आली आहे, त्यास शीघ्रांत आसोन जे गोष्टीनें मुस्तकीम राहे तें करावें, म्हणून लिहिलें. त्यास, सूत्रें बहुत येतात. येथून कारकून कोणी गेला नाहीं. सूत्रें येतात. परंतु येथें तीं अलक्ष आहेत. चिंता न करावी. उतावळीनें मामांनीं यश त्यास दिल्हें. उपाय नाहीं. ते दिवशीं सबूरी केली असती तर रात्रौ हे मिळाले असते. हे वीस कोसांची मजल सडे स्वारीनशीं नाझरेयानजीक माणेवर तृतीय प्रहरीं आले. जीन हालविले. रात्रौ जीन ठेऊन मामाजवळ जावें, हा इत्यर्थ केला. तों सूर्यास्तीं पळ मामाकडील आला. तेव्हां जीन ठेऊन तयारी करून उभे राहिले. पळ आला, त्यास खातरजमा करून पाठीशीं उतरविलें. प्रातःकाळीं राजश्री हरीपंत तात्या व सर्व सरदार आले. तेथेंच मुकाम केला. नबाबही लांब मजल करून तेथेंच आले. सर्व एकत्र होऊन पुढें चाल धरिली. नबाब निजामअली याचा पुतण्या येत होता, त्याजवर श्रीमंत धांवले. त्यास धरून नेलें, हेंहि वाईटच जाहालें. परंतु मिजाज कायम आहे. काल कूच करून येथें आले. आज कूच करून पुढें जात आहेत. श्रीमंतांचा मुकाम काल नलीमचा होता. विसां कोसांची तफावत आहे. लवकरच गांठ पडते. ईश्वरसत्तेनें परिणामही उत्तमच होईल. सर्व सरदारांची मिजाज हा कालपावेतों कायम आहे. पुढें ईश्वर बरेंच करील. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें ? तीर्थस्वरूप भाऊकडून सांडणीस्वार दोन वेळ आला. वर्तमान लिहिणें म्हणून आज्ञा होती. त्यावरून दोन वेळ पत्रें लिहून संकलित वर्तमान लिहून पाठविलें आहे. कळावें. हे विनंती.

वडिलांचे सेवेसीं आपत्यें गणेश नारायण सां नमस्कार. विज्ञापना. आज्ञेशिवाय किमपि गैरवर्तणूक व्हावयाची नाहीं. हे विज्ञापना.

पत्रांक १२१ श्री. (नकल) १६९६ चैत्र वद्य ६

उभयतांचे सेवेसीं. बाळाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल चैत्र वद्य ६ जाणून स्वकीय लेखन आज्ञा केली पाहिजे. इकडील सविस्तर श्रीमंत राजश्री तात्यासाहेबांचे पत्रावरून सविस्तर श्रवण होईल. मुख्यांचा एकिदा साबित आहे. विलग पडणार नाहीं. खातरजमा असो द्यावी. मेहनतेस अंतर करीत नाहीं. चाकरी मगदुराप्रमाणें करीत आहों. पसंत करणार आपण आहेत. इलजाम येणार नाहीं. सर्व यथास्थित आहे. हरघडी कृपापत्रीं सांभाळ करावा. हे विज्ञापना. राजश्री सदाशिव हरी मकार नामकाचे तर्फेनें आले आहेत. बोलण्यांत आलें कीं, बाईस व नानासाहेबांस एक करावें. कित्तेक मायेममतेच्या गोष्टी बोलतां, यांचें बोलणें होऊन, राजश्री हरिपंत तात्यांस समजल्याउपरी जें होईल तें सेवेसीं लिहून पाठवितों. हे विज्ञापना.

पत्रांक १२२

पौ चैत्र वद्य ११ गुरुवार. श्री. १६९६ चैत्र वद्य ६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य कृष्णराव नारायण सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता चैत्र वद्य षष्ठी जाणोन मुा लष्कर नजीक मोहळ जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष आपणाकडून शुद्ध एकादसी व पौर्णिमेचीं पत्रें आलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. इकडील मजकूर तर तपसीलवार तीर्थरूपांचे पत्रावरून व राजश्री लक्ष्मणपंत यांणीं लिाायावरून लिहून कळेल. एका दोहों दिवसांनीं सड्या फौजा होणार. मागाहून तपसिलवार लिहून पाठवूं. त्या सैन्यांतून राजश्री सदाशिव हरी आले आहेत. कांहीं सूत्रही आंतून आहे. कसें काय आहे, पुर्तेपणीं कळलें ह्मणजे लिहून पाठवूं. कसेंही सूत्र आलें तरी इकडील मिजाज कायम आहे. चिंता नाहीं. राजश्री हरीपंत तात्याकडे आह्मी व राजश्री दादा जात असतों. बहुत ममता उत्तम प्रकारें करितात. तात्यांचें साधन बरें राखिलें आहे. चिंता न करावी. पत्रें वरचेवर पाा असावीं. घोड्याविशीं लिाा त्यास, एक घोडा तुरकी, फारच चांगला, गुदस्तां यांनीं अडीच हजार रुपयांस घेतला होता, तो तयार आहे. परंतु एकच घोडा पाठविल्यास राजश्री बापूंसही पाा पाहिजे. दुसरा तूर्त पाठविण्यास सोय पडत नाहीं. याजकरितां न पाठविलें. तूर्त विकतही घेईन ह्मटल्यास मिळत नाहीं. व ऐवजही नक्त द्यावयास नाहीं. याजकरितां पाठवायास

आजपावेतों अनमान जाहला. यजमानाचें मानस कीं, पाठवणें. तेव्हां दोन पा. त्यास दुसऱ्याची तरी तूर्त सोय पडत नाहीं. याजकरितां तेथून राऊत कोणी येईसें असल्यास त्याजबराबर एकच पा ह्मणून लिा तरी एकच पा देतों. घोडा आहे हा फार चांगला आहे. हा राजश्री नानांचे मर्जीजोगाच आहे. येमनीपेक्षां अधिक चालणारा आहे. पाहिल्यानंतर कळेल. राा मल्हा[र] पानशे येथें येणार ह्मणून वर्तमान ऐकितों. त्यांजबराबर राऊत येऊन माघारे जातील त्यांजबराबर पत्र देतों. बहुत काय लिहिणें? लोभ करावा. हे विनंती.

पत्रांक १२३.

पौ अधिक वैशाख शुा ५ शुक्रवार. श्री. १६९६ चैत्र वद्य ८.

राजश्री नानाजी कृष्ण व राजश्री बाबूराव विश्वनाथ गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. सांडणीस्वाराबराबर छ १७ मोहरमचें पत्र पाठविलें तें छ २० मोहरमीं पावलें. लेखनार्थ कळला. राजश्री सखारामपंत बापू व राजश्री बाळाजपंत नाना यांचीं पत्रें पाठविलीं ते पावलीं. ऐशीयासी, राजश्री रघुनाथरावदादा यांणीं मामास हस्तगत करून सीनेच्या पाण्यानें लांब मजली करून जात आहेत. काल त्यांचा आमचा सोळा कोसांचा तफावत होता. भारी कारखाना परांडेयांत ठेवावयाबद्दल आमचा मुक्काम नबाबांनीं करविला. याउपरी नबाबांनीं जरीदे दाहा बारा कोसांच्या मजला करून मागें यावें आणि आह्मीं व राजश्री हरीपंत व राजश्री वामनराव व रास्ते वगैरे सरदार जाऊन गांठ घालावी; अटकून पाडावें; तोफा टाकून झुंजास आले तरी झुंजावें; ऐसा निश्चय ठरविला आहे. राजश्री भवानराव प्रतिनिधी काल येऊन दाखल जाहाले. हें सविस्तर वर्तमान राजश्री हरीपंत व राजश्री कृष्णराव यांणीं लिा आहे. त्याजवरून कळेल. राजश्री बापू व नाना यांसीं लिा आहे. तिकडूनही कित्तेकविशीं साधन प्रकार घडावा. राजश्री मोरोपंतदादा यांसीं इकडून पत्र बहुत दिवस जात नव्हतें, आणि त्याजकडूनही पत्र येत नाहीं, येविशींचा मजकूर तुह्मांस लिहिला होता. त्याचें उत्तर आलें. त्यास, हल्लीं पत्र लिा आहे. प्रविष्ट करून उत्तर पाठवावें. वरकड तुह्मांस ल्याहावें ऐसें नाहीं. वरचेवर पत्रें येत जावीं. राा छ २२ माहे मोहरम. कित्येक तेथील ममतेचा वगैरे मजकुर राजश्री तात्यांचे पत्रीं लिा त्यांणीं उमजाविलें. तुह्मीं उभयतां प्रसंगीं आहां. तेथें आह्मींच असों. इकडिल संशय किमपिनसावा. लक्ष दुसरें होणारच नाहीं. तेथील हे निशा आपली येऊन, त्यांची करावी. बहूत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक १२४
पौ. अधिक वैशाख शुद्ध ५ शुक्रवार. श्री. १६९६ चैत्र वद्य ८

अपत्यें तात्यानें दोनी कर जोडून सां। नमस्कार विनंती. राजश्री त्रिंबकराव मामा यांस जखमा लागल्या होत्या. फुटून चैत्र वा। ७ सप्तमीस देवआज्ञा जाहाली. मोठें वाईट जाहालें. राजश्री सेनासाहेब सुभा यांनीं राजश्री बापूंस व नानांस पत्रें पाठविलीं आहेत. राजश्री दादांस पत्र लिहिण्याविषयीं विनंती लिहिली होती. त्यावरून आज्ञा झाली कीं, पत्रें लिहिणें. चिंता नाहीं. त्यावरून त्यांसही पत्र यजमानांनीं लि। आहे. द्यावें. राजश्री बापूंनीं रा। दिनकरपंतांस पत्र तेथून लिहिलें होतें. त्यावरून त्यांस बहुत उत्कर्ष वाटला आहे. याचा प्रकार काय आहे हा शोध घ्यावा. मातुश्री दर्याबाई यांसही पत्रें तेथून आलीं आहेत, ह्मणून वर्तमान आइकिलें. त्यावरून सेवेसीं लिहिलें आहे. कळावें. येथें राजश्री हरीपंततात्यांनीं दर्याबाईचे प्रकार तीन चार शकला काहाडल्या होत्या कीं, एक प्रकार कीं, कोणेही प्रकारें राजश्री नानांस व बाईस एक करून द्यावें; दुसरें, बाईनीं फौज आपली आह्मी सांगूं तिकडे तैनात करून द्यावी आणि आपण तीनशें चारशें राऊतांनिशीं आपले गोटांत येऊन रहावें; तिसरा प्रकार बाईनीं तिनशें स्वारांनिशीं आपण पुरंधरास जावें, फौज येथें ठेवावी, अगर फोडून फाडून सांगों त्याप्रमाणें तैनातीस द्यावी. त्यास या तिहीं गोष्टींतून एकही प्रकार त्यांजकडून घडत नाहीं. एक होणें, तेव्हां टिका चिरंजीवाचे नांवें असावा ह्मणतात. लोक तैनातीस देऊन आह्मीं तिनशें स्वारांनिशीं कैसें राहावें? लोक तैनातीस कैसे जातील? ऐसें ह्मणतात. पुरंधरास जाणें उचित. परंतु तीनशें स्वारांनिशीं जाणें कैसें घडेल? घाटगे, निंबाळकर, घोरपडे, मान्ये, जाधव वगैरे हे आमचे मानपुरुष. हे तर समागमें घेतले पाहिजेत. दोन अडीच तीन हजार निदानीं समागमें येतील. ते घेऊन जा ह्मणाल तरी जातों. वऱ्हाडचीं पथकें आहेत. तीं येथें ठेवितों. ऐसें उत्तर जाहालें. त्यास, तीनीं उत्तरें कठीणच. पुरंधरास तीन हजारानिशीं रवाना करणें सला नाहीं. व जातील हा भरंवसा नाहीं. मार्गांतून गच्छ केल्यास काय करावें? समागमें आपली फौज द्यावी तरी निवडक फौज तीन हजारास, यांची साहा हजार असेल तेव्हां उपयोगी. नाहीं तर ठीक नाहीं. ऐसें आहे. त्यास अद्यापि निश्चय बाईचा होत नाहीं. यामुळें आपले फौजें(तील) लोकांची खातरजमा पुरवत नाहीं. फितुरी फौज समागमें घेऊन लढाईस जाणें उत्तम नाहीं ऐसें सर्वीं सर्वत्र ह्मणतात. राजश्री तात्याही कोणे प्रकारें दर्याबाईचा बंदोबस्त करून, सडे होऊन, पाठलाग करणार. त्या सैन्यांतील वर्तमान तर रा। नरसिंगराव धायगुडे आपले च्यारशें राऊतांनिशीं नगरास येऊन दाखल जाहाले. रा। कुशाबा पानशे, दरोगे तोफखान्याचे, आज येथें येऊन दाखल जाहाले. पाऊणशें राऊत समागमें आहेत.

दावल माहोत व बाळा माहोत पागेसुद्धां त्या सैन्यांतून निघाले म्हणून वर्तमान आहे. येथें येऊन दाखल होतील तेव्हां खरें. श्रीमंतांकडे दोन पथकें नवीं येऊन सामील जाहालीं. एक ताकपीर, दोन हजार फौज गायकवाडाकडील व लांबहाते शिंद्याकडील दीड हजार फौज. एकूण तीन साडेतीन (हजार) फौज नवी सामील जाहाली. म्हणून वर्तमान आईकिलें. राजश्री भवानराव प्रतिनिधी यांची रुकनुद्दौला यांची भेट जाहाली. उदयिक बंदेगानअलीचीही भेट होणार आहे. प्रतिनिधीजवळ तीनशें राऊत आहेत. कळावें. वरकड वर्तमान वरचेवर होईल तें मागाहून लिा पाठवीन. शेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक १२५.

पौ छ २३ मोहरम, चैत्र श्री. १६९६ चैत्र वद्य ८.

राजमान्य राजश्री मोरो शामराज दिा

चिरंजीव राजश्री महिपतराव त्रिंबक यांसीं:—

प्रति मातुश्री गंगाबाई आशिर्वाद. सुा अर्बा सबैन मया व अलफ. तुमचें प्रयोजन असे. तरी पत्रदर्शनीं हुजूर पुणियास जलद येणें. दिरंग न लावणें. जाणिजे. छ २२ मोहरम. आज्ञा प्रमाण.

पत्रांक १२६ श्री. १६९६

यादी पथक दिा राजश्री माधवराव निळकंठ पुरंदरे. सुा अर्बा सबैन मया व अफल.

कर्जपट्टीचा ऐवज रुा १४०००० याचा तपशील.

७०००० पौष अखेर

७०००० जेष्ठ अखेरी

१४००००

एक लक्ष चाळीस हजार सदर्हू प्रमाणें द्यावे.

कर्ज सरदारीवर फार जालें. याजकरितां सालमजकुरीं बाराशें राऊत ठेवावयास सांगितलें. त्यास कर्ज वारे तोंपावेतों बाराशा फौजेनशीं चाकरी करावी. पुढें दोन हजार फौजेनिशी चाकरी करावी.

मागील पांच सालां महालांत आफती आली व कर्नाटकांत दोन हजार फौजेची चाकरी जाली. सदर्हू छावणी तीन वर्षे जाली. माहागाई फार. सबब साहा लक्ष देणें जालें. त्यास सालमजकुरापासून मनास आणावयास चिरंजीव माहिपतराव त्र्यंबक यांस सांगितलें. त्यास तुह्मीं कच्चा पक्का माहालचा व पथकाचा हिशेब मागील पाहावा. याजमुळें माहालकरी याजकडे वगैरे ज्यांकडे ऐवज निघेल तो फाजीलांत घ्यावा. सरदारीचा कुल अखत्यार तुह्मांवर. जें उपयोगीं तें तुह्मीं करावें.

पत्रांक १२७

पौ चैत्र वा १२ शुक्रवार श्री. १६९६ चैत्र वद्य ९

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाना व तथा राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसी:--

पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ २३ मोहरम मु॥ नजीक परांडा जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. उभयतांनीं राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांस पत्रें पाठविलीं, तीं त्यांणीं मला दाखविलीं. आह्मी सर्व मंडळी एकरूप असों. कोणेविशीं गुंता पडूं देत नाहीं. ईश्वर उत्तमच करील. इकडील सविस्तर राजश्री तात्यांचे लिहिल्यावरून कळेल. श्रीमंत वीस कोस पुढें आहेत. आह्मी मोंगलांकरितां गुंतलों. याउपरी सडे होऊन पाठलाग करितों. त्यांणीं पळावयाची शकल काढली आहे. आह्मी पाठीस लागलों असतां कोठें जातात! तात्या सुखरूप आहेत. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें! लोभ असों दिजे. हे विनंती.

पत्रांक १२८

पौ चैत्र वा ११ गुरुवार श्री. १६९६ चैत्र वद्य

सेवेसी विनंती ऐसीजे. पालखी तयार करविली आहे, तयार जाहाली, पाठवितों ह्मणून लि॥ त्यास, सरंजामसुद्धां आपली पांबडी येईल त्याबरोबर पा. येथें दुसरी करीत नाहीं. बेदाणा, मनोका, एक रुपयाच्या जासुदा समागमें पा. एक घोडा सिद्धच आहे, परंतु दुसरा मेळवून पाठवणें, ऐसें यांचें मानस. त्यास, दुसरा चांगला मिळत नाहीं. कारवानी आले होते. त्यांत पाहिलें; परंतु आमचेच पसंतीस न ये. तेव्हां उपयोगी कैसा पडावा? यजमान तों पेंचामुळें संकोच्यांत पडतात. त्याशीं एकच पाठवावा. ऐसेंच वडिलांच्या विचारें जाहालें तरी लिहावें. तिकडील स्वार कोणी येतील त्यांस सांगावें. त्यां समागमें पाठवितील. गुंता नाहीं. हे विज्ञापना.

पत्रांक १२९.

पौ अधिक वैशाख शुा १० गुरुवार. श्री १६९६ चैत्र वद्य १४.

राजश्री नानाजी कृष्ण जोशी व बाबूराव विश्वनाथ वैद्य गोसावी यांसी:--

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. हरीभक्तपरायण राजश्री मार्तंड बाबा, वास्तव्य श्री जेजूरी, हे आह्मांस

पूज्यमान आहेत. सांप्रत गडबडीच्या प्रसंगाकरितां मुलेंमाणसें सुस्थळीं असावीं ह्मणोन यांचा मानस. त्यास विज्वर प्रसंगच रुबकार जाहलियास किल्ले पुरंधर समीप आहे. आपण राजश्री सखारामपंत बापू व राजश्री बाळाजीपंत नाना यांसीं सांगोन, निरोपद्रवार्थ किल्ले मजकुरीं एक घर यांच्या मुलांमाणसांस देऊन सांभाळ करवावा. व पा करडेरांजणगांव यांच्या प्रघातांत आहे. तेथील फडणिशीची असामी यांचे ज्यामात आनंदराव भैराळ यांसीं करून देवावी. स्वदेशीं चरितार्थ होईल. येविशीं आम्ही राजश्री नानांस पत्र लिहिलें आहे. प्रसंगीं येविशीं त्यांस सांगोन सदरहू कामें करून देविलीं पाहिजेत. बावाचें अवश्यक आम्हांस आहे. त्याप्रमाणें तुम्हीं अगत्यवाद धरून उभयतांकरवीं ममता करवावी. येविशीं अनमान सहसा न करावा. रा छ २७ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तब सुद.

पत्रांक १३० श्रीरामजयती १६९६ अधिक वैशाख शुद्ध १

वडिलांचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत वैशाख शुा १ पर्यंत मुा लष्कर येथें श्रीमंत मातुश्री बाईसाहेब असों. यानंतर वडिलांकडून सांप्रत आशीर्वादपत्रें येऊन वर्तमान कळत नव्हतें त्यास हालीं मानाजी कलभे यांजबराबर आशीर्वादपत्रें पा तीं पावलीं. पावोन लिहिला मजकूर सर्व ध्यानांत आला. कित्तेक प्रकारें सावधपणें लिहिलें. त्याप्रमाणेंच माझी चालीची रीत आहे. चिंता न करावी. इकडील वर्तमान तरः राजश्री त्रिंबकराव मामांनीं सज्या फौजा करून राजश्री आनंदराव रास्ते व राजश्री वामनरावजी आपले फौजेसुद्धां श्रीमंतांजवळून निघोन बुणगें बागलकोटास टाकून मामाजवळ वडगांव जयरामस्वामीचें या मुक्कामीं येऊन पोंहचले. राजश्री विठल शिवदेव व नारो शंकर वगैरे पथकें मिळोन चवदा—पंधरा हजार फौज व श्रीमंत राजश्री नानासाहेब यांची फौज व नबाबाकडील जावितजंग व श्रीमंत सेनासाहेबांची चार पांच हजार फौज, याप्रमाणें एकत्र होऊन, सडे होऊन, श्रीमंतांवर पाठीमागें गेले. श्रीमंतांनीं मिरजेहून कूच केलें. ते विसां कोसांच्या मजली करून श्रीपंढरीवर गेले. मामांनीं पाठीवर जाऊन कासेगांवास मुक्कामास वीस बावीस कोस चालून आले. धौशा व श्रमिंत नानासाहेब मागेंच होते. तों मामास चिठी आपलेकडील यजमानाची आली कीं, आज तुह्मीं माघारे सरून राहणें. याप्रमाणें जालें. तों मामांनीं विचार केला कीं, फौजेंत फितूर आहे, या वेळेस लाग करावा. ह्मणोन अंदेशा न करितां तयार होऊन पुढें जावें तों श्रीमंत खासा सात आठ अंबाऱ्या वीसपंचवीस हजार फौजेनें तोफखाना पुढें घालून, गाडदी वगैरे चालून आले. तों दोन सरबत्या तोफांच्या जाल्या. इकडून मामांनीं उजवे बाजूस रास्ते, विठल शिवदेव व डावे

बाजूस राजश्री वामनराव उठले. तों बाजू मोडून श्रीमंत दादांचे लोक मार्गे सारिले. तो हुजुरांत पांच सात हजार मामावर तुटोन पाटणकर, निंबाळकर आले. तों निशाणाचा हत्ती नेला. हत्ती पोटीं घालून मामावर मिठी पडली. तों फौज उधळली. मामाजवळ राजश्री निळकंठराव थोरात व फकीरजी खडतरे उड्या टाकून उभे राहिले. मामावर जखमा डोईस वार तरवारेचा, एक खांद्यावर, एक कुशीस, एकूण तीन वार होते. पाडाव त्रिवर्ग गेले. फौजा झाडून निघाल्या. तो पांचा सा कोसांवर श्रीमंत नानासाहेब मार्गीं भेटले. श्रीमंत मुकामास गेले. मामांनीं उतावळी केली. साऱ्या फौजा एकत्र झाल्या असत्या तर चिंता नव्हती. परंतु होणारापुढें उपाय नाहीं. आमची थोडीबहुत फौज. बुर्नगियांत नबाबाचे पिछाडीस श्रीमंत मातुश्री व सेनासाहेब होते. याप्रमाणें घडलियावर, राजश्री हरीपंत तात्या निभाऊन बुणग्यांत आलें. सर्वांचें समाधान राखून गाहा फौजेचा राखला. श्रीमंत कूच करून मजल–दर–मजल परांड्यावरून, नगरावरून टोंक्यास गंगातीरास गेले. साऱ्या फौजा पाठीमागें. नबाबसुद्धां नगरच्या मुकामास आज आलों. राजश्री त्रिंबकराव मामा श्रीमंतांबराबर अटकेंत होते. ते जखमांनीं हैराण होऊन मार्गांत खडकतच्या मुकामीं देवआज्ञा चैत्र वा। ८ रविवारीं जाली ! ईश्वरसत्तेपुढें उपाय नाहीं ! आतां नबाबसुद्धां पाठीमागें जात आहेत. सर्व कामांत तात्या आहेत. पुढें होईल वर्तमान तें वरचेवर लिहून पाठवीन. राजश्री अंताजीपंतास वडिलीं पत्रामागेंच पाठवितों म्हणून लिा। परंतु पंतमारनिल्हे आले नाहींत. तर, सत्वर पाठविले पाहिजेत. घरीं गडबडीमुळें एक सरांस निघोन जाणें जालें. ऐशीयास, प्रस्तुत वडिलीं स्वस्थ असावें. गडबड तिकडील वारली. घरास यावें. परंतु सावध असावें. काळ कठिण आला आहे. आम्हांविशीं चिंता न करावी. शरीरेंकरून हा काल पावेतों आरोग्यें असों. देशांत दरवडे पडतात ह्मणोन कळलें. ऐशीयास, रात्रींबित्रीं सावध असावें. दुसरें येथें आह्मी वडिलांचे आज्ञेप्रमाणेंच असों. खर्चाची निकड घरीं असेलच. बरें. सर्व चिंता श्री रघुवीर स्वामीस आहे. आजच राजश्री माहादाजीपंत नानास पत्रें येथून रवाना केलीं आहेत. पूर्वीं लिहिल्याप्रमाणेंच तेथून सत्वरच घडेल. बिडाकडे पागा गेली आहे. तेथें जफ्ती गेली आहे. येथें बोली स्वकीयांचे हातून पंचविसां राऊतांची करितों. एका दों दिवशीं बिडास माणूस पाठवून घोडीं आणवितों. वाटेचें संकटच आहे. युक्तीनें आणवितों. चिरंजीव सौ गोपकाबाईचा मजकूरः भुतें गत घेतों म्हणतात, म्हणोन लिहिलें. उत्तम आहे. जें आपलें घरांत नाहीं तेच भगवंत आणितो ! चिंता केलियानें काय होतें ? जे गोष्टींनीं विष्टगत घेत तें करावें. वडिलीं लिहिलें कीं, जें करणें तें युक्तीनेंच करीत जावें. ऐशियास, कोणेविशीं चिंता नाहीं. अंताजीपंतास घरास एकंदर

जाऊं देऊं नये. आम्हांकडे पाठवावें. त्यां समागमें आमची पालखी पुणियांत आहे ती पाठवावी. तबकडीखेरीज सामान असेल. ऐशीयास, पाठविली पाहिजे. शरीर अशक्त म्हणून चिंता न करावी. प्रसंग दिवस मेहनतीचे पडले आहेत. श्रीमंत मातुश्रीची ममता उत्तम प्रकारें आहे. मर्जीनुरूप सांगतील चाकरी तें करून असों. सर्वांसीं इष्टत्वें रक्षून असों. राजश्री वामनरावजीची व राजश्री तात्यांची भेट एका दों दिवशीं होत असते. श्रीमंतांचे फौजेंतून लोक पथके कोणी कोणी आले. राजश्री भवानराव प्रतिनिधी व मलबा पानशे व नरसिंगराव धायगुडे निघोन काल आले. तेथील फौजेचा धर सुटला आहे. पोटास एक पैसा नाहीं. पुढें घडेल तें पहावें. राजश्री रामाजीपंत कोंकणांतून आले नाहींत. त्यास बोलावूं पाठवावें. परी घोडी सबर नसली तर कवडीस पाठवून काढवून आणावी. भिकूस पाठविला म्हणजे काढऊन आणील. तर पाठविली पाहिजे. शिंग्यावर खोगीर ठेविलें म्हणून कळलें. उत्तम केलें ! दसरा पावेतों वर बसूं नये. मग मर्जीस येईल तें करणें. पुरण दूध मिळत नाहीं, तर आबाळन (न) होईल तें करावें. बाळंभट केळकर यांचे रुा एकशें त्र्येपन आम्हीं देणें होतें ते वडिलीं दिले असतील. नसले दिल्हे तर द्यावे. आपल्यावर मातुश्रीची ममता आहे. या पत्रामागें आपल्या येण्याविशीं पत्रें येतील त्याप्रों यावयाचें करावें. चिरंजीव बाळाजी दिनकर याचें लग्न करावें. आळसावर घातलियावर टीक नाहीं. मूल तर चांगली आहे. जातें समई विनंती केली होती. तेणेंप्रमाणें भीड घालून करावें. जानोजी शिंदे व लिंबाजी शिंदे आपआपले ठिकाणीं पागासुद्धां सुखरूप आहेत. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें ! हे विज्ञापना. इ०

राजश्री धोंडोपंत दामले स्वामीस सां॥ नमस्कार विनंती उपरी लि॥ पा॥. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लोभ करावा हे विनंती. रा॥ यशवंतराव यांस नमस्कार लोभ करावा हे विनंती. वो. नारायणभटजी काका सां॥ नमस्कार विनंती. उपरी लि॥ पा॥. पत्र पाठवावयास अनुकूलता न जाली ! असो. परंतु उचित असेल तेंच करावें. आम्हांविशीं चिंता न करावी म्हणोन ती॥ मातुश्रीबाईस सांगावें. हे विनंती इ०

पत्रांक १३१. श्री. १६९६ वैशाख अधिक शु॥ ३.

सेवेसीं नारो आपाजी सां॥ नमस्कार विज्ञापना. आजी गुरुवारीं प्रातःकाळीं राजश्री कृष्णराउ बल्लाळ घरास आले. मध्यरात्रीं राजश्री भवानराउ प्रतिनिधी आले. सडे लांब लांब मजली करून आले, तेथें त्यांचे राऊत दादा

जवळ होते ते व पालख्या दोन पुढें कोरेगांव पावेतों गेले होते. विदित जालें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक १३२

पौ अधिक शुद्ध. श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाबूरावजी वैद्य यांसीः—

प्रति लक्ष्मण बल्लाळ आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता अधिक शुद्ध १ मुा लष्कर नजीक किल्ले नगर वर्तमान यथास्थित असे. विशेष. हरिभक्तपरायण राजश्री मार्तंडबाबा वास्तव्य जेजुरी हे राजश्री सेनासाहेब सुभा यांचे गुरु आहेत. त्यास प्रस्तुत गडबड आहे. यांचे मुलांमनुष्यांचें संरक्षण जाहालें पाहिजे. याकरितां राजश्री नानासाहेब यांनीं राजश्री नाना फडणीस यांस व तुह्मांस पत्र लिहिलें आहे कीं, किल्ले पुरंधर येथें घराची सोय करून देऊन सांभाळ करावा. त्यास, हे आपणाकडे येतलि. तरी, यांची भेट करून देऊन, यांस स्थळ देऊन, संरक्षण होय तें करावें. व करडेरांजणगांव येथील फडणीसी यांचे जामातास करून द्यावी. येविशीं यजमानांनीं लिहिलें आहे. त्यास, आपण साहित्य करून, सनद फडणीशीची करून देवावी. हे थोर तपस्वी आहेत. जेजूरलिंगही यांस प्रत्यक्ष आहे. यांनीं राजश्री नाना फडणीस यांच्या कल्याणाविशीं व संतानाविशीं सांगितलें आहे. त्यास, तुमची भेट जाहल्यास पुसावें ह्मणजे सांगतील. त्याप्रों त्यांच्या कानांवर घालून, त्यांसी यांसी गांठ घालावी. ह्मणजे यथास्थित होईल. हे निस्प्रह आहेत. कांहीं आशा धरून सांगतात, ऐसें नाहीं. आणि जें सांगतील त्याप्रों घडेल, यांत अंतर नाहीं. आह्मांवरही कृपा करितात. आपली भेट जाहालियावर आपल्याहि प्रत्ययास येईल बहुत काय लिहिणें? लोभ किजे, हे आसिर्वाद.

राजश्री नाना स्वामीस सां नमस्कार. विनंती. लिा प्रों अगत्य साहित्य करावें. हे विनंती.

पत्रांक १३३

पौ अधिक वा ४ शुक्रवार श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध ८

आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता अधिक शुा ८ इंदुवासर मुा चिखलठाण वर्तमान यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव आपणाकडील कुशलार्थ लिहीत जाणें. विशेष. राजश्री नानांचें पत्र अमावास्येचें आलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं, रावजी प्रतापगडास गेले, मातुश्रीस समाधान वाटत नाहीं, त्यावरून चिंता

लागली आहे, त्यास, आरोग्य जाहलीयाचें वर्तमान लिहिलें पाहिजे. राजकी वर्तमान तरी: श्रीमंत फर्दापूरच्या घांटास गेले. आज घांट उतरले असतील. बऱ्हाणपुरच्या रोखें जातात. नबाबाकरितां दोन मुकाम हे फौजेचे येथें जाहाले. आज कूच जाहालें. मजलदरमजल त्यांचे पाठीवर जात आहेत. यांस त्यांस चाळीस कोसांची तफावत पडली आहे. पुढें काय होईल तें पहावें. प्रस्तुत मसलत लांबणीवर पडली, ऐसें दिसतें. ब्राह्मण मंडळी तर नित्य उठोन तिकडून येतच आहे. परंतु, मराठे मंडळींत अद्यापि कोणी येत नाहीं. मराठे फुटल्याविना ठीक पडतां दिसत नाहीं. सेनासाहेबसुभा यांचें वर्तमान तरी: नित्य उठोन घरणींपारणींच आहेत. सवा लक्ष देतात, त्यापें त्यांचे कांहीं होत नाहीं ऐसा प्रकार पडला आहे. राजश्री हरिपंत तात्या काल येथें आले होते. बोलणें चालणें जाहालें. परंतु, तात्पयार्थ, जिमे प्रों देऊं; अधिक मिळत नाहीं. यांस तरी तितक्यानें होत नाहीं. तात्यांचे कूच होऊन मजलीस जातात. यांचे कूच होणें कठीण पडतें. तेव्हां हिकडून तिकडून करून कूच करितात. कधीं मध्यरात्रीस कधीं प्रहर रात्रीस मुक्कामास जातात! याप्रमाणें प्रकार पडला आहे. परिणाम ईश्वर लावील, तरच लावूं. एरव्हीं ठीक दिसत नाहीं. विस्तारें काय लिहावें! लोभ किजे. हे आशिर्वाद.

राजश्री नाना स्वामीस सां नमस्कार विनंती उपरी. आपली रवानगी होणार, सत्वरच येतों म्हणोन लिहिलें, त्यावरून संतोष जाहाला. आपलें येणें होईल तरी उत्तम आहे. यादव वगैरे मराठे यांचे विचारें जातीनें कारभार करावा, ऐसें आहे. त्यामुळें हीं तिडणीं पडतात. पुढें काय होईल तें पहावें हे विनंती.

पत्रांक १३४

पौ अधिक वा। ४ शुक्रवार श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध ८

अपत्यें तात्यानें चरणांवर मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता। अधिक शु॥ ८ इंदुवासर मुकाम चिखलठाण, नजीक औरंगाबाद, वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत बऱ्हाणपुरच्या रोखें फर्दापुरच्या घांटास गेले. आज घांट उतरील. हे मुक्काम मजकुरीं शुक्रवारीं आले. अविंधाचे शहरास येणें बहुतां दिवशीं जाहालें. याजकरितां दोन मुकाम जाहाले. आज कूच जाहालें. मजलदरमजल त्यांचे पाठीवर जात आहेत. त्यांस यांस चाळीस कोसांची तफावत पडली आहे! पुढें कैसें होतें तें पहावें. बहुत काय लिहिणें! लोभ करावा. हे विनंती.

पत्रांक १३५ श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध ८

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव स्वामीचे सेवेसीः—

पोष्य सखाराम भगवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. श्रीमंतांकडील लोकांचा मजकूर लिहिला तो कळला. सरंजामी वगैरे यांचे घरीं निकड करावी ह्मणोन लिहिलें. त्यास निकडच झाली आहे. याउपर बोभाट लवकरीच होतील. रा छ ७ सफर. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे हे विनंती.

पत्रांक १३६

पो. अधिक शुद्ध १४. श्रीशंकर. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे शेवेसी:—


पो आपाजीराम कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ता अधिक शुा १० गुरुवासर मुा का जामखेड पा आंबेड येथें सुखरूप जाणून स्वानंद कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष आपणाकडून पत्र आलें तें कौमारीं काल दोन प्रहरां प्रविष्ट झालें. पेशजीं पत्रीं आम्हीं राजराजकी वर्तमान लिहिलें. येथील खर्चवेंचाचा मजकूर लिहिला होता. त्याचा तपशीलवार जाब न पाठविला. इकडिल वर्तमान तरः श्रीमंत राजश्री दादासाहेब टोक्यास आले होते ते पेशजीं लिहिलें होतें. तेथून मजलदरमजल पिंपरी परगणा एकतुणी पासून तीन कोसांवर आले दोन मुकाम जाले. आह्मीं शुा प्रतिपदेस ठाणें सोडून जामखेड येथें आलों. पाटील, कुळकर्णी, रयत साडेतीन गांवचे येथें आले. कांहीं आपलाले सोईनें गेले. गांव दरोबस्त कसब्यासुद्धां पायमल्लींत आले. लोक घाबरेपणें सडेमात्र पळोन आले. घरेंदारें अगदीं तसनसींत आलीं. श्रीमंतांचे सैन्याचा दंगा चार दिवस जाला. आसपासचे गांव कित्येक जाळले. माणसें मारलीं. तो दंगा कोठपर्यंत ल्याहावा? त्याजउपर मोंगलाई फौज व भोंसले व स्वसैन्य हा आकांत! त्याच मजलींनें आलीं. त्यांचा दंगा अद्याप आहेच. तात्पर्य, गांव अगदीं पायमल्लींत आले. पेस्तर सालची तरतूद होऊन लावणी होणें संकट आहे. वाकळूजचीं गुरेंढोरें व बैल देखील गेले. कसब्याचींही बैलढोरें गेलीं; व हे गांवची तसनस बहुत जाहली. घरें, गांव अगदीं परागंदा जाले. ईश्वरें मोठें संकटांत घातलें आहे. आह्मी घोड्यांचे चंदीकरितां सात आठ पल्ले हरभरे व पांचसात पल्ले बाजरी व पांच हजार सरम घेतला होता. तो सरंजाम अगदीं गेला. दीडाशां रुपयांची नुकसानी जाली. आतां पुढें घोड्याचे दाण्यावैरणीची व आमचे खर्चाची तर्तुद होणें कठीण जालें आहे. या दंग्यांत कोणी कर्जवामही देत नाहीं. ऐसा योग प्राप्त जालाआहे.

अरिष्टही निवारलें नाहीं. पुढें योगक्षेम कसा करावा? आतां या सालांत वसूल घ्यावयास जागा नाहीं. पुढें तर्तुदीस जागा नाहीं. याचें काय करावें हे आज्ञा ल्याहावी. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. ठाणें टाकून घोडीं पिढीं घेऊन या ह्मणाल तर घेऊन येतों. अथवा कसें करावें हें विस्तारपूर्वक ल्याहावें. आह्मी तर मोठे संकटांत आहोंत. जीव रक्षावयाचें कठीण पडलें आहे. भगवत् इच्छेस उपाय नाहीं. तुह्मांकडील पत्र येतें तेथें मजकूर उगडून लिहित नाहीं. त्यास, तपशिलवार उगडून ल्याहावें कीं, तुमचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयास येईल. तुह्मीं मोघम लिहिल्यास, आह्मीं काय समजावें? साल मारीं परगण्यांत वसूल नाहीं. परंतु सालपेक्षां महाल मा। अधिक पडला. व पुढेंही पाहिजे. होण्याचा ऐवजहि खर्चीचे भरण्यास गेला. चार तट्टें जगलीं पाहिजेत व चार माणसें संग्रहीं पाहिजेत. ऐसा योग घडला आहे. श्रीनें काय योजना केली असेल ते नकळे. पत्रीं कोठवर रड ल्याहावा ? राजक्रांत बहुत कठीण आहे. आतां पाटील व लोक ममतेंत घेऊन गांवावर वस्तीस न्यावी तर अरिष्ट निवारलें नाहीं. कोण्हे समयीं परतून येईल हें तथ्य नाहीं. मोंगल अद्यापी शहरींच आहे. चोर, राउत नित्य लूट लबाडी करितात. रा। हरिपंत फडके यांचें निसबतीचें सैन्य व साबाजी भोंसले यांचें सैन्य चौक्याची घांटी उतरून फुलमरी परगण्यांत गेले आहेत, मोंगल व दर्याबाई भोसली हीं दोन पथकें शहरावर आहेत. श्रीमंत फर्दापूरघाटें उतरून खानदेशांत गेले, ऐसें आहे. पुढें काय होईल हें नकळे. घोडीं पिढीं जगून तुह्मांजवळ येणेंचें संकट पडलें आहे. येथें आहेत यांचाही भरंवसा येत नाहीं. ऐसें जालें आहे. पुढें काय करावें ? वर्तमान कोण्हास ल्याहावें ? हें ठिकाण राहिलें नाहीं. जिवावर गोष्ट आली आहे. भगवंत पार पाडून तुमची भेट घडवील तेव्हां खरें. अस्तु. आपला उपाय नाहीं. घोडीं घेऊन तुह्मांकडे यावें, ऐसें आहे. येथें राहिल्यास खर्च चालला पाहिजे. याची आज्ञा काय ते लिहिणें. त्याप्रों वर्तणूक करावयास येईल. ठाणें मोकळें सोडून यावें कीं बंदोबस्त करून यावें, हें लिहिणें. पुढें गांवचा बंदोबस्त व पेस्तर सालची तर्तूद कोणते अर्थी कसी करावी, हें उगडून ल्याहावें. या पत्राचें उत्तर ये तोंपर्यंत ठाण्यांत अथवा आसपास आहोंत. उत्तर आल्यावर मग जे आज्ञा होईल त्याप्रों करूं. या प्रांतीं कांहीं बाकी राहिली नाहीं. अगोदर पर्जन्याची आफती, त्याजवर फौजांचें उपसर्ग जाले. याजमुळें अगदीं काम बुडालें. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. विस्तारें ल्याहावयास कांहीं सुचत नाहीं. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंती.

सेवेसी निलकंठ पिलदेव सां। नमस्कार. लि। धारें निवेदनांत येईल. ईश्वरें मोठे घोरांत घातलें आहे. निर्वाह होणें संकट आहे. असो. उपाय नाहीं. आपणाकडील सविस्तर ल्याहावें. लोभ करावा. हे विनंती.

पत्रांक १३७. श्रीगणेशायनमः १६९६ अधिक वैशाख शुद्ध ८

स्वस्ति श्रीमत्संवत् १८३१ श्रीमच्छकः १६९६ जयनाम्नि संवत्सरे उत्तरायणेर्के वसंतर्त्तौ मासोत्तमे प्रथम वैशाख शुद्ध ७ इंदुवासरे २६।४२ अदितिभे ३२।२० धृतौ योगे ५५।५८ वणिजकरणे तत्र मेषार्के गतांशाः ७ भोग्यांशाः २३ तत्र श्री सूर्योदयादिष्टकालः १७।३० तत्र समये कुलीरलग्नोदये श्रीमतां सवाईमाधवरायसंज्ञकानां प्रभुवर्याणां जन्मकुंडलीयम्



पत्रांक १३८.

पौ अधिक वा ४ शुक्रवार श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता अधिक शुद्ध १३ रविवासर मु‍ा नजीक सिंखेड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें खंडूबरोबर नवमीचीं पाठविलीं तीं काल मंदवारीं पावलीं. लिहिलें वर्तमान कळलें. श्रीमंत राजश्री सेनासाहेब सुभा यांस व भवानी शिवराम यांस पत्रें पाठविलीं तीं त्यांस दिल्हीं. उत्तरें पाठविलीं आहेत. पावतील. श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांस पुत्ररत्न जाहालें, ह्मणोन लिहिलें. त्यास, तुमच्या पत्रापूर्वीं तीन दिवस तोफखाने यांचा सांडणीस्वार पत्रें घेऊन आला. त्यावरून संतोषाचें वर्तमान आईकोन, निजामुद्दौले व सेनासाहेबसुभा व हरीपंत तात्या व सर्व सरदार आबालवृद्ध यांस संतोष जाहाला! तो पत्रीं लिहितां येत नाहीं! सरबत्ती व नौबतखाना सुरू करून शर्करा पृथक् पृथक् वांटल्या! ईश्वरें अमृतवृष्टी करून वंशावळी प्रफुल्लित केली! तशांत, भगवंतास प्रजेचें पालण आणि धर्मसंस्थापना कर्तव्य आहेच आहे हा निःसंदेह जाहाला! पुढें सर्वांचे मनोरथ सिद्धीस जातील, हे उमेद कुलवाद जाहाली! इकडील वर्तमान तरीः शहरपर्यंत मजलदरमजल नबाबसुद्धां आले. नबाबाचा मुकाम शहरासमीप जाहाला. वरकड फौजा चिखलठाणावर राहिल्या. दुसरे दिवशीं मुकाम नबाबामुळें सर्वांचे जाहाले. तिसरे दिवशीं राजश्री तात्यांनीं कूच करून फुलबारीवर गेले. सेनासाहेबसुभा यांचा मुकाम गवगव्यामुळें जाहाला. नबाबांनीं शहरीं सावकारांपासून पट्टी करून घ्यावयाकरितां मुकाम केले. तात्यांनीं फुलबारीवर मुकाम केला. सेनासाहेबसुभा कूच करून तात्यापाशीं आले.

नबाबही तिसरे दिवशीं आले. काल कूच सर्व फौजेचें तेथून जाहालें. आजेंही कूच जाहालें. मजलदरमजल योजिल्या कार्यास जात आहेत. परंतु श्रीमंत फार लांबले. गांठ कधीं पडत्ये तें पहावें. राजश्री आपाजीराव पाटणकर व वणगोजी नाईक व राजश्री नाईक निंबाळकर मध्यस्तीस श्रीमंतांकडून आले. तों उत्छाहाचें वर्तमान आलें. तेव्हां त्यांचें बोलणें निमे जाहालें. बहुधा वरपंग मध्यस्तीचा प्रकार, ऐसेंच दिसतें. समागमेंच आहेत. वरकड वर्तमान अधिकोत्तर ल्याहावें ऐसें नाहीं. बारशें जाहाल्यावर पेशवाईचीं वस्त्रें होतील. उपरांत फौजेंत यावयाचा मजकूर श्रीमंत राजश्री बापू व नाना यांचा होईल. उभयतां आल्यास आपलें येणें होईल. उभयतांचें येणें न झाल्यास एकटे बापूच आले तरी त्यांसीं येथील बंदोबस्त करून बोलोन घ्यावें. कामकाज होणें यथास्थित ममता करून दिल्ह्यास पुढें नीट पडेल. याजकरितां सूचना लिहिली आहे. राजश्री हरीपंत तात्या कृपाच करितात. प्रस्तुत यांचे फौजेंत रोजमरेयाचा गवगवा आहे. सवालक्ष देतात. परंतु यांचें कांहीं होत नाहीं. ऐसें आहे. बहुत काय लिहिणें? लोभ किजे. राजश्री नानाचें पत्र नगरचें आलें. सत्वरच येतील. हे आशिर्वाद. सरकारचीं पत्रें सेनासाहेबसुभा यांस नाहींत. हें काय तें ल्याहावें. हे आशिर्वाद.

पत्रांक १३९

पौ अधिक वा ४ शुक्रवार श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी दादा स्वामीचे शेवेसीं:—

पोष्य भवांनी शिवराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल अधिक शुद्धत्रयोदशी रविवार मुा नजीक सिखेड जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय यजमानसाहेबांच्या पत्रासह कळला. श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांसीं सप्तमी इंदुवासरीं पुत्ररत्न जाहलें, म्हणोन लिा. त्यास विद्यानगरीं एक वेळ सुवर्णवृष्टी जाहली! अह्मांवर वारंवार देव करितो हाच उल्हास आहे!! परवां गुरुवारीं राजश्री तात्यांस सदरहु वर्तमानाचें पत्र आलें. त्याजवरून श्रीमंत राजश्री नानासाहेबीं व नबाबांनीं व तात्यांनीं पृथक पृथक् नौबतखाने सुरू केले. तोफा, यंत्रें, सरबत्त्या केल्या. अंबारिया व नौबता गजस्कंधीं टाकून शर्करा वांटिल्या. नृत्यादि समारंभ, गजर उछाह जाहाले. संतोष अपरंपार जाहला! त्याचा तपशील काय लिहावा? कुलदीपक देवानें लाविला! आमचे साहेबांस आनंद अन्योन्य जाहला! देव त्यांस आयुष्य यथेष्ट करील! सर्वांचें जीवन


आहे. आह्मांस आधार बळकट जाहाला. आपण सर्व जाणतात. राजश्री नाना अद्याप आले नाहींत. उदयिक येणार. त्यांचे भेटीनंतर कळेल. येथूनही सविस्तर लेहूं. दरमजल नेमिल्या कामांस जात असों. कळावें. श्रीमंत राजश्री बापू व नाना यांसीं पत्रें लिहित होतों. परंतु राजश्री नानाजोशी येणार. त्यांची भेट होऊन त्या हातीं या अर्थी न लिहिलीं. आमचा साष्टांग नमस्कार सांगावा. सर्व प्रकारें या स्थळीं स्थापित आहों. आपण आमचा समाचार वारंवार घेत जावा. पदरचे असों. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक १४०

पौ अधिक वद्य ४ शुक्रवार. . श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

राजश्री बाबूराव विश्वनाथ वैद्य गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय कळला. मातुश्री गंगाबाई अधिक वैशाख शुद्ध ७ सप्तमी इंदुवारीं प्रसूत जाहाली. पुत्ररत्न जाहालें, ह्मणोन लिहिलें. त्यास गुरुवारीं प्रातःकाळीं हें संतोषाचें वर्तमान राजश्री हरी बल्लाळ यांजकडे आलें. श्रवण होतांच आनंद श्रुष्ट* भरून उरवरीत जाहाला. त्याचा तपशील काय लिहावा ? उछाव आज दोन तीन दिवस; नौबती, सरबत्ती, यंत्रांचा गजर, व शर्करा लष्करांत वांटिल्या. नबाब निजामुद्दौले आदिकरून समारंभ जाहाला. जगदात्मा कृपावंत होऊन कुलदीप उदय केला. त्यास आयुष्यवृद्धी करो ! सर्वांस आधार देवानें केला. जगन्निवास पुढें उत्तम उत्तमच करील ! येथून दरकूच कार्योद्देशास जात असों. राजश्री नानाजी कृष्ण अद्याप पावले नाहींत. उदयीक येणार. भेटीनंतर कळेल. रा छ १२ माहे सफर. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.



---

* सृष्टि व्यापून उरला.

पत्रांक १४१ श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

. आशिर्वाद उपरी. खंडू खिजमतगार यास इनाम पंचवीस रुा सरकारांतून दिल्हे. त्यास, वाटेनें गडबड. याजकरितां येथें आह्मांपाशीं दिल्हे आहेत. त्यास, यांस रुा २५ पंचविस तुह्मीं तेथें द्यावे. मिती अधिक शुद्ध १३, जय नाम संवत्सरे. हे आशिर्वाद.

पत्रांक १४२

पौ अधिक वा ४ शुक्रवार. श्रीशंकर. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसीं:—

पो कृष्णराव नारायण सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १२ सफर जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र तीर्थरूपांस पाठविलें तें पावोन लिखितार्थ कळों आला. श्रीमंत मातुश्री गंगाबाईस पुत्र जाहाला, ह्मणून लिा. त्यावरून संतोष जाहाला! त्याचा विस्तार कोठवर ल्याहावा? जगन्निवासें प्रजेचें पालण करणार उभे केले! आतां योजिलें कार्य थोडेच दिवसांत घडोन येईल! वरकड सविस्तर राजश्री लक्ष्मणपंतदाद यांनीं लिा आहे, त्यावरून कळों येईल. तीर्थरूप राजश्री नानासाहेब अद्यापि येथें येऊन पावले नाहींत. एक दोन रोजीं येतील. टोंक्यास आलियाची बातमी आली होती. सत्वरच येतील. राजश्री बापूंचा व नानांचा कागद राजश्री सेनासाहेबसुभा यांस आला नाहीं. पुत्र जाहालियाचें वर्तमान राजश्री हरीपंत तात्यांनीं सांगून पाा होतें व आपलें पत्रही आलें, त्यावरून त्यांसही फारच संतोष जाहाला. हाल्लीं उभयतांचीं पत्रें यजमानास पाा द्यावीं. वरकड राा दादांनीं लिा आहे, त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें? लोभ करीत जावा. हे विनंती.

स्वामीचे सेवेसीं पोष्य बाळाजी गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती. लिा वरून सविस्तर कळों येईल. आपलीं पत्रें येतात. परंतु माझें स्मरण पत्रीं होत नाहीं. सेवकास उमेद तों मोठी होती. परंतु पत्रींच विसर! तेथें वरकड गोष्टी कशा घडतील? मर्जीस आलियासीं कृपापत्रीं सांभाळ करीत जावा. सुज्ञांस विस्तार लिहिणें लागत नाहीं. बहुत काय लिहिणें? कृपेची वृद्धी करावी. हे विनंती.

सेवेसीं गणेश नारायण सां नमस्कार विनंती लिा परिसोन सेवकांचें विस्मरण नसावें. हे विनंती.

पत्रांक १४३

पौ अधिक वद्य ४ शुक्रवार. श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य जिवाजी माहादेव काणे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. आपणांकडील पत्रें बहुत लोकांस येतात. परंतु आमचें स्मरण होऊन पत्र येत नाहीं. याजवरून अपूर्व वाटलें; तुमचा आमचा स्नेह तैसा नाहीं जें विस्मरण पडावें. परंतु कालमहिमा आणि कारभारसंबंध याजमुळें विस्मरण जाहालें असेल! तरी ऐसें न करितां हरिघडी कृपापत्रीं संतोषवीत जावें. आमचें वर्तमान तागाईत छ १२ माहे सफर पावेतों सैन्यांत सुखरूप असों. स्मरण करून पत्र पाठवीत जावें. येथें लक्षुमणपंत आहेत; त्यांशीं बहुत स्नेह आहे. सर्व प्रकार तुह्मांकडील ल्याहावा. बहुत काय लिहिणें! हे विनंती.

पत्रांक १४४.

पौ अधिक वद्य ४ शुक्रवार श्री. १६९६ अधिक वैशाख शुद्ध अखेर.

यवतेश्वरी.

श्रीमंत राजश्री बाबूरावजी स्वामींचे सेवेसीं.—

पो महादाजी कृष्ण गोडबोले वास्तव्य जकातवाडी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री रघुनाथबावा श्रीं होते. तेथें अन्नशांतीमुळें दोन अडीच सहस्र ब्रह्मस्व जालें. याजमुळें तेथून निघोन वांईसही आले. तेथेंही कांहीं दिवस होते. परंतु ब्रह्मस्वपरिहार जाहला नाहीं. मग पुणियांत सतरा अठरा महिने तुळशीबागेंत आहेत. त्यास, हा दिवस उछाहाचा आहे. तरी श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांस निवेदन करून ब्रह्मस्वपरिहाराचें यश आपण घ्यावें. बावांची स्नानसंध्या उपोषणादिक आचरण कोणते प्रकारचें आहे तें सर्व आंपणांस विदितच आहे. तेथें विस्तार कां ल्याहावा? बहुत काय लिहिणें? लोभ असों दिला पाहिजे. हे विनंती.

पत्रांक १४५. श्रीशंकर. १६९६ ज्येष्ठ प्रारंभ.

यादी. ऐवज पोत्यापैकीं सरकारांतून घेतले. नांवें साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांस खर्चाबा. सुा अर्बा सबैन मया व अलफ माहे जिल्हेज उर्फ फाल्गुन.

जमा रु॥

५००० मि॥ वद्य नवमी रविवार प्रत जमखंडी गु॥ अवधूतराव गोधाजी दि॥ बाबूराव

३५०० मि॥ चैत्र शु॥ १ रविवार पुण्यास नारो आपाजीवर.

५०० मि॥ चैत्र शु॥ १ रविवार.

२५०० मि॥ चैत्र शु॥ १५ रविवार.

५८५० मि॥ चैत्र शु॥ १५ रविवार. चिठी पुण्यास नारोआपाजीवर.

१२५०० मि॥ चैत्र वद्य ४ गुरुवार.

३००० मि॥ वैशाख वद्य १ बुधवार. हस्तें...चिठी पुण्यास नारो आपाजीवर.

५५०० मि॥ वैशाख शुद्ध १० चिठ्या २ बऱ्हाणपुराहून आल्या.

- ३००० बाळाजी कृष्ण आठवले यांची.
- २५०० नांवें बाळाजी कृष्ण बाळंतविडे यांचेबा॥

———

५५००

खर्च रु॥

५००० देणें मादराव घोरपडे दि॥ सेनासाहेबसुभा यांनीं चिठी केली. लष्करांतून चिरंजीव तात्यानें मि॥ वद्य ९ रविवार. त्याच तर्फेचे गृहस्थ रंगो रुद्र घोरपडे.

३५०० मि॥ चैत्र शु॥ १ रविवार.

- २५०० देणें जोगोजी यादव शु॥ १.
- १००० देणें सदो

———

३५००

५०० देणें गोविंदजी नाईक जासूद मि॥ शु॥ १

१२५०० देणें निंबाजी नाईक माईणकर मि॥ वद्य ४ चैत्र गु॥ भवानीसींग पुर्व्या दि॥ नाईक मा॥र.

३००० आदम शादीखान पनीसौदागर यांनीं नवनीत खानपनी यास देविले ते दिल्हे मि॥ वैशाख वद्य ११

५५०० वैशाख शु॥ १० चिठ्या दोन देणें बाळाजी कृष्ण.

- ३००० देणें बाबूराव यांचें खासगींत खर्चाबा॥
- २५०० बाळंत विडा याचें सामान

———

५५००

पत्रांक १४६ श्री १६९६ भाद्रपद

यादी. सरकारचे जाबसाल राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांजपासून करार करून घ्यावयाचे. सुा खमस सबैन मया व अलफ.

सरकारचे नजरेचा ऐवज रुा
७५०००१ ऐन सरकार
१००००० राजश्री सखाराम भगवंत
१००००० राजश्री बाळाजी जनार्दन
५०००० हरी बल्लाळ.

१०००००१

दहालक्ष एक रुपया करार केला असे. सालमजकुरीं फौजेचा पेंच भारी. याजकरितां पेस्तर सालापासून दरसाल दोन लक्ष रुा· मार्गशीर्ष शुा १ पुण्यास पोतीं करीत जावें. पांच वर्षांत झाडा करून द्यावा. येणेंप्रों करार.

बालापूर व वासीमचें कापड दरसाल सरकारांत द्यावें, ऐसा करार पेशजीं जाहला आहे. त्यापासोन राहिलें असेल तें सालमजकुर दसरियास पुण्यास पावतें करावें. पुढें दरसाल देत जावें: येणेंप्रमाणें करार.

नवाब निजामअलीखांबाहादर याजकडील माहालांत तुह्मांकडील घांसदाण्याचा उपद्रव फार लागतो. याचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. त्यास तुह्मीं आपला मातबर माणूस आह्मां समागमें द्यावा. नबाबाकडील कारभारी येतील. सरकारांतून मामूल पाहून तह करून देऊं त्याप्रों ऐवज घ्यावा. जाजती उपद्रव देऊं नये. येणेंप्रों.

पेशजीं थेऊरचे मुक्कामीं ऐवजाचा करार आहे. त्यापैकीं वसूल पडोन बाकी ऐवज राहिला असेल तो झाडोन दसरियास पुण्यास पावता करावा येणेंप्रों.

सरकारचे महाल गंगथडी वगैरे कुल आहेत. त्यास सालमजकूरपासोन घांसदाणा घेऊं नये, उपद्रव लाऊं नये—येणेंप्रों.

पाा बालापुराकडे सरकारचा बाकी ऐवज येणें. त्याचें पत्र तुमचें सरकारांत आहे. त्याप्रों ऐवज सालमजकूर दसरियास पुण्यांत पावता करावा येणेंप्रों.

सरकारच्या लक्षाशिवाय दुसरें लक्ष शपतपूर्वक धरूं नये. प्रयोजन लागल्यास आपणांस बलाऊं पा. त्या समईं फौजसुद्धां येत जावें. येणेंप्रों.

बंगाल्याचें कापड दरसाल सरकारांत येत जावें. येणेंप्रों.

सदरहू आठ कलमें करार करून दिल्हीं असेत. याप्रों निभाऊन देऊं. येणेंप्रों करार.

पत्रांक १४७ श्री. (नकल) १६९६ श्रावण वद्य १०

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन घायगुडे यांसीं:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुह्मांकडील सरंजामाचे माहालांतून राजश्री मुधोजी भोंसले व हैदर नाईक व गोविंदराव गायकवाड यांजकडे वगैरे फितुरी जागां शिलेदार वगैरे चाकरीस गेले असतील. त्यांची गांवगन्नावर चौकशी करून, घरें व वतनें ठिकाणीं लाऊन, जप्त करणें. व त्यांचे माणसांकडून त्यांस कागद लिहून ते घरीं लवकर येत तें करणें. व आणखी शिलेदार तुमचे तालुक्यांत राहत असतील. त्यांणीं फितुरी सरदारांकडे चाकरीस जाऊं नये येविशी त्यांस गांवचे पाटील कुळकर्णी जामीन घेणें. ह्मणोन तुह्मीं आपले कमावीसदार यांस माहालोमाहालीं पत्रें लिहून बंदोबस्त करणें. जाणिजे. छ २३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें ! लेखनसीमा.

पत्रांक १४८ श्री (नकल) १६९६ भाद्रपद शुद्ध २

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसीं:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. सरंजामी फौजेची तयारी जलदीनें करून निघोन भाद्रपद शुद्धांत हुजूर येऊन दाखल होणें, ह्मणोन पेशजीं पत्रें सादर जालींच आहेत. त्याप्रमाणें तुह्मीं सिद्धता करून निघालाच असाल. त्यास, तुह्मीं कधीं निघालां तें लिहून पाठवणें. आणि दरमजल माहादेवाचे सुमारें येऊन मुकाम करून राहणें. जाणिजे. छ १ रजब. बहुत काय लिहिणें ! लेखनसीमा.

पत्रांक १४९ श्री. १६९६ भाद्रपद वद्य ६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसीं:—

पोष्य बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १९ रजब पावेतों यथास्थित असे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. राजश्री दीपाजीराव येरूणकर यांनीं आह्मांस जुने लोकांचें बोलणें ऐकून, मजकूर लिहिला. त्याजवरून आपल्यास येविशीं-

चा मजकूर काल लिहून पाठविलाच आहे. तरी, तुह्मीं येविशींचा मजकूर ध्यानांत आणून बंदोबस्त करावा, ह्मणोन लिहिलें. त्यांनीं लिहिल्यावरूनच लिहिलें आहे. दुसरा प्रकार कांहींच नाहीं. नामजाद लोकांचा भरणा किल्यावर बराच आहे. आपण जाऊन बंदोबस्त केला. उत्तम आहे. आपल्या लिहिल्यावरून खातरजमा जाली. नाहींतर दिपाजीरायांचे लिहिल्यावरून संशयांत पडलों होतों. गुंता उरकला. येविशीं दीपाजीरायास लिहितों. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दिजे. हे विनंती.

पत्रांक १५० श्री १६९६ भाद्रपद वद्य ८

राजश्री दिपाजीराव येरूणकर हवालदार किल्ले पुरंधर यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो बाळाजी जनार्दन आशीर्वाद विनंति उपरी येथील कुशल ता छ २१ रजब पर्येत जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुह्मी जुने लोक खासगींतले कामकाज आइकत नाहींत, आणि मनास येईल तशीं भाषणें बोलतात, येविशींचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. येविशींचा मजकूर बंदोबस्त करावयाविशीं राजश्री नारोपंत नाना यांस लिहिलें होतें. त्याजवरून ते किल्ले मजकुरीं येऊन तुमचा व त्यांचा बंदोबस्त केलाच आहे. हजिरी रोजचे रोज यथास्थित होत नाहीं. यास्तव दोहों दरवाजांस दोघे कारकून ठेऊन आल्या गेल्याचा झाडा तुमचे व खानगी पेहरनगीनें होत जाईल. त्याप्रमाणें संध्याकाळीं रोजचे रोज कळत जाईल. याप्रों केल्यास लोकांचा बंदोबस्त सहजच होईल. तरी, राजश्री नारोपंत नाना बंदोबस्त करून देतील, त्याप्रमाणें वर्तणुकेंत आणावें. तेथील कदीम लोकांपेक्षां हुजूर नामजादी लोकांचा भरणा फार आहे. मग चिंता काय ? बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक १५१ श्री (नकल) १६९६ भाद्रपद वद्य ९

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामींचे सेवेशीं

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता छ २२ माहे रजब पावेतों यथास्थित आहे. विशेष पत्र पाठविलें तें पावलें. किल्ले पुरंधर येथील बंदोबस्ताचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. रा दिपाजीराव येरूणकर यांचें पत्र पाठविलें तें येऊन पावलें. * तुह्मीं तेथें जाऊन बंदोबस्त केलांत, उत्तम गोष्ट झाली. गुंता उरकला. तुमचे तर्फेनें यंदा हरएक कामाबद्दल कोण प्रस्तुत आहे ? महिपतराव तों अद्याप आले नाहींत. लष्करांत गेलियावर सदैव पत्र पाठवित जावें. बहुत काय लिहिणें ? लोभ असों द्यावा. हे विनंती.

---

* येथपासून खाशांचें अक्षर.

पत्रांक १५२ श्री १६९६ भाद्रपद वद्य ९

तीर्थस्वरूप राजश्री कृष्णरावजी वडिलांचे सेवेसीः—

अपत्यें बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता छ २२ रजब जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित ठकार आश्रित दिा हुजरात यांचे उभयतां चिरंजीवांची तैनात सालाची सालांत देवावी, ह्मणोन पेशजी आपणास सरकारांतून पत्र असतां, सालगुदस्त'सन अर्बासबैनचे तैनातेचा ऐवज अद्यापी यांस पावला नाहीं. ऐशास यांचा साल गुदस्ता ऐवज राहिला असेल तो देवावा व पुढें सालाचे सालांत यांचा ऐवज देत जावा. यांजकडील दरमहाच्या चिठ्या साल गुाच्या पानसुपारी वगैरे व कापड आंख राहिले असतील त्या देवाव्या. लोभ* करावा. हे विनंति.

पत्रांक १५३ श्री (नकल) १६९६ भाद्रपद वद्य १४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव बाबा स्वामीचे सेवेसीः—

पोष्य हरी बल्लाळ सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल तागायत छ २७ रजब जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण घरास जाऊन फिरोन पुरंदरास आलां ह्मणोन ऐकिलें. त्यास फौजेची तयारी केलीच असेल. आपणांस येथें लवकर पाठवावें ह्मणोन श्रीमंत उभयतांस पत्र लिहिलें आहे. तरी आपण पत्र पावतांच निघोन येथें यावें. इकडील वर्तमान श्रीमंतांस लिहितों, त्यावरून कळत असेल. श्रीमंत तापीतीरीं आहेत. उतरावयाची तजवीज होत आहे. सारें कर्म दगाबाजीचें आहे. तुह्मी येथें अशा दिवसांत असावें, यास्तव सारीं कामें एकीकडे ठेऊन जरूर यावें. फौज जमा जाहाली नसली तर मागाहून चिरंजीव घेऊन येतील. आपण लवकर यावें. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक १५४ श्री १६९६ माघ.

सेवेसीं नारो आपाजी सां नमस्कार विज्ञापना.

मुधोजी भो यांजकडील देवाजीपंतांचें पत्र आलें त्याचा मजकूर समजला. नबाबाचा पोख्त मनसबा खराच ! परंतु प्रास्त काळास ठीक नव्हेसा वाटतो. नबाब गुंतले तरी आपणच गुंतले असें आहे. चहूंकडे चार मनसबे वाढले. हा आणखी एक होतो. तेव्हां खर्चाचा ताण चहूंकडील. व फौजेच्या खर्चाचा पेंच; व साष्टीची मसलत, व कर्नाटकांत फौज आणखी गेली पाहिजे; व

---

* येथून हस्ताक्षर नानाफडणिसाचें.

पुरंदरीं फौज पाहिजे; पुणियांत पांचशें राऊत पाहिजेत. चहूंकडून खर्चाची मोडणी! वरातांची वगैरे पाहतां फारच आहे. त्याहून आणखी वाढते. याजकरितां मर्जीस आलें तरी देवाजीपंताच्या पत्राच्या नकला करून नबाबाकडेच पाठवाव्या आणि त्यांसच ल्याहावें. आपण पोक्त मनसबा ह्मणतात याप्रों करावयाचा ठीकच आहे. परंतु थोरला मनसबा श्रीमंताकडे. सारी फौज तिकडे गुंतली व आपण हिकडे गुंतले, तेव्हां हैदर नाईकानें फार लबाडी केली. त्याचें पारिपत्य जालें पाहिजे व स्वदेशीं फौज असली पाहिजे. आपणाकडेही फौज आलीच पाहिजे. तूर्त मर्जीस येईल तरी आपण त्यांस आणऊन, मुधोजी भोंसले यांनीं चांद्यासच राहावें, रघोजी भोंसले यांजवळ राहूं नये. रघोजी भोंसले व दर्याबाई यांनीं नागपुरीं राहून तहाप्रों वर्तावें. असें त्यांचे माथां भार ठेऊन केल्यानें प्राप्त काळास ठीक पडलेंसें वाटतें. पुढें कांहीं बदमामली दिसल्यास, फिरोन गोष्ट सांगावयास काय आहे! करितां येईल. परंतु यासमयीं मसलत न वाढे तो प्रकार राजश्री कृष्णराव यांस लेहून दिला तरी बरासा वाटतो. नबाब तिकडे गेले, त्यापक्षीं त्यांस हेच गोष्टी बोलणें त्याच्या स्वरूपास योग्य. परंतु पुढें मागें पाहतां चहूंकडून शत्रु उठले, नबाब न गुंतेत तरी बरें. मला सुचला मजकूर लिहिला आहे. स्वामी विचार करून करणें तें करतीलच. सेवक लोकीं असलेली गोष्ट विनंति करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. सलूख करणें तो नवाबाचेच हातें व्हावा. ह्मणजे गुंता पडणार नाहीं. हे विज्ञापना. राजश्री कृष्णराऊ तेथून निघाले आहेत. जवळ आले असिले तरी भेटून त्यांची रवानगी व्हावी. ह्मणजे नवाबास वाईट न वाटतां कारस्थानीनें मनसबा न वाढे आणि भोंसला आपले पदरीं पडे, असें जाल्यास बरेंच आहे. कांहीं नजरहि होईल. पैका नसल्यास नजरेचे ऐवजीं मुलूख देईल. तूर्त बखेडा मोडेल. स्वामीस उचित वाटेल तें करण्यांत येईल. सुचला अर्थ लिा आहे. हे विज्ञापना.

पत्रांक १५५ श्री. १६९६ माघ शुद्ध ९

सेवेसीं नारो आनंदराव सां नमस्कार विज्ञापना ता छ ८ जिल्हेज मुा नजीक बडोदें यथास्थित असे. विशेष. स्वामींचें आज्ञापत्र छ १४ जिल्कादचें आलें. त्या पत्रीं आज्ञा कीं " तीर्थस्वरूप तिकडे आले. त्यांचे पाठीवर राजश्री हरी बल्लाळ व शिंदे होळकर मातबर फौजेनशीं आले आहेत. त्यांस तुह्मी हरीपंतास लेहून पाठऊन तिकडून फौज आणून भडोच व सुरतेची बंदी करणें. टोपीकरास ताण जरूर देणें. सरकारचा अमल च्यार दिवस न चालल्यास कामास येईल. पुढें सर्व समजोन घेतलें जाईल ". ह्मणोन आज्ञा जाहाली. त्यास, श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोद्यास आले. त्यांचे पाठीवर हरिपंत येतांच श्रीमंत मह्रीपार गेले, आह्मीं रेवा उतरोन फत्तेसिंगराव

गायकवाडसुद्धां हरीपंतांस भेटलों. श्रीमंतांचा तहाचा मजकूर करारांत आलियावर सुरतेस जाऊन आज्ञेप्रो बंदोबस्त, करितों. तूर्त सुरतेचे बंदोबस्तास राजश्री बाळाजी खंडेराव पुरंदरे व बळवंतराव धोंडदेव व शंकराजी लक्ष्मण पुरंदरे पाठविले आहेत. राजश्री बहिरो रघुनाथ व गणेश हरी निा सरसुभा तापीतीरीं सुरतेनजीक आहेत. त्यास बंदीविशीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांच्यानें बंदोबस्त होईल तितका करितील. श्रीमंत दादासाहेबाकडील जाबसालाचा फडशा होय तोंपर्यंत तिकडे जातां येत नाहीं व राजश्री हरीपंतहि निरोप देत नाहींत. लवकरच फडशांत येईल. सलुखावर घातलें असे. मागाहून सविस्तर वर्तमान सेवेसी लेहून पाठऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक १५६. श्री. १६९६ माघ—फाल्गुन.

सेवेसी नारो आपाजी सां नमस्कार विज्ञापना. विसाजी कृष्ण यांस तूर्त महिनाभर आणूं नये. खालें आहेत त्याप्रों असों द्यावे. परंतु, त्यास निक्षून पत्र असावें कीं, तुह्मी परशीकाजवळ जाऊन सारे फौजेनिशीं राहाणें, कलण्या (कल्याण) कडून पराशिकापावेतों पातळ उतळ राऊत तलाव्यास पाठवीत जाणें, कल्याणास एकंदर न राहणें. या प्रों परिच्छिन्न ल्याहावें. हें त्यांच्यानें होत नसल्यास मग दुसरे पत्रीं काय आज्ञा करणें ते करावी. कर्नाटकांत पाठविणें जरूर असिल्यास तसेंहि करावें. विसाजी केशव व सर.... आपाजी हरी व शिवाजी विठल यांस निक्षुण पत्रें पाठवावीं. चौदाशें माणुस आवघें साष्टीच्या बेटांत येशवंतगडसुधां इंग्रेजांचें आहे. तुह्मांजवळहि भरणा बराच आहे. याउपरी हर तरतूद करून इंग्रेजांस पेंच पडे, बेटांत लोक उतरून ठरेत, अशी तरतूद होत नाहीं, हें ठीक नव्हे. हेटघारे लोकांस इंग्रेज काय करितो ! आंतील आंत खायास व पाणी पायच्या माणसांस उपड आहे असें असोन कडव्या माणसांवांचून होतच नाहीं ह्मणऊन लिहितां ! तरी गनिमी तऱ्हेनेंहि आंत राहीन ह्मटल्यास त्यास सहजच पडेल ते तरतूद करून लेहून पाठवणें. ह्मणऊन पत्रें लेहून पाठवावीं.

पत्रांक १५७. श्री. १६९६ फाल्गुन शुद्ध १२.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—विनंति सेवक बाजी गंगाधर मुा बेलापुर चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना तागाईत छ १० माहे मोहरम पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें व तालुके मजकुराचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल रविवारीं संध्याकाळीं राजश्री रणछोड शेणवी वकील सरकाराचे मुंबईस होते ते येथें आले. कारण

श्रीमंत दादासाहेबीं सुरतेहून सनद मुंबईस पाठविली कीं, लक्षुमण गोपाळ यांस वकिली सांगितली आहे, त्यांजपासोन कामकाज घ्यावें आणि रणछोड शेणवी यांस सुरतेस रवाना करणें. हें वर्तमान मारनिल्हेचे इष्टमेस्र मोस्टीन यांणीं सांगितलें. त्याजवरोन हे तेथून चंद्रगमनी होऊन होडीस पांच शा देऊं करोन आले. होडीवाले यानें साष्टीचे खाडींत अलिकडे मौजे वसी ता मजकूर याचे नस्तावर चिखलांत उतरोन होडी निघोन गेली. तेथें चौकी सरकारची आहे. त्यांणीं बराबर शिपाई देऊन येथें रवाना केलें. ते प्रहर रात्रीस आवशीचे पावले. त्यांणीं तोंडी मजकूर सांगितला कीं, श्रीमंत दादासाहेब सुरतेस आहेत. इंग्रजानें जागा राहावयास माहामुदी बागांत दिल्हा आहे. श्रीमंत अमृतरावजी बराबर आहेत. नाटकशाळा आठजणी व पंचवीस च्याळीस पावेतों खिजमतगार वगैरे आहेत. इंग्रजानें आपले लोक जवळ ठेविले आहेत. सर्व साहित्य त्याजकडूनच होत आहे. मुंबईहून राजश्री सदाशीवपंत सौनी व नारोपंत गेले ते श्रीमंताजवळ आहेत. कारभार प्रस्तुत नारोपंत करितात. सुर्तेचे जफ्तीस सरकारचे राऊत हजार बाराशें होते. त्यांस दादासाहेबीं दोन वेळ सनदा सादर केले व निदानीं सांगोन पाठविलें कीं, उठोन जाणें, नाहींतर खासा स्वारी होईल! त्याजवरोन बंदीचे लोक पांच कोस माघारे सरले. इंग्रजांची उमेद तीन हजार गाडदी वगैरे लढाईचा सरंजाम घेऊन, रा गोविंदराव गायकवाड व खंडेराव गो यांजकडोन पो बडोर्दे आधीं सर करोन, गोविंदरायास द्यावें, नंतर अमदाबाज घ्यावी. भडोजेस गाइकवाडाची तक्षीम निमें आहे ती इंग्रजास बक्षीस द्यावी आणि मोबदला गाइकवाडास बडोदे पो ऐवज सरकार तर्फेचा द्यावा. राजश्री हरीपंत तात्यांचे फौजेबराबर लढाई घेऊन श्रीमंतांस देशीं पुणेयास आणावें. इतके जालियावर इंग्रजांस सुरतेची चौथाई बक्षीस द्यावी. सुरत-अठाविशी, वसई, बेलापूर देखील द्यावें. याजप्रों करार मदार उभयपक्षीं होऊन शिक्के देखील झाले. इंग्रजानें बंदर किनाऱ्याचे तालुकदारांस व धुळपास दादासाहेबांच्या सनदा आणावयाविशीं मुजरत फतेमारी गेली आहे. सनदा आल्या ह्मणजे ज्याच्या नांवच्या येतील तिकडे पाठवाव्या. कोण सनद मानितो, कोण मानीत नाहीं, हें पहावें. प्रस्तुत, दादासाहेब ह्मणजे मोठा किमया इंग्रजांचें हातीं सांपडला आहे. दुसरें दैवत नाहीं. ऐसा प्रकार मुंबईस जाला आहे. सुर्तेहून फतेमारी मुंबईस दोहोंरोजां येत्ये. दादासाहेबांचें पत्र मुंबईस जनरलास आलें कीं पुर्णेकर सावकार मुछदी यांचा ऐवज मुंबईस आहे तो जप्त करणें, जाऊं न देणें. याप्रों पत्र आलें आहे! इंग्रजांस प्रस्तुत स्वर्ग ठेंगणा जाला आहे. वरकड मुंबईत आज पांचशें मांणूस व साष्टी टांपूत आठ नवशें, उरणास दिडशें पर्यंत आहे. आणि हिकडून कोणी त्याजवर जात नाहीं. याजमुळें फार टिका करितात. असा प्रसंग! मुंबईस लोकांची भरती नाहीं, ऐसें घडलें नाहीं.

तिजोरी जामदारखान्यामध्यें आज पंचवीस हजार रुा पाहिजेत तरी नाहींत. धुळपाचें अरमाराची मोठी सलावत इंग्रेजावर आहे, परंतु तोहि अरमार सुद्धां येत नाहीं. दबोन राहिला आहे. याजमुळें इंग्रज फारच हांवभरित जाला आहे. बंगाली व चिनई व विलायती व बसराई मिळोन दाहा अकरा तरांडीं ताल्चिरीस नागखाडेयास आहेत. वर माल बहुत आहे. हलावें यासाठीं खोटी आहे. मुंबईस गुराबा व रेवा दोन तरांडीं मुंबईपैकीं आहेत. परंतु याचा भरंवसा धरीत नाहीं. धुळपाची सलाबत मोठी गालीब आहे! तिसरें तरांडें विलायती येणार आहे. तें आलेंयाजवर मग यावे, ऐसा करार जाला आहे. प्रस्तुत धुळप हिकडे नाहीं त्या अन्वयें तिकडेच त्या तरांडेंयाजवर सख्ती करून गळीं पडला तर मोठें काम होईल. इंग्रजांस तितकी दहशत आहे. याजकरितां सरकारांतोन धुळपाकडे कोणी शाहाणा माणूस व पत्रें जावोन, त्यास बक्षिस देऊं करोन सुवर्णदुर्ग वगैरे तालुकेयाचें आरमार एकत्र करून, त्या तरांडेंयांजवर जावें अथवा मुंबईस यावें, लूट माफ करावी, शहर लुटोन फन्ना करवावें. याप्रों जालेयास इंग्रजांचा गर्व परिहार होईल. इंग्रेज ह्मणतो कीं, सर्वांचा ऐवज मुंबईस आहे, यामुळें आह्मांवर सकती कोणी करणार नाहींत. याप्रों बोलतात, ह्मणोन रणछोड शेणवी सांगतात. याजवरोन विनंति लिा आहे. मारानिल्हेचें मानस स्वामीचे भेटीस यावयाचें बहूत आहे. आज्ञा होईल त्याप्रों वर्तणूक करितील. कित्तेक मजकूर स्वमुखें विनंति करणार आहेत. सरकार उपयोगीं आहेत. आज्ञेप्रमाणें वर्ततील. श्रीमंतांस मुंबईस आणावें हें मानस इंग्रजांचें नाहीं. दुसरा मजकूरः सावकारी वर्तमान रा गोविंदराव गो व खंडेराव गो दोन्ही राजश्री हरीपंत तात्यांकडे रुजू झाले. हे असल्यास इंग्रजाच्यानें कांहीं होत नाहीं. फजित पडतो. साष्टी तालुका घेतला. पुढेंही मनसबा कित्तेक करितो. हा विचार मेस्त्र मोस्टीन याचे व दुसरे दोन कोशलदार यांचे विचारास येत नाहीं, परंतु सरकार काम! आणि साष्टीचें यश आलें. याजमुळें उपाय नाहीं, ऐसें ह्मणतात. सदरहु विनंति मानिल्हेचे जबानीवरून सेवेसीं लिा आहे. रणछोड शेणवी यास हुजूर आणावयाचें असल्यास, राजश्री विसाजी कृष्ण यांस आज्ञापत्र असावें. ह्मणजे घोडे व तट्टू देऊन रवाना करितील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक १५८ श्री. १६९६ फाल्गुन शुद्ध १३

सेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. फिंगोजी व भवानी वोतुरकर सिंपी वस्ती पेठ पुरंधर हे पुरंधरास अटकेस होते, त्यांस पुण्यास पाठविले आहेत, तरी या दोघांचा शिरच्छेद करून लिहून पाठवणें ह्मणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें फिंगोजी व भवानी सिंपी

यांचा शिरच्छेद केला. रा छ ११ मोहरम सुा खमस सबैन मया व अलफ. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक १५९ श्री. १६९६ फाल्गुन वद्य १०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री जनार्दनपंत दादा स्वामीचे सेवेसी:—

पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता छ २३ मोहरम मुा खेड जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. नारोपंत नानास कैलासवास जालियाचें वर्तमान ऐकून श्रम जाहले, ते ईश्वर जाणे. एकाएकींच गोष्ट अशी घडली! ईश्वरीसत्तेस इलाज नाहीं! आम्हांस तर वडील होते. व राज्यांत माणूस एक! अशा व्यक्ती दृष्टीस पडावयाच्या नाहींत. ईश्वरीसत्तेस इलाज नाहीं. हीच गोष्ट खरी. त्यांचे मागें आपण आहेत. लहान मोठ्यांचा परामर्ष करावा. खेद करूं नये. होणार गोष्ट ती चुकत नाहीं. आह्मी नानाप्रों आपल्यास मानितों. त्यांचा लोभ आमचे ठाईं कसा होता, तो तुम्हांस ठाऊक आहे. तदन्वयें करून आपण लोभ करून समाचार घेत जावा. इकडील वर्तमान तर: श्रीमंत इंग्रजांकडील सरंजाम घेऊन खंबाइतास आले आहेत. उभयतां गायकवाड आह्मांस येऊन भेटणार. तोहि प्रकार अद्यापि घडला नाहीं! दोन चार रोजांत कोणता अर्थ तो निवडेल. लिहून पाठऊं. तिकडील वृत्त लिहित जावें. बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे. हे विनंती.

राजश्री सदाशीवपंतदादा स्वामीस सां नमस्कार विनंती. उपरी. फार दिवस पत्र येत नाहीं. ही गोष्ट तुह्मांपासून दूर असावी. नानाचें वर्तमान ऐकिल्यापासून चैन पडत नाहीं. श्रीसत्तेस इलाज काय? सदैव पत्रीं समाचार येत जावा. लोभ कीजे हे विनंती.

राजश्री तात्यांस सां नमस्कार विनंती. उपरी; लिा परिसोन लोभ कीजे हे विनंती.

पत्रांक १६०. श्री. १६९७ चैत्र वद्य ६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री आबा स्वामींचे सेवेसीं:—

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार, विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. तुह्मीं छ २७ मोहोरमचीं पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं:—

आरमाराकडे गल्ला नेमिला' त्यापौ कांहीं पोंचत नाहीं, मामलेदार तपशील सांगतात, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, तुमचे लिहिल्या पूर्वींचे सरकारचे खिजमतगार व पत्रें भाताचे वसुलास पाठविले असेत. या उपरी नेमणुकेप्रों गल्ला पोहोंचेल. कलम १

देवगड तालुकियापौ सरदार चौतीस आहेत, त्यापौ निमे तालुके मजकुरीं ठेवावे, निमे दुसरे तालुकियांस नेमावे, ह्मणोन लिहिलें तें कळलें.

उत्तम आहे. करावें. कलम १.

गंगाधर गोविंद यांणीं गलबत नारळाचें धरून आणिलें ह्मणून लिहिलें तें कळलें. कलम १.

इंग्रजांचे कागद पेटींत घालून पाठविले ते पोहचले व चित्रें पावलीं कलम १.

गोंवेकर फिरंगीयांचें गलबत आणिलें आहे, येविशीं त्याचें पत्र आलें आहे, त्यास तहाचा ठराव कसा जाला आहे, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास, तहनाम्याची नकलच अगोदर तुह्मांकडे पाठविली आहे त्यावरून कळेल. तेथें लिहिलें असेल त्याप्रों पाहून लेहून पाठवावें. कलम १.

सर्व तालुकदारांस व आरमारांस तहनाम्याप्रों सांगून......जिवाजी विश्राम भेटीस येणार ह्मणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. सरळपणें येत असल्यास भेट घ्यावी. कलम १.

बाबूराव साळेकर याचा मजकूर तुह्मीं लिहिला तो कळला. ऐशियास मारनिले यांणीं किल्ले विजयदुर्ग येथें गंगाधर गोविंद यांजवळ चाकरी एकटेयांनीं करून वेतन नेमणुकें प्रों रत्नागिरीं लाऊन घ्यावें. अरमाराकडे त्याची नेमणुक नाहीं. कलम १.

एकूण कलमें सात लिहिल्याप्रों करावें. राजश्री हरबाजीराव धुळप आरमारसुधां स्वारीस गेले होते, डंगी धरून आरमारसुधां आले, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास, डंगीवरील माल फरोख्त करऊन आरमाराकडील तोडमोडीस लाऊन, व अडसेरीचे बेगमीस गल्ला घेऊन अडसेरीस देऊन, आरमार सुवर्णदुर्गास पाठवावें. रा छ २० सफर बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती. पो छ २८ सफर.

पत्रांक १६१. श्री. १६९७ वैशाख शुद्ध ६

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंग गायकवाड दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल सदैव पत्रीं लेखन करून संतोषवीत असावें. विशेष. आपणाकडून पत्रें आह्मांस व साहित्याविशीं पत्रें अमदाबादकर ग्रहस्त व पित्रव्यास येत गेलीं तीं त्यांजकडे पावती करीत गेलों. साहित्याचा प्रकार आजपर्यंत प्रथम दिवस! त्यापैकीं आह्मीं कारकिर्दी-

ममतेनें पित्रव्याचे मुख्य पुत्र चिरंजीव राजश्री मल्हारराव गायकवाड आह्मांकडे आणिलें. तेव्हां अधिक शुद्ध द्वितीया-तृतीयांचीं युद्धें दोन जाहलीं. त्याज अलिकडे युद्धप्रसंग आजपर्यंत जाला, नाहीं. आह्मीं बडोदें, खेड, पाटण प्रांतांचीं ठाणीं कायम करून, आपले लेख धैर्याविशीं येतात, त्याजवर दिवस काढितों. पुढें दिवस निघावयाचें संकट. हें पूर्वी व हालींचें वर्तमान राजश्री दादासाहेबाकडील वगैरे, सविस्तर राजश्री बाळाजी नाईक भिडे यांचे पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरोन कळों येईल. सारांश, मुरवीपणाचा सर्वस्वीं भरंवसा आपला आहे. त्याजवर असूं. विशेष ल्याहावेसें नाहीं. आपणाकडील साकल्यार्थ लिहून संतोषवृत्ती करावी. रा॥ छ ४ माहे सवाल. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंती-मोर्तबसूद.

श्री

श्रीमार्तंड चरणीं तत्पर
दमाजी सुत सयाजीराव
गायकवाड समशेर
बहादर निरंतर

पत्रांक १६२ श्री. १६९७ जेष्ठ वद्य १

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव दादाजी गोसावी यांसीः

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा सीत सबैन मया व अलफ. चिकोडीकर देसाई यांचा ठराव हुजूर रा आपाजी श्यामजी यांचे विद्यमानें होईल. ठाणीं वगैरे राजश्री पांडुरंगराव गोविंद यांचे स्वाधीन लवकर करण्याविषयीं तुह्मांस पत्र पेशजीं गेलें आहे. त्याप्रमाणें हालीं ठाणीं वगैरे मशारनिल्हेचे स्वाधीन हुजरून खिजमतगार पाठविले आहेत यांचे गुजारतीनें करून हुजूर लेहून सत्वर पाठविणें. दिरंग लाविल्यास परिच्छिन्न कार्यास येणार नाहीं. ठाण्यांत गोळी वाजविल्यास फौजेचा वगैरे पैका तुह्मांपासून सरकारांत भरून घेतला जाईल. हें स्पष्ट समजोन, ठाणीं वगैरे स्वाधीन करणें. जाणिजे. छ २२ रावल. आज्ञाप्रमाण. लेखनसीमा. पौ छ १५ राखर जेष्ठमास, सुा सीतसबैन.

पत्रांक १६३ श्री. १६९७ श्रावण वद्य १०

पौ छ २८ जाखर श्रावण वद्य आमावास्या मंदवार सीत सबैन. १४

जीशांद बुलंद मकांने पंडित अजम माधव राउज्यूं दवांमश फकतहूं:—

आबुबाज बहज्यत व कामरांनीं असावाब मुशिरथ व शादमानी हमबारा वररुए रोजगार मुशाफिक मेहरुबान सराफलुत्फ नली एहसान मज्या मैशीफात सितूद हसाफत कुशादा व अमदाबाद अजिंदील एखलास हानराव्येल उइलिम हार्नबी इस्कोयर प्रजिदेंत गोवर्नदोर जनराल जजीरे मुंबई बादजशरे शौक कींमा फौक बरामुतसवीर नेस्त मशाहुदराय शफकत पैराय आंकीं. आं शौकत पन्हांहि मफाविजां ईबलाग फर्माविला तो अजदस्त आं शौकत पन्हांचे नौकर भिकाजीपंत रसीद होऊन लिहिला मजमून आयां जाहला. आं हिशमत पन्हांहि तस्तीर केलें कीं, अमारत पन्हां अजम सखाराम भगवंत यांचे नांवें रसीद जाहलें. त्याची नकल आं शौकत पन्हांहि इंजानेंबांकडेस पाठविली आहे, आणि आं शौकत पन्हांहि आपले तमाम सरदारांसही हूकूम कलमी सादर केली आहे कीं, इंग्रजाचे अहशामाशीं जंग अगर ईजा दरपेश न आणावी. तर बेहत्तर असे. आं हिशमत पन्हांचें नौकर मारनिले भिकाजीपंत यांहीं आंहिशामत पन्हांचें नांवें इंजानेबास जाहीर केलें कीं सदरहू आं हिशामत पन्हांची हुकूम आपले सरदारांस सादर जाली आहे. ती पंडित अजम रघुनाथ राऊ पेशवे यांसीं व त्यांस जे तमाम मुस्तफिक आहे त्याजशिही तालुक ठेविते कीं, मशारनिले आं हिशामत पन्हांचें सरदारांहिं त्याचे फौजेसीं व त्याचे तमामदरी मुकदमीयांत मुतफिक आहेत यांजशींहि जंगदर पेश आणूं नये व तसदी देऊं नये. तर हे बात वाजीब आहे. सबब कीं, मोजुनइल्लेहि पंडित अजम रघुनाथराऊ पेशवे इंजानबाचे इफाजतेंत आहेत. अजहाल जैसें आहे तैसे कुलबजा राहील, ऐसाच आं शौकत पन्हाचा इरादा व मतलब आहे, ह्मणोन अजरुए यकीन. आं हिशामत पन्हांचे नौकर मारनिले भिकाजीपंत यांहीं इंजानेबास जाहीर केलें. तर इंजानेबाचें मजकूज खातीरहि तैसेंच असे. बिनाबरा इंजानेबाकडील अहशामाचें सरदार यांस लाजीम व वाजीब. तैसीं हुकूम इंजानेबीं सादर केली आहे. व दरख्वास्त करितों कीं, आं हिशामत पन्हांचे हुकुमाची मुताबियत अमलांत येई ऐशी आं शौकत पन्हांही खबरदारी फर्मावावी. तेव्हां इंजानेबांचा हुकूमहि जेथपावेतों करारदाद अमलांत येईतवलग बजजे एहसान मुताबियतींत येईल जिआदा. बजुज शोकचे! मुतशव्यांशवब्द. आयाम बकामबाद. . रा छ २१ शोहर जमादिसांनीं. हे किताबती.

पत्रांक १६४ श्री (नकल) १६९८ अश्विन वद्य ५

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन गोसावी यांसी:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा सबा सबैन मया व अलफ.

कोंकणांत गांवखेडीं भरलीं आहेत. त्यास, तुमचे लष्करींचे लोक उपद्रव लावतील, लुटतील, जाळतील व भातें आणून चारितील, तेव्हां बाकी राहणार नाहीं. सरकारची मोठी नुकसानी होईल. कोंकणांतील किल्लेकोटाचा खर्च भारी. त्यांचे बेगमीचा ऐवज कोंकणाचाच. कोंकण खराब जाल्यानें ऐवज हुजुरून पाठवावा असें होईल. त्यास, ओढीमुळें हुजुरून बेगमी होण्याचा अर्थ समजतच आहे. तेव्हां, किल्याकोटाच्या बेगमीवांचून गळाठा होईल. याजकरितां कोंकणास काडीमात्र उपद्रव लागों न देतां, आबाद राखिलें पाहिजे. ऐशियास, तुह्मीं आपले फौजेस वरचेवरीं निक्षून ताकीद करून, रयतेस व रयतेच्या घरादारांस, शेताभातास किमपी तोषीस लागों न देणें. जे हरामखोर तोतियास मिळाले असतील, त्यांचें पारपत्य केल्यास, पैका घेतल्यास, चिंता नाहीं. तसें आढळल्यास करणें. वरकड रयत गरीब व कोंकण ह्मणजे केवळ सरकारचा खजाना. त्यास उपसर्ग लागलियानें सरकारनुकसान फार आहे. दुसरें, फौज लूट करील, तत्रापि रोजमुरा सोडणार नाहीं. याजकरितां काडीमात्र उपद्रव न लागे असा पक्का बंदोबस्त करणें. रखवाली करवीत जाणें. ऐसें करितां जो ताकीदीस न ऐके, त्याचें पारिपत्य करावयाची मुरवत न धरणें. जाणिजे. छ १७ रमजान बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक १६५ श्री. १६९७ कार्तिक शुद्ध १२ नंतर

.... तीन पत्रें आपलीं वरचेवर आलीं. तेथें राजश्री.....सेनासाहेबसुभा यांनीं जलदी करून आपले फौजेंत यावें. श्रीमंत नेमल्या स्थळास येतात. उभयतां सरदार समागमें आहेत. चिंता नाहीं. परंतु श्रीमंताची बुध शास्वत नाहीं. याजकरितां जलदीनें यावें. व राजश्री हरीपंततात्यांचींही पत्रें एका रोजाचे अंतरानें याजप्रकारें येत गेलीं. तेव्हां राजश्री सेनासाहेबसुभा यांजकडे दररोज जावें. कारभारी यांसीं बोलावें. कारभारी यांणीं उत्तर करावें कीं, ऐवज तयार जाहला, करितों, निघतों. तें प्रमाण वाटावें. जेव्हां राजश्री सेनाधुरंधर व महमद इसफ, सात हजार फौज तीन हजार गारदी व तोफा चार घेऊन, अलजपुरींहून निघाले ते नागपुरावर चाल धरून वीस कोस अलीकडे आले. नागपूर पन्नास कोस राहिलें. त्यांनीं जुने फौजेची समजावीस काढून नवी फौज आणीक मेळवून आले. तेव्हां येथें गलबल फारच जाहली. मसलत ठहरली कीं, राजश्री सेनासाहेबसुभा यांनीं डेरादाखल व्हावे. पुढें अस्त. मुहूर्तही नाहीं. याकरितां, छ १० रमजानीं डेरेदाखल जाहले. तों डेरे मात्र उभे करून सारवान, फरास, खास चौकीचे गारदी, खिजमतगार यांपैकीं दोनसें मनुष्य व पंचवीस जासूद आणि खांसा त्या माणसांत रोजमुरा नाहीं. मारेकरी यांचे बजिन्नस कागदच पेशजीं सांपडले.

घरचा फंद! कोणाचा प्रकार कैसा, हे कसें समजावें. गांवांतच मारेकरी असलियास कैसें वोळखावें? खांसा, तर, हवेलींतून बाहेर आले आणि दशा, तर, या प्रकारची! पांच राऊत डेऱ्याजवळ कोणाचे उतरत नाहीं. तेव्हां भास ऐसा जाहला कीं, हा फंद सर्वांचा एक जाहला. काम नासेल. तेव्हां कारभारी राजश्री भवानी काळो व भवानी शिवराम यांजला हें काय, ऐसें पुसिलें. त्यांनीं सांगितलें कीं, दों वर्षांचा गळाठा, लोकांस पोटास नाहीं, नागपुरांत वाणी उच्यापत देतात त्यावर लोक आहेत, बाहेर निघाल्यास पैका घेतल्याखेरीज एक समागमें येणार नाहीं, पैका तर दिसेना. तेव्हां सरदारी बुडाली हें परिछिन्न वाटलें. कारभारी यांनीं तों साफ सांगितलें कीं, ऐवज नाहीं, सावकार बुडाले, रयत बुडाली. यजमानाजवळ खासगत दौलतीपैकीं वीस लाख रुपयाचें सोनें व रुपें होतें. तें कुल कारभारी यांनीं, अलजपुरावर गुदस्तां रावसाहेबांचें वर्तमान आलें त्या गर्दींत लोकांनीं गवगवा केला, त्या संधींत कुल ऐवज भरतीस घातला. तेव्हां ओला होऊन घांट चढले. पुढें राजश्री मामांच्या यांच्या भेटी जाहल्या. ते समईं मुलखांतहि पैसा घेतला व सरकारांतूनहि खर्चास मिळालें. त्यामुळें ते दिवस गेले. हालीं तों खासापासीं एक रुपाया नाहीं. पुढें उपाय काय? सेनाधुरंधर तों दरमजल अमजेरास तीन कोसांचा तफावत राहिला. येथें, तर, तरतूद नाहीं. शहरांत गर्दी जाहली. उमज पडेनासा जाहला. कारभारीयांचे व यजमानांचे आंत आंत पाहिलें तर परस्परें विक्षेप. याचें कारण मनास आणितां, दौलतीचा नाश जाहला. आजपावेतों सवा करोड रुपये रोकड व मुलूख दाहा हजार फौजेस दों वर्षांत खर्च जाहला. व सात लक्षाचें कापड. चाळीस हत्ती, दोनसें घोडे खासे इतका वसूल लोकांस पावोन, पांच पांचसें माणसांचा एकच गोंधळ! धरनी! उपास! कारभारी यांनीं एका दिवसा आड जेवणें. धन्यास दोन प्रहर रात्रीस अन्न मिळावें. खासे यांची ही दशा! कारखाने घोडीं उपाशीं! दाम नाहीं. हत्ती बारा पंधरा ते दोन दोन मुछदी यांनीं रतीब द्यावा. उंट दाण्याविना तीन चारसें मेलें. ऐसें वर्तमान मुख्यांनीं सांगितलें. तें आईकवलें नाहीं. तेव्हां विनंती केली कीं, हा इतल्ला कैसा दिला नाहीं? याचें उत्तर केलें कीं, पठाण दोन हजार व मराठे ऐसे आपले मलईत मेळऊन त्या लोकांनीं रामरामास येऊं नये, सलाम करूं नये, समागमें चालूं नये. कांहीं विषादानें बोलतात. ते कुल मिळोन धरणें बैसावें. उपास पाडावे. तेव्हां खुशामत करावी. ह्मणतील तें आईकावें, तेव्हां उठावें. करारमदार करून घ्यावें. लोकांच्या बोल्या पांच पांच हजार जातीचे मनमानेशा आपल्या यादी खासगत करून द्याव्या. जितका हरामखोर सरदार फंदी तितका आपले आंगीं लाऊन घेऊन खावंद जरबेंत असावा. पैका त्यास द्यावा तेव्हां उपाय काय? देणें घेणें त्याचेच स्वाधीन. कांहीं बोलावे, तर दिवस नाहींत. कैसेंहि करून. परंतु, एक वेळ मसलत

सिद्धीस जाऊ, या अर्थी तेंहि सोसिलें. परंतु, नागपुरीं अडीच महिने जाहले मामलत अगर कोणताही इतल्ला खावंदास नाहीं. ऐवज कोठील करावा ? आणि कोणास द्यावा ? हा इतल्ला नाहीं. हिशेब मात्र एक मास जाला ह्मणजे दप्तरदारास यादी दाखऊन जमाखर्च ल्याहावा. हे चाल आज दोन वर्षे आहे. मामा व तात्याचे विद्यमानें पांच लाख रुपये बराणपूरपर्यंत रोजमरा पावला. त्यांपैकीं नाना जोशी याचें विद्यमानें पंधरा हजार रुपये मात्र ठाऊक ! वरकड दाखला देण्याचा नाहीं. सवा लक्ष रुपये दरमहा येत असतां, दाणा घोड्यास नाहीं. उंटें मेलीं ! चार रोज तीन रोज मुदबक नाहीं ! नाना जोशी यांचे घरीं जेवणें. अगर तात्याकडे गेलों, तर तेथें जेवणें. चौं रोजा आड मुदबक व्हावा. हें वर्तमान आईकोन मुस्ताक जाहलों. सवा करोड रुपये बारा हजार फौजेस दोन वरसांत वसूल असतां, हा गजब ! तेव्हां यजमानांचें सर्व आइकून कारभारी यांस पुसिलें. त्यांनीं विजातीय कांहीं सांगितलें. तें पत्रीं काय ल्याहावें ? यजमानाच्या बोलण्यास दाखला पडत चालला. तेव्हां खातरजमा जाहली. पुढें सेनाधुरंधर आमजेरावर आले. लोक डेऱ्याजवळ एक नाहीं ! खाविंद एकला ! याची तजवीज कारमारी उभयतांस पुसिली. तरी उभयतां एकांत एक नाहींत. रा भवानी काळो याजकडे फौजेची समजाविसी लोकांची हजिरी हिशेब पांच सात वर्षांचा आला. ते लोक मातब्बर. बोल्या करून भवानी शिवराम यांनीं आपणाकडे आले त्यास पैका द्यावा. भवानी काळो याजकडे यादव, पांढरे वगैरे यांस पैका न द्यावा. तेव्हां कूल सरदारांची झोड. श्रावणमासाच्या दक्षणेसारखी दोन रुपये अधिक तिकडे ब्राह्मणांनीं जावें ! हे चाल दोन वरसें चालत आली. रा भवानी काळो यांस तगीर करावे, आपल्या कामांत यांनीं न बोलावें, हें केलें. घरीं बसविलें. तेव्हां राजश्री सेनासाहेबसुभा यांस बोलणें प्राप्त झालें. कोणचि राहिलें नाहीं. पुढें संदेह. न जाणों काय होतें ! एक यादव मात्र यांचे पक्षीं राहिले. तेव्हां राजश्री सेनासाहेबसुभा यांनीं संमंध, एका बाणदारांचें जमातदारास कामावर न घालतां बिडी घातली इतका संमंध, लाऊन आपल्या जिवावर आलें. पोटकरारी करावी. मरावें ? पागोटें टाकिलें. मोठा त्रास केला. हें आयकोन धांवोन गेलों. समाधान केलें तों भवानी शिवराम याचे गार्दी व लोक मिळाले. हें वर्तमान आलें तेव्हां मारनिले यास घरास लाऊन दिल्हें. भवानी शिवराम याचें बिनसलें. तेव्हां आह्मी व राजश्री नानाजोशी ऐसे राजश्री दिवाकरपंत दादा यांच्या घरास गेलों. त्यांसीं भाषण केलें.त्यांनीं मागाहून कथा सांगितली कीं, मीं नागपुरीं असतां मजला चारसें लोक पाठवून गेले. मामांचा व यांचा युद्धाचा समय ते वेळेस पोहोंचलों. मामांची व यांची भेट केली. पुढें मामांनीं कांहीं खुणेच्या गोष्टी सांगितल्या. त्या आधारावर मामाजवळ जाऊन राहिलों. सेनासाहेबसुभा रघोजी बावास जाहला

असतां, कटेश्वरीं गंगातिरीं मामांनीं गंगेचें उदक गंगेंत बसोन राजश्री साबाजी बावाच्या हातीं घातलें कीं, सेनासाहेबसुभा तुह्मांस दिला, ऐसें इमान देऊन मग मसलतेच्या रीतीनें भवानी शिवराम व जिवाजीपंत फडणीस व दिवाकरपंत यांस सांगितलें कीं, दर्याबाई मुलास घेऊन जात होती ते मोठ्या प्रेत्नें रा॥ त्रिंबकरावपंत वर्तक व पत्रें पाठऊन आणिली. तिणें यादी पाठविली होती. ते करार करून दिल्ही. तेव्हां ते आली. नाहीं तर इंदुरावर गेली होती. नागपुरास जाती. तेव्हां, मागून कुटुंबाकरितां तुह्मी जा-ल, याकरितां यादी करार करून दिल्ही आहे. परंतु आतां मोठ्या खिडक्या दरवाजे ठेविले आहेत. तूर्त शिक्केकटार पंधरा दिवस मात्र ठेवा. साबाजी भों नाना ऐसें चिठींत लिहीन. मागूं नका. सेनासाहेब सुभा रघोजीबावास लिहीन. हा सिद्धांत मामांनीं व दिवाकरपंतांनीं करून, सेनासाहेबसुभा यांस व भवानी शिवराम यांस सांगितलें. आणि सांगितलें कीं, तुह्मीं बाईकडे जात जावें, रतिमात्र चूक पडली ह्मणजे नवाब व आह्मीं मिळाल्यास इजला गा-रत करून देईन! तों बाईकडील पत्रेंहि मामांस सांपडलीं. रा॥ शिवराम वि-ठ्ठल यांजकडे संचार बाईनीं धरिला. तो त्यांनीं सांगितला. बाईवर चौक्या! सेवट मूल आणि बाई संभर रावतांनसीं डेऱ्याजवळ आपल्या असावी, हा करार जाहला. बाईस उमजलें कीं, मी यांची आज्ञा न मानिली ह्मणजे हे यादींतून निघतात आणि गारत करितात. त्यावर राजश्री हरीपंत तात्या आले. हें कच्चें वर्तमान तात्यांस व रुकुनुद्दौले व जाबितजंग यांस मामांनीं सांगितलें. सेवट श्री पंढरीच्या देवालयांत बाईनीं मामास शपथेनें गोंवावें ऐशी संधी घडवून, भाऊबहीण हें नातें लाऊन, देवासमक्ष ह्मणूं लागली कीं, यादी ख-री ऐसें वचन द्यावें. तेव्हां मामांनीं साफ सांगितलें कीं, रघूजीबावा जानोजी बावाचे पोटचा नाहीं, तुजला पुत्र नानाचाच खरा. ऐसें विशादयुक्त भापण केलें तेव्हां बाईस निराशा जाहली. तेव्हां आपली गत पुसली कीं, माझा वाली कोण? तेव्हां मामांनीं उत्तर केलें कीं, साबाजीबावा अवज्ञा करील तरी करूं देणार नाहीं. हें वर्तमान डेऱ्यास येऊन तात्यापाशीं सांगितलें. व रुकुनुद्दौले व जाबितजंग यांजपाशींहि सांगितलें कीं, देवाजवळ मजला बाईनीं गांठिलें होतें, त्यास साफ सांगितलें, बाई उमजली. दंगा करील, जाईल, याजकरि-तां मोंगलाजवळ पिछाडीस उतरविली. तमाम फौजेच्या हजिऱ्या राजश्री त्रिं-बकपंतास व फडणवीस सचंत्र ठेऊन घेतल्या. त्याचे कारकून बेइतल्ला केले. बाईस उमजलें कीं, आतां नानासाहेबांसच धरिल्यानें वांचल्यें. तेव्हां सरदार व कारकून राजकारणास लागले. त्या दिवसांत आह्मींहि बोध करून ठीक करावें ऐसें होतें. त्यास, मामा एका दिवसाकरितां उतावळी करून गेले. दगा पावले. दुसरे रोजीं सर्व सरदार व नवाब एक करून श्रीमंतास दोन मजली जाऊं न द्यावें, हें जाबितजंग व आपण जिद करीत असतां, आपणावर

तुफानें ! शिक्केकटार मागितली. सेनासाहेबसुभा रघोजीबावास देणार ऐशीं पत्रें पुरंदरास लटकीं पाठविलीं व तात्यास सांगितलें, मुधोजीबावाचें व श्रीमंताचें सूत्र. ऐशीं तुफानें घेऊन, केला श्रम त्यास, श्रीहरी व चार मातबर रास्ते आदिकरून यांस ठाऊक आहे. जाबितजंगास घेऊन आलों. एक मास निर्मलेकडे मजला लागला. मामांनीं सांगितलें कीं, हे मसलत राजश्री बापूची आहे. मीच बापू आहें. भेद नाहीं. मजविशीं पुरंदरास लिहिलेंहि असेल. ऐसे श्रम केले असतां, मामा जातांच आपले राहुटींत बसलों. पंधरा रोज पाहिलें तों तुफान करून कैद करितात. तेव्हां राजश्री बापूकडे पत्र पाठविलें. बापूंनीं व नानांनीं हरीपंतास लिहिलें कीं, मसलतेंतून दिवाकरपंतास न टाकणें. आणि मजला पत्र आलें त्यांत आज्ञा कीं, हरीपंताकडे जात जाणें. तेहि बोलावितील. तेव्हां, तीं पत्रें प्रतिष्ठेस प्राणास आश्रय जाहला. राजश्री नाना जोशी आले. त्यांचें दर्शन जाहलें. तें पुर्ते वाकीफ जाहलें. आमचें समाधान केलें. तों हरीपंतावर बाईचे मसलतेचें जड पडलें. पुरंधरचीं पत्रें आलियावर तात्यांनीं पदर पसरिला कीं, चूक जाहली. नाहक तुह्मांवर आरोप केला. भवानी शिवराम पायां पडले कीं, चूक जाहली. ईश्वर आह्मीं सोडिला. इतकें आतां माफ करावें. पुढें चुकणार नाहीं. तेव्हां तात्याकडे जाणें सुरू केलें. बाईचा कारभार. तीस लक्ष रुपये तलब बाईची द्यावी. पुढें बाईस सरंजाम द्यावा. या पेंचांत दौलत गारत. फौज सेनाधुरंधर याची हणमंतराव घाटगे वगैरे यांचें जथ पडणार. तेव्हां या तोडमोडींत राहून, सेवट, बाईचे बुद्धीनें बाई लुटली गेली. तीस लाख तलब देणें. याजला ते वांचली. खंडेराव दरेकर व आपाजीराव पाटणकर बाईचे मध्यस्तींत असतां, बाई चुकतां गारत जाहली. सेवट, अबरु वांचली. तात्यांनीं तह केला. बाईस एक किल्ला द्यावा. वरकड साबाजीबावास पागा, हत्ती, सिलेखाना द्यावा. हा तह केला. दिवाकरपंतांनीं बाईकडून सेनासाहेबसुभा यास करारप्रों मिळावें, ऐसें साधन राखावें, हें तात्यांनीं करून; भवानी शिवराम याचे कामांत तिडण न करावी, जें जाहलें तें जाहलें. हे इमानांत चुकले, आतां याजविशीं शपथ मजशीं करावी, कारभार यानें करावा, वडिलपणें आपण सल्लामसलत देत जावी, हें तात्यांनीं करून; निरोप दिल्हा. दिवाकरपंतांनीं आक्षेप केला कीं, पुरंधरास जाऊन उभयतां बापू व नाना यांच्या भेटी मीं घेऊन येतों. तेव्हां सेनासाहेबसुभा यांनीं आक्षेप फार केला, आणि तात्यांनीं समाधान केलें. बहुमान केला असतां हे पुरंधराकडे पाहतात हें दिसलें. याकरितां यासमागमें वराडांत आलों. पंचवीस दिवस बाईकडे जाणें. बाईचें व नानाचें प्रेम निस्सीम जाहलें. एक जागा जेवावें. नानाचें कसें विचारावें. फारच ममता. मागील लुटणें दुःख सर्व विसरलें. बाईनीं तात्यास पत्र लिहिलें कीं, माझी खातरजमा नानांनीं केली. यांनीं लिहिलें कीं, बाई माझी जाहली, आतां तूट

जन्मभर पडत नाहीं. हें नाना जोशी यांचे प्रत्ययास आणून दिल्हें. नानास नेऊन सर्व दाखविलें. बाईनें फौजेच्या समजाविशीं नुपर पडली तर पैका द्यावा, किल्ले द्यावे, नाना साहेबांचें सर्व साहित्य करावें. हे पुत्र ती आई, हें पंचवीस रोजांत जाहलें. हें पाहतांच, मागती काय जाहलें, नकळे, बाईकडे मी जाऊं नये, आणि बाईचा क्षोभ. मन मानें तें बोलों लागली. तेव्हां शोध मनास आणितां कारभारी यास हें असह्य जाहलें. बाईचें व नानासाहेबांचें एक, आणि जवळ मी, हे मसलतेंत असतां मीं राहणार नाहीं याकरितां यजमानास कळों येत नाहीं, ऐसें दर्शविलें व बाईस अनेक प्रकारें दर्शविलें, जर हे बाईकडून जातील, तर आपण बाईपासून चौरोजांत किल्ले घेईन. यजमानानीं नानास पुसिलें. त्यांनींहि संमत दिलें. हें वर्तमान आपणास कळलें, तेव्हां आम्ही तिकडील वस्त सोडून उगेच राहिलों. ऐसें दिवाकरपंतांनीं कित्तेक प्रकारें कारभारी यांच्या चुक्या सांगितल्या. त्या पत्रीं कोठपर्यंत ल्याहाव्या ? दिवाकरपंतानीं मसलत नासिली. नीट करावी, ते कारभारी यांनीं ह्मणावें कीं, हें मीं अगोदरच केलें होतें. तेव्हां आपण व्रत धरिलें, नाना जोशी यांचे घरीं बसावें. आपणाकडे नानाचीं पत्रें गेलीं, तर मी नानापाशी आहें, ऐसें आपणास ल्याहावें. याचें कारण कीं विरस न दाखवितां बापूची व नानाची भेट घ्यावी. मामाचे मसलतींत श्रम फार केले आळा घातला. साबाजीबावाचें व मामाचें नीट करून दिल्हें. भवानी शिवराम यास कारभारांतून काढावें, हें मामास सेनासाहेबसुभा यांनीं सांगितलें. मामानींहि मान्य केलें. त्याप्रों भवानी शिवराम यास तगीर करावें. तेव्हां मींच मामाशीं अट धरिली कीं भवानीपंत माझा पुत्र होय. त्यास कारभारांतून काढिल्यास मी करणार नाहीं, व तुम्हांजवळहि राहणार नाहीं. ऐसें कित्तेक प्रकारें मामास विनंती करून राहिलों. याचें कारण कीं एक वेळ पुरंधरास जावें, उभयतांची भेट घ्यावी, ते आज्ञा करितील त्याप्रों वर्तणूक करावी, ऐसें कथन दिवाकरपंतानीं बहुतच सांगितलें. कोठपर्यंत ल्यहावें? तेव्हां आम्ही व नानानीं बहुता प्रकारें सागितलें कीं, सेनाधुरंधर आमजेरास आले, येथें समजोत कोणतीहि नाहीं. या समयीं तुम्ही चित्त घालावें. त्यास उत्तर केलें कीं विठलपंतास वराडांत ठेवावें. आधीं तुह्मीच नागपुरास जाऊं नये. ऐसें यजमानास बहुता प्रकारें सांगितलें. आठ रोज नाना तुह्मांस घेऊन सर्व सरदारांच्या घरास फिरलों. सर्वांस सांगोन अलजपुरावर रहावें, हे मसलत केली. तुह्मीं पाहिली. ते विचारास न आली. तेव्हां विठलपंतास ठेवावें ऐसें केलें. समई मसलत सांगावी ते आइकूं नये. तेव्हां आतां आह्मीं तों श्रीहरीचें चिंतन करीत बसलों. तात्यास सोडिल्यापासून कांहीं इतला कामाचा आपणास नाहीं. आणि आतां काय ह्मणतां ? त्यास आह्मीं येथें आलों. त्या दिवसापासून द्रीष्टीनेंहि पाहिलें. हे कोणत्याहि कामांत नाहींत. आणि तुह्मीं उभयतांस पुरंधरास पत्रें लिहिलीं.

त्यांत उभयतां कारभारी एकत्र आहेत. ऐसें कैसियावरोन लिहिलेंत? व आपलीं पत्रें दिवाकरपंतास दोन तीन आलीं कीं, सेनासाहेबसुभा यास घेऊन सत्वर फौजेंत यावें. त्यावरून दिवाकरपंत नाना जोशी यासीं ह्मणों लागले कीं, तुह्मीं उभयतांस काय लिहिलें, ते आह्मांस ऐसीं पत्रें लिहितात, तेव्हां आह्मीं येथें कारभार करितों, आणि त्यानें लिहिलेप्रों आमच्यानें घडत नाहीं, हें लिहिणें तुमचें उचित नाहीं, आतां मीं उभयतांस पत्रें लिहून आपली प्रथम जोडी पाठवीन. हें आमचे समक्ष भाषण जाहलें. शहरचे लोक व शिपाई व रयत-सावकार, वाड्यांतील बायका, सर्वांचा एकच प्रकार कीं, दौलत, जर दिवाकरपंत कारभार करितात तर, निभत्ये हें पाहोन व समय पाहोन आह्मीं फारच निकड केली कीं, आपण, बापू व नानापर्यंत हें जात, ऐसें करावें. तेव्हां भवानीपंतासच पुढें करून, सावकारांच्या घरोघर जाऊन, आठ रोज मोठा श्रम तीन तीन प्रहर रात्रपर्यंत आह्मांसुद्धां घेऊन बसावें. कामाची व बोलण्याची व जलदीची हातवटी पाहिली. सावकार मामलेदार राजी. पूर्वीं कारभार केला. त्यास आपले विद्यमानेंच कर्ज कोणाचा एक रुपाया सरकारांत बुडों न दिल्हा. हें सर्वांकरवीं आह्मांसी भाषण करविलें. आणि आमचे दृष्टोत्पत्तीस आणून दिल्हें. आठा रोजांत दाहा लाख रुपये ऐवज, कांहीं मुछदी व कांहीं सावकार व रयत व॰ कटकची मामलत ऐसा ऐवज, नवीच कल्पना करून ठरविला. आणि आतां फौजेस देऊन निघणार. यजमानाचा बेत कीं, कैसेंहि करून यांस फसवून कामांत आणावें. हें आह्मांसी भाषण व दिवाकरपंतांसही भाषण बहुत नम्रतेनें काकळूत करून करितात कीं, तुह्मी चित्तावर घेत नाहीं तर, माझा प्राण वांचत नाहीं. मीं पूर्वीं सर्व प्रकारें चुकलों. ऐसें शंभर वेळ यजमानानें म्हटलें. परंतु दिवाकरपंतांची एकच जिद कीं पुरंधरास बापूनानाकडे जाऊं. ते आज्ञा करितील तैसें करीन. तेव्हां आम्ही यजमानाच्या मर्जीकरितां बोलिलों कीं, उभयतांचीं पत्रें येथें आणवितों. आणि पत्रेंही वरचेवर तुह्मांस येत आहेत. परंतु यांचा बेत कीं, रुबरू जावें. श्रम कोणाचे केले हें सर्व विनंती करीन, रुजवात सर्वांची व तात्यांची करीन. यजमान व आह्मी त्रासलों ऐकत नाहींत, पत्रें आलीं तरी रुबरू जाऊन मग करीन. तेव्हां याला बाहेर तरी काढा, हें मात्र केलें. आतां ऐवजावर चिठ्या करून निघावें. सेनाधुरंधराचा नेट बसतां, विठ्ठलपंत तात्याजवळ होते, ते बोलाविले. ते व हे मिळून पंधरा हजार जमा होतील. महमद इसफ व इस्माइलखान व सेनाधुरंधर यांणीं गारद तोफा मोगल जाहालें. हे गनीम याकरितां रुकुनूद्दौले यांस पत्रें जावीं कीं, वराडास सुभा इस्माईलखानास तगीर करून दुसरा केला असेल तर तो जावा, नसेल तरी खानानें फंदास सोबत देऊं नये, अगर जाबितजंग वराडास पाठवावा. जाबितजंग व हे एक जाहाले ह्मणजे अलजपुरचें खूळ तुटतें. जाबितजंग वराडांत

जरूर जरूर यावा; नाहींतर मोंगल गनीमीची लढाई, नागपूर मजबूत नाहीं, शहर गालत होईल, किंवा न जाणो कैसें होईल. सेनासाहेबसुभा यांचा निश्चय शपथपूर्वक कीं, सेनाधुरंधर यांसीं लढाई हत्तीवर बसोन घेईन! हें संकट सर्वांस वाटतें. हे हत्तीवर बसोन त्याजवर जाणार. ते तों मोंगली सामान यांत पाटणकर, निंबाळकर वगैरे मोठमोठे सरदार काळजी करतात कीं, तोफा गारद येथें नाहीं, आहे त्याचें साहित्य नाहीं. हें कसें होईल? याकरितां जाबितजंग जरूर पाहिजे. व आपणही सेनासाहेबसुभा यास वडिलपणें ल्याहावें कीं, आपणास रक्षून शत्रूस मारावें. हेंही जरूर ल्याहावें. वरकड येथें संचार फंद यजमान अगर कोणी याचे एक लक्ष श्रीमंत राजश्री पंतप्रधान येथील दैवत. दुसरा अर्थ नाहीं. आवांतरी आमचे संकटीं आवांतर उत्पन्न जाहला, ऐसें नित्य ह्मणत असतात. दुसरा अर्थच घडणार नाहीं. हे निशा पक्की आहे. श्रीमंतांनीं रोकड वीस लाख पाठविली. घबी याजला श्रम! पैका नाहीं! हे दिवस परंतु पाहणार नाहींत. वस्ताद मसलत समयास जाऊन सांगणार. आणि यजमानच एकनिष्ठ हे खातरजमा. दिवाकरपंत कायवंग्मनसा बापूनानाचा नायब. हे बोलतात. करणीहि पाहतों. एकदां उभयतांस पहावें हाच मानस आहे, हेंहि निशा जाहली. एक भवानी शिवराम याची व धन्याची चित्त शुद्ध नाहीं. हें त्यांसही उमजलें आहे. आपलें आचरण आपणांस कळतें. आचरणच ऐसें दिसलें कीं, यजमान फार जाल! फार फार अंगेज केली. नाहींतर एक दिवस निभों नये. ऐशी चाल पाहिली. यांतून न जाणों काय निघतें? सर्वदा लक्ष आश्रय लोकांचा मोंगलांकडून कोठेंहि जोरानें कारभार असावा. ऐसें साधन चाल रीत आहे. ते एकदां सर्व आपल्याजवळ येतात. दरमियान सेनाधुरंधर मात्र आले. हा गुंत आहे. हे दरमियान नसते तर, न बोलावितां तात्याकडे जाऊन, तेथून शंभर पन्नासानिसीं पुरंधरास जावें, हे येथील मर्जी आहे. यांत सेनाधुरंधर याचा योग पाहावा, कैसा घडतो व लढाई कैसी होती. आतां युद्धाचाच प्रकार दिसतो. हें वीस कोस असतां टाळा देतां नये. टाळा दिला तर नागपूर शहर गारद होतें. किल्ला एक गडीं नाहीं. आस्रा, मंडलें किंवा निर्मळ दुसरा आस्रा नाहीं. कबिले समागमें घ्यावे, सरंजाम टाकावा, ऐसें संकट आहे. ज्याबितजंग मात्र असावे, अगर जे आज्ञा येईल तैसें करतील. कच्चें वर्तमान लिहिलें आहे. कित्येक आंतील बाहेरील अर्थ मी भेटेन तर सर्व निवेदन करीन. सर्व प्रकारें सेनासाहेबसुभा यांस लक्ष आपलें आहे. आपली आज्ञा तेंच मान्य, ऐसें आहे. येविसीची खातरजमा जाहली. पत्राचें उत्तर सत्वर येणें. बहुत काय लिहिणें? कृपा लोभ करावा, हे विनंति.

पत्रांक १६६ श्री माहालक्षुमी. १६९७ मार्गशीर्ष शुद्ध २

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १०२ मन्मथ नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति स्वामी याणीं वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदासिव—दीक्षित ठकार यांसि आज्ञा केली ऐसीजे. तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें हुजूर प्रविष्ट जाहलें. आपण श्रींचे दर्शनास करवीरास येणार, येविसीं आज्ञापत्र सादर व्हावें, म्हणून विनंतिपत्रीं लिहिलें, तें विदित जालें. श्रीचे दर्शनास हर कोण्यास येणेविसीं लडा काये आहे ? तुह्मी येणार, तरी सुखरूप येऊन, श्रीचें दर्शन घेऊन, जाणें. जाणिजे. निदेश समक्ष.

समत मंत्री.
बार सुरु सुद
समत सुद बार.

मर्यादेयं
विराजते.

पत्रांक १६७ श्री मोरेश्वर. १६९७ मार्गशीर्ष वद्य १२

विनंती उपरी. मेस्तर हेष्टन यांजकडून बंगाल्यांतून वकील कर्नेल आपटेन कलकत्ताहून श्रीमंताकडे पुरंदरास जावया निमित्त आले. दोघे मुख्य आहेत. बरोबर तीन अंबाऱ्या, व रिकामे वोझ्याचे वगैरे हत्ती नव, एकूण बारा हत्ती, व फिरंगी पांच सातसें पर्यंत, व चार शंभर आहेत, व नेहमीं वोझीं शंभर, व हजीर बेगारीची तीस, व उंटें तटें वगैरे खडदूर शेंपन्नास आहे. सुरतेकडील इंगेरजाचा व श्रीमंताचा सलूख करून द्यावा, या अर्थी आला. बरोबर श्रीमंताकडील कारकून व जासूद जोड्या व दस्तक आहे. दस्तकावरून आह्मीं नांवें लिहून घेतलीं आणि आपणास लिहिलीं. फिरंगी भाषेचीं नांवें आहेत. रजबचें दस्तक आहे. ठिकाण सोडून च्यार महिने जाले. आणखी आठ रोजांनीं पुरंधरास जातलि. वैजापुरीं रविवासरीं आले. शहरींहून नबाबाकडून दर्गाकुलीखानाचा भाऊ मेजवानींचीं वस्त्रें व दुशाला दोन व हजार रुपये नक्त घेऊन आला. त्याकरितां सोमवारीं वैजापुरीं मुकाम जाला. आज मंगलवारीं बाबूलगांवावरून चितली ता बेलापूर येथें मुकामास गेले. मार्गी कोणास कांहीं उपद्रव किमपि देत नाहींत. जें लागेल तें पैसा देऊन घेतात. हे विनंती.

पत्रांक १६८ श्री (नकल) १६९७ पौष्य वद्य ५

राजश्री यशवंतराव शिंदे गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. ता

मनोळी व चिकोडी वगैरे गांव श्रीमंत महाराज यांजकडून कर्जांत राजश्री आपाजी शामराव यांचे विद्यमानें राजश्री रामचंद्र महादेव याजकडे आहेत. त्यास, महाराजांची स्वारी बाहेर फौजेसह निघोन चिकोडी प्रांतीं येऊन, गांव खेडीं घेऊन पुढें आणखी घेणार, ह्मणोन कळलें. त्याजवरून, हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे. तरी, करार जाला असतां, त्यांत अंतर करणें, गांवखेडीं घेणें ही गोष्ट उत्तम नसे. याउपरी महाराजांस विनंति करून गांवखेडीं घेतलीं असतील तीं माघारीं देववून, पुढें उपसर्ग होऊं न देणें. नाहीं तरी तैसेंच लिहिणें. त्याप्रो। केलें जाईल. रा छ १९ जिलकाद, सु॥ सीत सबैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

पत्रांक १६९ श्री. अंदाजें १६९८

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री लक्ष्मणपंत बाबा स्वामींचे सेवेशीं:—

पो। हरी बल्लाळ व पद्माकर बाबूराव सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. राजश्री आबाजी खंडो सुदामे सालगु॥ श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडून निरोप घेऊन आपले घरास जात होते. त्यास खंडाळ्याचे ओढयावर चोरांनीं लुटलें. तेव्हां आपण वाईंत होते. खंडाळेकरांनीं माग काढिला ' तो भुइंजेस आला. तेथें साऱ्या रामोशांनीं मिळोन मनसोबा करोन, भुंइजे पुढें चिंधोळीस माग न्यावा. ते टाकून, खडकी येथें माग न जातां साऱ्यांनीं एकोपा करून, खडकीचा रामोसी चोर ह्मणोन धरिला. तो आज ता। कैदेंत आहे. त्याची चौकसी पहातां त्याजकडे मुद्दापत्ता नाहीं. तेव्हां साऱ्या रामोशांनीं दाव्यादंदानें धरिला किंवा कसा धरिला ते जाणत. साऱ्या रामोशांनीं......(वि) चारूं लागले कीं, हा तुमचा चोर. तेव्हां आबाजी खंडो आतुर. सारे रामोशी याणीं आणून विचारितात. त्यास ह्मणतात कीं, आह्मीं करूं त्यांत तुह्मीं आहां, कीं तुमची चोरी आह्मीं उगऊन देतों. त्यावरोन आंबाजी खंडो यांणीं हा चोर ह्मटलें. त्याजवरोन खडकीकर रामोशी आणोन वाडयांत ठेऊन गेले. चौकशी करितां, पांच सात गांवचे रामोशी वाईस आणून विचारलें कीं, " खडकीकराकडे मुद्दा शाबीत करून देणें, नाहींतर सारे मिळोन चोरीचा फडशा करून देणें. तेव्हां मुद्दापत्ता नाहीं, सा। सात गांवचे रामोशी यांनीं करार केला कीं, आबाजी खंडो याचें काय गेलें तें सत्य पुरस्कर सांगावें. सारेजण मिळोन हिस्सेरसी करोन, कागद लिहोन देऊन, आठ पंधरा दिवसांचा वाइदा करून गेले, नंतर खंडाळेकरास आणिलें. त्यांनीं तीस रु॥ ठराऊन गेले. परनिशेचें खतच दिल्हें आहे. वेळेकर व कवठेकर व सुरूकर हेही कबूलच आहेत. मौजे बदेगांवकरांवर रोखा केला. त्यास, त्याणीं गैरवाका रा। रामा-

जपिंत घाटगे यास समजाऊन, त्यांणीं स्वामीचें पत्र आणिलें. पुढें रोखे (पुढें फाटून गेलें आहे.)

पत्रांक १७० श्री (नकल) १६९८ कार्तिक शुद्ध १४

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री जगन्नाथ चिमणाजी निा संस्थान धाडवसी गोसावी यासः—

सेवक माधवराव नारायण प्रधान सां नमस्कार सुा सबा सबैन मया व अल्लफ नारोराम कारकून दिा संस्थान मजकूर यांणीं हुजुर विदित केलें कीं:

श्री परमहंस भार्गवरामबाबा पासोन आजपर्यंत संस्थानचें लिहिण्याचें काम एकनिष्ठेनें करीत असतां हाल्लीं आपले हातें घेत नाहीं, ह्मणून ऐशियास पूर्वीपासून याजपासून लिहिण्याचें काम घेऊन यांचें चालवीत असतां हाल्लीं दिक्कत करावयास प्रयोजन काय? तरी पूर्ववतप्रों कामकाज यापासोन घेत आलां त्याप्रों घेणें व चालवीत आलां त्याप्रों चालवणें.

आपणाकडे गोसावीबावापासोन पानपत्रावळीकरितां एक मनुष्य चालत होतें त्यास, सरकारचा बेहेडा जाला, तेव्हां माणूस दूर जाहालें. त्या ऐवजीं पंचवीस रुा दरसाल करार केले ह्मणोन तर संस्थानचे ऐवजीं शिबंदीखर्च संस्थानचा आहे. त्यामधें कंमपेश करून यांचे पंचवीस रुा माणूस दूर जाल्यापासोन साल दरसाल देत जाणें. कलम १

आपणास कदीम संस्थानाकडे वेतन रुा सवासें चालतात. त्यास, योगक्षेम चालत नाहीं. तारापूर प्रांत वसई येथें आपणांस मजमूची असामी होती ते बंद पडली. रा जगन्नाथ चिमणाजी यांणीं रजबदली करून ते असामी आपले चिरंजिवाचे नांवें करून घेऊन धर्मार्थ आपणांस शंभर रुा देतात. त्यास, असामी आपली आपले नांवें चालोन पैका पावे तें करावें. ह्मणोन. तर सनदपैवस्तीपासून असामी नारोराम यांचे नांवें चालऊन, असामीचें वतन मशारनिलेस देत जाणें.

कलम १

एकूण तीन कलमें लिहिल्या प्रों करार करणें. येविशीं बोभाट फिरून येऊं न देणें. जाणिजे. छ १२ सवाल आज्ञाप्रमाण. मोर्तब.

पत्रांक १७१

पैा छ १५ जिल्काद. श्री १६९८ मार्गशीर्ष वद्य ३

रावसाो मेहेरबान करमफर्याम मखलिसां सखाराम पंडत सलम लाहुताला.

बादक षौक मुलाकत मसरत आयात मषहूद खातीर इतिहाद मासरबाद.

येथील खुषी जाणून आपली षादमानी हमेषा कलमी करित आलां पाहिजे. दरोंविला, बहुतरोज जाहाले. आपणाकडील खैर आफियतेचा खबर मालुम होत नाहीं. दोस्तीचे जागां ऐसें न व्हावें. हमेशा आपली षादमानी कलमी करित यावें. हाली नरसिंगराव कारकून या बाा चेरथान पारचे पाठविले असे. आजरा एखलास घेतला पाहिजे. ज्यादा लिहिणें काय असे? हे किताबती.

पत्रांक १७२ श्री १६९८ मार्गशीर्ष अखेर

आंशाहामत पन्हांनीं किताबत वसूल उसूल केली ते पोंहोंचोन खुष खुरमी हांसल जाहाली. व आशाहामतपन्हांकडून सदाकत अतवार नरसिंगराव आले. यांणीं मूंजबानीं जाहीर केलें, ते मुफसल जाहीर जाहालें. वपारच्या रसीद जाली ते पोहचली. त्याजवरून गंगाधर राव रास्ते हुजूर येऊन आशाहामतपन्हांकडून मुकदमा जाहीर केला, तो मालूम जाहाला. ऐसीयास, ये बाबेचा मजकूर नरसिंगराव यांस सांगितला आहे. हे लिहितील त्याजवरून कळेल. हमेशा किताबत पाठवून दिल ताजा करणें. दोस्ती जागां.

पत्रांक १७३ श्री १६९८ पौष प्रारंभ.

विद्यार्थी बाजी सदाशिव कृतानेक सां नमस्कार. विज्ञापना कीं: रा नारो रघुनाथ वैद्य पुणेंकर सरसुभा दिा निलकंठ महादेव यांचें पत्र आम्हांस काल सायंकाळीं तापीतीरचें मोीश्वर वद्य १४ चें आलें. मुा टाकरखेडें पा नंजरबारचे लिा आलें कीं, भाऊ लटके जाहले. रा हरि दामोदर व निकम व नारोपंत बरवे वगैरे तमाम जमा करून पारपत्यास आलों. आह्मीं आपल्या जमावानसीं समागमें आहों. सत्वरच पारिपत्य करून येतों. ह्मणोन लिा आहे. आपणास कळावें, म्हणून लिहिलें आहे. विदित होय. हे विनंति.

पत्रांक १७४ श्री (नकल) १६९८

सिका.

यादी विसाजी कृष्ण यांस जातीस तैनात व पुत्रास पालखीची तैनात व विठ्ठल कृष्ण बंधु यांस जातीस तैनात व फौजेस सरंजामास माहाल वगैरे आहेत. सुा सबा सबैन मया व अलफ.

खाशांच्या तैनातादेखील पालखी व खेरीज तैनात गांवजमिनीसुद्धां.

३५१६० तैनाता.

३०६१० खुद्द तैनात.

१००१० बरहुा पेशजी.
२०००० जाजती हिंदुस्थानचे स्वारीस जातेसमई.

३००१०
६०० कापड आंख १५०

३०६१०
१२६० महिपतराव विश्वनाथ जातीची तैनात नाहीं. पालखी व अबदागिऱ्याची तैनात.
३२९० विठल कृष्ण बंधु यांस तैनात पालखी दिवट्या, अबदागिऱ्या सुद्धां.

३५१६०
१०७८ खेरीज तैनात, गांव व जमीन.
१००० मौजे नऱ्हे ता कर्यात मावळ.
८८४॥. ऐन.
११५।. जाजती.

१०००
६० मौजे भिवंडी ता करणेव जमीन चाहूर.
१८ मौजे घोरपडी ता हवेली, प्रां पुणें, जमीन रुके ८४.

१०७८

३६२३८

फौजेस सरंजामास वगैरे गांव माहाल आहेत.
६६०५८।≥
पो सांगोलें, देहें, व पो मिळोन २८ तनखा रु॥ ६६०५८।≥
तपशील.
२४६४३८≥॥ सरंजामाकडे
४१४१५८≥॥ दुमाले

६६०५८।≥
१३४४३॥. पो ब्रह्मपुरी उर्फ माचनूर देहे ७

सातगांवची तनखा रुा.

फुटगांव आकार रुा.

३६६८९|||. ता कर्डेरांजणगांव पो देहे १७ तनखा रुपये

१२५१४|||= को बेलगांव वगैरे गांव ४ होन नाणें.

६२५७।≡ यासीं दर होनास रुपये

२ प्रो। १२५१४|||= रुपये

३६१९||. मौजे देऊळगांव सिंदी देहे १ आकार तनखा. रुपये

१९९१||. मौजे पारगांव ता पांडेपेडगांव रुपये

३८०९

किता फूटगांव ३८०९८÷

१००० मौजे कोटमंगी कार्यास कसूर प्रां। हुकेरी

४९५६८÷

मौजे सुर्त्ते व शंकरगांव पा। काठी

९९२५ मौजे पुळुंज पो माहाल.

पत्रांक १७५ श्री. (नकल)

सिका

१६९८
१६९९

यादी विसाजी कृष्ण यास जातीस तैनात व पुत्रास पालखीची तैनात व विठल कृष्ण बंधु यास जातीस तैनात व फौजेस सरंजामास माहाल वगैरे आहते. सुा सबा सबैन मया व अलफ.

खाशाच्या तैनाता देखील पालखी व खेरीज तैनात गांव जमिनीसुद्धा.

३५१६० तैनाता

३०६१० खुद तैनात.

१००१० बरहुकूम पेशजी.

२०००० जाजती हिंदुस्थानचे स्वारीस जातेसमयीं.

३००१०

६०० कापड आंख १५०

३०६१०

१२६० महिपतराव विश्वनाथ जातीची तैनात नाहीं. पालखी व अबदागिऱ्याची तैनात.

३२९० विठल कृष्ण बंधू यांस तैनात पालखी दिवट्या आबदागिऱ्यासुद्धां.

३५१६०

१०७८ खेरीज तैनात गांव व जमीन

१००० मौजे नऱ्हे ता। कर्यात मावळ.

८८४॥।. ऐन

११५।. जाजती.

१०००

६० मौजे भिवू ता। करेपठार जमीन चाहूर.

१८ मौजे घोरपडी ता। हावेली प्रांत पुणे जमीन रुके ८४

१०७८

३६२३८

फौजेस सरंजामास वगैरे गांव महाल आहेत

६६०५८।≶ पों सांगोलें देहे मिळोन २८

√ तनखा रुपये

६६०५८।≶

तपसील

२४६४३८≶॥ सरंजामाकडे

४१४१५८≶॥ दुमाले

६६०५८।≶

१३४४३॥। पों ब्रह्मपुरी उर्फ माचनूर देहे ७ सात

गांवची तनखा रुपये

फुटगांव आकार रुपये

३६६८९॥। ता। कर्डे राजणगांव पों देहे १७

तनखा रुपये

१२५१४॥।= कसबे बेलगांव वगैरे गांव

४

होन नाणें ६२५७।≶ यासी

दर होनास रुपये २
प्रमाणें १२५१४॥।≈ रुपये
३६१९॥ मौजे देऊळगांव सिंदी देहे १
आकार तनखा रुपये
१९९१॥ मौजे पारगांव ता। पांडे पेडगांव रुपये
३८०९८॥।÷

किता फुटगांव
३८०९८॥।÷
१००० मौजे कोटं, मागील्यांत
कसूर प्रांत हुकेरी
४९५६८÷ मौजे सुरते व शकर
गांव पा। काठी
९९२५ मौजे पुळुंज पैकीं माहाल
२३४६७॥। दिगर जहागीर राक्षसभुवन वगैरे
देहे २३

√ तनखा

२१३७९॥।. ऐन
२०८८ सरदेशमुखी

२३४६७॥।

ता।-
१२५० निरगुडी निस्बत
मोरो गिरमाजी
१२१८ मानापुर नि।
छपा गोसावी

२४६८
सरंजामांत
२०९९९॥।

३९३४८॥।÷
पौ वजा निरगुडी कसबा वि-
सील आलाहिदा लिहून रुपये
१२५०
बाकी रुपये ३८०९८॥।÷

९७९७॥=। पो पारनेर पैकीं
देहे तनखा रुपये
४

१०२२६॥÷

प्रांत जुन्नर पो गांव
चा तनखा रुपये

४२॥≶ प्रो कालेवाडी
६३०-।- प्रो रणेवाडी ता कर्डे
३१४७ ता बेल्हे पो देहे ५
१०९६। ता चाकण देहे ३
२८३२८= ता गाजी भोइरे देहे ४
२४७८।• पो पारगांव ता आले

१०२२६॥÷
१२४५२९॥≈॥• पो आलमले देहे ७५
यो तनखा रुपये
११४३१५८≈॥ ऐन
१०२१४॥ दुमाले

१२४५२९॥≈॥

४०६३६॥≶
पो पातशापूर
१२५५८८≈। पो मजकूर देहे ४५
७११ कर्यात नससरी देहे २

१३२६९८≈॥

√ दर होनास ३८÷ प्रमाणें रुपये ४०६३६॥≶
१००० मौजे नऱ्हे ता कर्यात मावळ तनखा रुपये

३५८५०७॥≈॥।•

पत्रांक १७६ श्री. १६९९

याद़ी निा दिनकरराव रामचंद्र. सुा सबा सबैन मया व अलफ.

किल्ले सिंहिगड येथील जवाहीरखान्यापैकीं रुपयाचीं भांडीं काढून लोकांस खर्चास दिल्हीं आणि किल्ला लढविला. कलम १.

तीर्थरूप राजश्री शिवाजीपंत व धोंडोपंत यांचीं माणसें उभयतांच्या बेड्या काढून, त्यांस व त्यांचीं माणसें आमच्या स्वाधीन करावीं. कलम १

आह्मांमुळें आमचे सोयरेधायरे व इष्टमित्र यांस उपसर्ग लागला असेल. तरी निर् उपद्रव करावा व वस्तभाव जप्तीस आली असेल ती माघारी देवावी. कलम १.

खासगत घोडीं व वस्तभाव सुद्धां आबरू संरक्षण करावी. कलम १.

किल्ल्यावर सोनारापासून टंकसाळ घातली, व शिक्का नवा कोरविला, आणि रुा पाडविले. त्याचा जाबसाल आह्मांकडे व सोनाराकडे माफ करावा. कलम १.

तीा चुलते व सौा मातुश्री व बंधू व मुलेंमाणसें यांजवर चौकी आहे ती उठवावी. कलम १.

आमचे जेष्ठ बंधू कर्नाटकप्रांतीं आहेत. त्यांजकडे स्वार आणावयासीं गेले ह्मणोन ऐकिलें. त्यांस मनाई करावी. कलम १.

तीर्थस्वरूप राजश्री महिपतराव कृष्ण व तीर्थरूप मशारनिलेचे चाकर

आमचे पदरीं च्यार गृहस्थ मातबर आहेत. त्यांस, हरएक बाबें, निमित्य ठेवून उपद्रव न द्यावा. कलम १.

तोतयास मिळोन कोंकण प्रांतींचे किल्ले सुटले व प्रांत खराब जाहला. त्याचा उपद्रव नसावा. कलम १.

रत्नागिरी ता तीा राजश्री महिपतराव कृष्ण यांजकडे होता. तो सरकारांत घेतला ते समई चुलते व सौ मातुश्री व बंधू यांजवर चौकी बसवून घरची वस्तभाव जप्त केली. ती माघारी देवावी. कलम १.

रत्नागिरी तालुक्याचा ऐवज तोतयास खर्च जाहला तो हिशेबामुळें वाजबी निघेल तो मुजरा घ्यावा. कलम १.

तीा राजश्री परशरामपंत, आमचे बंधू, यांची स्त्री कोंकणप्रांतीं आहे. ती आह्मांजवळ आणवावी. कलम १

पुण्यांतील वाड्यांतील वस्तभाव जप्तींत आली असेल, ती माघारी देवावी. कलम १.

आह्मां सर्वांस शिवाजीपंत सुद्धां प्रायश्चित देऊन शुद्ध करावें. कलम १.

आपले तीर्थरूपांचे धनी तीा राजश्री महिपतराव कृष्ण सर्व कार-

या उभयतांस मालेमालतीस कोंकण-च्या बखेड्यामुळें उपद्रव जाहाला असेल. त्यास दूर होऊन नवीन उपद्रव न होय तें करावें. कलम १.

कसबें पांवस येथील वाड्यांत वस्तवानी व नख्ती ऐवज जो सरकारांतून जप्त जाहला आहे, तो आमचा आमचे स्वाधीन करावा. कलम १.

भार व मामलती व उदम ती चें नांवें चालत होता. त्यास हल्लीं कोंकणपट्टीच्या बखेड्यामुळें सर्व सोडून, महिपतराव यांचेस्वाधीन करून, त्यांचें त्यांजकडे चालवावें. कलम १

का पांवस येथें ती रा महिपतराव कृष्ण यांच्या वाड्यास व बागास वगैरे कांहीं उपसर्ग लागला असलियास मोकळी करवावी. कलम १

पत्रांक १७७ — १६९९ चैत्र शुद्ध १४

श्री (अस्सल बरहुा नकल.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरी बल्लाळ स्वामी गोसावी यांसी:—

पोा माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. पो सांगोलें व आलेबले व माचनूर व पुळुंज वगैरे गांव राजश्री विसाजी कृष्ण यांजकडे सरंजामास आहेत. त्यास, तुह्मीं त्यांचे गांवांवर रोखे करूद ऐवज घेतला, व पुढें रोखे होतच आहेत, ह्मणोन हुजूर विदित जालें. ऐशास, यांचे माहालास व गांवास उपसर्ग न करणें. रोखे केले असतील ते मना करवून, ऐवज घेतला असेल तो माघारा देणें. गांवगन्ना राऊत रखवालीस देऊन, त्यांचे महालास व गांवास उपसर्ग होऊं न देणें. जाणिजे. छ १२ रोबल, सुा सबा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

पत्रांक १७८. — श्रीसीताकांत. — १६९९ श्रावण शुद्ध ६.

राजश्री बाबूराव विश्वनाथ गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो मुधोजी भोंसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिला मजकूर अवगत जाहला. पूर्वी जाहलेला प्रकार यजमानांनीं खासदस्तुरपत्रीं लिहिला आहे, त्याजवरून कळलें असेल. फौजेची समजोती होत आहे. चाळीस पन्नास लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. बाजत बरसात हैदरावरी जाणार. शिंदे व होळकर आपलाले स्थळास निरोप घेऊन छावणीस गेले. पुण्यास येणार. उभयतांचें ऐक्य फार चांगलें जाहलें ह्मणोन लिहिलें. त्यास पूर्वी राजश्री बाळाजीपंत नाना

यांचें पत्र स्वदस्तुरें विस्तारयुक्त आलें तें अवलोकनीं सर्व अर्थ इच्छित घडलें हें समजोन जो संतोष जाहला त्याचा अर्थ लिहिणेयांत आलाच आहे. सांप्रतच्या लिहिण्यावरून तरी कोणताही गुंता राहिला नाहीं. मुख्य राजश्री पंतप्रधान दैवशाली आणि राजश्री नाना यांची एकनिष्ठता. त्यांचींच फळें श्रीनीं दिल्हीं- याजउपरी सर्व बंदोबस्त यथास्थित होऊन येतील. वरकड इकडील कित्तेक मजकूर पूर्वी लिहिले आहेत. सांप्रत राजश्री दिवाकर पुरुषोत्तम यांचे पत्रावरून कळों येतील. रा छ ५ माहे रजब. सविस्तर मारनिलेच्या पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद*

*शिक्का रघोजीचा

पत्रांक १७९ — १६९९ भाद्रपद शुद्ध १४

श्री लक्ष्मीकांत
श्रीशाहूराजपदांभोजभ्र-
मरायितचेतसः । बिंबा-
त्मजस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते।।

आज्ञापत्र सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा, ता मोकदम, मौजे धनवाडी, पा तळेगांव दाहा सहस्रांची, हालीं वस्ती मौजे हिंगणगांव, पा कुऱ्हा, प्रांत वऱ्हाड. सुा समान सबैन मया व अलफ्‌. मौजे मजकुरीं पळून जाऊन धनोडी मजकुरावर दावादंद करितोस ह्मणोन हुजूर विदीत जालें. तर, हे गोष्ट कार्या (स येणार नाहीं) हल्लीं देखत आज्ञापत्र आपले गांवास उठून येणें. दावादंद न करणें. याजउपर दावादंद केला तरी पारपत्य केलें जाईल. या कामास जासूद पाठविला असे. यासीं मसाला रुा ५ पांच आदा करणें. जाणिजे. छ १३ माहे शाबान. मोर्तबसुद.

पत्रांक १८० — श्री. — १६९९ आश्विन वद्य ९

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव कृष्ण गोसावी यांसी:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा समान सबैन मया व अलफ. तुह्मांपासून सरकारांत कर्ज घेतलें मुद्दल मित्या.

रुा

३५००० मिती मार्गशीर्ष शुा ३ त्रितिया शके १६९७, मन्मथनाम संवत्सरे, छ १ सवाल, सन सीत सबैन. ऐन मुद्दल बेरीज रुा

१०९०॥. मिति चैत्र शुा ३ त्रितिया शके १६९८, दुर्मुख नाम संवत्सरे, छ १ सफर, सन सीत सबैन. व्याजाबा रुा

३६०९०॥.

एकूण छत्तीस हजार पावणेएक्याण्णव रुा सदरहु मित्यांनीं घेतले. त्यांसी व्याज दरमाहे दरसदे रुा १ एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. तरी जाहले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून दिल्हा जाईल. जाणिजे. छ २५ रमजान. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा. बार.

पत्रांक १८१. श्री. (नक्कल.) १६९९ कार्तिक शुद्ध १३

राजश्री बाळाजी नाईक भिडे गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें. विशेष. तुह्मांपासून कर्ज घेतलें येणेंप्रोंः—

३००००० सरकारांत भरणा, मार्गशीर्ष शुद्ध १.
५०००० सखारामपंत बापू, पौष शुद्ध १.
२५००० नानाफडणीस सवादोन लाख पौष शुद्ध १५.

३७५०००

एकूण पावणेचार लक्ष. यास व्याज दरमहा दर सेंकडा रुा १। सवा विन सूट देऊं. शके १६९९, हेमलंबी नामसंवत्सरे, कार्तिक शुद्ध १३. बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तब. शिक्का.

पत्रांक १८२. श्री. १६९९ कार्तिक

खान अजम याकूतखान दाममोहबतहू

अमारत व आयालत मर्तबात हशमत शौकात मंजील तमलाज मुखलिसां इस्तिनहार दोस्तां वादज पौक मपहूद जमीमोनीर गर्दानीदः मेखामदर्दी वेला आं अमारत पन्हांनीं मुफाविजाईबलाग केला तो उसूल जाहाला व सदालत अतवार रामचंद्र हरी दातार यांणीं मोहिबांकडील

कित्तेक सफाईचे मंजमूल जाहाहीर केले ते मालूम जाले. सरकार तालुकीयांत येऊन खलकास तोशीस होऊं देत नाहीं व रजुवातीचा मजमून कलमी केला (तो) आंयां जाहला. आं अमारतपन्हां सरकार तालुक्यांत येऊन रयतीस छडाछड बहुत होते. सरकारतर्फेकडील चाकरमानेयाचे कबिले धरून नेले व भातें भरून नेलीं, ये बाबेचे बोभाट बहुत येतात. लेकिन हुजूर वकील रवाना केला असतां सरकारचाकरमानेयांचे कबिले धरून नेऊन खलकास तसदी देणें व भातें भरून नेणें हें ताजुब आहे! मोहिबांकडून असें अमलांत येत असतां, सरकारतर्फेनें पेषदस्ती होत नाहीं. गुदस्तांपासून वकील हुजूर दरसाल करावे, हें कलमी करीत असतां, मोहिबांचे जानापासें वकीलांस रवानगीस मुदत लागली. इंग्रेजांचे गडबडीची फुरसत पाहून सरकारताल्लुक्यांत लोक रवाना करणें व इंग्रेजाची कुमक करितों ऐसें कलमी करणें तहाखेरीज असे. दुतर्फा दोस्ती चालावी हें बरज्या. लेकिन, रजुवातीविसी मोहिबांकडून बारबार कलमी होतें. बिनांबरां, येणें देणें काय निघते हा कलमी जाबसाल असतां, आं अमारतपन्हांकडील वकील हुजूर आल्याचे हमराई कागदपत्र मरसूल केले नाहींत. जबानीचे वाकफगारीनें मालूम कैसें होतें? येबावे रामचंद्र हरी यास हुकूम केला आहे. लेंहाजा, कागदपत्र हिशेबाचे हुजूर येऊन, जाहीर होऊन, त्याची जुजरसी करून दातार मुमाइलेयास हुकूम केला जाईल. खलकास मुजाहमत होणें हें मुकदिमेयाची अजतर्फ आं अमारतपन्हां होत आहे. अजि जेहत नुकसान कदाम तर्फेनें अमलांत येईल हें मोहिबांस मालूम न होय ऐसें नाहीं. रामचंद्र हरी यास हुजूर ठेऊन घेतले आहेत. यास कित्तेक मुकदिमेयांचा हुकूम केला आहे. मारनिल्हे कलमी करतील. ते दर्याफ्त करून दोस्तीची तरकी चाले तें करणें. आंअमारतपन्हांस मुनासीब आहे.

पत्रांक १८३. श्री. (नकल.) १६९९ मार्गशीर्ष शुद्ध १२.

राजश्री वर्तमान व भावी कादार पा विसनपूर गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड. सुा समान सबैन मया व अलफ. वेदमूर्ती राजश्री शिवरामभट बिन निलकंठभट, उपनाम भंडारी, गोत्र भारद्वाज, सूत्र कात्यायन, शाखा वाजसनी, वास्तव्य शहर मुलेर, हे सत्पात्र थोर ब्राह्मण जाणोन, प्राा मजकूरीं सालमजकुरापासोन नूतन धर्मादाय दररोज रुपये ।- पाव रुपया रोज करार करून दिल्हा असे. तरी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सदरहू, रोजचा ऐवज आदा करीत जाणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणें. पत्राची प्रत लिहून घेऊन, असल पत्र वेदमूर्तीजवळ भोगवटेयास देणें. रा छ १० जिल्काद. बहुत काय लिहिणें? मोर्तब. शिक्का.

पत्रांक १८४. श्री. १६९९ पौष शुद्ध २.

रा छ ३० जिल्काद, सन समान XXX जंजीरेकर हबशी यांचें पत्र.

आंमरतपन्हांनीं मुफाविना इबलाग केला तो उसूल होऊन खुरमी हांसल जाहाली. कितेक मजमून बयावार कलमीं केले, ते आंयां जाले. लेकिन ये बाबेचे मजमून मुफसल गणेशराम दातार यांस हुकूम करून रा केलें असतां, रहादरायान त्यास लासूर पैदा होऊन घांटमाथां छ जिल्कादीं फोत जाले. बिनाबरा, दुतर्फा कित्येक मुकदमेंयांचा फैसला होणें, सबब मोहिबांकडून वाकफगार शाहाणें माणूस रा करावें. समजोन घेऊन जाबसाल करून रा केले जातील. सरकार तर्फेनेंही शाहाणें माणूस रुखसत होतील. बिलफैल, प्रांतांत दंगा होऊन रयतीस उपसर्ग होतो, ये बाबेचे हूजूर बोभाट येतात. हें एखलासींचे जागां मुनासीब नाहीं. ताकीद करून उपसर्ग प्रांतांत न होय तें........कीजे.

पत्रांक १८५ श्री. १६९९ पौष शुद्ध १२

जंजीरेकरांचे पत्राची नक्कल.

......मान जयराम त्रिंबक सोमण.

मुफावीजा मरकुम केला तो पोहचून खुषजुदी हांसल जाली. लिहिला मजमून मालूम जाहला. ऐशास, गणेशराम दातार हक झाले. पुढें दुतर्फा जाबसाल सुरळीत अमलांत यावें, सां आंअमारतपन्हांकडून भलें माणून रा करावयाविशीं इबलाग केलें. त्यावरून भलें माणूस रा करितों ह्मणोन कलमीं केलें असतां, प्रांतांतील दंगा होणें तो होतच आहे. हें एखलासींचि जागा दुरुस्त नाहीं. सरकार तर्फेनें निखालसीचा मार दर्याफ्त करून भले माणूस बलाविले आहेत. तरी जलदीनें रा करावें. अकरा माहालची दुतर्फा पाहणी होणें, त्याचा हंगाम हाच आहे. याजकरितां भलेमाणसाची रवानगीस दिरंग न लावितां लौकर रा करावें. रयतीस तसदी लागते ये बाबेचा बंदोबस्त करवावा. दोस्तीचे जागां असें अंमलांत नसावें. रा छ २२ जिल्हेज. जादा काय लिहिणें ? हे किताबत.

सन समान पौषमास मुा परंधर येथून रा जालें. खान अजम याकूतखान दाम मोहबत हु.

पत्रांक १८६ श्री १६९९ पौषवद्य ११

राजश्री माहादजी शिंदे गोसावी यांसीः—

छ सकल गुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. राजश्री महिपतराव कृष्ण साठे यांजकडे पो हुकेरी व मनोळी

हे तालुके कर्जात. त्यास सन सितांत एसाजी शिंदे फौजसुद्धां पो मजकुरीं येऊन गांव घेतले. त्यांपैकीं कांहीं गांव राजश्री रामचंद्र गणेश यांणीं घेऊन मारनिलेचे हवालीं केले. कांहीं गांव ठाणें, सेंदूर व हासूर वगैरे येणें राहिलें आहेत. त्यास तिकडे सांप्रत तुह्मीं गेलां आहां, याजकरितां तुह्मीं यांजकडील गांव घेऊन मशारनिलेचे हवालीं करणें. मारनिलेचे कारकून तुह्माकडे गेलेच आहेत. ते तिकडील माहितगारी तुम्हांस सांगतील. त्याप्रमाणें जरब पोंचाऊन ठाणीं घेऊन हवालीं करणें. जाणिजे. छ २४ जिल्हेज, सुाा समान सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद. लेखन सीमा.

श्री
राजाराम नरपति हर्ष-
निधान माधवराव
नारायण मुख्य प्रधान.

पत्रांक १८७ श्री १६९९ माघ शुद्ध १३

. राजश्री महिपतराव तो रत्नागिरी गोसावी यांसीं:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माहादजी शिंदे दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष. राजश्री आपाजीराम दाभुळकर यांची कुणबिण कस एक पळून गेली, ती ताा लांजें उमगिली आहे, म्हणून कळलें. त्यावरून, हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे. तरी यांची कुणबिण ज्याचे घरीं असेल त्यास ताकीद करून, यांचे माणसांचे स्वाधीन करवावी. रा छ १० मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तबसुद.

श्री.
जोतिस्वरूप चरणीं तत्पर.
राणोजी सुत माहादजी
शिंदे निरंतर.

पत्रांक १८८ श्री १७०० चैत्र वद्य ३

पौ छ १५ रबिलावल, सन समान सैबन.

रावसाो मेहरबान करमफर्माय मोखलिसां बाळाजीपंडत फडणवीस सलमला हुताला.

बादज षौक मुलाकात मसरत अयात मषहुद खातर इतिहाद मासरबाद, येथील खुषी जाणून आपली शादमानी हमेषा कलमी करीत आलां पाहिजे. दर्री बिला, बहुत रोज जाहाले, आपणाकडील खैर आफियतेचा खबर मालूम होत नाहीं. दोस्तीचे जागां ऐसें न व्हावें. हमेशा आपली शादमानी कलमी करीत यावें. हाली नरसिंगराव कारकून या बा चे थानपारचे पाठविले असे आजराः एखलास घेतला पाहिजे. जिआदा लिहिणें काय असे ? हे किताबत.

पत्रांक १८९ श्री १७०० आषाढ वद्य १०

रावसाहेब आदा मुलाजमें एकबालहू.

जयेर दौलत व एकबाल रफात व अवालि मर्तबा तफीस खातम बख्त-दारीं आबेजव्हार आलम परवरी फरोजी पेंचराग हिशमत फराजी देली वायम करमत अजयुफी कड बाबत व कामरानीं दाई मजश्यारे कवताल्याबाद अजि खैर आपेश उइलम लुइस एस्कोयर बाद अर्जुए हुजुर मोफसरूर इन-शाफ खातीर मेहेर मजातीर मेरादों नव.........फनामा तिराज सादर केला तो पोंचून हिसियार खुरमी हांसल जाली. एकबालपन्हांचे लिहिल्यावरून श्याहामत व एकबालपन्हां गवरनर जनराल कलान कलकत्ते जंगबाहादुर यांचीं खतें पाठविलीं आहेत. येऊन पावतील. कलकत्तेयाहून खुदाएवंद न्यामत इनरावेल कोंपनीची फौज येत आहे. रहदारीस दस्तक द्यावेंविशीं गवरनर जनराल यांहीं कलमीं केलेंच आहे. त्यास तर्फे इंज्यानेब अर्ज ऐसाजे. मेहेरबानी करून बंतरपासून व सरकारचे सरदार जागजागांचे यासीं दस्तक द्यावें. येथून फौजेच्या सरदारांस पाठवून देऊं. दस्तक असल्यानें दुतर्फेच्या फौजेशीं मुलाखत जाहाल्यास कोण्हेविशीं रहदारींत हरकत वगैरे नाहीं. बेह-त्तर असे. कलकत्तेचे खलिते पावल्याचा दरजबाब पाठवावें. येथून रवाना केले जातील. रा छ २४ जमादिलाकर. ज्यादा एयामशादमानी जुमाबंद.

पत्रांक १९०. श्री. १७०० ज्येष्ठ–आषाढ.

सां नमस्कार विनंती उपरी. फरांसिसांचे येथें तीन वकील आले आहेत, त्यांचें व आमचें बोलणें जाहालें, ह्मणोन विस्तारें लिहिलें तें सर्व कळों आलें. आणखीहि कित्तेक मजकूर विस्तारें लिहिले ते कळले. तुमच्या लि-हिल्याचे अन्वयें श्रीमंतांस विनंती केली. हे विशींचें बोलणें येथें बहुत जा-हालें. तेव्हां खातरजमा जाहाली. उत्तम आहे, हे आज्ञा जाहाली. संशय

इतकाच जे, कोणती गोष्ट करणें ते बहुत विचार करून करावी. केल्या मर्जीनुरूप फल आल्यास उत्तम. कदाचित् न घडल्यास करण्यास दोष येतो मोठ्या गोष्टीस पेंच. जे तुह्मांसीं बोलतात, त्यांची खातरजमा येथें केली. परंतु त्यांचेच स्वाधीन कोणताहि प्रकार नसिल्यास मग काय होणें हें कळतच आहे. याकरितां आज कोणतेहि गोष्ट नमुदांत आणणें हें ठीक नाहीं. यास्तव याचा विचार पुर्ता करून, तेथें आपणांस त्यांसीं जें बोलणें तें बोलावें आणि जो निश्चय करणें तो करावा. सर्व अर्थ त्याचे हातीं: येविशीं तुमची खातरजमा जाहालियासच करावें. नाहींतर ठीक नाहीं. घोडे स्वाधीन नसिल्यास बसणार काय करितो? सर्व अर्थ तुमचे ध्यानांतच आहेत. करण्याविशीं येथील मर्जीचा संतोष आहे. पक्के मात्र असावें. घोडे स्वाधीन आहेत यांत संदेह नाहीं, हे खातरजमा तुमची जाहलियावर तेथेंच जो निश्चय करणें तो तुह्मींच करावा, येविशीं आलाहिदा तुह्मांस चिठी आहे. हेच दाखवून खातरजमा करावी आणि कार्य करावें. गुंता नाहीं. जाहिराणा पत्राचा सिलसिला हा प्रकार केव्हां घडेल? येथील मर्जीनरूप एकदोन प्रचिती येतील तें करून दाखवितील, तेव्हां जे गोष्ट होणें ते स्पष्ट होईल. तोंपर्यंत करणें ठीक नाहीं. याप्रमाणें आज्ञा जाहाली. कळावें. तुम्हांकडून याचाविषयीं ग्रहस्थ आले ते भेटले. त्यांसहि हाच मजकूर सांगितला आहे. त्यांचें पत्र आलाहिदा गेलें आहे व हालीं आहे, त्यावरून कळेल. कार्य जाहलियावर तुमचें पत्र आलें ह्मणजे येथील मर्जीनरूप जे सला तुम्हांस लिहिणें ते लिहूं. त्या अन्वयें प्रचितीस यावें ह्मणजे सर्व गोष्टी मनोदयानुरूप घडतील. भोंसले याचें व इंग्रजांचें सूत्र आहे म्हणून येथें वर्तमान दाट आहे, व बुंदेले यांचे लिहिण्यांत आहे, व पलटणें आलीं आहेत, त्या समागमें बेणीरामपंत आहेत, ऐसें असोन तुह्मीं कांहींच लिहिलें नाहीं, हें काय? तस्मात् तुम्हांस कळलेंच नसेल. तरी येविशींचा बारिकाईकानें पक्का शोध करून लेहून पाठविणें. यांउपर कोणे विशींचा आळस एकंदर नसावा. बहुत सावध असावें. बारिकाईनें जें वर्तमान आढळेल तें वरचेवर लिहीत जावें. दिवस बहुत नाजूक आहेत व संधीचे आहेत. फार जपावें. येविशीं सहसा सुस्ती नसावी. पत्र वाचून फाडून टाकणें. मार फार नाजुक आहे याकरितां ही विनंती. इकडे, मध्यें मोरोबाची वगैरे घालमेल जाली. त्या दिवसांत तेथील डोळे ठिकाणीं नव्हते. सरंजाम वगैरे जप्त केला होता. त्यास मागती देतात आहेत, म्हणोन तुह्मीं लिहिलें. त्यास, उत्तम आहे. द्यावा. आपण आपले तर्फेनें, त्यांचे डोळे ठिकाणीं नव्हते, हें दर्शऊं देखील नये. याचें कारण नाहीं व येथेंहि त्याप्रमाणेंचा निश्चय आहे. तुह्मींहि दर्शऊं नये. रंगामेजी व खातरजमाच आहे. हे विनंती......विनंती फरांसिसाचे वकिलाचें पत्र पों त्यास, जो येथें वकील होता तो गेला. पत्र आम्हांजवळच आहे.

पत्रांक १९१ श्री १७०० श्रावण—भाद्रपद—आश्विन

पुा राजश्री रावजी स्वामीचे सेवेसी:—

विनंती उपरी इकडील वर्तमान विशेष लिहिणें तरी एक वेळ आंग्रेजाचा मजकूर. त्याचा इतल्ला वरचेवरी आपले पत्रीं लिहिण्यांत आलाच आहे. आंग्रेजांची पत्नावरी पत्रें दाट आलीं कीं, आह्मीं दरमजल तुमचे प्रांतावरून मुंबईस जातों. येथून उत्तरें त्यास वरचेवरी एकदोन रवानग्या तेथील आज्ञा प्रों गेलीं कीं, फरांसिसांचे वकीलास बिदा केलें, तुमचा व श्रीमंतांचा स्नेह जो आहे तोच आहे. आणि दोन चार उत्तरें पाठविलीं कीं, मार्ग विशम आहे. पर्वत आहेत, मार्गोनीं पाणी...........हि हरवख्त मिळणार नाहीं. अशीं इकडून पत्रें लिहीत गेलों. कदाचित् कठोर ल्याहावें, तरी कटक प्रांतांत अपाय करतील, हें जाणोन उत्तरें पाठवित गेलों. परंतु त्यांचीं पत्रें वरचेवरी हींच येत गेलीं कीं, आह्मीं दरमजल याच मार्गें येतों. त्यास अलीकडे त्यांच्या लष्करांत काशीद जोड्या होत्या, व रा बेणीराम शिवभद्र वकील त्याजवळ आहे. आपणास ठाऊकच आहे. त्यास, त्यांणीं पत्र पाठविलें जे कर्णेल लसलीन* आणि साहा पलटणें काल्पीस आलीं आहेत. तेथून कर्णेल गांजर यास तीन पलटणें देऊन, काल्पी अलीकडे जलालपूर आहे, तेथील मजल सांगितली. त्यांणीं कूच करून, दोनप्रहर रात्रीस फौजबंदी करून, राजश्री बाळाजी गोविंद व बुंदेले यांच्या फौजा जवळपास जाणोन, रात्रीस निघाले ते जासुदांनीं मार्ग भुलविला. अरण्यांत जेथें पाणी नाहीं तेथें पडले. दोन अडीच प्रहर दिवस जाहला. इतकियांत कुल लोक तृषेनें व्याकूळ होऊन रानोरान जाले. कर्णेल गाजर सरदार मातबर व तीनशें गाडदी व पन्नास गोरे ऐसे तरी मेले. हें वर्तमान कर्णेल लसलीनांस कळतांच त्यांणीं कूच करून त्याजवळ आला. यांची इतकियांची गत करून, तेथेंच मुक्काम व्यत्रवतीवरी केला. प्रथम इकडे येण्याविशीं शकून याप्रमाणें जाहला! पुढें न यावें तरीं बुंदेल्यांचे व बाळाजीपंताचा शह खाऊन माघारे हलले, ऐसें होईल. याजकरितां छत्रपुरा.........आणि तेथें छावणी केली ....हिंदुस्थानांत व बंगाल्यांत भ्रम राहतो. याअर्थीं छत्रपुराजवळ आले. इकडील येण्याची चाल सुस्त आहे. पुढें वर्तमान येईल तैसें लिहिण्यांत येईल. आंग्रेज निवळ श्रीमंत दादासाहेबांचेच पक्षावर नाहींत. कांहीं आणिक चालीवर आहेत. शुजायतदौरेचे लो—लेक आपली कंपु तयार करितात. नजफखानाचें सूत्र आहे. हें वकिलीचें लिहिणें नाहीं, वर्तमानें सावकारी पक्कीं आहेत. याहीवर न कळे! विनंती.

---

* Cohonel Leslie व Colonel Goddard.

पत्रांक १९२ श्री. १७०० भाद्रपद वद्य ६

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव कृष्ण गोसावी यांसीः—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा तिसा सबैन मया व अ-लफ. तुह्मांपासून ताा रत्नागिरी येथील मामलतसंबंधें रसदेचा ऐवज आगाव सरकारांत सन खमस व सन सीत सबैनांत घेतला होता. त्यांपैकीं रदकर्ज प्रावोन बाकी ऐवज राहिला तो व त्याचें व्याज जालें तें सरकारांत कर्ज करार करून ठेविला. मित्याः—

रुा

८८४७९।-।. ऐन मुद्दल वैशाख शुा १ शके १७०० विलंबीनाम संवत्सरे.

२८७०१॥≈॥. व्याजा बाा च्यार मास वजा करून पक्की मिती भाद्रपद शुा१ शके १७०० विलंबीनाम संवत्सरे.

११७१८१

एकूणं एक लक्ष सत्राहजार एकशें एक्याशीं रुा सदरहू मित्यांनीं घेतले. यासी व्याज दरमाहे दरसदे रुा १ एकोत्रा शिरस्तेप्रों करार केलें असे. जाले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून दिल्हें जाईल. जाणिजे. छ २० साबान. बहुत काय लिहिणें ? श्री लेखनसीमा.

पत्रांक १९३. श्री. १७८० आश्विन शुद्ध १.

राजश्री लक्ष्मणपंत स्वामीचे सेवेसीं:—

विनंती उपरी छत्रपुरीं मुंबईहून दोघे गृहस्थ आले. त्यांणीं येथें पत्र पाठ-विलें कीं, तेथून पांच लक्षांची वरात फौजेच्या खर्चाची दिल्ही आहे. तरी एक कारकून छत्रपुरास पाठवून देणें. तो वरात पाहील, मग तुह्मांस रुा देणें असले तरी देणें. नाहींतरी फिरंगियास सांगूं. त्यांस यांनीं उत्तर लिहि-लें, वरात व पत्रें कैसीं आहेत तीं घेऊन येणें. ह्मणोन कासीद गेला आहे. उत्तर आलें नाहीं. नागपुरीं भोंसल्यास सूत्र आहे. त्याचा वकील इंग्रजां-जवळ आहे. तूर्त चार महिने छावणी करून हा मुलुख काबिल करितात, ह्म-णोन लिहिलें तें कळलें. ऐसीयासी, तिकडे सरदार शिवाजी विठ्ठल वगैरे सरकारचे व शिंदे होळकर यांचे आहेत. आणि शिंदे, होळकरहि लौकरीच त्या प्रांतें येणार, असें आहे. ईश्वरइच्छेनें शत्रूचें पारपत्य होईल. श्रीमंतांचा प्रताप थोर आहे. रा २९ साबान. हे विनंती.

पत्रांक १९४. श्री. १७००आश्विन शुद्ध १.

राजश्री लक्ष्मणपंत स्वामीचे सेवेसीं:—

विनंती उपरी तिकडील वर्तमान राजकी श्रीमंत पुसतात. त्यांस, कांहीं लिहित जावें, ह्मणून लिहिलें. त्यास, इकडील वर्तमान फाल्गुन मासीं रा

मोरोबा दादा फडणीस वाफगांवास जाऊन तेथून होळकर फौज सुद्धां व त्यांनींहि पांच हजार पावेतों ठेविली होती. रा बजाबा पुरंदरे व चिंतो विठ्ठल ऐसे पुण्यास येऊन येथील शिक्का कट्यार व निशाण घेऊन पुढें सासवडावर मुक्काम केला. मध्यस्त रा सखारामपंत बापू व कृष्णराव बल्लाळ व माधवराव जाधवराय हे ऐसे येऊन, रा नाना फडणीस यांनीं व त्यांनीं एक विचारें कामकारभार करावा ऐसें ठराविलें. त्याप्रों कांहीं चाललें नाहीं. चैत्र व वैशाख दोन महिने तसेच रोखानें गेले. पुढें रा हरीपंत तात्या फौजसुधां कर्नाटकांतून आले; व शिंदे कोल्हापुराकडे होते, तेहि आले. तेव्हां मसलत ठरून, यांचा त्यांचा बिघाड पडोन, मोरोबादादा यांसीं नगरचे किल्यांत ठेविलें. बज्याबा चंदन किल्ला येथें ठेविलें. चिंतो विठ्ठल मुंबईस पा होते ते तेथेंच आहेत. होळकर येथें आहेत. शिंद्याच्या लगामानें चालतात. उभयतां सरदार येथें आहेत. इंग्रजांचें पारपत्य उभयतां सरदारांनीं करावें, कर्नाटकांत सखारामपंत बापू व नाना यांनीं फौजसुधां जावें, याप्रों मार ठरला. फौजांची तयारी होत आहे. दसरा जालियावर मुहुर्त करून डेऱ्यास दाखल होणार. याप्रों मजकूर आहे. रा आश्विन शुद्ध १ बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक १९५ श्री. १७०० आश्विन शुद्ध ६

राजश्री महिपतराव साठे गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माहादजी शिंदे दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें व श्रीविश्वेश्वराचा प्रसाद पितांबर पाठविला तो राजश्री माधवराव गंगाधर यांणीं पावता केला. श्रीचा प्रसाद पावोन संतोष जाहले. आपण इकडे येऊन भेटून जावें, ह्मणून लिहिलें होतें; परंतु, योग न घडला, परभारें जाणें जाहलें. महेश्वराहून पुढें जावयासी निघणें जाहलेंच असेल. स्वास्तिक्षेम पुण्यास पावल्याचें लेहून कळवावें. र ॥ छ ४ रमजान. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तब सूद.

श्री

जोतिस्वरूप चरणीं
तत्पर राणोजी सुत
माहादजी शिंदे निरं-
तर.

पत्रांक १९६ श्री १७०० आश्विन वद्य ४

राजश्री आनंदराव हांडे देशमुख सरकार जुन्नर गोसावी यांसीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री सुभानजी जाधवराव रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन सविस्तर वर्तमान विदित जालें. तर्थिरूप राजश्री खाशांचा मुहुर्त वसईस जावयाचा कधींचा आहे तो लेहून पाठवावें, ह्मणोन लिहिलें. ऐशीयास, ममईच्या बाऱ्यावरी दहा फरकतें थोर व दाहा बारा हजार फिरंगी आला आहे, वसईवरी यावयाची दाटी फार आहे. ह्मणोन श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचीं पत्रें आलीं कीं, तुह्मीं अविलंबें स्वार होऊन जाणें. त्यावरून त्या मार्गें जावयाचा मजकूर राहिला. उदैक आश्विन वद्य पंचमीस सोमवारीं भोजनोत्तर स्वार होऊन जाणार. मुक्काम उदैक आळंदीचा आहे. आपणास कळावें ह्मणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंति.

पत्रांक १९७ श्री. १७०० मार्गशीर्ष शुद्ध ५

पुा राजश्री बाबूराव स्वामीचे शेवेसी:—

विनंती उपरी ममईकर इंग्रज तीन चार पलटणें व कांहीं तोफा ऐसे कोकणांत उतरले. पैकीं दोन तीन तोफा व कांहीं लोक घांटमाथा आले. हें वर्तमान कळतांच राजश्री बापू व आह्मीं हुजूरातसुद्धां, शिंदे होळकर समेत, वानवडीवरून कूच करून तळेगांवचे सुमारें त्यांचे रुखावर आलों. फौजेची समजाविश काहीं जाली. कांहीं होत आहे. हाल्लीं इंग्रज कोकणांत उतरले. घांटावर आले. त्यांचें पारपत्य कर्णें कठीण नाहीं. सत्वरच ईश्वरइच्छेनें तंबी होईल. परंतु इंग्रजाचा बिघाड जाला हे गोष्ट खुली ! हिंदुस्थानांत पलटणें आलीं तथापि पडदा होता. ते म्हणत होते कीं, आम्हांस ममईस जाणें, पंतप्रधान यांसीं बिघाड नाहीं. कलकत्त्याहूनहि पत्रें येत गेलीं. त्यांतहि हाच भाव कीं, रावपंतप्रधान यांसीं करार व आहदिया जाला तोच मंजूर. ऐसें पडद्यानें होतें. ते त्यांणीं होऊन, उघडी गोष्ट करून, तालुकियांत चालून आले ! तेव्हां तंबी कर्णें प्राप्त. इंग्रजी चाल प्रामाणिक ऐसें होतें ! तें त्यांणीं लोभामुळें सर्व सोडून बदनजर धरली. ही गोष्ट दक्षणेस व दक्षणेंत नबाब, पंत प्रधान व भोंसले, हैदरखान सर्वांस वाईट ! चरकाची गत आणि इंग्रजांची चाल एक ! दौलतकर्ते दूरदेशीं आहेत तेच हें समजतील कीं, ही गोष्ट वाईट आहे. ज्या राज्यांत टोपीकरांची चाल झाली तेथील गति काय, हें कांहीं लोपलें नाहीं ! याचा विचार राजश्री दिवाकरपंतदादा यांणीं काय केला ? इंग्रजी चाल दक्षणेंतील मोडणें, त्याचा कबज्या न होणें, याची तऱ्हा व सलाह कशी योजिली, हें त्यांस पुसोन, काय मसलत सांगतात, करितात

हें सत्वर लिहावें. गनीमाई राज्याची. आगत्य इकडे आहे आणि त्यास नाहीं ऐसें नाहीं. राजश्री सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा, तुह्मी बसोन, दूरदृष्टीनें पोख्त मनसबा विचारून नेक सलाह ल्याहावी. इकडे कोणतीही गोष्ट त्यांचे सलहखेरीज नाहीं. हे विनंती.

पत्रांक १९८. श्री. १७०० पौष शुद्ध १

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री जगन्नाथ चिमणाजी गोसावी यांसीः—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा तिसा सबैन मया व अलफ. नारोराम कारकून संस्थान धावडशी यांस सवस्थानसंमंधें सवासें रुा पावत होते. त्यास, मारनिले (याचें यो–) गक्षेम न चाले, सबब पाा तारापूर प्रांत वसई येथील मजमूची असामी सांगितली होती ती सरकारांतून बाद पडली. साा हल्लीं साल मजकूरापासून संस्थान मजकूर येथील लिहिण्याचें कामकाज सांगोन सालिना तैनात रुा

१२५ पेशजींची नेमणूक संस्थानाकडे पावत होतीं त्या प्रों रुा

१२५ जाजतीं सालमजकुरापासून.

२५०

एकूण अडीचशें रुपये करार करून दिल्हे असेत; तरी याजपासून सेवा घेऊन वेतन पावित जाणें. जाणजे. छ २९ जिल्काद. आज्ञाप्रमाण. मोर्तब.

पत्रांक १९९ श्री. १७०० माघ शुद्ध १

आशिर्वाद उपरी येथील क्षेम ताा माघ शुद्ध ११ गुरुवासर मुा नागपूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. जालनापूरचे मुकामचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. संताजीनाईक यांची भेट जाहाली, वर्तमान लिहिलें तें कळलें. त्यास, येथें आल्यावर सविस्तर लिहून पाठऊं. येथील प्रकार तरी छ २९ जिल्हेजचें पत्र श्रीमंतांचें आलें, त्या दिवसापासून पहिलें भाषण तें किमपि नाहीं. सफाईचेंच आहे. आम्हांस काल बोलावूं पाठविलें. देवडीवर गेलों. उभयतां होते. राजश्री मन्याबापूंस हळद लाविली. समारंभ जाहला. आह्मांस ह्मणों लागले कीं, गडगनेर कधीं करितां? आह्मी उत्तर केलें कीं, आमचीं मुलें माणसें येथें नाहींत. तेव्हां ह्मणों लागले कीं, चिंता काय, आह्मीं कोणाचे घरीं जेवण्यास जात नाहीं, उगेच येऊं, विडे घेऊं. तेव्हां उत्तर केलें कीं, उचित आहे, मर्जीस येईल तेव्हां घडेल. त्यास, गडगनेर करावें लागतें. पांच सातशें रुपयांचा खर्च आहे. न करावें तरी वाईट मानितील आणि ते होऊन सफाईवर येत असतां न करावें हें

विदित नाहीं. नवाबाकडील पत्रें आलीं होतीं. त्यांत त्यांनीं कायम मिजाजी-चेंच लिहिलें होतें. राजश्री जिवाजीपंत यांचेंहि पत्र आपणास आहे. बगाजीपंत यांणीं लिहिलें होतें कीं, नवाब श्रीमंतांकडे अनुकूल, फौजांची तयारी करविली आहे, परंतु संदेहांत आहेत, इंग्रेजांशीं बिघाड श्रीमंतांचा आहे, आपण निराळे आहों, त्यास कसें होईल, याजकरितां अंतस्त दोन्हीं सूत्रें ठीक, उघड श्रीमंतांचा पक्ष ऐसें बोलतात, ऐसें लिहिलें होतें. त्यावरून आह्मांस ह्मणों लागले कीं, नवाब आपला ह्मणतां; त्यास आइकिलें कीं! आह्मीं उत्तर केलें कीं, या दिवसांत नवाबांनीं फार केली. तेव्हां ह्मणों लागले कीं, आह्मीं कांहीं केली नाहीं. आह्मीं उत्तर केलें कीं, तुह्मीं केल्याची स्तुत काय करणें, नवाब परकी, हिंदुमुसलमान हे दोन पक्ष. वैरभाव भगवंत निर्मित आहे, या अर्थीं त्यांनीं फार केली, तुह्मीं केल्याचें आश्चर्य काय, हे दौलत आणि ते दौलत दोन हेंच लक्ष आमचे घरीं नाहीं, त्यांनीं करावें तेंच तुह्मीं करावें ऐसें आहे. ऐसें कित्तेक भाषण जाहलें. तेव्हां तेथें काय उत्तर करितात? इंग्रज गाडराकडून एक आला आहे. कलकत्त्यास जाणार. त्यास यांचें त्यांचें बोलणें होऊन जाईल. यांनीं गाडरास व कलकत्त्यास व जंगाकडे पत्रें या वर्तमानाचीं लिहिलीं आहेत. मल्हारीकडील हुंडी पटली कीं नाहीं, ह्मणोन लिहिलें. हुंडी पटेल. गुंता नाहीं. परंतु तुह्मीं तेथें गेल्यावर ऐवज कोणीकडे उतरावा, तें लिहिलें पाहिजे. हुंडी पांच सात दिवसांत पटेल. गुंता नाहीं. तुह्मी सत्वर जावें. सविस्तर वृत्त ल्याहावें. बहुत काय लिहिणें! लोभ कीजे हे आशिर्वाद. राजश्री जिवाजीपंत यांस फडणिशीचीं वस्त्रें शुद्ध पंचमीस दिल्हीं. अद्यापि बंदोबस्त कांहीं नाहीं. तिकडे रवाना करणार ते संधींत काय होईल तें लिहून पाठऊं. हे आशीर्वाद.

पत्रांक २०० श्रीशंकर १७०० माघ शुद्ध १०

राजश्रियाविराजितराजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसीं:—

पो। जिवाजी माहादेव काणे साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल माघ शुद्ध १० पावेतों मुक्काम नागपूर येथें सुखरूप असों विशेष. आपण गेलिया तागाईत पत्र पाठऊन समाचार न घेतला! तर माझें विस्मरण व्हावें हें नव्हतें. परंतु कां जालें हें नकळे! तर ऐसें नसावें. सदैव पत्र पाठऊन सांभाळ करीत गेलें पाहिजे. यानंतर आपण गेलियावर एकदां दोनदां निरोप जाऊन मागितला. परंतु प्रेमाचींच भाषणें केलीं. नंतर श्रीमंतांकडे जाऊन, एक प्रहर बहुतां प्रकारें भाषण करून काम द्यावेंसें ठराऊन आले. मग मजला बोलऊन नेऊन सांगितलें कीं, श्रमिंतांची मर्जी तुह्मांवर प्रसन्न करून आलों. आणि बहुत प्रकारें बोलिले. त्याजवर श्री पंचमीस आपण येऊन वस्त्रें फडणिशीचीं दिल्हीं. दुसरे सांगून दामाजीपंतासमागमें पाठविलें कीं, जें पूर्वी

सुदामत यांजकडे काम असेल त्याप्रो द्यावें. त्यांत उकरावयाचें नाहीं. मग आह्मांशीं बोलिले कीं, बळवंतराव यास पाठवितों, तुह्मींहि जावें, ह्मणजे माझी खातरजमा आहे. कबूल केलें. तो सर्व प्रकार मागील पत्रीं लिहिला आहे, त्याजवरून कळेल. प्रस्तुत तिकडील वर्तमान फार चांगलें आलें. त्याजपासून येथें लक्षुमणपंतदादा यांचा प्रेमा पूर्ववत्प्रमाणें करून द्यावयाचे संधानांत आहे. ईश्वर घडवील तें खरें. फार खट्ट तुह्मांवर आहेत. जो संदेह आपणापाशीं आह्मी जाते समई घेतला तो खरा शोध लागला. कळावें. आपण तेथें यांच्या गोष्टी समेटीच्याच बोलाव्या. त्या येथें तानकोबाचे हातें येथें कळाव्या. तो असेल त्या समई श्रीमंतांशीं चांगलें बोलावें कीं, येथें ऐकून दुःसंदेह येत नाहीं. येथें आह्मी प्रतिज्ञा करून दादापाशीं बोलिलों कीं, रावजी आपला प्रकार ईषत् मात्र व्यंग बोलणार नाहींत. आमचें त्यांचें मात्र न बनें. यास कारणं, दैव अथवा शनीश्वर आला हें नकळे, असें आपल्या प्रत्ययास रावजींचें बोलणें येईल तैसें घडावें. आह्मांस पाठवावयाचा सिद्धांत आहे. वद्य पंचमीस मुहूर्त आहे. मध्यें बळवंतराव यास मुहुर्तच नव्हता. यास्तव निघण्याचा विलंब मात्र जाला. कळावें. श्रीमंत राजश्री नाना यांस पत्र लिहिलें आहे तें पावेल. आपण तेथें आहेत तेव्हां मीं काय लिहूं ? सर्व आपण मागें केलें तैसें करतील. रावजी शेवटचे ऐसें जे जाले त्यांचा बयान काय लिहूं ? इंग्रजांस ऐसी शिकस्ती कोणी दिल्ही नव्हती. शिकस्ती देऊन आपला तोरा जायां न होतां आला, हें केवढें जालें ? यास जोडा नाहीं. श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे प्रतापास उपमाच नाहीं. गर्भापासून कृष्णचरित्रासारिखेंच जालें ! ध्यानास आणावें. धर्म रक्षावयास ईश्वर साह्य खरा ! हें आतां पटलें. कळावें बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ करीत गेलें पाहिजे. ही विनंति. इ० इ०

पत्रांक २०१. श्री. (नकल) १७०० माघ वद्य ३.

करार जाबता शपतपूर्वक राजश्री दादासाहेब यांचाः—

राजश्री माधवराव नारायण पंत प्रधान यांणीं विद्यमान राजश्री तुकोजी होळकर व माहादजी शिंदे सुा तिसा सबैन मया व अलफ. तुह्मांआह्मांशीं नानाप्रकारें विग्रह राज्यलोभास्तव वाढोन आह्मीं दौलत साधावी यास्तव प्रयत्न बहुत केला. इंग्रजांकडे जाऊन त्यास साह्य करून, बरोबर घेऊन इंदुरीतळेगांवपर्यंत आलों. परस्परें लढाईचा प्रसंग घडला. अंदेशा पाहतां आपण राज्यलोभाविष्ट झाल्यानें इंग्रजांकडे दौलत जाती असें जाणून उभयतां सरदारांकडे आलों. सरदारांनीं खर्चाची बेगमी करून देतों आणि स्नानसंध्या करून स्वस्थ राहावें असें सांगितलें. त्याप्रमाणें मान्य करून खर्चाची बेगमी अलाहिदा नेमणुकप्रमाणें नक्की बारा लक्षांची जागा लाऊन दिली. ती आपण घेऊन, स्नानसंध्या करून, झांशीस राहून, राज्याचा लोभ धरून दौलतीचा

वारसा करणार नाहीं, व दौलतीस वांकडें पडे असें आचरण आह्मांपासून होणार नाहीं. नेमणूक करून दिल्ही त्यांत सत्कालक्षेप करून स्वस्थ राहूं. तुह्मीं पंतप्रधान राज्याचे धणी व चिरंजीव बाजीराव रघुनाथ तुमचे कारभारी करून घ्यावे, असें उभयतां सरदारांचे व आमचे विचारें ठरून, आह्मीं मान्य झालों. तुह्मीं व चिरंजीव बाजीराव यांणीं तीर्थरूप कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब धणी व कारभारी या अन्वयें वर्तत होते त्याप्रमाणें प्रबुद्धपण आलियावर परस्परें वर्तावें. स्वामीसेवकधर्म उभयतांनीं अन्योन्य निःकपटपणें चालवावा. धणीपणाची व कारभाराची पुस्तपन्हा तुह्मीं उभयतांची उभयतां सरदार करितील. आह्मीं या दौलतसंबंधीं कारभाराच्या प्रकरणांत एकंदर मन घालणार नाहीं. वर्तणुकेच्या कलमबंदीची याद अलाहिदा लिहून दिली आहे त्याप्रमाणें आचरण करूं. उभयतां सरदारांचे विद्यमानें परस्परें करार ठरले आहेत, त्याप्रमाणें तुह्मांकडून अमलांत यावें. आह्मांकडूनहि अमलांत येईल. यांत अंतर करूं तर श्रीसांबाची व गंगाभागीरथीची शपत असे. जाणिजे. छ १५ माहे मोहरम, सुा तिसा सबैन मया व अलफ. मुकाम इंदुरी तळेगांव.

पत्रांक २०२ श्री १७०१ चैत्र शुद्ध १

हिशेब गुा साहूकार बाा राजश्री माहादजी शिंदे यांजकडे ऐवज येणें सुा तिसा सबैन मया व अलफ. शके १७०१ चैत्र शुा प्रतिपदा. रुा

५६४२९॥• बाा खत ऐन मुद्दल व व्याज रुा

३१०८७ ऐन मुद्दल मिति कार्तिक शुा ३ शके १६९३ बाा खत.

२५३४२॥• व्याज ईा ताा शके १७०१ चैत्र शुा १ मुा माहे एकूण कच्चे २७६४६७० दरसदे रुा एक प्रो रुा २७६४६॥= पौ वजा बारोत्रा रुा २३०३॥≡ बाकी व्याज रुा

५६४२९॥•

१४४०५।• पेशर्जी हिशेब जाला ते समईचीं कलमें व्याज बाा ऐवज रुा

१००० वेंकाजी नाईक मनसबदार यांस शिंदे यांणीं द्यावयासीं केले आहेत. रुा

१८०० लाख रुपयांची वरात शिंदे यांणी रायपूर येथें कार्तिक शुा १ चे मुदतीची दिल्ही. मुदतीस ऐवज न पावला तर ऐवज पावेल ते मुदती पावतों व्याज द्यावयाचा करार आहे.

त्यास वरातेचा ऐवज मार्गशीर्ष शुा ११ स आला. त्याचें व्याज मुा माहे १८२४ कचे १८००० एा दर सदे रुा १ प्रो रुा

७२०० पहिले खतांत ऐवजास साहा महिन्यांची मुदत असतां एक वरीस वजा केलें तेव्हां सहा महिन्यांचें मुद्दल रुा ११९५२२॥ अजमासें व्याज येणें रुा

११९६ अधिक मास वजा करावयाचा शिरस्ता नसतां अधिकमास वंजा केला. त्या एक महिन्याचें व्याज अजमासें येणें.

३२०९।· बारोत्रा सुटीचा शिरस्ता नाही बिनसूट आहे. त्यास सूट घातली ते रुा

१४४०५।·

७०८३५

पत्रांक २०३. श्री. १७०१ चैत्र शुद्ध १२.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री लक्ष्मणपंत स्वामीचे सेवेसीं:—

पो जनार्दन आपाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष. तुह्मी पत्र पा तें चैत्र शुद्ध १२ द्वादशीस पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळाराव यांणीं बक्षीगिरीची असामी सरकारांतून करार करून घेतली, त्याविशीं राजश्री बाबांनीं लिहिलें, त्याचें उत्तर पा आहे. प्रविष्ट करणें. इकडील वर्तमान: इंग्रज मुंबईकर तळेगांव पावेतों आले होते. त्यांचें पारपत्य होऊन कौल घेऊन गेले. त्यांनीं हिंदुस्थानांतून आणविले होते ते सुरतेस गेले. श्रीमंत दादासाहेब यांसीं इंग्रजांनीं उभयतां सरदारांचे हवाला केलें. त्याज बा चाकरीस फौज सरदारांची देऊन त्यांनीं झांशीस राहावें, तिकडेच बारा लक्षांचा सरंजाम द्यावा, या प्रों करार होऊन त्यांची रवानगी जाली. प्रस्तुत टोंक्यासं आहेत. पुढें जातील. वरकड इकडील उभयतां कारभारी होते. त्यांतून श्रीमंत रा सखारामपंत बापू यांची फितुराचीं पत्रें सांपडलीं. याजकरितां त्यास कैद करून किल्ले सिंहगड येथें ठेविले आहेत. प्रस्तुत कामकाज अवघें श्रीमंत रा नाना व राजश्री हरीपंत तात्या करीत आहेत, श्रीमंत रावसाहेब यांची मुंज वैशाख शुद्ध ५ स आहे. पुण्यास होत आहे. हें जालेयाउपरी उभयतां

सरदारांची रवानगी होईल. तथापि छावणी देशी होऊन, उपरान्त त्याप्रों येतील—कळावें- या छ ११ रोवल बहुत काय लिहिणें! लोभ असों दीजे. हे विनंती.

पत्रांक २०४ श्री. १७०१ ज्येष्ठ वद्य १

राजश्री फत्तेसिंग गायकवाड समशेरबाहादूर गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय. कुशल लिहित जावें. बहुत दिवस तुह्मांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहिणें. इकडील मजकूर तरीः खासा स्वारीबराबर हरी बाबाजी व राजश्री महादजी शिंदे यांजकडलि सरदार होते. त्यांणीं बहुत अमर्यादा केली. त्याजमुळें त्यांचें पारपत्य करून, खासा स्वारी तिकडे येत आहे. त्यासीं तुह्मी शाहाणे माणूस, कारस्थानी आहां, याजकरितां तुह्मांकडे येत आहों. यासी, येविशीं तुमची सलाह कशी काय ते लेहून पाठवणें. तिकडे आल्यावरी तुमच्या विचारें जसा मनसबा करणें तसा केला जाईल. जाणिजे. छ १४ जमादिलावल. इंग्रेज आह्मांस सामील आहेत. तें तुम्हांस ठाऊकच आहे. त्याचीहि फौज बोलाविली आहे. तेहि लौकरच येऊन पोंहचतील. बहुत काय लिहिणें !

पत्रांक २०५. श्री. १७०१ अधिक श्रावण शुद्ध ११.

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी:—

श्रीसकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबाहादर दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. सांप्रत्य इकडील वर्तमान राजश्री दादासाहेब सुरतेस शहरांत आहेत. इंग्रेजांकडील सरंजाम तापीदक्षणतीरीं रयतेचीं घरें मोडून, नवीन इमारत उभी करून लोकांच्या घरांत छावणी केली आहे. याजमुळें लोक परागंदा होऊन गेले. लावणी-आबादीस ठिकाण नाहीं. माहाल खराब, बेचिराख जाले. रयतेस उपद्रव. पुढील भरवंसा न पुरे. याजकरितां तमाम माहाल उज्याड जाहाले. हालीं राजश्री दादासाहेब यांणीं अमदाबाद, बडोदें व डभईकडे राजाराम गोविंद याची रवानगीचा विचार ठरवला. शहराबाहेर येऊन राहिले होते. ते महकूब होऊन, गाजुदीखान याची उभारणीचा निश्चय करून, नर्मदा अलीकडील बंदोबस्ताकरितां पाठवावें. समागमें, सरंजाम, पलटणें व स्वार व तोफा देऊन पाठविणार, ह्मणोन बातमी आली आहे. अद्याप तेथेंच आहेत, इकडे येऊन बखेडा करणार. ये विसींचा बंदोबस्त ठेविला पाहिजे. स्वस्थतेचा अर्थ

कांहीं दिसोन येत नाहीं. याजकरितां महीपलीकडे खंबायतकराच्या तोंडावर तीन हजार फौज पेशजीं रवाना केलीच आहे. सुरत प्रांतीं थोडी बहुत फौज आहे. आह्मीहि मासपक्षांत निघावयाचे तरतुदींत आहों. परंतु फौजेचा देण्याचा पेंच तीन वर्षांचा जाला. त्याचा गवगवा पडला आहे. याची सोय करून निघावयाचें होईल. सरकारच्या फौजेची रवानगी होऊन लौकर आल्यास उत्तम आहे. वरकड तिकडील बातमी जैसी येत जाईल तैसी मागाहून लिहून पाठऊं. रवाना छ १० माहे रजब. बहुत काय लिहिणें? लोभ करावा. हे विनंती. मोर्तब सुद.

श्री राजा शाहु नरपति
चरणीं तत्पर फत्तेसिंग
गायकवाड सेनाखास-
खेल समशेरबहादर:

पत्रांक २०६. श्री. १७०१ अधिक श्रावण शुद्ध ११

राजश्री महादजी बाबा शिंदे गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. सांप्रत्य इकडील वर्तमान राजश्री दादासाहेब सुरतेस शहरांत आहेत. इंग्रजांकडील सरंजाम तापी दक्षण तीरीं आहे. रयतेचीं घरें मोडून, इमारत नवीन उभी करून, लोकांच्या घरांत छावणी केली आहे. याजमुळें लोक परागंदा होऊन गेले. लावणी आबादीस ठिकाण नाहीं. माहाल खराब, बेचीराख जाले. रयतेस उपद्रव. पुढील भरंवसा न पुरे. तमाम माहाल उज्याड जाले. हालीं राजश्री दादासाहेब यांणीं अमदाबाद, बडोदें व डभईकडे राजाराम गोविंद यांची रवानगीचा विचार ठरविला. शहराबाहीर येऊन राहिले होते, तें तहकूब ठेऊन, गाजुदीखान याची उभारणी करावयाचा निश्चय करून, नर्मदा अलीकडील बंदोबस्ताकरितां पाठवावें, समागमें सरंजाम पलटणें व स्वार व तोफा देऊन पाठिवणार, ह्मणोन बातमी आली आहे. अद्याप तेथेंच आहेत. इकडे येऊन बखेडा करणार येविसींचा बंदोबस्त ठेविला पाहिजे. स्वस्थतेचा अर्थ कांहीं दिसोन येत नाहीं. याजकरितां महीपलीकडे खंबायतकराचे तोंडावर तीन

हजार फौज पेशजीं रवाना केलीच आहे. सुरतप्रांतींहि थोडीबहुत फौज आहे. आह्मीं मासपक्षांत निघावयाचे तरतुदींत आहों. फौजेचा देण्याचा पेंच तीन वर्षांचा जाला. त्याचा गवगवा पडला आहे. त्याची सोय करून निघावयाचें होईल. सरकारच्या फौजेची रवानगी होऊन लौकर आल्यास, उत्तम आहे. वरकड तिकडील बातमी जैसी येत जाईल, तैसी मागाहून लेहून पाठवूं. कळावें. रवाना छ १० माहे रजब. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक २०७. श्री. १७०१ अधिक श्रावण वद्य ३

राजश्री वेंकटपती तिमया नायडू संस्थानक गोंदी गोसावी यांसीः—

अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद. सुा समानीन मया व अलफ. राजश्री बाजी गोविंद यांचें कर्ज सुभाणा गिरमाजी व पांडुरंग गिरमाजी हरकारे यांजकडे त्रिंबकराव विश्वनाथ यांचे विद्यमानचे स्वारीचें येणें आहे. त्यास, सन अर्बासबैनांत सुभाणा गिरमाजी यास आणिलें. तें समईं त्यांणीं करार केला कीं महिन्याभरानें अर्काटहून हुंडी करून ऐवज पाठवितों. असें असतां अद्याप हुंडी आली नाहीं व जाबसाल देखील पाठविला नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जालें. ऐशियास, येविशींचें काम रा बनाजी गोविंद कारकून यांस सांगोन पाठविलें आहे. तरी, तुह्मी सुभाणा गिरमाजी व पांडुरंग गिरमाजी यांस बरे वजेनें ताकीद करून, मार, निल्हेचा वाजवी खताप्रमाणें व्याजसुद्धां हिशेब होईल तो ऐवज अर्काटचे सराफांत भरून, हुंडी करून, पुणियास जलद पाठऊन देणें. या कामास दिवसगत न लावणें. जाणिजे. छ १७ रजब. आज्ञाप्रमाण लेखनसीमा.

श्री

राजाशाहु नरपती हर्षनिधान माधवराव नारायण मुख्य प्रधान ॥

पत्रांक २०८. श्री. १७०१ अधिक श्रावण वद्य ९

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसीः—

श्रीसकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादूर दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान राजश्री दादासाहेब व इंग्रेज यांजकडील पेशजीं तिकडून बातमी येत गेली त्याप्रमाणें आपणाकडे लेहून पाठविलें, त्यावरून ध्यानास आलें असेल. सुरत प्रांतीं माहालोमाहालीं ठाणीं बसऊन कमावीसदार पाठविले होते. डभईस आपाजी आईतोळे यांजबरोबर सरंजाम देऊन रवाना केलें. थोडा बहुत सामान समागमें घेऊन, नर्मदा उतरून, झाडेश्वरीं आले, ते माघारे सुरतेकडे गेले. गाजुदीखान यांजला अमदाबाद बडोदें महीपार पाठवावें, ऐसें होतें. ते मसलत तूर्त राहिली. हालीं बातमी आली कीं, इंग्रेज यांणीं अष्टाविसींतील कमाविसदार बलाऊन घेतले. मसलतीचा मजकूर कळणियांत आला नाहीं. काय ठरलियांत आला असेल तो खरा. आह्मीं बाहिर निघावयाचे तरतुदींत आहों. फौजेच्या देण्याचा पेंच तीं वर्षांचा पडला आहे. लोकांनीं गवगवा फार केला आहे. याची समजोती काढोन निघावयाचें होईल. सुरतेकडील बातमी जैसी येईल तैसी लिहून पाठऊं. रवाना छ २३ माहे रजब. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंती. मोर्तबसुद.

श्री राजाशाहुनरपति-
चरणीं तत्पर फत्तेसिंग-
राव गायकवाड सेनाखास-
खेलसमशेरबाहादर.

पत्रांक २०९. श्री. १७०१ अधिक श्रावण वद्य १०

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबाहादूर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान राजश्री दादासाहेब व इंग्रज यांजकडील पेसजीं तिकडून बातमी येत गेली, त्याप्रमाणें

आपणाकडे लेहून पाठविलें. त्यावरून कळलें असेल. सुरत प्रांतीं माहालो-माहालीं त्यांणीं ठाणीं बसविलीं होतीं. डभईस आपाजी आईतोळे याजला सरंजाम देऊन पाठविले. थोडाबहुत सामान समागमें घेऊन नर्मदा नदी उतरून झाडेश्वरीं आले, ते माघारे उतरून सुरतेकडे गेले. गाजुदीखान यासीं अमदाबाद व बडोदें महीपार पाठवावें, ऐसें होतें. ते मसलत तूर्त राहिली. सांप्रत्य, बातमी आली कीं, इंग्रेजांनीं अठाविशींतील कमावीसदार बोलावून घेतले. मसलतीचा मजकूर कळलियांत आला नाहीं, ठरल्यांत आला असेल तो खरा. आह्मीं बाहिर निघावयाचे तरतुदींत आहों. फौजेचा देण्याचा पेंच तीं वर्षांचा पडला आहे. लोकांनीं गवगवा बहुत केला आहे. याची समजोति काढोन निघावयाचें होईल. वरकड बातमी तिकडील येईल तैसी लिहून पाठवूं. रा छ २४ माहे रजब. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे. हे विनंती. मोर्तबसुद.

श्री राजा शाहु नरपति चरणीं
तत्पर फत्तेसिंगराव गायकवाड
सेनाखासखेल समशेर
बहादर ॥

पत्रांक २१०. श्री. १७०१ श्रावण शुद्ध ४.

राजश्री पंतप्रधानें गोसावी यांसी:—

श्रीसकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबाहादर दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष राजश्री अंताजी नागेश येथें आले. त्यास दरबारचे वगैरे जाबजाल पुसिले. येथून दरबारचे भरण्यास ऐवज दरसाल देत गेलों. तो सरकारांत न पावतां सरकारचा पेंच तसाच राहिला. असेंहि असतां, इतके दिवस चालविलें. पुढें आमचे घरांतील पेंच. मारनिल्हेचा पहिलेपासून बखेडखोर कारभार. या अर्थी याचा

बंदोबस्त करणें आला. येविसीचें सविस्तर राजश्री बाळाजी नाईक निवेदन करतील. त्यावरून विदित होईल. रा छ २ माहे शाबान. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंती. मोर्तबसुद.

श्रीराजा शाहुनरपति
चरणीं तत्पर फत्तेसिं-
गराव गायकवाड सेना-
खासखेल समशेरबा-
हाद्दर ॥

पत्रांक २११ श्री. १७०१ श्रावण शुद्ध ४

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फतेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहाद्दर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. राजश्री अंताजी नागेश येथें आले. त्यास, आजपर्यंत सर्व प्रकारें येख्तीयार मारनिलेवर ठेऊन चाललों. इकडे आह्मी मसलतसीर, असेंहि असतां, दरबारची पुरवणी करीत गेलें. आजपर्यंत दरबारचा गुंता उरकावा, व राजश्री बाळाजी नाईकाचे देण्याची तोड निघावी, याप्रों येथून पुरावा केला. असें असतां, दरबारचा व नाईकाचे देण्याचा पेंच तसाच राहिला. यांचें येणें येथें न जालें. यामुळें दरबारचा जाब समजल्यांत न आला. गुदस्तां तिकडून आह्मांकडे आले. त्यास, आह्मांस न भेटतां माघारे गेले. ते दुसाणीयास जाऊन बसले. दरबारींहि न गेले. दरबारचा शोध त्यांशिवाय मनास आणावा तरी, हे पहिलेपासून बखेडेखोर. आह्मी मसलतसीर. घरांतील खुळें नानाप्रकार्ची. फौजेचा पेंच. चहूंकडे बखेडे. त्याअर्थी कांहींच मनास न आणितां चालविलें. पुढें पाहतां कोण्हे एक गोष्टीनें परिणाम दिसोन न आला. यामुळें मारनिलेचा बंदोबस्त करणें प्राप्त जालें. येविसीचें सविस्तर राजश्री बाळाजी नाईक निवेदन करतील. तें ध्यानांत आणून, बंदोबस्त करुन दिल्हा पाहिजे. तात्या ! आमचा तुमचा भाऊपणा. त्यापक्षीं तुह्मीं सांगितलें त्याप्रों तेंच लक्ष धरून इतके दिवस काहाडले. पुढें परिणाम सुध दिसों न आला. यास्तव हें करणें प्राप्त

हे अनभव आपल्यास आले असतील. सर्व भर्वसा आपला आहे. रा छ २ माहे शाबान बहुत काय लिा ? लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसुद. शिका (मागें दिल्याप्रमाणें).

पत्रांक २१२. श्री. १७०१ श्रावण शुद्ध ४.

पो मिती श्रावण वद्य २ रविवार.

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ कृतानेक सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २ माहे शाबान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडे पेशर्जी भास्करपंतास पाठविलें. त्या पत्रांचीं उत्तरें आपण आषाढ शुद्ध २ पाठविलीं व हालीं शुद्ध ३ आलीं. त्यास, पहिलीं पत्रें आशाढ वद्य १३ चीं साहा दिवसांचे वाईद्याचीं तीं पावलीं नाहींत. द्वितीयेचे पत्राचीं उत्तरें पाठविलीं तीं पावलींच असतील. त्यावरून कळलें असेल. राजश्री अंतोबा बाबांचा मजकूर तेथून भास्करपंताचे पत्रीं लिा कीं, तूर्त जलदी न करावी. दुसाण्याकडील बंदोबस्त जालियावरी उपरांत करणें तें करावें. आमचें लक्ष त्यांचे ठाई दुसरें नव्हतें. परंतु यजमानाचें त्याचें दिवसें दिवस वांकडें पडत चाललें. आण आपण पत्रें साहा रोजांचे मुदतीचीं पाठविलीं तीं पत्रें आह्मांस न पावलीं. व कासिदाचें ठिकाण नाहीं. तीं पत्रें त्यांस सांपडलीं. कशावरून ह्मणावें ? तरी बापूजी नरसी यांजपाशीं आपले पत्रांतील मजकूर बोलले. ते मशारनिलेनीं आजपर्यंत आम्हांशीं बोलले नव्हते. तें प्रस्तुत सविस्तर सांगितलें. व त्या गृहस्थाची चेर्या एक प्रकारची दिसून आली. येथील संशयाचा प्रकार कांहींच घडल्यांत नव्हता, आपलीं पत्रें आलीं त्याचें ठिकाण नाहीं. यांचा प्रकार निघोन जावयाचा यजमानास समजला. तेव्हां यजमानानें बंदोबस्त केला. दुसरें, राजश्री बापूजीपंताशीं बोलून त्याचें उत्तर पाठवावें, ह्मणजे सरकारचीं पत्रें पाठवितों, दरबारचा बंदोबस्त केला आहे, म्हणोन लिहिलें. त्यास, याचीं उत्तरें पेशर्जी आपणास लिहिलें होतें कीं, बापूजीपंत मारनिल्हेचे ममतेंत, यामुळें आम्हीं त्यांसीं बोललों नाहीं. उभयपक्षीं परस्परें संशय. परंतु पेसर्जी आपली चिठी आली, व हालींचे पत्रीं लिा, यामुळें बापूजीपंताशीं ममतेचें बोलून चिठी दाखविली. याजवर त्यांनीं आह्मांस सांगितलें कीं, जें आमचें यजमानाचें लक्ष तेंच आमचें, दुसरा विचार नाहीं. ह्मणून यांचें व आमचें बोलणें जालें. ऐवजाचा मजकूर खासगत व सरकारचा जाबसाल. त्यास सरकारचें लक्ष राहून आपली सचोटी राहावी, याअर्थीं सर्व प्रकारें येथील वोढ सोसून, ऐवजाचा भरणा करीत गेलों. याचे अर्थ सर्व ध्यानांत असतील व पुढें समजतील. दरबारची तोड निघावी व आपले देण्याचा मार्ग निघाला पाहिजे. त्यास, येथील प्रकार दौलत सर्व प्रकारें

बोढीस आली. शिबंदीचे व शिलेंदारांचे नित्य तंटे ! अशांतहि दरबारचा व आपले देण्याचा मार्ग काढिला पाहिजे. त्याचे तरतुदींत आहों. परंतु निभाऊन घेणें सर्व आपणाकडे आहे. येथील रड लिहितात, असें आपल्या समजल्यांत येईल. त्यास, परभारें समजलें तें खरें. आह्मीं कांहीं कारभारी नाहीं. दरबारी आपल्याशिवाय दुसरियास जाणत नाहीं. सर्व कारभार आपला व दौलतीचें संरक्षण करणें आपणाकडेसच आहे. आपले आज्ञेशिवाय दुसरा विचार नाहीं. आपली आज्ञा तें प्रमाण. आज्ञा प्रो वर्तणूक घडेल. वरकड सविस्तर राजश्री बापोजी नरसी लिहितील, त्याजवरून कळेल. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक २१३. श्री. (नक्कल) १७०१ श्रावण शुद्ध ४

राजश्री गोंदबा स्वामीचे सेवेसीं:–

विनंती उपरी. तुह्मी श्रीमंत राजश्री नानास व राजश्री बाळाजी नाईक नानांस पत्रें पा तें पाहून वर्तमान कळलें. लिहिल्याप्रमाणें सरकारचे ऐवजाचा निकाल पडल्यास सारी प्रमाणिकता आहे. नाईक पुष्कळ खातरजमा करितात. परंतु, श्रीमंताचे प्रत्ययास आले पाहिजे की नको ? येविंशीची काळजी धरून सरकारचा निकाल लवकर पडेसें करावें. सविस्तर नाईकाचे लिहिल्यावरून कळेल. बंधूविशीं काळजी न करावी. तजविजेनें आणऊं. शिलेदाराचा मजकूर कसकसा आहे तो लिहून पाठवावा. रा छ २ साबान. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंती.

रा मिती भाद्रपद शुद्ध* २ रविवार.

पत्रांक २१४. श्री. १७०१ श्रावण शुद्ध ६

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

पोष्य बाळाजी महादेव सां नमस्कार विनंति. येथील कुशल ता छ ४ साबान मुकाम बडोदें यथास्थित असे विशेष. येथून राजश्री बापूजीपंत यांनीं आपल्यास पत्र लिा आहे. त्याजवरून सविस्तर समजेल व आह्मीं आपल्या लाखोटियांत श्रीमंत राजश्री तात्यांस पत्रें लिहिलीं आहेत तीं आपण पाहून एकांतीं तात्यांस द्यावीं. सर्व बंदोबस्त येथिल आपल्याकडे आहे. आह्मीं ल्याहावें असें नाहीं. बहुत काय लिहिणें ! कृपालोभ असों दीजे हे विनंती.

---

* पत्र छ २ साबान ह्मणजे श्रावण शुद्ध चतुर्थीला लिहून ठेविलें व रवाना भाद्रपद शुद्ध २ ला ह्मणजे पुढें सुमारें महिन्यानें केलें, असें दिसतें.

पत्रांक २१५ श्री १७०१ श्रावण शुद्ध ११

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांस:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहाद्दर दंडवत× विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. राजश्री अंताजी नागेश येथें आले. त्यांस आजपर्यंत सर्वप्रकारें येख्तीयार मारनिल्हेवर ठेऊन चाललों. इकडे आह्मीं मसलतशीर असेंही असतां दरबारची पुरवणी करीत गेलों. आजपर्यंत दरबारचा गुंता उरकावा व राजश्री बाळाजी नाईक याचे देण्याची तोड निघावी, याप्रमाणें येथून पुरावा केला. ऐसें असतां, दरबारचा व नाइकाचे देण्याचा पेंच तसाच राहिला. यांचें येणें येथें न जालें. यामुळें दरबारचा जाबसाल समजल्यांत न आला. गुदस्ता तिकडोन आह्मांकडे आले त्यास, आह्मांस न भेटतां माघारे गेले, तो दुसाणीयास जाऊन बसून राहिले. दरबारींहि गेले नाहीं. दरबारचा शोध त्यांशिवाय मनास न आणावा, तरी हे पहिलेपासून बखेडेखोर. आह्मीं मसलतसीर. घरांतील खुळें नानाप्रकारचीं. फौजेचे पेंच, चहूंकडे बखेडे. त्याअर्थी कांहींच मनास न आणितां चालविलें. पुढें पाहतां, कोण्हे एक गोष्टीनें परिणाम दिसोन न आला. यामुळें मारनिलेचा बंदोबस्त करणें प्राप्त जाला. ये विसींचें सविस्तर राजश्री बाळाजी नाईक निवेदन करितील. तें ध्यानांत आणून, बंदोबस्त करून दिला पाहिजे. सर्व भरवसा आपला आहे. रा छ ९ माहे शाबान. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंती. मोर्तबसुद.

शिक्का मागें दिल्या प्रमाणें.

पत्रांक २१६ श्री. १७०१ श्रावण वद्य ३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोंदबा स्वामी गोसावी यांसी:—

पोष्य बाळाजी नाईक भिडे कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. तुह्मीं पत्रें लिहिलीं त्या अन्वयावरून शिंदे व होळकर यांनीं गोविंदराव यांचे पेंच वांटणीचे घातले होते ते सरकारांतून दूर करविले. आणि तुह्मीं लिहिल्याअन्वयें सरकाराच्या कारभाराचा ठराव करून घनशाम नारायण व गोपाळराव रामचंद्र व बापू नरसी यांची रवानगी तुह्मांकडे केली. त्यास पांचा महिन्यानें मान्यपत्रें पाठविलीं ह्मणून लिहिलें. त्यास, हा लग्नाचा कारभार ह्मणऊन सरकारांत मान्यपत्रें पाठविलींत ? कीं सरकारचा कारभार जो केला त्या मुदतीप्रों रुपये न पाठवितां बयान लाऊन लिहितां ? हें बरें कीं काय ? तुमच्या लिहिल्यावरून या कामांत आह्मीं येऊन ठरावांत आणिलें. त्याचें फळ कीं सर-

कारांत बलाऊन फजित करितात. आणि तुह्मीं बडोद्यामध्यें स्वस्थ बसावें. शिबंदीचे व इंग्रजाचे बयान घालून लिहितां, हें अपूर्व आहे! त्यास हालीं सरकारांतून राघो गोविंद पाठविले आहेत. तर पत्रदर्शनीं ऐवज देऊन यांची रवानगी करावी. तुह्मीं तों लिहित नाहीं. परंतु बाहेर ऐकतों कीं, तुमचे यजमान तुमचे स्वाधीन नाहींत. आइसें असतां, आह्मांस कारभार विलेस लाऊन घ्यावा ह्मणऊन आह्मांस लिहित होतेत तें कशास? आतां लिहिलेंत, तर हरतजवीज करून सरकारचा कारभार निर्गमास आणतांच उत्तम आहे. न आणिल्यास तुमची स्थित राहणार नाहीं. हें स्पष्ट समजऊन वर्तावें. यांतच ऊत्तम आहे. निखालस आपले जातीवर न जावें.

विनंति उपरी. घनश्याम उभयतां अंतोबाकडील दोघे येथें येऊन, आह्मांस घेऊन सरकारचा कारभार विलेस लावून, सरकारचे कागदपत्र घेऊन गेल्यास आज सा महिने होत आले. तर कारभारीयांस आपण ताकिद करून आइवज सरकारच्या कराराप्रों पाठवावा, तो न आला. ठराव आपले मतें केला कीं आपले आज्ञेनें केला, हें आह्मांस कांहींच कळत नाहीं. तर, हालीं राजश्री राघो गोविंद सरकारांतून पाठविले आहेत. तर कराराप्रों ऐवज देऊन यांची रवानगी करावी. न केल्यास आपले दौलतीस पेंच पडेल, हें पुरतेपणीं चित्तीं आणून वर्तावें.

पत्रांक २१७ श्री १७०१ श्रावण वद्य ५

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत विनंति. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान दोन तीन पत्रीं आपणांस लिहिलें आहे. त्यावरून ध्यानास आलें असेल. सरकारी वोढगस्त जाली. सरकार ऐवजाची निकड. याचा फडशा व्हावा. अर्थीं सर्व प्रकारें वोढ सोसून ऐवजाचा पुरावा करीत गेलों. ऐसें असतां राजश्री अंताजी नागेश यांणीं सरकार व सावकार सचोटी राखिली नाहीं. हें मनास आणावें तरी आह्मी मसलतसीर आणि घरांतील नाना प्रकारचे पेंच. प्रसंग चहूंकडून विस्कलित, मारनिले गुदस्तां आह्मांकडे यावयासी आले. ते न भेटतां माघारें गेले. ते दुसाणीयास जाऊन राहिले. दरबारींही न गेले. प्रस्तुत आल्यावर मारनिले यांस सांगितलें कीं, दौलतीचा व दरबारचा बंदोबस्त करणें व मागें कारभार येख्तीयारीनें केला तो समजोन द्यावा. तें पुसल्यास ठिकाण नाहीं. ऐसें पक्केंपणें दृष्टीस आल्यावर मारनिले यांचा बंदोबस्त करणें प्राप्त आला. पुढें पाहतां, सरकार व सावकार व दौलतीचा पेंच भारी. येविसींची पैरवी

होऊन मागील पुढील आमचे अर्थ आपणांस समजलेच पाहिजेत, ह्मणोन राजश्री बाळाजी नाईक भिडे यांजकडे राजश्री बाळाजी अनंत पा आहेत. हे सविस्तर मजकूर नाइकांस निवेदन करतील. तें ध्यानास आणून आपल्याजवळ नाईक बोलतील त्याप्रमाणें बंदोबस्त करून द्यावा. दौलत पेंचांत आली. मुलुखांत जीव राहिला नाहीं. हमेशा फौजेचा हंगाम. सर्व आपल्या ध्यानांत आहे. त्यास सरकार व सावकार यांचे पेंच उलगडून दौलतीची स्थिति राहे तें करावें. रा छ १९ माहे शाबान. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक २१८. श्री. १७०१ श्रावण वद्य ५

श्रीमंत राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ साष्टांग नमस्कार विनंतो येथील कुशल ता छ १९ माहे साबान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री सेनाखासखेल समशेरबहादर यांचें व राजश्री अंतोबा बावांचें परस्परें वैमनस्य जाल्याविशींचें सविस्तर पेशजी पत्रीं लिा आहे त्यावरून ध्यानांत आलेंच असेल. अंतोबा बावांचें व यजमानांचें यथास्थित रीतीनें चालावें यास्तव आज दिवसपर्यंत दोहीं पक्षीं चांगलेंच निभावलें. प्रस्तुतकाळीं हे येथें आले. यजमान साहेबांनीं त्यांस कित्तेक प्रकारें सांगितलें. आपणही त्यांस सांगावयाचे रीतीनें सांगत गेलों. परंतु यांचें त्यांचें यथास्थित न राहतां वांकडें पडोन नासलें. हें सविस्तर यजमानांनीं आपणांस लिहिलें आहे. व राजश्री बाळाजी अनंत यांसी राा बाळाजी नाईक भिडे यांजकडे पाठविले आहेत. इकडील अर्थ नाईक आपणांसीं बोलतील. ते ध्यानांत आणून बंदोबस्त यथास्थित करून द्यावा. सर्व प्रकारें भरंवसा आपला आहे. वरकड इकडील सविस्तर राजश्री बालाजीपंत आपणांस लिहितील त्याजवरून ध्यानास येईल. आह्मांस सर्व प्रकारें आधार स्वामीचा आहे. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ करावा हे विनंती.

पत्रांक २१९. श्री. १७०१ श्रावण अखेर

पो मिति भाद्रपद शुा १ मंदवार.

श्रीमंत राजश्री बाळाजीनाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. येथून पत्रें एक दोन शेवेसीं पाठविलीं तीं पावलींच असतील. त्यावरून निवेदन जालें असेल. दरबारचा बंदोबस्त यथास्थितपणें राखावा. इकडील कांहीं चिंता न करावी. ऐवजाचे तरतुदींत असों. पक्केपणाचें बोलणें आमचें व राजश्री बापूजी नरसी यांचें

करून मागाहून सविस्तर लेहून पाठवितों. दरबारचीं पत्रें घेतलीं आहेत, तीं पाठवितों, ह्मणून एक दोन पत्रीं लिहिलीं असतां, अद्याप येत नाहींत. तरी तीं पत्रें पाठवावीं. चिरंजीव राजश्री नारोबानाना आपणापाशीं आणलेच असतील. तत्राप, आले नसले तरी बहुतशी वोढ न करावी. रा शिंदे याजकडील बंदोबस्त करून घ्यावा. वरकड, पेशर्जी बापूजी नरसी व बाळाजी महादेव यांनीं आपणांस व सरकारांत पत्रें लिहिलीं आहेत. त्यावरून सविस्तर अवगत जालें असेल. दोन चार वेळां आपणाकडे पत्रें रवाना केलीं असतां, आपल्यास पत्रें पावल्याचें उत्तर येत नाहीं हें काय समजत नाहीं. मार्गांत कांहीं दिकत पडली असेल तर नकळे. आपण येथील बंदोबस्त करून घेतला आहे. तो पक्केंपणेंच असेल. पत्रें पाठवून द्यावीं. मार्गाची सावधतेविशीं ताकीद काशिदास करावी. वरकड येथील सर्व आपणाशिवाय कांहीं दुसरा अर्थ नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पत्रांक २२०

पो मिती आश्विन शुा ५ गुरुवार श्री. १७०१ भाद्रपद वद्य ८

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २२ माहे रमजान पर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण भाद्रपद शुा ९ चीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिा सविस्तर कळलें. दरबारी मजकूर लिा व ऐवजाविसीं निकडीनें लिहिलें. त्यास, येथून पर्याय लिहिलें तरी आपणांस प्रमाण वाटत नाहीं. अस्तु! ऐवजाची रवानगी केली आहे. पावतील. वरकड योगीराजाचा वगैरे संशय मनांत आणून लिा. व आह्माकडील कोण्ही न्यून्य बोलणार ते समजावीत असतील. त्यास, यजमानसाहेबांची निष्ठा श्रीमंतांसी दुसरी कोण्हे कालीं होणार नाहीं. हे खातरजमा आपणांस असेलच. वरकड आमचा विचार आपल्याशिवाय किमपि होणार नाहीं. शिंदे यांजकडील राजकारण राखावें. त्यास, ते येथें आले आहेत. आपले नजरेस येईल तसें करावें. येविसींचे पेशर्जी सविस्तर लिा आहे. त्या अन्वयें बंदोबस्त करावा. गकारनामक यांसी कामांत घ्यावें न घ्यावें तें लिहावें ऐसें लिहिलें. त्यास, त्यांचीं पत्रें आह्मांकडे आलीं होतीं. त्यास, आह्मीं लिहिलें कीं, नाईकांची मर्जीनरूप राहून काम करित जावें. त्यास, आपण त्याची खातरजमा करून घेऊन कामांत असों द्यावें. सारांश, आपली खातरजमा होत असेल त्याप्रमाणें करावें. तोच आमचा विचार. वरकड रा बाळठाकूर यांसी काल येथून रा केले आहेत. लवकरच येऊन पोंचतील. त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों दीजे हे विज्ञप्ति.

पत्रांक २२१. श्री. १७०१ भाद्रपद शुद्ध ५

श्रीमंत राजश्री बाळाजीनाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

पो बाळाजी महादेव सां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता भाद्रपद शुा पंचमी मुा बडोदें यथास्थित असे. विशेष. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर यांजकडे सरकारचा ऐवज येणें. याजकरितां मजला श्रीमंत राजश्री नानास्वामी व तात्या या उभयतांनीं आज्ञा करून घनश्याम नारायण याजबराबर रवाना केलें. ते मशारनिल्हे याजसमागमें दुसाणियास आलों. पुढें बडोदियास यावें तों अंताजी नागेश यांचें पत्र घनबास आलें कीं, तुह्मीं बडोदियास न येणें; माघारें, मार्गांत आला असलां तरी जाऊन दुसाणियास राहणें. येथून आमचें पत्र यावयाकरितां येईल तेव्हां येणें. याप्रमाणें तापीतीरीं पत्र आलियावर मारनिल्हे माघारे निघोन दुसाणियास चालले. राजश्री बापूजीपंत सुद्धां आह्मीं उभयतांनीं विचारिलें कीं, दुसाणियास चलावें, तेथून तुमचे आमचे विचारें ठरेल तसें करूं. त्याजवर दुसाणीं गेलों. तेथपावेतों बापूचा आमचा स्नेह सामान्य होता. पुढें विचार पडला कीं, घनबा गोपाळराव यांस याच यजमानाची आज्ञा, ह्या प्रों यांनीं केलें. पुढें तुमची आंमची गत काय ? तेव्हां बापूचा आमचा स्नेह, निखालसतेचा परस्परें खातरजमा होऊन जाहाला, तो कोणे गोष्टीवर आपण म्हणतील तरी, बापूचे ठायीं आपलें लक्ष चांगलें व आपलेंही त्यांचे ठायीं निखालसतेचें असें दिसोन आलें. माझा प्रकार ह्मणावा तरी श्रीमंत नाना स्वामीस माझी माहितगार निखालस, सेवक असे जातीची फारशी नाहीं. परंतु, श्रीमंत तात्या स्वामीचे ठाई माझें लक्ष कसें, मजकडून लाभाचा मोहो पडून तात्यांचे पायांशीं दुसरा भाव धरीन व सरकार काम नाशीन, असे जातीची बुध होईल न होईल हें तात्यांचें चित्त जाणत असेल. सर्व प्रकारें प्राण गेला तर द्यावा, हा हेत धरून तात्यांचे पायांशीं अंतर न करावें, असे जातीची परिक्षा असेल, याजकरितां मजला या कामास पाठविलें हें जाणोन, राजश्री बापूजीपंत आह्मी उभयतां एकत्र जालों. उभयतांचे भाव स्वामीसेवेवरी सारिखे जाले तेव्हां स्नेह पडला. घनबाचीं, अंतोबाचीं आचरणें बापूंस पेशजीं समजलीं होतीं. मजला सांप्रत समजलीं. याजमुळें उभयतांनीं एक विचार करून दुसाणियापासून सोनगडीं निघालों. घनबाचें समाधान राखोन त्याचे विचारें निघालों. अंतर्यामींचा भाव स्वामीकार्य करावें, हा होता. कारण घनबाची मर्जी राखोन, महत संकटानें प्राणास उदक घालोन मार्गांतून निघालों असतां, स्वामीसेवेवर एकनिष्ठ माझा तात्यांचे पायांसीं दुसरा भाव नाहीं. तेणें प्रों बापूंचा तुमचे ठायीं नाहीं. ह्मणून पकडून बडोदियास पावलों. येथें येऊन प्रथम फत्तेसिंगरावसुद्धां अंतोबाची भेट झाली. रंग पाहतां या उभयतांत वैमनस्य ! तेथें आह्मां उभ-

यतांस कोण पुसतो ? त्यांत श्रीमंत दादासाहेब या प्रांतें इंग्रजांस येऊन भेटले. याजमुळें आमचें तेज वाढणें कळतच आहे. त्यांत कारस्थानीं करून, अंतोबाचे ठायीं ममता पेशजीपेक्षां फार दाखऊन उभयतांचें वैमनस्य, मागील रंग, अंतोबा काय सांगतो हा प्रकार समजोन घेऊन तपसीलवार अंतोबाची जबानीचा मजकूर साहा बंद लिहून, अमृ (त) राम भगवंत याजसमागमें लाखोटियावर तुमचें नांव घालोन तुमचे विद्यमानें तेथें उभयतां यजमानास विनंती प्रविष्ट करावी, असें सांगोन रवाना केली. नंतर दुसरा प्रकारः माहितगारीचा परिश्रम नसतां विहंगममार्गेकडून बातमी घेऊन तपशीलवार पत्रें, बापूनीं आपल्यास, मी तात्यास, याप्रमाणें लिहून छ २५ रजबीं रवाना केलीं तीं पावलीं असतील. त्याजवरून, कांहीं माणूस कारस्तानींचें, असें आपल्यास व श्रीमंत तात्यास आमचे सुकृतेंकडून चित्ताचे ठायीं वाटलियास, मोठी योग्यता मिळेल, असें भासत असतां, मध्येंच स्तब्ध जालें. आपल्याकडील पत्रांचीं उत्तरेंच येईनात. तों इकडे फत्तेसिंगराव अंतोबाचें फारच विटून फत्तेसिंगराव यांणीं अंतोबास कैद केलें. गोविंद गोपाळ कारभार करूं लागले. माजी आपल्याकडे सूत्र लाविलें तेंहि चांगलेंच केलें. आपले आज्ञेशिवाय आमचे संमत गोविंद मामांस न पडलें असें खरेंच. परंतु हजारकोस उभयतां गेलों तसे आपली खातरजमा बापूविशी व माझी खातरजमा श्रीमंत तात्यांस याप्रमाणें माझेंहि लक्ष्य त्यांचे पायाजवळ असे. त्यांचे पाय जाणत असतील. जें करणें तें कच्चें लिहून आज्ञा आणऊन पुढें कर्तव्य तें करावें. असें असतां, आपण गोविंद गोपाळ यांचे उत्तराबरावर बापूंस चिठी लिहिली ती मारनिले यांनीं न देतां, आपल्याकडे दुसरें पत्र लिहून पाठविलें. नंतर आपली चिठी आटां रोजांनीं दाखविली. चिठी पाहतांच बापूंनीं उत्तर केलें कीं, यजमानाची आज्ञा मान्य. तो मजकूर मजलाहि कळला. मीहि उत्तर केलें कीं, तेथें नाईक व तात्या एक जागां, त्यांचा परस्परें दुसरा भाव नाहीं, जे नाईक यांची आज्ञा तेच तात्यांची. याप्रमाणें आपले ठिकाणीं विचार करून गोविंद गोपाळ यांचे लक्षांत चालूं लागलों. ऐवजास मार्ग पुसों लागलों. अंतोबाचें लक्ष तेथें श्रीमंतांचे पायाशीं विपरीत जालें. याजमुळें फळ पावला. तो प्रकार सविस्तर पेशजीं लिा आहे, त्याजवरून समजलाच असेल. ह्मणजे अंतोबाचें लक्ष कसें, हेंहि लिहून पाठविलें. दुसरे छ २५ रजबीं गुत अर्थ लिहिला. त्यांत फत्तेसिंगराव यांचें लक्ष कसें, अंतोबाचें कृत्रिम कसे जातीचें, पुढें मोठी गोष्ट सांप्रत काळींचे प्रसंगांत हाताखालीं असावी याजकरितां आपलेकडे पक्केपणें लिा, आणि गुप्तच राखावी असें सुचविलें. तिसरें गोंदबा मामांचें संधान व फत्तेसिंग याचें एकविचाराचें आहे. आपल्याशीं अंतर होणार नाहीं. हें राखोन आज्ञा मानण्याचा मार्ग पाहिला. आज्ञा लवकर न आली. याजमुळें येथें उभयतांस बोध करून, राजश्री बाळाजीपंत रानडे यांज समागमें तपशील-

वार आपल्यास लिहून, आपले विचारें सरकारऐवजाचा निकाल पडावा, आपल्याशीं व तात्याशीं यांचा दुसरा भाव नसावा, हे अर्थ कित्तेक केले असतां, आपण गोविंद गोपाळ यांचे पत्रांचें उत्तर व बापूंस बोलावणें व खातरजमा पडे असें जातीच्या चिठ्या तेथील उभयतां यजमानांच्या घेऊन, परभारें पाठविल्या. याजवरून आमचें लक्ष लोभाचें किंवा स्वामीकार्यावर मेहनत करून कारस्तानी केली याचें फळ व बक्षीस जन्माचें आज फावलें, असें जालें. परंतु, आमची आपल्याशीं एकनिष्ट चांगलीच आहे. याजमुळें येथें गोविंद गोपाळ यांनीं अकृत्रीम लोभ करावा, असे यांस ईश्वरें बुध दिली. याजमुळें आपलीं पत्रें आलीं तीं दाखविलीं. परंतु आपण इतका विचार न केला कीं, आपली आज्ञा मोडीत असे जातीचे सेवक नाहींत. तेव्हां पुन्हां त्याच पत्राचें उत्तर ल्याहावें होतें कीं, आमचें पत्र त्यांस दाखवावें. तें न ऐकतां अंतोबाचे लक्षीं राहिल्यास याप्रों करूं. तें न जालें. याजवरून बहुत चित्ताचे ठाईं आनंद जाला. आजपावेतों येखत्यारी येथें लौकिकांत आहे अशी वाटत होती, ते सर्वत्रांस समजली. वरकड फारसा विषय नाहीं. श्रीमंत तात्यानीं आपली हातचिठी दिली, त्यांत माझें नांव नाहीं. तेव्हां पुढें येथें मातबरीची अथवा तेथील तात्यांचे विश्वासाचे आहेत नाहींत याची रीत यांस समजलीच असेल. असो. आह्मी सेवक सेवा करून असावें. परंतु यांत आमचें कांहीं भूषण कमी होतें असें नाहीं. ज्यांचे ह्मणवितों त्यांस चांगलें दिसतें करावें. आमचें तो मंगळसूत्र आहे. तेथें विभिचारपण ईश्वर घडूं देणार नाहीं. आजपावेतों तात्यांचे ठायीं कसे रीतीचें लक्ष, हें पत्रीं काय लिहूं! मोठें राजकारण बाळाजी माहादेव यांस सांगितलें तरी चिंता नाहीं, ऐसे जातीची माझी निष्ठा. तात्या स्वामींची खातरजमा असतां, अंतोबांच व गायकवाड यांचे कामास पाठविलें. हे दोसी. यांचे सहवासामुळें आमचे ठाईं तेथें आपल्यास विकृत आली. कशी ह्मणतील तरी. बापूंचा भरवसा आपल्यास न पडे, असें वाटल्यामुळें गोंदबा मामास परभारें पत्र लिहिलें. माझे ठाईं तात्या स्वामींची आली. याजमुळें खातरजमेची चिठी गोंदबास पाठविली. त्यांत माझें नांवच नाहीं! तेव्हां तात्यांचे परम आप्त असें येथें सांगतात, तें उगेच, असें यांस वाटावें इतकाच प्रकार. एरवी आमची चित्तवृत्ति एकनिष्ठेची आहे. त्यापक्षीं आह्मांकडून वांकडें पाऊल पडणार नाहीं. पडेल ते दिवशीं पुन्हां चरणदर्शनास येणार नाहीं. असे जातीची तात्यांचे पायापाशीं माझी प्रतिज्ञा व आपल्यापाशीं बापूंची, यांत अंतर नाहीं. बापू व मी उभयतां येथें एकत्रपणें आहों. याजमुळें यांसहि येथें समजलेंच असेल. ते भाव दर्शनीं सांगावयाचे. आतां विस्तार कोठवर ल्याहावा? सारांश, स्वामीसेवेवरी एकनिष्ठ असल्यास ज्या कामास सेवक पाठवावा त्याची खातरजमा जितकी आपल्यास असेल तितकीच सेवा त्यास सांगावी,

सेवा सांगोन त्याची प्रतिष्ठा न राखतां, जें काम सांगावें तें काम दुसरे द्वारें विशेष साधलियास त्यास पूर्वसूचना असावी. ह्मणजे त्याचें पाऊल त्याप्रों पडतें. आपले मर्जीनुरूप येथें आमचें पाऊल पडेल. येथें कारस्तानीनें राहिलों याजमुळें आपलीं पत्रें आलीं तीं त्यांनीं आह्मांस दाखविलीं. जरी आह्मांस पेसजीं रवाना केलें ते समईची आज्ञा होती, त्याप्रमाणें येथें चित्तांत आणून अंतोबास कैद केलें. ते समई आह्मीं येथें आग्रह करितों तरी आज हीं आपलीं पत्रें येतीं ह्मणजे आमचीं घोडीं घेऊन आपल्याकडे रवाना करिते. परंतु सेवक आपल्या हाताखालील, याजमुळें चार संधानें राखोन आहों. आपण संधान केलें त्याजशिवाय दुसरे तरेचें छ २५ रजबीं लिहून पाठविलें आहे. तें यांतील नव्हे. प्रगट होऊं नये. हेच विनंती. पत्र श्रीमंत तात्यांस एकांतीं दाखवावें. यांत आळस नसावा. माझी शपथ असे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक २२२. श्री. १७०१ भाद्रपद.

विज्ञापना ऐसीजे. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर यांचें बोलणें कीं अंताजी नागेश यांचें बहुत प्रकारें मनोधारण करीत होतों कीं, तुमचा कारभार तुह्मीं करून शिबंदी, सरकार, सावकार यांचा फड (शा) करणें. माझा पेशजीपासून इतबार तुमचे जागां. व सर्व तुह्मीं येख्त्यारीनेंच करीत होतां त्याप्रों करणें. तें न होय, तेव्हां कैद केलें. त्यापक्षीं हिशेब घेणें प्राप्त. अंताजी नागेश यांजकडेस सुरत अठाविसी वगैरे माहालची मामलत. त्याचे हिशेबाचे फडशे होणें. याशिवाय सरकारांत ऐवज मशारनिल्हे यांनीं किती दिला व आह्मांकडून महालचा नख्त रवानगीसुद्धां मारनिले यांजकडे काय पावला, याचा झाडा समजला पाहिजे. बाकी निघालियास तिचा फडशा होणें. आणि अंतोबा यांनीं तो सातपुडियांत मवास, कोळी यांजपासून पाहाडी किल्ला पंचवीस हजार रुो देऊन घेतला आहे. तेथें ऐवज व मुलें माणसें सुा जाऊन पावलियास ठीक नाहीं. याजकरितां सरकारांतून बंदोबस्त होऊन मजबुदी जाली पाहिजे. व घन:शाम नारायण वगैरे शिंदे यांजकडून बखेडे करवितील. यांची सूचना होऊन बखेडा न होय असा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां सेवेसी सांगितल्यावरून विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक २२३. श्री. १७०१ भाद्रपद शुद्ध १३

पो मिति भाद्रपद वा १० सोमवार.

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामींचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणून

स्वकीये कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आज छ १२ रोजीं सुरतेहून बातमी आली कीं, शहराहून इंग्रजानें कूच करून, कामरेज पाठीशीं देऊन, मुकाम केला. भडोचकर व सुरतकर मेस्तर बाटम ऐसे बाहेर निघाले आहेत. मुंबईकर जनराल तेहि सरंजामसुधां येणार. बंगाल्याहून पंधरा सोळा हजार माणूस आलें. त्यांचीं पत्रें नागपूरचे मुकामींहून आलीं. त्यावरून हे सर्व बाहेर निघाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब शहरांतच आहेत. राजश्री बापूजी होळकरहि कागदीं पत्रीं मिळाले! श्रीमंतांस सामील होणार. नागपुरीहून लोक येतील, त्यासमागमें भोंसल्याकडील फौज येत आहे, ऐसी वदंता आहे. रा॥ राजाराम गोविंद यांची रवानगी महीउत्तरतीरीं होत आहे. समागमें दोन पलटणें दिलीं. वरकड झाडून इंग्रज घाटावर फौजेसुद्धां जाणार. सोनगडास राहणार. ऐसेंहि बोलतात. लाला मुनशी विसां दिवसांचा करार करून गेले आहेत. त्यांचा मार्ग पाहतात. तदनुसार करणें तें करीतील. परंतु जनचर्चा कीं, नागपुरींहून लोक आले ह्मणजे देशीं जातील. याप्रमाणें बातमी आली. ते आपणांस लि॥ आहे. सत्यमिथ्या नकळे. कूच होऊन बाहेर आले. व अमदाबादेकडे फौजेची रवानगी. दोन गोष्टी ते प्रमाण आहेत. येविशीं यजमान साहेबांनीं आपणांस व कारभारी यांस लि॥ आहे, त्यावरून अवगत होईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति.

पत्रांक २२४ श्री. १७०१ भाद्रपद वद्य ८.

पु॥ श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे शेवेसी:—

सां॥ नमस्कार विनंती. चिरंजीव राजश्री नारोबा नानास शिंदे घेऊन आले नाहींत. दरबारचा प्रसंग पडेल तसें करावें. कजायामुळें घेऊन न आले ह्मणोन लि॥ त्यास सर्व प्रकारें आपण आहेत. उभयतां कारभारी यांचें आश्वासन आपणांपाशीं जालें आहे. त्यापक्षीं आतां दिवसगत लागणार नाहीं. जसें कळेल तसें करून आपले जवळ आणावे. व फार दिवस जाले आहेत. योगिराजाचे लक्षाचा मा॥र लि॥. त्यास यजमान साहेबांचें लक्ष श्रीमंतांपासीं. कोण्ही कालीं दुसरें व्हावयाचें नाहीं. हे खातरजमा आह्मी त्याहावी असें नाहीं. अनभव आहेतच. आमची निष्ठा जे आपल्यापाशीं आहे तेच. याचा संशये कोण्ही कालीं न मानावा. आपले चित्तांत नाहीं. परंतु सूचना लिहिली आहे. त्यास, येविशीं कांहींएक चित्तांत न आणावें. याची खातरजमा असें द्यावी. येविसींचें सविस्तर राजश्री बाळ ठाकूर सांगतील त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें? कृपालोभ कीजे. हे विज्ञप्ति.

पत्रांक २२५ श्री. १७०१ भाद्रपद वद्य ९.

राजश्री बाळाजी नाईक नाना भिडे गोसावी यांसी:—

विनंती उपरी. राजश्री सखारामपंत बापू यांजकडे सत्रा गांव होते. त्यास, हालीं राजश्री अण्णाजी अनंत अष्टाविशींत आहेत. त्यांणीं कारकून पाठऊन बंदोबस्त केला आहे. दरबारीं कोणी गैरवांका समजावितील, यास्तव सूचनार्थ लिहिलें असे. रा छ २३ माहे रमजान. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक २२६. श्री. १७०१ आश्विन.

पुा श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सां नमस्कार विनंती. शिंदे यांजकडील पहिले करार मदार ठरला आहे त्याप्रों द्यावें लागेल, ह्मणोन लिा. त्यास, येविसींचें तपशीलवार पेसजीं लिहिलें आहे. त्यावरून ध्यानांत आलें असेल. त्यास आपले युक्तीस येईल त्याप्रों ठराव करून लिहून पाठवावें. घडोन येईल. माारनिलेकडून कारकून येथें आला आहे. त्यासहि आह्मीं समाधान पत्रें लिहून दिल्हीं आहेत. आणकरारमदाराचें आपणावर घालून लिा आहे. त्यास, आपले ध्यानांत येईल तें करावें. आपण करतील तें आह्मांस मान्य. बहुत काय लिहिणें? कृपालोभ कीजे हे विज्ञप्ति.

पत्रांक २२७. श्री. १७०१ आश्विन शुद्ध १.

पो मिती कार्तिक शुद्ध २ बुधवार.

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—सेवक गोविंद गोपाळ सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ माहे रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण भाद्रपद शुद्ध ९ पत्र पाठविलें तें पावलें. लिा सविस्तर अवगत जाहालें. पत्रीं ऐवजाकरितां निकडीनें लिहिलें. व घनःशाम नारायेण शिंदे यांचे लष्करांत गेले आहेत. त्याजवरून उभयतां सरदार यांचीं पत्रें कारभारी यांस आलीं कीं, गायकवाडाकडील गृहस्थ आला आहे. दौलत गोविंदरायास द्यावी, सरकारचे व आपले पैक्याची निशा करून देवितों. तीं पत्रें व जिन्नस आपल्यास दाखविलीं. त्यावर आपण खातरजमेचे बोलले आणि मुदत करून पत्रें आह्मांस लिा. त्यास येथील प्रकार दररोज काय ल्याहावा? राजश्री बाळाजी अनंत रानडे जाऊन बहुत दिवस जाले. आपणापासीं पोंहचून अद्याप उत्तर येत नाहीं. त्यास, माारनिले पावलियावर सविस्तर समजलियांत आलें असेल. त्याजवर विशेष प्रजन्य गेला यामुळें चहूंकडून (संकट) प्राप्त जालें आहे. पीक गेलें,

मुलूखगिरी.........व याजमुळें राहिली. यांत ईश्वर काय परिणाम लावील तो खरा. या दौलतींत कांहीं बाकी राहिली नाहीं. बोढघस्तेखालीं बहुतच आली आहे. यंदांचें साल सरकारांतून निभाऊन घेतल्यास कांहीं उभी राहील. नाहींतरीं परिणाम लागणें कठीण आहे. परस्परें समजल्यांत येईल तें खरें. बहुत काय लिहिणें? कृपालोभ करावा हे विज्ञप्ति.

पत्रांक २२८ श्री. १७०१ आश्विन शुद्ध १.

पुा श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामींचे सेवेसी:—

साां नमस्कार विनंती. आपण श्रावण वद्य त्रितियेचीं पत्रें पाठविलीं तीं पत्रें आह्मांकडे यावीं तीं न येतां राजश्री बापूजीपंतांकडे गेलीं. त्यांनीं पत्रें फोडून पाहून आह्मांकडे पाठविलीं तीं छ २३ रमजानीं आम्हांस पावलीं. फार दिवस पत्रांस लागले, याचें कारण कांहींच समजत नाहीं. पत्रांतील मजकूर कीं, यत्न शेवटास गेला, त्यास हें कर्म करावयाची उतावळी किमर्थें केली, सरकारचें काम थोडें बहुत निदर्शनास आणावें, ग्रामाकडील बंदोबस्त व्हावा, आपली आज्ञा यावी, तेव्हां घडावें, हें तुह्मी करणार नाहीं, परभारें जालें किंवा काय तें समजलियांत आलें नाहीं, ह्मणून या पर्यायें लिहिलें. त्यास, येविशींचे तपशील पाहिलेच लिा आहेत, त्यावरून समजलियांत आलेंच असेल. राजश्री राघोपंत पाठविले ह्मणोन लिहिलें. त्यांचें येणें न जालें. दुसरें, गोपाळराव यांस परभारें पत्रें दिल्हीं ह्मणोन लिा. त्यास, त्याचा पर्याय पुरवणी पत्रीं लिा आहे. व बाळ ठाकूर सांगतां ध्यानांत येईल. इकडून अंतर किमपि पडावयाचें नाहीं. श्रीमंत राजश्री नानांस व श्रीमंत राजश्री तात्यांस पत्रें पाठवावीं कीं, गोपाळ यास काम न द्यावें. त्यास आह्मीं कांहींच चिठी पत्रीं दिल्ही नाहीं व यजमानानींही दिल्ही नाहीं. तेव्हां, उगेच त्यांस काय ह्मणोन ल्याहावें? तत्रापि, पाहिजे तर पाठऊन द्यावयास येईल. बहुत काय लिहिणें? कृपालोभ कीजे हे विनंती.

पत्रांक २२९ श्री. १७०१ आश्विन शुद्ध ११

पौ छ १० सवाल सन समानीन.

पंडत सो मेहेरबान करम फर्माय मखलिसां हरी पंडत फडके सलमला हुताला.

बादज शौक मुलाकात मसरत आयात मशहूद जमीर इत्तीहाद पिजिरबाद येथील खुषी जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करीत आलां पाहिजे. दरींविला, आपणाकडील कामांत सई व कोषिस करणेचा मार नरसिंगराव वकील यांनीं लिहिल्यावरून मालूम जाला. आपणास आह्मीं दोस्त जाणत

असों. हमेषा आपली षादमानी कलमी करीत आलां पाहिजे. हालीं चेचेरथान पारचे पाठविले आहेत. आजराः एखलास घेतला पाहिजे. जिआदा लिहिणें काय असे?

पत्रांक २३० श्री. १७०१ आश्विन शुद्ध.

पुा श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सां नमस्कार विनंती. राजश्री राजाराम गोविंद योगीराजापाशीं होता. त्याजसमागमें सरंजाम देऊन अंकळेश्वरास मुकाम आला. हें वर्तमान आह्मांस कळतांच फौजेची तयारी करून सिद्ध जाहालों. राजाराम गोविंद इंग्रजांचे परवानगीनें नर्मदा उतरून उत्तरतीरास येऊं लागले. त्यास अधिकच लोकांचा गवगवा. आण इकडे आपली फौज. पुर्तेपणें आपला पारिणाम लागत नाहीं हें समजोन, रात्रीं वीस पंचवीस स्वारांनिशीं डबईपलीकडोन हालोलकाकेलेस गेला. तेथेंहि न राहतां पुढें माळव्याकडे गेले. सरंजाम बराबर होता तो अंकळेश्वरींच राहिला. कांहीं उठोन माघारा सुरतेस गेला. तूर्त इंग्रजांचा सरंजाम पोख्त तयार जाहाला आहे. पुढें काय मसलत हें कळत नाहीं. येथून राजश्री लक्ष्मणराव चिटणीस यांजकडे पत्रें लिहून बातमी वरचेवर आणवीत असों. तेथें जो निश्चय ठरेल तो बरचेवर लिहित असावें. बहुत काय लिहिणें? कृपालोभ कीजे. हे विनंती.

पत्रांक २३१ श्री. १७०१ आश्विन वद्य २

पौ मिती कार्तिक शुद्ध ८ मंगळवार.

श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक नाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १६ माहे सवाल जाणून स्वकीयें कुशल लिहित आसिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र बारागिराबराबर पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर अर्थ अवगत जाहाले. इकडील मजकूर तरी सुरतेहून पेशर्जी राजाराम गोविंद नर्मदा उतरून इकडे आले होते. त्यास येथून सरंजाम रवाना केला. तेव्हां त्यास इकडील ताण बसला आण त्याचे सिबंदीनेंही गवगवा केलाच होता. यामुळें सडे सारें सोडून रात्रीं पळून माळवियांत गेले. हें पेशर्जी आपणांस लिाच आहे. त्यावर छ ११ सवालीं राजश्री चंदरराव पवार इंग्रजांचे परवानगीनें नर्मदा उतरून अलीकडे आले. त्याजवरी येथून सरंजाम पाठविला आहे. त्याची व आपले सरंजामाची गांठही पडली आहे. त्याचें पारिपत्य करावें. याचें अगाध नाहीं. परंतु मागील पिछा भारी, व सरकारांत तह काय ठरतो तेंही कळलें पाहिजे. एकवेळ बिघाड जाहलियावरी पुर्तीच कंबरबंदी

केली पाहिजे. यास्तव युक्तीचेच वाटेनें भय दाखऊन बंदोबस्त करवितों. तत्रापही बिघडलेंच तरी उपाय काय? येविसींचे तपसीलें श्रीमंत राजश्री यजमानांनीं आपणांस व सरकारांत लिा आहे त्यावरून ध्यानांत येईल. ऐवजाकरितां वरचेवर लिहिलें. त्यास, प्रांतांतून अगर कोठून सोये होऊन येणें कळतच आहे. कर्जवाम घेऊन कांहीं सोये काढावी. तरी प्रथम राजाराम गोविंद याची गडबड जाली व अलीकडे चंद्रराव पवार याची गडबड यामुळें कांहीं एक घडों न आलें. प्रस्तुत तरतूद करीत असों. तरतूद करून रवानगी करितों. आम्हांस रात्रंदिवस आपलेकडील लक्ष राहून, खरेपणांत पडावें हाच निजध्यास. परंतु एक एक नवेंच विघ्न उभें राहतें! त्यास उपाय काय करावा? त्यांतही तजवीज करून मागाहून पा आहों. प्रजन्य गेला. यामुळें प्रांतांत हाहाकार होऊन लोक तमाम उठोन मुलूख उजाड जाला व जलचरांचें खूळ. यामुळें कोणी सावकार कामास धजत नाहीं. येणेंकरून जें करावयास जावें तें सिद्धीस जात नाहीं. आमचे प्रेत्नें एक दिवस अगोदर घडोन येईल तें करून पाठवीत आहों. यांत अंतर होणार नाहीं. खातरनिशा असों द्यावी व येविशींची निशा राजश्री बाळाजीपंत यांणीं केलीच असेल. वरकड सविस्तर मारानिल्हे याचे पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें? कृपालेभ कीजे हे विज्ञप्ति.

पत्रांक २३२ श्री १७०१ आश्विन वद्य २

पुा राजश्री बाळाजीनाईकनाना गोसावी यांसी:—

विनंति उपरी. राजश्री रामचंद्र पवार डभई परगण्यांत येऊन मुकाम करून राहिले होते. परगणा जप्त करावा, पैका मिळऊन पुढें अमदाबादेची जप्ती करावी, ऐसे मोठ्या उमेदीनें आले होते. त्यास, येथून फौजा पाठविल्याच होत्या. आह्मींहि फौजमुधां पाठीवर मुकाम केला. आपलेकडील लोक वरचेवर रवाना जाहले. पारपत्य यथास्थित करावयाचें केलें. त्यास, त्याजकडील बोलणें लागलें कीं, आपल्यास बाहादारी दिल्हियास निघोन जाऊं, ऐसे बोलूं लागले. उपरांत बहादारी दिल्ही कीं, तूर्त बिघाड न करणें. एक वेळ बिघाड जालीया मग आपले हातीं राहणार नाहीं, आणि सरकारचा शब्द लागेल जे तहरहाचा जाबसाल टरत असतां यांणीं बिघाड केला. यास्तव मारानिलेस जाऊं दिल्हें. परंतु मोठ्या उमेदीनें माघारे गेले आहेत. आम्हांस बहुत जरबेनें पत्रें लिहिलीं आहेत. परंतु पुढें होणार तें होईल. आमची निष्ठा श्रीमंतांसीं दुसरी नाहीं. इंग्रजांशीं तहाची अगर बिघाडाची बातमी राखून दरचेवर आम्हांकडे लिहून पाठवीत जावें. यासीं आम्हांसीं नित्य संबंध पडला आहे. दोहींकडून संकट. उपाय नाहीं. ऐवजाविसीं आपण वर-

चेवर लिहितात. येथें एखादी तरतूद करावी. त्यास दिवसास एक नवें खूळ उभें राहतें. कोणी सावकार उभा राहत नाहीं. कोणास भरंवसाच पडत नाहीं. यांत कांहीं सोय पाहून तरतूद घडेल ती मागाहून करून पा. आपण वरवर लिहितात आण आमचे ध्यानांत नाहीं, ऐसें नाहीं. परंतु उपाय काय करावा ? वरकड सविस्तर मागाहून लिहून पा. रा छ १६ माहे सवाल बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंति. मोर्तबसुद.

पत्रांक २३३ श्री. १७०१ आश्विन वद्य २

पुा राजश्री बाळाजीनाईकनाना गोसावी यांसीं.—

विनंति उपरी. सचिण सत्रागांव व फुटगांव राजश्री सखारामपंत बापू यांचे सरंजामांत पेशजी आपलेकडून दिले होते. व गल्हेमरोळी राजश्री नाना कडे कर्जांत दिल्ही होती. त्यास, सरकारठाणीं तेथें होतीं. उपरांत राजश्री दादासाहेब सुरतप्रांतीं आलियावरी सरकारचे महाल इंग्रजानें जत केले होते. ते समयीं हेही महाल जप्तींत आले होते. तेव्हां आपलेकडील कमावीसदारांनीं इंग्रजास समजाविलें कीं, हे महाल आह्मांकडील आहेत. सत्रागांव बापूकडे अंतस्तांत दिले होते. अखेरसालपर्यंत द्यावयाचा करार होता. त्यास, अखेरसाल मागेंच होऊन गेलें. आतां त्याजकडे महाल द्यावयाचें कारण नाहीं. तरी आमचे महाल सोडून देवावे. त्याजवरून महाल इंग्रजानें पक्केपणें बोलून सोडून दिलें. उपरांत सरकारचा अंमल पुन्हां सुरतप्रांतीं बसला. त्यावरी महाल सरकारांत द्यावें. त्यास, गल्हे व मरोळी हे दोन्ही महाल नानांकडे. तेथिल कमावीसदारांचीं पत्रें व कारकून येथें आले. सविस्तर वर्तमान सांगितलें कीं, महाल नानांकडे द्यावे. त्यावरून राजश्री अण्णाजी अनंत यांस पत्रें देऊन नानाकडील ठाणीं बसविलीं. हें वर्तमान इंग्रजांस कळलियावरी आह्मांकडील कमावीसदारांस ह्मणों लागले कीं, तुम्हीं आमाण बोलून महाल सोडवून घेतले याचें कारण काय ? आम्ही तुमचे सारेच महाल जप्त करू असें बहुत दोष ठेविले. तेथें समज किती हें ध्यानांतच आहे! तेव्हां संकट जाणून पुन्हां आपलेकडोन महाल जप्त केले आहेत. याप्रमाणें मजकूर आहे. यावरी सरकारचीं व नानाचीं पत्रें शब्द लाऊन आलीं. त्यांचीं उत्तरें काय द्यावीं, येविसींचे राजश्री हरीपंततात्यास राजश्री बाळाजी महादेव यांनीं लिहिलें आहे. त्यावरून ध्यानांत येईल. येविसींचे सविस्तर आपणांस लिा आहे, म्हणोन सरकारांत लिा आहे. तरी सविस्तर समजावून ध्यानांत आणावें. आपलेकडून कांहीं एक गुंता नाहीं. गोष्ट कुपेचीं पडली आहे. रा छ १६ माहे सवाल. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति. मोर्तबसुद.

पत्रांक २३४

मुंबईकर इंग्रजास पत्र रा छ. १७०१ आश्विन.

इजहार आंकी मुदत मदीद आं शहामतपन्हांकडील कितावत येऊन दिलखुषी होत नाहीं. तर हमेषा मोहबतनामा इबलाग करोन मसरूर करीत जावें. दिगर सरकारांतून वकील लाला सेवकराम याजला कलकत्त्यास रवाना केलें. व सरकारचे मदारुलमहाम यांनीं खतूत मरसूल केलें. त्याचा दरजबाब कोसल कलान कलकत्तेकर यांनीं निगारष केला. त्या खात्यांतील फिकरा पारसी व त्याचा तरजमा हिंदवी करून पाठविला आहे त्याजवरोन मुफसल मुषहुद होईल. व कोसल कलान कलकत्तेकर यांनीं कलमी केलें आहे कीं, या बमोजिब खत अशामतपन्हांस व तेथील कोसलदारांस कलकत्त्याहून परभारें मुंबईस इरसाल केलें आहे. येकीन कीं तें खत रसीद होऊन मतलब जाहीर झाला असेल. त्यास कबिले माही दादा साहेबाबाबें व चिखली वगैरे राा फत्तेसिंगराव गायकवाड यांचे मुलखाबाबद मजकूर मरकूम केला आहे. त्याचा दर जबाब इंजानिबास लिहून पाठवावा. व चिखली वगैरे मुलुख मये वसूल दुसाला सरकारचे अमलदारांचे सुपूर्द करावा. व बमोजिब करारनामा तीन लाखांचा मुलुख आशामतपन्हां ज्यांस देवितील त्यांचे सुपूर्द सरकारांतून करविलें जाईल. दिगर मनाफ करारनामा बारा लाखांचे वसुलांत पो जंबूसरचा ऐवज देविला आहे. त्यास परगणे मजकूरचा ऐवज वसूल करोन आंशाहामतपन्हांकडील लोकांचे पदरीं घालावा ह्मणोन सरकारांतून राा महादजी रामचंद्र यांजला पाठविलें आहे. मशारनिलेस जाऊन कमकसर एक साल गुजरलें. हानोज आंशाहामतपन्हांकडील अमलदार पो मजकुरांत दाखल देत नाहीं. तर येबाबें आंशाहामतपन्हांनीं आपलेकडील लोकांस निगारष करावें कीं, सरकारचा काा महादजी रामचंद्र पो मजकूरचा वसूल करोन ऐवज पदरीं घालीत जाईल, त्यांचीं कबजें देत जाणें. याहून पेशजीं साल गुदस्तां व सालहालचा पो मजकूरचा वसून घेतला असेल त्याची रसीद देणें, म्हणोन निगारष करावें. जो करार ठरला आहे त्यास सरकारांतून तफावत होत नाहीं व आंशाहामतपन्हांकडून तफावत अमलांत न यावा.

पत्रांक २३५ श्री. १७०१ आश्विन वद्य १०

कृष्णराव बल्लाळ यांचे नांवें हैदरखानास पत्र छ २३ सवाल अलकाब सदरहू-प्रमाणेंच-सुाा समानीन, आश्वीन. कागद बुट्टीदार.

अजम नबाब हैदरअल्लीखान-बहादूर सलमतुताला साहेब मेहेरबान करम फर्माय मुखलिसान बाद इस्तियाक मुलाकात बहय्यत समात मुकषुफा जमीर इतिहादत नवीरबाद येथील खैर सला जाणून आपली खैर खुषी कलमी

करून दिलताजगी करीत असिलें पाहिजे. खुदावंत-न्यामत रावसाहेब पंडित प्रधान यांचा व आंमोहिबांचा सलूख पक्का व मजबूत होऊन कराररनामा अह-दशंतीनसीं जाला तो सरकारचे मातबर-षाहामत व अवालीपन्हां कृष्णराव नारायण व नरसिंगराव वकील मोहिंबाकडील यांजबराबर देऊन रवाना केले असेत. मारानिले नुमा-ज्यलद व षिताब आं-मोहिंबाकडे पोंहचतील. बिल-फैल अजरुये अखबार.जाहीर जालें कीं, मोहिंबाकडील फौज आदवानी व मुदगल वगैरे नबाब निजाम-अली-खान-बहादूर यांचे तालुक्यांत येऊन, हरकत पेष आणून, तमाम प्रांत वैराण केले. मकानास मोहसिरा करणार. ऐशास, व लिन्यामत रावसाहेब पंडित-प्रधान यांचा व नबाब निजाम अली-खान बहादूर यांचा तरीका एकलासचिा कदीमापासोन चालत आला. हरबाबें त्यासी ज्युदागी नाहीं. हालीं मोहिबांचाही सलूख होऊन दोस्तीची मजबूती जाली. तेव्हां तिन्ही दौलती एक व बेहबुदी व मसलत एक जुदाई राहिली नाहीं. इंग्रजांस तंबी पोंचवण्याची मसलत मातबर. सर्वांचे एक-दिलीनें मुखालिफांची तंबी व्हावी. दरम्यान असे सिगुफे-मुळें मोठे मसलतींत कमती येते. आपआपल्यांत पेच येतात. हे सलाह दौलत नाहीं. बिनाबारा आपले फौजेस ताकीद करून वापस आणवावी. नबाब मवसूफ यांचे तालु-कियास इंग्रज येऊन मकानांत आपला कबजा करणार. तेव्हां मोठे मसलतीस पायबंद बसेल. सबब अव्वल हा बंदोबस्त करावा, हें मोहिबांचे दिलांत आलें असेल. त्यास, येविसीचे कुलमरात-व नबाब-मवसूफ यांस कलमीं केलें असोन, त्याचा तेविसींचा बंदोबस्त जलदच करतील. इंग्रजांचे तंबीचे मस-लतीस नबाब-मवसूफ एक-दिल आहेत. शिकाकोल-राजबंदरीकडे चालून जाण्यास लवकरच खेमेदाखल होणार. मोहिबांनीं आदवानींकडील हंगामा जलद मना करवावा. सर्व मसलती व दूरंदेशी आपले दिल निषीन आहेतच. मुसफल बयान नरसिंगराव पोंचल्यानंतर करतील, त्याजवरून मालूम होईल.*

पत्रांक २३६. श्री.

सदरहू प्रमाणें हरीपंत यांचे नावें पत्र पाठविले त्याचीं नकल.

अजम नबाब हैदरअलीखां बाहादूर सलमहुताला साहेब मेहेरबान करम फर्माय मुखालिसान बाद इस्तियाक मुलाकात जाणून बहज्यत समाद मशहूद जमीर इत्तीहाहत नवरिबाद येथील खैर सल्ला जाणून साहेबीं आपली खैर खुषी कलमीं करीत असिलें पाहिजे. दिगर, आं मेहेरबांकडून छ मोहरमचें खत आलें ते नेक वख्तीं पोंहचून खुषी व खुरमी जाली. नरसिंगराव वकील व येकलाह दस्तगाह कृष्णराव नारायण व सिंदे यांजकडील त्रिंबकराव व राव रास्ते यांजकडील गोविंदराव व गणपतराव पोहचून मुफसल मजमून मालूम

*ह्या अस्सल पत्रांचा सारांश काव्येतिहाससंग्रहांतील १६७ व्या पत्रांत दिला आहे.

जाला. श्रीमंतांकडील करारनामा व आपलें निभावणीचें खत मशारनिले यांनीं दाखविलें. त्यांत एक दोन कलमांची तकरार होती. सबब श्रीमंतांकडील पाठवण्याचा करारनामा व निभावणीचे पत्राचे मसविदे मशारनिले यांजपाशीं दिल्हे. त्याप्रमाणें करारनामा व खतें येऊन पोंचतांच सावकाराकडे पैसे पोंचवीत असों. आणि इंग्रजाकडील मोहिमेस कूच करून जात असों. आज दोन सालांपासून चेनापटणकरांचा दोस्ती करण्याचा इरादा. एक पालखी व दाहा जवानांनसीं येण्यास अर्जू. लेकीन, जात मकरी. त्यांची चाल खुषकींत न व्हावी. सबब श्रीमंतांसीं सलुख केला. आम्ही चेनापटणाकडे गुंतल्यावर इंग्रज साष्टी जंबुसर वगैरे मकाने घेऊन मुद्देमाफक कबूल करतील. त्यास इकडलि मसलत व इतक्याखेरीज सलूख न करावा म्हणोन आंसाहेबीं कलमीं केलें. चुनाचे आंमेहरबांकडील नरसिंगराब वकील श्रीमंत खुदावंत न्यामत यांचे हुजूर असतां सलुखाचा सवाल जबाब करूं लागले. ते वख्तीं सरकारांतून करार करण्याचे कलमांची याद लेहून दिल्ही कीं, हे पटनास नबाबबहादूर यांजकडे पाठवावी. त्यावरून मशारनिले यांनीं याद रवाना केली. त्यापैकीं आंसाहेबीं बंगल्यास फौज पाठवण्याचे वगैरे एक दोन कलमें बाद घालून आपणाकडून दुसरीं बाद कबूल करून पाठविली. त्या यादीवरहुकूम करारनामा सरकारांतून ठरविला. एक आदवानी वगैरेस इजा न द्यावी इतकें कलम जास्त. वरकड आंसाहेबीं कबूल केल्या बमोजिब कलमें असतां, हालीं दुसरा मसविदा ठरावून पाठविला, यांत व त्यांत तफावत भारीच आहे. तेव्हां करारशिवाय नवी गोष्ट जाली. सरकारचे वचनाची कायमी कशी हें आइंदे जहुरांत येईल. एकवख्ती सलूख व सफाई जाली, त्याबरहुकूम निभावणींत यावें हे सरकारची खेश आहे. आणि ज्या दौलतींत आहादशर्त व वचनाची मजबुती तेच दौलत कायम व खजानाही तोच जाणावा. दौलत आहे तेथें आमदही आहे व खिसाराही आहे. लेकीन, करारांत अंतर इकडून येणार नाहीं. श्रीमंत खुदावंत न्यामत व नबाब बहादूर यांची दोस्ती व पक्का सलूख जाहला. याचा लौकिक बहुत जाला. त्यांत क्षुंजकामावर नजर राखणें हें खानदानास व उमदेपणास लाजम नाहीं, ऐसें मदारुलमाहाम यांणीं दिलांत आणोन आंमेहेरबांनीं मसविदे पाठविले. त्याबरहुकूम करारनामा व निभावणीचीं खतें पाठविलीं आहेत. राव मेहेरबां महादजीराव शिंदे फौजेसह गुजराथ प्रांतीं दरकुच गेलें. त्याजकडून निभावणीचें खत येणें. सबब मसविदा मुजरत त्यांजकडे रवाना केला. जलदच येईल. बाद आंसाहेबांकडे रवाना होईल. अवलचे करारास व हालींचे करारास तफावत बहुत आहे. सरकारांतही पांच साहा सालांचा खिसारा. आपली दोस्ती व भाईचारा जाला. तेव्हां इकडील खिसारीयाची फिकीर आंसाहेबांस आहेच. ऐसें मदारुलमाहाम यांणीं दिलांत आणोन तफावतीचे कलमांचा येख्त्यार आंसाहेबांवर

दिल्हा. आपण लाजम तेंच करतील. कराराप्रमाणें पैक्याचा भरणा आंसाहेब करतीलच. सरकारांत खिसारा, मसलत भारी, सबब आपल्याशीं कांहीं बोलण्याविशीं रावमेहेरबान कृष्णराव यांस कलमी केलें आहे. त्या बमोजीब अमलांत यावें. आजीवात चेनापट्टणाकडे जाण्यास दिवसगत न लागावी. अरसा बहुत कमी राहिला. इंग्रजांची जात बेइमान. दक्षणचा दाइया ठेऊन न होण्याचे मनसबे बांधितात. व खूब मकरही जाणितात. आंसाहेबांकडे पटणास येण्याचें राज्यकारण तसेंच कर्नेल गाडर सुरतकर यांची पुणियास येण्याची आर्जु. लेकीन, त्यांचे चालीचा नक्ष पक्का समजोन साफ जाब मदारुल माहाम यांणीं दिल्हा. साष्टी जंबूसर वगैरे देऊन बजीदी केल्यास सरकारांतून इंग्रजांचा अर्ज ऐकणें, हें होवायाचें नाहीं. येविशीं खातरजमा असावी. आंसाहेबही खूब त्यांचे मकरास वाकफ. राज्यकारण न ऐकतां कायमीनें तवीच अमलांत यावी. जें होणें तें तर फैनच्या इतल्यानें व सलाहतदबिरीनें व्हावें. एकासी गोड बोलून, एकास जक द्यावी, फोडाफोड करावी, हे हुन्नर टोपीकर बहुत जाणतात. या भुलथापीवर न जावें. बाजे मरातब राव मेहेरबान कृष्णराव यांस कलमीं केलें त्यावरून वाजे होईल. हामेश खत पाठवून दोस्तदार यांची खुषी करीत जावी.

पत्रांक. २३७

पौ मित्ती कार्तिक शुद्ध १५ मंगळवार. श्री. १७०१ आश्विन वद्य १३

राजश्री बाळाजी नाईक नाना गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राज्यमान्ये स्ने।। फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहाद्दर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. इकडील सविस्तर वर्तमान पेशजीं एक दोन पत्रें पाठविलीं, त्यांजवरून कळेल. प्रस्तुत सुरतेकडील वगैरे कित्तेक मजकूर राजश्री गोविंद गोपाळ यांचे पत्रीं लिहिला आहे, त्याजवरोन ध्यानास येईल. वरकड मागाहून साद्यंत लिहून पाठऊं. रा छ २६ माहे सवाल. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंती. मोर्तबसुद. (शिक्का मागें दिल्याप्रमाणें).

पत्रांक. २३८ श्री. १७०१ आश्विन वद्य १४

श्रीमंत राजश्री बाळाजीनाईकनाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ सा। नमस्कार विनंति येथील कुशल ता। अश्विन वद्य १४ मु।। लष्कर व्यासेश्वर नजीक जाणून यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. आज पंधरा रोज. त्यास वरचेवर पत्र पाठऊन परामर्ष करीत जावें. यानंतर आपण मल्हारजी फडके यांजबरा-

वर पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, त्याचा हिशेब पाहून पुन्हां यांसच पाठऊन देणें. तेथील कामाचे हेच उपयोगी ह्मणोन आज्ञा. त्याजवरून त्यांचा हिशेबाचा मागील फडशा करून, पुढील बंदोबस्त यांजकडे सांगोन पा। आहे. तरी तेथील सर्व बंदोबस्त करून द्यावयाचा तो आपण करून द्यावा. वरकड इकडील मजकूर पेशजी कासीदा समागमें लिहिला आहे. व रा। बाळ ठाकूर जाऊन पोंहचलेच असतील. त्यांचे जबानीवरून ध्यानास येईल. सारांश यंदाचें वर्ष कठिण आलें आहे. यांत ईश्वर अबरू राखील तर व आपली कृपा पूर्ण. नाहीं तर कळतच आहे. तूर्त येथील प्रसंग बहुत विलक्षण. यांत करतांही न करतांही दोष. चहूंकडून संकट. असो. जे काळीं जें घडावयाचे तें तों ईश्वरसत्तेनें घडतें. परंतु निमित्य मात्र येतें. असो. आपणास कोणते समई कोणी आह्मांविशीं विकल्पाची गोष्ट भासवील ते मात्र आपण ध्यानांत न आणावी. आह्मीं येथें ते आपणच आहां ऐसें समजोन, जें काम मसलत लहान मोटी करणें ते करावी. येविशींची खातरजमा शेवटपावेतों एकत्र रीतीची असों द्यावी. आमची निष्ठा चित्तापासून हेच आहे. यांत, अंतर कधींच पडावयाचें नाहीं. याजवर श्रीसत्ता ! परंतु निश्चय तों याप्रमाणें आहे. येथील सविस्तर मल्हार फडके जबानीं सांगतां कळों येईल. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ करावा हे विज्ञप्ति.

पत्रांक. २३९ श्रीसांब. १७०१ कार्तिक शुद्ध १ नंतर.

पौ कार्तिक वद्य ४ शनवार रात्रौ.

शेवेसी सां। नमस्कार विनंती उपरी. आपली आज्ञा घेऊन स्वार जह्यालों, ते सोमवारीं दोन प्रहरां लष्करांत सुखरूप पावलों. त्या ग्रहस्थाची रात्रीस भेट जाहली. राजश्री चिमणाजी पंत येथें नव्हते. प्रतिपदेस आले. त्यांची आमची भेट होऊन मजकूर ध्यानास आला. या मजकुरांत कांहीं जीव नाहीं. मनस्वी जाबसाल. तुम्हांस पूर्वी लिहिला होता. त्या प्रों आहे. आपल्या ग्रहस्थाची व मुख्याची भेट जाहली. कार्याचा खुलासा समजला. त्याचा तपसील तेथील पत्रें आलीं होतीं त्यांजवरून शिलेदाराचे हवाला गृहस्थ केले. तुम्हीं जाणा, व हे जाणा ऐसें लौकिकांत जह्यालें. आंतून जाबसाल, तुम्हीं आपला पैका घेणें, कोणाचें भय न धरणें, ऐसा खुलासा समजल्यानंतर आपल्या गृहस्थाकडून शिलेदाराकडे जाबसाल लाविला आहे. त्याजवरून रा। नकारनामकास उपद्रव बहुत जाहला होता तो शम करविला आहे. शिलेदाराचे मतें, आमचा पैका द्यावा. त्यास, आम्हीं उत्तर केलें कीं शाई शिरस्तप्रों पैका देउं. ऐसें बोलल्यानंतर, त्यांतहि सोय पडत नाहीं. त्याचे हजार राऊत दुसाला चाकरी आणि पावती चाळीस हजार रुपये ! बहात्तर हजा-

यांच्या चिठ्या सावकारावर आहेत. त्याही बजिन्नस चिठ्या त्याजपाशीं आहेत. चिठ्या पो कांहीं रुपाया पावला आहे. त्याचा कारकून रा नारोपंत नांदुरकर चिमणाजीपंताचे विद्यमानें आम्हांस भेटले. येथील प्रकार ऐसा आहे. मुख्याकडील जाबसाल तर परिछिन्न शिलेदाराचें नांव घेत नाहीं. तुह्मी जाणत व शिलेदार जाणत, ऐसें स्पष्ट उत्तर जाहलें. मुख्याचा जाबसाल शोध करतां गांवचे गांव सुरक्षित चालवावे व मुख्याचा व दरबार खर्च सव्वालक्ष पर्यंत पडतील, आणि गृहस्थाची मुक्तता होईल. परंतु शिलेदाराचा जाबसाल राहतो. जहालें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. शिलेदाराचा जाबसाल हिशेब देणें. शाईशिरस्तेप्रों पुढें वर्तणूक करूं. आह्मांस ज्या गृहस्थाकडे पाठविला त्याचा मनसबा कीं, शिलेदाराची तोड पाडावी. हें खरें. यास कारण मुख्याचा जाबसालाचा विश्वास पटत नाहीं. याला कारण बकारनामक याजकडे अकार नामकाचे ग्रहस्थांनीं पक्का जाबसाल केला आहे कीं नारोबाची सुटका न होय ऐसें पक्केपणें कित्येक जाबसाल त्यांनीं पक्के करून घेतले आहेत. या अर्थी मुख्याचा जाबसालाचा भरंवसा नाहीं. सविस्तर अर्थ ध्यानास आणून उत्तर लिहावें. व रावसाहेब भास्करपंतांस खर्चाविशीं त्यांनीं चिठी लिहिली आहे, त्याप्रों त्यांची बेगमी करावी. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असों द्यावा. हे विनंती.

पत्रांक २४० श्रीसांब १७०१ कार्तिक वद्य ५

पौ कार्तिक वद्य ७ मंगळवार च्यार घटका रात्र.

सेवेसी सां नमस्कार विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. येथील मजकूर आपल्या गृहस्थाची व मुख्याची भेट जाहली. त्यांतील मजकूर पत्रीं लिहितां येत नाहीं. परंतु तिकडील पक्ष मुख्यांनीं भारी धरिला आहे. नकारनामकांचा मजकूर मुक्ततेचा. त्यांत मजकूर कीं, आम्हांकडे जाबसाल नाहीं. शिलेदारांची पैक्याची निशा करून त्यांणीं सुखरूप जावें. व शिलेदारांचा मजकूर तर मनस्वी आहे. तीन लक्ष शाईशिरस्तेप्रों त्यांणीं बाकी काढिली आहे. त्याही मधें ते मजकूर बोलतात कीं, बक्षीचे हिशेबानें शाईशिरस्तेप्रों देणें निघेल तो ऐवज देणें. त्यांतही पांच रुपये कमी दिल्यास घेऊं. त्याचाही मजकूर. आपल्या गृहस्थास दरम्यानें घालून जाबसाल परभारें केले आहेत. येथल्या मुख्यांशीं व तेथील कारभाऱ्याशीं कांहीं पेंचही आहेत. त्याचे जाबसाल होतील तेसमईही शिलेदारांचा पैका दिल्याविना मुक्तता होत नाहीं. व ते गृहस्थ हातीं लागणें हे गोष्ट तों घडत नाहीं. दोहों चोहों दिवसांमध्यें मागती मुख्याशीं गांठ घालून त्याची ममता आपल्या यजमानावर व याची मुक्तता होय ऐसें करितों.

परंतु पैका बहुत पडेल. मागाहून होईल वर्तमान तें लेहून पाठऊं. आपल्या गृहस्थांनीं चिठी लिहिली आहे. ती अलाहिदा पाठविली आहे. ती पावेल. वाचून त्यासही उत्तर ल्याहावें. रवाना मिती कार्तिक वा। ५, सायंकाळ, चार घटका दिवस. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असों द्यावा. हे विनंती. पत्र पाठवाल तें रा। देवराव हिंगणे यांचे राहुटीस पाठऊन द्यावें. जो माणूस पाठवाल त्यासही स्थळ हिंगण्याची राहुटी सांगावी. हे विनंती.

रा॥ दादास व दिवाणजीस सां। नमस्कार. लिहितार्थ परिसिजे. उत्तर तपशिलवार लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

पत्रांक २४१ श्री. १७०१ आश्विन वद्य अखेर.

पु॥ श्रीमंत राजश्री बाळाजी नाईक स्वामीचे सेवेसीं:—

विनंती. आपण आश्वीन शुद्ध १४ चें पत्र पाठविलें तें पावोन परम संतोष जाहला. पत्रीं मजकूर कीं, तुह्मी येजमान बहुत सावध असावें ! इकडील काळजी न करावी. काळूबराबर पत्रें पाठविलीं आहेत तीं समक्ष द्यावीं. व राजश्री बाळोबानाना बहुत उपयोगीं पडले. पाहिले पासोन यजमानाचे पदरीं. यांचें यजमानांनीं चालवावें. कैलासवासीयांनीं गांव दिल्हे आहेत ते चालविले पाहिजेत. व ऐवज जलदीनें पाठवावा म्हणून तपासिलें लि॥ त्यास, यजमानापाशीं निष्ठेनेंच वागत असों. दुसरा विचार नाहीं. दरबारची काळजी आह्मीं कशास्तव करावी ? आपण प्रसंगीं. त्याअर्थीं आम्ही बेफिकर असों. ऐवजाचा मजकूर तरी तरतूद करीत आहों. इकडे राजाराम गोविंद यांची गडबड व दुसरी चंद्रराव पवार यांची जाहली. यामुळें सावकार धीर पुरून काम होत नव्हतें. आतां तरतूद लवकरच करित असों. राजश्री बाळोबानाना बहुत उपयोगी पडले. त्यास यांतील काय भाव आहे तो समजालियांत येत नाहीं. तरी सविस्तर लिहिलें पाहिजे. म्हणजे समजण्यांत येईल. बहुत काय लिहिणें? कृपालोभ करावा हे विज्ञप्ति.

पत्रांक २४२. श्री. १७०१ मार्गशीर्ष शुद्ध ३

पै॥ मार्गशीर्ष वद्य ३ रविवासर शके १७०१

पु॥ राजश्री बाळाजीपंत नाना स्वामीचे सेवेसीं:—

विनंती उपरी. तुह्मी केलेलीं कलमें लिहिलीं त्यांचीं उत्तरें येणें प्रमाणें:—

सरकारकामाचें बोलणें चालणें च्यार रुपये उणें अधिक नाईकांनीं बोलून करारांत आणिलें आहे, म्हणून लिहिलें. उत्तम आहे. कलम १

राजश्री संभाजीबाबा यांणीं व घनःशाम नारायण यांनें प्रयत्न मात्र केला, सरकारांत पत्रें गोविंद जोशी यांजबराबर पा, परंतु सरकारांत जाबसाल न जाला, म्हणोन लिहिलें तें कळलें. कलम १.

श्रीमंत राजश्री नानाफडनीस यांचें हारण व नाईकाचा खलबत्ता हरीपंत जटार यांजसमागमें पाठविला आहे तो पावलाच असेल. उत्तर पाठवावें. कलम १

अकारयाजविशीं परभारें कांहीं लिा, तरीं तुह्मावर घालून ल्याहावें, तरी जें लिहिणें तें तुह्मावरी घालून लेहूं. कलम १.

सतरा गांवचा मजकूर व गल्हे मरोळी, त्यास तूर्त गडबड माजली आहे. तूर्त काय समजावें. पुढें निवळ जाहलियावर तुमचे व नाईकाचे विचारें ठरेल तें केलें जाईल. कलम १.

निंबाळकर सोयरे याजकडील लग्नाचा मजकूर लिा. त्यास त्यांचींहि पत्रें परभारें येथें आलीं आहेत. तूर्त दंगा! कांहीं सुचत नाहीं. याचा निश्चय मागाहून करून पाठवितों. त्याप्रा करावें. कलम १.

. नारायणराव गोविंद वगैरे शिलेदार यांचा मजकूर लिा. त्यास तुह्मी इकडे यावयाचे सुमार होईल तेव्हां येथून लेहून पाठऊं. त्याप्रा करावें. कलम १.

हुंडियाच्या पेटा पाठवणें म्हणून लिा त्यास ,जाबि हुंडिया नाहींत... पा आहेत. पा असतील. कुशल देवेश्वर यांचे हुंडीची दिकत होती. म्हणून पेठ पाठविली आहे. ऐवज पावेल. चिंता नाहीं. कलम १.

ऐवजाविशीं ताकीद असावी. त्यास, ताकीद तो आहेच. गडबडीस विलाज काय करावा! कलम १.

सुरतआठाविशीं तील खबरदारी असावी. त्यास, तेथील बंदोवस्त आहे. त्याविशीं चिंता नाहीं. कलम १.

बाळ ठाकूर याचे यजमानाचें समक्ष बोलणें जालें आहे. त्यांत कांहीं अंतर नाहीं. पक्केपणच आहे. कलम १

गोपाळराव रामचंद्र यांचा मजकूर त्यास त्याचे चुलते आम्हांपाशीं बहूत आग्रह करून पत्र तुम्हावर घेऊन गेले आहेत कीं, हे तुमचे मिळणींत मिळाले. असें असल्यास लेहून पा उपरांत येथून लिहिणें तें लिहूं, म्हणून पत्र दिल्हें आहे. तुमचे युक्तीस पडेल तें करावें. कलम १.

सरकारांतून बंदोवस्त कागदपत्राचा वगैरे काय करून द्यावा म्हणून लिा. त्यास, सर्व तुमचे ध्यानांत आहे. कनिष्टाचा बंदोबस्त व गृहस्थांचा यथास्थित रीतीनें व गंगातीरीं एक गांव निर्वेध चांगला बहुत दिवस चाले असा करून घेणें. वरकड समक्ष सांगितलें आहे, व याद दिल्ही आहे, त्याप्रा करावें. इंग्रजाकडे माहाल गेले आहेत त्याचा प्रेत्न करून घ्यावा. कलम १.

नवापूर द्यावें असें वचन राजश्री

तिगस्तां माहाल इंग्रेजाचेकडे आपले गेले आहेत त्याचे मोबदला पंचमहाल वगैरे सरकारांतून देत होते. त्यास ऐवज थोडा म्हणून न घेतले. त्याचा प्रेत्न करून पाहणें. कलम १

राजश्री नानाफडणीस यांचें पत्र आलें होतें त्याची नक्कल तुह्मास पाहण्यास पाा आहे. पत्रांत मजकूर कीं, मसलतीचें काम आहे, तुम्हांकडील मातबर माणूस पाठऊन द्यावा, त्यांसीं बोलूं. याप्रमाणें पत्र यजमानाचें नांवें आलें होतें. त्याचें उत्तर येथून लेहुन दिल्हें कीं, आह्मांकडील नाईक पहिले पासोन बोलतात. तेच बोलतील. त्याप्रो लेहून दिल्हें आहे. तुम्हांस कळावें. कलम १.

हरी तात्याचें आहे, व यादहि करावयाची आहे. पुण्यास स्वारी गेलियावरी सनदा करून द्याव्या असा करार आहे. तुम्हास वाकफच आहे. कराराची याद तुह्मी जातांना तुह्माजवळ दिलीच असेल. नसली तरी पाठऊन देऊं. करारांत आणावें. कलम १.

येणें प्रमाणें लिहिलें आहे. यांत नाईकांचे विचारें येईल तैसें करावें. मिति मार्गेशीर शुध ३. बहुत काय लिहिणें ! कृपा किजे. हे विनंति.

पत्रांक २४३ श्री १७०१ मार्गशीर्ष शुद्ध १०

श्रीमंत राजश्री बाळाजीनाईकनाना भिडे स्वामींचे सेवेसीः—

विनंति उपरी. तुह्मीं पत्र मार्गेशीर शुद्ध ४रविवारचें पाा तें मंदवारीं दोन प्रहर रात्रीस पावलें. सातवे रोजीं पावलें. लिहिला मजकूर कळों आला. अटकेंत असतां पत्रें कशीं येतात, ह्मणून लिा. चवकशी तो बहुत आहे. परंतु हें कलियुग! लहान माणसास द्रव्य दाखीवल्यास न करावयाचें कर्म करितात. यजमान व ते एक जाहले ह्मणून लिा. त्यास, येथें तों कांहींच नाहीं. तेथें आपल्यास प्रत्ययास कैसें आलें, त्याचा शोध पुर्तेपणीं करून लिहून पाठवावें. एरवीं शिके तो असामींवार त्याजपाशीं आहेत. अक्षरें दुसऱ्यासारखीं काढून मधील मध्यें कर्में आजपर्यंत करीत आले आहेत. तेहि त्यांचे नित्यांतील आहेत. याजकरितां खरें खोटें कोठून आहे, हें समजलें पाहिजे. याजकरितां चिठी पत्रीं ठिकाणीं पाडावी. यजमान आम्ही बाहेर निघालों. तेथें होते तों दबाव होता. मागें राहणार नाहीं, बखेडा होईल, याजकरितां उभयतां बंधु मार्गशीर शुद्ध ३ चे दिवशीं अलंकार करून केशवराव देशमुख आले होते. त्याजसमागमें सरंजाम देऊन वडनगरास रवाना केलें. तेथें पोंचलेयाचे

आपणास पत्र आलें नाहीं. येईल. समागमें आपलेकडील खिजमतगार, ब्राह्मण, कारकून आरबांच्या बैरखा नेहमीं दोन दिल्या आहेत. याशिवाय पोंचवावयाकरितां पागा वगैरे सरंजाम दिल्हा आहे. तो अद्याप आला नाहीं. कळावें. येविशींची खातरजमा असों द्यावी. आमचा प्राण गेल्यावर मग जें घडणें तें घडेल. आह्मी तुह्मी एकच भाईबंद, स्नेही, धणी, सर्व आपली जोड केली आहे. वरकड त्याग न करितां करणें प्राप्त जाला आहे. तेव्हां आपलेशिवाय दुसरा विचार नाहीं. यजमानानीं लिा आहे, त्याजवरून कळेल. मिती मार्गशीर शुद्ध १० मंदवार प्रातःकाळ. हे विज्ञप्ति.

पत्रांक २४४ श्री १७०१ मार्गशीर्ष शुद्ध १०

पुरवणी राजश्री बाळाजीनाईकनाना भिडे गोसावी यांसीः—

विनंति उपरी. आपण बरखोडेविशीं लिहिलें कीं, थोडक्या कामासाठीं राजश्री हरीपंततात्या यांचे चित्तांत संशय पडतो, याजकरितां मल्हारजी फडके यांसी मनाई करून पत्र पाठवावें, त्यांणीं सनद आणिली त्यावरून सर्वांस आश्चर्य वाटतें. ऐशियास, आह्मीं जहागिरीची सनद दिली. परंतु फडके यांणीं समक्ष कबूल करून बोलिला जे, मी नाइकास पत्रें दाखवून त्याचे सांगितलेप्रमाणें तात्याचे मर्जीनुरूप घडून आल्यास बंदोबस्त करून घेऊं. तुह्मांस न सांगतां परभारा बखेडा केला. असो. त्याजला माघती पत्र सादर असे. मुजाहीम होणार नाहीं. आपण राजश्री तात्या यांसीं समाधानाचेंच बोलावें. कळावें छ ९ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंती मोर्तबसुद.

पत्रांक २४५ श्री. (नकल) १७०१ मार्गशीर्ष शुद्ध १०.

राजश्री बाळाजीनाईकनाना भिडे गोसावी यासीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा फत्तेसिंग गाइकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित असावें. विशेष. तुह्मी मुजरत अजुरदार समागमें पत्र पाठविलें तें पाऊन सविस्तर लेखनार्थ ध्यानास आला. आंगराजाकडील मजकूर विस्तारें लिहिला कीं, केलें काय. ऐशीयासी, येथें त्यांतील एकहि प्रकार नाहीं. त्याइविर तेथें आपणास दरबारीं सांगितलें असेल त्यागोष्टीचा शोध पुरतेपणें मनास आणून कोणाच्या कागदपत्रीं काय, तें साद्यंत ल्याहावें. मारानिले व त्याचे बंधू असे मार्गशीर्ष शुा ३ अलंकारयुक्त राजश्री केशवराव देशमूख समागमें वडनगरास पाठविले आहेत. वरकड तेथें कोणी लबाडी केली असेल, त्याचें ठिकाण लाऊन ल्याहावें. तुमचे विचारासिवाय कांहीं नाहीं, येविशींची खातरजमा

बाळाठाकूर यांणीं केलीच असेल. परंतु इतक्या लबाड्या मर्धींच होतात ! त्याचा शोध व शिक्यानिशीं पत्रें व स्वदस्तुर चिठी याचा शोध मनास आणून लिा कीं, पुन्हां हें न घडे. त्याचें पारपत्यही घडल्या कोणी असें करणार नाहीं. मधींचे मधें असें घडल्या घरबूडच होणार. त्यापक्षीं हें ठिकाण लाऊन जरूर जरूर लिा. माझ्या गळ्याची शपथ असे. तर आपण हे गोष्टीची सुस्ती करूं नये. बहुत काय लिहिणें ? राा छ ९ माहे जिल्हेज. हे विनंति.

मार्गशीर्ष वद्य ५ सोमवार राा नारायणराव गोविंद यांजबरावर अस्सल.

पत्रांक २४६

पैा छ १० जिल्हेज श्री. १७०१ मार्गशीर्ष शुद्ध ११

रावसो मेहेरबान करमफर्माय मोखलिस बाळाजी पंडत फडनवीस सलमलाहुताला.

बादज पाँक मुलाखत मसरत आयात इत्तीहाद आअरबाद येथलि खुषी जाणून आपली षादमानी हमेषा कलमी करीत आलें पाहिजे. दर्रीविला, बरखुरदार सादत व एकबार तशिांकरीम साहेब यांस सावणूरचा नबाब अबदुल हमीदखान याचे लडकीची निसबत मोरर पाहून नेमदीन छ २५ जिल्कार्दी शादीची तारीख मुकरर जाहली आहे. हे खुषी आपले असे, याकरितां कलर्मी केलें जातें जे आपण येऊन शादीची खुषी नजरेनें पाहून दिलशाद व दोस्तीची तरक्की केली पाहिजे. हमेष आपली षादमानीस निगारस करवीत यावें. जियादा लिहिणें काय असे ?

पत्रांक २४७

पौ मिती मार्गशीर्ष वद्य ४ रविवार रात्रौ. श्री १७०१ मार्गशीर्ष शुद्ध अखेर

राजश्री बाळाजीनाईक स्वामीचे सेवेसी:—

सेवक गोविंद गोपाळ साष्टांग नमस्कार. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण कार्तिक शुद्ध १ व सुध पंचमीचीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिा सविस्तर अवगत जाहलें. चिरंजीव राजश्री नारोबानाना यांची काळजी न करावी. आपल्यावर विश्वास, तेव्हां काळजी कशास करावी, हें तो खरेंच आहे. आमचा अभिमान आपणासच आहे. तेथें आह्मीं उपरोधिक काय ल्याहावें ? आपण आह्मांविशीं बहुत मेहनत करितात, ह्मणोन राजश्री बाळाजीपंतांनीं तपसिलें लिहिलें. त्यास आमचा विचार आपल्याशीं किमपी दुसरा नाहीं. ऐवजाचा भरणा होणें. येथलि अर्थ पाहतां आपणांस काय ल्याहावें ! केवळ संकटाचे दिवस प्राप्त जाहले आहेत.

चहूंकडून हंगाम एकच माजला आहे. सिबंदीचा पेंच फौज घरीं बसलिया-मुळें सिबंदी चडली. जलचर नर्जीक याचा विश्वास नाहीं. यामुळें घरीं बसून राहणें प्राप्त जाहलें. आतां तरी आपलीं पत्रें व सरकारचीं पत्रें आलीं कीं, तह बिघडला. यामुळें केवळ लोकांचे होश ठिकाणीं राहिले नाहीं. मुलूख, प्रजन्य नाहीं यामुळें खराब जाहला. दुसरें हें अरिष्ट उभें राहिलें. पुढें याचा विचार काय करावा? आपण आमचे वचनावर सरकारांत वचनीं गुंतलें. यास पार पाडणार श्री समर्थ आहे. आपण कांहीं चिंता न करावी. ऐवजाचे तजाविजींत असों. चिरंजीव राजश्री नाना आपणापाशीं आलियाचें वर्तमान जलदीनें लिहिलें पाहिजे. आमचा अभिमान सर्वप्रकारें आपणास आहे. या अर्थीं आह्मांस काळजी कोणे गोष्टीची नाहीं. येथील सविस्तर यजमानपत्राव-रून कळेल. सारांश, ही दौलत बोढीखालीं बहुत आली आहे. कांहीं बाकी राहिली नाहीं. एक एक विघ्न नवेंच उभें राहतें. यांत ईश्वर लाज राखील ते खरी. सरांश, आह्मांस आपले पाशीं खरेपण राहिलें ह्मणजे सर्व जालें. वरकड सविस्तर मागाहून लिहून पा. चिरंजीवाचे येणें आपल्यापाशीं जालें न जालें हें कळत नाहीं. तरी सविस्तर लिहावें. न जाल्यास येणें होईल तें करावें. आपल्या विचारास करावयाचें तसें करावें. आह्मी आपल्या आज्ञेशिवाय नाहीं. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ किजे. हे विज्ञप्ति.

पत्रांक २४८ श्री. १७०१ मार्गशीर्ष वद्य ९

राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर गोसावी यासी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री हरी बल्लाळ आ-शीर्वाद. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आपणाकडून पत्रें येतात व राजश्री बाळाजीनाईकनाना सांगतात, त्यावरून सविस्तर कळतें. इकडील कित्तेक मजकूर लोकवार्ता ऐकोन चित्त संशयाविष्ट होत असेल. त्यास, श्रीमंत नानाची कायम मिजाज आहे ? जो आपल्याशीं करार आहे त्यांत दुसरी गोष्ट होणार नाहीं. येविसीं पुर्तेपणीं खातरजमा असावी. आपले दवलतीचें कल्याण व्हावें हेंच इच्छा व तत्प्रत्युक्त साधन तेंच करितों. आपण श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे पायांशीं एकनिष्ठ. तेव्हां, दुसरेसारखी गोष्ट कैसी घडेल ! कोणी कित्तेक बनाऊन सांगतील त्यांजवर न जावें. जो येथील खंबीर आहे, तो बळकट आहे. चिंता न करावी. येविशीं बाळाजीनाईकनाना लिहितील त्यावरून कळेल. रा छ २२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. आह्मी येथें असतां आपण कोणेविसीं चिंता न करावी. हे विनंती.

पत्रांक २४९.

पो मिति पौषशुा १२ श्री. १७०१ मार्गशीर्ष वद्य १०

श्रीमंत राजश्री बाळाजीनाईकनाना स्वामीचे सेवेसीं:—

सेवक गोविंद गोपाळ सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ताा छ २३ माहे जिल्हेजपर्यंत वर्तमान येथास्थित जाणोन स्वकीयें कुशल लेखन करीत असावें. विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं त्यास सविस्तर लेहून संतोषवीत जावें. इकडील वृत्त पेशजीं लिहिलें आहे त्यावरून कळों आलें असेल. वरकड साद्यंत यजमान साहेबांचे पत्रावरून विदित होईल. सर्व प्रकारें भरंवसा आपला आहे. चिरंजीव राजश्री नारो गोपाळ याजविसीं आपणांस बहुत लिहिलें. परंतु सरकारांत चार गोष्टी सांगून त्याची रवानगी न जाली. या कार्याची आपणापासून दिवसगत न लागावी. या उपरी सत्वर मार्गस्त करावें. विस्तार ल्याहावा ऐसें नाहीं. तेथें बहुत उपद्रव मांडिला आहे. आपणास कळतच असेल. सारांश, सरकारलक्षांत एकनिष्ठपणें असतां तेथें ऐसा विचार नसावा. असो. आपण श्रम करितां कमी करीत नाहीं. तेव्हां आमचे दैवयोग. आपण काय करितील ? वरकड इकडील मजकूर तरी जलचर सामान सरंजाम करून तयार जाले आहेत. बोलवा व मसलतींतील तो विचार उत्तरदिशेची आहे. घांट व मार्ग इकडील व दक्षिणेकडील कोंडाईवारी व सेंदव्याचा वगैरे तमाम पाहावयासीं गेले आहेत. बारा बेलदार लाऊन नर्मदाचा घांट नीट करावयासीं गेले आहेत. गुंता तयारींत काडीमात्र नाहीं. आपलेकडील भरंवसा धरावा, तर यावेळपावेतों दृष्टोत्पत्तीस कांहीं येत नाहीं! आह्मांस तों तीन जागा सांभाळणें:—एक नर्मदाउत्तरतीर, दुसरें दक्षिणतीर, व महीउत्तरतीर तीन्ही ठिकाणीं त्याचा शेजार एक ठिकाणीं असल्यास चिंता नाहीं. सर्व शत्रुपण माथां आलें आहे. दुसरेकडील येथील भरंवसा बाळगावा तरी कळतच आहे! शहरचा कारभार सावकारी आहे. ऐशियासीं तिकडून कोंडाईकडून आगमन सुरतप्रांतीं अति सत्वर जाल्यास उत्तम आहे. ह्मणजे उत्तरतीराकडील काळजी नाहीं. जैसें करणें तैसें घडेल. हे गोष्टीस दिवसगत लागली तर दोष न ठेवावा. मग जैसें घडावयाचें असेल तैसें घडेल. सारांश, येथील लक्ष तुह्मासिवाय नाहीं. खातरजमा असों द्यावी. परिणाम मात्र शुद्ध व्हावा नाहींतर एकहि साधन नाहीं. ऐसें जाहल्यास मग विचार कळतच आहे. दुसरें चंदरराव पवार यांचें पारपत्य होऊन पेटलाद व आमोद येथील ठाणीं सरकारचीं बसविलीं. आमोदेस सरंजाम आपले कडील आहे. कारण, क्‍ादार यांचे मतें असावा. नाहीं तर क्‍ादार यांच्यानें ठिकाण धरून रहावत नाहीं. कारण मित्र नजीक शेजार. याजकरितां याप्रों करून बंदोबस्त केला आहे. क्‍ादार यांचे विचारें सरंजाम बोलावणें जाहल्यास बोलाऊन घेऊं. पवार नर्मदा उतरून अंकलेश्वरीं पोंचले. तेथून पुढां जाणार. जातील.

जातसमयीं आपलेकडील माहाल व सराइ येथील वोळी धरून नेल्या व गुरें ढोरें घेऊन गेले! माहालाची खराबी बहुत केली. पुढां सुरतेकडे जावें या मनसब्यांत त्यास, त्यांचे यजमानाचें पत्र आलें की, तेथेंच राहावें. सरंजाम तोफा वगैरे पायदळ आणखी रा करणार. ऐसी बातमी आली. तेव्हां आणखी उपद्याप करावयाचा मनसबा आहे. मग जें घडेल तें पाहावें. रा लक्ष्मणराव चिटनिस यांसीं रजा दिली. ठाणीं कांहीं उठविलीं. आण आपले कडील जलचर यांणीं पा व पाठवणार. मारनिले तेथें आल्यावर सविस्तर समजण्यांत येईल. सारांश, तिकडून आगमन लौकर व्हावें. म्हणजे सर्व गोष्टी उत्तम आहे. बहुत काय लिहिणें? कृपा करावी. हे विज्ञप्ति.

पत्रांक २५० श्री १७०१ पौष शुद्ध ३

श्रीमंत राजश्री नाईक स्वामीचे सेवेसीं:—

विनंती सेवक नारायणराव गोविंद मो जामगांव सां दंडवत विज्ञापना ताा पौष शुद्ध त्रितिया इंदुवासरे प्रहर रात्र पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालों, ते शनवारीं येथें दाखल जालों. रविवारीं श्रीमंत पाटीलबावांची भेट घेतली. त्याचा कित्तेक मार तपशीलवार राजश्री बाळाजीपंतनाना बक्षी यांचे पत्रीं लिहिला आहे. त्याजवरून श्रुत होईल. पत्रीं मार लिा आहे, त्याजप्रमाणें सरकारचे पत्राचा डौल यांचे नांवाचा तयार करून आधीं पाठवावा. याचा निग्रह आहे, ऐसें नाहीं. ममतेच्या विचारें सर्व आपले कृपेंकरून होऊन येईल. पत्रदर्शनीं विनंती लिहिल्याप्रमाणें पत्रें पाठऊन द्यावीं. बहुत काय लिहिणें? कृपा असों दिजे. हे विनंति.

पत्रांक २५१ श्री (नकल) १७०१ पौष शुद्ध १३

यादी कराराची येणेंप्रमाणें ठरली. सुा समानीन मया व अलफ. मो जाहला. विः—

७१००० तूर्त नक्त द्यावे.

५०००० मुख्यास.

२१००० दरबारचा खर्च.

५००० रावजी-

५००० भाई.

४००० आबा चिटणीस.

२००० रामाजी पाटील.

२००० आपाजी सावाजी.

२००० निळो शामजी.
१००० जिऊबादादा.

२१०००

७१०००

१५०००० राजश्री अंताजी नागेश याजकडून हिशेब घ्यावा ह्या ऐवजीं.
१००००० दरबारचा खर्च.
५०००० मुख्यास.

१५००००

सदरहू याद तुमचे हातीं असावी.

३२००० सरंजाम किल्ले पायागड यांसी लाऊन द्यावा ह्मणोन पहिला करार तलबाचा.

२५००० मुख्यास.
४००० रावजीस गांव एक चांगला.
३००० भाईस गांव एक चांगला.

३२०००

याच्या सनदा द्याव्या अथवा सनदा जवळ नसल्यास कराराची याद लिहून देऊन यांचे कारकुनाजवळ सनदा यजमानाजवळ गेलियावर द्याव्या.

सदरहु तीनही कलमें याजप्रमाणें ठरलीं. याची तरतूद लिाप्रमाणें करून पाठवावी. आपण म्हणतील कीं, तूर्त देणें. याचा ठराव सांगितल्याशीं अधिक जाला तर येथून गृहस्थ गेले याजमुळें आह्मांकडून बोलण्यास कमी जाहालें. तेव्हां प्रदिसा फार जाहली. दोघे मुद्दई सबल. येथें त्यांचीं सूत्रें नाना प्रकारचीं लागलीं. मग कोणेप्रकारें बंदोबस्त खचित व्हावा. यामुळें ठराव याजप्रों जाहला. हिशेबाचे वक्तीं ठराव जाहला. तो आपले सरकारचे बिफायतीचा आहे. सरंजाम ठरला तो पहिले बोलण्यांत आहे. त्यास शक, विशमता जाहाली. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञप्ति. मिति पौष शुा १३

पत्रांक २५२ श्री. १७०१ पौष वद्य १४

राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर गोसावी यांसी.:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो महादजी शिंदे रामराम विनंति. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित असिलें

पाहिजे विशेप. आपणाकडून राजश्री नारायण गोविंद जामगांवचे मुकामीं आले. यांणीं कित्येक आपणाकडील घरोब्याचे अर्थ सांगितले. त्याजवरून कळलें. ऐशास पूर्वीपासून आपला आमचा स्नेह चालत आला आहे. त्याचप्रों पुढें चालावा, हेंच आमचें मानस आहे. त्यास, सांप्रत गुजराथप्रांतें इंग्रज यांणीं दंगा केला आहे. त्यांचें पारिपत्य करणें प्राप्त आहे. येविशीं मुजरत आपणाकडे पत्र पाठविलें आहे. व हालीं मारनिलेस सांगितलें आहे ते आपणांस लिहितलि. आह्मीही दरमजल येत असों. आम्ही येऊं तोंपर्यंत आपण दम धरून, ठाणीं जतन करून, शत्रूचे पारिपत्यास शेह द्यावा. त्याचा पराश्रम होऊं देऊं नये. आपणास सामील व्हावें, ह्मणून चिरंजीव राजश्री भगिरथराव शिंदे यांस लिहून पाठविलें आहे. आजपर्यंत आपण सरकारचें लक्ष राखिलेंच आहे. त्याचप्रों पुढें सरकारउपयोग करून दाखवावा. वरकड इकडील अर्थ आपणासीं दुसरा नाहीं, हें मारनिले लिहितलि. पन्नाससाठ तोफा समागमें आहेत. ह्या दरकुचांत लांब मजलींत चालत नाहींत. याकरितां पंचवीस तोफा समागमें घेऊन, वरकड तोफा मागें ठेविल्या. मागाहून येतील. तूर्त पंसवीस तोफा थोर लहान बराबर घेतल्या. त्यासुद्धां जलदच येऊन पोहचतों. तों पावेतों इंग्रजांस ठांसून राखावें. वर्तमान वरचेवरी कळवीत जावें. रा छ २७ मोहोरम. बहुत काय लिहिणें? लोभ किजे हे विनंती. मोर्तबसूद.

श्री
जोतिस्वरूप चरणीं
तत्पर । राणोजी सुत
माहादजी शिंदे निरंतर ॥

पत्रांक २५३ श्री. १७०१ माघ वद्य ११

दंडवत विनंती उपरी. छ. २९ माहे मोहरमची हस्ताक्षरची चिटी पाठविली ती पावली. पावोन संतोष जाहला. कित्तेक अर्थ खातरजमेचे लिहिले. त्यासी आजपर्यंत ममतेचें लक्ष अकृतिम आमचे ठायीं जाणोन सर्वस्वीं अर्थे प्राणें आमचें लक्ष सरकारचे सेवेंत. दुसरा अर्थ नाहीं. त्यापक्षीं सांप्रत जलचरांचा प्रकार वृद्धिंगत. कोण्हीकडील साहित्य समयासीं न जालें. प्रांताचा विध्वंस, स्थळाचा अपाय जाहल्यास पुन्हां विशेष प्रयत्न श्रमसाध्य. कारस्थानी

समयोचित करणें तें करावें लागती. परंतु ज्यांत सरकारमसलतीत उपयोग त्याजवर नजर आहे. यांत अंतर असेल तर शपथ असे. येविशींची खातरजमा असों द्यावी. सविस्तर नाईक निवेदन करतील. त्याजवरोन कळेल. रा छ २४ माहे सफर. हे विनंती.

पत्रांक २५४

श्रीशंकर प्रसन्न. त्रिसुद १७०१ माघ वद्य ३०

राजश्री पाटील बावा गोसावी यांसीः—

श्रीमंतसकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री बाळाजी अनंत स्नो श्रीमंत राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर आशिर्वाद. विनंती. येथील कुशल ताा माघ वद्य पावेतों सेवकांचें वर्तमान यथास्थित असें. विशेष. आपण राजश्री नारायणराव गोविंद यांसी आज्ञा दिली. मारनिल्हे येथें आले. सविस्तर कृपेचें वर्तमान सांगितलें. त्यावरून बहुत संतोष जाहला. आपण थोर. सर्व प्रकारें सांभाळ करित आलां. पुढें आपण करितील. श्रीमंत रा सेनाखासखेल आपणाशिवाय काडीमात्र नाहींत. जी विनंती करणें ती मारनिल्हेस सांगितली आहे. ती ध्यानांत आणून बंदोबस्त करावा. आह्मी सेवक लोक पदरचे असों. सेनाखासखेल यांसी पत्रें येथून रा केलीं आहेत. त्यांचीं उत्तरें आपणाकडेस येतील. त्याजवरून सविस्तर निवेदन होईल.

(यांतील शोधावरून हा मसूदा असावा असें दिसतें.)

पत्रांक २५५ श्री. १७०१ माघ वद्य

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामीचे सेवेसीः—

पोा बाळाजीनाईक भिडे साा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष राजश्री नारायणराव गोविंद हे राजश्री पाटिलबावांकडे पाठविले होते. त्यांसीं बोलोन येथें आह्मांकडे आले. त्यास त्यांच्या बोलण्याचालण्यांत पाटिलबोवांसीं आलें आहे. तें सर्व आपल्यास निवेदन करतील. तें ध्यानांत आणून, त्या दरबारचा बंदोबस्त पक्के रीतीचा करून, सेनाखासखेल यांचे निदर्शणांत येई तें करावें. सर्व भरंवसा आपला आहे. तेथें विस्तारें ल्याहावें नलगे. राजश्री खंडो आवजी पुन्हां आपले दरबारीं साधनास लागले आहेत, ह्मणोन वर्तमान परस्परें आईकितों. त्यास, सर्व साधन करणें आपणाजवळ. त्याअर्थी आह्मी काळजी कशास करावी? आह्मांकडील व सेनाखासखेल यांजकडील मजकूर मारानिले निवेदन करितील, त्याप्रमाणें बंदोबस्त करून देत असावा.

पत्रांक २५६ श्री. १७०१-१७०२

यादी राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर सुा समानीन मया व अल्लफ.

१ तुमची आमची निखालसता राजश्री बाळाजीनाईक भिडे यांचे विद्यमानें जाहली आहे. आपणांस खातरजमा पडावी येविसीं अलाहिदा कलमबंदी लिहिली आहे त्यावरून कळेल. ह्मणोन पत्र.

१ इंग्रजाचे मसलतीस आह्मी उभयतां सरदार येणार आहों. त्यासमयीं आह्मां उभयतांकडून अगर सरकारांतून तुम्हांविशींचे प्रकार वांकडे आढळल्यास आह्मी तुम्हांस सर्व प्रकारें हमारा आहों. अंतर देणार नाहीं म्हणोन बेलभंडार दिला आहे. कलम १

१ इंग्रजांचा व तुमचा वैरभाव पडल्यास तुमचें साहित्य सर्व प्रकारें करूं. म्हणोन पत्र. कलम.

पत्रांक २५७

(मुसा बुसी याचे पत्राची नकल) श्री (नकल) १७०२ आषाढ वद्य २

जहांमगब अवालिमरतबात शोकतमाली मनलतमुलान मेहरबान मदारुलमहाम बाळाजी पंडित मुबक मोहबतहूं:—

छ १५ रजब पावेतों दरजागा गुडालूर खैर आफियत जाणोन आपली पादमानी हमेशा कलमी करवीत असलें पाहिजे. दिगर इंग्रेजांनीं बहुत गरमी यंदा तिकडे......करून खुष्की तमाम काबीज केले. आणीक करीत जातात. याजकरितां खुष्कीचे तमाम सरदारांनीं इंग्रेजास तंबी करून खुष्कींतून त्याजला खेरीज करावें. ह्मणून नक्श ठराऊन त्याजप्रमाणें इंग्रजावर चहूंकडोन खुष्कीवर मोहीम केली आहे. दर्यांत इंग्रजांचीं जहाजें वगैरे आहेत. त्यांचे तंबीबद्दल फरासीसांची जमियत पाठवणें. परंतु मसलत करून नवाब हैदरखान बहादर इज्जतमकान याजकडून फरांसिसांच्या पातशाहास व वजीरासही ते खत लिहून मुजरतमहाम वगैरे पाठविले. करितां पेशजीं मुसे सोडोब व मुसे खुप्रैन बा फरासीसांचे जमियत रवाना करून पाठविले होते. त्यास हाली आम्हांसही सात हजार सालेदातसहित रवाना करून पाठविले. याकरितां आह्मीही गुडलुरास येऊन तीन महिने जाले. आह्मीं पाहिजे तसा सामान सरंजाम व तोफखान्याचे बैलावर चारीच घोडे व खबरदारीकरितां बैल उंटें वगैरे खर्चास नकद व खाणेचा सरंजाम नवाब फत्तेअलीखानबहादूर यांणीं करून दिल्हा आहे. आह्मीं आपली जमियत व नवाब मौसूफ यांची जमिय-

तेंचं इत्तिफाकानें अनकरीब चेनापट्टणचें मकान घेऊन, इकडील इंग्रजास तमाम गारत करून, तैसेंच मुंबईकडे दर्याचे राहानें मुसामुफरूनें यांस जाहाजासुद्धां रवाना करून पाठवून, आह्मीं खुषकीचे रहानें येत असों. खुदाचे फजलेकडून मुंबई वगैरे मकाने घेऊन रावपंडितप्रधान यांचे तालुके मकानांत वगैरे इंग्रजानें घेतले आहे तेंही सहजाणें सोडून दिल्हें जाईल. आह्मीं आलों तें पाहून, इंग्रज आपले जागां घाबरा होऊन, खुषकीचे सरदारांशीं फोडाफोडी करून, आपणाकडे करून घ्यावें ह्मणून या तजविजेंत आहेत. त्याची तजविज आपण आपले करारमदारावर कायम राहून, तिकडे इंग्रजांत तंत्री अंमलांत येईतसें करावें. आमचे व आपले इत्तीफाकानें इंग्रजाचें नांव निशाण नाहसिरखें नेस्तनाबूत होतील. आनि बहुतां दफन होतील. आपण हें काम रातीवानें, बनांव दूरंदेशी आहेत, कलमी करावें असें नाहीं. इंग्रजाकडील हमीष्टवीन गरनल......व असीर जाहले आहेत. त्यास सोडून द्यावें. त्यास कैद करून टेविलें...इंग्रजाकडे रघुनाथराव आहेत. त्याचा बदला होत आहे. आह्मांस आपले दोस्त जाणून हमेषा आपली षादमानी कलमी करीत आलें पाहिजे. जिआदा काय लिहिणें असे?

पत्रांक २५८ (असल बमोजीब नकल.) १७०२ श्रावण

पंडत अजम बाळाजपंत फडणवीस सलमलाहुताला.

सो मेहेरबान करमफर्माय मुखलिसां बादज षौक मुलाकत मशर्रत आयात हत्तीहाद माअसरबाद येथील खुष्की जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करीत यावें. दिगर, आह्मीं घांट उतरून मखालिफाकडील कित्तेक गड किल्लेस ठाणा घातले. मजकूरास पट्टी लेहून पाठविलें असे, त्यावरून मालूम होईल. चेनापटणाकडेही दौड पाठविलें असतां, मकान मजकुराचे आसपास नीम कोसचे फासलेनें फिरंगीयांचे बाग आहे. त्या भागांतील फिरंगी सरदार वगैरेस मारामारी केल्याचा मजकूर परभारें आपणास जहूरांत येईल. इकडील फौज चेनापटणचे चौगीर्दी मारामारी करीत फिरत आहेत. बिलफैल, फिरंगयांनी इकडे भारी शेह लागल्याकरितां मछलीबंदर वगैरे तमाम जागेची जमियेत बोलाऊं पाठविलें आहेत. त्यापैकीं कांहीं जामियत येऊन जमा जाली आहे. आणखी जामियत येऊन जमा होणार आहे. त्यांणीं जमा होऊन मैदानास निघतील तरी लढाई करावी, ह्मणोन मुकरर केलें असे. बिलफैल, या मुलखांत बारीषेचा शदत फार आहे. तरी आम्हीं आपले दोस्तीवर नजर देऊन, बारीष वगैरे एकही न पाहतां, सख्ती कबूल करून, कुलहा पैशाची तंबीचे कामावर नमूद जालों असों. जे जे तंबी होत जाईल ते हुजुरांत येईल. नवाब निजाम अल्लीखां व भोसले तांहाल खामोष

याचा सबब काय न कळे. तरी कलमीं करून पाठवावें. कृष्णराव नारायण तेथें पोहोंचले असतील. आपणाकडून येथें राहावयाबद्दल रावमारनिलेसच रवाना करून पाठविणेचें करावें. हमेषा आपली शादमानी कलमी करीत यावें. जिआदा लिहिणें काय असे ? हे किताबत.

पत्रांक २५९.

छ १ शवाल. १७०२ भाद्रपद वद्य २.

श्रमिंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:--

सेवक रामचंद्र कृष्ण रिसबुड सा। नमस्कार विज्ञापना. तागायत छ १५ माहे रमजान मुकाम आदवानी नजीक, नबाब बसालतजंग, जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमान छ २३ साबानीं जासूदजोडीसमागमें विनंतिपत्रें व नबाबचे इनायतनामे सहीत रवाना केले ते पावोन सेवेसीं अर्ज जाली असेल. अलीकडे छ १० माहे रमजानीं सेवक दरबारीं गेलों असतां, नबाब अमीरूलउमराव यांणीं खलबतींत च्यार घटिका बोलिले कीं, गटुंरचा तालुका नबाब निजामद्दौलाबहादर यांणीं आपणाकडे करून घ्यावयाविसीं इंग्रज फिरंगी बंगालेकर यांसीं जाबसाल लाविला आहे कीं, सरकारांत घ्यावा. आह्मांस ह्मणतात कीं आह्मीं सरकारांतून ऐवज नक्त देऊं. येविशीं आह्मी मुकरर अर्जी हुजूरांत केली आहे कीं, आपण पहिलेपासोन सर्फराजी केली आहे, त्याप्रो अमलांत आणावें. कदाचित् गंटुर तालुका सरकारांत ठेवणें मंजूर असलियास त्याचा ऐवज आह्मांस द्यावा. महाल लाऊन द्यावे. कारण कीं, आह्मांस पहिलेपासूनच जुन तालुका बहजार दिलात. कारवाई होते. तालुकियावर दामसुके करून देऊन व तनखा करोन देऊन कारवाई होते. नक्त ऐवज सरकारांतून देऊं ह्मटलियास येथील निकडीनें वारंवार अर्ज मारून करावे लागेल. याअर्थी ते गोष्ट ठीक नाहीं. कृपा करोन पहिलेपासोन सर्फराजी आहे. त्याप्रों ऐवज तालुका अथवा तोच महाल ठीक करोन, आमचा आह्मांस द्यावा. येविषयीं आपण हुजूरांत सई व कोशिस करून नबाबास लिहिलियाशिवाय मामुलप्रों अमलांत येत नाहीं. येविषयीं राजश्री जिवाजीपंत वकील सरकार यांस लिहून हुजुरांत काम होऊन ते गोष्ट करावी. येविशीं, राजश्री कृष्णरावजीकडून लिहावें, म्हणजे कामाची बरामद होईल. आह्मी सर्व प्रकारें श्रीमंताचें मर्जीशिवाय व हजरत बंदगानअलीचे मर्जीशिवाय नाहींत. ज्यापक्षीं उभयपक्षीं सल्ला, तेच आमची सल्ला. सल्लाप्रों वर्तणूक करोन हुजूरचे आश्रयाची बड आहे. यास, येविषयीं पूर्वीं लिहिलें आहे. व हालींही पत्रें व इनायतनामे पाठविले आहेत. पत्र पावतांच डाकेसमागमें मुसनापत्रें पाठवावीं म्हणोन बोलले. व म्हणाले कीं, येविषयीं आपण सई करोन

बोलिल्याशिवाय बंदोबस्त होऊन, काम चालणार नाहीं. म्हणोन बहुतां प्रकारें सांगितलेवरून सेवेसीं विनंती केली आहे. त्यास, स्वामीनीं साहित्य केलीयाशिवाय परिणाम दिसत नाहीं. छ ११ माहे मिनहूस सुतरस्वार हैदरअलीखानबहादर यांजकडून वर्तमान आलें कीं, 'आरणीचा किल्ला घेऊन अर्काटसमीप उतरलों. मोर्चे लाविले आहेत. आजपर्यंत अठरा किल्ले घेतले व वेळूरचा जाबसाल भेद केला आहे म्हणोन बोलत आहेत. छ १२ माहे मीनहूस सेवक दरबारीं रात्रीं दीड प्रहरीं नबाबाकडे गेलों असतां, नबाब बोलले कीं, काल रात्रीं बहादर यांचे लष्करांतून कोणीं लिहिलें आहे कीं, पहिले कडाचुरी नंदराज श्रीरंगपट्टणकर याजपासोन कर्ज घेतलेबा रुा एक क्रोड व्याज सहीत व त्रिचनापल्लीचा किल्ला द्यावा. दिलीयास सलुख करावा. ऐसें मानस दिसतें. म्हणून तेथून वर्तमान आलें आहे. म्हणून बोलत होते. पुढें दाहा हजार फौज चिनापट्टणावरून रवाना केली आहे व राजश्री उत्तमराव व इत्यारखान यांस हैदरअलीखान यांनीं रुकसत केलें. दोन चार दिवसांत येणार म्हणून उत्तम सुतरस्वार तेथून पुढें आला. त्यानें वर्तमान सांगितलें व पत्रेंही अलीखानबहादुर यांणीं कर्नाटक प्रांतीं लूट केली व महमूद बंदर येथील हत्ती वगैरे आणिले. म्हणून पेशजी विनंती केली आहे. गोटूर प्रांतींहून वर्तमान सावकारी लिहिलीं व लोक बोलतात की, मीर हैदरअलीखानाकडील यांणीं गोटुरचे तालुकियांत स्वारी करून जमीदारांचे भेदानें तमाम मुलखांत अंमल आपला केला. व फिरंगी कांहीं पंचवीस पन्नास व बार दोन च्यारसें गार्दी होते. ते मंगळगिरीकडे निघोन गेले. म्हणोन वर्तमान आहे. येविषयीं नबाबासही विचारलें असतां, बोलले की, आमचें वर्तमान कांहीं आलें नाहीं, लोक बोलतात. भागानगराहून वर्तमान आहे कीं, सुरतेकडील फिरंगीयास चिनापटणकरांनीं बोलाविलें असतां, उत्तर पाठविलें कीं, इकडे काम कांहीं जालें नाहीं, मग आमचें येणें कोणे प्रकारचें होईल! म्हणून वर्तमान आहे. व कोंकणपट्टींत फिरंगी इंग्रज बंदरकिनाऱ्यानें पुण्यापासोन सोळा कोशीं आहेत, म्हणोनही भागानगरचे आंखबारेंत होतें. येथील वर्तमान पेशजीं कपटराळचा किल्ला नबाबाचे फौजेंत घेऊन किल्ला पाहून बरोबर करून पुढें कोडदुरास फौज जाऊन महासरा केला आहे. व मीरमुबारकखान सबदरजंग हे नबाब निजामद्दौलाबहादर यांजकडून पेशजीं आले. ते अद्यापि येथेंच आहेत. छ १३ माहे मीनहूस दरबारीं गेलों असतां, नबाब बोलले कीं, तुम्ही श्रीमंतास व आपणास आम्हांविषयीं बहुत प्रकारें लिहावें कीं, गोटूरचे जिलियांत अथवा ऐवज महाल होत ऐसें करावें. आम्ही सर्व प्रकारें आम्हीं आपले फौजेनिसीं आपले आहोंत. पुस्तेज्यापासोन घरोबा आहे साहिता केलियाप्रमाणें ह्या जाबसालास मामुलप्रमाणें अमलांत येते. योजना करून लिहोन अमलांत ये तें करावें. त्याजवरोन विनंती केली आहे. नबा-

त्यानीं आपली जोडीही दिल्ही आहे. मी बोललों कीं, आमची जोडी पाठवीतच आहे, हें कशास पाहिजे? त्याजवरोन बोलले कीं, काम जरूरी, आपली जोडी व सरकारी जाऊन सत्वर उत्तरें घेऊन येतिल. म्हणून पाठविली आहे. नबाबांनीं इनायतनामा आपणास एक व तीर्थस्वरूप राजश्री कृष्णरावजीस इनायतनामा व राजश्री हरीपंत तात्यास खलिता ऐसे घेऊन सेवेसीं पाठविले आहेत. येऊन पोचतील. जासुदास रोजमुरा द्यावयास आज्ञा करावी. उत्तराचीही आज्ञा होऊन रवाना करावें. पेशजीं तीन जोड्या जोडीमागून जोडी रवाना करीत गेलों. परंतु फिरोन एकही जोडी सेवकाजवळ आली नाहीं. रोजमुरेविशीं फार विलंब लागतो. वरचेवर पावत नाहींत. येथें महर्गता फार आहे. मागील रोजमुरे बाकी राहिले ते हाल्लीं ऐसें देऊन पाठवावें. सेवकास एथें येऊन एक वर्ष झालें. अद्यापि नेमणूकचिठ्ठी व जहागिरी गांवचा बंदोबस्त व खर्चासही कांहीं सरंजामी होऊन येत नाहीं. यामागोन आजपर्यंत कर्ज सावकारी खादलें. त्यास देण्यास कोठें ठिकाण नाहीं, आणि नित्य खर्चास पाहिजे. त्यास, साहेबीं कृपा करोन नेमणुकीची चिठी व जहागिरी गांवचा बंदोबस्त करोन व खर्चास हुंडी चिठी नारायण पेठेची करोन पाठवावी. येविषयीं वारंवार विनंती करावी. यास स्वाम सर्वजण आहेत. साहेबाशिवाय संरक्षण कसें होतें? साहेबाचे मर्जीस ज्याप्रमाणें कृपा करोन बंदोबस्त करोन पाठवावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक २६० श्री. १७०२ भाद्रपद वद्य १४

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसीः—

श्रीमंतसकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो खंडेराव जाधव कृतानेक साष्टांग दंडवत. विनंती उपरी येथील कुशल ताा छ २७ माहे रमजान मुाा नजिक कासारबरी यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयाची आज्ञा केली पाहिजे. साहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालों ते कोरेगांवीं भीमा उतरोन, निंबदेहेरचे घांटे टोक्यावर गंगा उतरोन, मुक्काम मजकुरीं येऊन दोन चार मुक्काम केले. समागमें पथकें व पागा नेमणूक आहे. त्यांची मार्गप्रतीक्षा केली. परंतु अद्याप कोणीही आले नाहींत. आह्मीं येथून घांट उतरोन जावें, तर खानदेशांत तापीतीरीं शंभूचें प्राबल्य जालें आहे. महालोमहालचा आमल उतरून मामले निघाले. त्याजकडलि जमाव भारी आहे. यास्तव जलदीनें जातां येत नाहीं. गांठ पडल्यास सरकारचा नक्ष राहून पारिपत्य जाहलें पाहिजे. याजकरितां पथकाची मार्गप्रतीक्षा येथेंच करीत असों. सेवेसीं वर्तमान श्रुत व्हावें, ह्मणोन विनंती लिहिली आहे. पथकें रवाना करावयास हुजरे गेलेच आहेत. आणखी ताकीद होऊन रवाना लौकर जाले

पाहिजेत. एक दोन ठाणीं त्यांणीं घेतलीं आहेत. त्याजवर हल्ला करून जातांच ठाणीं घेतल्याशिवाय दाब पडणार नाहीं. येविशीं समक्ष विनंती केली होती. साहेबाची आज्ञा जाली कीं, मागाहून च्यार तोफाही रवाना करितों. त्याची रवानगी जाली असल्यास उत्तम. नसली जाली तरी सत्वर तोफा रवाना करावयाची आज्ञा जाली पाहिजे. विशेष काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

पत्रांक २६१

पौ छ ७ सवाल इहिदे. श्री. १७०२ आश्विन शुद्ध ९

हरीपंडत फडके सलमलाहुताला

सौ मेहेरबान करमफर्माय मखलिसां बादज षौक मुलाकत मसरत आयात इत्तीहाद माअरबाद येथील खुषी जाणून आपली षादमानी हमेशा कलमी करीत यावें. दिगर, इंगरेजाचे तालुक मातबरगड किल्ले वगैरे घेऊन आरकाडापाशीं उतरलों असतां, चेनापटणाहून जेनराल मंडोर नामें सरदार दोन्ही हजार गोरे फिरंगी व आठसेहे तुरुस्वार व दाहा हजार बार व तीस तोफा सुधां लढाइचे इच्छेनें कंचीस आल्यावरून आह्मीं आरकाडाहून कूच करून कंचीस पोहचून त्याचे फौजेस घेरा दिल्हा असतां, फिरंगीचे कुमकेस गुंटुर व मछलीबंदराहून जनरल बेली नामें सरदार चारीसेंह गोरे फिरंगी व पांच हजार बार व बारा तोफा वगैरे जंगी सरंजाम येण्याची खबर पोहचतांच, त्याचे तंबीकरितां इकडूनही फौज पाठवून मारामारी करविल्यावरून ते जमियत पुढें येऊं न सकतां कंचीस चारी कोसाचे फांसलेनें गढीचा आसरा घेतले. त्याचे उपराळेस कंचीहून जेनराल मंडोरानें आपले हमराहि जमियेतपैकीं होष चुनिंदे पांचसें गोरे फिरंगी व शेंभरी तुरुसवार व निवडक दोन्ही हजार बार व पंधरा सरदार पालखीनिसीमसुद्धां कंचीहून पाठविले. करितां जनरल बेली नामें सरदार पहिले आपणापाशीं होते ते जमियत व कंचीहून गेले ते कुमकी फौजसहित जमाऊन भेऊन इकडील फौजेसी लढाई करीत येणेची खबर आल्यावरून त्याच वख्तीं आह्मी कंचीस आलों. ते कुलाह पोषाची फौजेवरही कित्येक फौज पाठवून खाशी फौज सुद्धां चालून जाऊन, मारामारी करून, जनरल बेलीचे फौजेस कतलआम केलें. खुद जनरल बेलीनामें सरदार याशिवाय मातबर मातब्बर पालखीनिशीन तीस सरदार व गोरे फिरंगी पाचेसेंहे जित शाबूत सरकारांत दस्तगीर जाहले. पांचेसेंहे फिरंगी व दोन हजार बार पावेतों मारले गेले. बाकी बार व तमाम बंदुका व बारा तोफा वगैरे कुल त्याचें लष्कराचें लष्कर लुटून घेतलें. हे खबर कंचीस आली. ते जनरोल मंडोर ऐकून आपले हमराही फौजमुद्धां रातचे वख्तीं फरारी जाहले. सबब, इकडून

भारी फौजा पाठविल्या. करितां यांस त्यांस लढाई होऊन जेनरल मंडोर यांचे हमराही जमियत मारून घेतलें. जेनराल मजकूर ताव आणतां न सकतां राहेत. आपले हमराही तोफा व रणगाडे व बारुतच्या पुटीया व बाटीर वगैरे सरंजाम टाकीत टांकीत दोन्ही तिन्ही हजाराचे जमियतेचे निसीं कंचीहून आठ कोसांवर, चेंगलपटनामें गढींत त्याचा ठाणा आहे, त्या गढीच्या आसरेस जाऊन पोंहचला. इकडील फौजही त्याचा पिच्छा करीत जाऊन त्या गढीस घेरली आहे. खुदाच्या फजलेकडून त्याचीही तंबी आनकरीब होईल. त्यास कलमी करणेंत येईल. आपण दोस्त असां. याकरितां येथें लढाई ज्या प्रकारें जाहली, ती त्याच नक्षें प्रमाणें मफसल लिहून पाठविलें असे. परभारेंही अखबारे करून जहुरांत येईल. हमेषा आपली षादमानी कलमी करीत यावें. ज्यादा लिहिणें काय असे ?

पत्रांक २६२ श्री. १७०२ आश्विन शुद्ध १३

यादी सदासिव दीक्षित वाजपेय याजी वा। शाहूनगर यांस सरकारांतून प्रतिवर्षीं दहा हजार रुपये पावत असत, ते सहा वर्षें पैसा पावला नाहीं. कदाचित् आजपर्यंत राहिले ते वजा करून पुढें सालमजकुरापासून कांहीं निर्वाहार्थ ऐवज योजून नेमून घ्यावा.

सिराळ्यापैकीं गाव देविला आहे तो ताकीद करून देविला जाईल. ऐवज देणें राहिला आहे. त्यास, दीक्षिताकडून कारकून आल्यावर किती ऐवज देणें तो समजोन, कांहीं ऐवजाची सोय पाहून, वरात देविली जाईल. येणेंप्रों करार करावे.

छ १२ सवाल, इहिदे समानीन, आश्वीन.

पत्रांक २६३ श्री. १७०२ मार्गशीर्ष वद्य ३.

राजमान्य राजश्री विठल शामराज गोसावी यांसीः--

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ इहिदे समानीन मया व अलफ राजश्री तुकोजी होळकर इंदुराहून निघाले आहेत. त्यास बोलाऊं पाठवून सरकार कामावर यावें, म्हणून गंगाजल निर्मल अहिल्याबाई होळकर यांणीं तुह्मांकडून हुजूर लेहविलें. त्यावरून इंग्रेजाचे मसलतीस लौकर फौजसुद्धां नमूद व्हावें, म्हणून त्याजकडे पत्रें पाठविलीं त्याप्रों ते कूच करून दरमजल सेंधव्यानजीक आल्याचें वर्तमान आलें. त्याजवरून जलद खानदेशांत येऊन, केसो कृष्णाचें पारपत्य करून, लांब लांब मजलीनें, वसईकडे इंग्रेजांनीं दाट करून लढाई सुरू केली आहे, तिकडील उपराळ्यास सरकारच्या फौजा गेल्या आहेत, तुह्मीं लौकर जाऊन पोंहचून सरकार काम करणें, म्हणून त्याज-

कडे पत्रें गेलीं आहेत. त्याप्रों ते जातील. अहिल्याबाईनीं तुह्मांस सांगून लेहविलें, त्यावरून मारनिल्हेस लौकर बोलाविलें. सरकारमसलतीचे समई आले. परंतु, त्याची व अहिल्याबाई यांची भेट जाली नाहीं. त्यास, त्याजकडील पत्रें आलीं व रा। बळवंतराव वांकडे व रखमाजी दादाजी आले. त्यांच्या सांगण्यांत अहिल्याबाईची अमर्यादा कर्तव्य नाहीं, सरकार चाकरीची आज्ञा होईल तसें करावयास......यामध्येंच अर्थ आहेत. त्यापक्षीं अहिल्याबाईनीं दुसरा अर्थ मनांत आणूं नये. पहिले मामलेदार असतील किंवा नवे त्यांनीं केले असतील, त्यांची घालमेल करूं नये. मामलेदारास ताकीद करून वरचेवरी मारनिलेकडे खर्चाची पुरवणी होय असें करावें. येविसीं अहिल्याबाईस अलाहिदा पत्रें पाठविलीं आहेत. तुकोजी बावा येथील आज्ञेवरून निघाले नाहींत. इंदुराहून निघाल्यावर त्यास येथलि अमर्यादा न होतां सरकार चाकरीवर न्यावें, ह्मणून अहिल्याबाईनीं तुह्मांकडून लिहविलें. त्याजवरून त्यास लिहिलें. ते येतात असें असतां, अहिल्याबाई मनांत वांकडें कां आणितात? तुकोजीबावा येथें आल्यावर बाईची मर्यादा रक्षीत असाच (उपदेश) होईल. बाईचे ठाईं येथें दुसरा विचार नसतां, तुकोजीबावा मसलतीस आले. मागें मामलतीच्या धालमेली व जपत्या होऊं लागल्यास त्यास चाकरीची उमेद कैसी होईल? सरकारांत मसलतीचे उपयोगीं काय पडतील? फौजमुद्धां मसलतीस आले. त्यास विरुद्ध वाटे असें केल्यानें सरकार काम नासतें, हें समजोन कोणतीही घालमेल करूंच नये. या प्रमाणें तुह्मी बाईसीं बोलून, तुकोजी बावांस विरुद्ध न वाटे असें करणें.

(खास दस्तुर) 'सरकारकामावर सर्वांची दृष्टी असावी. बाईही फार समजतात. तेव्हां वांकडें पडे असें होणार नाहीं. रा। १७ जिल्हेज.

पत्रांक २६४

(मसूदा अहिल्याबाईचा) श्री १७०२ मार्गशीर्ष वद्य ३

तुकोजी होळकर इंदुराहून निघाले आहेत. त्यांस पत्रें पाठवावीं कीं, बाईची अमर्यादा न करितां, तुह्मीं लिहून सरकार कामावर न्यावें, ह्मणोन पेशजीं आपण राजश्री विठ्ठल शामराज यांस सांगोन लेहविलें. मारनिल्ही लिा त्याजवरून इंग्रजाचे मसलतीस फौज सुद्धां लौकर नमुद व्हावें, ह्मणोन तिकडे पत्रें पाठविलीं. त्याप्रमाणें ते कूच करून दरमजल सेंधव्यानजीक आल्याचें वर्तमान आलें. त्याजवरून जलद खानदेशांत येऊन, केसो कृष्णाचें पारपत्य करून, लांब लांब मजला करून, वसईकडे इंग्रजांनीं दाटी करून लढाई सुरू केली आहे, तिकडील उपराळ्यास सरकारच्या फौजा गेल्या आहेत. तुह्मींही जलदीनें जाऊन पोहोंचून सरकार काम करावें. या अन्वयें त्याजकडे

पत्रें गेलीं आहेत. त्याप्रमाणें ते (जातील.) तिकडून लिहिल्यावरून त्यास लौकर मतलतीस येण्याविशीं पत्रें पाठविल्यावरून, सरकारमसलतीचे समई तेही आले. परंतु आपली त्याची भेट जाहली नाहीं. यास्तव दुसरा अर्थ मनांत आणाल तर आणूं नये. पहिले मामलेदार असतील किंवा नवे त्यांणीं केले असतील, त्यांची घालमेल करूं नये. मामलेदारांस ताकीद करून वरचेवरी त्याजकडे खर्चाची पुरवणी होय ती गोष्ट करावी. त्यांजकडील पत्रें आलीं. त्यांत व राजश्री बळवंतराव वांकडे व रखमाजी दादाजी आले. त्यांचे सांगण्यांत मातुश्रीबाईची अमर्यादा कर्तव्य नाहीं. सरकार चाकरी करावयाची. आज्ञा होईल तिकडे करावयास गुंता नाहीं, हे अर्थ आहेत, लिहिल्या अन्वयें त्यांचे फौजेची व खर्चाची तरतूद मामलेदारांस ताकीद करून करीत जावी. नवेजुनेची घालमेल करूं नये. विरुद्ध सहसा दाखऊं नये. येथिल लिहिलेवरून तुकोजी होळकर निघाले नाहींत. निघाल्यावर तुह्मीं.........इकडून लिहिविल्यावरून त्यांस मसलतीवर येण्याविशीं पत्रें पाठविलीं. ते येतात...... आहे. प्रसंगावर सर्वांचें लक्ष असावें. येथें तुम्हांविशीं दुसरा विचार नाहीं. व ते येथें आल्यावर तुमची मर्यादा करीत असाच अर्थ होईल. ते हिकडे आल्यावर, त्यांणीं कमाविसदार ठेविले होते ते तुम्ही दूर केले, दुसरे पाठविणार, असें करूं नये. माणूस.........ते सरकार चाकरीस येतात. महालांची जप्ती होते, तेव्हां चाकरीची उमेद कशी राहील? हें ध्यानांत आणावें. पाटिलबावांचें मत, वांकडें दाखवूं नये, असेंच आहे. याजकरितां लिहिलें आहे. कोणतेंही नवेंजुनें करूं नये. तुकोजीबोवा मसलतीस आले. त्यांस विरुद्ध न वाटे असेंच करावें.

(खासदस्तुर):—प्रस्तुत इंग्रेजांची मसलत सरवादांत कशी पडली आहे आपली दूरदेशीं समज फार आहे. तेव्हां आपण दुसरी गोष्ट करणार नाहीं, हे खातरजमा आहे. रा छ १७ जिल्हेज.

पत्रांक २६५ श्री. १७०२ मार्गशीर्ष.

राजश्रियाविराजितराजमान्य राजश्री रावजी स्वामीचे सेवेसीं:—

दिवाकर पुरुषोत्तम कृतानेक नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिला आभिप्राय कळों आला. पूर्वी जाहलेला प्रकार यजमानांनीं खास दस्तूर पत्रीं लिहिला आहे, त्याजवरून कळलें असेल. फौजेची समजोती होत आहे. चाळीस पंन्नास लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. बाजदबरसात हैदरावरी जाणार. शिंदे, होळकर आपलाले स्थळास निरोप घेऊन छावणीस गेले. उभयतांचें एक्य फार चांगलें जाहलें.

ह्मणोन विस्तारें लिहिलें. ऐशियास, पूर्वीं श्रीमंत नाना यांचें खासदस्तुर पत्र विस्तारें आलें तें अवलोकनीं संतोष श्रीमंतांस व मजला जाहला आहे, तो पत्रीं कोठवर ल्याहावा ? इच्छित प्रकार श्रीहरीनें घडविला,' एतद्विशईचा मजकूर पूर्वीं लिहिण्यांत आलाच आहे......चे लिहिल्या वरून तरी कोणताही गुंता.........नाहीं. मुख्य श्रीमंत महाराज रावसाहेब यांची एकनिष्ठता, त्याचींच फळें, श्रीनीं दिल्हीं. याउपरी, सर्व बंदोबस्त यथास्थित होऊन येतील. वरकड, इकडील कित्तेक मजकूर पूर्वीं लिहिले आहेत व सांप्रत श्रीमंत नाना यांचे सेवेसीं लिहिले आहेत, त्याजवरून कळों येईल. प्रस्तुत माझे शरीरास आराम नाहीं, शूल पंधरा रोजांत जातो, अखंड वायू उदरांत, पोट फुगलेंच असतें, जेवण बंद, दहषतीनें राहिलों, याकरितां श्रीमंतांस विनंति करून ऋव्याधीस अगर आणीक जें मरजीस येईल तें पाठवून द्यावें. हें जरूर करावें. बळवंतरावजीस पुसून ते काय सांगतील तें लिहिणें. वरकड आंगरेज वगैरा वर्तमान व नवाब जफरदौरेचे विशीं रा दादांस सविस्तर सांगितलें ते लिहितील. आजवरी रोग मोठा चारीगार होता. एकदां कसेंही अरिष्ट दूर होऊन श्रीमंतांस यश आलें. कुरापत जळून गेली. नाहींतर याच रोगानें आज चारीमास कैसे सख्त दिवस गेले ते श्रीहरीसच ठाऊक ! वरते आपण तीन पत्रें प्रथमचीं पाठविलीं. यावर तर कांहींच इष्ट काजांत नोहती. गावेलगडच दिवस होता. पुढें श्रीहरी काय करवितात तें सर्वत्रास दिसत असे. आतां हें लिहिणें! आबांस रा दादा रोज बोलत कीं, भाऊ देवाजीपंत, मी भाऊ कशाचा ? हें आपणासच लिहिलें होतें आणि तेच दिवस पडावे ऐसें देवानें दाखवून सर्वांची.........सत्यें बाहीर पाडून........................आतां तरी नीट बंदोबस्त करावा, हें जर ल्याहावें, तर सर्व बंदोबस्ताविशीं गुरू ! तेथें काय ल्याहावें ? आपलें शरीर आराम जर असेल तर श्रीमंतांपाशीं यावें. श्रीमंत आपासाहेब यांची मरजी फार आहे कीं, श्रीमंत माहाराज रावसाहेब यांस पहावें. तेव्हां, श्रीमंतांच्या भेटी व सर्वांच्या होतील, हें वारंवार बोलतात. मी तर लिहिलेंसें वारंवार ह्मणतात. आंगरेज, शुजायतदौरेचा लेंक व नजफखान व जयनगरवाले हे सर्व एक जाहले, हें ऐकितों. तेथें खबीर काय असेल ती खरी. जफरदौरेविशीं दादानें लिहिलें आहे. यजमानानें त्यांच्या शफता व पत्रें पाठविलीं, खातरजमा फार केली, हेंही आहे. हे विनंति.

पत्रांक २६६ श्री. १७०३ चैत्र

XXX (पल) टणाचें पारपत्य करून नेस्तनाबूत केले असतील. इकडील मजकूर तरी गाडरनामें इंग्रेज वसईचा किल्ला घेऊन हावभरी होऊन, बोरघाटाच्या माथां येऊन, अडचणीची जागा धरून बसला आहे. त्यास, इक-

डील फौजा राजश्री हरी बल्लाळ व तुकोजी होळकर त्याचे तोंडावर आहेत. नित्य सडे जाऊन, तोफा नेऊन लागू करून, तोफांचा व बाणांचा मार करितात. दाहा वीस माणूस जायां होतें. घांटाखालीं रा। परशराम रामचंद्र यांस दाहा बारा हजार फौजेनिशीं पाठविलें. दोन तीन लढाया करून रसदा लुटिली, लोक मारिले, बंदुका वगैरे आणिले, व त्यांची रस्त बंद केली आहे. त्याच्या लष्करांत माहागाई आहे व लोक नित्य गोरे व काळे कवाइतींत दाहा पांच नित्य येतात. मैदानांत येता तरी ठीक होतें. त्यास त्यांच्यानें पुढें येवत नाहीं. याचें पारिपत्य लौकरच होईल. अर्काटप्रांतीं इंग्रेजांनीं कित्तेक ठाणीं, मुलूख घेतला होता. त्यास हैदरखान बहादूर यांणीं तिकडे जाऊन, अर्काट घेऊन फुलचरी व चैनपटण वगैरे जेर केलें. व फरांसीस खानमारनिल्हेनीं आणून इंग्रेजांस जरबेंत आणिला आहे. सारांश, तुम्ही तिकडील पलटणांचें पारपत्य करून हटविलें, पळविलें, किंबहुना पारपत्यही केलेंच असाल. तुह्मांकडील इभ्रतीनें इंग्रेजांची कंबरच बसेल. तुम्ही मातबर सरदार, मातबर मनसुबे करून कित्तेक शत्रू पराभाविले. तेथें इंग्रेजांचा मजकूर काय? इंग्रेज साहुकार असतां, त्यांणीं शिपाईगिरीची उमेद धरून लढाईचा कस्त धरितो! तरी काय चिंता आहे? तुह्मीं त्याचें पारिपत्यच करालच. तीर्थस्वरूप कैलासवासी नानासाहेब व राऊसाहेब पुण्यवान. त्यांचा आशीर्वाद आमच्या मस्तकीं आहे त्यांचे आशिर्वादें व श्रीकृपेंकरून शत्रूचा पराभव होईल.*

पत्रांक २६७ श्री १७०३ चैत्र

....

...... जाहाजें आलीं. त्याजवरील सरदार याचे जबानीवरून मालूम जाहलें. ......मुंतर्णे नामें भारि जमावानिशीं उमदा सरदार जंगी सामान घेऊन मुतआकिब येत आहे. तो आलियावर इकडील इंग्रजांचें एक बंदर राहणार नाहीं. नूरमहमदखान व नरसिंगराव यांसी आपलेपासीं ठेऊन आनंदराव यांसीं कृष्णराव नारायण याजबराबर पाठवावें ह्मणोन मुफसल कलमीं केलें तें हर्फबहर्फ दिलनिषीन जालें. चुनाचे जनरल कूट चिनापट्टणाहून फुलचरी वरून गुडलूर अडचणीची जागा पाहून, तेथें जाऊन, आश्रियास आला व आं मेहरबान मार्गांत मुखालिफास घाबरें करीत गुडलुराजवळ त्याचे फौजेस माहासिरा देऊन राहिले. हे षकल नेक दुरुस्त जाली. त्यास हाच कावू वख्त मुखालिफाचे पायमल्लीचा आहे. आंसाहेबी खुषकींतून व फरासीस येणार व आला तो दरयांतून बंदर किनारियासीं. या बमोजिब निकड जाहलियावर मुखा-

---

* ह्या पत्राचे पहिले दोन बंद गहाळ झाले आहेत.

लिफांस खूब सजा पोंहचेल, ऐसें इंग्रजानेवांचे दिलांत वाटतें. फैलफैल, इक-
डील मजकूर तरः गाडर बोरघांटाखालें येऊन तीन चार (पल) टनें घांटावर
पाठविलीं. त्यांचे मुकाबल्यास मेहेरबान हरीपंत व होळकर आहेत.हा मजकूर
पेशजीं कलमीं करण्यांत आलाच आहे. फिलहाल परशराम पंडित मिरजकर
बारा हजार व सरंजाम सुद्धां घांटाखालें इंग्रजांचे पिछाडीस रसद बंद करून
पिछाडी करून पायबंद द्यावयाकरितां पाठविले. इताकियांत खासा गाडर
घांटावर सरंजामसुद्धां आला. दोन तीन पलटणें घांटाखालीं ठेविलीं आहेत.
त्यास, पंडतमाारनिले यांणीं घेराघेरी करून घाबरें केलें आणि दोन हजार
बैल व किराणा बाबेचे व उंटें व छकडे वगैरे सरंजाम भरोन रसद जात
होती ते मारली. बैल वगैरे लुटून आणिले. हालीं घेराघेरी करून आहेत.
गाडर घांटावर आला ते दिवशीं मेहेरबान हरीपंडत व तुकोजीराव होळकर
ते तलाव्यास गेले होते. ते वख्तीं इंग्रेज अडचणीची जागा धरून मुकाम
करून राहिला आहे. तेथून दोन तीन पलटणें कोस दीडकोस चालून आलीं.
त्यांवर सरकारचे तोफा व गाडद व बाणांची मारागिरी होऊन लढाई खुब
तऱ्हेनें जाली. इंग्रजांचीं (पलटणें) हटाऊन माघारी घालविलीं. ते लढाईंत
इंग्रेजांकडील दोन सरदारांपैकीं तोफेचे गोळ्यानें....................
व दुसरा बाणानें ठार जाहाले. व कां......पलटणांतील लोक ठार व जाया-
बंद जाहला. सरकारचे गाडदी वगैरे कांहीं लोक कामास आले व जखमी
जाहाले. याबमोजिब लढाई जाली. इंग्रज पक्या अडचणींत घांटावर राहिला
आहे. तेथून....................................तो मयदानांत
यावयाचा कस्त करीत नाहीं. त्याचे लष्करांत रसद घांटावरून व घांटाखा-
लून पोंहचावयाची बंदी आहे. सबब गिरांनीं व बहुत फिकीरींत आहे. (चि-
नेहून चाळीस जहाजें, पन्नास लक्षांचा माल भरून इंग्रजी जहाजें येत
होतीं. त्यांची व फरांसीसांची लढाई जाहाली. इंग्रजी जाहाजें फरांसीसांनीं
सिकस्त केलीं.) फरांसिस याची गलबल दर्यांत आहे. असें जासुदी......
.........(याप्रमाणें फतेमारी जासुदी) जहाज.........मुंबईस आलें
त्याणें वर्तमान सांगितलें.........मुंबईंत गलबल आहे. अशी बातमी मुंब-
ईच्या सरकारांत आली. दरींविला, इंग्रजी दाहा पलटणें हिंदुस्थानांतून...
.........वांतील दिलांत आणून सिप्रीकाल्हरावर आलीं. ही खबर राव
मेहेरबान माहादजीराव शिंदे यांस मालूम होतांच, अवल कांहीं फौज रवा-
नगी त्यारुखें करून मुतआबिक आपणही मातबर फौज बयम तोफखाना व
सरंजाम व सरकारचे सरदार बाळाजी गोविंद व शिवाजी विठल वगैरा मे-
फौज, येकूण तीस पसतीस हजार फौजेचा जमाव करून, इंग्रजी पलटणांचे
मुकाबल्यास गेले आहेत. व फजल पलटणांची तंबी होईल, तें जुहूरास ये-
ईल. गुजराथचे जिल्यांत (हंगामा) करण्याविशीं पेषजीं गणेशपंत बेहेरे वगैरे

सरकारची फौ॰. दाहा हजार रवाना केली. त्यांणींही इंग्रजाचे तालुकियांत शिरोन हंगामा सुरू केला आहे. खुलस मुखालिफांस, चहूंकडोन ताण व घेराघेरी, आजीज होत ऐसी आमलांत आली. आजिबाद होईल ते नमूदास येईल. कृष्णराव नारायण यांची व फौजेची तयारी जाहाली आहे. लवकरच येऊन पावतील; ह्मणोन हैदरअल्लीखान यास नानांचे नांवें हिंदवी पत्र.

पत्रांक २६८ श्री १७०३ आश्विन वद्य १३

रा. मल्हारराव सोमवंशी गोसावी यांसी:—

सुा इसन्ne समानीन मया व आलफ. तुह्मी आपले गांवीं मौजे जवळे—पैकीं पारनेर एथें कलाल बाळगून दारू करवीत होता, ह्मणून हुजूर विदीत झालें. त्यास, कलाल यास सरकारांत आणून चौकशी करितां, तुह्मी सरकार आज्ञेशिवाय कलालाकडून दारू करवीत होता, हा अन्याय तुह्मांकडेस लागू झाला. त्यास, सदर्हू अन्याय तुह्मांस माफ करून, नजरेचा ऐवज सरकारांत द्यावयाचा करार केला. त्याप्रमाणें बदला देणें तो रंगो गोपाळ कारकून कुलशिलेदार यांजकडे खासे चाकरीच्या बायकांस व मुलांस व सुनांस सन समानिनिचे व सालगुदस्तचे मोईनपैकीं रुपये ४००० हजार रुपये देवविले असत. तरी तूर्त पावतें करून पावलियाचें कबज घेणें. जाणिजे. छ २६ सवाल.

पत्रांक २६९ श्री. (नकल) १७०३ कार्तिक वद्य १

(शिक्का सवाईमाधवरावसो.)

२ नोव्हेंबर, १७८१

यादी रो महिपतराव विश्वनाथ. सुा इसन्ne समानीन मया व अलफ. तैनात सालिना रुा

४०००० खासा तैनात

३०००० विसाजी कृष्ण

१०००० महिपतराव विश्वनाथ

४००००

७००० कारकूनमंडळी दरकदारसुद्धां

३००० शागीर्द पेशा

२७५०० राऊत

१२५०० पागाचरिदा लागवड
बा मुा सुद्धां.
१० खाशी घोडी
१५ बारगीर

२६

दर ५०० शें प्रों.
१५००० शिलेदार ५० दर
३०० प्रों १५०००

२७५००
२५०० हची सरकारचा रतीब लागवड बा
मुा मोघम

८००००

यासी सरंजाम
३९००० दिगर जहागिरीचे गांव मामले बीड पो राक्षसभुवन वगैरे फुटगांव हरि बल्लाळ याजकडे फौजेचे सरंजामास दिले होते ते दूर करून.
१७५०० परगणे पातशहापूर वेळगांव निा महिपतराव विश्वनाथ पो कमाल बेरजेचे गांव लावून द्यावे.
१२१०० पो वाळूज येथील मोकासा मुराराव जाधव यांजकडे होता तो दूर करून
१२६५ मल्हारराव पोवळ याजकडील मोकाशे सर-

कारांत जप्त आहेत
त्या पो
१६९२ तो हवेली
संगमनेर
१५७३ ता देपूर

३२६५

६४५९ मौजे कोरेगांव ता बेलापूर तनखा रुपये ७५०९ पो वजा मोकासा १०५० बाकी.
रुजू पो खावदेव येथील मोकासा मल्हारराव पोवार याजकडील अकरा हजारांचा सरकारांत जप्त आहे त्यापो लावून द्यावे.
२००० देशीं गांव मोजून द्यावा. जुन्नर प्रां संसारास उपयोगी.

८०३२४

ऐशीं हजार तीनशें चोवीस रुो बेरजेचा सरंजाम येणें प्रों करार करावे.

सरंजामास महाल गाव दिल्हे आहेत. अमल याचे हवालीं करण्याविशीं सनदा व ताकीदपत्रें देवावीं.

इनाम गांव जातीस दोन हजार रुोचा कमाल बेरजेचा मोजून द्यावा. येणेंप्रों करार करावे.

कुरण पो गवत सुमारी १०००००

असाम्या पूर्वींपासोन
१ किल्ले नगर. येथील मजमू.
१ किल्ले त्रिंबक येथील सबनिशी.

—

२

दोन असाम्या दूर करून दुसरेकडे सांगितल्या आहेत. त्या सालमारीं दूर करून पूर्ववत प्रों दोन्ही

एक लक्ष पुण्याचे सा-ईचें कुरण पाहून नेमून द्यावें.	असाम्या करार केल्या आहेत. यांजपासोन प्रयोजनी घेऊन वतन पेशजीप्रो पावत जाणें ह्मणोन मामलेदारास सनदा. त्रिंबकची असामी चालते, कारकूनापासून काम घेतात, परंतु वेतन देत नाहीं, ह्मणोन सांगितलें. त्यास, चाकरी घेऊन वेतन राहिलें असे. तरी सालमजकुरीं द्यावें. पुढें सालमारापासून पावतें करावें. याप्रों सनदेंत लिहून देवावें.

छ १५ जिलकाद कार्तिक मास. सनदा लिहिणें.

पत्रांक २७० श्री १७०३ फाल्गुन शुद्ध १५

पो छ १४ रावल, फालगुण, इसने समानीन. आंचीवर आलें. दोन बंदरास.

शेवेसी आनंदरावजी बाजी व गणेश केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २६ सफर मुकाम मुसळीपाक येथें स्वामीच्या कृपावलोकनें-करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री नाना यांनीं छ ६ मोहरमचीं पत्रें जासूदजोडीबराबर राजश्री कृष्णराव तात्या यांस पाठविलीं तीं छ १६ सफरीं पावलीं. पत्रीं आज्ञा जेः बंगाल्याकडे फौजेच्या रवानगीची सिद्धताच आहे. पैक्याची सरबराई तर्तूद करून, जाबसाल उरकोन, उत्तर-प्रत्योत्तराचा प्रसंग न पडतां, ऐवजाची रवानगीच होऊन येई तें करावें. छत्तिसांची तरतूद न होय, तर निदान तिसांचा जाबसाल उरकून पाठवावा ह्मणून. व दुसरें, पुरवणीपत्रीं लिहिलें जेः इंग्रजांच्या कबजांतील मुलुख मारून ताराज करावा. रसदेची वगैरे आमद रफ्ती होऊं नये. यास्तव सरकारां-

तून लोक रवाना केले होते. ते स्वाऱ्या करितात. याजपुढें इंग्रजाकडीलही जमाव मुकावल्यास येऊन, झटपट जागांजागां चालविलीच आहे. च्यार गलबतें भरून कांहीं जिन्नस व लोक मुंबईकडून इंग्रजांचे लोक मुकावल्यावर कोहेजेकडे होते. त्यांच्या उपराळ्यास मनोरचे खाडींतून येत होते. त्याची बातमी राखून, किल्ले कोहज येथलि सरकारचे लोक कांहीं मेले व कांहीं पाण्यांत उड्या टाकून बुडाले. गलबतें सरकारच्या लोकांनीं शिकस्त करून पाडाव आणिलीं. याजमुळें इंग्रजाकडील जमाव तिकडे रवाना झाला आहे. सरकारचे लोक तेथें आहेत. ते मजबुदीनें आहेत. व येथून भरतीस लोक वरचेवर रवाना होत आहेत. ह्मणून विस्तारें लिहिलें. ऐशियास, बंगाल्याचे मसलतीचे सरबराईविशीं सरकारांतून पत्रें आंचीवर जीं जीं आलीं तीं तीं नबाब बाहादूर यांस श्रवण करून, पत्राचे भाव समजाऊन, उत्तरें निरोत्तरें जालीं. त्या अन्वयें आंचीवर लिहित गेलों. सांप्रत, मुंबईहून वकील पुण्यास आल्यामुळें त्यांच्या बातम्या परभारें नानाप्रकारच्या येतात. तेणेंकरून त्यांच्या चित्तांत विकल्पाचे वृक्षच वाढले आहेत. याचीं परिमार्जनें करावयाचीं तीं करीतच आहों. सरकारचीं व स्वामीचीं पत्रें नबाबास येतात. परंतु स्वामीच्या लिहिल्यानें व आमच्या बोलण्यानें खातरजमा होत नाहीं. याचे संशय निवारण व्हावयाचा विचार तर, मुंबईकर वकील माघारा लावून द्यावा व नबाब निनिजामअल्लीखा करारप्रमाणें मसलतीस नमूद होत नसल्यास कृष्णराव बल्लाळ यांणीं नबाबाशीं रुष्ट, तुटक भाषण करून उठोन यावें. याप्रों जालें. ऐसीं परभारें वकीलांचीं लिहिलीं नबाबबाहादूर यांस आलीं ह्मणजे संशयाचा वृक्ष निर्मूल होईल. जाल्यास सरबराई तर्तुद, बंगाल्याची मसलत केल्यास, वीस लक्ष रुा ची होईल. तें प्रस्तुत घडत नाहीं. तेव्हां गुजराथ वगैरे प्रांत सोडवायाचे तजविजेस फौज रवाना केली ह्मणून वकिलांचीं लिहिलीं आलीं, ह्मणजे साल मजकुराचे बारा लक्ष रुा पाठवून देतील. याच अन्वयें पत्र जासूदजोडीसमागमें राजश्री कृष्णराव तात्या यांनीं राजश्री नानास व आह्मीहि सेवेसीं पाठविलीं आहेत. जासुदास पोहोंचावयास दिवसगत लागेल, याजकरितां आंचीवरही रवाना केलें आहे. सारांश, यांच्या चित्तांतील आशंकापरिहार, विना मुंबईकर वकील पुण्यास आला आहे तो तुटक गोष्टी सांगून माघारा लावून दिल्याखेरीज होत नाहीं. हा प्रकार घडावयाचा विचार कसा असेल, तो कळेना. स्वामीकडील बातनीनिसांचीं पत्रें विकल्पयुक्त येऊन बेमर्जी होती. नबाबसाहेब यांचा शोध फार सूक्ष्म, केवळ गंभीरपणेंच हा काल पावेतों आहेत. दुसरें कोणीं असतें तरी काय करतें कळेना. यांनीं यांनीं आपले जागां निश्चय केला आहे कीं, आपल्याकडून अंतर पडेलसा शब्द लाऊन घेऊं नये. तिकडूनच न घडावयाची गोष्ट घडल्यास मग कळेल त्यारीतीनें आपला मतलब साधावा, या विवंचनेंत आहेत. आह्मांस सांगितलें

आहे कीं, तुह्मी दररोज कळेल त्याअन्वयें येथील स्थितीचें व चहूंकडील ऐकण्यांत येत जातील तीं कोणे विषयींचे अंदेशे ध्यानांत न आणतां खुलाशानें लेहून आंचीवर मोहोरेनिशीं रवाना करीत जाणें. आह्मीं तुमचा लाखोटा कदापि फोडून पाहणार नाहीं. याप्रमाणें आह्मीं लिहिण्याकरण्यांत कांहीं आदिपश्चात पाहूं ह्मणून खातरजमा करितात. व आजपावेतों तसेंच चालवितही आहेत. याजकडे दोष ठेवावयाचा प्रकार कांहीं दिसण्यांत तूर्त येत नाहीं. वरचेवर पत्रें उगऊन लिहून सेवेसीं रवाना करितों. स्वामीकडून समर्पक उत्तरें व त्या अन्वयें नवाबास परभारें बातम्या निरबालम येतील तो सुदिवस होईल. सारांश, नवाबसाहेबांच्या चित्तांत विपरियास परिच्छिन्न आला आहे. स्वामी पत्रें लिहितात व आह्मी खातरजमा करितों. परंतु खातरजमा होत नाहीं. याउपर सर्व अर्थ ध्यानांत आणून, नवाबसाहेबांची खातरजमा होऊन, बोलावयाची उजागरी होय, ऐसें करणार स्वामी समर्थ असत. तपशील कोठवर ल्याहावा ? ज्यांत सुदिवस दिसे तें करणार स्वामी समर्थ असत. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक २७१ श्री १७०३ फाल्गुन वद्य ४

पौ छ १९ रावल फाल्गुन, इसन्ने समानीन ह्या आंची.

पुरवणी सेवेसीं विज्ञापना विशेष. स्वामीकडून व सरकारांतून निवळ पत्रें येतात. त्यांत दिकतीचा प्रकार कांहींच नसतो. त्याजवरून आह्मीं नवाब बहादूर यांसीं खातरजमा करून बोलतों. आज पावेतों आमचें बोलणें व स्वामींचें लिहिणें यथार्थ जाणून बंगाल्याकडील वगैरे मसलतीविशीं जें जें बोलणें झालें तें वरचेवरी अंचीवरील पत्रें रवाना केलीं आहेत. अलीकडे इंग्रजाकडील वकील पुण्यास येऊन जाबसालचें बोलणें निश्चयांत आलें ह्मणून वकीलाचें लिहिणें; व बातम्या चहूंकडून खचित आल्यामुळें, यांच्या चित्तांत नानाप्रकारच्या कल्पना उत्पन्न होऊन, स्वामीस लिहिण्याचा प्रकार सांगून, आह्माकडून लिहविलें आणि अंतरंगें विनंती पंताकडून चेनापटणकरांशीं संधानाचा सिलसिला लाविला. त्याजवरून इंग्रज सर्वप्रकारें मान्य करून मशारनिलेस पाठवून देणेंविशीं लिहिलें आहे, म्हणून वर्तमान ऐकण्यांत आलें. अद्यापि प्रगट नाहीं. खरेंच असल्यास निदर्शनास येईल. बहुतकरून खरें असेल. येविशीं शोध करून मशारनिलेस त्याजकडेस पाठऊन देणार अगर कसें काय, तें मागाहून लिहून पाठवितों. आजपावेतों इंग्रजांच्या तंबीविशीं दोन आधार होते. त्यापैकीं स्वामीकडील आधार बिलकुल तुटलासा झाला. दुसरा फरांसिस येण्याचा. तो कसा होतो तो पहावा. एकूण नवाबचें चित्त अंदेशांत पडून, इकडील मस-

लतीविशीं उदासीनता जाली. न जाणो, स्वामीकडील कायमी यथास्थित राहून आठपंधरा रोजांत फरांसिसांचीं आमदानी जाल्या, योजिली मसलत सिद्धीस जाऊन नक्ष होतो. नाहीं तरी, हें इंग्रजाकडील राजकारण हरकसेंही समेटून घेऊन चाल कोण्हीकडे करतील, हें नकळे. याच बेतावरी इकडील प्रांताची आस्था न ठेवतां बेचिराख केला. अर्काट व अरणी हीं दोन मातबर स्थळें तींही खालीं करून तमाम सावकारा वगैरे लोक व तोफा घांटावरी लाऊन दिल्ह्या. किल्ला न पाडतां ठेवितील जरूर. असा प्रकार येथील जाला आहे. सर्व स्वामीस कळावयाकरितां विनंति लिहिली आहे. सर्व दूरंदेशीनें जें करणें तें नुमूस न पडे व लौकिकांत स्वामीचा नक्ष विशेष घडे असा प्रकार करावा. फरांसिस करार आलेच असले, तर एक दोन रोजांत तहकीक वर्तमान येईल तें जलद सेवेसी लेहून पाठऊं. फरांसिस यावयाचा प्रकार नसला, तर ही आवई पाहून इंग्रेजांसीं राजकारण हर तऱ्हेनें समेटून घेतील. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक २७२ श्री. १७०३ फाल्गुन वद्य ४

पो छ १९ रावल फाल्गुन, इसन्ने समानीन ह्या आंची.

पुरवणी शेवेसीं विज्ञापना. छ ५ रबिलावलीं संध्याकाळीं नबाबसाहेब यांनीं राजश्री भुजंगराव यांस दरबारास बोलाऊन वर्तमान सांगितलें जे: फरांसीसाकडील जाहाजें येणार याची वार्ता होतीच. आतांच वर्तमान आलें जे फरांसिसांचीं चाळीस जहाजें लढवाई पाण्यांतून चेनापटणास दाखल होऊन तीन रोज जाले. जाहाजांस लंगर टांकून इंग्रजांशीं व फरांसिसांशीं लढाई सुरू जाली ह्मणोन वदंता आहे. याखेरीज वीस जहाजें खुष्कीवरी उतरोन लढाई करावयाचे (इरायानें) फुलचरीस येऊन दाखल जाले. जमियत किती आहे, सरदार कोण आला आहे, हें वर्तमान कांहीं तहकीक लिहून आलें नाहीं. एकदोन रोजांनीं तपशीलवार लेहून येईल. म्हणजे मदारुलमहाम यांस लेहून पाठऊं. सांप्रत वर्तमान ऐकण्यांत आलें तें रावअजम कृष्णराव नारायण यांस सांगावें. तहकीक बातमी आली. त्यास बोलाऊं पाठऊन सविस्तर वर्तमान सांगूं. मदारुलमहाम यांचा भरंवसा खचित जाणून, फरांसिसांत आणावयाचा उदेग केला. तेहि येऊन पोहोंचले. अशा समयांत मदारुलमहाम यांनीं इंग्रजाच्या वकीलाकडे वचन गुंतऊं नये. तमाम खुषकींतील सरदारांनीं एकदिल होऊन इंग्रजांचें तंबीवरी कमरबंदी केली आहे. याजकरितां यावरी फरांसिस आले. मदारुलमहाम यांजखेरीज वरकड सरदारांचे भरंवसे समजले! असो! आतांहि मदारुलमहाम यांनीं कायमी राखिली तरी, आह्मी मदारुलमहाम व फरांसिस तिघे मिळून इंग्रेजांची बेबुनियाद करूं. अशास, त्याप्रमाणें

राव मशारनिले याजकडून मदारुलमहाम यास साफ लेहून पाठवावें. इंग्रजांच्या तंबीचा समय प्राप्त जाला आहे. असा वख्त वारंवार यावयाचा नाहीं. याप्रमाणें राजश्री भुजंगराव यांस सांगितलें. सविस्तर स्वामीस कळवण्याकरितां लिहिलें आहे. आठ दिवसांत पंधरा दिवसांत खामखा येतात असें होतें. आतां लांबणीचा प्रकार नाहीं. दोन तीन रोजांत समजेल. सविस्तर श्रीमंत राजश्री नानांस राजश्री कृष्णराव तात्यांनीं लिहिलें असे. याउपर फरांसिस येतात, ऐसें आहे. फरांशीस आलियावर इंग्रजांचें पारपत्य नवाबबहादर यथास्थित करितात. मागाहून आणिक एखादे दिवशीं वर्तमान सेवेशीं लिहून पाठऊं. वरकड सविस्तर अर्थ, आंचीबरोबर वरचेवर पत्र सेवेसी लिहिलीं असत, त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक २७३ श्री नकल १७०४.

रुा

१६२६९०००

पैकीं वसूल रुा

५९१६००० सन अर्बा सबैन पासोन ता सन सबा. सालें ४

२९५८००० गोविंदराव यांच्या दंग्यामुळें दरोबस्त वसूल त्याजकडे पडला. सबब सरकारी देणें तें साल २

२९५८०००मानिले अमदाबादेस राहिले. मही-पारचा अमल त्यांनीं केला व सुरत अठाविशींत नेहमीं फौज त्यांत कडील राहिली; सबब माहालीं आकार न जाहला.

५९१६०००

२५००००० इंग्रजांचे दंग्यांत व श्रीमंत दादासाहेब यांजकडे सन खमस सबैन, दरबारचा खर्च वगैरे सुद्धां.

१६००००० किता

७००००० अमदाबाद आपले स्वाधीन करून घेतलीं ते समईं.

२००००० अमदाबादेस पलटण होतें तें काढावयास दिल्हे.

२५००००००

३५००००० भडोच इंग्रजांनीं घेतली इा खमस सबैन ता अर्बा समानीन सालें सुमारी १० दहा.

११६६००० वसूल सरकारांत पावला अजमासें.

५००००० विा अंताजी नागेश सन सबा सबैन.

३००००० राजश्री बाळाजी नाईक भिडे यांजकडून भरणा.

२००००० गुा घनशाम नारायण मा गोविंद गोपाळ.

५०००००

१६०००० मा गोविंद गोपाळ, सन इहिदे.

१००००० कापड

५०००० सन इसने.

५०००० सन सलास.

१०००००

११५००० हरीभक्ति, सन सलास.

८५००० विा गमाजी पा

८०००० दादासाहेब.

५००० विसाजी आपाजी वरात पेसजी बा

८५०००

५००० मौजे काळुस वाभारें असले येथें जप्तीबा

२००००० अमदाबादचे सिबंदीस दिल्हे

१५०००० अमदाबाद

५०००० विरमगांव

२०००००

११६६०००

१२०८२०००

या खेरीज ह्या पासोन फौज नेहमीं दरमाही ठेवणें पडली. सबब सिबंदी-च्या पेंचांत आहों. त्याचा खर्च आजपर्यंत भोगीत आहों. सरकारलक्षांत अंतर न पडावें ह्मणोन सर्व पेंच माथां सोसून सरकारलक्ष्मीं अंतर केलें नाहीं.

पत्रांक २७४ श्री १७०४ चैत्र

राजश्री सखाराम हरी यांसी:—

आशीर्वाद उपरी, बारभाईकडून संदर्भाचा मजकूर लिहिला. पांचांचे परगणे देणार. हजार फौजेनशीं आपा अथवा जो यांतील मर्जीस येईल तो ठेऊन द्यावा, या अन्वयें लिहिलें. त्यासी, आह्मीं गंगातीरीं एकटें रहावें. त्यांणीं सारा दवलतीचा कारभार जवळ करावा. तेव्हां कोणाशीं बोलावयासीं कामास नये. रिकामें बोललों तरी तेंच निमित्य ठेऊन त्या माणसास धरून नेऊन पारिपत्य करावें. किल्यावर घालावें. तेव्हां आम्हांस राग यावा. राजकारण तरी करूं नये. ऐसें नाना उपद्रव सोसून रहावें, त्यापेक्षां दूर असावें. तेणेंकरून आह्मांस वाईट वाटणार नाहीं, त्यासही आमचें भय नाहीं. जवळ राहिल्यास परस्पर भय. निमित्य ठेऊन, आमचे माणसांचीं पारपत्यें करणार. याविशीं-चे अनुभव पूर्वीं बहुत भोगिले आहेत. ते पांच देणार ते येथेंच पाठविले तरी काय वाईट ? आमचे मनांत भडोच अथवा सुरतेस नर्मदातीरीं रहावें ! बारभाई सरळ चालले तरी रणगची मर्जीची जागा आहे तेथें राहूं. आह्मां जवळ त्यांचे फौजेचें काय प्रयोजन ! तथापि पांचचारशें आमचे ममतेचे लोक राहिले तरी काय चिंता आहे ! तुफानें घ्यावयायोग्य, मात्र, नसावें ! आमचा खर्च निदान, दवलत सोडिली तरी, लक्ष रुपये दरमहा पाहिजेत. इतकें कांहीं त्यांस बहुत नाहीं. आम्हीं, मूल गंगाबाईचा खराच असल्यास, निमे दवलतेचे खावंद. तेथें बारा लक्ष बहुत नाहींत. तथापि ते लोभाविष्ट ! यास्तव, पांच देतात तितकेंच घेऊन नर्मदातीरीं राहूं. आम्हांजवळ चौकी-दाखल लोक नलगेत. चाकरीचे रीतीनें हजार पांचशें राहिले तरी राहोत. आपा राहिल्यास उत्तम आहे. परंतु येथील हुकुमाप्रों चालावें. असो. आह्मीं ल्याहावें त्यांत व बारभाईचे बोलण्यांत अस्मान जमिनीची तफावत ! दहावीस

मराठे व कारभारी मध्यें येतील, आपली खातरजमा करितील, ह्मणोन लिहिलें. तूरी ते दरमजल देशाकडे जातात. आह्मी सुरतेंत आहों. दिवसेंदिवस लांबण पडते. तेव्हां त्यांची आस्था किती आहे, हें कळतच आहे! मऱ्हाटेही रा मल्हारजी होळकराप्रों कोणी नाहींत. तथापि आहेत त्यांत चाकर मातबर मिळोन खातरजमा करितील, तरी पुढें सख्याचा मजकूर पडेल. तूर्त आह्मीं अंगरेजांचे पेट्यांत सुखरूप आहों! थोडेंबहुत खर्चास देतीलच. येथें कांहीं उपद्रव आह्मांस नाहीं. तिळमात्र बंदी नाहीं. मोकळे आहों, व सुखरूप आहों! बरसात येथेंच होईल. पुढें जें नेमिलें तें होईल. सारांश, येथील सुखापेक्षां तेथें अधिक सुख वाटेल तरी येऊं. दाटून सुख टाकून दु:खांत कोण पडतो? छ १० राखर.

पत्रांक २७५ श्री १७०४ मार्गशीर्ष शुद्ध ५

राजश्री रघोजी आंगरे वजारत–माब सरखेल गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावें. विशेष. सरकारांत लग्नाचे साहित्याबद्दल सर्वांप्रमाणें तुम्हांकडे ५०००० पन्नास हजारांची नेमणूक केली असे. तरी सदर्हू ऐवजाचा भरणा सत्वर हुजूर करावा. जाणिजे, छ ५ मोहरम, सुा सलास समानीन मया व आलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती लेखन सीमा.

श्री
राजाशाहु नरपती हर्षनिधान माधवराव नारायण मुख्य प्रधान*

पत्रांक २७६ श्री. १७०५ माघ शुद्ध १३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेय याजी स्वामीचे सेवेशी:—

विद्यार्थी बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें.

---

* न उलटा खोदला आहे.

लिहिला मजकूर सर्व कळला. मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले ते पावले. स्वीकारिले. फडतरे याजकडील ऐवजाविशींचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास, येविशीं फडतरे यास ताकीद करून ऐवज देविला जाईल. रा छ १२ रौवल. लोभ असों द्यावा. हे विनंति.

पौ फाल्गुन शुा ६ शके १७०५

पत्रांक २७७ श्री. १७०६ चैत्र शुद्ध ८

श्री
राजाशाहु नरपति हर्ष-
निधान माधवराव
नारायण मुख्य प्रधान.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधरविश्वासनिधि राजमान्यराजश्री माधवरावपंडितप्रधान तार्हीं मोकद्म, मौजे कामेरी, ता वंदन, प्रांत वांई. सुा अर्बा समानीन मया व अल्फ, शके १७०६ क्रोधीनाम सवंछरे. राजश्री विसाजी कृष्ण, उपनाम चिंचळकर, गोत्र वशिष्ठ, सूत्र आश्वलायन, मौजे तेरवण, ता राजापूर प्रांत मजकूर, यांणीं हुजूर का पुणें येथील मुकामीं विनंति केली कीं, आपण बहुत दिवस स्वामीसेवा एकनिष्ठपणें केली, कुटुंबवत्सल आहों, योगक्षेम चालिला पाहिजे, यास्तव स्वामीनीं कृपाळू होऊन आपणास कुटुंबाचे योगक्षेमार्थ एक गांव नूतन इनाम करून देऊन चालविलें पाहिजे ह्मणोन. त्याजवरून मनास आणितां, यांणीं बहुत दिवस स्वामीसेवा एकनिष्ठपणें केली, कुटुंबवछल आहेत, यांचें चालविणें अवश्यक जाणोन, यांजवरी कृपाळू होऊन, यांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ मौजे मजकूर हा गांव स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा देखील सरदेशमुखी दरोबस्त बमय साहोत्रा, कुल बाब, कुल कानू, हल्ली पट्टी व पेस्तर पट्टी, खेरीज हक्कदार व कदीम इनामदार करून; जलतरुतृणकाष्टपाषाणनिधिनिक्षेपसहित इनाम तिजाईसुद्धां सरकारांतून नूतन इनाम करून दिल्हा असे. तरी, मौजे मजकूर सदरहूप्रमाणें यांचे दुमाला करून देऊन, यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें. दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें. या सन-

देची प्रति लेहून घेऊन, हे अस्सल सनद यांजवळ भोगवटीयास परतोन देणें. जाणिजे. छ ७ जमादिलावल. आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

पत्रांक २७८ श्री. १७०६

यांदी आजमास राजमंडळाच्या खर्चासी सो सुा खमस समानीन जमा रुपये.

६०००० बत्तीससिराळें येथील ऐवज.
१०००० शाहार सातारा छल्या व नकासा व जकात. व पेठा गुरुवार बुधवार व सोमवार व रविवार.
१०००० हत्तीचा ऐवज सचिवपंत यांजकडून.
३५०० इंदापूरचे देशमुखीपैकीं.
३७०० महादजीपंत यांजकडे सावोत्रा वगैरे.
२००० थोरला वाडा करंजेचा ऐवज.
२००० उबार जमीन किल्ला सातारापैकीं.
२००० बळवंतराव बाजी याचा सरंजाम जप्ती.
५० मौजे पळसीची सेरी.
१७०० कुरणाकडे.
१००० किरकोळी पाटिलक्या व सेऱ्या व बागा वगैरे.
१५०० दरेकराकडील आहीरवाडी वगैरे.
२५०० चिट्टीमसाला, खंडगुन्हेगारी, कारसाई, व कडबा शिवाय प्रतिनिधीकडील कारसाई तट्टे, भाजी.

१००००००

सदरहूपैकीं खर्च अजमास रुपये
२५००० दरमहाचा दरमहा दिल्हा राजमंडलचे लोक आा४०० रोजमरा.
५००० कारकून दप्तरचे व राजश्री कडील व दोनी वाड्यांकडील.
३६००० राजवाड्यांतील कापड सुद्धां
: १५००० राजश्री
१०००० श्रीमंत आऊसाहेब
८००० उभयतां राण्या २
कापड

३६०००

४००० खानाजाद व बाइका एकंदर २२५ अंतुश्री
२००० धर्मादाव
  १००० राजश्रीकडील नित्य गळ व मोइनीसुधां
  ५०० आऊसाहेबाकडे
  ५०० दोनी वाडे मिळोन

  २०००

३००० वर्षासनें दोन्ही वाडे व राजश्रीकडील व शाहूमहाराज व आईसाहेब व श्रीमंताकडील कारभारी त्र्यंबकराव याजपासून कृष्णराव पर्यंत.

७५०००

रोजमारा दुमाहीचा दुमाही द्यावा-
शिवाय श्रीमंतांकडील स्वार १५० आहेत व सरकारचीं मनुष्यें रोजमरेचीं आहेत तीं शाहारची रखवाली करतील, स्वार न पाठविले कोठें तरी.

पत्रांक २७९ श्री. १७०७ ज्येष्ठ

यादी जनरल बाडम यांसीं सरकारतर्फेनें बोलावें. सुघ्र सीत समानीन मया व अलफ. कलमें.

फरांसिसांचा व तुमचा बिघाड पेशजीं जाला होता. अलीकडे सलूख जाहला. त्यास, निखालसपणानें बेकिलाफ सलुख चालत आहे कीं कसें आहे? सरकारांत फरांसिसांकडील बोलणें, टिपूवर सरकारांतून मसलत जाल्यास आह्मीं हमराहा मदतीस चाकरीबद्दल येण्याचें, लागलें होतें. दोनतीन वेळां त्याजकडोन पैगाम आले. परंतु इंग्रजांशीं व सरकाराशीं निखालस दोस्ती. तेव्हां फरांसिसास सामील आणणें ठीक नव्हे. इंग्रजांशीं दारमदार स्नेहाचे झाले आहेत. त्यांचीच वृद्धि असावी. याजवर नजर देऊन फरांसिसांचें बोलणें सरकारांत पसंद न केलें. हाल्लीं टिपूचे पारिपत्यास सरकारांतून फौजा रा होणार. तेव्हां फरांसिसांचें बोलणें इकडे सरकारांत नापसंद जाल्यामुळें, कदाचित हिंदुस्थानांत आपला फैलाव ज्याजती व्हावयाउमेदीनें फरांसिसानें टिपूशीं सलूख करून, त्याचे मदतीस सामील होण्याचें ठराऊन, त्याचे मदतीस आल्यास, याचा विचार इंग्रज करितात, हें जनराल यास पुसावें. मसलतीचा

विचार थोर. तेव्हां विलायती हुकुमाशिवाय कोणताही मनसबा विचार कसा होतो, असें कदाचित् म्हणतील. तर, विलायतेस लिहून, तेथें ठराव होऊन तेथील हुकूम यांस येऊन, मसलत करणें, त्यास अवकाश बहूत पाहिजे. आणि इकडे तों मसलत्त प्राप्त जाहाली. उपेक्षा होऊन अवकाशावर पडिल्यास, पुढें दिवसेंदिवस त्यास भारी पडतें. सरकारांत टिपू सुरळीत वर्तोन सरकारमर्जीप्रमाणें सलूख करून मोकळा जाल्यावर, फरांसीस सामिल आहे. त्यापक्षीं मसलत इंग्रजांसच जड पडेल. याचा दूरदेश विचार त्यांचे ध्यानांत येऊन, याचे पैरवीचा मनसबा कसा कायम आहे ? सरकारांत तों इंग्रजांचे दोस्तीचे बद्दल खातर. फरांसिसांचे मसलतीस येण्याचें बोलणें ऐकिलें नाहीं. येविशींचें सविस्तर लिहिल्याअन्वयें जनराल यांसीं बोलोन त्याचें उत्तर काय करितात, तें लेहून पाठवणें.

कलम १

मेस्त्र मालिट मुंबईहून कलकत्त्याल गेले आहेत. हेच पुण्यास वकिलीचे कामावर कलकत्त्याहून आल्यास, सरकारचे कामाचे उपयोगीं पडतील व आह्मांपासोनही साहित्य कामकाजाचें घडेल. यास्तव, सरकारांतून कलकत्त्यास सूचना मालिटचे रवानगीविषयीं जाल्यास चांगलें, म्हणोन जनराल तुह्मांपाशीं बोलले. त्याजवरोन कलकत्त्यास सरकारांतून पाठविलें आहे कीं कलकत्त्याहून पुण्यास वकील रवाना करणार, त्यास मेस्त्र मालिट वाकब आहेत, तेच आल्यास फार चांगलें. येविशीं तुम्ही बोलावें आणि उत्तर काय तें कळवावें, ह्मणोन पत्र गेलें. याप्रमाणें जनराल यांस सांगितलें कलम १

पत्रांक २८० श्री १७०७ भाद्रपद शुद्ध २

यादी राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा व राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंदर यांजकडील करारमदाराचीं कलमें. सुा सीत समानीन मया व अलफ.

घरचा अगर बाहेरील कसाही प्रसंग पडला तर सरकारचे लक्षाशिवाय दुसरें लक्ष धरणार नाहीं. येणें प्रों करार.

तुह्मीं पुत्रसुद्धां सरकारचे लक्षांत असावें, दुसरें लक्ष धरूं नये. येणेंप्रों करार.

इंग्रजांचा बिघाड जाला तर शरीक सरकारचे. येणेंप्रों करार.

प्रांत गंगथडी येथील महाल सरकारांत आले आहेत. तेथील वासदाणा तुमचा. तो तुह्मीं घेऊं नये. याचे ऐवजीं प्रां वरकड येथील सरदेशमुखीबाबतीचा ऐवज सवादोन लक्ष रुा तुह्मांकडे दरसालचें येणें तें तुह्मांस माफ केलें. याप्रों करार सनइसने सितैनींत जाला आहे. व त्या अलिकडे सन तिसा सितैनांत ब्रह्मेश्व-

पांच हजार रुपयांचें कापड बाळापूर व वासीमचें सरकारांत दरसाल द्यावें असा करार पेशजींचा आहे. त्याप्रों, सालमजकूर सन सीत समानीनापासून सरकारांत दरसाल पावतें करीत जावें. येणेंप्रों करार.

राचे सालीं अकरा माहालचा घासदाणा घेऊन एकसा करार आहे. त्याचा फडशा पेस्तर सालीं करावा. येणेंप्रों करार.

ब्रह्मेश्वराचे मुकामीं कैलासवासी जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांसीं करार जाले आहेत. त्याप्रों चालावें. येणेंप्रों करार.

छ ३० सवाल, सन सीत समानीन, भाद्रपद, मुकाम पुणें.

पत्रांक २८१ श्री १७०७ माघ वद्य १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री शिवाजी विठ्ठल स्वामी गोसावी यांसी पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय लिहीत जाणें. विशेष. संस्थान करोली येथें सरकारचा अमल आहे. त्यास, संवत १८३९ पासून सरकारचे अमलाचा ऐवज येणें, त्याविशीं राजश्री माहादाजी शिंदे यांणीं ठराव करून दिल्हा. त्याजवरून संस्थानिकांनीं ठाणें मौजे कुतवोन व तर्फ मागदोल ऐवजांत लाऊन दिल्हीं आहेत. त्यास, मौजे मारीं व तर्फमारीं सबलगडाकडील ठाणीं तुह्मीं घालणार, ह्मणोन हुजूर विदित जालें. त्याजवरोन हें पत्र लिहिलें असे. तरी संस्थानिकांनीं आपले संस्थानपैकीं मौजे मार व तर्फमजकूर सरकारचे ऐवजीं सरकारांत ठाणीं मुद्धां हवालीं केलीं असतां, तुह्मीं उपद्रव करणार, हें ठीक नसे. तुह्मीं ते प्रांतीं फौजमुद्धां असतां, सरकारचा अमल बसऊन घ्यावा तो अर्थ न होतां, जाहाल्या अमलास खलेल करितां, हे गोष्ट उत्तम नाहीं. मौजे मारास व ता मारास तुह्मीं कोणेविशीं उपद्रव न देतां, सरकारचे ऐवजाचा झाडा होऊन येई तें करणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ २६ रबिलाखर, सुहूर सीत समानीन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक २८२ कदाचित् १७०८

रावसो मुश्फक मेहरबान करमफर्मांम मुखलिसां दामकरमहू बाद आर्जूय दर्याफ्त स्वामी मवासलत सरासर बैइजत कैमुत ज्याबिजुतहरीर तमक शुफजमीर तलतुफ पिजीरबाद. आपलें कृपापत्र आमचे पत्राचा दरजाब पावलें. आह्मांकडील जमियतीचे कुमर्दानाचा तरतूद होळकराचे लढाईचा शामरावाचे लिहिल्यावरून आपले ध्यानांत आला. व बेहेरे व अनंत एक हजार

स्वारांनिसीं होळकराविशई रवाना केले व आनखीं अवघे मजकूर सखाराम रामचंद्राचे लिहिल्यावरोन कळेल, ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास, सुचनेप्रमाणें होळकर मजकुरासीं सलूख घडून येईल. होळकराचे खंडणीचें व पायमलीचें नुकसान महालातील जालें त्याचे ऐवजाचे मुकुदम्यांत आपले कृपेचे उमेदवार नारायणराव.................

पत्रांक २८३. श्री १७०८ चैत्र शुद्ध ३.

श्री बाळकृष्ण प्रभु चरणारविंदीं.

तुह्मीं विनंतीपत्र फाल्गुन वद्य चतुर्थी, मुकाम नजीक सुरापूर वाघनगीरा श्रीकृष्णाउत्तरतीर येथील पाठविलें, तें चैत्र शुद्ध द्वितीयेस पावलें. किसुरावर टिपूचा जमाव फौज व गाडदी मिळून पंचवीस हजार होती. ते राजश्री तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे त्यापासून पंधरा कोसांवर जातांच ते निघोन धारवाडचे आश्रयास गेले ह्मणोन बातमी आली, वगैरे राजकी सविस्तर लिहिलें तें श्रीचरणीं निवेदन जाहालें. तुमचीं पत्रें दोन तीन आलीं. त्यांचीं उत्तरें पाठविलीं तीं पावलींच असतील. रवाना चैत्र शुद्ध तृतीया.

पत्रांक २८४ श्री.(असलबमोजिब नकल.)१७०८ ज्येष्ठ वद्य ११

विनंती ऐसीजे:—कृष्णापार रायचूरपावेतों नबाबाचे सरदारांसमागमें मी गेलों. श्रीमंत राजश्री गोविंदराव बापू व गोविंदराव भगवंत यांस नबाबांनीं त्यांचे समागमेंच ठेविलें. कारण कीं, अदवानीचा महसरा उठविणें. त्यास उभयतांनीं विचार पाहिला कीं, पुढें छावणीचाही बेत उत्तम प्रकारें जाला पाहिजे. म्हणून हेही समागमेंच राहिले. अदवानीचें वर्तमान ऐकून व इकडून पत्रें गेलीं यावरून, श्रीमंत राजश्री तात्यांनीं राजश्री आपा व रघुनाथराव व बाजीपंत अण्णा यांची फौजेसह रवानगी अदवानीचे सुमारें केली. हा सर्व तपशील बापूंनीं पेशजीं स्वामीस लिहिलाच आहे. तीं पत्रें इंदापुरकडून स्वामीस पावलीं असतील. यानंतर, छ १७ साबानीं रायचुराहून निघोन छ २५ माहे मजकूरीं भागानगरास नबाबाकडे मी आलों. नासिरुलमुलूख व मुगरुलमुलूख व समशुमुलूख यांजपाशीं कोन्हेर बाबूराव यांस ठेविलें आहे. टिपूनें हल्ला केल्या तितक्या मोठ्या जुरमतीनें महाबतजंग यांनीं मारून काढल्या. याचा तपशील पेशजीं विनंती लिहिण्यांत आलीच आहे. अलीकडील वर्तमान आलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिलें आहे. त्यावरून ध्यानास येईल. हे विज्ञापना.

पत्रांक २८५ श्री १७०८ ज्येष्ठ वद्य १३

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री महिपतरावबापू स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्मीं छ २० साबानचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. बहुत संतोष जाहाला. प्रकृतीचें वर्तमान लिहावें ह्मणोन लिहिलें. त्यास, तीस महिने जाहाले, वायूचा उपद्रव जाला आहे. मातुश्री ताई येथें आली होती ते समई प्रकृत पाहिली. त्याजवर औषध चाललेंच आहे. त्यास, अधिक उणी प्रकृत होते. अद्यापि ठरली नाहीं. उपाय करीतच आहों. ईश्वर *कृपा करील. तुमची प्रकृत चांगली आहे ह्मणोन लिहिलें. त्यास, ईश्वरानें कृपा केली. श्रीमंतांचे दर्शनास यावयाविशीं पूर्वी लिहिलें आहे. श्रीची आज्ञा घेऊन यावयाचें करावें. रा छ २७ साबान. बहुत काय लिहिणें ! लोभ असों दीजे हे विनंती.

पत्रांक २८६ श्री. १७०८ आषाढ शुद्ध ६

सेवेसी विज्ञापना. आपली स्वारी येथें असतां टिपूकडील शृंगेरीपंत राजश्री मुधोजी भोसले यांजकडे आला. त्याजबराबर भोसल्यांनीं आपलेकडील लालादुल्लभदास देऊन आज्ञा झाली. त्याप्रों मुद्दे सांगून पाठविले. ते अदवानीस टिपूकडे गेले. लष्करांबाहेर अर्ध कोसावर डेरा दिला. तेथें रहावयास सांगितलें. दोन दिवस भेट जाली नाहीं. तिसरे दिवशीं सायंकाळीं बलाऊं पा, पत्र दिल्हें, व वर्तमान सांगितलें. त्यास वरकड कांहीं नाहीं, सालाबादी पैका राहिला असेल तो देऊं, त्यांत पायमली मजुरा द्यावी, बदामी घेतल्यानें तीस लक्षांची नुकसानी झाली, असो, ती आह्मांकडे द्यावी. तुमचा नरगुंदचा किल्ला काळोपंत देतो, त्यानें पेशकसी कराराप्रों द्यावी, कितुर तर आमचें खंडणीचें संस्थान. याप्रों भाषण जालें. तीन प्रहरपर्यंत बसोन तेचसमई निरोप दिला. पत्र लेहून दिल्हें. तें घेऊन, शृंगेरीपंत व लाला भनूचे मुकामापलीकडे गेले. तों सेनाधुरंधर गेले. चिरंजीव येथें आहेत. त्यांजकडे जाऊन पत्र दिल्हें. वर्तमान सांगितलें. त्याजवर तें पत्र व लालास आह्मांकडे पाठविलें. लालानें मजकूर सांगितला, तो लिहिलाच आहे. पत्रांत मजकूर स्नेहाचें फार लिहिलें होतें. दुसरें कांहीं नाहीं ! बोलण्यांचा मजकूर उभयतांवर घालून लिहिला आहे. तें पत्र पाहून आह्मीं सांगितलें कीं, टिपूचा आमचा फासला जवळ आहे. राजकारणांचा भाव समजला. त्यापक्षीं, जाब लिहून देऊन लावून द्यावा. त्याजवर आह्मीं लालास पुसलें कीं, कांहीं अधिक

---

* हरिपंत फडक्यांना पोटदुखीची व्यथा होती. तींतच त्यांचा अंत झाला.

उणें सांगितलें आहे कीं, काय? त्यांणीं सांगितलें कीं, सांगितला मजकूर इतकाच. तेव्हां रवाना करण्याचा निश्चय ठरला. त्यावर, शृंगेरीपंतानें सांगितलें कीं, मजला मुधोजी बावासीं बोलावयास सांगितलें आहे. त्यांची गांठ पडली पाहिजे. तेव्हां पुसलें कीं, कागद पाहिला, तुह्मीं मजकूर सांगितला याहून अधिक काय बोलावयाचें? त्यास, भेट जाली पाहिजे, हाच आग्रह. नाहीं ह्मणावें तर चिरंजीवास वाईट वाटेल, व लष्करांत नसावा, याजकरितां जाणें तर जा, ह्मणून सांगितलें: त्यावरून मुधोजीबावाकडेस रा केला. काय अधिक सांगतो पाहावें. लष्करांतून पीडा लाऊन दिली. धुरंधराची गांठ पडल्यावर पत्र आलें तें दृष्टीस पडेल. त्याजवळ अधिक मजकूर काय सांगितला असेल तोही कळेल. राजकारणांचा प्रकार समजलाच आहे. परंतु कच्चें वर्तमान ऐकलें तें सेवेसीं लिहिलें आहे. रा छ ४ रमजान. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना. लालाबरोबर एक हत्ती व चार वस्त्रें पाठविलीं. हत्ती लंगडा आहे. तो चिरंजीवांनीं येथें चालेना ह्मणून ठेऊन घेतला. विदित झालें पाहिजे. हे विज्ञापना.

पत्रांक २८७ श्री १७०८ आषाढ वद्य ३

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री महिपतरावबापू स्वामीचे सेवेसीं:—

पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. पत्र पाठविलें तें पावोन बहुत समाधान जाहलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. शरीरप्रकृतीविशीं लिहिलें. त्यास औषध घेत असतों. मातुश्री ताई तेथें आली होती. त्यांणीं प्रकृत पाहिली त्यापेक्षां आतां प्रकृत दिवसेंदिवस चांगली आहे. श्रीकृपेंकरून आरोग्य होईल. तुह्मीं येण्याचा मजकूर लिहिला तो कळला. श्रीस प्रार्थना करून यावयाचें करावें. मुरवा कोहळ्याचा पाठविला तो पावला. वैद्यास पुसून घेतों. कळावें. रा छ १७ रमजान. बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे. हे विनंती.

पत्रांक २८८ श्री १७०८ श्रावण शुद्ध ११

राजश्री हरीपंततात्या स्वामीचे सेवेसीं:—

विनंति उपरी. भोंसल्यांचे दरमहाचे तीस हजाराहून मी अधिक बोलिलों नाहीं, व बोलत नाहीं. इतके द्यावे लागतील. देऊं. खासा पुण्यास येतील, त्यांस येथें मेजवानी स्वामींनीं केली. त्यांनीं आपणास केली. त्याजवर फिरोन गांठ पडल्ये, तेव्हां श्रीमंतांचा निरोप व आपला घराऊ निरोप द्यावाच लागेल. दसरा जाहल्यावर मी येतों, अगर सेनासाहेबसुभा यांस पाठवितों. ऐसें

शपथ पूर्वक बोलून, आपलें काळीज आमच्या हवाली करून गेले आहेत. शफत वाहिली, याजमुळें करतीलसें दिसतें. स्वामीची गांठ पडल्यावर या गोष्टी निघतील. फिरोन खचित करून घ्यावें. यान्चा उपयोगअनुपयोग फार-करून समजला. परंतु, मसलतीवर दृष्ट. त्यापक्षीं च्यार खरकटीं बाळगलींच पाहिजेत. मंडल्याविशीं श्रमी आहेत. येविशीं बुंदेल्यांस निक्षून लिहून, यांचे स्वाधीन होय, तें करावें. सर्व अर्थ ध्यानांत आहेत. त्याहावेंसें नाहीं. ह्मणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. त्यास, धुरंधर येथें आले. श्रीमंतांचा निरोप व आह्मीं आपला घराऊ निरोप, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे योग्यतेप्रमाणें केलें. त्यांणींही आपल्या योग्यतेप्रमाणें केलें. येविशींचा वगैरे सविस्तर मजकूर छ २७ रमजानीं लिहून तुह्मांकडे पाठविलाच आहे, त्यावरून कळेल. खर-कटीं बाळगावयाची संवय तुह्मांस आहेच. त्याप्रो घडतही आहे. मंडळ्या-विशीं पत्रें लिहून कारकून व हुजरे हाल्लीं रवाना केले. रा छ २ सवाल. हे विनंति.

पो छ १० शवाल, प्रातःकाल, श्रावण, सबा समानीन.

पत्रांक २८९ (नकल). १७०८ भाद्रपद वद्य १२

पौ छ ११ जिल्हेज सबा समानीन.

राव अजम अकरम लक्ष्मणराव रास्ते सलमलाहुताला.

सो मुघफक मेहेरबान कदरदां करमफर्माय माखलिसां बादज षौक मुला-कत मषहुद जमीर मुजीरत बेहुदतखमीर नमुदा मा आयद. येथील खुषी जाणोन आपली षादमानी हमेषा कलमी करीत आलें पाहिजे. दरींविला छ ७ जिल्कादचें खत अजराहेमेहेरबानगी पाठविलें तें पोंहचून खुषी हांसल जहा-ली. तुम्हीं उभयतां येथें होतां. येथील बोलण्याचा जातिसमई सर्व मजकूर रुबरु सांगितला होता. व तुम्हीं येथें असतां तुम्हांकडून वारंवार पत्रें लिहून पाठविलींच होतीं. तुम्हीं तेथें जाऊन पोंहचल्यानंतर उत्तम प्रकारें बोलून तहाचें पर्याय कांहींच न लिहिले. यावरून अपूर्व दिसून आलें. अमुक प्र-कारचा तह करावयाचा म्हणून तपसील लिहून पाठवावा म्हणून लिहिले होतें. तर, आह्मीं तेथून येते समई पेशकसीचा ऐवज व दरबारखर्चाचा ऐवज सहित दिल्हे. या तरफैनची दोस्ती मजबूत होत आहे ह्मणून अण्णा सो सांगितला होता. त्याप्रमाणें आमचे खाविंद खुदावंदन्यामतांस जाहीर केला. त्यास,पेशकसीचा ऐवज देणें. सर्वांकडून तकरारच नाहीं. वाजबी जें देणेंच असेल तें दिलें जाईल. दरबारखर्चाचे मजकूर लिखापढी नाहीं. मुनासीब देणेंच असेल तें देऊं. या किरदीत तरफैनचे दोस्ती मजबूद जाहल्यावर, आणखी ज्यां ज्यांस मुनासीब जेथपर्यंत करणेंच तेथपर्यंत केला जाईल, ह्मणोन फरमा-

विलें. आपण दाणा व दूरंदेष आहेत. सहल कामाकरितां आपले खाविंद श्रीमंतांसीं करोडोंचे पेंचांत न घ्यावा आणि तर्फैनचा खल कुळाच्या रफाईवर नजर देऊन मदारुलमहाम यांस ज्याप्रकारें बोलावें कीं त्याप्रमाणें बोलून तर्फैनचे दोस्ती मजबूत होत असें करून इतिल्ला द्यावा. तर्फैनचे दोस्तीचे कामास सिवाय तर्फैनचे उमदा लोक दरम्याने आले. अगर दहा वर्षे ऐसेच कज्या खटपट असलियाही फैसल्ला पावणार नाहीं. सावक पंचवीस तीस वर्षा खालें कैलासवासी रघुनाथराव व माधवरावसाहेब असतांना, इकडून मातबर वकील खाननुरुल्ला व करीमखान गेले होते. त्यास, उभयतां रावसाहेबांनीं ताजीमतवाजू देऊन मानपान केले होते. त्याजप्रों तिकडूनही आनंदराव निंबाजी येथें होते. त्यास, आज हा मुलाकत ताारागीन्यावस्ती त्यांनीं हुजूरदरबारास आले. त्यावख्तीं ताजीम व अत्तरदान पानदामचामुदार होत होते. हे मजकूर आम्हीं आपणास जाहीर केला होता. बोललों. आतांहि आनंदराव निंबाजी हमराही लोक असतील ते आपणाला जाहीर केलेंच असतील. आम्हीं आलों असतां श्रीमंतांकडून मानपान जाहाले ते आपणास जाहीर आहे. श्रीमंतांचे व सरकारअसदुल्ला हीच दोस्ती मजबूत जाहाल्यावर हमेषा तिकडून उमदा लोक येथें यावा, येथील उमदा लोक तेथें यावा. त्यास, मानापानांत फरक आलिया कैसे येतील ? याकरितां तेंथें मदारुलमहाम यांसीं वगैरे बोलून, येथून उमदा शखस आलिया श्रीमंतांकडू ताजीम देणेंचेंही मार ठराऊन लिा॰ पाठविलिया, येथें आम्हीं हुजुरांत अर्ज करून येथून उमदा शखस पाठविला जाईल. आंसाहेबांकडील खैरआफियतेचे खबर निगारष करीत आलें पाहिजे. रा छ २५ जिल्काद. ज्यादा काय लिा. हे किताबत. १७०८.

पत्रांक २९० श्री. १७०८ आश्वीन वद्य १२

राजश्रीयाविराजित राजमान्यराजश्री महिपतराव बापू स्वामीचे सेवसीं:—

पो हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष तुह्मी छ १७ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. फार दिवस पत्र आलें नाहीं, विस्मर जाहालें, ह्मणोन पत्रीं लिहिलें. ही गोष्ट खरी आहे. परंतु माझे शरीरास सावकाश नाहीं. यामुळें पत्र पाठविण्यास विस्मरण पडलें खरें. राजश्री रामचंद्र नाईक यांजवळ आपले प्रकृतीचें वर्तमान पुसत असतों तेही सांगत असतात. तेव्हां विस्मरण नाहीं. तुमची प्रकृती नीट असावी अशीच प्रार्थना ईश्वराजवळ आहे. तुह्मीं लिहिलें कीं, श्रीदेवाजवळ

आल्यापासून वीस दिवसांत सांप्रत बरी आहे. त्याजवरून अति संतोष जाहला. तुमची निष्ठा श्रीजवळ आहे. तेव्हां ईश्वर कृपाच करील. संदेह नाहीं. सेवा चालते त्याप्रों चालों द्यावी. सदैव पत्रीं कुशल वृत्त लिहीत जावें, आमचें प्रकृतीचें वर्तमान तर पोटांत दुखत असतें. उपाय करितों. चार दिवस बरें वाटतें, फिरोन नीट नाहींसें होतें. इलाज करीतच आहें. कळावें. रा छ २५ जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंती. छ ४ मोहोरम.

पत्रांक २९१ श्री. १७०२ पौष शुद्ध ९

बक्षिसनामा शके १७०८ पराभवनाम संवत्सरे पौष शुा ९ नवमी शुक्रवार ते दिवशीं राजश्री बाळाजी जनार्दन, उपनाम भानू, गोत्र काश्यप, सूत्र आश्वलायन, महाजन, मौजे वेळास, ता वेसवी, सुभा दाभोळ, यांसी न्याहालकुवरबाई, कुचमानसिंग जाधवराव व राव जगदेव उर्फ राजे आनंदराव बिन जाधवराव, देशमुख व देशपांडे सरकार दौलताबाद, वगैरे सुभे खुजस्तेबुनियाद. सुा सबा समानीन मया व अलफ. सन ११९६ फसली. कारणें बक्षिसनामा लिहून दिल्हा ऐसा जे: सन ११८९ चे सालांत राजे मानसिंग जाधवराव देशमुख देशपांड्ये कैलासवासी जाहाले. सबब व नबाबबंदगानअल्ली यांणीं माहालानिहायचे वतनाची जप्ती केली. ते सोडून बेवारसे पदरीं सनदा करून घ्याव्या म्हणोन आम्हीं हैदराबादेस गेलों. सरकारचे मुत्सद्दी वगैरे यांचे विा जाबसाल लाविला. तों भाऊबिरादर मानसिंग जाधव वल्लद यशवंतराव जाधव हे वृत्तीसंबंधें वादास आले. आम्हांकडील विठ्ठल बयाजी दिवाण माहितगार पुरातन होते, त्यांचा काळ जाहाला. सर्व प्रकारें गोष्ट विलग पडिली. वतनाचे खटपटीस माहितगार जाबसालीं माणून कोणी पदरीं नाहीं हें संकट आणोन तुम्हांकडे पैगाम लाविला कीं, आपण श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा राज्यकारभार सर्व चालवितां, नवाब बंदगानअल्ली यांस तुमचा स्नेह बहुत आहे, त्यांजपाशीं वकीलकीचे कामास राजश्री जिवाजी रघुनाथ आहेत, त्यांजला आम्हांविशीं लिहून त्यांजकडून हरएकविशीं आमचें साहित्य होय आणि वतनाच्या सनदा मोकळीविशीं आम्हांस प्राप्त होत, तें करावें. याप्रों आमचें बोलणें ऐकून, आमचे घरोब्यावर व थोरवर्तनाचें संरक्षण करावें यांत इहपर पुण्य पुरुपार्थ आहे हें जाणोन, आपण जिवाजीपंत यांस लिहून आमचे साहित्यास अनुकूल केलें. त्याजवरून जिवाजीपंत यांणीं नबाब बंदगानअल्ली यांचे दरबारीं साहित्य करून, पूर्ववत्प्रों वतनाचे बहालीच्या सनदा आमचे नांवें करून ठेविल्या. वतनाचा भोगवटा पूर्वीपासून आपले वडीलवडील

करीत आले त्याप्रा आपणही अनुभऊं लागलों. गेलें वतन पुन्हां प्राप्त जालें हा लाभ आह्मीं चित्तांत आणून, आपला उपकार बहुत जाहला याचें उत्तीर्ण काय व्हावें याचा विचार करितां, शिवाय वतन द्यावयाजोगा अर्थ दिसत नाहीं हें जाणोन, पो वरूळ ऊर्फ राजपुर येथील देशमुखदेशपांड्येपणाची वृत्त पूर्वीपासून आपली आहे, त्यांपैकीं देशपांड्येपणाचें वतन पेशर्जी जिवाजी रघुनाथ यांचे पुत्र खंडेराव व अमृतराव जिवाजी यांस देऊन देशमुखीची वृत्त आपणाकडे चालत होती ते आपणांस दिल्ही. यानें कांहीं उपकार फेडिलासा जाणोन, देशमुखीची वृत्त देहे एकतीस द्यावयाचा करार करून, हें बक्षीसपत्र तुह्मांस आत्मसंतोषें लिहून दिल्हें असे. तर सदहूं एकतीस देहे येथील देशमुखीचें वतन व वतनसंबंधें हक्क रुसूम वगैरे भोगवटा द्यावयाचीं कलमें बितपशील:—

१ हक्क रुसूम दर गांवास तनखे यास दरसदे रुा ३ द्यावयाचा शिरस्ता आहे त्यापौ देशपांडे रुा १ घेतील. बाकी रुा २ तुम्हीं घेत जावे.

१ सिरपाव सरकारांतून अगोदर तुम्हीं घ्यावा, मागाहून देशपांडे घेतील.

१ वतनी कागदावर वगैरे दसकत तुम्हीं आपले नावें करावें. तुमचे बाजूस देशपांडिये दसकत करितील.

१ भेट तुम्हीं अगोदर हकीमापुढें ठेऊन, मग देशपांडे यांणीं ठेवावी.

१ बिडा सरकारचा वगैरे अगोदर तुम्ही घेऊन, मागाहून देशपांडे यांणीं घ्यावा.

१. वरकड हरएक मानपान वतनसंबंधें अगोदर तुम्ही, मागाहून देशपांडे यांणीं घेत जावे.

१. देशमुखीचे वतनाबाबत वाडा कसबे मजकुरीं आहे, तेथें इमारत बांधून बांदावें.

१. कसबे मजकुरीं वगैरे हरएक

१. भेटी दर गांवास दोन, तुम्हीं व तुम्हांकडील गुमास्ता प्रों मजकूरचे कामाकाजास ठेवाल त्यांणीं घेत जावी. कलम.

१. धनगरांचे माग ज्या गांवीं असेल त्या गांवीं दरसाल चवाळें एक घेत जावें.

१ चांभाराकडील जोडा दर गांवास दरसाल एक घेत जावा.

१ कसबे मजकुरीं सायरान हक्क आहे तो घेत जावा.

१ शाहा दावलपिदर याचे मुजावरापासून दरसाल तबरुकाबाबत रुा ३ तीन घ्यावयाचा शिरस्ता आहे. त्यांपैकीं देशपांडे यांचा रुा १, बाकी दोन तुम्हीं घेत जावे.

१. भाकरीबाबत ऐवज गांवगन्ना येईल तो निमे देशपांडे यांस देऊन बाकी निम्मे तुम्ही घेत जावा.

१. कलावंत थेर भोरीप वगैरे यांस त्याग अगोदर तुम्हीं, मागाहून देशपांडे यांणीं द्यावा.

गांवीं बाजार भरेल तेथें शेवसबजी तुम्हीं घेत जावी.

१. इनाम जमीन जिराईत, बागाईत, पूर्वींची आहे ते तुम्हीं अनुभवीत जावी.

१. सणाची मोळी माहारांकडील दर गांवास घ्यावी.

१. संक्रांतीचे तीळ व पित्रांचें तूप दर गांवास घेत जावें.

१. प्रो मारीं हरएक कामकाजामुळें प्राप्त होईल तें तिसरा हिस्सा देशपांडे यांस देऊन, दोन हिस्से तुम्हीं घेत जावें.

१. परगणे संबंधें सरकारचें देणें वगैरे पडेल तें तिसरा हिस्सा देशपांडे व दोन हिस्से तुम्हीं देत जावें.

. सदरहूप्रो कलमें करार करून दिल्हों आहेत. त्याप्रो व तुह्मीं आपले कारकिर्दीस नवीन संपादन कराल ते तुह्मी आपली मिरास मुस्तकीम जाणून, तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें भोगवटा घेत जावा. वतनास दुसरियाचा अधिकार नाहीं. कालक्रमें कोण्ही वारीसदार मुजाहीम जाला, तर आपण त्यासी वारूं. तुम्हांस तोशीस लागों देणार नाहीं. सदरहू करारास आमचे वंशींचा कोण्ही दिक्कहरकत करील त्यांस कुळस्वामी व पूर्वजांची शपथ असे. हा बक्षिसनामा लिहून दिल्हा. सही.

पत्रांक २९२ श्री १७०८ पौष वद्य ५

सेवेसीं वेंकोजी अनंत शिर सां नमस्कार विज्ञापना ताा पौष वद्य ५ पावेतों स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज्ञेप्रों स्वामींचें आज्ञापत्र राजश्री कृष्णाजीपंत यांस प्रविष्ट केलें. त्यांनींही सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. त्याचा उद्धार होयसा केला पाहिजे. इकडील वर्तमान तर अविंध तळ कोंकण तलचेरी बंदरावर आहे, त्याची फौज आठ हजार खास पागा व सिलेदार दहा हजार व बार व कर्नाटकी प्यादे मिळोन साठ हजार व तोफा लहान मोठ्या दोनशें, याजपौ पांच हजार स्वार व पंधरा हजार बार वगैरे प्यादे व पंधरा तोफा लहान इतका जमाव सुधा बुरानदीन यास कित्तुरावर पाठविला. त्यानें कित्तुरचें काम करून तेथेंच होता. हालीं आपले फौजेची आवई पडल्यावर अविंधाचे आज्ञेनें हुबळीवर मुक्काम ह्मणून एकंदर परवाना आला आहे. आणखीं दोन परवाने आल्यावर तेथून कूच करून हुबळीस येईल. धारवाड, कोपल, गजेंद्रगड, बदामी, तुंगभद्रातीर धरून, इकडील मुलुकांतील कडबा जाळून टाकणेंविशीं ताकीद व जमीदार जागां जागांचे व त्याचे कारभार करणारास धरून कैद करून ठेवावे आणि उत्तरेकडील फौज कृष्णापार होतांच मुलुक तमाम जाळून जमीदारांस पटणास पाठविणेविशीं एक परवाना आला आहे. प्रस्तुत समय आहे. आवई न घालितां

लष्करें तुंगभद्रेवर आलीं तर वैरण काहींही आहे. आणि जमीदार लोकांचा बच्याव होत आहे, आणि खुद्द तिकडे शहास गुंतला आहे. चित्रकलदुर्गास आपली फौज येई तोंपर्यंत तो कांहीं इकडे येत नाहीं. तेथील शह भारी पडला आहे. एक वेळ युद्धप्रसंग जाहला. मोड याचाच जाहला. म्हणून त्यास खोदून काढावें म्हणून बसला आहे. आपली फौज भारी होऊन आल्यास दुर्गाचे मैदानांत आपणाकडून आणखी एक सरदार भारी जमावानिशीं पा. लढाई करावी. तहकीक वर्तमान मुद्दाम ब्राम्हण जाऊन आपाजीरामाची राहुटीस ऐकोन आला. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक २९३. श्री. १७०९ चैत्र शुद्ध ५.

मुरलीधर जोतिषी पातशाही यांचे पत्राचा तरजुमा:—

विशेष. फार दिवस कृपापत्र आलें नाहीं. तरी पाठविलें पाहिजे. आह्मी आपले शुभचिंतक जोतिषी आहों. पूर्वी कितेक पत्रें आपणांस पाठविलीं होतीं. हालीं कांहीं विचार शास्त्राज्ञेवरून लिहितों, तो ध्यानांत आणावा. आपले ग्रह बहुत चांगले आहेत. तणेंकरून शरीरीं आरोग्य राहावें. प्रतिष्ठा वाढावी. ईश्वराची कृपा व्हावी. लहान थोर सरदार हुकमीं अनुकूल राहावे. शत्रूचा नाश व्हावा. स्वपरदेशांत विख्यात कीर्तिवृद्धि व्हावी. थोर थोर राजे याणीं आज्ञा मानावी. अनेक नजरा येतील. पेशकशी येतील. स्वामींच्या रूबरू मान वाढावा. दुष्ट, चाहाड, लबाड यांचा नाश होईल. आपल्या फौजांस यश प्राप्त होईल. हैदर—नाइकाचे पुत्रावर हें वर्ष फार वाईट आलें आहे. शनिश्वर मकर राशीचा आहे. कर्नाटक देशाचे राज्यास मारील. पूर्वींही आह्मीं आपल्यास लिहिलें होतें तें वर्ष हेंच आलें आहे. त्याचा मुलूकही श्रीमंताचे हातास येतो. घोडे, हत्ती, माल, तोफखाना येईल. च्यारी तर्फेचे फौजेवर श्रीमंताची फौज यशस्वी होईल. राज्यांत आपला अधिकार वाढत जाईल. दोन सरदार आपआपल्यांत लढतील. आपल्यापासून सन्मुख होईल. शरणांगत येतील. राजा आपले इच्छेचें फळ पावेल. पौष—शुद्ध—पौर्णिमेस ग्रस्तास्त—चंद्र—ग्रहण होईल. सूर्य, मंगळ, बुध, शुक्र, राहु एका राशीस येतील. त्याचेंही ग्रहण होईल. यांचें फळ हेंच आहे कीं, ज्यालंधर आणि अटक—अयोध्या— ××× ता येथील स्वामी आपल्या + +++ करून मारले जातील; अथवा अक ++++ थोर यांजवर पडेल. राज्य श्रीमंतांचें ++ दक्षणेस ज्या त्या देशावर जागा जागा दाखल होईल. याप्रमाणें शास्त्राज्ञा आहे. फाल्गुन मासीं तेरा दिवसांचा पक्षही पडला आहे. तीन सरदार मारले जातील अथवा मृत्यूनीं मरतलि —अयोध्येचा स्वामी, कर्नाटक देशाचा स्वामी. अटकचा स्वामी. हा विचार शास्त्राचे आज्ञेवरून केला आहे. पुढें ईश्वर—इच्छा बलिष्ठ आहे. एक थोर

सरदार शत्रुत्व करील. अंत:करणापासून विघाड करील. परंतु कांहीं होणार नाहीं. यास्तव, एक–सहस्र चंडीपाठ करवावा, सहस्र कन्याभोजन करवावें. सकल अरिष्ट दूर होईल. आपले घरीं या वर्षांत दिव्य संतान होईल अथवा गर्भ होईल. आषाढमासीं आमचे कन्येचा विवाह आहे. तरी कृपा करून साहित्य करावें. आम्ही निरंतर आपणांस लिहीत आहों कीं, श्रीमंतांचा प्रताप वाढेल, अस्त–उदय होय तों राज्य होईल, थोर थोर मुलूक हातांत लागेल. एक चाकर माहादजी शिंदे पाटील याणीं जाऊन अंमल दाखल सर्व केला. गड–किल्ले मुलूक घेतला. परंतु आम्हांस दक्षणा न पाठविली. हाल्लीं कन्येचा विवाह आहे. मि॥ चैत्र–शुद्ध ५, संवत १८४३.

पत्रांक २९४ श्री. १७०२ चैत्र वद्य ११

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यराजश्री बळवंतराव दादाजी कामदार प्रांत कल्याण भिवडी गोसावी यांसी:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा सवा समानीन मया व अलफ. रा बाबाजी अनंत ढवळे यांचे तीर्थरूप अंताजी नारायण हे सन ईहिदे समानीनांत इंग्रजाचे लढाईत सरकारकामास आले. सबब, यांस दीडशें रुपये आकाराची जमीन, नूतन इनाम, कल्याण प्रांतीं, यांचे सोईस पडेल तेथें, नेमून घ्यावयाचा सालगुदस्तां करार झाला आहे. परंतु सनद सादर जाली नाहीं. त्यास, हाल्लीं हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी सदरहु दीडशें रुपये आकाराची जमीन प्रांतमजकुरीं यांचे सोईस पडेल त्या गांवीं, नेमून देऊन, यांचे नांवें पेस्तर सालापासून इनामखर्च लिहीत जाणें आणि चतु:सीमेचा जावता हुजूर लेहून पाठविणें. त्याप्रमाणीं इनामपत्रें करून दिल्ही जातील. प्रांतमजकूरचे अजमासास सालगुदस्तां व सालमजकूरचा दुसाला ऐवज तीनशें रुपये घ्यावयाची नेमणूक केली आहे. त्याप्रमाणें सदरहू रुपये जमिनीबद्दल यांस पावते करणें. जाणिजे. छ २५ जमादिलाखर.

आज्ञाप्रमाण.

लेखन
सीमा

पत्रांक २९५. १७०१

....

कडील नित्यानीं एकटें दुकटें होऊन भेटतात. आपली फौज जाऊन शामील

जाली याजमुळें रामसिंगजीची बाजी सरशी दिसते, बिकानेरकरही अद्यापि उभयपक्षीं येऊन शामील जाला नाहीं. राजश्री सवाईमाधोसिंगजी याचा व बख्तसिंगजीचा पूर्वीपासून स्नेहभाव होताच. व सांप्रतकाळींही त्यांजकडील कर्णीदान चारण येऊन ठाकुर पेमसिंगजीचे विद्यमानें मजबुती करून गेला होता. न कळे, कसा काय करार जाहला. एवंच टिका, हाथी, घोडे, वस्त्रें, जवाहीर त्यास पाठवून ऐक्यता जाणविली. कुसळसिंग झालाबेकर याजकडी-लही राडा आजि पंधरा सोळा महिन्यांपासून पडून राहून, त्याचा पुत्र कुंवर जसवंतसिंगजी रुसुवा करून घरीं जाऊन बसले होते. दिवाण हरि गोविंदजी-चा पुत्र व कन्हईराम दिवाण या उभयतांसीं, त्याजला समजाऊन आणावया-निमित्य, पाठविलें असतां ते न आले. व राजीं बसल्यानंतर देवशासीं जाऊ-न, एकदां वडील कोणी यांचे कुळांत सत्या जाहल्या जाहेत, त्यांचीही पूजा एकदां जाऊन करणें जरूर, ऐशा कित्तेक विचारानुरूप राजश्री सवाईमाधो-सिंगजीनीं अजमीरचे रुखें डेरा उभा करविला. व मजसमागमें इठराम धभा ई व रविदत्त जाट......रामजीचा पुत्र चिमणराम याजकडून झालावेस ठाकूर कुसळसिंगजी व कुंवर जसवंतसिंगजीस समजाऊन आणावया निमित्य पाठ-विलें. आजि पंधरा महिने जाले कीं नित्यांनीं येऊं येऊं करित होते. स्वामीचे पुण्यप्रतापेंकरून त्यासीं भाऊबंदसुद्धां तेथून स्वार करून आणिलें. तों सवाई-जी डेरे दाखल जाले होते. उभयपक्षीं भेटीगोष्टी करून, त्यांचीं जागीरपट्टी जें कांहीं पावत होतें तें यथापूर्वक त्यांजवर बहाल करून देऊन, सन्मानपूर्वक सौख्य संपादून दिधलें. पाहतां गती तो बाहिरही निघायाचें कारण इतकेंच होतें. परंतु इताकियांत कुंवर सुरजमल जाठ यांसहवर्तमान ठाकूर पेमसिंगजीही येऊन पावले. सुरजमलजीसीं व बख्तसिंगजीसीं परम स्नेह. याजकरितां त्यांनींही बहुत कांहीं विचार केला कीं, इतके दिवस दक्षणी चौथाईचे ग्राहीक म्हणवीत होते. आतां सर्वस्व ग्राहीक जाले. आगरियांचा अमल दखलच केला. राहिली अजमेर. याचीही सनद हातीं ठेवितात. फौज रामसिंगजीचे कुमकेनिमित्य गेलीच आहे. तुर्कांनीही तिकडेच डौल दिधला आहे. या गोष्टींची पैरवी आतांपासून केलिया उत्तम. त्यासीं सवाईजीनीं तर हाच जाब दिधला कीं, आमचें तर कांहीं त्यांनीं इतकें अधिक केलें नाहीं व स्नेहभावाचा विचार आपला भिन्न भिन्न आहेच. जरी ये समई केवळ राम-सिंगजीकडेच पाहावें तर बख्तसिंगजीनीं जोधपूर घेतलें तें वजोरमर्दीनें घेतलें. व रामसिंगजी पाहतां नांवारीस. व सरदारांहीं त्याची कुमक विचारली असतां तटस्थच राहणें उत्तम. अथवा सरहद्देवर एखाद्या मातबराबराबर फौज देऊन पाठवावें, जिकडील सरशी पाहावी तिकडील गोष्ट सांगावी, हाही एक तट-स्थतेचा विचार आहे. वरकड प्रसंग तर विना सार्वभौमादिकांविराहित होणें दुस्तर. तेव्हां, सुरजमल्लांनीं स्त्रीकार केला कीं, मजशीं व बख्तसिंगजशीं

कोणेही रीतीनें द्वैतार्थ नाहीं. वजीरुलमुमालिकांसीं व त्यांसीं निपट एकोपा. ते ही निवावयासीं सिद्ध. बलके, सार्वभौमांसींहीं काहाडतील. या गोष्टीची मजबुती जे करावयाची ते करून घेतली आहे. आपण मात्र ठाकूर प्रेमसिंगजी हजार स्वारप्याद्यांनिशीं समागमें दिधलें पाहिजे. ह्मणून राजीहि करून तिनी चारी दिवस पावतों राहून, शिकी राहून, सैदांचा चाळिसां हजारांचा महाल सेट मुरारजी व किशनजी यांचे येथें गहाण असतां ते जागा इनाम घेऊन, पेमसिंगजी सहवर्तमान रुखसत होऊन गेले. त्यासी याचा मनसुबा हा दिसोन आला कीं, दिल्लीस जाऊन वजीरउमरावसार्वभौमादिकांसी भर भरून बाहेर काहाडून, एकदां काय आगरें व काय अजमेर या जिल्हेंत वजीरासीं अथवा सार्वभौमासीं आणून, एकदां राजविराज करून, सर्व जमीदार राजे एकत्र होऊन, पुरुषार्थ करून दाखवावा! समदु:खी तो सकलही जाहलेच आहेत. जाटाचे खातरदारीस्तव यांनीं पेमसिंगजीस त्यासमागमें दिधलें कीं, कितेक दिल्लींतील सनदअसनदाचें काम बाकी आहे तें संपादणें जरूर. दुसरें, राज्यीं बसल्यानंतर, दिल्लीस जाऊन सलाम केला नाहीं, बादशहा आहेत, न गेलिया......, यास्तव ऐसें दिसोन येतें जे कांहीं लोक...गेल्यानें राजकारणांचा जमाव जालिया तेथवरही जाऊन सलाम मुजरा करून यावें. त्यास, वजीरजी तूर्त हजुरेंत फसले आहेत. रुकसत होत नाहीं. जावेदखानाशी व वजीरजीसीं अनबनाव. जाटासीं वजीरासीं स्नेह. त्यासीं हर प्रकारें काहाडून आगऱ्यासी अथवा अजमेरकडे न्यावें, या उद्योगांत आहेत. बख्तसिंगजीसहि आशाबद्ध केलें आहे जे, उभयतांहि दिल्लीस जाऊन लवकरच वजीरासीं अथवा सार्वभौमास अथवा एकाद्या मातबरासीं लवकरच घेऊन येतों, तोंवर उतावळी न करणें. जरी इतकियांत उभयतांत युद्ध होऊन सरसी जालिया, जिकडील सरसी होईल तिकडील तजवीज केली जाईल. नाहीं तर, धीरेधीरें जें कांहीं होतें तें पाहतच आहों. म्हणून जात सुरजमलजी बहुतकरून तरतुदेंत लागलेसे दिसतात. मवाजी राठोड, बख्तसिंगजीचा मामा, व हरनाथ टपासें हे उभयतां येऊन पावले. त्यांजबराबर सदाशिवभट, सवाई माधोसिंगजींचे विद्यागुरु, यांजबराबर दोनी हजारनिशीं बिदा केलें. बाहियार्थीं तर हेंच म्हटलें कीं, जेणेंकडून चुलत्यापुतण्यांत सौरस्यता प्राप्त होई..........

पत्रांक २९६

पों छ १ सफर श्री 'लक्ष्मीकांत'. १७०९ आश्विन शुद्ध ५

सन समान समानीन, कार्तिक १७०९

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांसीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित

जावें. विशेष. येहतिशाकजंग याजबाबत किस्तबंदीचे ऐवजाकरितां वारंवार आपलीं पत्रें आलीं. त्यास त्या ऐवजीं येथून साडेतीन लक्ष रुपयांचा भरणा राजश्री रामचंद्र गंगाधर ओंकार यांचे दुकानीं केला आहे. मुदतीप्रों मार-निले ऐवज देतील. याजप्रो घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. रा छ ४ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंती. मोर्तबसुद शिक्का (पूर्वी दिल्याप्रमाणें).

पत्रांक २९७ श्री. १७०९ कार्तिक शुद्ध ७

' अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव कृष्ण गोसावी यांसीं:—

सेवक माधवराव नारायणप्रधान नमस्कार. सुहूरसन समान समानीन मया व अलफ. तुह्मी विनंतिपत्रें पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. लिहिला मजकूर अवगत जाहाला. शरीर प्रकृत चांगली आहे म्हणून लिहिलें, तें कळलें. तीर्थरूप मातुश्री ताईची रवानगी लौकरच करण्यांत येईल. रवाना छ ६ सफर. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक २९८ श्री. १७०९ माघ शुद्ध ५

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव कृष्ण गोसावी यांसीं:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुहुरसन समान समानीन मया व अलफ. तुम्हीं विनंतिपत्र व मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले ते प्रविष्ट जाहाले. रा छ ४ जमादिलावल. बहुत काय लिहिणें ? लेखन सीमा. (पौ) माघ शुद्ध १० मंदवासर.

पत्रांक २९९ श्री १७०१ वैशाख शुद्ध २

शिक्का
सवाईमाधव-
राव साहेब

(अस्सल ब० नक्कल)

यादी सिद्धेश्वर महिपतराव यांचे तीर्थरूप महिपतराव विश्वनाथ मृत्य पावले. सबब मशारनिल्हेचे पुत्र यांचे नांवें सरंजाम पेशजी महिपतराव विश्वनाथ यांजकडे चालत होता त्यापैकीं सालमजकुरापासून करार. सुा समान समानीन मया व अलफ.

सालीना रुपये.

१०००० खासा तैनात पेशजीची बेरीज पैा ४००००

७००० कारकून मंडळी पेशजीप्रों दरकदार वगैरे.

१००० शागिर्दपेशा पेशजी रु. ३००० पौ.

३६००० पागा व पथक.

२१००० पागेकडे सरंजाम पेशजी पंचवीस स्वारांचा साडेबारा हजारांचा होता. त्यास पागा जाली. सबब पेशजीची बोली दूर करून, पागेकडे मोघम चंदी लागवड बद्दल मुशाहिरा वगैरे मिळोन.

१२५०० कदीम

८५०० जाजती

२१०००

१५००० सरंजामी स्वार ५० दर ३०० प्रों.

३६०००

२५०० हत्ती सरकारचा रतीब लागवड बदल मोघम.

५६५००

छप्पन हजार पांचशें सरंजामाची बेरीज ठरली. त्यास, सदरहूप्रमाणें लाऊन दिल्हा असे. येणेंप्रमाणें करार करावे.

करार—

सरंजामास महाल लाऊन दिल्हे आहेत त्यास याजकडे वसूल सुरळीत देणें, म्हणोन सनदा व ताकीदपत्रें देवावीं. देणें.

कुरणा पौ गवत एक लक्ष द्यावयाचा पेशजी प्रो नेमून द्यावें. येणें प्रो करार करून चिटी देवावी. देणें.

किता कलमें

१ मौजे घोरपडी, तालुका हवेली प्रांत पुणें जमीन बिघे १०

१ मौजे भिवंडी, तो कडेपठार,

खेरीज तैनात

१ इनामी गांव मौजे कारी, ता वंदन प्रो वाई.

१ खेरीज तैनात मौजे नऱ्हे ता० कर्यात मावळ.

२

दोन गांव चालविणें. येणेंप्रो करार करून गांवास ताकीदपत्रें देवावीं. देणें.

असाम्या पेशजीप्रमाणें

पौ पेशजीप्रो.

—

२

सरंजामाचें कलम सालमजकुरापासून, म्हणोन लिहिलें आहे. त्यास साल गुजरलें. याजकरितां, पेस्तरसालापासून करार करून सनदा घ्याव्या.

येणें प्रो करार करावे. करार पागेच्या ठाण्याचे गाव

१ मौजे वडाले, पौ कांहीं.

१ मौजे कुंभारगांव, पौ इंदापूर,

१ किल्ले नगर येथील मजमू.

१ किले त्रिंबक येथील सबनिसी.

१ किल्ले बेळगांव येथील सबनिसी.

—

३

तीन आसाम्या करार करावे, वेतन पेशजीप्रो पावीत जावें, म्हणोन सनदा देवाव्या. देणें.

छ ३० रजब सन समान वैशाख सनदा लिहिणें.

येणेंप्रमाणें करार केला असे. छ ३० रजब, सुा. समान समानीन मया व अलफ

पत्रांक ३०० श्री १७१० वैशाख शुद्ध ६

वेदशास्त्र–संपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेययाजी स्वामीचे सेवेशीः—

विद्यार्थी बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित जावें. विशेष. तुम्ही चैत्र वद्य सप्तमीचें पत्र पाठविलें तें पावलें. वैशाख–मासीं राजश्री पंतप्रतिनिधी यांचे विवाहाकरितां कऱ्हाडास येणार, असें ऐकिलें. त्यास, येते–समई सातारि–यास येऊन श्रीमंत माहाराज छत्रपती यांचें व श्रीमंत आईसाहेब यांचें दर्शन घेऊन जावें. त्यांचा हेत आपले भेटीविसी बहुत आहे. मार्गशीर्ष–मासीं आम्हीं आपले भेटीकरितां मेणवलीस आलों होतों, त्यासमई श्रीमंताचे येण्याविशीं बोलिलों होतों. त्यास, श्रीमंतांचे येण्याचा अर्थ आपण घडवीतील त्या समई घडेल. परंतु आपले येणें याप्रांतीं आहे, त्याअर्थी सातारियास येऊन राजदर्शन करून जावें, म्हणोन लिो. तें सविस्तर कळलें. त्यास, सातारियास *यावयाचे होतें. परंतु, राणी वारल्याचें वर्तमान आलें. त्यास, बहुता दिवसीं येणें तें सुतकामुळें दूर बसावें, मजुरा करतां नये हे ठीक नाहीं, याकरतां न आलों. परभारे कऱ्हाडास .जातों. आपणास कळावें. रा छ ४ साबान. लोभ असों द्यावा. हे विनंति.

पो वो शुद्ध ७ सोमवार सन समानीन.

---

* येथून हस्ताक्षर नानाफडणीसाचें. समान समानीन बद्दल नुसतें समानीन असें पैवस्तींत चुकून पडलें आहे.

पत्रांक ३०१ श्री. १७१० ज्येष्ठ वद्य ६

॰श्री
राजा शाहु नरपति
हर्षनिधान माधवराव
नारायण मुख्य प्रधान.

दस्तक सरकार राजश्री पंतप्रधान ता कमाविसदारान व चौकीदारान व बाजेलोकान व मोकदमान देहाय नावाडे वळेकरकेरी सुा तिसा समानीन मया व आलफ. सरकारची जामूदजोडी पुंजाजी नाईक कामगारीस रवाना केली असे. तरी, मार्गी जातां येतां कोणेविसी मुजाहिम न होणें. नदीनाले पार करणें. जाणिजे. छ. १९ रमजान.

लेखन
सीमा.

पत्रांक ३०२. श्री. १७१० आषाढ वद्य १०.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेययाजी स्वामींचे शेवेसीं:—

विद्यार्थी बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष आपण राजश्री सदाशिव अनंत या समागमें पत्र पाठविलें, तें प्रविष्ट होऊन लिहिला अर्थ कळला. ऐशीयास राजश्री धोंडो बल्लाळ आपल्याकडील कामकाजाबद्दल येथें होते. त्याजवरून प्रसंगानुरूप तूर्त एक गांव हजार रुपयाचा, पा सिरालें पैकीं, आपणास देविला आहे. व पा सांगोलें येथील सन समानचे वर्षासनापैकीं पांचशें रुपये राजश्री विसाजी कृष्ण याजकडे राहिले होते ते त्यास सांगोन देविले आहेत. प्रविष्ट होतील. रा छ २४ सवाल. बहुत काय लिहिणें?* लोभ असो दीजे. हे विनंति.

---

* येथपासून नानाफडणिसांचें अक्षर.

पत्रांक ३०३. श्रीगणपती. १७१० श्रावण वद्य ५.

श्रीगणपति
श्रीपंतप्रधान चरणीं त-
त्पर रामचंद्रसुत परश-
राम निरंतर

अज स्वारी राजश्री परशराम रामचंद्र ता मोकदम, मौजे चिकुर्डे, का कोडोली, प्रा पनाळा. सुा तिसा. समानीन मया व अलफ. रा बळवंतराव जिवाजी देशपांडे प्रा—मा याणीं विदित केलें कीं, नारायण आनंदराव देशपांडे प्रा मा हे आमचे भाऊबंद, आम्हास वतनाचा वांटा देत नाहींत, येविसी पेशजी श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांच्या वेळेस कैलासवासी हरी दामोदर याजकडे पंचाईत नेमून दिल्ही. तेथें निवाडा करून मशारनिलेनीं पत्रें दिल्हीं. पुढें हुजूर फडशा व्हावा, त्यास श्रीमंत नानासाहेब कैलासवासी जाले. पुढें दंगेच होत गेले. अलीकडे आपणापासीं येऊन पांच सात वर्षे वतनाचा विभाग ठेवावा म्हणोन विचारीत आलों. तेव्हां उभयतांनीं फिरून वादास जावें असें ठरलें. थलपत्रही लिा. परंतु, नारायण आनंदराव वादास जावयासी निघत नाहींत. यास्तव, कृपा करून आमचा विभाग देवावा म्हणोन. त्याजवरून पाहतां, हे भाऊबंद खरे असोन, यांस विभाग देत नाहींत. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब याणीं हरी दामोदर यांजकडे पंचाइतीस लाऊन दिल्हे. तेथें निवाडा जाला आहे. परंतु विभाग देत नाहींत. यास्तव हाली मौजे मा येथील देशपांडपणाचा इनाम व हक्क वगैरे कानूबाब पेशजीपासून चालत असेल त्याप्रमाणें बळवंतराव जिवाजी याजकडे चालविणें जाणिजे. छ. १९ जिल्काद.

मोर्तब
सुद.

पत्रांक ३०४ श्री. १७१० भाद्रपद शुद्ध १०

सेवेसी महिपतराव कृष्ण सां नमस्कार विज्ञापना ताा छ ९ जिल्हेजपर्यंत आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस पत्र येऊन

सांभाल होत नाहीं. तरी ऐसें नसावें. सर्वदा पत्रीं परामर्श करीत असिलें पाहिजे. दर्शनास बहुत दिवस जाहाले. प्रस्तुत श्रीची आज्ञाही जाहल्यांतच आहे. यास्तव दर्शनाचा बेत आहे. परंतु श्रीयोगेश्वरी कुळस्वामिणी आहे. तिचेंही दर्शन जन्मांत जाहालें नाहीं. याजकरितां तेथें जाऊन, तेथून जवळच श्रीवैद्यनाथ व श्रीनागनाथ दर्शन करून, सिंहस्थप्रयुक्त गंगास्नान करूं. चरण सन्निध यावें, हें मानस आहे. यास्तव विनंति लिहिली आहे. त्या प्रांतीं वणजाऱ्यांचा वगैरे उपद्रव बहुत, याजमुळें एकटें जाण्याची सोय नाहीं, यास्तव शंभर राऊत आल्यास जाणें घडेल, हें जाणोन विनंति लिहिली आहे. तर कृपा करून स्वार पाठवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. दीड दोन महिन्याचें काम आहे. यांत जसी मर्जी असेल तसें करीन. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असावा. हे विज्ञापना.

पत्रांक ३०५

पौ छ २९ सफर तिसैन मार्गशीर्ष. श्री १७१० भाद्रपद वद्य ७

श्रीमंत पंतप्रधान स्वामीचे शेवेसीः—

विनंति सेवक रघुनाथ हरी कृतानेक सा॥ नमस्कार. विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ भा॥ वा॥ ७ पो॥ स्वामीचे कृपेंकरून सेवकांचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ २६ रमजानचें आज्ञापत्र सादर जालें तें छ १७ जिल्हेजीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, ता॥ झाशी येथील मामलत तुह्मांकडे. त्यास, मामलतीप्रों सरकारांत रसद येत नाहीं व हिसेब कचा पका साल होतांच आकारून सरकारात समजाऊन वरचेवर फडशे करून घ्यावे, तेहीं गोष्ट तुह्मांकडून होत नाहीं. मामलतीवर दुसरे गृहस्थ जाजती बोलतात. याजकरितां सालमजकुरची रसद तुह्मीं दोन लक्ष रुो भरणा करणें आणि कचा हिशोब सन तिसासमानीन पावेतों सरकारांत समजाऊन फडशा करून घेणें. या प्रमाणें होत असल्यास उत्तम आहे. नाहीं तरी, दुसरे मामलेदार बोलतात त्यास मामलत सांगून, घालमेल करावी लागेल. येविसींचें उत्तर सत्वर पाठवणें, ह्मणोन आज्ञा. ऐसीयासी, येथील सविस्तर वर्तमान व अजमास लिहोन राजश्री बाजी जगन्नाथ व अंताजी विश्वनाथ यांजकडे पाठविला आहे. सेवेसी श्रुत करितील. आम्हीं सरकारचे शिलकी सेवक. सरकारांत किफायत होत असतां नुकसानीची विनंति आम्हांकडून करवणार नाहीं. येथील वैवाट मनास आणून आज्ञा जाली पाहिजे. येथें तालुक्याची जमा थोडी खर्च भारी. याजमुळें किल्यांचे व स्वारसिबंदीसाहुकारांचे पेचांत आहों. दुसरे गृहस्थ जाजती बोलतात येविशीं सेवकांनीं विनंती कोणती करावी. सरकार मर्जी असेल त्याअन्वयें आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवकास आज्ञा होईल त्या आज्ञेस ऊजूर

नाहीं. हिसेब तयार जाले ते हुजूर दफ्तरांत पोहोंचलेच आहेत. अलीकडील सालें तयार जालीं तीं विजयादशमी जालियानंतर रवानगी करितों. राहिले हिशेबही निकडीनें तयार करऊन लवकरच हुजूर पावतील. आम्ही अशक्त याजमुळें हिशेब सरकारांत देऊन मागील फडशा करावा, हेच इच्छा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३०६ श्री लक्ष्मीकांत. १७१० आश्विन शुद्ध ५.

राजश्री बाळाजीपंतनाना गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. राजश्री पंतप्रधान यांचे भेटीचे उद्देशें नागपुराहून सुमुहूर्तें छ १७ जिल्हेजीं डेरेदाखल जाहलों, आणि तेथून दरमजल मुर्तजापुरीं येऊन मुकाम केला असे. अतःपर लांब लांब मजली करून अविलंबें येत असों. भेट होईल तो सुदिन असे. तेथें तीा आवा याचें राज्यकारण आढळलें. म्हणोन सूचना व्हावी, याअर्थीं राजश्री पंतप्रधान यांणीं राजश्री बाबूराव विश्वनाथ यांसीं पाठविलें. त्यास, तें पत्र येथें पाहून बजिन्नस तीर्थरुपाकडे पाठविलें आहे. त्याचा बंदोबस्त सर्व घडून येईल. रा छ ५ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दिजे. हे विनंती. मोर्तबसूद.

श्री
श्रीराजारामपदांभोज-
भ्रमरायितचेतसः ।
बिंबात्मजस्य मुद्रेयं
राघवस्य विराजते ॥

पत्रांक ३०७. श्री १७१०.

जाबता गुन्हेगारी तोतयासंबंधीं बाबत मराठे वगैरे सरदार-लोक-तालुके रत्नागिरी निा राजश्री महिपतराव कृष्ण. सुा तिसा समानीन मया व अलफ. पेशजी सन सीत-सबैनांत तोतया जाहला होता. त्याजकडे लोक सरदारी करून चाकरीस राहिले होते. त्यांपैकीं कांहीं असामींचे फडशे गुन्हेगारींचे पेशजी होऊन, बाकी राहिले आहेत त्यांजपासून गुन्हेगारी घ्यावयाविसीं

हुजूरची आज्ञा जाहली. त्याजवरून तोतयाकडे सरदार लोक चाकर राहिले होते, त्यांचा मजकूर सुभा मनास आणून, जिवा-मवाफक गुन्हेगारी करार केली ते रुा.

४२४६ तोतयाचे वेळेस नव्या सरदाऱ्या करून, बरोबर लोक घेऊन, चाकरीस तोतयाकडेस राहिले होते, सा रुो.

८२० ता संगमेश्वर.

५० महिमाजी दळवी, मौजे तरिर्ये.

९० बाबूराव बिन मालोजीराव मुर्वे खोत, मौज अंत्रवली.

१०० सुभानराव बिन संभाजीराव सुर्वे, मौजे मुचरी.

१०० सेख अबदला पाटणकर, कसबा संगमेश्वर.

४० धोंडजी नलवडे खोत, मौजे करजुवें.

३५ लक्षुमण चवाण, मौजे कुळें.

७५ काजी हसन वा काजी अली, कसबा संगमेश्वर.

३५ वाघोजीराव सुर्वे राजवाडीकर, गुा विसाजी महादेव साठे.

३५ कृष्णाजी सुर्वे राजवाडीकर, गुा विसाजी गोपाळ केळकर.

१४० राणोजीराव बिन रायाजीराव सुर्वे, मौजे मुचरी.

४० गोविंदराव सुर्वे बिन बावाजीराव सुर्वे, मौजे मुचरी.

१५ लक्षुमण चवाण हजाम, मौजे धामणी.

६५ सिवाजीराव बिन संभाजीराव सुर्वे, मौजे मुचरी.

८२०

४१० ता देवळें.

१०० खंडोजी बिन कृष्णाजी चवाण, मौजे मार्डें.

६० मदनाजीनाईक लोटणकर, ता मौजे गोडगांव.
५५ आपाजी मोहिते. मौजे कोरलें.
६० गोविंदराव पाटोले खोत, मौजे तळवडें.
४० सिवाजी अदटराव खोत, मौजे कोरलें.
५० अमृतजी अदटराव खोत, मौजे कोरलें.
४५ लक्षुमण चवाण, मौजे चाखणें.

———

४१०

१२१० ता हातखंबें.

२०० बाळ सावंत वळकेकर, मौजे वळकें.
२५ धोंड सावंत वळकेकर मयत जाहाला, सबब त्याचा लेक हर सावंत याजपासून घ्यावयाचें ठराविलें ते.
५० दौलत सावंत बिन देव सावंत खोत, मौजे खेडसी.
४० माहादजी नागवेकर भंडारी, मौजे खेडसी.
७० बाळ सावंत बिन लखम सावंत खोत, मौजे खेडसी.
६० हर सावंत बिन रंग सावंत खोत मौजे खेडसी.
३०० विठोजी देसाई, ता मजकूर.
२०० गुण सावंत बिन देव सावंत पालकर खोत, मौजे पाली.
१०० दादबा देसाई, ता मजकूर
५० नागोजी साळवी टेंबकर खोत, मौजे टेंब्यें
५० कृष्णाजी सरफेर, मौजे नाणीन.
३५ भिकसांवत टेंबकर, हाली वस्ती मौजे वेरल ता कर्जे.
३० भवान साळवी टेंबकर, मौजे टेंब्यें.

———

१२१०

३०० ता हराचिरी

१०० हरजी येसजी नाईक खोत, वा मौजे भाटियें.

४५ गुण साळवी राय साळवी खोत, मौजे फणसंप.

४५ आपाजी साळवी बिन सुर साळवी खोत, मौजे फणसंप.

३५ गणोजी चांगाजी बन्ये खोत, मौजे निरूल.

४० गोपालजी बोरकर, मौजे सोमेश्वर.

३५ हरजी नाईक बोरकर, मौजे सोमेश्वर.

३००

५६५ ता सेतवडें.

१७५ बाबूराव बिन अमृतराव विचारे खोत मौजे वरवडें.

७५ भगवंतराव बिन रायाजीराव विचारे खोत, मौजे वरवडें.

७५ दौलतराव विचारे खोत, मौजे वरवडें.

५० दौलतराव सिर्के, वा का सेतवडें.

२५ जाव साळवी खोत, मौजे मालगुंड हा मयत जाहला, सा त्याचा भाऊ सजनाजी याजकडे करार केले ते रुो

२५ सुरसाळवी खोत मौजे मालगुंड हा मयत जाहला, सबब त्याचा लेक खंडोजी साळवी याजकडे करार केले ते, गुा विठोजी साळवी.

५० बाळाजीराव खोत, मौजे वरवडें, हाली वस्ती मौजे मेढें, ता फुणगुस, गुा आपाजी देसाई.

५० येसवंतराव विचारे खोत, मौजे वरवडें.

४० लक्षुमण साळवी खोत, मौजे मालगुंड.

५६५

१६१ ता लांजे

४५ हिरोजी कद्रू मौजे देवधें.

३५ कृष्णाजीराव इदूलकर, मजरें निवेसी.

२५ अदम नाईक लांजेकर, कसबा लांजें,

१६ हरजी कळवजे, कसबा लांजे, याजकडे रुा ४० चाळीस रुा करार केले होते त्याजवर तो मयत जाहला. पोटीं पोर लहान पांच–सात वर्षांचा, केवळ नादार, भीक मागून खातो. सा कळवजा मजकूर जिवंत असतां वसूल आले होते, त्याप्रमाणें करार केले ते रुा.

४० गोपाळ भिकाजी हळब्ये, वा साठवली.

१६१

४९५ माहलानिहाय.

६५ दादजीराव राणे खोत, वा बसणी का नेवरें.

४५ संभाजी पोलेकर, वा पेठ जंजीर रत्नागिरी, हाली वा मौजे कुले ता संगमेश्वर.

८० तानसावंत बिन भिकसावंत देसाई, मौजे काडिपें ता फुणगुस.

३० हरजी पंडित, वा मौजे मुरबंडी तालुके अंजणवेली.

२५ कृष्णाजी तोडणकर वा वडारद–पार ता पांवस.

६० मालजी जाधव, वा मौजे नाखर ता पांवस.

४० बिरोजी दळवी, मौजे फणसवलें ता केळ्यें माजगांव.

६५ कमळोजी साळवी, मौजे करबुंड ता केळयें माजगांव.

१२५ बाजीराव बिन आपाजीराव इदुलकर खोंत मौजे विघ्रवली ता देवरूख.

४९५

२८५ वडामिन्या का नेवरें.

५० कृष्ण सावंत बिन देव सावंत मीरकर.
५० गुण सावंत बिन राय सावंत मीरकर.
२५ धोंड सावंत बिन कृष्ण सावंत मीरकर.
५० रत्नोजी भाज्या भंडारी.
४५ गणोजी भाटकर भंडारी.
४० राजकोजी गबाजी पाटले भंडारी.
२५ बाळ सावंत राम सावंत मीरकर.

२८५

४२४६

२९८० खानविलकर गांवगना ता लांजें याणीं नव्या सरदाऱ्या केल्या व कदीम सरदार होते त्याणीं नवे लोक ठेविले. सा गुनेगारी करार केले ते रुो.

१२५ विटोजीराव खानविलकर, मौजे इंदवटी, नवी सरदारी केली होती, सा.

७०० त्रिंबकराव खानविलकर, मौजे कुटें, हे मातबर माणूस पेशजीपासून सरसुभाकडे वसईस पथकमुद्धां चाकरीस होते. तिकडून तोतयास तळागडचे मुकामीं येऊन भेटले व मौजे–मजकुरीं घरीं त्याचा कारभारी होता त्याणें मशारनिल्हेचे नांवें सरदारी केली होती. ऐशास ते हालीं मयत जाहले त्यास, त्याचे पुत्र बळवंतराव वसईस त्याचे सरदारीवर चाकरीस आहेत, त्यांजकडे करार केले ते.

४०० रामराव खानविलकर, मौजे कुटें, दादजीराव यांचे बंधु, यांणीं नवी सरदारी केली होती, सा करार केले ते रुो.

१२५ मुरारराव खानविलकर, मौजे खानवली, नवी सरदारी केली होती सा.

२०० दौलतराव खानविलकर मयत जाहले. त्याणीं सरदारी नवी केली व त्याचे बाप जिवाजीराव हि बरोबर होते, सबब करार केले ते रुो.

१५० साबाजीराव खानविलकर, मौजे बिवली, यांणीं नवी सरदारी करून गेले होते सा.

२५० लक्षुमणराव खानविलकर, मौजे खेरवसें यांणीं नवी सरदारी करून गेले होते सा.

३०० अमृतराव खानविलकर, मौजे केळवें, यांणीं नवी सरदारी करून गेले होते सा.

७५ रामाजीराव खानविलकर, हालीं वा मौजे अंत्रवली, ता संगमेश्वर, यांणीं नवी सरदारी केली होती सा.

४० संताजीराव खानविलकर, मौजे बोनी बुा, हे पेशजी तालुके-मजकुरी चाकरीस होते, त्यांणीं तोतयाचे वेळेस नवी सरदारी करून बरोबर लोक घेऊन तोतया बरोबर गेले होते, सा करार केले ते रुा.

५५० राघोजीराव खानविलकर मौजे बोनी बुा.

२५० खुद्द राघोजीराव तोतयाचे पूर्वींच तालुके-मजकुरीं पथकसुधां सरदारी करून चाकरीस होते. त्यांणीं तोतयाचे वेळेस आपले सरदारींत नवे लोक ठेऊन, तोतयाकडे बरोबर गेले होते; व राघोजीराव यांचे चुलते रत्नोजीरावही तोतयाबरोबर होते, परंतु चाकरीस राहिले नव्हते. अलीकडे रत्नोजीराव मयत जाहले. त्यास, राघोजीराव यांणीं नवे लोक ठेवून तोतयाबरोबर गेले होते, व रत्नोजीराव चाकरीस राहिले नव्हते, परंतु बरोबर गेले होते, सबब करार केले ते रुो.

३०० बाबूराव खानविलकर, राघोजीराव यांचे चुलते, ते पेशजीपासून सरसुभाकडे व वसईस पथकसुधां चाकरीस होते. त्याचे नांवें त्याचे घरीं गंगाजी बाळया होता. कारभारी याणें तोतयाकडे सरदारी करून बरोबर लोक घेऊन, चाकरीस गेला होता. त्यास बाबूराव वारले. त्याचे

पुत्र रामराव त्याचे आसामीवर वसईस चाकरीस आहेत. त्याजकडे करार केले ते, गुा राघोजीराव.

५५०

२५ बाबूराव खानविलकर, वाा लावगन खानवली, याणीं नवी सरदारी करून गेले होते सा.

४० आपाजीराव खानविलकर मौजे बोनी बुाा ताा लांजें,. याणीं नवी सरदारी करून तोतयाकडे राहिले होते सा.

२९८०

८५० तालुके मजकुरीं पेशजी कदीम चाकर होते, त्याणीं नवे लोक ठेऊन तोतयाकडेस चाकरीस राहिले होते. साा वाा पेठ जंजिरे रत्नागिरी वगैरे.

५० येसजी बिन कृष्णाजी नलवडे, वाा बाले किला, हे पेशजी तालुके-मजकुरीं चाकर होते. त्याणीं तोतयाचे वेळेस आपले नांवें सरदारी करून, लोक बरोबर घेऊन तोतयाकडे चाकरीस राहिले होते. साा करार केले ते, शो.

७५ गंगाजी नाईक बोरकर, मौजे सोमेश्वर, ताा हरचिरी, हे कदीम सरदार तालुके मजकुरीं पथकसुधां चाकरीस होते, त्याणीं तोतयाचे वेळेस आपले सरदारींत नवे लोक ठेऊन चाकरीस राहिले होते. साा शो.

१७५ गोपाळजी भुजबळराव कोंडभुजबल, मौजे आंबडी, ताा देवरुख, हे कदीम सरदार पथकसुधां तालुके मजकुरी चाकरीस होते. त्याणीं आपले सरदारींत नवे लोक ठेवून चाकरीस राहिले होते. साा.

५० अली नाईक वा इभ्राम नाईक पांवसकर, वा कसबा पांवस, हे कदीम तालुके मजकुरीं चाकर होते, त्याणीं तोतयाचे वेळेस नवे लोक ठेऊन सरदारी केली आणि तोतयाबरोबर चाकरीस गेले होते. सा.

६० येसजी नाईक सिवळकर, वा पेठ जंजिरे मजकूर, हे कदीम सरकार पथकसुधां तालुके मजकुरीं चाकरीस आहेत. त्याणीं तोतयाचे वेळस नवे लोक आपले सरदारींत ठेविले होते, सा रुो.

१५० यमाजी नाईक भावळे, मौजे कासारी, ता सेतवडें, हे कदीम सरदार तालुके मजकुरीं चाकरीस आहेत. त्याणीं तोतयाचे वेळेस आपले सरदारींत नवे लोक ठेऊन, तोतयाबरोबर गेले होते, व भावळे यांचे भाऊ तुकोजी नाईक कदीम चाकर, परंतु तोतयाबरोबर गेले होते. व भगवंतजी नाईक जदीद सरदारींत चाकर राहिले होते, परंतु सरदारी केली नाहीं. त्यास त्याजकडे करार केले ते रुपये.

६० कोनाजी येशवंतराव, मौजे कोसुंब, ता देवरुख. हे तालुके मजकुरीं कदीम सरदार होते त्यांणीं तोतयाचे वेळेस आपले सरदारींत नवे लोक ठेऊन, बरोबर चाकरीस गेले होते सा.

४० रामाजीराव कदम, मौजे निवेदर्डी, ता देवरुख, हे तालुके मजकुरीं कदीम सरदार होते. त्याणीं तोतयाचे वेळेस आपले सरदारींत नवे लोक ठेविले आणि चाकरीस राहिले होते. सा करार केले ते रुा.

४० बाळोजी नाईक पाटले, वा राहाटागर, का नेवरें, हे कदीम सरदार तालुके

मजकुरीं होते. त्यांणीं तोतयाचे वेळेस नवे लोक आपले सरदारींत ठेविले आणि चाकरीस राहिले होते, सा.

६० सुरसावंत जोंगसावंत खेडिसीकर, हे कदीम चाकर तालुके मजकुरीं होते. त्यांणीं तोतयाचे वेळेस नवे लोक ठेऊन चाकरीस राहिले होते, सा.

४० पिलाजी-नाईक सिवळकर, वा पेठ जंजिरे मजकूर, यांणीं तोतयाचे वेळेस आपले नांवें सरदारी करून, नवे लोक बरोबर घेऊन चाकरीस राहिले होते. त्यास सिवळकर कदीम चाकर दुसरे सरदारींत असोन, तोतयाचे वेळेस आपण नवी सरदारी करून राहिले सा.

५० लक्ष्मण सावंत देसाई, ता धामणसें, हे कदीम सरदार तालुके मजकुरीं पथकसुधां चाकरीस होते. त्यांणीं तोतयाचे वेळेस आपले पथकांत नवे लोक ठेविले होते, सा त्याजकडे गुन्हेगारी येणें ते, तो मयत जाहाला, त्याचे लेक रामाजी देसाई यांजकडे करार केले ते रुो. आा

३१

८५०

११५ पथकीसबनिशाकरून ब्राह्मण कारकून तोतयाचे वेळेस चाकर राहिले होते. त्यांजकडे करार केले ते रुा

३५ अंताजी नारायण खोत, मौजे चार्फे, येसवंतराव विचारे यांचे पथकांत सबनिशी केली होती सा

४० लक्षुमण गोविंद खोत, मौजे चेर्प्ये, बावाजीराव विचारे वा तालुके अंजनवेल, याचे पथकांत सबनिसी करून होते सा.

४० लक्षुमण नारायण कानडे माहाजन, मौजे देऊड

बाळसावंत धामणसेकर याचे पथकांत सबनिसी करून होते सा. आा ३

११५

१०९९ कृष्ण सावंत बिन शंकर सावंत देसाई, मौजे पोंचरी, ता फुणगुस, हे तोतयाकडे नवीन सरदारी करून, बरोबर लोक घेऊन, चाकरीस राहिले होते. त्यास आणून मनास आणितां, त्याणीं लेहून दिलें जेः—आपण तोतयाकडे सरदारी करून जामदारखान्याचे निसबतींत चाकरीस राहिलों होतों. त्यास, किले राजमाची येथील मुकामीं आपणाजवळ जामदारखान्याकडील कारकून यांणी तीन गांठोड्या रुप्याचे दागिनेयाच्या व मोकळे तीन दागिने रुप्याचे, पो येक कासांडी व दोन वाट्या येणेंप्रमाणें, आपणाजवळ देऊन, स्वारीचा मुकाम होईल तेथें आणून येणें, म्हणोन सांगितलें. पुढें तोतयाचा मोड जाहला. सा सदरहू ऐवज घेऊन आपण आपले घरीं आलों. त्यास, तीन गांठोड्यांपो येक गाठोडी, अजमासें दोनशें रुपयांची किंमतीचे दागिनेयाची, बाजी सावंत व लखमा नितोरा व चिमा गुरव फुणगुसकर हे आपले पथकांत चाकरीस होते, त्याजवळ होती. ते त्याजकडे लागली. बाकी दोन गाठोड्या व तीन दागिने आपणाकडे लागले. ते आपण खर्च केले म्हणोन सावंत-मजकूर याचे पथकांत सिपाई होते, त्या पो सदरहू मजकूर ज्या असामींस समजला होता त्यांचीं नांवें लिहून दिल्हीं. त्याजबा सदरहू असामी पो तालुके-मजकुरीं हजीर होते त्यांस आणून चौकशी करितां, तेही सदरहूअन्वयें कबूल जाहले. सा त्यास सावंत यांसी तोतयाकडील दागिने आणिले ते सरकारांत आणून द्यावें, तें न केलें, दरम्यान खर्च केले सबब, येविसीची गुन्हेगारी व दागिन्यांची किंमत व कृष्ण सावंत याणीं नवी सरदारी करून बरोबर लोक घेऊन तोतयाकडे चाकरीस राहिला येविशींचे गुन्हेगारीचा फडशा करणें, म्हणोन आज्ञा करून अटकेस ठेविले. त्याजवरून त्याणीं विनंति केली कीं, आपण गरीब केवळ नादार, परंतु सदरहू अपराध आपणापासून

जाइला आहे, ऐशास जीवन—मवाफक गुन्हेगारी व दागिन्याची किंमत घेऊन मोकळीक केली पाहिजे, म्हणोन सावंत मजकुर याजपाशीं वामनाजी हरी पटवर्धन, मौजे कोतवडें, का। नेवरें, याणींही विनंति केली. त्याजवरून मनास आणून दागिनेयाची किंमत व गुन्हेगारी करार केली ते जमा गु॥ हाय रु॥

६८९ दागिन्यांची किंमत.

५६४ गाठोड्या रुप्याचे दागिन्यांच्या सुमारें ३ एकूण दर गाठोडींत दागिने अजमासें होते म्हणून कृष्ण सावंत याणें लिहून दिल्हे. व यापो येक गाठोडी तीन असामी फुणगुसकर यांजकडे लागली. त्यापो तिसरा विभाग बाजी सावंत सांधि साठ-सत्तर रुपयांचे किंमतीचे दागिने आपले ह्मणोन बाजी सावंत यांणीं लिहून दिलें, व तोतयाचे जामदारखान्यापो दुसरे सरकाराजवळ रुप्याचे दागिनेयाची गांठोडी दिल्ही होती ती विजयदुर्गास पेशजी सांपडली. ती दोनशें रुपयांचे किंमतीची होती. याप्रमाणें दाखला पुरला. त्याजवरून मनास आणून दर गाठोडींत दोनशें रुपयेचे किंमतीचे दागिने अजमासें ठराविले. तीन गाठोड्या मिळून रुपये ६००. पो वजा लखमा नि तोरा कुणबी फुणगुसकर यांजकडे येक गांठोडीचा तिसरा विभाग लागला. त्याचे रु॥ ६५ पासष्ट लंग त्याजकडे येणें. त्यास, तो केवळ गरीब, अनुत्पन्न, भिकारी दाखल आहे. ऐशास त्याजबाबद वसूल आला ते रु॥ २९, बाकी वसूल येणें त्याजविशीं त्यास तगादा आहे. परंतु वसूल आल्यास पेस्तर जमा येतील. सा॥ वजा रुपये ३६. बाकी जमा रु॥.

४०० गुा कृष्ण सावंत पोंचरीकर गाठोड्या
२ यो.

१६४ प्रा गांठोडी १ ऐकूण.

७० गुा बाजी सावंत बिन आत्माजी
सावंत देसाई.

७० गुा बाजी सावंत बिन आत्माजी
सावंत देसाई, का फुणगुस.

६५ चिमा गुरव, कसबा फुणगुस पो
गुरव मजकूर मयत जाला. बा-
इको अंजनवेल, तालुकेयांत ना-
दारीमुळें गेली सा दुसरेयापासून
घेतले. येणें प्रा रुो.

४० अंता सोनार, कसबा मजकूर,
याचा बाप बाबसेट यांसि गुरव
मजकूर याणें सदरहु गाठोडीचे
विभागापैकीं रुप्याची साखळी
येकतीस तोळे वजनाची कर्ज
दिल्ही होती. त्याजबाबत सो-
नार मजकूर याजकडे करार
केले ते साखळी १ एकूण.

२५ गुरव मजकूर याजकडील
दुसरें उत्पन्न नाहीं. त्यास तो
पोचरीकर याचे पथकांतील
सिपाई. सबब कृष्ण सावंत
याजपासून घेतले ते रुा.

६५.

२९ लखमा नीतोरा कुणबी, कसबा
फुणगुस, याजकडे गाठोडीचा
तिसरा विभाग सरासर रुपये ६५
येणें. ते पो वसूल आले ते रुो.

१४ रोख नितोरा याणें वसूल दि-
ल्हे ते.

१५ रुप्याची सांखळी जोड सदरहू
गाठोडीचे विभागापो नितो-

रा यार्णे विकिली. त्याची किं-
मत ज्यार्णी विकत घेतली
त्यार्णी उणी समजाऊन आ-
पण दरम्यान घेतले होते म्ह-
णोन विदित जाहले. त्याज-
वरून मनास आणून त्याज-
पासून घेतले ते रुो

५ दावजी वाघला काा मा
यार्णे साखळी जोड ग-
णसेट सोनार पीरदवणे-
कर यासी देऊन त्याजपा-
सून पंधरा रुा घेतले.त्या
पो दाहा नितोरा मज-
कूर यासि दिल्हे बाकी
पांच आपण घेतले, त्यास
तो मयत जाहला सा
त्याचा लेक साहेबू या-
जपासून घेतले रुो

१० गणशेट सोनार पीरदव-
णेकर यार्णे सदरहू सांख-
ळी जोड अंतशेट सोनार
सरंदकर यासि विकत
दिल्हा आणि त्यापासून
पैका घेतला त्या पो गण-
शेटीकडे सिलक राहिले ते

१५

२९

१६४

५५४

१२५ मोकळे दागिने वाट्या दोन व कासांडी येक येकूण तीन दागिन्यांची किंमत अजमासें शंभर सवाशें रुपये होते, म्हणोन कृष्णसावंत याणें लिहून दिल्हें. त्याजवरून मनास आणून करार केले ते, गुा कृष्ण सावंत पोचरीकर.

६८९

४१० गुन्हेगारी जीवामवाफक करार केली ते रुा.

२०० गुा कृष्ण सावंत पोचरीकर.

१२५ खुद्द कृष्ण सावंत तोतया- कडे नवी सरदारी करून चाकरीस राहिले व सदरहू दागिने दरम्यानें खर्च केलें सा.

७५ अमृत सावंत बिन आत्माजी सावंत व शिव सावंत व हर सावंत पोचरीकर, यांसी सदरहू दागिने कृष्ण सावंत याणीं आले हा मजकूर समजला असतां, सरकारांत विदित न केलें.सा, त्याजकडे गुन्हेगारी दर असामीस रुा २५ प्रमाणें करार केले ते, ते सदरहू तीन असामी कृष्ण सावंत याचे चुलते भाऊ सा कृष्ण सावंत याजपासून घेतले ते.

२००

५५ बाजी सावंत बिन आत्माजी सावंत देसाई काा फुणगुस यांसी सदरहू दागिनेयाचा मजकूर समजला असोन सरकारांत विदित न केलें व येक गांठोडीपैा दागिने आपण

घेऊन खर्च केले होते सा करार केले ते.

५० देव सावंत बिन येस सावंत देसाई कसबा मजकूर यांसी सदरहू दागिनेयाचा मजकूर समजला असोन सरकारांत विदित न केलें सा ठराविले ते.

४० लखमा नितोरा याजकडील सांखळीचा जोड सोनार वगैरे यांनीं विकत घेतला होता, त्यास सांखळ्या जोड कोठील याची चौकशी न करितां घेतला व त्यापो कांहीं रुाही आपण दरम्यानें घेतले होते, त्यास रुा किमतीबाबत घेऊन दरम्यानें ठेविले होते ते नितोरा याजकडे गांठोडीचा ऐवज ठरला त्यापो मजुरा दिल्हे गुन्हेगारी घेतली ते.

१० दावजी वाघला का फुणगुस यानें सदरहू वैवाट केली त्या तो मयत जाहला सा त्याचा लेक साहेबू याजपासून घेतले रुपये १५, वजा नितोरा याजकडे ५, बाकी गुन्हेगारी.

१५ गणसेट सोनार पिरदवणेकर याजपासून घेतले २५ वजा नितोरा याजकडे मजुरा रुा १० दाहा, बाकी गुन्हेगारी.

१५ अनंतसेट सोनार सरंदकर याणें सांखळी जोड विकत घेतला त्यास जोड कोठील याची चौकशी न केली सा गुन्हेगारी रुो.

४०

२४३

२५ गोपाळशेट सोनार, मौजे हातपें ता। सौंदाळें याणें कृष्ण सावंत पोचरीकर याजपासून रुप्याचे दागिने साखळ्या व वाट्या व पंचपात्र विकत घेतलीं, त्यास सदरहू दागिने कोठील याची चौकशी करून सरकारांत विदित करावें तें न केलें सा गुन्हेगारी रु।

४० धाका कळघाटा, वा। मौजे पलचुकरी, व बुधा पालवलकर वस्ति कसबा फुणगुस हे पोचरी याचें पथकांत चाकर होते त्यास कृष्ण सावंत याणें दागिन्याच्या गांठोड्या आणून दरम्यानें ठेविल्या हें समजलें असतां सरकारांत विदित न केलें सा.

२० धाका कलघाटा, मौजे पलचुकरी.
२० बुधा पालवलकर का। फुणगुस.

४०

४१०

१०९९

९२९०

० कित्ता सरदार अनुत्पन्न भिकारी दाखल आहेत, पैसा उत्पन्न व्हावयाचा नाहीं. परंतु नवी सरदारी करून चाकर राहिले होते सबब दखलबाज लिहिले ते असामी:—

१ अंतोजी सावंत खंडेकर, मौजे झाडगांव का। नेवरें.

१ धन्याजी मान्या वाशीकर, रक्तपिती लागली आहे.

१ बाळाजी चवाण, मौजे जाबरूप, हा मयत जाहला बाइको नादार आहे.

१ राज सावंत मीरकर मयत जाहला त्याचा मूल लहान गरीब आहे.

१ दादजीराव खानविलकर मौजे खानवली खुद व लेक दोघेहि मयत जाहाले, बाइको अनुत्पन्न आहे सा.

१ आपाजीराव खानविलकर, मौजे बोनी बुा ता लांजे हे व त्याची स्त्री दोघेंही मयत जाहलीं, त्यास दोन मूल आहेत त्यापो येक थोर, सोळा–सत्रा वर्षांचा आहे, तो वेडा आहे, अंगास कापरी नेहमीं असत्ये व धाकटा पांच–सात वर्षांचा आहे, याप्रमाणें दोघेही अनुत्पन्न आहेत सा.

१ धोंडजी कुरुंद वा किले जैगड हा मयत जाहाला, बाइको अनुत्पन्न सा.

१ रामजी चवाण कुलेकर याचें नकल जाहलें.

१ दुळबाजी साळवी फणसदकर हा मयत जाहला, मुलगा लहान आहे तो सोइऱ्याचे घरीं आहे, वडामिऱ्या येथें आहे सा.

१ सोन साळवी फणसेकर मयत जाहला, बाइको व मुलें परागंदा जाहलीं, त्याचा कुणबावा बापूजीजी नलवडे याजकडे आहे, त्याणें त्याचा मुलगा हाजीर केला होता, परंतु लहान आणि नादार सा.

१ विठोजी कदम, मौजे कणगोली, हा मयत जाहला, पोटीं पोर नाहीं, बाइको नादार सा.

१ रायाजी बोरकर सोमेश्वरकर दाभोळेस होता, तिकडे मयत जाहला, पोटीं संतान नाहीं.

१ बावाजी नागवेकर, मौजे टेंब्यें याचा, तोतया मोडल्यावर, हात कासला. हालीं परागंदा आहे.

१ चिमाजी पवार तिवरेकर मयत जाहला, नकल जाहलें.

१ भिकाजीराव इंदूलकर, मौजे दाभोळें, रक्तपिती लागली सबब श्रीत्रिंबकेश्वरास जाऊन राहिला आहे. बाइकोमुलें घरीं आहेत, ती केवळ नादार सा.

१५

० धोंडजी सुर्वे हा पेशजी तालुके मजकुरीं चाकर होता. त्याणें तोतयाचे वेळेस नवे लोक बरोबर घेऊन चाकरीस राहिला होता. त्यास, वरकड सरदारांपासून गुन्हेगारी जीवमवाफक घेतली, त्याजप्रमाणें याजपासून घ्यावयाची. परंतु, धोंडजी सुर्वे याजपासून तोतयाकडे गेला होता, सबब गुन्हेगारी घ्यावयाची, त्यास सुर्वेमजकूर सरकार–उपयोगी माणूस

आहे आणि जातवान, याजकरितां गुन्हेगारी माफ केली असे.

·।· फाजील वसूलमुळें जाहले ते.

८०॥।· बाळ सावंत राम सावंत मीरकर.

८॥।· येसाजी नलवडे.

८॥· सुरसावंत जोग सावंत

·।·

१२९०।·

पत्रांक ३०८ श्री. १७११ वैशाख शुद्ध १

सेवेसी रघुनाथ हरी कृतानेक सा। नमस्कार विनंती येथील कुशल ता। वैशाख शु॥ १ पावेतों स्वामीच्या कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. सांप्रत, कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी पत्र लिहावयाची आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान सालमलकुरीं आफत पडली, त्यांत माघमासीं गारा पडल्या, तेणेंकरून कांहींच आस्त राहिली नाहीं. गोसावी चाकर आहेत, यांची तनखा चढली आहे. पैशास ठिकाण नाहीं. यामुळें दूर करावयाचा विचार योजिला. तों दतियेकरांनीं गोसावी दूर होतात हें समजोन गीर्द झासी येथील मौजे भागोरगांव मारिला, माणसें जखमी केलीं, घरें जाळलीं, गुरें वगैरे लुटून नेलीं, आणि आणखी उपद्रव करावयाच्या उद्योगास लागले. जमा जाला सा। गोसावी मागती ठेवणें प्राप्त जालें. गोसावी यांस दरमहा रोजमरा पाहिजे. पैशास ठिकाण नाहीं. पैसा पेंच पडला आहे. रबींत अगदींच ठिकाण राहिलें नाहीं. मवास भारी याचें पारपत्य होतें तरी पैसा मिळता व सरकारची जागा सुटती. परंतु तो योग घडत नाहीं. मवासाचें दैव बलवत्तर यामुळें सरदारांस इच्छा होत नाहीं. आल्या दिवसापासून सरदारांस विनंति करितों. सांप्रत राजश्री आलिबहादर आले आहेत. त्यांजकडे विनंति करावयास कारकून पाठविले आहेत. ऐशास कृपा करून पाटीलबावास व अलिबहादर यांस ताकीदपत्रें पाठवावयाची आज्ञा करावी. मेहनेत विनंति करून पाहों. वरकड सरदारांकडील वर्तमान उभयतां सरदार मथुरेस आहेत. फौजा पुढें रवाना केल्या. मुलतानाकडे जाण्याचा मनसब आहे. घडेल तें पहावें. गुलामकादर याणें दिल्लींत बेकैद बहुत केली. त्याचे पारपत्यास आलीबहादर दिल्लीस गेले, तों गुलामकादर तेथून पळोन जाऊं लागला. त्याच्यामागें जाऊन, त्यास हस्तगत करून, मथुरेस आणून, शरीर छिन्नभिन्न करून, मारून टाकिला. मोटामल्ल ज्याच्या विद्यमानें ग्वालेर सुटली होती, तोही फितुरांत आढळला. ह्मणून त्यासही मारून टाकिलें.

सांप्रत त्या प्रांतीं स्वस्थ आहे. वरकड सविस्तर राजश्री बाजी जगन्नाथ व अंताजी विश्वनाथ यांस लिहिलें आहे. सेवेसी श्रुत करितील. बहुत काय लिहिणें? कृपा लोभ कीजे हे विनंति.

पत्रांक ३०९ श्री १७११ श्रावण वद्य २

सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १ जिलकाद गुरुवार प्रहर दिवस पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री अलिबाहार बाबाकडून सरकारच्या लखोट्याची थैली मेणकापडी एक आली. येतांच डाकेबराबर सेवेसी रवानगी केली असे. थैली पोंहचल्यानंतरी सरकारचे लखोटे जे असतील ते सबनीस हुजूर प्रविष्ट करतील. मारवाडांत राज्याचे घरीं फितोर व सांप्रत वाटाडे सिकस्त जाले. ह्मणोन राजश्री बाबाच्या फौजा मारवाडांत गेल्या. जैपूरवालाहि सरंजाम सिद्ध करीत आहे. याप्रो जैपूराहून पत्रें आलीं त्यावरून विनविलें असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३१० श्री १७११ श्रावण वद्य ७

पो छ २३ जिल्काद सन तिसैन श्रावण.

सेवेसी केसो महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता। छ २१ जिल्काद परियेंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, रा। काकोबा वैद्य कोपरगांवीं पाठविले आहेत. त्यास काल दोनप्रहरीं पावले. श्रीमंत बाबासाहेब यांजला उतार पडला आहे. ओषधही घेत असतात. व श्रीमंत आपासाहेब यांचा मळेयांतून येत समईं खाचेंत पाय गेला. तों लचक पोटांत बसली आहे. दुखतो. श्रीमंतास चांगला उतार पडत आला आहे. पेठ येवलें येथें सरकारचा जकातीचा अंमल व साइराचा आहे. त्यास होळकराकडील तुळाजी तावरा, पागा होळकराकडील घेऊन आले आहेत, त्यास पेठेंत कटकट होऊन लढाईचा प्रसंग मांडिला आहे. गांवांतलि उदमी सावकार गांवांतून जाणार. मोकासीही सिबंदी ठेवीत आहेत. त्यास, पेशजीं करारमदार पुणियांतच होऊन आला असतां, आतां तुळाजी तावरे यांणी पागा व शिबंदी आणून सरकारचा अमल उठवावा असें आहे. त्यास, मामलेदारही सिबंदी ठेऊन कजिया करतील. परंतु, येथें सरकारची फौज असतां, लढाईचा प्रसंग नसावा. याजकरितां सेवेसी वर्तमान लिहिलें असे. मामलेदाराची कुमक करावयाची आज्ञा जाहलियास, आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीन. मध्येंच करावें, तरी आज्ञा नाहीं. याजकरितां सेवेसी विनंतिपत्र पाठविलें असे. तरी, स्वामींनीं आज्ञा करून

पाठविलेंयासी आज्ञेप्रमाणें करितों. त्यांनीं निकडच केली तरी येथूनही कांहीं देतो. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३११ श्री १७११ आश्विन शुद्ध ४

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक बाळाजी महादेव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २ मोहरमपर्यंत स्वामीचें कृपावलोकनें तालुके सिवनेरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. सरकारचे आज्ञापत्र छ २४ जिलकादचें छ १ मोहरमी सादर जालें. तेथें आज्ञा कीं, हणमंता बिन चापाजी पाटील टिलेकर मोकदम मौजे कुलसेत तर्फ हवेली प्रांत जुनर यानें हुजूर विदित केलें कीं, मौजे मजकुरीं पाटिलकीचीं सेतें माझीं आहेत त्यास, रघु डोक्या व संतु डोक्या व त्रिंबक डोक्या, मौजे मजकूर, हे तिघे जण आपलीं सेतें असें बोलून आपल्यासीं कज्या करून सेतास खलेल करितात व मौजे मजकुरीं आपली जागा आहे त्या जाग्यावर डोके घर बांधूं लागले. ते समई त्यास ह्वाही दिल्ही असतां जबरदस्तीनें माझे जाग्यावर घर बांधिलें. याजकरितां डोके यास हुजुर आणून मनास आणावयाची आज्ञा जाली पाहिजे. ह्मणोन, त्याजवरून, हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी येविसीचें वर्तमान मनास आणावें लागतें. सबब, डोके तीन असामी हुजूर आणविले आहेत. त्यास व तुह्मी आपले कडील कारकून माहीतगार व बाजी कानदेव यांसी हुजुर पाठवून देणें. ह्मणोन त्याजवरून डोके असामी तीन यासी पाठविले आहेत. परंतु हणमंता पाटील याजपासीं डोके घरठाणेयाचा व सेताचा कजिया सांगतात. त्यास, हरदूजणाचें वर्तमान मनास आणून फडशा करावयासी जमीदार व भोवरगांवचे गोत असावे. ते मौजे मजकुरीं जाऊन सेतें व घरठाणा पाहून फडशा करितील. यास्तव, हणमंता पाटील यासी आज्ञा होऊन मजकडे आला ह्मणजे जमीनदार व भोवरगांवचे गोत जमा करून, त्यांचे विचारें ठरेल त्याप्रमाणें फडशा पाडीन. वरकड, डोक्यांस तिही असामी मिळोन तीस रुपये मसाला जाला आहे. त्यास कुळंब्यावर तिही सालाची आफ्ती पडली, याजमुळें अन्न खावयासी नाहीं. उपासी मरतात. ढालाईतांनीं बहुत निकड केली. परंतु त्याजपासीं पैसा निर्माण न होये. तेव्हां तीस रुपयें मी दिल्हे आहेत. त्यास, मसाला माफ होऊन ढालाईतांनीं सदहू तीस रुपये घेतले आहेत ते माघारे द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. तुलमसेत हा गांव स्वामीनीं कृपाळू होऊन मजला इनाम करून दिल्हा आहे. परंतु टिळेकराचा काच रात्रंदिवस सोसवत नाहीं. येविसीची विनंति पूर्वी स्वामीपासीं

समक्ष केली आहे. वरकड, मौजेमजकुरीं एक मूल डोकेयाचें. तेथील पाटीलकी वगैरे अधिकार त्याचे होते. परंतु प्रसंगानुरूप पाटीलकी मोंगलांनीं घेतली आणि त्यांणी सरकारांत दिल्ही. याचा पाल्हाळ पाहतां बहुतच आहे, तो पत्रीं कोठवर ल्याहावा ? प्रस्तुत, टिळेकर* सरकारचा खिजमतगार ममतेचा. त्याजपासीं या कुळंब्यांनीं भांडोन परिणाम लागणें, हें समजलेंच आहे. यास्तव, हणमंता टिळेकरास मीही येथून आणायवासी पाठविलें आहे. तो स्वामीची आज्ञा घ्यावयासीं येईल. त्यास आज्ञा होऊन, येथें येई तें करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ३१२ श्री १७३३ माघ वद्य ८

आज स्वारी राजश्री त्रिंबकजी पाटील डेंगळे ता। वाटेदार नि॥ वो राजश्री सिद्धेश्वर दीक्षित ठकार, जमीन मौजे कोंढीय, प्रांत कराड, सुईसन्ने अशर मयातैन व अलफ. ठकार याचे वसुला ऐवजीं रुपये १५ पंधरा वो राजश्री शिवराम दीक्षित ठकार यास खेडचे मुबादला द्यावयाबद्दल देखत रोखा घेऊन सातारा येणें. या कामास लोक दिमत हुजरात पा।, यांस मसाला रुो १ येक आदा करणें जाणिजे. छ २१ मोहरम.

बार

(मोर्तब सुद.)

पत्रांक ३१३ श्री १७३३

यादी ४८३०० रुो

पौ वजाः रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांजकडेस सन तिसातिसैनापासून अमल होता. ते समई वहिवाटीस आकार जाला नसतां बेरजा लाऊन भरती केली. त्या बेरजेचा महाल अगर इतलाख ऐवज घ्यावयाचा. त्याचें कलम फडशा होण्याकरितां आलाहिदा लि॥. ते रु॥ १९८५४॥।≈॥. बाकी सरकारअन्वयाचे आकाराची बेरीज दरसाल रु २८४४५८–॥. पो सन इसन्नेअशरमयातैनांत भरसालचा आकार जाला म्हणोन........बाबूराव

---

* हा जोत्याजी टिळेकराचा मुलगा.

यांणीं समजाविलें. ती बेरीज २९६६९. पौ वजा वहिवाटीस खर्च लिा आहे त्या प्रों १८९०३ रुा बाकी ९६७७॥-।.

ता
बाा गुाा
रसद
खासगी

पौ सालमजकुरीं माहालीं पेंढरीयांचा वगैरे दंगा जाला, म्हणोन समजाविलें. साा वजा रुा तकुब. हुंडणावळ महालीं दंगा वगैरे साा.

पत्रांक ३१४ श्री.

अजम फ्रान्सिस्क आंतोन दावीयोग काबराल गोवर्णदोर कपतान जनराल रुस्तुमुल्मुल्क सरफराजुद्दौले मुस्तकीम जंग बहादूर बंदर गोवा दाम-मोहोबतहू:—

शाहामत आवाली—मर्तबत व हशमत—मंजलत मवाकत दस्तगाहा—एतजादा दोस्तां आजज्यानीव दौलतराव शिंदे सलाम आंकीं: येथील खैरखुषी जाणोन आपली खैरखुषी कलमी करीत जावी. दीगर: तुह्मीं पत्र पाठविलें तें मेजर फिलोस यांचे मार्फातीनें पालखी व किताब—मरातब वगैरे बादशाही वस्त्रांसुद्धां कृपा करून पाठविलें तें पावोन परम संतोष पावलों, म्हणोन लिहिलें तें कळलें. मेजर—मजकूर यांस कितावत करून पाठविली तीहि ध्यानास आली. खाजगत सरकारांत बंदुका—चकमकी, फिरंगी—विलायतीची दरकार आहे. यास्तव, तुमचे येथें विलायतेहून आल्या असतील त्या पाठविणें. हजार बंदुका, चांगली कीळ—कांटा—तोखतान—सुद्धां, तयार करवून, चौल—बंदर येथें पाठवून द्यावा. त्याची किंमत सर्व सरंजामासुद्धा होईल त्याचा आकार व चौलपर्यंतचा खर्च लिहून पाठवावा. त्याप्रमाणें ऐवज येथून मिंगेल खलीमसोज फिरंगी ममई-कर याचें विद्यमानें पावता होईल. वरकड मजकूर मिंगेल—सोज लिहितील त्याजवरून कळेल.

पत्रांक ३१५ श्री लक्ष्मीकांत १७३६ वैशाख शुद्ध १५

पुा राजश्री नारायेणराव वैद्य गोसावी यांसी:—

दंडवत विनंती उपरी. कारभारी इकडील विशीं फारच कळमळ ठेऊन आहेत. त्यास, त्यांचा येथून संतोष करावा, हें मनांत आहे. त्यास, ही दौलत त्यांणीं आपली मोजावी आणि ज्यावेळेस जसा त्याचा इशारा येत जाईल

त्याच रीतीनें येथूनहि करण्यांत येईल, हेंच पाहणें येथील आहे. यांत गुंता नाहीं, ही खातरजमा त्यांणीं आपली पक्की ठेऊन, जितकें उचित व चांगलें तितकें या दौलतीविर्सी जातीनें पाहत जावें. येविसींचे मजकुराची आज्ञा राजश्री नारायेण येशवंत यांसीं केली आहे. ते तुह्मांस लिहितलि. त्याजवरून कळेल. रा छ ४ माहे जमादिलावल. हे विनंती. मोर्तब सुद.

पो। छ १३ जावल, सन अर्पा अशर, शके १७३६ वैशाखमास. मु॥ पुणें.

पत्रांक ३१६ श्री १७३६ आश्विन शुद्ध १

राजश्री नारायेणराव गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री॥ रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें. विशेष. दारकूजीनाईक गायकवाड यांणीं सरकारांत विनंती केली कीं, मौजे पिंपळगांव सराई, पा। देउळघांट, व मौजे आनंद, पा। जाफराबाज, व मौजे रुईखेड, पा। चांडोल, हे तीन्ही गांव माझे पाटीलकीचे आहेत. या गांवांपैकीं, देउळघाट व जाफराबाद या दोहों माहालांची वांटणी गांवगन्ना जागीरदार मोकासदार, सरदेशमुख बाबते वगैरेची जाली. त्या वांटणींत दों माहालचे गांव जागीरदारांचे हिशांत लागले. एक रुइखेड, मात्र, सामलांतींत आहे. त्यास, हरदो गांवास जागीरदारांचा मनस्वी उपसर्ग लागतो. कौल एके रीतीनें द्यावा आणि वर्तणूक मनास येईल तैसी करावी ! या चालीचे पोटांत रयेतीचे व आमचे घरांत वसीयेत राहिली नाहीं. रुईखेड तो जुमल्यांत ! तेव्हां तेथें सर्वत्रांचाच उपसर्ग होतो. याजमुळें नांदणूक न होतां, गांव खराबींत आले आहेत. वृत्तीचा विशय, तेव्हां गांवचा बंदोबस्त असावा, यास्तव हे तीन्ही गांव मल्हार रेणूराव यांचे चिरंजीवानीं राजश्री राणे गोविंदबक्ष यासीं बोलून गांवचा इस्तावा सात सालां करून, करार करावा आणि बंदोबस्त करून घ्यावा. बलकी, आपले आंगीं लाऊन घेतल्यासारखें करावें, ऐसें जाल्यास गांव आबादीस येऊन वसायेत होईल व जागीरदाराचा वगैरे उपसर्ग लागणार नाहीं. इस्ताव्याप्रमाणें सरभरा आह्मी त्याची करूं. कारण, घांटमाथां अंमल राजश्री पंतप्रधान यांजकडील. तेव्हां मल्हार रेणूराव यांचे चिरंजीवास राजश्री सदाशीवपंतभाऊ यांणीं सांगितलें असतां, तेहि करून घेतील, ऐसें नाईकमजकुरांनीं योजिलें आहे. याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे. व येविसींचा तपसिल राजश्री सदाशीव बापूजी व गंग्या तूपकर यांसीं लिहिला आहे. त्याप्रमाणें ते तुह्मांस समजावितील. तो समजून घ्यावा. व भाऊंसही पत्र लिहिलें आहे तेहि पावतें करून, उभयतांचे सांगितल्याप्रमाणें तुह्मींहि बोलून, ज्यांत यांचे गांवचा बंदोबस्त घडे तें करावें. नाईकमजकूर यांचें अगत्य सर-

कारांत किती, हें तुह्मांसहि माहीत व या करण्यांनीं यांचे गावचा बंदोबस्त होत आहे व कांहीं कोण्हाचे आंगावरहि बाबत पडत नाहीं. ज्याचा पैसा तोच देत आहे हें समजोन, तुह्मीं राजश्री सदाशीवपंतभाऊ याजकडून मल्हार रेणूराव यांचें चिरंजीवास सांगऊन, सदरहू लिहिल्याप्रमाणें यांचे गांवचा बंदोबस्त करून देवावा. रा छ ११ माहे रमजान *दारकूजीची अगत्या येथें. तेव्हां राजश्री भाऊंस अगत्य सहाजच आहे, व नुकसानीचीहि गोष्ट नाहीं, व तेथील केल्यानीं हा बंदोबस्त घडेल, ऐसें समजोन लिहिलें आहे. तर लिहिल्या प्रो चित्त पुरवून, बंदोबस्त जरूर करून घ्यावा. बहुत काये लिहिणें. हे विनंती. मोर्तबसुद. पो छ २९ सवाल, आश्वीन शुद्ध १ भृगुवार, शके १७३६

पत्रांक ३१७. श्री (नकल.) १७३७–३८.

यापूर्वीं तहनामा शराकत व मवाफिकत तरफैनचा मुकरर व्हावा ऐसें जरनेल गोरनर लाटसाहेब बाहादर यांहांचे अंतःकर्णांत होतें. परंतु राजेसाहेबांचे खातरेस बिलकूल मंजूर न पडला. याजकरितां बंदोबस्ताची तजवीज दुसरी कीं त्यांत फायदा तहनाम्याचा सरकार इंग्रज बाहादूरांचा मोहेसर होय हें लाजीम जालें. त्यास, नवाबवजीर महमदखान भोपाळवाले यांचे Khvahishi ख्वाहिसी दरखास्तीप्रमाणें लाटसाहेबांचे हुजुरांत या दिवसांत कबूल पडून खानमजकूर सरकार कुंपनीचे बसालती सिलसिल्यांत दाखल जाला आहे. त्यास, राजेसाहेबांनीं महाराज दवलतराव शिंदे बाहादूर यांचे शरातीनें आपली फौज तैनात केली आहे कीं, मुलुक भुपाळचा आपले कबज्यांत अणावा. परंतु मुनासिब आहे जे, आपले सरदारांस या इराद्यापासून मना करावें. हा अर्थ लाटसाहेबाचे हुकुमाप्रमाणें श्रीमंत माहाराजांचे खिजमतेंत अर्ज करितों. व मुखलिसानें या दिवसांत लाटसाहेबबाहादुराकडून दोस्तीचे मरातीब दोनतीन वेळां राजेसाहेबांचे सरकारांत जाहीर करण्यांत आणिलें आहे. याजकरितां सांप्रत करणें जरूर न होतें कीं, नव्या शिरत्यानें पुन्हां बोलणियास मूळ दिसलें. परंतु लाट साहेबास अंदेशाची जागा आहे कीं, शायद गरजगो मनुष्याचे सांगण्यावर शुबाह व वसवास राजे साहेबांचे अंतःकर्णांत प्राप्त होईल. या सबब तैशा मणुशाची जुबान बांधली जावी कीं, ते मानसें बिलकुल राजेसाहेबाचे सरकारचे खैरख्वा नाहींत, बलके लटकें बोलून विच्छितात कीं, सरकारचे कामाचे बेहबुदीत खलेल आदां न व्हावे. या सबब लाटसाहेबास मुनासब दिसलें कीं, मुखालिसांचे नांवानें या बेबारतीचा खासदस्तुरानें इनायतनामा लिहिला. त्यास त्या मजमुनाची अक्षरशा अर्ज करितों. लाट साहेब

---

* येथून मजकूर खुद्द खाशांच्या हातचा.

बाहादुरानें तमाम बजिदगीनें लिहिलें आहे कीं, राजेसाहेबांचे खिजमतींत अर्ज करावा तें इकडील चित्तांत. शिवाय दोस्ती राजेसाहेबांचे सरकारांत. दुसरा खियाल नाहीं व न जाला. व राजेसाहेबांचे मुमसानांचे खांदा इच्छित नाहीं. बलके, खातरा चित्तांत हमेशा आमचे ऐसे होते कीं, राजेसाहेबांची रियासत दुसरियाचे रियासतीनें निसबतीपेक्षां बावकर व सरसबाज व मजबूत राहावी. ज्या वेळेपासून राजेसाहेबाचे नारजावंदीचा सबब दर मोकदम करार पावणें सिलसिला शराकत मवाफिकत दोस्ती इंग्रेज बाहादुराचें सरकारासीं, तेव्हां आह्मांस उचित जालें जे नवी मसल्हत धुंडावी. आपसोस केली कीं, शायद या मसल्हतीनें राजेसाहेबांचे मर्जीस गिरानी येईल तर हकीम आहे कीं, निसबत सरकार मवासुफ फायेदा जाहीर होत आहे. याजकरितां यांस खातर राजेसाहेबांची मंजूर येऊन, या मसल्हतीची पैरवीस ढील टाकिली होती. परंतु सबब चंददरचंद मुसकिलीचें जालें आहे. प्रसंगास राजेसाहेबांनीं आमचे चित्तांतील मरातीब मंजुर न फर्माविलें. तेव्हां आह्मांसही तैसेंच जालें कीं, बलके दोस्तीचे मुर्बीचे लवाजम्यानीं उचित व वाजवी होतें कीं, मजबुती व बंदोबस्त सरकारकुंपनीइंग्रेजबाहादुरांची आवघ्या गोष्टींवर अधिक जाणून, त्या रस्त्याची कोशीस ठेवावी. अस्तु. जे दोस्ती राजे साहेबांचे सरकारची आमचे सरकारास जैसी आहे तैसीच आहे. यापरता दुसरा खियाल समजूं नये. हरयेक प्रकारें आह्मीं इच्छितों जे, दोस्तीचे व स्नेहाचे सिलसिल्यांनीं तमाम सरदार हिंद व दक्षणचे आपले कूदरतीचे हुकुमाप्रमाणें मजबूत असोन, बलकी दिवसों दिवस विशेशात्कार घडावा. याजकरितां हेंहि आहे जे, नजरसूद बेहबूद उमुराद सरकारइंग्रेजबाहादुरांचे जे जरूर पडेल त्यास ढील करितां येत नाहीं. व दरबाब मुकरर करणें शिरस्ते हिफाजत मुलूक सरकारइंग्रेजबाहादुरांचे प्राप्त जाले, त्यास महकूप करणें होऊं सकत नाहीं. याजकरितां जो नक्षा सदरीं लिहिला गेला यांतच फायदा लक्षांत आला. याविरहित लाटसाहेबांचे चित्तांत दुसरें आणीक कांहीं नाहीं. जेव्हां राजेसाहेब गौर फर्मावितील कीं, बायेसना किंवा ऐसें नारजावंदी? रजावंदी आमचे दरबाब करार पावणें. नक्षा शराकत व हिफाजत दौहि दौलतीची कीं बहुतवेळां ख्यायेश आंग्रजाचे सरकारांतून जाली होती. करार पावणें या बंदोबस्ताची बहूत दिवसांपासून लाजिम होती. परंतु यांस खातर खुद व दौलतचे तहामुनवत व वकूफ राहिला होता. येकीन, जाणतील कीं लाटसाहेबांसीं सिर्फ नाइकजीचे हे मसल्हत कबूल केली. तहकीक आहे जे, आंग्रेजीं जमियत भोपाळचे जिल्ह्यांत राहिल्यानें पेंढारी यांचे खारीज होणें या मुलखांतून व हिफाजत मुलूख राजेसाहेबांची बेखलश होईल व राजेसाहेबांचे सरकारांत बहुत फायेदा मालुम होत आहे. आंग्रेजांचे बाह्यात्कार राजेसाहेबांचा इरादा भोपाळचे मुलकावर होता, तो या नक्षामुळें हरकतीस पावला,

त्यास, सरकार आंग्रेजांस या सबबाची लाचारी असे. त्यास राजेसाहेबांनीं येकिन समजावें कीं, लाटसाहिब बेशक तरकीचे च्याहणार या रियासतीचे व दवलतीचे आहेत. बाकी, राजेसाहेबांस याचा तपसील दरयाफ्त करावयाचा व जबाब देणें यांचें जें मंजूर असेल त्यासीं ज्या वेळेस हुकूम होईल त्या वेळेस हजर होईन व मुखलिसानें या मोकदम्याचा जबाब काय ल्याहावा हें उत्तर जलद व्हावें.

पत्रांक ३१८ श्रीलक्ष्मीकांत. १७३७ आश्विन शुद्ध ६

पो छ ४ जिल्काद, आश्वीन शुद्ध ६ शके १७३७ मुा पुणें सुा सीत अशर.

राजश्री नारायेणराव वैद्य गोसावी यांसी:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. त्यास, त्याचीं उत्तरेंहि पूर्वीं पाठविलींच आहेत. तीं पोहचून मजकूर समजलाच असेल. रांगडा ब्राह्मण याजबराबर तुह्मीं चिरंजीव राजश्री बाबा याजकरितां आंगारा पाठविला तो पोंहोचून, तुमच्या लिहिल्याप्रमाणें चिरंजीवास आंगारा लाऊन त्याचा गुण कसा काये तोहि पाहण्यांत आला. हा सारा तपशील ब्राह्मणाचे समक्षच जाला आहे. व सांप्रत तोच ब्राह्मण माघारें आला आहे. जबानीं तुम्हांस सविस्तर सांगेल, त्याजवरून कळेल. रा छ ५ माहे शवाल. * बहुत काय लिहिणें ! हे विनंती. मोर्तबसूद.

पत्रांक ३१९ श्रीलक्ष्मीकांत. १७३८ ज्येष्ठ वद्य ७

राजश्री नारायेणराव वैद्य गोसावी यांसीं:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें. राजश्री सुभेदार–नाईक–निंबाळकर हे सरकारचे पदरीं आहेत व यांचा अगत्यवाद ज्यापक्षीं येथें आहेत त्यापक्षीं तुम्हांसहि जरूरच आहे. त्यास, यांचे चुलते राजश्री आपाजी नाईक निंबाळकर हे राजश्री पंतसचीव यांचे खटल्या-

---

* खाशाचें हस्ताक्षर.

मुळें तेथें अटकेंत आहेत. व येविशीं पेशजीं तुम्हांस तपसीलवार लिहिण्यांत * आलेंच.

पो छ २० रजब जेष्ठमास.

पत्रांक ३२० श्री. १७४२

हकिकत जंजीरे मुंबईन्युसपीपर छापून आले. त्यांतील हासील मजकूर. सन १८२१ इसवी या सालांत दक्षणेंत कोणीही शककर्ता उत्पन्न होईल. तो सन ३० पर्यंत गुत्प राहील. सन १८३१ चे सालापासून किंचित् प्रगट होत जाईल. तो सन १८३३ पासून प्रकट होऊन राज्य करूं लागेल. हिंदुस्तानप्रांतीं चांभार यांचे जातींत एक शककर्ता पैदा होईल. तो हिदुस्तानचें राज्य सात दिवस करील. त्याचा पराभव सन १८२१ चे सालीं शक करिता दक्षिणेंत जाहला आहे, तो चांभार याचे जातींत जाहला आहे, त्याचें पारिपत्य करून वलयांकित पृथ्वीचें राज्य यथान्यायानें करून करील. त्यास मंत्री तिघे होतील. त्यांचीं नांवें, दुर्जितासिंग व हिराशेट पारसी व फकीर महंमद ऐसे मिळोन, इंग्रजास कैद करून, राज्यकारभार चालवितील. हिराशेट पारसी शककरिता याजजवळ जाऊन, रदबदली करून, 'इंग्रजास मुक्त बंदनांतून करील. सन ३३ सांपासून कुंपिणी सरकारचा अंमल चालणार नाहीं. सन ३७ चे सालीं ज्यलमार्गीं च्याळीस हजार फौज माहीम जिल्हे मुंबईस येऊन मातबर लढाई करून, मुंबई ठाणें घेऊन, गाढवाचा नांगर फिरवितील ! तेथील अंमल शककरिता याचे स्वाधीन करून मुंबई घेईल. तो चाकर होऊन राहील. पुढें चाळीसांचे सालीं दुष्काल पडेल. हें वर्तमान लिहिलें कशावरून ह्मणाल तर, रूमचे पाछाय यांजवळ कोणी रमलवाला आहे. त्यांणीं भविष्य पूर्वी लिहित गेला तें खरें होत आहे. हालीं त्याणें लिहिल्यावरून छापिलें आहे. श्रीनारायण प्रा.

पत्रांक ३२१ श्री. १७४५

यादी महिपतराव कृष्ण साठे व यशवंतराव परशुराम परांजपे सुा अर्बा अशरीन मया तैन व अलफ. कारणें अर्जी लिहिली ऐसीजे. कैलासवासी श्रीमंत बाळाजी विश्वनाथ यांणीं आमचे आजे पणजे यांस पुण्यास आणून व तैनात सालीना रु० दाहा हजार करून मामले वगैरे कामकाज सवाईमाधवराव साहेब यांचे कारकिर्दी पावेतों हरएकाविसी चालवीत गेले. व वडि-

---

* पुढें पत्र फाटून गेलें आहे.

लांचे कारकिर्दींत राजे रजवाडे व सरंजामी व सरकार पेशवे यांजकडे ऐवज येणें व लोकांचीं देणीं शके १७१७ पावेतों होत आलीं. नंतर श्रीमंत बाजीराव साहेब पुण्यास येऊन कारभार राज्याचा करूं लागले. त्यांणीं आह्मांसी वांकडें मनांत ठेविलें कीं सवाई माधवराव यांचे आप्त यांचें नीट नसावें. ह्मणोन आमचा सावकारी व्येव्हार दरोबस्त बुडाला व तैनात सुद्धां बंद केली. व कामकाजें काहाढलीं. यामुळें दरोबस्त आमची खराबी जाहाली. वस्तीस सुखवस्तु राहिलों. त्यांत होळकरानें खंड घेतला. ते समई दरोबस्त गेलें. आणि पंचवीस वर्षे बे रोजगार. उभयतां कोण्ही पुस्तपना राखी असा नाहीं. तशांत कुंपनी सरकारांतूनही सर्वांस सरंजाम व कोणास पगार व कोण्हास इनाम चालविलें. आणि आपली अनास्था केली. एक गांव करवीरकरांकडून इनाम तो चालविण्याविशीं पांच वर्षे साहेबांचे कानावर घातलें. चकत्याही हुबळी धारवाडास दिल्ह्या. परंतु अद्यापि गांव पदरीं पडत नाहीं ! आणि हाल्लीं आह्मांवर सावकार फिर्याद देऊन अर्ज्या देतात. त्यांसीं जाबसल करावयास कोण्ही कारकूनही जवळ राहिला नाहीं व देणें ज्याचें ते आबरु ठेवित नाहींत. या करितां साहेबीं मेहेरबान होऊन आह्मीं निराश्रित, आह्मांस सावकाराचें देणें याविसीं तोशिस न लागे आबरु राहोन साहेबाचे वस्तीस कांहीं दिवस काळ कंठे असें जालें पाहिजे. दुसरे कोठें जावें तरी ठिकाणाही नाहीं. व जवळ अर्थ कोण्हे विसींच राहिला नाहीं.

पत्रांक ३२२ ॥ श्री ॥ १७५१ भाद्रपद शुद्ध १

रुजू

हकायत–आगाहा–मारिफत–दस्तगाहा श्रीधरणीधरबावा देव संस्थान चिंचवड सलमुलाहुताला:—

छ आजी–सौब मेजर–जनरल सरज्यान मालकम साहेब–बाहाद्दूर गवरनर बादज–सलाम खैरयत–अंजाम आंकेः येथील खैरसला जाणोन, आपली शादमानी हमेशा कलमी करीत असिलें पाहिजे. दरींविला, आ–साहेबीं सरकारांत याद कलमी केली त्यांतील हासील कीं, संस्थानचे कामांत मामलेदार फिर्यादी मनास आणितात त्या आणूं नये येविशीं हुकूम व्हावा. ह्मणोन, त्यास, येविसीं मेहेरबा कलकटर–साहेब यास जाहीर केलें पाहिजे. ता ३० माहे आगोस्त, सन १८२९ इसवी. ज्यादा काय लिहिणें ? प्यार कीजे. हे किताबत.

N. M. Malcolm.

पत्रांक ३२३ ॥ श्री ॥ १७५२ आश्विन शुद्ध १४

रुजू

इकायक अगाह: मारीफत दस्तगाहा श्रीधरणीधरबावा देव, संस्थान चिंचवड, सलामत:—

छ आजी सौब मेजर जनरल सरज्यान मालकम साहेब-बहादून गौरनर बादज सलाम खैरीयत अंज्याम आं कीं:—येथील खैर सला जाणोन आपली शादमानी हमेशा कलमी करीत असावी. दरीविला आं-साहेबानीं, संस्थानचे इलाख्याचे गांवावर दिवाणी कामा बा अर्ज्या होतात, त्यास संस्थानाकडे घेण्याविसीं सनद देविली पाहिजे. म्हणोन कलमी केलें. ऐशास, आं-साहेबानीं पत्रांत लिहिलेले मजकुराविसीं सरकारांतून बंदोबस्त होत आहे. मालूम होय. ता। १ आगटंबर सन १८३० इसवी. जादा काय लिहिणें? प्यार कीजे. हे कितावत.

N. M. Malcolm

पत्रांक ३२४ श्रीगुरुसमर्थ १७५५ श्रावण वद्य ९

पा। छ २७ रबिलावल,
सन अर्बा सलासीन.

श्रीमंत राजश्री नाना-
साहेब साहेबांचे सेवेसी:—

आज्ञाधारक रमाबाई देसाई नाडगौडा पा। गोकाक दंडवत विनंती विज्ञापना ता। छ२३ माहे रबिलावल पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. हणमंता काळे याजबरोबर आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. धर्महाटीकर यांचे फैसल व्हावें लागतें, व दत्तक प्रकरणीं बोलोन ठरला पाहिजे, त्याजकरितां चिंचणसि येणेंविषयीं आज्ञा. त्यास, एविशीं पेशजीं राजश्री उडपी रामचंद्र याजबरोबर विनंनिपत्र देऊन पाठविलें होतें. मसार निल्हेनें आपणास विनंति केलेच आहे. मी समक्ष येऊन; विनंति करावी, असें काय आहे ? मशारनिल्हे जे विनंति करतील तें माझें आहे. तत्राप चरणासंनिध येण्यास आलश नाहीं. परंतु, तूर्त शरीरीं नीट नाहीं. थंडीवाऱ्यान प्रकृत बिघडेल. त्यास उडपीराव रामचंद्र यास इकडील मजकूर सांगून, विनंतिपत्र देऊन, पाठवितों. चरणास विनंति करतील. मनन करून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. इकडील जाबसालाविशीं मी याव असा भाव नाहीं. चेरणदर्शनाची इच्छा आहे. फुरसोतिन येईन. सारावश, आज्ञा बाहीर मी नाहीं. पाऊस गेल्यामुळ बखेडा माझी फार आहे. सर्वप्रकारें सांभाळ करणार स्वामी समर्थ आहां. मी विशेष लिहिणेस शक्त नाहीं. ममदापूर काम-

याविशीं आलाहिदा विनंतीपत्र लिहिलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. मशारनिल्हे स्वामीकडे येऊन विनंति करितील, ते मनन होऊन जे आज्ञा होणें ते व्हावी. तूर्त कामती वगैरेस हरएक विशीं उपद्रव होऊं नये, या प्रमाणें हुजरेयांस ताकीदपत्र देणेंविसीं आज्ञा व्हावी. *सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ३२५ श्री. (नकल) १७५९ आषाढ शुद्ध ९

हरीभक्तपरायण राजश्री विष्णुबावा संस्थान धावडशी यांसीं:—

प्रति प्रतापसिंहराजे दंडवत उपरी. तुम्ही हुजूर विदित केलें कीं, संस्थानचे खर्चाकडे गांव व जमीन वगैरे आहे. त्याची वेवस्था आह्मी व आमचे भाऊबंद मिळोनें करीत होतों. दरम्यान आमचे भाऊबंद यांणीं कामांत बखेडा केल्यामुळें गैरव्यवस्था जाली. तेव्हां संस्थानचे जमाखर्चाचे वेवस्था नीट ठेवण्याकरितां हुजरून गोविंद माहादेव कारकून व व्यंकाजी भोंसले यांस पाठऊन, त्यांस माहितगारी करून देऊन, त्यांचे विद्यमानें वहिवाट करित जाणें. येविशीं आमचे व वासुदेव बाबूराव तांबे फडणीस संस्थान मजकूर यांचे नांवें सनतिस्सा अशरीनांत पत्र आलें. नंतर त्या सालीं गोविंद माहादेव कारकून हुजुर नेले. भोंसला राहून देवस्थान चौकशीकडून मुनीम राजश्री विष्णु माहदेव माहजनी वहिवाट करित आहेत. त्यास हल्लीं आमचे भाऊबंद यांणीं पेशजींप्रमाणें संस्थानीं वागावें, गांवकामांत बखेडा करूं नये, असा बंदोबस्त करून घेतला आहे. या उपरी संस्थानचे जमाखर्च गैरवेवस्था होणार नाहीं. याकरितां स्वामींनीं कृपा करून पूर्ववतप्रमाणें संस्थान वहिवाट आम्हांकडे कायम करून, हुजरून भोंसला आहे त्यास आणून देवस्थानाकडील देखरेख होत आहे ती मना करण्याविशीं आज्ञा जाली पाहिजे. म्हणोन. त्याजवरून, संस्थान मारचे वहिवाटींत भाऊबंद बखेडा करीत नाहींत, हें आह्मी मिळोन एकविचारें पूर्ववतप्रमाणें व्यवस्था नीट राहून वहिवाट तुम्हांकडे कायम करून, लिहिलें आहे. तरी संस्थानाकडे इनामी गांव व जमीन वगैरे उत्पन्न परइलाख्यांतीलसुद्धां चालत आहे. त्याचा जमाखर्चाची वेवस्था दुरुस्त राखीत जावी. जाणिजे. छ ८ रबिलाखर, सुा समान सलासीन मयातैन व अल्लफ. तारीख १२ जुलै सन १८३७ इसवी मोर्तब आहे.

---

* नक्षत्रापुढील अक्षरें खुद्द रमाबाई देसाई इच्या हातचीं मोडींत आहेत.

पत्रांक ३२६ श्री. १७६९ कार्तिक वद्य ३.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दिक्षित ठकार स्वामी गोसावी यांसी.

शेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधी नमस्कार विनंति उपरी. श्रीमंत क्षेत्रियकुलावतंस श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणीं चिरंजीव राजश्री श्रीनिवासराव याचे विवाहाचा निश्चय मार्गसीर्ष शुा ९ गुरुवारीं योजिला आहे. शरीरसंबंध राजश्री आंताजी नारायेण मुतालीक यांची कन्या वधू योजिली आहे. तरी तुम्ही सहकुटुंब सहपरिवारें लग्नसरंभास यावें. रा छ १६ जिल्हेज, सुा समान अर्बैन मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें. ? हे विनंति.

पत्रांक ३२७. १७७७ चैत्र वद्य १४.

My dear Vinayakrowjee,

Allow me the liberty to introduce the bearer Bhaskerao Bhauoo to your favourable notice, who is cousin to the adopted son of the late Nana Farnavis, who, I have no doubt, will meet at your hand the honour due to his rank.

I do not know at which stage any application, respecting my honorary title, has arrived. Young gentlemen, I imagine, dislike corresponding with old hands, because they know Purvoe English, not palatible to young ones, knowing gramatical language, but this, I hope, will not deprive me of the pleasure of hearing from you on the point in question; hoping you are in the enjoyment of good health. Belive me,

My dear J,
Yours Faithfully,
Moroba Sadasea.

Poona 15th April 1855.

Address:—Venayeckrao Wassoodew Esquire, &c, &c, &c, Bombay.

---

* Palatible, gramatical, वगैरें स्पेलें मोरोबा सदाशिवाच्या Purvoe (परभू) English चे मासले आहेत. विरामचिन्हेंही मासलेवाईक आहेत. मुंबईच्या इग्रज लोकांत Purvoe म्हणजे खर्डेघाश्या, असा Purvoe या शब्दाचा रूढ अर्थ इ. स. १६०० पासून आहे.

पत्रांक ३२८ — श्री — १७८०

सदासिव दि० बिन बाबदेव दि० ठकार.

- नारायण दिक्षित.
  - लक्ष्मीकांत हिंदुस्थानांत.
  - सिद्धेश्वर दि० सातारा.
    - रामचंद्र दि० ठकार
      - सिद्धेश्वर दि०
      - लक्ष्मण दि०
- यज्ञेश्वर दिक्षीत
  - सदासिव दि० हयात सातारा
    - यांस पुत्र ५ इंदुरांत राहतात.

पत्रांक ३२९.

पो आश्विन वा १३ सुा तिसैन — श्री — १७११ आश्विन शुद्ध ८

शेवेसी. कृष्णाजी जनार्दन ओक मो जंबूसर कृतानेक सा नमस्कार विज्ञापना ता अश्विन शुा ८ पावेतों यथास्थित असे. विशेष. मी जंबुसरास आलियावर आपले लिहिल्याप्रमाणें अजमासाची सरकारांत निकड आहे, त्यास, पत्र देवावयाची आज्ञा जाली पाहिजे, म्हणोन राजश्री दिवाणजीस विनंति केली. त्यावरून त्याची सालमाारचे मखत्याप्रो साडे तेवीस हजार रुो जमा धरून, आपले फाजिल बाकीसुद्धां सतरा हजार येणें. त्यापैकीं जमेंत खर्च वजा होऊन, बाकी सा हजार रुो फाजिलास टाकून, बाकी दहा हजार रुो सरभुवनची रसद मेहेंदळे याजपासून घ्यावी, म्हणोन सरकारांत विनंतीपत्र लिहून पाठविलें. ते समई पाऊस पाणी चांगला प्रथमता लागों लागला. तेव्हां फारच पडिला यामुळें भाताचे तरु टाकिले त्याची तसनस जालियामुळें कपारी थोडी बहुत पडिली. तरूंची घट आली. पुढीं पाऊस ज्वारींचे पेरणीस चांगला उघडला. पेरण्या झाडून जाहल्या. नंतर मघा लागल्यापासून संतत पाऊस पडतो. येक दिवस उघडत नाहीं. यामुळें ज्वारी कुजोन गेल्या, व पेस्तर सालाकारणें किस्तंकार ढळिया पडावयाचा तो राहिला. येविसींचा मार सुभा समजाविला. त्यावरून येविसी सरकारांतही त्याची विनंतिपत्र लिहून पाठविलें तें पावलेंच असेल; व त्या जासुदाबरोबर आपणही विनंति

लिहिली आहे. हालीं उत्तराचा एक चरण राहिल्यापासून पाऊसांनीं उघाड दिली आहे. परंतु रेचावड जमिनीची ज्वार दरोबस्त गेलियामुळें पांचचार हजारांचें नुकसान रयतेस मजुरा द्यावें लागेल. तेव्हां फाजिलास ऐवज नेमिला तो राहणार नाहीं. गुदस्ता च्यार हजार रुो रदकर्जिस नेमिले. परंतु, आफ्‌ती-मुळें व कौलीं लावणी सुभाहून जाली सा, कमी आकार होऊन रदकर्जास ऐवज राहिला नाहीं. रसदेचे पैकीं फाजील राहिलें. सालमजकुरींही याप्रमाणें जालें. याज करितां सरकारांत विनंति करून, कांहीं ऐवज रसदेपो कमी करून, फाजिलास लाऊन द्यावा. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

पत्रांक ३३० श्री

रु

पो छ ५ सफर तीसैन. १७११ आश्विन वद्य ५

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक त्र्यंबकराव येशवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ १९ माहे मोहरम मुक्काम किले नरगुंद स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. तालुके—मजकुरीं येथील दुसालची वहिवाट तयार करविली आहे. दिपवाळीच्या सुमारें कारकुनाची रवानगी करून सेवेसी पाठवितों. दक्षिणेकडील बातमीचें वृत्त तरीः खुद्द टिपू कोईमतुरान-जीक जमाव सुद्धां आहे. अद्याप तह नाहीं. या तोंडीं फौज नवती. याकरितां मुरार्जी नलगे व गंगाजी सांवत वगैरे फूट सरदार पांच हजार फौज व पांच हजार बार येणेप्रों तुंगभद्रा उतरोन करजगीवर मुकाम करून राहिले आहेत. लस्करांत माणसें बातमीस पाठविलीं आहेत. मतलब काय आहे, याचें ठि-काण लाऊन मागाहून सेवेसी विनंति लिहितों. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

पत्रांक ३३१ श्रीगजानन. १७११ पौष वद्य ९

रु

श्रीमंत राजश्री नाना—

साहेब स्वामीचे सेवेसीः——

विनंति सेवक विश्वासराव आपाजी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ये-थील वर्तमान छ २२ माहे रबिलाखर मु॥ गारदौंड स्वामीचे कृपेंकरून ये-थास्थित असे. विशेष. मिर्जामुजफर बक्त शहाजादे छ १९ तारखेस प्रातः-काळीं स्वारी बागांत येथून आदकोसावर गेली होती. फिरून प्रहर दिवसांत

होवलीदाखल जाले. यानंतरीं हिंदुस्थानांतून यांचीं पत्रें आखबार छ १९ तारखेस रात्रौ आलीं. त्यांत मार: राजश्री पाटीलबावा रामघाटास सूर्यग्रहणास गेले आहेत. तेथें कार्तिकस्नान करून श्रीमथुरेस आले. वजिराकडून टिकावस्त्रें आलीं आहेत. बिलकारसाहेब वकील यांचे मार्फतीनें गुजरावलीं. येकवीस पाचें होते व तीन किस्ती जवाहीर, येक हात्ती, दोन घोडे याप्रमाणें आले. त्यांचे कडील भला माणूस आला होता. त्यास तीन खोन वस्त्रें व येक रकम दिली व वरकड जैपूरवाल्याकडील वकील रा सुभेदार यांचे लस्करांत येऊन बसले आहेत सुभेदारांनीं पाटील बावास + + + + + + + राजेमार यांचा कांहीं तह ठरावा. त्यास हे मसलत काहीं ध्यानास आणूं नये. मिर्जा इसमायलबेग याणें फितूर करून जैपुराकडे संधान लाविलें. आपलीं कुटुंबें गडास होतीं तीं काढून आपले लष्करांत नेलीं. जेपुरास रवाना करणार. जेपूरवाले राज्यांनीं लाख रुो खर्चास पाले आहेत. दिल्लींत आवई गेली आहे कीं, इसमालबेग फौजसुद्धां येणार. ह्मणून पातशहानीं शहरचा बंदोबस्त मांडिला आहे. दरवाजे दरोबस्त बंद करून तीन दरवाजे मात्र खुले ठेविले आहेत. रो पाटील बावास शुका पार होता कीं इसब बेगचा इरादा दिलीस यावयाचा आहे. त्यावरून पाटीलबावांनीं खातरजमा करून लेहून पाै. वरकड खर्चावेंचाचीं तंगचाई बहुत आहे. सलातीन यास उपोषणें गुजरतात. येक शहाजादा कंनसल होता तो निघोन गेला. यास्तव पातशहानीं पाटील बावास लिाे होतें कीं, सलातीन उपासी मरतात. त्यास यांचा भक्षावयाचा बंदोबस्त करावा, अथवा यास आनात करून द्यावें. त्यावरून शाहनीजामुदीन यास लिाे कीं, माहालांत ताकीद करून बंदोबस्त करावा. जाबेखान गुलामकादराचा भाऊ याणें साहरणपूर प्रांतीं राहिले व सिख जमाव करून रो. बालेजी इंगळे यांची लढाई रुबकार आहे. याप्रमाणें आढळलेलें वर्तमान तें सेवकानें लिहिलें आहे. सेवेसी श्रुत व्हावें. पत्रोत्तरीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिाे ! लोभ केला पाहिजे.

पत्रांक ३३२ श्री १७११ पौष वद्य ११

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे शेवेसी. विनंति विज्ञापना. बडोद्याहून च्यार घटका दिवसास नारोपंताची चिठी आली. सेनाखासखेल यास पौष वद्य नवमी मंदवारीं च्यार घटका रात्रीस देवाज्ञा जाहली. रविवारीं अग्निसंस्कार जाला. गुंता नाहीं. यामागें वर्तमानें येत तसें हें नाहीं. निश्चयरूप गोष्ट ईश्वरें घडविली. पुण्यास हें वर्तमान सा रोजांत जावें. पुण्यास त्याहवयाचें काव्यांत वगैरे हुल्लड येकदां होईल त्यास मारवाडी सिंदी झाडून रवाना करावें. सरदार गेला. धनी नाहीं. फितूर माजलें. मानाजी गायकवाड यास आणावयास माणसें गेलीं, नारोपंताची चिटीच पाठविली आहे. रा सोमवार पांच घटका

दिवस चढतां जंबुसराहून रवाना केलें. कोणे वेळेस आपणाजवळ पावतील ती वेळ ल्याहावी. आपण च्यार रोज आंकलेश्वरापुढें जावयाचें करूं नये. सरंजाम जवळ असों द्यावा. सरदार गेल्यानें घालमेल होईल. शहरचा बंदोबस्त आहे; परंतु फितुर बहुत. सरकारांतून सरंजाम या प्रांतीं येतो तर चांगलें. हा प्रसंग आहे. पुण्यास सा रोजांनीं वर्तमान पोंचल्यास चांगलें. हे विनंति.

पत्रांक ३३३ श्री १७११ पौष वद्य १२

रु

विनंति सेवक गणेश हरी मुक्काम आंकलेश्वर कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ २५ राखर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. फत्तेसिंगराव गायकवाड यास समाधान नव्हतें. त्यास पौष वा। ९ *नवमी मंदवारीं पहाटेच्या च्यार घटका रात्रीस देवाज्ञा जाली. भडोचकर सावकाराकडे बडोद्याहून बातमी आली. त्यांणीं आह्मांकडे सांगोन पाठविलें. त्यावरून आइकिलें. वर्तमान स्वामीस कळावें, याजकरितां वर्तमान आइकतांच काल संध्याकाळचे घटकेस सा घटिका दिवसास कागद लिहून जासूद जोडी पाचवे दिवशीं स्वामीकडे जाऊन पोंहचावें असा करार करून, रवाना केली आहे. परंतु, आमचा कारकून बडोद्यास आहे. त्याचें पत्र आलें नव्हतें. तें आज उद्यां येईल, तेव्हां सविस्तर लेहून पाठवीन ह्मणोन, त्या पत्रीं लि। आहे. त्यास, त्याच दिवशीं संध्याकाळीं आमचे कारकुनाचें पत्र व दुसरें अमोदकराचें पत्र ऐ। दोन्हीं वर्तमानाचीं येऊन पावलीं. तींच स्वामीकडे पाठविलीं आहेत. त्यावरून विदित होईल. ईश्वरीसत्ता प्रमाण! यास कोणाचा उपाय नाहीं. परंतु त्या प्रांतीं मवासास फत्तेसिंग याचा जबाब चांगला होता. त्याप्रमाणें नवा बसोन बंदोबस्त होई तों मह्रीकाठ्याचे वगैरे मवास उचल करितीलच. परंतु, सरकारची फौज या प्रांतीं आलियामुळें दबाबानें मवास उचल करूं पावणार नाहींत. परंतु, प्रसंगोपाद दंगा जाहल्यास इतक्या फौजेनें बंदोबस्त होणें जमीयेतीप्रमाणें होईल. याजकरितां भरणा पोख्त असावा. या प्रांतीं कांहीं सरंजाम आणि सरदार मर्द आणि मनसेबेयानें चाले असा असल्यास राजकारणाचे उपयोगीं पडेल. मग, स्वामीची मर्जी. पुण्यांत फौज आहे तसी या प्रांतीं राहील. राजश्री रामचंद्र भास्कर याचीं पत्रें पुण्यास गेल्याचें वर्तमान आइकिलें. गेलीं असतील. मी आंकलेश्वरीं प्रस्तुत आहें. वासद्याकडे जाणार.

---

* फत्तेसिंग गायकवाड २१ डिसेंबर १७८९ त वारला. असें जें ग्रांट डफ लिहितो तें चूक आहे. तो शके १७११ पौष वद्य नवमी शनवारीं पहाटेच्या चार घटका रात्रीस म्हणजे ९ जानेवारी १७९० स वारला.

परंतु च्यार दिवस वाट पाहून मग जाईन. तिकडे पत्रें पाठविलीं आहेत. उत्तर येईल त्याजप्रों करीन. उरपाडेस कारकून पाठविला आहे. परंतु कमावीसदार याद द्यावयास अनमान करितो. तेव्हां निकड करणें प्राप्त. ते बोभाट लिहितील. यास्तव विनंति लिा आहे. राजश्री असाराम विनायक मातबर सावकार भडोचकर यांणीं दुकान जंबुसरीं घातलें. त्याचा मजकूर आलाहिदा पुरवणींत लिा आहे. त्यावरून विदित होईल. उत्तराची आज्ञा जाहली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३३४ श्री. १७११ पौष वद्य १२

रु.

विज्ञापना. रा असाराम विनायक भडोचकर हे मातबर सावकार. घरचीं जाहाजें चिनाई व विलायतेस जातात. इंग्रेजांमध्यें यांचा उदीम विशेष. याजकडे पा भडोच येथील जकात होती. ते सालमजकुरीं मारनिलेकडील काढून दुसरीयास सांगितली. त्याजवरून यांचें मन खरें होऊन जंबुसरास आले. आह्मी बहुत प्रकारें खातरजमा केली. त्याजवरून त्यांणीं तेथें दुकान घातलें. म्हणाले, जो मी रुई खरेदी करीन ते जंबुसर अमोद येथें बंदरीं आणोन भडोचेस न्यावयाचा नाहीं, परंतु कांहीं रयात असावी. आम्हीं सांगितलें, तुम्ही मातबर सावकार, भडोचेहून येथें आलां, त्यास कांहीं तुमचें आईकों, तुम्ही फार वोढूं नये, सर्वांबरोबर हिसेब करावे, मग रयात करणें ते तुमचे आमचे विचारें होईल, तुह्मांस खटें करणार नाहीं. त्याजवरून, त्याची खातरजमा जाहली. मी आंकलेश्वरीं आलों. तेव्हां पर्वाच्या दिवशीं भेटावयास आले. म्हणाले, पहिलें अंकलेश्वरीं बंदर होतें, मोंगलानें जबरदस्तीनें पाडिलें. याजकरितां आमचे चित्तांत येथें बंदर करून सुरत व मुंबई येथून माल आणून कत करावी, तेणेंकरून सरकार किफायत, तुम्ही ह्मणाल इंग्रेज कांहीं दिकत करितील, त्याजविशींची जिमा माझा मी बंदोबस्त करीन. तेव्हां मीं सांगितलें, तुह्मी म्हणतां तें खरें, परंतु जकातीचा आकार होईल तो गाईकवाड घेतील, सरकारांत नफा नाहीं. आधीं भडोचकर माझ्या नांवें हाका मारितात, येथें बंदर जाहलें ह्मणजे पाटीलबावास पत्रें पाठवितील, तेथून सरकारांत पत्रें येतील, तेव्हां ताकीद येविसीं होईल, केला श्रम व्यर्थ, यास्तव सरकारांत विनंति लिहितों. आज्ञा जाहलियास गाइकवाड याचा बंदोबस्त होऊन सरकार किफायत जाहलियास करून त्यांणीं मान्य केलें. त्याजवरून शेवेसी मजकूर लिा आहे. जर करावयाची मर्जी असल्यास सरकार किफायेत आहे. पाटीलबावांनीं लिहिलें असतां मग सरकारांतून आइकों नये असें पक्कें असल्यास आज्ञा असावी, आंकलेश्वरीं असाराम विनायक यांणीं

सिकंऱ्या कापूस पिकावयाचा घातला. चोहींकडील कापूस येथें गाठोडीं बांधवयास येईल. सावकाराचें मानस भडोचे बंदरची कमती पडे असें करावें. जसी आज्ञा होईल त्याजप्रों करीन. मौजे संजोद पा आंकलेश्वर व मौजे शंकरपूर भाटे प्रों भडोच याचे सिवेचा कजीया पडला आहे. याजकरितां ऐवज भडोचकराचा अटकाविला आहे. यास्तव त्यांणीं जंबूसरचे सावकाराचा पैका भडोचेस चाळिस हजार पावेतों अटकाविला. आमच्चीं माणसें त्या ऐवजासमागमें होतीं. कारणें, टकसाळेंत रयाल आणविलें. तें त्यांणीं अटकावून ठेविलें, तेव्हां, असाराम विनायक यांणीं सांगितलें कीं, तुम्ही सावकारी माल अटकावितां हें चांगलें नाहीं. आंकलेश्वराहून कागद व कारकून गेला. त्याणें बहुत सांगितलें तेव्हां त्याणीं तर, ऐवज सोडून दिल्हा. परंतु त्याचें मानस आमचा कोणी अटकाऊन पैकेयाचा निकाल करून घ्यावा. मी आलों तों नर्मदा भडोचेजवळ उतरलों परंतु खबरदारीनें उतरलों. त्याजला ऐवजाविसीं निकड लागली आहे. आह्मीं त्याजला सांगोन पाठविलें, सनद आणून द्या, किंवा जमीन द्या, पैका घ्या. त्याचें म्हणणें पडतें, जमिनीचे आकारापुरता ऐवज ठेऊन बाकी द्यावा. त्यास, हे गोष्ट घडल्यास करितों. आज्ञा असावी. सरकारांतून पाटीलबावास निक्षूण पत्रें जाऊन, तेथून भडोचकरांस जरबेच्चीं पत्रें आलीं म्हणजे ठीक पडेल. वाजवीचें गैरवाजवी होतें, येवढें वाईट वाटतें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३३५ श्रीगजानन १७११ माघ शुद्ध ११

रु

श्रीमंत राजश्री नाना—

साहेब स्वामीचे सेवेसी—

विनंति सेवक विश्वासराव आपाजी दिा देवराव महादेव, कृतानेक सा नमस्कार. विज्ञापना येथील वर्तमान ता छ १२ * माहे माघ शुा ११ पावेतों स्वामीचे कृपेंकरून शेवकाचें येथास्थित असे विशेष. छ २४ रबिलाखरचें पत्र नवाब अकबर अलीखान याचें दिल्लीहून आलें. त्यांतील घरु मार लिहिला होता तो कांहीं समजल्यांत आला नाहीं. परंतु राजश्री पाटील बावांचें लस्करचें वर्तमान कीं इकडून सरकारची पत्रें व श्रीमंत स्वामीचीं पत्रें गेलीं त्याजवरून त्रिवर्ग सरदारांसीं परस्परं रसायेण होऊन सुभेदार पाटीलबावांचे येथें मेजवानीस गेले होते, परंतु हिमत बहादर याजबा मनांत शुधता नाहीं. बाह्य मात्र राक्षितात. जैपुरवाले राजे यांचे वकील राजश्री सुभेदार यांचे लस्क-

---

*छ १२ जमादिलावली माघ शुद्ध १३ येते, ११ येत नाहीं. तत्रापि पत्र १७११ माघांतील आहे, हें मजकुरावरून स्पष्ट आहे.

रांत आहेत. याचे मार्फतीनें सलुखाचा पैगाम लागला आहे. मिर्जा इसमायलबेग खांकानोडचे प्रांतांतच आहे. दोन्हीकडे सूत्र रक्षून आहे. जेपूरवाले यांणीं लाख रुपये खर्चास पो आहेत. परंतु बशर्थ मारनिलेचीं कुटुंबें शहरांत दाखल व्हावीं, तेव्हां ऐवज सावकारानें द्यावा, ऐसा करार आहे. त्याजवरून राज्याचा पाटील बावांचा तह ठरणार तेव्हां कुटुंबें तेथें पो ठीक नाहीं. यास्तव तेथें बमयकुटुंबसुधां तेथेंच आहेत. तह जाल्यानंतरी पुढें काय ठरेल तें पाहावें. यानंतरी छ ४ तारखेस हैदराबादेहून रो गणपतराव वकील याचा जासूद यामार्गे गेला. त्याणें जबानी वर्तमान सांगितलें कीं नबाब स्वारीस शहराबाहेर निघाले होते. ते समई कोठून पत्र आलें नाहीं, परंतु, हतीवर स्वार नबाब होते, त्यास लाखोटा आपले हातें फोडून पाहिला, आणि आपले जेबांत ठेविला. मग मशरूनमुलुक याजकडे क्रोधानें अवलोकन केलें, आणि स्वारी ते क्षणीं शहरांत दाखल जाली. उपरांतिक बंदोबस्त खासपागास व फौजेस ताकीद जाली कीं, जमा व्हावें. येसी आज्ञा होऊन डेरे बारादारीवर जाले आहेत. जासूद संक्रांतीस तेथून निघाला. मग डेरेदाखल कधीं जाले असेल तें न कळे. रुख कोणीकडे जावयाचा, हें समजलें नाहीं. हैदरखानाकडील ही वकील तेथून बारा कोसावर आला होता. कांहीं टिक्याचा सरंजाम बराबर आहे. दोन हाती, कांहीं जवाहीर, घोडे वगैरे आणिलें आहे. कांहीं फौज कुमकेस फिरंग्याकडे रवाना करावयास मागणार, ह्मणून ऐकिलें. वरकड, येथील वर्तमान तरी दोहीं दिवसां आड शाहाजादे स्वारीस निघतात. बागांत सहल चार घटका करून हवेलीदाखल होतात. समागमें रो बळवंतरावजी वगैरे मंडळी जात असते. नबाब अकबरअलीखान स्वामीचा स्तव बहुत करीत असतात कीं, श्रम बहुत जाला होता, परंतु आमचा गौर ऐसा केला कीं, खुशवक्ती त्याची कोठवर सांगावी, व बंदोबस्तही खातरखा आमचे स्वामी करितील ह्मणून नित्यशाह बोलण्यांत येतें. सेवेसी श्रुत व्हावें. आढळलें वर्तमान तें सेवकानें लिहिलें आहे. पत्राचे उत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें? लोभ केला पो. हे विज्ञापना.

पत्रांक ३३६ श्री १७११ माघ शुद्ध ११

सा. नमस्कार विज्ञापना ता.

प्रातःकाळ पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री अलिबहादरबाबाकडून सरकारच्या लखोट्याची थैली एक आली. येतांच डाकेबराबर सेवेसी रवानगी केली असे. थैली पावल्यानंतरी सरकारचे लखोटे जे असतील ते सबनीस हुजूर प्रविष्ट करतील. इस्मालवेग पळोन जैपुरास गेला. तेथें राज्यांनीं घरास येऊन, बहुता प्रकारें खातरजमा

करून, येक हाती व तरवार व +++ घेऊन सन्मान केला. याप्रों जैपूरचे पत्रें आलीं त्यावरून सेवेसी विनंति लिहिली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३३७ श्री

पो छ २५ जमादिलाखर तिसैन १७११ माघ वद्य ७

रु

सेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ २१ जमादिलावल, मुा लष्कर गंगातीर नजिक कोसभर प्रांत तेलंग, यथास्थित असों. विशेष. राजश्री रघोजी भोसले याजकडील दिनचर्याः छ १ रबिलाखर प्रातःकालीं स्नान देवपूजा करून, च्यार घडी बाईकडे दरबार करून, प्रहर दिवसा स्वारी सकरदरियास गेली. तेथें डेरेराहुट्या पाहून आले. सायंकाळपासून दोन प्रहर रात्र पावेतों दरबार जाला. शिलेदार लोकांस वगैरे दोन दोन रोजमरे खर्चास देविले, व गंगातीरीं धर्मादावबद्दल दाहा हजार रुपयांच्या अधेल्या पावल्या करावयास सांगितलें. गंगातीरीं व मार्गी जातांना माहागाई बहुत आहे ह्मणून रस्त यावयास याचा मुलूक आहे तेथ पावेतों कमाविसदार यास ताकीद करविली कीं, जागा जागा परगाणियांत वाणीउदमी असतील त्यांस सांगून गल्ला भरून लष्करचे मार्गी आणीत जावा. ह्मणून सांगाविलें. छ २ रोज प्रातःकालीं स्नान देवपूजा करून, भवानी काळो व भवानीपंत मुनसी यांस बोलाऊन, दोन घडी खलबत करून, झाडून कमाविसदार मंडळी बोलाऊन त्यांजकडे बाक्या येणें त्या ऐवजीं लोकांस वराता करून देविल्या. छ ४ रोज प्रातःकालीं स्नान देवपूजा करून, आईकडे प्रहरभर खलवत केलें. जाधवांनीं तलबेकरितां अडविलें होतें, त्यांचा जावसाल चाघे मानकरी यांजवर टाकला आहे. चौघांनीं सांगावें तें उभयतां ऐकावें, असें केलें आहे. परंतु, हे चौघांचें ऐकतील हेंहि प्रमाण नाहीं. छ ५ रोज प्रातःकालीं हजामत करून माहादाजी लष्करी यांसी चार घडी खलबत केलें. स्नान देवपूजा करून, प्रहरभर बाळाबाई यांचे वोसरीवर बसून, पागेची घोडींशिंगरें आणून पाहिलीं. छ ६ रोज प्रातःकालीं माहादाजी लष्करी यासी दोन घडी खलबत करून स्नान देवपूजा केली. बाईकडे च्यार घडी जाऊन यशवंतराव नाईक रुसला होता त्यास, वेंकोजी भोसले पाठवून, त्यास समजावून आणविलें. छ ८ रोज मंदवार प्रातःकालीं स्नान देवपूजा करून, बाईकडे जाऊन, भवानीकाळोस बोलाऊन, दोन घडी खलबत जालें. तिसरे प्रहरीं स्वारी तयार करऊन पांढरा पोशाख करून, चौकडा मोत्यांचीं कंठी घालून, घोड्यावर स्वार होऊन पश्चिमेचे शुक्रवार–दरवाजानें निघोन, दक्षणेस सकरदरियाचे बागाजवळ डेरे दिल्हे, तेथें डेरे–दाखल, मागील दोन

घडी दिवस राहतां, जाले. चिमाबाई वगैरे यांची स्वारी च्यार घडी रात्रीस डेऱ्यास गेली. छ १० रोज प्रातःकाळीं स्नानदेवपूजा करून, भवानी काळो यासी च्यार घडी खलबत केलें. प्रहर दिवसा स्वारी निघून, सिताबर्डीजवळ संगमावर माहादेवाचें देवालय बांधितात तें पाहून, फुटाळ्या तळ्यावर जाऊन, घडीभर बसून, तळ्यांत मणूष्र घालून, पाणी किती आहे म्हणून पाहिलें. तिसरे प्रहरीं सकरदरियास लक्ष्मीनारायणाचें दर्शणास गेले. छ ११ रोज कूच करविलें. पांच कोस मौजे पाचेगांव येथील मुा करविला. डेरे व लष्कर वगैरे झाडून गेले. माघून स्वारी जावी, तों पिराजी जाधव याणें तलबेकरितां पेशजी स्वारी सिताबर्डीजवळ प्रहर रात्रपर्यंत अडविली होती, तेव्हां लटकी तोडजोड करून दिल्ही, त्याचा कज्या चुकला नाहीं, तेव्हां त्यांणीं आणखी सांगून पाठविलें कीं, माझे तलबेचा फडशा जाला नाहीं आणि स्वारी जाती हें ठीक नाहीं, तलब द्यावी तेव्हां जावें हें उत्तम आहे, नाहीं तरी स्वारी मागें कोणासी बोलावें, माझी तलब तो लक्ष सव्वालक्ष रुपये येणें, स्वारी गेल्यास मी येथें नागपूरचे वाणी बकाल व सावकार धरून दोन लक्ष रुपये वसूल करीन. या प्रमाणें जाधवाणीं सांगून पाठविलें. तेव्हां स्वारी जाणें राहिली. पुढील मुा झाडून लष्कर गेलें. या मुकामीं खासे सडे व मुदसदी व बायकाच्या पालख्या मात्र होत्या. ते दिवशीं मुा जाला. अवघी रात्रभर तळावर जागाजामा खलबत—या ठिकाणीं दोन घडी, येथून दुसरे ठिकाणीं दोन घडी या प्रमाणें—अवघ्या तळावर खलबत जालें. राहुटी, कनात, चांदणी कांहींच नाहीं. उघडे होते. सकरदरियाचे बागांतून भोजन करून येत होते. दोन दिवस बायका देखील पालख्यामधेंच बसून राहिल्या. छ १२ रोजीं जाधव तो कांहीं ऐकेना. याचें मानस चाळीस पन्नास हजार रुपये द्यावे. तेही चिठी—वरात द्यावी. जाधव तो एक रुपया सोडूं ना ह्मणेत. तव्हां, त्याजवर लटकाच दाब टाकून, हल्ला करून लुटून घेतों ह्मणून गारदी व शंभर दोनशें लोक पाठविले. हल्ला जाऊन उभी राहिली. त्यांणीं सांगून पाठाविलें, हल्ला पाठवा, लुटून घ्या, आह्मी सिद्धच आहोंत, पाणिपतावर बुडालों अथवा बादामीवर मेलों म्हणूं, जिवावरच उदार जालोंत, परंतु तलब सोडणार नाहीं. याप्रमाणें सांगून पाठवीत. तेव्हां सायंकाळीं जाधवास अठ्ठावीस हजार रुपये नख्त देऊन, बाकी ऐवजाची निशा दोन महिण्याचे करारार्णे महमद अमीखा पठाण शिवणीकर यांची दिल्ही. तेव्हां रात्रीं कूच केलें. प्रहर रात्रीस नगारा, निशाण, जरीपटका पुढें लाऊन दोन प्रहर रात्रीस स्वारी निघून पांचगांवचे मुकामास गेली. समागमें पन्नास-साठ राऊत होते. रात्रीं काशीकर सावकार आला. त्याची भेट जाली. शंभर मोहरा नजर ठेवल्या. जाधवाचे तलबेकरितां दोन दिवस घोळ पडला. झाडून लष्कर कूच करून पुढील मुकामीं गेले. खासे सडे उघडे होते. लाख

रुपये देण्याचा मजकूर बहुतसा नाहीं. कारभारी–मुत्सद्दी यांजमध्यें कोणी भारी माणूस तोडजोड करून उलगडा पडेल असा नाहीं चाट्या–शिंप्या प्रमाणें मुछद्दी आहेत. छ. १३ रोज साता कोसांचें कूच केलें. भोजन जाल्यावर प्रहर दिवसा घोड्यावर बसून, पेशजीं मुधोजी भोसले व साबाजी भोंसले यांची लडाई जडली ते जागा मुकामापासून दोन कोस होती तेथें जाऊन पाहात होते. जिकडून तोफा लावल्या तिकडे त्यांचे लोक हुजेर होते. चौहूंकडे रण पाहून घोड्यावर उभे घडीभर होते. जागा बहूत यशस्वी आहे, ह्मणून बोलले. तेथून सायंकाळीं स्वारी मगरधोकड्याचे मुकामास डेऱ्यास आली. छ १४ रोज कूच नवा कोसांचें जालें. प्रहर दिवसा स्वारी निघोन, मार्गांत मौजे चणवड व शिरसी येथील पागा व गाईंचें खिलार पाहिलें. सायंकाळीं स्वारी गिरडचे मुकामीं डेऱ्यास आली. छ १५ रोज पंधरा कोसांचें कूच जालें. प्रहर दिवसा गिरडचा पीर डोंगरावर आहे त्याचें दर्शनास गेले. तेथून स्वारी निघोन सायंकाळीं शेगांवचे मुकामास आले. पंधरा कोस मजल भारी जाली ह्मणोन छ १६ रोजीं मुा केला. छ १७ रोज प्रातः काळीं कूच जालें. रव पडली जैराम व बाजीराव पाटणकर यांणीं तलबेकरितां येऊन अडविलें. तेव्हां स्वारी मागील मुकामींच राहिली. निमे लष्कर दहा कोस पुढें भाद्याचे मुकामास आलें. पाटणकर यांणीं अडविल्यामुळें तीन रोज स्वारी तेथेंच होती. पाटणकराकडे यांचें कर्ज होतें. तें तलबेंत वजा करून, त्याचा रोखा त्यास देऊन आणखी नवहजार रुपये नख्त दिल्हे. तेव्हां तेथून कूच करून भाद्याचे मुकामास आले. छ २१ रोज कूच करून सात कोस चंद्रपुरास तिसरे प्रहरीं आले. सायंकाळीं माहाकाळी देवीचे दर्शणास स्वारी गेली. छ २२ रोज प्रहर दिवसा स्वारी शहरांत गेली. शहरचे दरवाज्यांत एक हल्या व बकरें मारिलें. किल्ला झाडून फिरून पाहिला. तेथून माहादजी गुजर याचें घरीं भोजनास गेले. तिसरे प्रहरीं शिकारीस गेले. वाघरा वगैरे लाऊन पाहिल्या. शिकार कांहीं मिळाली नाहीं. दोन घडी रात्रीस डेऱ्यास आले. छ २३ रोज प्रातःकालीं स्नान करून स्वारी निघोन शहराबाहेरून शहरास प्रदक्षणा केली. पहिले रघोजी भोसले याणें चंद्रपूर घेतलें तेव्हां गांवकुसास व दरवाज्यास जागाजागा तोफांचे गोळे लागले आहेत. ते झाडून जागाजागा उभे राहून पाहिले. तिसरे प्रहरीं शिकारीस गेले. तेथें पांचसात तितर मात्र मिळाले. सायंकाळीं डेऱ्यास आले. चंद्रपुरास बहुता दिवसा स्वारी आली ह्मणोन तीन चार मुकाम करून शहर व किल्ला पाहिला. छ २६ रोजीं चंद्रपुराहून कूच जालें. नगारा, निशाण, जरीपटका, परसोजी भोसले याजबरोबर पुढें लाऊन स्वारी माघून दोन घडी दिवसराहतां मुा आली. नगारा, निशाण, जरीपटका, स्वारीबा ठेवीत नाहींत. लोकांचे मुजरे घ्यावयाचा बहुत त्रास येतो. मागून स्वारी-

बराबर दीडशें दोनशें लोक असतात. कोणे दिवशीं चाळीस पन्नास असतात. छ २८ रोज कूच दहा कोसांचें जालें. झाडीमुळें दिवसा मार्गांत स्वारीस चालावयास रवेची वगैरे बहुत दाटी होती. स्वारी लौकर चालत नाहीं. झाडी बहुत, मार्ग लहाण, याकरितां मागील प्रहररात्रीस स्वारी सर्वांची निघून पुढें गेली. दोन प्रहरां मार्गांत प्रणितो नदींत भोयाकडून मासे धरविले. तें जाळें तुटलें. मर्जी बहूत दिक्क जाली. जरीपटका, निशाण वगैरे मागून भवानी काळो घेऊन आले. छ २९ रोज कूच होऊन, स्वारी निघून मार्गांत शिरपुरचा किल्ला पाहिला. तेथील दरवाज्यांत एक हल्या मारविला. छ १ जमादिलावल च्यार कोस मौजे मेटंपल्लीचा मुा जाला. छ ३ रोज सात कोस मौजे नंकल्पल्लीचा मुा जाला. छ ४ रोज पांच कोस कोटंपल्लीस मुा जाला. छ ५ रोज गुरुवारीं पहिले प्रहर दिवसा स्वारी गंगेस आली. येथें चिनुरावर मोंगलांकडील फौज दोन हजार पावेतों आहे. राजा रड्डी भेटीस आला होता. स्वारी येतांच त्याची भेट उभाउभी जाली. उभयतां क्षौर केलीं. तीर्थ उपास करून छ ६ रोजीं श्राद्ध केलें. छ १० रोजीं प्रहर दिवसा स्वारी सर्वांची, मुा पासून काळेश्वर च्यार कोस आहे, तेथें प्रणितेचा संगम जाला आहे, तेथें स्वारी गेली. काळेश्वराचें दर्शण करून सायंकाळीं आले. छ ११ रोज तिसरे प्रहरीं राज्या—रड्डी डेऱ्यास आला होता. च्यार घडी बसून गेला. छ १३ रोज स्वारी सर्वांची चिमाबाई वगैरे सुध्धां काळेश्वरास गेली. गंगादक्षणतीरीं मांडव घातले. वेंकाबाशास्त्री सोमयाग करितात. शास्त्रीबावांनीं खाशांस विचारिलें कीं, याग करावा असें चित्तांत बहूत आहे, परंतु साहित्य कांहीं अनुकूल नाहीं. त्याजवरून खाशांनीं सांगितलें, साहित्य काय पाहिजे तें देवितों. छ १४ रोज यज्ञास आरंभ केला. छ १६ रोज प्रहर दिवसा स्वारी, चिन्नूरचे किल्ल्याजवळ अगस्तेश्वर महादेव आहे, त्याचे दर्शनास गेले. दर्शण करून किल्ला पहावा, अशी मर्जी होती. दोन प्रहर जाले, उशीर लागेल, पुढें एकादे दिवसा पाहूं ह्मणाले. भोयकिल्ला आहे, लहाण आहे, त्याचें लष्कर पायदळ दोन हजार पावेतों आहे, तें बाहेर किल्याच्या जवळच उतरलें आहे. यज्ञमंडप ठेंगणे घातले. त्यास तिसरे प्रहरीं, आहोती टाकते वेळेस, मांडवास आग लागली. त्याचे शांतीच्या आहोती टाकल्या. छ १७ रोजीं तीन पशू, छ १८ रोजीं एक पशू, ऐसे च्यार पशू मारले. यज्ञमंडपांत शूद्रांणीं जाऊं नये, पाहूं नये. खासे नित्य जाऊन कुंडाजवळ बसत होते. आहोती टाकते वेळेस ब्राह्मणासी बोलावें. हे आहूत कोणती, कशाची ह्मणून पुसावें. होमाचे वगैरे ब्राह्मणांचे चाळीस पन्नास पात्रांचें स्वयपाकाचें साहित्य नित्य कोठींतून पाठवीत होते. छ १९ रोजीं यज्ञ समाप्त जाला. शास्त्रीबावा व आणखी ब्राह्मण खाशाजवळ बहूत स्तुती करीत होते:—महाराज! यज्ञ बहूत चांगला झाला. हत्ती, नगारा,

गारदी, तोफा, बंदुखा वगैरे बाराची शिलक समारंभ चांगला जाला. कृतायुगीं विश्वामित्राणीं यज्ञ केला होता, त्याप्रमाणेंच हा यज्ञ जाला. अशी बहूत स्तुती केली. परंतु हत्तीतोफा फुकटच्या होत्याच. वरकड, आणखी कांहीं यज्ञसंबंधें धर्म किंवा ब्राह्मण-भोजन-संतर्पण केलें नाहीं. होमाचे सोळा ब्राह्मण व आणखी पंचवीस तीस ऐशा पन्नास ब्राह्मणांस एक–एक रुपया दक्षणा दिल्ही. मुछद्दी, मानकरी, शिलेदार वगैरे याणीं यज्ञापुढें, कोणी मोहोर, कोणी दाहा रुपये, पांच रुपये ठेवले, ह्मणून, मराठे मानकरी वगैरे सर्वांस मेजवानी शास्त्रीबावाकडून करविली. साहित्य कोठींतून पाठवून दिल्हें. नांव मात्र शास्त्रीबावाचें. ब्राह्मणांस व लोकांस बहूत भ्रम होता कीं, यज्ञास साहित्य लागेल तें देवितों ह्मणून खासे बोललेत. कनिष्टपक्षीं च्यार पांच हजार रुपये लागतील, असें सर्वांचें मानस. परंतु कांहींच न केलें. अजमासें च्यार पांचशें रुपये लागले असतील. गंगेस आल्यापासून दीडशें दोनशें गोदानें दिल्हीं व अन्नछत्र घातलें. नित्य दोनशें तीनशें च्यारशें ब्राह्मण जेवितात. बंदोबस्त चांगला नाहीं. तिनशें पात्राचा स्वयंपाक करवितात, तेथें पांचशें ब्राह्मण येतात. तेव्हां, ब्राह्मण उपाशीं उठतात. कोठाळे–कारभारी लबाडी करितात. त्याची चौकशी नाहीं. भूरदक्षणा ब्राह्मणास एकादों दिवशीं देणार व गजदान देणेंत आहेत. छ २१ रोज राजारड्डी मोगलाकडील याची मेजवानी, मुदबखचें साहित्य व बकरीं, आलीं होतीं. तें निमें मानकरी वगैरे लोकांस वांटून देविली. महागाई, आठ दहा शेरांची धारण आहे. समागमें फौज एक हजार व तोफा लहाण अच्छेर गोळ्याच्या च्यार आहेत, व बाणाचे उंट दाहा, व गारद दोनशें आहेत. समागमें यात्रा नागपुराकडील वगैरे दोन हजारआली आहे. येथें शिवरात्र करून, आमावाशा जाल्यावर, चिमाबाई वगैरे वेंकोजी भोंसले एथून च्यार मजलीं राजेश्वरास जाणार. व रघोजी भोसले कूच करून शिरपुरास अथवा चंद्रपुरास जाऊन राहाणार. चिमाबाई राजेश्वराहून आल्यावर, हुताशनी चंद्रपुरीं करून संवत्सरप्रतिपदेस नागपुरास जावें असा मजकूर आहे. राजश्री भवानी काळो याणीं येथें लक्ष–होम केला. वोझ्याचे छकडे व कारखाने वगैरे काल पुढें नागपुरास लावले. स्वारीबार लौकर चालत नाहींत व तेथें माहागाई आहे, याजमुळें पाठविले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३३८ श्रीगजानन

पो छ २५ रजब, तिसैन. १७११ फाल्गुन शुद्ध ६

रु.

श्रीमंत राजश्री—नानासाहेब

स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक विश्वासराव आपाजी, दिा देवराव महादेव कृतानेक सां।

नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता छ ५ माहे जमादिलाखर मु॥ गार-दौंड स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपा करून छ १५ जमादिलावलचें पत्र पा सेवकास सनाथ केलें. तेणेंकरून अत्यानंद जाला. यानंतरीं येथील वर्तमान. रा॥ लाला फत्तेचंद तेथून आज्ञा घेऊन निघाले ते येथें छ २० तारखेस पावले. त्रितीय प्रहरीं मिर्जा मुजफरबक्त शाहाजादे यांचे मुलाजमतीस राजश्री बळवंत रावजी, लालमुनशी वगैरे सर्व मंडळी गेलों. मुलाजमत जाली. खैर आफीयत मिजाज खुसीचें वर्तमान श्रीमंतांचें व स्वामीचें पुसिलें. नंतर लालानीं वर्तमान मुफसल हिंदुस्थानचें वगैरे निवेदन केलें. दोन घटका दिवानखान्यांत होते. मग, नबाब अकबर आलीखान यांची भेटी जाली. परस्परें खैरआफीयतचें बोलणें जालें. च्यार घटका बसून सायंकाळीं आपले घरास आले. दुसरे दिवशीं छ २१ तारखेस लालाफत्तेचंदजीस बोलाविलें. मग मा॥निले नबाब यांसीं हजर जाले. वर्तमान पुसिलें कीं, आतां आह्मांस श्रीमंत बंदोबस्त करून रवाना कधीं करितात? हिंदुस्थानचा रंग दिवसोदिवस बिघडत चालिला. मुलकाची खराबी होत आहे. दंगा मिटत नाहीं. येसा जाला आहे. त्यास, आह्मी येथें उगेंच बसलों आहों. तरी कांहीं काम आम्हांकडून घ्यावें. म्हणजे आह्मांत कांहीं माणुसकी आहे किंवा नाहीं हें ध्यानास येईल. इसमालबेग कोठील कोण ऐसें असतां पन्नास हजार फौज बाळगून कजागी करितों. त्यापक्षीं आमचे पदरीं तरी नांव आहे. तरी आपला उपराळा मात्र असावा. मग चिंता नाहीं. खातरसा हिंदुस्थानचा बंदोबस्त आपले प्रतापानें करूं, व राजे रजवाडे इसमालबेग हे सर्व आमचे संधानांत आहेत. ऐसें विस्तारें बोलणें जालें. परंतु त्यांतील मुख्य भावगर्भ हा कीं, आमचे खर्चाची वोढ, यास्तव सत्वर बंदोबस्त करून रवाना करावें. दिलीहून खोजेजादा निघोन जैपुरास गेला. त्यास रजवाडे व उदेपूरवाले यांचें येक संधान होऊन, खोजेजादे यांस सन्मान करून ठेविलें आहे; व गाजुदीखान शाहाकडून फौज घेऊन बिकानेरावर आला आहे. त्यास राज्याकडील वकील गेले आहेत कीं, तुम्ही येऊन सामील व्हावें. खोजेजादे येथें आले आहेत. त्यास यांजला मुखतयार करून विजारतचा कारभार आपण करावा, हें एक राजकारण नवें निघालें आहे. त्यास या प्रसंगीं आह्मीं गेलों तरी हा बखेडा कांहीं होऊं पावणार नाहीं. आपले प्रतापानें दिल्ली, दक्षणहिंदुस्थान एक होईल. याप्रमाणें भाषण जालें. मग लालांनीं आज्ञेप्रमाणें उत्तरें चांगलीं केलीं कीं, उतावळी न करावी. काम मोठें आहे. यास्तव सोईनें सर्व मर्जीनरूप होईल. याप्रमाणें त्यास नवाबांनीं जे समयीं धडपसरचे मुकामीहून कूच जालें, त्या समई लालाफत्तेचंद यांजपाशीं सात दफांची यादी लिहून दिल्ही होती कीं, श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेबांनीं जुवांबक्तशहाजादे यास वलीअहद करून बसविले होते व तोच इरादा धरून

आह्मी आपलेपाशीं आलों आहों. ऐसी खर्चाची तकलीफ व शाहाजादे यांचे लग्नसंबंधी वगैरे सात कलमें लेहून दिल्हीं होतीं. त्यांचें उत्तर काय करून आला ह्मणून पुशिलें. त्यास, लालांनीं आज्ञेप्रमाणें साकल्य सरकारचा उपर राखून, त्यांची मर्जी संतोष वाटे ऐसीं उत्तरें केलीं. तीं लालाफत्तेचंद समक्ष पायापासी विनंति करितील, त्यावरून ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत व्हावें. मी गरीब निराश्रित आहें. माझी शरम स्वामीचे चरणास असे. बहूत काय लिो ? कृपा लोभाची वृद्धि असावी हे विज्ञापना.

पत्रांक ३३९ श्रीगणपती १७११ फाल्गुन शुद्ध १०

राजश्री गोविंद रघुनाथ जोशी स्वामी गोसावी यासीः—

सेवक परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी. रा शामजी विठल कुलकर्णी मौजे चिकुर्डें, काा कोडोली, यार्णी विदित केलें कीं, आमचा व आमचे पुतणे बापूजीवाजी याचा वाट गिविसी पेशजी कजिया होता. त्याचा निवाडा वालव्याचें थर्ली होऊन परस्परें समजपत्रें व निवाडपत्र जालें आहे. त्याप्रमाणें बापू जिवाजी आमचा फडशा करीत नाहींत. येविशीं ताकीद जाली पाहिजे. ह्मणोन, त्याजवरून, हें पत्र लिा असे. तर, तुह्मीं येविसीचें मनास आणोन, निवाडपत्राप्रों वाजवी फडशा बापू जिवाजी करीत नसल्यास निक्षूण ताकीद करून निकाल करवणें. तेथें न ऐकत, तर हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ ९ जमादिलाखर, सुा तिसैन मया व अलफ. हे विनंती.*

पत्रांक ३४० श्रीगजानन १७११ फाल्गुन वद्य ८

रु

पो छ २५ रजब तिसैन.

श्रीमंत राजश्री नाना

साहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक विश्वासराव आपाजी, दिा देवराव महादेव, कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ माहे जमादिलाखर सुा दौंड स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. कृपा करून छ ७ जमादिलाखरचें पत्र पो तें पावलें. सेवकास सनाथ केलें तेणेंकरून आनंद जाला. यानंतरी येथील वर्तमान छ १८ तारखेस नवाब आकबरआलीखान यांचीं पत्रें व अखबार घेऊन येक नाजर मोहबत आबजू कासीहून आला व बकसी नबाब मुंत्पाददौला त्यांचा पुत्र मुबारकदौला ऐसे उभयतां हिंदुस्थानांतून

---

* 'हे विनंती' येवढीं अक्षरें व मथळ्यावरील 'गणपती' हीं अक्षरें खुद्द परशरामभाऊ पटवर्धन यांचीं आहेत.

आले. त्यांणीं तिकडील अखबार आणिली आहे. त्यांत वर्तमान तरीः राजश्री पाटीलबावाचा मुलगा श्रीमथुरेवर आहे. इकडून सरकारचीं पत्रें व स्वामीचीं पत्रें गेलीं कीं, त्रिवर्ग सरदारांनीं येकचित्तानें असून १.८ त करावी, द्वैत नसावें; व हिम्मतबहाद्दर यास सरफराज ठेवावें. त्यावरून पाटीलबावा बोलिले कीं, आह्मीं श्रीमंतांचे आज्ञेशिवाय नाहीं, परंतु नवाब आलीबहाद्दर ऐकत नाहींत, त्यास आमचा उपाय काय. हिमतबहाद्दर येक दिवशीं आपला गळा कापून घेत होता. तेव्हां आलीबहाद्दरबावास खबर जाली. त्यावरून तेथें गेले, आणि मारानिलेचे हातची सुरी घेतली. बहुत खातरखा केली. खर्चाची तकलीफ होती. यावरून, कांहीं खर्चास व वस्त्रें त्यांचे जनान्यास नक्तीं त्यावरून, कांहीं पशमीना शालजोड्या वगैरे जिनस किनखाप पा दिल्हे. आणि आलीबाहाद्दरबावा, पाटीलबावांचे गुरुबंधु तेथें आहेत, त्यांचे डेऱ्यास गेले होते. त्यास, त्यांजला हें वर्तमान साकल्य सांगितलें कीं, बावा ऐकत नाहींत, आणि हिंमतबहादर आज आपला गळा कापून घेत होते, त्यास आमचा उपाय नाहीं, बावाचा निग्रह भारी त्यास काय करावें, त्यावरून फिकीर. बावा स्वार होऊन पाटीलबावांचे डेऱ्यास गेले आणि सांगितलें कीं आलीबहादरबावा तेथें आले आहेत, तरी आपणही चालावें. त्यावरून पाटीलबावा व राणेखानभाई स्वार होऊन गेले. उभयेतांच्या भेटी परमलोभानें जाल्या. बहुत लोभाचीं बोलणीं झालीं. मग पाटीलबावांनीं बावांस हातीं धरून आपले डेऱ्यास नेलें. परम शिष्टाचार केला. वस्त्रें वगैरे जवाहीर अकराखोन तयार करून हाती घोडे दोन ऐसे आणिलें. परंतु बावांनीं कांहीं घेतलें नाहीं. आतर, पानदान मात्र घेतलें, आणि स्वार होऊन आपले डेऱ्यास दाखल जाले. वरकड तुभाभाई फिरंगी याचे नवे पलटणें याची तयारी जाली आहे. त्यावरून बावास त्याची कवायत दाखवायास बोलाविलें. त्यावरून सुभेदारांस बोलाऊं पों कीं, पलटणें पाहावयास आपणही चालावें. त्यास सुभेदारांनीं निरोप सांगोन पों कीं, आमचे येथें लोकांचा गवगवा बहुत जाला आहे, यास्तव येणें होत नाहीं, आपण जाऊन पाहावीं. ऐसें सांगून पों. आणि आपले लोकांस सांगोन पों कीं, तुह्मी येऊन हांगामा करणें. त्यावरून लोकांनीं येऊन हांगामा केला. पाटीलबावा पलटणाची तयारी पाहून बहून खुशवक्ती जाली. मग स्वार होऊन डेरेदाखल जाले. रा कासीबा होळकर दिल्लीस गेले आहेत. मुलाजमतीस शाहानिजामुद्दीन यांणीं येऊन अर्ज केला कीं, मुलाजमतीस चालावें. त्यावरून बोलिले कीं, रो पाटीलबावाप्रों आमचा मान व त्या सिरस्त्याप्रों खीलत वगैरे द्यावें, तरी येऊं, नाहीं तर सांप्रत येत नाहीं. त्यावरून शहाजीनें विनंति केली कीं आज्ञेसिवाय मी नाहीं, परंतु हुजुरांत सांप्रत खर्चाची तकलिफ बहुत आहे, यास्तव लाच्यारगी आहे, नाहीं तरी गुंता नाहीं. मग कासीबांनीं सुभेदारांस पत्रें पों

कीं, मुलाजमतीचा प्रकार याप्रमाणें आहे. त्यावरून सुभेदारांनीं लिहून पाँ कीं, तूर्त मुलाजमतीस न जावें, पुढें आह्मी लिहून पा तेव्हां जावें. त्यावरून महकूफ राहिले. दिल्लीहून खोजे जादे जैपुरास गेले होते. तेथून जोतपुरास गेले. शहरापासून येक कोस बाग आहे. तेथें मुकाम करून आहेत. राज्यांनीं सिष्टाचार मात्र केला. परंतु मुलाजमत अद्याप जाली नाहीं. राजे बिजेसिंग यांचा दिवाण आहे. त्याणें कांहीं वर्तमान जैपूरकरास लिाँ. त्यावरून दिवाणावर इतराज बहुत आहेत. जैपूरवालेही आपले फौजेची तयारी करून आहेत. जोतपूरवाल्याकडीलही फौज रवाना कुमकेस जाली आहे. दिल्लींत डाके नित्य पडतात- शहरांत बंदोबस्त चांगला नाहीं. पातशाई सलातीन आहे. त्यांस उपोषणें पडतात. वस्त्रें नाहींत. रात्रौ सीतानें हैराण, तेव्हां पातशाहांनीं कांहीं रजया खरीद करून पा दिल्या. याप्रों दिल्लीचें वर्तमान लिाँ आहे. त्याप्रों पाटीलबावाचे वगैरे लस्करांत नित्य चोऱ्या होतात. घोडीं, उंटें नेतात. सावकाराचें दुकान फोडितात. ऐसा प्रकार आहे. वरकड, येथील वर्तमानः हुताशनीचा समारंभ वाा ५ पंचमीस राजश्री बळवंतरावजी यांणीं रंगाची तयारी करून कुसुंबी रंग व केशराचा व फुलांचा वगैरे गुलाल सर्व साहित्य घेऊन सर्व मंडळी सुधा शाहाजादे यांचे हुजूर दिवानखासांत समारंभ च्यार घटका नाचरंग जाला. बहुत संतोष जाले. मग नबाब अकबरआलीखान याजकडे दोन घटका नाचरंग होऊन, सांईकालीं आपले घरास आले. सेवेसी श्रुत व्हावें. जालें वर्तमान तें सेवकानें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें ? लोभ केला पाो हे विज्ञापना.

पत्रांक ३४१ श्री १७११

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेययाजी स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी बाळाजी जनार्दन साा नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र राजश्री बाळाजी भिकाजी याजबरोबर पाठविलें तें पावलें. राजमंडलचे तैनातीचा व वर्षासनाचा ऐवज पावत नाहीं, व एखतपुरचा मार लिहिला व मारनिलिनें सविस्तर सांगितलें, त्याजवरून कळलें: ऐशास, आपले लिहिल्यावरून, राजश्री हरीपंत यांस वर्षासनाचे ऐवजाविशीं सांगितलें आहे; व सरकारचीं सनद येक हजार रुपयांची सालाबादचे ऐवजाची मारनिलेस दिली आहे. सनदेप्रमाणें आपल्यास ऐवज पावता करतील व इनाम गांवचाहि बंदोबस्त करून देतील. *लोभ असों द्यावा. हे विनंति.

---

* येथपासून हस्ताक्षर नाना फडणिसाचें.

पत्रांक ३४२ श्री. १७१२ अधिक आषाढ वद्य १

पंश्री मुख्य प्रधान श्रीराव सवाई माधौ राइजू. येते श्री महाराजाधिराज श्रीमहाराजा श्रीराजा धौकलसिंघजू देवके बांचनै आपर उहांके समाचार भले चाहिजै. इहांके समाचार भले है. आपर जादा दिननतै अपने पाती समाचार नहीं आये है, सो लिखिवी. अरु उधरकीं इधरकी बात आगै तै येक चली आई हे. काहूतरह जुदाइगी नहीं रही है. तिहितै अव आपकौ जादा जादा चलाउ नौ. इहां तै पंश्री पांडित मोरौजी कौ पठवाये है. सो हकीकति इनके कहैनानि वो. पाती समाचार लिखत रहिवी. असाढवादि १ संवत् १८४६ मुा परना.

पत्रांक ३४३ श्री. १७१० मार्गशीर्ष शुद्ध १

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महिपतराव कृष्ण गोसावी यांसी:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुहुरसन तिसा समानीन मया व अलफ. तुह्मीं पत्र छ ६ सफरचें पाठविलें तें छ २७ मिनहूस प्रविष्ट जाहलें. लिहिला मजकूर सविस्तर अवगत जाहला. श्री नरहरीसानिध्यें करून शरीरप्रकृत चांगली आहे, ह्मणून लिहिलें. उत्तम आहे. रा छ २९ सफर. बहुत काय लिहिणें ? लेखनसीमा.

पत्रांक ३४४ श्री १७१० मार्गशीर्ष वद्य १४

छ मा अनाम देशमुखदेशपांडे मामले बीड यांसी:—

माधवराव नारायण प्रधान सुा तिसा समानीन मया व अलफ. मामलेमार पो दिगर जाहागिरीचे गांव राक्षसभुवन वगैरे येथलि अमल महिपतराव विश्वनाथ यांजकडेस जातीस व पागापथकाचे बेगमीस सरंमजाम चालत होता. त्यास ते मृत्य पावले, सबब त्यांचे पुत्र राजश्री सिद्धेश्वर महिपतराव यांजकडे जातीस व पागा पथकाचे बेगमीस सरंजाम सालमजकुरापासून करार करून दिल्हा असे. तरी, मारानिलेशीं रुजू होऊन, अमल सुदामत प्रों सुरळीत देणें. जाणिजे. छ २७ रबिलावल. आज्ञा प्रमाण. लेखनसीमा.

श्री
राजा शाहु नरपति-
हर्षनिधान माधवराव
नारायण मुख्य प्रधान.

पत्रांक ३४५ श्री १७१० पौष वद्य १२

तीर्थस्वरूप मातुश्री ताई वडिलांचे सेवेसीं:—

अपत्यें माधवरावाचे साष्टांग नमस्कार विनंती. येथील पौष बहुल द्वादशी पर्यंत वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असे, विशेष. आपणाकारणें मकर संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. स्वीकारून उत्तर पाठविलें पाहिजे. बहुतकाय लिहिणें ? हे विनंती.

पौ छ ३ जोवल उर्फ माघ शुा ४ शुक्रवार शके १७१०

पत्रांक ३४६ श्री (नकल) १७११ वैशाख शुद्ध ११

यादी राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांजकडील करारमदाराचीं कलमें पेशजीं कैलासवासी मुधोजी भोंसले सेनाधुरंधर पुण्यास आले तेसमयीं करार जाला त्याप्रों वगैरे. सुा तिसा समानीन मया व अलफ.

घरचा अगर बाहेरील कसाहि प्रसंग पडला तर सरकारचे लक्षाशिवाय दुसरें लक्ष धरणार नाहीं. येणें प्रों करार.

इंग्रजांचा बिघाड झाला तर शरीक सरकारचे येणेंप्रो करार.

त्रिवर्ग बंधू सरकारचे लक्षांत राहूं, दुसरें लक्ष धरणार नाहीं, येणेंप्रों करार.

पांचहजार रुपयांचें कापड बाळापूर व वासीम पेशजींचें कराराप्रों दरसाल सन सीत समानीनापासून सरकारांत देत जावें, असा करार आहे. त्यास कराराप्रमाणें मागील कापड देऊं. पुढें दरसाल देत जाऊं. येणें प्रों करार.

संस्थान गढे मंडळें, रेवा-उत्तरतीर, राजश्री खंडोजी भोंसले सेनाबाहाद्दर यांस फौजेचे सरंजामास सरकारांतून करार करून दिल्हें. त्याचे

पा गंगथडी येथील महाल सरकारांत आले आहेत. तेथील घांसदाणा तुमचा तो तुह्मीं घेऊं नये. याचे ऐवजीं प्रा वराड येथील सरदेशमुखी व बाबतीचा ऐवज सवादोन लक्ष रुा तुह्मांकडे दरसालचें येणें तें तुह्मांस माफ केलें. याप्रों करार सन इसने—तिसेनांत जाला आहे व अलिकडे सन तिसा तिसेतांत ब्रह्मेश्वरचे सालीं अकरा महालचा घांसदाणा घेऊं नये असा करार आहे. त्याचा फडशा पेस्तर सालीं करावा. असा करार कैलासवासी सेनाधुरंधर यांणीं सन सीतसमानीनांत केला आहे. त्यास, तूर्त नागपुरास जलदीनें जाणें याजकरितां फडशा महकूफ करावा. पेस्तर सन तिसैनांत याचा फडशा क्षेपनिक्षेप करून देऊं येणेंप्रों करार.

ब्रह्मेश्वरचे मुकामीं कैलासवासी जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा यासीं

कलमबंदीची याद सन सीतसमानी-नांत जाली आहे. त्याप्रों सरकारांतून चालवावें. आह्मीं कराराप्रों निभावणी करूं. येणें प्रों करार.

करार जाले आहेत. त्याप्रों वर्तणूक करूं. येणेंप्रों करार.

छ ७ साबान, सन तिसा समानीन, वैशाखमास. मुकाम पुणें.

पत्रांक ३४७ श्री लक्ष्मीकांत १७११ ज्येष्ठ वद्य ११

वेदमूर्ती राजश्री नाना दीक्षित यांसीः—

प्रति रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंति. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. खासा स्वारी पैठणास गंगा उतरत आहे. त्यास, कायगांवीं ज्या नावा असतील त्या पैठणास जरूदी पाठऊन द्यावें. छ २४ माहे रमजान. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

पौ शके १७११, सौम्य संवत्सरे, आषाढ शुद्ध मंगळवार.

पत्रांक ३४८ ॥ १ ॥ १७१२ कार्तिक वद्य ७

पंश्री राजेश्री वावूराउ केसोराउजू ऐते श्री राजधरवहादुर गजसिंघजू श्री गंधृपसिंघजुके वांचने ओंपर अपने समाचार सदा सर्वदा भले चाहिजै. तापी छै यहाके समाचार भले है. आपकी मिहरवानगीते ओपर आगैतै आपुसौं श्री हजूरी सौ जिहतरह व्यौहार रहो आयौ है सो हमेतों तौनउ तरह समजै है. अरु आपु जेठे सरदार हौ. हमारी वातके स्वैया आपऊ हौ. आपुसिवाइ हमै दुसरौ कोऊ नाहीं दिखातु आइ. अरु आगै पंश्री पंडित खंडोराऊ यहां आए हते सो राज्यकी जागा सवतहसन हसकरी अनै पंश्री पंडित लछमनराऊ झासी बारे आए, सो हमारौ ऊनकौ सूत हतौ हमसौ ऊनसों तौ भेटऊन हौन पाई. तुहलौ श्रीनौनै अरजुनसिंघनें न्याऊ करमार कै भगाइ दए अरु लूट लए. ऊनकौ भगाके अव हमारे राज्यपै आए सो हमै छैकैहै. जौतौ इनको पारपत होई अरु हमारी मदत होवे. मै आवे तौ हम आपके ऊकमी है. जौ तो हमारी दसपंद्रा हजार घौरेकी मदत होवे. मै आवे अरु हमारे भया श्री गंधृपसिंघकौ संग लिवा ऐ आवै, तौ हम पैसान श्री की दैवेकी राहवांधे अरु राज्यकी सजल वैढे तौ हम हमेस आपुके ऊकमी है. अरु पंश्री पंडित वालजी यहां है सो ऐ हमारी वात नाहीं चितमें धरत आइ. आपुकौ वडौ दुवारौ है जिहमै राज्य कौ सुधार होई सो कीवी. अरु जिहमै हमारे भैयाकौ ऊवेल होइ अरु हमारी वात रहै सो आपु कीवी. या हकीकति श्री नानासाहिब कौ जाहिरकर जिहमै राज्यकौ सुधार होइ तौन

आपुकौ करनौ है. और विदीवार हकीकति श्रीटकसारीभावानीसिंघकौ लिखी है सो ए जाहिर कर है. अरु इनऊके हाथ आगौ पाती लिखी है सोवचवाइ देखवी. हम सब वातनपै काइम है सिखापनु होई. सुफुरमाइ पठैवी मार्ग वदि ७ संवत १८४७ मुकामु मडफा (!)

श्री

श्री
जोतिस्वरूपचरणीं तत्पर
महादजीसुत दवलतराव
शिंदे निरंतर

पत्रांक ३४९ श्रीं १७१२ कार्तिक मार्गशीर्ष

मेहेरबान हरीपंत हमषान मित मुस्तफिद असतां आपण पंत मवासुफ यांस रोबरो जबान मबारकेनें फर्माविलें कीं, तुह्मीं मागें पुइतगर्मीवर राहून फौजेस इंग्रेजांकडे रवाना व मामुर करावें. ये विसींचा तपशील त्यांणीं इकडे निगारीष केला. त्यावरून मुफसाल दर्याफ्त जालें. चुनाचे, आपण सलाह फर्माविली. ते मसलहतीस बहुत मुनासीब. आइंदा कोणासही सरेमाय वेगळेपण दिसत नाहीं. दोन्ही उमद्या दवलतीच्या तकवीयतेस नेक व मुफीद आहे. लेकिन, मिस्तर मालिट यांचा सवाल आग्रहानें कीं, जनराल जातीनें कलकत्याहून मुकावल्यावर आले. सरकारांतून हरीपंत सरंजामसुद्धां मोहिमेवर रुखसत व रवाना झाले. हे खबर त्यांस कलमी कर्ण्यांत आली. जनराल यांची दिलापासून खाहीष कीं, पंत मोईन यांणींच फौजफेरोजीसहित पुढे यावें. खुलस, मिस्तर मालिट यांच्या मुबालग्यावरून कियासांत आलें कीं, खुद्द हरीपंत सरंजामसुद्धा गेल्यावांचून फकद फौज गेल्यानें जनरलाची खुषी नाहीं. सबब, हुजुरांतून येविसीं पंतमोईन यांस लिहून पुढें जाणें होय तें करावें. ह्मणोन निजामद्दौला बाहादूर यांस फारसी पत्र नानाकडून.

पत्रांक ३५० श्री १७१२

विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. ढोकलसिंग याजवर खंडेराव हरी यांणीं जरब दिल्यामुळें निघोन गेले, त्यास बुंदले यांच्या सरकारचा भाऊपणा, यास्तव च्यार रुो त्याजकडून करार करून घेऊन त्याची जागा

पणें त्याजकडे ठेवावी, यांत भाऊपणाही राहून कार्य होईल, त्याचे कबिले वगैरेस उपसर्ग खंडेराव हरी याजकडून न लागे तें करावें, म्हणोन लिों तें सविस्तर कळलें. येसीयासी, आपलीं पत्रें पूर्वी येविसीं आल्यावरून राजश्री खंडेराव हरी यासी लेहून पाठविलें होतें. त्यावरून मारानिलेनीं खोणीकडे मातबर पाठवून, त्यास घेऊन येऊन, सरजेतासिंग व ढोकलसिंग याचा कलह भाऊपणाचा होता त्याचा ठराव, दोन हिसे ढोकलसिंग व एक हिसा सरजेतासिंग, या प्रों करून हिसेरसीद फौजखर्च दोघांकडून च्यार रुो ठराऊन घ्यावे, असें ठरविलें आहे. ढोकलसिंग याचे कबिले वगैरेस उपसर्ग खंडेराव हरी याजकडून लागणार नाहीं. येथून लिहिण्यांत आलें आहे.

पत्रांक ३५१ श्री. १७१२

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. इकडील वर्तमान तरीः टिपूनें कोयेमुदुराजवळ छावणी केली.आयाज वगैरे नायेमार झाडींत आहेत. परंतु नायेमाराचे लोक फार जाया केले. त्याचा चिलर उपद्रव आहे. परंतु बाहेर येऊं सकत नाहींत. कित्येक आनंतशयेनच्या सरहदेस गेले ह्मणावयाचें वर्तमान टिपूनें ऐकून पहिलेपासून त्या स्थलावरी दांतच आहे. याविषयीं कांहीं हो, तें स्थल घ्यावें ह्मणून तजवीज करून फौजेची तयारी आहेच. त्यांतही मुलकांतील फौज जमा करीत आहेत. आनंतशयेनचे सरहदेस लागून फौज उतरविली आहे. हें वर्तमान तेथील राज्यास कळून, तेही आपली फौज घेऊन आपले सरहदेंत उतरले आहेत. हामेशा इंग्रेजी येक पटालंबार रानांत होतीच. मध्यें गडबड जाहली, ते वेळेस दोन हजार बार आणखी पाठविला. तीन हजार बार मध्यें दोनी फौजेच्या उतरलेत. हें वर्तमान आत्रीस्थ गौरनरांनीं ऐकून आपले हुशारींत लागलेत; आणि टिपूस पत्रें लिहिलींत कीं: तुह्मीं आमचे जमीदाराबराबरीं द्वेष वाढवून त्याचें मकान घ्यावयाची तजवीज केलियावरून पाहतां आह्मांसीच विरुद्ध करावें ह्मणून दिसोन येतें. तुमच्या आमच्या करारांत तें स्थल दाखल आहे ऐसें असतां, घडीघडी उपद्व्याप करणें युक्त नव्हे. जर करावें म्हणूनच असल्यास आह्मांस त्याहावें. आम्हीही त्याचे कुमकेस सिद्ध आहों. यावरी जें युक्त दिसेल तैसें उत्तर पाठवणें. त्याप्रमाणें आह्मी अमलांत आणूं. याप्रमाणें पत्र गेलें आहे. याचे उत्तराची मार्गप्रतिक्षा करितात. दुसरे आपले तयारींत दारूगोळे वगैरेच्या सरंजामांत आहेत. यावरी जैसें होईल तैसें सेवेसी लिहिजेल. भटाचे घरचें वृत्त. अवघी बचबच आहे. मित्रही कामांत फिरतात. परंतु त्याचीही निभावणुकेची खातरजमा होत नाहीं. ऐसें काम विघडलें. सेंजणास वसूलबाकीस गतवर्षींचे वसूल देणें. तेव्हां हाल विद्येमानची गती काय? असो. सर्वत्र हेंच म्हणतात जे, पुन्हां जेनपद स्वेताकांत होईल. ईश्वरें क्षेम करावें. श्रेष्ट स्थलचे नृपास पैत्य-

भ्रमाचा उपद्रव फार जाहला होता. सबब पांच महिने काम आतर जाहलें. त्या समई लोकलाजें येतों म्हणून लिहिलें होतें. त्यास, तेथील लोकांनीं उत्तर पाठविलें कीं, तुम्ही येक वर्षी तेथें असणें. ऐसीं पत्रें रवाना जाहलीं. इतकियांत केमल निधोन गेला. तदनंतर पत्रें येऊन पावलीं. त्यांवरून पाहतां नूतन यावयासी च्यार दिवस लागतील, ऐसें दिसतें. यावरी च्यार महिने जाहाजें यावयाचा हंगाम राहिला. यावरी पाहावें. जैसें मागाहून वर्तमान येईल तैसें सरकारचे जोडी बराबरी तपासिलें लिहिजेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३५२ हु. १७१२

रफआत व अवालिपनाह तुजारत व मआलिदस्तगाह अजम बेल चियोर जुजेवासदे करवाल सकट तारबंदर गोंवा महफुंज बाशद. आजितर्फ महाराज गिरानी जिजाऊसाहेब बअदज दुवा आंकी. बहुत रोज गुजरले असतां, अजम विजरई यांकडील व आरपुअतपनाहकडील खत यखलास नमतम रसूल होऊन, शादमानी रुएदाद न जाहली. बईसबब कलमीं केलें. जातें जे, साहेबीं अजम विजरई यास भाई म्हणविलें. विजरई लोक सखुनास गुंतावयाचे नव्हेत. असें असतां सखुनास गुंतोन, साहेबांस तुम्हीं व त्यांणीं कलमीं करून पाठविलें. त्यावरून साहेबाचा जजीरा साहेबाचेकडे आहे, ऐसें दिलामध्यें जाणोन तुमच्या यकसखुनावरी व कलमी केल्यावरी साहेब बेफिकीर आहेत. साहेबीं भाई म्हणविलें. आणि कार्यास बहुत रोज गुजरले. त्याहाजा पैदरपै कलमीं करावें लागतें. ये बाबेचा सर्व प्रकारें अभिमान व इरे विजरई यांणीं व तुम्ही खातरेमध्यें आणोन, मुंबईकराकडे खत पत्रें कलमीं करून, हुजरे पाठविले आहेत. सारांश, सरकारचा जजीरा सरकारांत ताबीन होऊन साहेबाजवळ वचन गुंतलें आहे त्या क्रियेस मुक्त होऊन, यकसुखनीपणाची नेकी व खुशी सर्व टोपीकरांत जाहिरीस येई, तें करणें वाजीब व लाजीम आहे. वरकड आज्ञेप्रमाणें चिरंजीव राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार कलमीं करितां मालुम होईल. जिआदा+++++++१ लेखनसीमा.

पत्रांक ३५३ श्री. १७१२ चैत्र शुद्ध ३

रु.

पो छ १५ रजब तिसैन.

शेवेसी श्रीराम सदासीव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना छ १ रजब येथास्थित असो. विशेष. राजश्री सेनासाहेबसुभा याचें छ ४ जमादिलाखरीं गंगेहून कूच होऊन छ ५ रोजीं नंकलपल्लीचे मुकामीं नागपूरची डाक आली

भवानी नागनाथ मुनसीस फाल्गुन शु॥ ३ देवाज्ञा जाल्याचें वर्तमान आलें. मुनशीविशीं सर्वांस हळहळ वाटली. गुंडो शंकर कारकून पेशजी आडंपल्लीकडे पाठविला आहे. वेंकटराव गोड्याचे गांव तेलंग प्रांतीचे लुटितो. वस्ती होऊं देत नाहीं. गुंडो शंकर याणें त्यांजकडील एक ठाणें घेतलें, व लष्कर मार्गांत जातां येतां खेहून येक दोन घोडीं नेलीं, म्हणून सिरपुरचे मुकामींहून गुंडो शंकरास कुमक किसनसिंगास पाठविलें होतें. तेव्हां वेंकटराव गोड गुंडो शंकरास भेटला. छ १२ रोज चंद्रपुरास मुकाम आला. तेथें आठनव मुकाम जाले. हुताशनी करून चिमाबाई व वेंकाजी भोंसले राजेश्वरास गेले होते. ते छ २० रोजीं चंद्रपुरास आल्यावर, छ २१ रोजीं कूच करून, छ २५ रोज भृगुवार तिसरे प्रहरीं नागपुरास वाड्यांत दाखल जाले. देवघरापुढें दोन घडी बसले. रयत व कमावीसदार व राजाराम मुकुंद, बंगाल्याचे सुभे यांणीं वगैरे नजरा केल्या. चिमाबाई येतांच बाहेर शंकरदरियाजवळ खंडोजी भोंसले याजविशीं बहुत रडली. शहरांत येतांच वाड्यांत जावें ते गेले नाहींत. मागती बाळाबाई यांचे वाड्यांत जाऊन बसले. तेव्हां सर्वांणीं जाऊन समजाऊन आणिलें.बाईस वारंवार दुःख बहुत आठवतें. मुनशीचें वर्तमान ऐकून खाशास मुछ्यांस सर्वांस वाईट वाटलें. हुताशनी चंद्रपुरावर केली. तेथें नाचरंग कांहीं केला नाहीं. याप्रों खंडोजी भोंसले याचें वाईट कोणासच वाटलें नाहीं. त्याचें स्मरण खाशास किंवा मुछ्यांस कोणासच होत नाहीं. असा बंदोबस्त येकच कट करून कृत्रिम करून अनर्थ केला. छ २७ रोज प्रातःकाळीं स्नान करून स्वारी मुनसीचे घरास गेली. त्याचे चिरंजिवाचें समाधान करून, दोन घडी बसून, राजाराम मुकुंद, बंगाल्याचे सुभे यांचे घरास गेले. त्यांचे बंधूस बंगाल्यांत देवआज्ञा जाली. त्याची स्त्री सती गेली. राजाराम मुकुंद याचें समाधान करून आले. छ २८ रोज प्रातःकाळीं स्नान करून, प्रहर दिवसां स्वारी फुटल्या तळ्यास गेली. तळें पाहिलें. तेथें नवा बाग केला आहे, तो पाहिला. च्यार घडी निद्रा केली. बागांतील केळें आणून पठाण वगैरे लोकांस वाटलीं. साईकाळीं स्वारी आल्यावर स्नान करून, सोमवारचें भोजन केलें. छ २९ रोज प्रातःकाळीं स्नान करून, संवत्सरप्रतिपदेचें निशाण जरीपटक्याची पूजा केली. मुछदमंडळी वगैरे झाडून आले. देवप्रतिष्ठा जाली. श्रीरामनवमीचा उत्सव आहे. पूजाअर्ती जाल्यावर चार घडी दरबार जाला. बंगाल्यांतील सावकार आला आहे. त्याणें हत्ती नग दोन नजर केले. येक मोठा व येक लाहाण आहे. महिपत दिनकर यास छत्तीसगडास जावयास मुहुर्तेकडून राहुटी बाहेर द्यावयास सांगितलें. आठाचौरोजांनीं जातील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३५४ श्री १७१२ वैशाख शुद्ध १

श्रीमंत राजश्री बाबासाहेब साहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक अंबाजी इंगळे रामराम विज्ञापना येथील क्षेम ता छ ८ माहे शाबान येथें महाराजाचे कृपेकडून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री जगोबा बापू आम्हांस येथें ठेवून गेले. लोकांची निते धरणी. लोकांचें मनांत कज्या करावा हें मानस पाहून, येथेंच च्यार रोज राहावें हें सांगोन, मथुरेस जावयास गेले. सरकार–किफायतीची गोष्ट सांगितल्यास लोकांस धाईट दिसती. त्यास धण्याची आज्ञा आली तर च्यार रोज मेवाडांतून कामकाज करून येईन. येथें रिकामे बसोन काय करावयाचें आहे ? त्यापेक्षां मेवाडाचें कामकाज आटोपोन धण्याचे पायाकडेस येईल. त्यास मेवाडांत जावयाची आज्ञा जाहाली पाहिजे.*बहुत काय लिहिणें ? लोभ करावा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३५५ श्री १७१२ आषाढ वद्य.

राजश्री आपाजीराव स्वामींचे सेवेसी.—

विनंति उपरी. इसमालबेग नारनोळावर होता. तेथें त्याचीं पलटणें फुटोन आपलेकडे संधान लाविलें; व मारवाडी यांजकडेही संधान लागलें. तेव्हां फक्त मोगली फौज मात्र च्यार हजार पर्यंत राहिली. तेव्हां तेथून कूच करून जैपूरप्रांतीं चालला. नंतर आपले फौजेनें निकड केली. तेव्हां पुढें निभाव न होय तेव्हां पाटण परगण्यांत लहान किला आहे, तेथें इसमाल्या व मारवाडी यांनीं मुकाम केला. नंतर जेष्ठ शुद्ध दशमी व एकादशीस दोन लढाया जाल्या. त्याजकडील माणूस जखमी व ठार फार जालें. आपले कडलि ही थोडे बहूत जाया जाले. सारांश तूर्त आपली फौजेची जरब त्याजवर चांगली आहे. राजश्री बापूजी होळकर व कासिबा होळकर पुढें फौजसुद्धां आहेत. हालीं राजश्री आलीबहादर यांजकडील फौज दोन हजार राजश्री सदाशिवपंत यांचे चिरंजीव बलवंतराव याजबराबर देऊन रवानगी केली. सारांश तिघांही सरदारांचे चित्त शुद्ध नाहीं; आणि मसलत तरी उभी राहिली आहे, म्हणोन लिहिलें व फडणिसीचे कानू कायद्याचें बोलणें होऊन यादी ठरल्या आहेत, त्याजवर मखलाशा होऊन खाशाचा करार करून द्यावयाचा आहे, तो जाला म्हणजे सेवेसी तपसीलवार लिहून पाठवूं म्हणोन; व तुमचें राहणें तूर्त च्यार महिने जालें, पुढें येणें कधीं घडेल पहावें, म्हणोन; लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास, सांप्रत इस्मालबेगाचाही मोड जाल्याचीं पत्रें आलीं आहेत. त्यावरून पाटीलबावा यांची निष्ठा श्रीमंतांचे पायासी आहे

---

*हस्ताक्षर अंबोजी इंगळ्याचें.

त्यापेक्षां अशाच गोष्टी घडतील. संतोष जाला. पुढें होईल तें ल्याहावें. फड-णिसीचे कायद्याचे यादीवर करार होणें. त्यास, तुह्मांस जाऊन किती दिवस जाले, तेव्हांपासून करार होतच आहे. आणि पाटीलबोवाचा व आमचा भाऊपणा. त्यापक्षीं इतके दिवस लागूं नयेत. करार जालेच असतील. लिहून पाठवावे. तुह्मांस पाटील बावांनीं ठेऊन घेतलें म्हणोन, त्यास कांहीं कामाकाजाचे दिवस असतील म्हणून राहविलें असेल. उत्तम आहे.

पत्रांक ३५६ श्री १७१२ भाद्रपद शुद्ध २

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक जनार्दन सिवराम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता भाद्रपद शुद्ध २ पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकांचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमानें: आषाढ वा सप्तमीस सरकारची जोडी रवाना जाहली, तें पाऊन सकल वर्तमानें ध्यानारूढ जाहलीं असतील. अस्विनीस्थ नृपाचें वर्तमान दोन तीन पत्रीं तपसिलें लिहिलें तें ध्यानांत असेलच. विद्यमानी गौनर होरन बहादर यांनीं आरणीचे दत्तपुत्र श्रीनिवासराव यांस अधिकारावरी स्थापिलें. आस्विनीस्थ नृपासी व आहालिकारासी आणि आत्रीस्थासी फारच वैमनस्क येऊन पडलें आहे. यासमई जें यांनीं केलें तें केलें. तीन अधिकार उभयेता बधूंसच आहेत. दुयेम गौनर कासमेजर यांचें कांहीं चालत नाहीं. खामाखाये आस्विनीस्थ दत्तपुत्रासच स्थापावें ह्मणून फार आग्रहांत आहेत. त्यास निमित्य व येक आसरा नबाबसालाचा धरून हें काम करावें, ह्मणून आह्मांस बोलाऊन सांगितलें जें: याविषईचें अगत्य श्रीमंतांस असावें. त्यांनीं उपेक्षा केल्याकरितां ज्याच्या मनांस जैसें आलें तैसें करितात. याकरितां याविषयींचा बंदोबस्त करावा. मसविद्याप्रमाणें पत्रें आल्यास, श्रीदयेनें न्यायमार्गच केला जाईल. त्यास, तीन पत्रें यावीं. श्रीमंत महाराज शाहूराजे यांचें पत्र यावें. जे, पूर्वीं आह्मी सराचे बेलड केमळ यांस चंदावराविषयीं लिहिलें होतें. त्यांनीं दरजबाब पाठविले नाहींत. आह्मी ऐकिलें होतें जे: इंग्रेज लोक न्याये पंचायतीकडून काम पाहतात. ह्मणून ऐकत होतों. विद्यमानीं बहूतच अविहित आमलेंत आणिलें आहे. तें काय ह्मणजे, तुळजाजीराजे यासी संतती नाहीं. तेव्हां आमच्या दायेजाचे मुलास दत्त घेतले तें किंनिमित्य? म्हणजे अस्सल कौमेचा यास अधिकार, पण इतरांस नाहीं. प्रतापसिंग राजे यांनीं येक कलवातणीस ठेविलें होतें. ते न व्हता, व्यंकणा म्हणणारासी तीसी संमध पडला. ऐसें असतां, तिला येक लेक जाहाला. त्यासमई प्रतापसिंगराजे म्हणाले जे, हा मूल मजसारिखा नाहीं, व्यंकणा सारिखा आहे. ऐसें म्हणून तिजला इतराजीखाले ठेऊन, त्या मुलास नजरबंद ठेविलें होतें. ऐशा

मुलास तुळजाजी याचा भाऊ म्हणून, त्याला पट बांधिलें आहे, म्हणून ऐ-किलें. त्यावरून हे न्यायेरीती कोणती ? दत्तपुत्र घेतला त्यास सोडून देऊन, गैरवारसास आमचे घर देणें फार अनुचित. तुम्हांस व आम्हांस स्नेहभाव विशेष आहे. तनमुळें लिहिलें जातें जें, आमचे घर काढून ऐशीया कंचिनीच्या मुलास देणें अविहित. मुख्य आमच्या कौमांत पुत्र नसल्यास दत्तपुत्रच अधिकारी, ऐसें आहे. यांत आपल्या चित्तास वित्यास भासल्यानें, आपण अपरोक्षी आमच्या शास्त्रप्रकारें न्यायेरीतीनें आमच्या दायेजाचा मूल तुळजाराजे यांनीं पोसणा घेतला. त्यासच आमचे घरीं ठेविजेसें केलें पाहिजे. येखादे आपले चित्तीं असेल कीं सराचे बेलड केला त्याप्रमाणें केलें. हें मनांत असेल तरी, हें वर्तमान समग्र आमचे स्नेहांत लाट कारणवालिस यांस विनंति लिहून त्याचा हुकुम घेऊन आमचे मुलास आमचे घरीं ठेविलें पाहिजे. आमचे मुलास आमचे घरीं ठेविनास गेल्यानें तुमच्या व आमच्या स्नेह्याचीं अभिवृद्धि कसी होईल? आह्मीही हे अर्थ आववे सूचना केली आहे. कुंपणीची आमची दोस्ती आहे. त्यापक्षीं आपले चित्तीं ही स्नेह्याभिवृद्धि करावी म्हणून असेलच. परंतु इतरता येणार नाहीं; व जेणें करून हरदो तर्फेची खुषी होऊन दोस्ती राहील तेच आपण करितील, हे आमच्या चित्तांत खातरजमा असे. दोस्तीचे ठाई ज्यादा कलमी कायेद्याप्रमाणें महाराज राजे यांचे मोहरेनिशी येक पत्र यावें. तैसेच सरकारचे पत्रांत ल्याहावें जे: महाराजांनीं लिहिल्याप्रमाणें तुम्ही आमलांत आणावें. येणेकरून खुषी होऊन दोस्ती राहात आहे. जेणेकरून आमचे राजेयाचे घरचा बंदोबस्त होऊन संतोष होतील तें करावें. यावरी ऐसें सरकारचें पत्र मर्जीस आल्यास सरकारचे तर्फेनें जे ल्याहावयाचे भाव ल्याहावे. तिसरें, आपलें खास पत्र यावें जे, येथील कितेक बाबती राजेयांनीं व श्रीमंतांनीं तुम्हांस लिहिले आहेत. त्याप्रमाणें संवस्थानचा बंदोबस्त करून उत्तरें लवकर पाठवावीं. येणेंकरून सकल लोकांस संमत व खुषी होत आहे. जेणेकरून न्यायेप्रकारें कोणी शब्द ठेविनासारिखें आम्ही लिहिल्याप्रमाणें अमलांत आणावें. सर्व जाणत्यास विशेष काय लिहिणें असे. ऐशीं तिन पत्रें आणवावीं म्हणून सांगितलें; व मसविदाही त्यांनींच ठराऊन दिल्हा. त्याप्रमाणें सेवेसी विनंति लिहिली आहे. तरी याविषयींची तजवीज करितां लिहिल्याप्रमाणें पत्रें यावीं. येणेंकरून सरकारास कीर्ति येत आहे. दुसरे संवस्थानचा अभिमानही प्रसिद्ध होऊन दाब राहत आहे. नूतन स्थापना जाहाल्यासीवाय सरकारचे लक्षांत येत नाहींत. अधिकारस्थ विप्रास आकाश दीड बोट आहे. कोणासही खातरेंत आणीत नाहींत. आपले ठिकाणीं जसी सरकारची मोहर आहे तद्वत पंतप्रधानाची मोहर केली. असो. आपले घरांत कांहीं करोत. परंतु सरकारची बरोबरी व सरकारासी स्पर्धा केल्यानें कल्याण कैसें होतें. राजपत्न्या वगैरे सर्वत्रांस बेदिल केलें आहे. हें समग्र तपसील तप-

सिलें सरकारचे जोडीबराबरी सेवेसी लिहिले आहेत. त्यावरून ध्यानास आलें असेल. यांचीं उत्तरें लवकर यावीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ३५७ श्रीव्यंकटेश प्रा. १७१३

शेवेसी सां नमस्कार विनंती ऐसी जे. स्वामींनीं दोन नकला व एक पुरवणी कित्ता खास दस्तूरची चिठी पाठविली ती पाऊन भाव समजला. स्वामींनीं लिहिलें तें सर्व यथार्थ आहे. मीहि स्वामीच्या आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक करितों. स्वामीकडे जाऊन आलों याच तर्कावर कयास बांधून रास्ते यांस लिहिलें असतील, इतकाच अर्थ. आपण चित्तांत संदेह आणूं नये. वरीष बारा जाल्यासहि लेख किंवा उच्चारांत गोष्टी येणार नाहीं. आदिपश्चात सर्व ध्यानांत धरून कोण्या रीतीनें आज्ञा कशी कशी जाहली आहे त्याच बेतानें कार्यास प्रवर्तलों आहें. इकडीलविशीं जशी पाहिजेल तशी खातीरजमा असली पाहिजे. पेशजीं दुर्गचें टिप्पण करून पाठविलें आहे, म्हणोन सेवेसीं विनंती लिहिली होती. त्यास, एक वेळ तेथपर्यंत माणूस जाऊन वाटा चालत नाहींत. दुर्गाभोंवताले स्वार फिरत आहेत आणि दुर्गचें संधानहि भाऊकडे लागलें आहे. अशांत, आपण गेलें असतां पत्र पुढें रवाना होणार नाहीं, म्हणोन माघारा आलों. त्यानंतर सर्वेच त्या बा। जोडी करून देऊन तेथें एक दोन पत्ते पूर्वील वळखीचे बोलेनें संधान होतें तें सांगून, मुख्य कोठें आहे तेथेंच रवाना केलें आहे. माणून येथून गेला तो शाहाणा आणि इतबारी, यांत गुंता नाहीं. दोन रोज अधिक उणें, उत्तर घेऊन येईल. कामकाज बनून येणें तेथील आस्था प्रमाण. राजश्री आपाजीराम संधानाकरितां आला आहे ह्मणोन येथें आल्यावर ऐकिलें, हेंहि खरें. पूर्वीं कराडीं असतांना पळून सावनुरास आला आहे, ऐसें ऐकिलें होतें. येथें आल्यावर व स्वामीच्या लिहिल्यावरून संधानास आला आहे, असें समजलें. पूर्वीपासून त्याचें लक्ष्य स्वामीच्याठाई नीट आहे आणि माझे सर्व ठाईंहि विश्वास आहे. त्याजकडे कोणासहि पाठविल्यानें आम्हांकडे वळेल. यांत गुंता नाहीं. परंतु मुख्य बडबड्या व भोळा. चित्तांत गोष्टी राहत नाहींत. कागदींपत्रीं जाबसाल लाविल्यास, आपल्या महत्त्वाकरितां पत्रें दाखवायास देखील अंदेशा करणार नव्हे. तो साधक नव्हे. सिद्ध पुरुष आहे. तेव्हां इकडील अडचणी त्याचे ध्यानांत कोठून भरणार? याजकरितां कागदींपत्रीं संधान नीट पडणार नाहीं. त्याकडेहि कोणसा आप्त पाहून निरोपानेंच स्थूलमानेकडून तेथीलहि भाव घेतों. मुख्य मूळापासून काम होऊन आल्यास सर्वोपरी चांगलें. त्याच प्रयत्नांत आणखी एकदोन संधानें आहेत. एक वेळ हरप्रयत्नें श्रीमंतांनीं आपणांस सांगितल्यावर शेवकहि हुंडी तो उतरून देतों. पेस्तर सिद्धीस नेणें स्वामीकडे. आमचे चुलते तीा रा। लक्ष्मणराव व रामराव ह्मणोन, शाहादराच्या सैन्यांत स्वामी होते त्या वेळेस

त्यांची भेटी स्वामीस करविली होती. आणि त्यांचे प्रयोजनास स्वामी अनुकूल जाले होतेत. बहुतकरून स्मरणांत असेल. तीा लक्ष्मणराव तो त्यांजकडेच आहेत. तीा रामरावकाका हे मात्र घरांस आले होते ते आजपर्यंत घरींच होते. सांप्रत आमच्या भेटीकरितां आणि एकदोन मुलीहि पाहून आहेत. ते येथेंच आहेत. त्यांसींहि वरचेवर बोलण्यांत येत जातें. पुर्ते पक्केंपणें निखालसता आमची जाली म्हणजे त्यांची रवानगी मुख्यापर्यंत करून, बनल्यास हुजुरांत राहून कामकाज करून वरचेवर पाठवणेस येईल; आणि योग्यताहि आहे. चित्तावर घेतल्यास सर्वहि करितील. हें जाणून त्यांची रवानगी करावी ह्मणतों. पुर्ते समर्पक दिसल्याप्रमाणें करीन. कोण्हेविशींहि इकडील चिंता आपण करूं नये. आपल्या वाटेस येई तोच प्रकार इकडून घडेल. पत्र पाहून विसर्जन करावें. लोभ करावा हे विनंती. तीा रा रामरावकाका यांणीं स्वामीस पत्रें लिा आहेत. विदित होईल. हे विनंती.

पत्रांक ३५८ श्री १७१३ वैशाख सुमारें.

पुरवणी सेवेसी विज्ञापना

× + + घडवाव्या. त्या आह्मांपासून जाल्या नाहींत. त्याचीं कारणें तशींच पडलीं. सांगतां येत नाहीं. त्यास, आतां श्रीमंत राजश्री नाना यांणीं तह संबंधीं बोलणें ऐकोन घेऊन तहावरील गोष्ट पाडित असल्यास, मीच पुणियासीं येतों. याचसंबंधें आह्मीं टिपूस लेहून पाठवून, लाख दोन लाख रूपयांचें जवाहीर नजर करावयासीं घेऊन येतों. आमचें बोलणें सर्व ऐकून घेऊन, जेणेंकरून टिपूचीं दौलत राही अशी एखादी तोड काढून समेटांत आणावें. असें बहुत तपसीलें विनंती करावयासीं सांगितली. आणि आपल्यास येणेविशीं श्रीमंतांनीं आज्ञा केल्यास, टिपूकडून जवाहीर नजरेचें आणावयाचें. त्यास वाटेनें सांडणीस्वार निभावले पाहिजेत. त्याविशीं श्रीमंतांचीं पत्रें राजश्री तात्या यांसीं व राजश्री भाऊ यांसीं असावीं. नाहीं तरी, मध्येंच लुटले जातील. असें सांगितलें. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. सेवकास बदरीजमानखान वस्त्रें देत होता. घेतलीं नाहींत. तेव्हां एक घोडा लहानसा द्यावयासीं लागला. तोहि मीं घेतला नव्हता. मी निघोन पुढें सात आठ कोश आलों. तेथें मागाहून माणसाजवळ देऊन मजकडे पाठविला. तत्रापि मी घेत नव्हतों. माणूस माघारा घेऊन जाईना. तेव्हां तो घोडा मी बरोबर घेऊन आलों आहें. बदरीजमानखान बहुत बोलणीं बोलला आहे. सेवेसीं आल्यावरी समक्ष विनंती करीन. करवीरास आलों, तों महाराज श्रीकृष्णास्नानास कन्यागत आहे ह्मणून गेले. पांच सात रोजीं येतील. आले ह्मणजे येथील गुंता उरकोन सेवेसीं येतों. बदरीजमानखान याचे बोलण्याचा भाव

आतुरपणा बहुत दिसतो. कसेंहि करावें आणि तह होय अशी गोष्ट व्हावी असें बोलणें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.*

पत्रांक ३५९ श्री १७१३ वैशाख वद्य १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरी बल्लाळ स्वामी गोसावी यांसी:—पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्हीं पत्र छ ५ साबानचें पाठविलें तें छ १३ मिनहूस प्रविष्ट जाहलें. व दुसरें पत्र छ १० साबानचें पाठविलें तें छ १८ मिनहूस पावोन लेखनाभिप्राय अवगत जाहला. नवाबाची भेटी प्रथम दिवशीं जाहलियावर पत्र आलें त्याचें उत्तर पेशजींच रवाना जालें आहे. नवाबाशीं मसलतीचीं बोलणीं ठरावांत येऊन, तुम्हीं कूच करून सरकारचे फौजेंत कर्नूळचे मुकामीं दाखल जाला व नवाबाची फौज सामील जाल्यावर पुढें जावयाचा इरादा होईल. इंग्रजानें बेंगरूळचा किल्ला छ १५ रजबीं घेतला म्हणून किन्विस लिहून आलें त्याजवरून लिहिलें तें कळलें. इंग्रज श्रीरंगपट्टणकडे जाणार. मार्ग दुर्घट. तथापि बातमी येतच आहे तशी लिहिन म्हणून लिहिलें तें कळलें. व दुसरे पत्रीं मजकूर कीं, नबाबाची फौज चाळीस कोसाचे अंतरानें इंग्रजांजवळ जाऊन पोंचली. दरम्यान टिपू आहे ह्मणून अवघड. सरकारची फौज दहा हजार पुढें पाठवायची त्याची तयारी केली. त्यास नवाबाची फौज गेली त्याच मार्गें रवाना करितों, म्हणोन लिहिलें तें कळलें. टिपूस व इंग्रजाचे फौजेस आठ कोसांचें अंतर होतें. त्या पक्षीं मुकाबले झालेच असतील. बातमी येत जाईल तशी वरचेवर लिहून पाठवित जाणें. जाणिजे. छ १ रमजान सुहुरसन इहिदे तिसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. पो छ २७ रमजान, मुा नजीक श्रीरंगपटण.

पत्रांक ३६० श्रीव्यंकटेश प्रा. १७१३ ज्येष्ठ

शेवेसीं साा नमस्कार विनंती ऐसीजे. तीा रा आनंदराव बागलकोटेस आले आहेत. म्हणोन ऐकिलें आणि आपणासहि पुणेहून कळून लिहिलें. त्यांनीं आपल्या महत्वाकरितां बागलकोटेस राहून दक्षणेकडील बातमी पुण्यास रास्तेकडे लिहून पाठवीत असतात. त्यांत, मी पुणेस जात असतां मध्यें स्वामीकडूनच फिरोन आलों. त्याजवरून कयासानें लिहिलें असेल. आह्मीं तेथून आल्यावर कोणासहि भाषणांत आणिलें नाहीं. त्याचें लक्षणें नाहीं. ते संभूती उठऊन थोरथोरांमध्यें विक्षेप पाडावा हें पूर्वींपासून. त्यांत

* पत्राचा पहिला किंवा पहिले बंद गहाळ.

स्वामीची कृपा माझे ठाईं आहे. त्यास, इरप्रकारें रास्तेस लिहून पाठऊन त्यांत व आपणांत पुन्हां विक्षेप पाडावा, त्यायोगें मी स्वामीच्या पायांपासून दूर व्हावें, ही कवायत पुष्कळ भरले आहे. सर्वहि स्वामीच्या ध्यानांत असों द्यावें. मी बहुत सावधगिरीनें वर्तणुक करितों. स्वामिचें बोलणें किंवा लेख प्राणहि गेल्यास इतरांच्या दृष्टीस अथवा कर्णास स्पर्श होणार नाहीं, ही खातरजमा असावी. यांचें निदर्शन दिवसें दिवस कार्यावर समजत जाईल. हें पत्र आपण मनन करून सर्वच विसर्जन करावें. टिपूसाचें वर्तमान बेंगळुरापलीकडे झाडींत मागडीचा किल्ला आहे. तेथें सरंजाम ठेऊन, आपण पुढें करेशाकरेशांत, गीव्रिले शावंतगी म्हणोन पाहाडी लोक आहेत त्यांचे आसरियानें जबरदस्तीनें आहे. तूर्त मात्र, इकडील फौजा पटणपर्यंत जाऊन लूट करून घेऊन येतात. एंवदा प्रर्जन्यकाळीं कांहीं दम असल्यास उपद्रयाप करील. सोडणार नाहीं. केवळ तो यासमई बुडाल्यासारिखा आहे. परंतु, परिणामास जी गोष्ट उतरेल तीं खरी. अंतरंगचा भाव इंग्रजासीं स्नेह करून घेऊन, उपरांतीक इकडील समाचार घ्यावा, या याचनेत आहे. येविशीं इंग्रेजांशीं जावसाल फरांसिसांचे विद्यमानें विलायतींत लिहून पाठविला आहे, ह्मणोन कोणी कोणी तिकडील पक्षाचे बोलतात. सर्व निदर्शनास येईल तें खरें. आम्हाकडूनहि माणूस गेला आहे. त्याचें काय उत्तर येतें तें पाहावें. आणि तीा रामराव काकांसही रवाना करितों. कसें कसें उत्तर येत जाईल तें सेवेसी श्रुत करीत जाईन. एक वेळ स्वामीच्या विचारें पुन्हां त्याजकडील अनुसंधान लागावें, तेणेंकडून सेवकाची सेवा रुजू व्हावी, ही इच्छा आहे. परिपूर्ण करणार श्रीहरी आहे. हे विनंती.

पत्रांक ३६१ श्री व्यंकटेश प्रा. १५१२ ज्येष्ठ वद्य १०

पो छ २१ जिल्काद, इसने तिसैन.

स्वामीचे शेवेसीं. विनंती पोष्य भुजंगराव अण्णाजी सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ज्येष्ट वदि १० पावेतों स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामीकडून कृपापत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. येणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तर, सदैव कृपापत्र पाठऊन सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. इकडील वर्तमान पेशजी स्वामीकडून माणसें आलीं होतीं त्याजबा विस्तारें लिा आहे. विदित जाहलें असेल. बागडकोटेस तीर्थरूप आनंदराव आहेत. त्यांचें पत्र आलें होतें. त्यांत दक्षिणेकडील वर्तमान होतें जेः टिपूसो नागमंगळावर होता. त्यास साहा कोसांचे अंतरानें इंग्रज व मोगल उतरले होते. यांजवर छापा घालावा म्हणून तयार होऊन येत असतां, उभयतांस वर्तमान कळून, दुपारीने बुनगें मार्गे देऊन, पुढें सडे होते.

यांची त्यांची गांठ पडून दोन प्रहरपर्यंत गोळागोळीनें लढाई जाहली. उभयपक्षीं लोक फार जाया जाले. शेवट टिपूसो सर्वेच निघून पटणास दाखल जाहला. त्यानंतर, हेहि जाऊन लागलीच कावेरी पार होऊन शहर गंजम येथें उतरले आहेत, ह्मणोन वर्तमान. आणि कोणी कोणी म्हणतात जे, पटणास मोर्चे लाविले आहेत ह्मणोन, पटण घेतलें, टिपूसो,सडे पळून गेला ह्मणोन. असें तिकडे अनाहूत जालें आहे. ह्मणोन वर्तमान ऐकिलें ते शेवेसीं लिा आहे. यांत खरेंलटकें स्वामीस पुण्याहून बातनीचें वर्तमान येत असेल त्या अन्वयें पाहावें. एकूण तूर्तच्या प्रसंगीं तिकडील तों असें आहे. हेंच शाश्वत राहोन परिणामीं भटी नीट उतरली पाहिजे. राजकारण कोण्या थरास जातें पाहावें. स्वामीस सैन्याहून व पुण्याहून तहकीक वर्तमान येत असेल. तपशीलवार लिहून पाठवावें. व इकडूनहि माणसें गेलीं आहेत. अद्यापि फिरलीं नाहींत. येतांच तहकीक वर्तमान कळेल. त्याप्रों शेवेसी विनंती लिहीन. अवंदा नवरा व नवरी दोन्हीं चित्ताप्रमाणें मिळालीं नाहींत. याजकरितां लग्नें राहिलीं. पुढें ऋणानुबंध सर्वांविशीं स्वामीचे पाय आधारभूत आहेत. विशेष लिहिल्या उपरोध दिसेल. क्रिया केवळ उत्तम. सर्वज्ञाप्रति बहुत काय लिहिणें ! लोभ असो दीजे हे विनंती.

पत्रांक ३६२ श्री व्यंकटेश प्रा. १७१३ श्रावण वद्य २

पो छ १४ जिल्हेज

इसने तिसैन

स्वामीचे शेवेसीं. विनंती. भुजंगराव अण्णाजी कृतानेक सांा नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य ७ पावेतों स्वामीच्या कृपावलोकनें करून यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान लिहून लखोटा बागेवाडीकर सुभेदार यांच्या विद्यमानें पाठविला होता. शेवेसीं प्रविष्ट होऊन मजकूर विदित जाहला असेल. आज पावेतों त्रिवर्गाचें सैन्य पटणासमीप होतें. सांप्रत पर्जन्यकाळ आला याजकरितां, उभयतांनीं कार्याकारण पायचे लोक फिरंगीयाचे हमराहा करून; फौज घेऊन, माघारे चित्रदुर्ग व गुती या पट्टीस छावणीस येणार. टिपूसो आजपावेतों किल्ल्यांत होता. तो, किल्याबाहेर उभयकावेरीमध्यें दोन पेठा आहेत, त्या दरम्यान येऊन उतरला आहे. तहाचें बोलणेंहि लाविलें आहे, ह्मणे. या प्रकारें कोणी कोणी तिकडून आलेले गृहस्थ तहकीक वर्तमान ह्मणोन सांगतात. परंतु लष्करची व मुख्यमुख्य स्थलची बातमी पुण्यास येऊन परभारें स्वामीस विदीत होत असेल. त्यांत लिहिलें येईल तें खरें. येथें ऐकिलेलें शेवेसीं विनंती लिहिली आहे. मुख्यापर्यंत आह्मांकडूनही तीन प्रतीचीं पत्रें व माणसें गेलीं आहेत. त्यांतून एकहि पुनरागम नाहीं. तात्या साहेब! पूर्वी कोण्ही एक्या पादशहानें कृपावंत होऊन

एक्या ग्रहस्थास समुद्राच्या लाटा मोजून आणणें बद्दल शेवा सांगितली, ह्मणे! याचा अन्वयें माझ्या उमेदीसही शेवा योजून मुख्य स्थळाहून प्राप्त जाहली. तेव्हां दैवाची परिक्षा समजावी. आतांचा प्रसंग पाहतां, आमच्या हातून कार्य सिद्धी घडून स्वामीची व यजमानाची कृपा संपादणें उघड दिसत आहे. त्यांतहि श्रीहरीच्या चित्तीं काय आहे नकळे! कोणत्याहि जातींत एकवेळ जिवाहून अधिक चाकरी करून पुत्रपौत्रास अन्नास ठिकाण करितात. अस्मादिकांच्या जातीस वारंवार बशर्त चाकरीवर कृपा व्हावी ऐसें ठरलें. असो! योजिल्या प्रमाणें सरकारचाकरी घडल्यास सत्वरींच स्वामीचे पाय पाहतों. नाहींपक्षीं कृपेची वृद्धी असावी. अंवदा कर्नाटकांत फौजा गेल्यामुळें श्रीमंतांच्या नांवाप्रमाणें कार्य तों सिद्धीस गेलें, व बहुत लोक, गतराज्य व ग्राम व उद्योगगत व नूतन संपादन श्रीमंतांस कल्याण चिंतून खुशाल आहेत. आह्मींहि त्याहून अधिक चित्तांत आनंद मानून, रात्रंदिवस स्वामीच्या पायांचें स्मरण करीत, या ग्रामांत कुटुंबसुद्धां आनंदेंकडून आहों. स्वामीची कृपादृष्टि पूर्ण असावी. मीहि एक वचनाचा दास स्वामीचा आहें. विसरूं नये. ही विनंती उभयतांसहि मिळून आहे. लोभ करावा. हे विनंती.

पत्रांक ३६३ श्री. १७१३ श्रावण वद्य २

राजश्री तुकोजी होळकर गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. राजे माणिकपाल संस्थान करोली मंडरावल यांजकडे सरकारचा सालाबंदी ऐवज येणें. त्यापैकीं बाकी बहुत राहिली आहे. त्यास, तुह्मीं फौज पाठवून, संस्थानिकास जरब देऊन, ऐवज बाकी सुद्धां महिपतराव कृष्ण व रा रामचंद्र माहादेव यांचे विद्यमानें वसुलांत येऊन, पुढील सरकारचे सालाबादी ऐवजास नेहमीं गांव लाऊन देवावा, याविशीं पेशजी तुह्मांस लिहिलें असतां, अद्याप बंदोबस्त यथास्थित जाहला नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जालें. त्याजवरून हें पत्र लिहिलें असे. तरी तुह्मीं संस्थानमजकुरीं फौज पाठऊन, संस्थानिकास जरब देऊन, सालमजकूरपर्यंत मागील बाकीसुद्धां ऐवज मार निलेकडे वसूल होय तें करणें. व पुढें सरकारचे ऐवजास गांव नेहमीं लावऊन देवऊन, अमल सुरळित चाले तें करणें. जाणिजे. छ १४ जिल्हेज, सुा इसन्ने तिसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें! हे आशीर्वाद. मोर्तब असे.

पत्रांक ३६४ श्री १७१३ श्रावण वद्य ८

श्रीमंत महाराज राजश्री नाना साहेब स्वामीचे शेवेसीं:—

आज्ञाधारक शामराव बल्लाळ कृतानेक सा नमस्कार विज्ञापना ता छ२१ जिल्हेज सोमवार दोन प्रहर दिवस महाराजाचे कृपावलोकनेंकरून मुकाम वरुड नजीक वाफगांव मंडळीसहवर्तमान येथास्थित असे. विशेष. दत्तु खिजमतगार यार्णे मल्हारजीस तयार करून रातोरात काढून न्यावें हा विचार पका जाला. हीं बातमी रा भगवंतराव बल्लाळ दिवाण मानिले याणें जलदी करून सिबंदीचे लोक ममतेचे दत्तूकडे पाठवून, दत्तूस हस्तगत केलें. हा मजकूर मल्हारजीस कळतांच त्यांणी दत्तूची कुमक केली. ह्मणोन सिध्याहातीं मल्हारजीसही धक्के मारून वाड्यांत अटकाऊन भोंवताली चवकी बसविली. खूनकरी दत्तु व खासा मल्हारजी कैद केला आहे. त्यास महाराजांनीं, मतकर होळकरांचा मामा वाकडू पा सेवसी आलाच आहे, त्याची खातर रक्षावी. हा प्रसंग उपयोगींचा आहे. तीर्थस्वरूप राजश्री नारायणराव व सखारामपंत यांजकडे रातोरात दत्तुखिजमतगारास कैद केल्याचें वर्तमान लिहिलें आहे. त्यांणीं श्रुत केलें असेल. पक्की बातमी भगवंतराव यांजकडे सूत्र आहे, तिकडून आली. महाराजांचे पायांचे प्रतापें जें होणें तें होत आहे. उत्तराची आज्ञा व्हावी. बहुत काय लिहिणें ? कृपा करावी. हे विनंति.

पत्रांक ३६५ श्री (नकल) १७१३ आश्विन शुद्ध १

राजश्री बळवंतराव माहादेव कादार पा आमझरें गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माहादजी शिंदे दंडवत. सुा इसन्ने तिसैन मया अल्फ. बद्दल देणें विनायक माहादेव व नारो कृष्ण कारकून निा बक्षी. यांसीं वेतन जातीस व मुदबखचे रोजमुरे व शागिर्दपेशा वगैरे बाबत. ता सन इहिदे तिसैन अखेर साल बा करार चिठ्या एा

८२८०	वेतन व शागिर्द पेशा वगैरे दरसाल रुा१८२० प्रा हिद छ १७ सफर सन सबा ता सन इहिदे तिसैन अखेर साल माहे ५४८१८ आकार रुा८२८०
२१४॥	मुदबख बा वगैरे सालिना ७०२ रुा प्रा हिा छ ९ जाखर सन इहिदे ता छ १७ सवाल येकंदर साल माहे ३८२०
४३९।	दफ्तरखर्च निा बक्षी खाा कागद व समया
११७	खाा उंटनफर ¦१ एकूण रुा
१६४९॥।	चंदी व लागवड घोड्यास व उंटास इा सन तिसैन ता मन इहिदे तिसैन दुसनला रुा

१४६। सारवान व मसालची यांचे हिशेबाबद्दल रुा
१४३। ग्वा तेल दीपास व मशालेस.

१०९९०

पैकीं आदा, पातशाई माहाल पौ मा आपाजीराम फडणीस रुा ५५०० बाकी देणें रुा ५४९० पैकीं पा बडोदे वगैरे माहाल येथील सन सलास तिसेनचे रबीचे ऐवजीं वरात लाऊन दिल्ही रुा २७४०. बाकी देणें ते २७५० रुा एकूण दोन हजार सातशें पंनास रुा तुह्मांकडून देविले असेत. तरी पामार येथील पेस्तर साल सन सलास तिसैनचे रबीचे ऐवजीं सदरहु सत्तावीसशें पंनास रुा जेष्ठ शुा १५ पौर्णिमा शके १७१५ पंधराचे मित्तीस मारनिल्हेस उज्जन चलणी आदा करून कबज घेणें. जाणिजे. छ २९ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तबसूद.

पत्रांक ३६६ श्री १७१३ पौष वद्य ११

दंडवत विनंति. आपण वेदमूर्त राजश्री नारायण भट बावा दीक्षित यांबरोबर आशीर्वादपत्र पाठविलें, तें पावोन समाधान जाहालें. पत्रीं लिहिलें कीं, दो लग्नाचा उपाधेपणाचा विषये राहिला आहे, तो नारायणभट बावास देणें. ह्मणून लिहिलें, त्यावरून आह्मी त्याचा फडशा केला. आपण रविसंक्रमणाचे तिल शर्करायुक्त पाठविले ते पावले. स्वीकार केला. वारंवार आशीर्वादपत्र पाठऊन परामृश करीत असावें. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विनंति.

पौा पौष वद्य ११, विरोधकृत.

पत्रांक ३६७ श्री रामोजयति. १७१४ चैत्र शुद्ध १०

राजश्रियाविराजित राश्रमान्य राजश्री गणेशपंत दादा स्वामी वडिलांचे सेवेसीः—

पोष्य राघो आपाजी कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी येतील कुशल जाणोल स्वकीये लिहित गेलें पाहिजे. विशेष. आह्मी लष्करांत यजमानासमागमे गेलों होतों, त्यास रविवारीं सायंकाळीं नांदगांवास आलों. त्यास, आपले भेटीस सत्वरच येतों. पुणियाचे मुक्कामीं आपले व राजाचें बोलणें जाहलें. राजे तेच आपण आहेत. त्याजवरून आह्मांस राज्यांनीं माघारें रवाना केलें आहे. तर म्हसवड संबंधें पेशजीपासून बोलणें आहे. गुदस्तांहि बोलणें जाहलें त्याजप्रमाणें आपण निभावणी करून घेतली. बाकी बोलण्यापैकीं बाकी राहिली आहे. त्यास, भेटी नंतर फडशांत येईल. हालींचेहि बोलणें आहे, त्यास,

आल्यानंतर आपले विचारें होणें तें होईल. आम्हांस भाऊ आपण म्हणविल्याचा अभिमान सर्वप्रकारें आपणांसच आहे. तेथें लेहून कळवावें ऐसें नाहीं. म्हसवडाविषयीं आतां नवीन काहीं घालमेल न करावी. मुदाम यजमानांनीं आपलेकडे पाठविलें आहे. आणखी कितेक बोलणीं आहेत. समक्ष बोलणें होईल. येविषयीं राजश्री तात्या स्वामींसही विनंति करावी. आह्मी पदरचे आणि राज्याविषयीं सर्व प्रकारें अभिमान आपणास उभयतां आहे. त्यापेक्षां कोणताही अर्थ दुसरा नाहीं. वचनें दिल्हीं तीं रामबाण आहेत. आतांच येतों. परंतु स्वारीचेमुळें उष्णाचा उपद्रव जाहला. त्यास, प्रकृतीस ठीक नाहीं. कांहीं स्वस्थ जाहल्यावर लवकरच येतों. दादा! भाऊ म्हणविल्याचा अर्थ आपण शेवटास न्यावा. काम काज होणें तीं होतील. राज्याचे अभिमानी आपण. त्यापेक्षां आह्मी ल्याहावें, ऐसें नाहीं. पत्राचें उत्तर द्यावें म्हणजे दोन रोज आज्ञेप्रमाणें राहुन येईन. नाहीं तर, तैसाच येतों. कळावें. बहुत काय लिहिणें? लोभ करावा हे विनंती.

पैवस्ती छ ९ साबान ईसनै तीसेन.

पत्रांक ३६८ श्री १७१४ आषाढ वद्य १०

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेययाजी स्वामींचे सेवेसीं:—

विद्यार्थी बाळाजी जनार्दन सां। नमस्कार विनंति येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. आपणाकडून ज्येष्ठ शुद्ध येकादशी व आषाढ शुद्ध चतुर्थीचीं पत्रें आलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. राजश्री कृष्णराव अंबीकर यांचे पथक सातारीयांत चाकरीस आहे. त्यांतील स्वारांनीं गुदस्ता श्रावणमासीं आमचे वाड्यांत येऊन रात्रौ मारामार केली. खिजमतगारास तोडलें व माहातास मारलें. अशी आगळीक केली. याचा जाबसाल त्याणीं करावा तो अद्याप केला नाहीं. येविसीचा विचार आपण केला पाहिजे. व आंबे याची डाली येक पाठविली आहे घ्यावी. म्हणोन लिहिलें. ऐशियास, आपलें पत्र आलें, त्यावरून राजश्री सदाशिवपंत अभ्यंकर यांस अंबीकरास ताकीद करून ज्यापासून आगळीक जाली असेल त्याजकडून आपणाकडील माणसाची समजूत करवावी ह्मणोन लिहिलें आहे. ते करवितील. आंबेयांची डाली एक पाठविली ती पावली. * रा। छ २२ जिलकाद. लोभ असों दीजे. हे विनंति.

पौ आषाढ वद्य १४, परिधावी सां।.

---

* येथपासून अक्षर नानाफडणिसाचें.

पत्रांक ३६९ श्री. (नकल) १७१४ भाद्रपद वद्य ११

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरोपंत स्वामीचे शेवेसी:—

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित ठकार वाजपेययाजी यांचें वर्षासन रुो एक हजार पो खटाव येथील देशमुखीचे ऐवजावर आहे. त्यास, सालगुदस्तां सन इसन्ने तिसैनचे वर्षासनाचे रुो दीक्षितांस पावावे, ते पावले नाहींत. म्हणोन कळलें. त्यास, तुम्ही पौ मजकूर येथील देशमुखीचे हक्कापौ एक हजार रुो वसूल करून सालगुदस्तां सन इसन्ने तिसैनचे वर्षासनाचे सदरहू रुो दीक्षितांस पावते करून, त्यांची पावती घेऊन पाठवावी. कदाचित् सालगुदस्ताचा ऐवज फडतरे यांणीं नेला असल्यास, सालमजकुरीं देशमुखीचे ऐवजीं निकडीनें वसूल करून, दीक्षितांस पावते करावे. रा छ २४ मोहरम. बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे. हे विनंति.

पत्रांक ३७० श्रीगणपती. १७२४ पौष शुद्ध १३

श्रीगणपति
श्रीपंतप्रधान चरणीं
तत्पर रामचंद्र सुत
परशराम निरंतर

अजस्वारी राजश्री परशराम रामचंद्र ता मोकदमानी, मौजे बोरगांव, प्रा सिरालें सुा सलाम तिसैन मया व अलफ.

राजश्री येशवंतराव जगजीवन नाडगौडा, पो मजकूर यांजकडे कर्जाऊ ऐवज येणें त्याचे रद कर्जास प्रों मकुरची नाडगौडीचा ऐवज लाऊन दिल्हा. त्याचें वसुलाचें काम राजश्री गोविंद रघुनाथ जोशी याजकडे सांगोन आलाहिदा सनद सादर जाहाली असतां, मौजे मजकूरचा हक्काइनामाचा वसूल सुरळीत देत नाहीं, ह्मणोन विदित जाहालें तर, सालाबादप्रमाणें हक्काचा व इनामाचा वसूल सुरळितपणें मशारनिल्हेकडे देणें.

इनामाचा वाटेकरी यांस ताकीद करोन बाकी देवणें. फिरोन बोभाट येऊं न देणें, जाणिजे. छ ११ जमादिलावल.

मोर्तब सुद.

पत्रांक ३७१ श्री. १७१४ माघ शुद्ध १३

विनंती विज्ञापना ऐसिजे. नवाबांनीं हिशबाचे प्रकर्णी मुनीरुलमुल्ूख बाहादूर व राजे चंदूलाल यांसीं पेशजीं बोलणें केलें होतें. त्याजवरून कारभारी व मुत्सद्दी यांणीं हिशेब तयार करून दाखविले. ते प्रत्ययास न येतां उत्तरें होत गेलीं. यास्तव राजाजीनीं आपले खाविंदाचे मर्जीचा खुलासा माहालांतून व शिकंदरयारजंग व शिकंदरकुलीखां याजकडून घेऊन कृपा संपादावी, याजकरितां कांहीं ऐवज नजर प्रमाणें कबूल केला होता. त्या ऐवजाची तर्तूद होऊन प्रविष्ट जाला नाहीं. यास्तव नबाबाकडील बोलणार निरंतर उभयतां कारभारी यांजकडे येऊन बोलणें करीत होते. परंतु जाबसाल उगवण्यांत आला नाहीं. जाणोन छ ४ रोज गुरुवारीं प्रथम प्रहर रात्र गुदरल्यावर, नवाबांनीं चोपदारासमागमें मुलूखमनसूर व राजाजी यांजकडे ऐवज प्रकर्णी निरोप निकडीचा सांगून पाठविला. त्याजवरून राजे चंदूलाल आपले जागां बहुत विचारांत राहून, मीरआजमदअल्लीखां यांस बोलाऊं पाठविलें. मशारनिले, आलियानंतर दरबारास जाब सांगून, आपण व राजे गोविंदबक्ष व खानमजकूर यांचीं बोलणीं खिलवतींत अडीच प्रहर रात्रपर्यंत जाहालीं. छ ५ रोज शुक्रवारीं राजाजी दरबारास मुनीरुलमुलूखबहादुर यांचे जाण्यापूर्वीं भोजनाचा गुंता उरकून, प्रथम प्रहराचे अमलांत मुत्सद्यांसहित खिलवतीचे दिवाणखान्यांत जाऊन बैसले. उपरांतिक दोन घटिकांचे अवकाशानें मुलूखमवसूर येऊन पोंचले. उभयतां कारभारी दरबारास आल्याचें वर्तमान समजल्यानंतर, नवाब नवेदमहालांत बरामद जाहले. तेथें शामतजंग व हाफजयारजंग व शिकंदरकुलीखां व आसदयारजंग व अकबरयारजंग व मयाराम व मिर्धेताहरअल्लीखां यांस बोलाऊन घेतलें. त्यांचा सलाम मजुरा जाहाल्यावर कितावा पाहात बैसले. मीरदेतोहरअली समागमें शुका लेहून कारभारी यांजकडे पाठविला. तो उभयतांनीं पाहून, त्याचें प्रत्योत्तर लेहून दिल्हें. दोन प्रहर दोन घटकापर्यंत तीन वेळां नवाबाकडून शुके मिर्धे व आसीकबराबर आले ते पाहून त्या......तर, राजे चंदुलाल यांणीं पाठविली. मर्जीप्रमाणें जाबसाल उगऊन आले नाहींत. याजमुळें दरबारास जाब न सांगतां निद्रा केली. कारभारी खिलवतीचे दिवाणखान्यांत बसून राहिले. तीन प्रहरांनंतर

जागृत होऊन कारभारी याजकडे निरोप व शुक्र मिर्धेताहरअली व असीक-समागमें पाठवीत गेले. त्यांचीं उत्तरें व हिशेबाच्या फर्दा वरचेवर खाविंदांचे आज्ञेअन्वयें तयार करून राजे चंदूलाल पाठवीत होते. एक प्रहर दोन घटका रात्रपर्यंत बैठक होऊन परस्परें शुके येत गेले. नवाबाचे मनोदयारूप अमलांत न आलें. रात्र फार जाहली यास्तव दरबारास जाब बोलून जनान्याचा बंदोबस्त जाहला. कारभारी व मुत्सद्दी आपलाले मकानास गेले. राजाजी हवेलीस येऊन पोंचतांच, मीरअजमदअलीखां इंग्रेजांचे कोठीस जाऊन, त्यासीं बोलणें करून आले होते. त्यांजला बोलाऊन घेऊन गोविंदबक्षसहित त्रिवर्गाची खिलबत अडीच प्रहर रात्र पावेतों जाहली. उपरांतीक खानमवसुफास निरोप देऊन, उभयतां बंधूनीं भोजन करून, निद्रा केली. छ ६ रोज मंदवारीं प्रथम प्रहरांत कारभारी व मुत्सद्दी यांनीं नित्यनेम उरकून दरबारास जाऊन, दिवाणखान्यांत बैसले. नवाब नवेद माहालांत जनान्याचे बंदोबस्तानें किताब पाहत होते. छ मजकुरीं कारभारी यांजकडे निरोप कांहींएक सांगून पाठविला नाहीं. अडीच प्रहराचे सुमारास दरबारास जाब बोलून निद्रा केली. मंडळी आपाआपले मकानास गेली. अमजदअलीखा प्रातःकाळीं रसल साहेब यांजकडे जाऊन त्यासीं राजे–मनसुफांचे सांगितल्याप्रमाणें बोलणें करून मशारनिलेनीं नानकराम याचे बागांत येण्याचा निश्चय ठराऊन आले. याची इतल्ला राजे–मोइनास केली, त्याजवरून बागांतील हवेलींत फर्शाची तयारी करवून, तीन प्रहरीं उभयतां बंधू व अमजद–अलीखां पालखीचे स्वार होऊन गेले. नंतर एक घटकेचे आवकाशानें सावितजंग–बाहदूर व छोटे रसलसाहेब व कनिष्ट बंधू ऐसे त्रिवर्ग घोड्याचे स्वारीनें हवा खावयाचे निमित्यें निघून नानकराम याचे बागांत येऊन पोंहचले. चंदूलाल व गोविंदबक्ष उभयतां बागांतील दरवाजियाबाहेर येऊन घेऊन गेले. प्रथम बागाची सहल व मकानाची हौजकारंजी इत्यादिक तयारी पाहून, क्षेम कुशलतेचीं भाषणें जाहलीं. तदुत्तर, खिलवतीचे पकांनीं उभयतां राजाची व इंग्रज व खानमजकूर ऐसे बसून, दोन घटिका रात्रपर्यंत बोलणें जालें. त्या बैठकींत राजे मवसुफांनीं आपले खाविंदाचे मर्जीचा व दिवाणाचे वर्तुणुकीचा वगैरे मजकूर तपशिलें समजाऊन बहुतच उदाशीची बोलणीं केलीं त्याजवरून मेस्तर रसल साहेब यांणीं उभयतां बंधूंची खातरजमा फारच करून, अखेरीस वचनप्रमाण जाहलें. उपरांतिक राजेमोईन आपले जागां संतोष होऊन, ज्याफतीबद्दल फर्दू लिहून दिल्हा. आतर पानदान, फुलांचे हार व तरमेवा व खुष्कमेव्याचे खोन व आंब्याच्या डाल्या दिल्या. त्या घेऊन, इंग्रज बहादुर स्वार होऊन, •कोठीचे मकानास गेले. तदुत्तर, चंदूलाल व गोविंदबक्ष यांणीं संध्या करून च्यार घ-

टिका रात्रीं मकानास आले. सारांश, नबाबाचें बोलणें कीं, हिशेबीं बाकी पस्तीस लक्ष आहे. ती व शेरणीबाबद रकम मीरमरहूम गेल्यापासून आजपर्यंत सरकार दाखल करावी. त्यास, येविशीं राजाजींचें बोलणें कीं तालुकियांत आमदानी कमी, याजमुळें शेरणीचा ऐवज वसुलांत आला नाहीं. माहालीं बाक्या येणें आहेत. तो रुपया निकड करून घेतला असतां, तालुकियाची लावणी न होतां उज्याड होतात. श्रीमंत महाराज यांचे सरकारांतून कौल मनस्वी देऊन रयतीस तगाई देतात, यांजकरितां तमाम तालुकियांतील असाम्या उठोन श्रीमंतांच्या राज्यांत गेल्या आहेत व जातात. यास्तव ऐवज उगवून येत नाहीं म्हणोन. त्यास हें बोलणें नबाबाचे ध्यानास न येतां ऐवज मागण्याची निकड असे. आंख कोडीवरता आहे. व ज्याफतीबद्दल फर्द रसलसाहेब यांस दहा हजार रुपयांचा लेहून दिल्हा. ऐसें ऐकतों म्हणोन राजश्री त्र्यंबकपंत निसबत रायराया व अंबादासपंत यांणीं समजाविले व आणखी एक दोन जागां मातबर ग्रहस्थांचे मुखें बोलण्यांत आलें. त्याजवरून शेवेसी विनंती लिहिली आहे. याउपरी जाबसाल निश्चयांत येऊन पक्केपणीं समजेल त्याची विनंती लिहीन. सेवेसी श्रुत व्हावें. रा छ ११ माहे जमादिखर. लोभ असावा. हे विज्ञप्ति.

पत्रांक ३७२ श्री १७१४ अखेर

विज्ञापना. मीर अबदूल कासम याचे रवानगीचे वेळेस मषीरुलमुल्क यांणीं गोविंदराव उभयतां यांस बोलाऊन मजकूर सांगितला कीं: मीर साहेब यांजला रवाना करीत आहेंत. त्यास, त्याचे चित्तांत अंदेशे कित्तेक आले आहेत. रा तात्या येथें आहेत. त्यांचा यांचा बहुतसा परिचय नाहीं. यास्तव तुह्मीं त्यांची खातरजमा करावी. रा तात्यास पत्रें लिहून द्यावीं. पुणेयास मदारुळमाहाम यांचीं पत्रें आणवावीं कीं मीरसाहेब यांसीं दुसरा अर्थ नाहीं. रा तात्यांही दुसरा अर्थ न धरावा. आपल्या सल्लेस जी गोष्ट येईल त्यांचा इतल्ला यांजला करीत जावा. यांजला प्रसंगोचित मार चांगला आढळून येईल तो येऊन अर्ज करितील. लिहिणार शाहाणे, बोलणार चांगले आहेत. याप्रो पत्र आणवितों ह्मणोन त्यांची खातरजमा करावी. ह्मणोन सांगून, बाहादूर उभयतां गोविंदराव, मीर अबदुल कासम यांचे घरीं आले, त्यासीं बोलणीं बहुत जालीं. त्यांची खातरजमा केली. पत्रें देतों व स्वामीचीं पत्रें पुर्णेयाहून आणवून देतों, ह्मणून बोलले. कर्नाटकप्रांतींच्या यादी निवडून काढिल्या आहेत. त्या रा रायांस बोलाऊन वाचून दाखविल्या. त्यांची फारशी करून मीर साहेबांबरोबर दिल्या. इतकें बोलणें होऊन चंपी कलवंतीण तेथें आली होती, ते गोविंदराव भगवंत यांजपाशीं बोलत होती कीं, रंभाजी बाजी याजला आशुन्याकरितां येथें बोलाऊन घ्यावें. त्यास बाहादूर यास

चंपीनें व गोविंदराव भगवंत यांणीं मार पुसोन घेतला. त्यास हुजुरांत अर्ज करून सांगूं म्हणोन बाहादूर यांणीं उत्तर केलें. उपरांत बाहादूर उठोन गेले. मीरसाहेब यांणीं उभयतां गोविंदराव यांची ज्याफत केली.

गोविंदरावकृष्ण	गोविंदराव भगवंत
१ शिरपेंच	१ पागोटें
५ शालजोडी किनखाप	१ शालजोडी
जामेवार काशीचा	१ किनखाप
दुपट्टा, पागोटें, विजार	२ जामेवार शेले.
—	—
६	५

येणें प्रो देऊन रुकसत केलें. त्यास, जाहाला मार तो लिहिला आहे. उभयतां काय लिहिणार तें लिहोत. हे विज्ञापना.

पत्रांक. ३७३ श्री १७१४ अखेर.

विज्ञापना ऐसीजे. कलकत्याहून सात आठ पलटणें तेलंगी, त्याजमध्यें दाहा बारा गोरे कर्ते होते. त्यास सांगितलें कीं, तुह्मी खुसगीच्या मार्गें चेनापटणास जावें. तेव्हां ते निघून दोनचार मजली आले. मागाहून हुकूम आला जेः तिकडून न जावें. जलमार्गें जावें. तेव्हां गोरे होते त्यांनीं तेलंगे वेषधारी होते त्यांस सांगितलें, हुकूम याप्रमाणें आला आहे. तेव्हां हिंदू होते त्यांणीं साफ सांगितलें कीं, याचा निभाव हिंदु धर्माचा जलमार्गें आच्यार होणार नाहीं. तेव्हां गोरे यांणीं कलकत्यास लिहून पाठविलें. त्याचें उत्तर आलें कीं हिंदु आहेत त्यांचें पारपत्य करणें. हें वर्तमान हिंदू लोकांस समजलें. तेव्हां एका करून गोरे वगैरे होते त्यांची त्यांचीच बनली. तेव्हां गोरे वगैरे माणूस पांचसातशें माणूस ठार झालें. कांहीं गोरे पळून कलकत्यास गेले. हिंदुमाणूस राहिलें तेंहि अफरातफरा जाहलें. गंजम शहर समुद्राचें तिरीं आहे तेथें एके दिवशीं लाल मत्स्य मोठा निघाला. तें वर्तमान तेथें साहेब होता त्यास कळलें. त्याणीं किताबत काढून पाहिली. तेथें निघालें कीं आमके दिवशीं समुद्राचें पाणी येऊन शहर बुडेल! तेव्हां ताकीद करून शहर वोस केलें. कोणी राहिले त्यास पाणी येऊन शहर वाहून गेलें. म्हणोन वर्तमान समजलें. खरें लटकें देव जाणे! हे विज्ञप्ति.

पत्रांक ३७४ पुा २

राजश्री नाना गोसावी यांसीः—

* साहेब किल्यांस आले तेव्हांही त्यास कांहीं सख्ती पोंहचली नाहीं, व आपणाकडूनहि पोंहचत नाहीं, याजवरून दोरी सईल पडली? हे जात बेइ-

मान. यांचा इश्वास धरूं नये. मार्गेपासोन लबाड्या करीत आले तें विदितच आहेत. त्याचे निसबतीचें माणूस आहे तें चाकरीचुकरी सांगितली तरी मानीत नाहीं. हें राजश्री सदाशिवपंत दादास निवेदन केलेंच आहे. आह्मी वारंवार आपणास लिहावें तरी टीक दिसत नाहीं. सूचनार्थ लिहिलें आहे. कळेल त्याप्रों बंदोबस्त करावा. बहुत काय लिहिणें! कृपा लोभ करीत असिलें पाहिजे. हे विनंती.

पत्रांक ३७५ श्री. १७१४ अखेर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री आबा स्वामींचे सेवेसीं:—

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री बापूभट घारपुरे यांणीं श्री हरीहरेश्वर माहादेव याचें नवीन देवालय जनस्थानीं बांधिलें आहे. त्यास देवाचे पूजा नैवेद्य व नंदादीप वगैरे खर्चास कुलबाब व कुलकानू कमाल आकाराचा गांव ऱ्यारसें रुपयांचा नुतन इनाम पा नासीक अगर पा वणदिंडोरी या माहालांत श्रीमंतांनीं देविला आहे. त्याची सनद अलाहिदा तुमचे नावें आहे. त्यास, सनदेप्रमाणें गांव भटजीचे दुमाला लौकर करावा आणि लेहून पाठवावें. त्याप्रमाणें इनामपत्रें करून देवऊं. पत्र पावतांच आधीं हें काम करावें. कमाल* आकार याप्रमाणेंच हाल वसूल व खटपट केलीयास शें पन्नास रुपये अधिक होत असेहि गांव असतात. या रीतीचा पाहून लौकर नेऊन द्यावा. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे निनंति.

पत्रांक ३७६ श्री तालीक

राजश्री हरीपंत तात्या गोसावी यांसीः—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. रघुनाथसिंग चौधरी पो देवास याजकडे पोमाचे चौधरातीचें कामकाज मुदामतपासून चालत आहे. याचे भाऊबंद हक्कदस्तूर हिशाप्रमाणे घेत गेले. ऐसें असतां, कृष्णसिंग पेशजी पुण्यास येऊन आपले परी सरकारांत विनंति करून, हुजरे देवाशास आणोन दंगा केला. त्यावरी राा सदाशिव दिनकर लष्करांतून गेले. त्यांणीं हा मजकूर समजोन देवाशाहून हुजरे माघारे नेले. हें वर्तमान मारनिलेनीं सविस्तर सांगितलेंच असेल. रघुनाथसिंग यांचा काळ जाहाला. त्याचा पुत्र खुमानसिंग हालीं भोगवट्याप्रों वहिवाट

---

* येथपासून अक्षर लाशांचे.

करीतच आहे. कृष्णसिंग पुन्हां सरकारांत गैरवाका समजावितो म्हणोन ऐकिलें. त्यावरून आपणास लिहिलें आहे. तरी रघुनाथसिंगाची वहिवाट बहूत दिवस चालत आली आहे. त्याप्रमाणें चालवावी. कृष्णसिंग गैरवाका समजावील. त्यास ताकीद जाहाली पाहिजे. रा छ २ रमजान. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति. मोर्तब असे. शिका.

पत्रांक ३७७ श्री

राजश्री रामचंद्र माहादेव गोसावी यांसः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो तुकोजी होळकर दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असिलें पाहिजे. विशेष. कसबें कडुस ताा खेड येथील धर्माजी व काळोजी पोटे धणगर यांणीं विदित केलें कीं कसबें मजकुरीं आमचे मिरासी सेत नवखंडी जमीन आहे. त्यापौ कांहीं आह्मीं वाहतों व कांहीं पडित होती ते गांवकरीयांनीं दुसऱ्यास लाविली. प्रस्तुत, जमीन आमचे आम्हीं मागत असतां द्यावयासीं गांवकरी दिकत करितात. येविशीं त्यांस ताकीद जाली पाजे. ऐशियाशी, कसबे मजकुरीं आपल्याकडील कमावीसदार असेल त्यास पत्र देऊन याचा करीणा मनास आणून पोटे मजकूर याची जमीन ज्याकडे गेली असेल तो द्यावयासीं दिकत करीत असला तर त्यास ताकीद करून, वाजबी याचें मिरासी सेत जें असेल तें झाडून यांचें यांजकडे देवावें. येविषयीं लढा* पुन्हां न राहे तें करावें. रा छ २४ मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तबसुद.

श्री म्हाळसाकांतचरणी
तत्पर मल्हारजिसुत
तुकोजी होळकर

पत्रांक ३७८ श्री

यादी राजश्री शिवाजीराव सुर्वे मोकाशी मौजे कुसगांव ताा पोनमावळ हा गांव सरकारांतून नानाजीराव सुर्वे आपले तीर्थरूप यांणीं सिद्दी सातावर

---

* येथपासून खाशांचें अक्षर.

वार केले सबब सत्तावीस जखमा आंगावर लागल्या, ह्मणोन बहुमान करून सदरहू गांव दिला. चुलता आत्माजीराव आपल्या तीर्थरूपाबरोबर चाकरीस होता. भाऊपण्याचा वेठाळेपणा सर्व ठीकच जाहला आहे. चाकरी मात्र एक जागां करीत होते. त्याजवर भाऊसाहेबांबरोबर हिंदुस्थानांत आपण व आपले चुलत भाऊ खंडोजी सुर्वे बिन भिवजीराव सुर्वे गेलों होतों. तेथें सर्व घोडीं पिढीं जाऊन परतोन माघारें आलों. पुण्यांत कर्ज बहुत जाहलें. ते समई खंडोजी सुर्वे यांणीं आमचें व आपलें नांव घालून कुसगांवासी सनद सरकारांतून घेतली आण आपले घरास गेले. त्यापासून आज वीस बावीस वर्षें खंडोजीचें कोणी हुजूर चाकरीस आलें नाहीं. आपण सरकारची चाकरी करीत आलों दरम्यान घोडपेच्या सालीं निरोप घेऊन घरीं गेलों. मग घोडपेस स्वारी सरकारची जाली. ते समई आपणास चाकरीस बलावणें गेलें. नंतर आलों. तों स्वारी होऊन पुण्यास श्रीमंत आले. आह्मी हुजूर पागेकडे निसबतीस होतों. त्यास, सदरहू चाकरीस चुकलों हें निमित्य ठेऊन गंगाधर पंत हुजूर पागेकडील यांणीं गांव जप्त केला. त्याजवर गांव सोडवावयास सरकारांत नजर रुपये १३०० व दरबारखर्च ३०० एकूण सोळाशें रुा पडिले. नंतर आणि एकवेळ चाकरीस यावयास चार रोज अधिक लागले ह्मणून मागतीस गांव जप्त करून रुा ६०० घेतले. एकूण बेवीशें रुपये आपणास पडिले तें व्याजसुद्धां तीन हजार सावकाराचे जाहाले. तेव्हां व्याज भारी सबब कैलासवासी नारायणरावसाहेब यांचे कानावर मजकूर घालून, राजश्री महिपतराव कृष्ण यांजकडून तीन हजार रुपये एकोत्रा व्याज घेऊन, सावकारास देऊन, गांव मारानिलेकडेस ठेविला. हाल्लीं इंग्रजांच्या दंग्यामुळें वगैरे, कोळ्यांच्या दंग्यामुळें व तोतयाच्या दंग्यामुळें गांव दोनतीन वेळां वोस पडिला. मागती लावणी करून चाकरी सरकारची नेहमीं करीत आलों असतां हाल्लीं नारायणजी सुर्वे खंडोजी सुर्वे यांचे पुतण्ये, येऊन कजिया करितात. हाल्लीं ठकारदिक्षितांची भीड घालून गांवची सनद करून घेतली आहे. त्यास सनद माघारी घेऊन, साहेबीं वाजवी इनसाफ मनास आणून, कर्तव्य तें करावें. बेवीस वर्षे चाकरी सेवा कोणी केली? चाकरीचा गांवबलांडे सोसले. रोजमुराहि आज दहावर्षे सुरळीत पावत नाहीं. ऐसें असोन साहेबीं निमे गांवची सनद नारायणजीस दिल्ही! याची चौकशी जाली पाहिजे. शेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति.

पत्रांक ३७९ श्री

यादी होळकरा बाा ऐवजाच्या वराता गाईकवाड यांजपासून घेतल्या. सुा खमस सितैन

५५००० अंताजी नागेश कादार पाा ढवळके. सदरहु वरातेचे वसुलास भिकाजीपंत पैलाडू आहेत.

२५००० गोविंदराव गाईकवाड पो सिभेर नजीक बडोदें सदरहु ऐवजाचे वसुलास गोविंद......व मनोहर किंकर यांस...

१०००० चिंतो त्रिंबक कादार प्रा...सराई...वसुलास माणूस दिा ठेविलें असे.

५००० चिमाबाई गाईकवाड प्रा. कोरेळ. सदरहु वरात वसुलास मनोहर नाईक किंकर.

५००० केदारजी गाईकवाड कादार प्रां अंतापूर. सदरहु वरात मारीनल्हेचेच हवालीं रा कृष्णाजी नाईकांनीं केली.

१०००००

सदरहु वराता रा कृष्णाजी नाईक....याणीं हवालीं जिकडील तिकडे केल्या आहेत.

पत्रांक ३८० श्री. १७१५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री दादा स्वामीचे सेवेसीः—

पो महिपतराव जिवाजी सां नमस्कार विनंति. उपरी येथील कुशल छ १ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पा तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. श्रीमंत उभयतां मंगळवारीं प्रातःकाळीं स्वार होऊन सातारियास राजदर्शनास जाणार. श्रीमंत राजश्री नानासहि येथें येऊन च्यार पांच दिवस जाहले. त्यांणीं आपल्यास यावयाविशीं पत्र लिहिलेंच आहे. लौकरीच दर्शनलाभ होईल. वरकड भेटी नंतर सविस्तर कळेल. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजेः हे विनंति. इ० इ०

पत्रांक ३८१ श्री. १७१४।१७१५

विज्ञापना. मशीरुलमुल्ख यासीं उभयतां गोविंदराव यासीं नबाबाचे समक्ष बोलणें जाहलें कीं: इंग्रजांचें पत्र मिस्तर कनवी याचे विद्यमानें आलें आहे. व मीर अबदुल कासम याचे विद्यमानें आलें आहे. त्यास, प्रस्तुत त्याजला जाब लिहून द्यावा कीं, टिपूचा करार रावपंतप्रधान याचा व आमचा राजश्री हरीपंत यांचे विद्यमानें जाहला होता त्यास तीन सालें जालीं. त्याजकडून कांहींशी पेशकदमी आढळून आली. श्रीमंतांशीं ऐवजाचा करार केला. तोहि कराराप्रों अमलांत न आला. यास्तव रावपंतप्रधान यांजला आह्मांस त्याची तंबी करणें जरूर होती. इतकियांत तुमचीं पत्रें आलीं. त्याजवरून बाहिर निघावयाचा निश्चय केला. त्यास, तुह्मांस, खुष्कींतून यावें लागतें. समुद्रांतून येणें. तेव्हां समीप पडतें. हा मजकूर एक. दुसरा मजकूर

कृष्णापासून त्याचा तालुका लागतो. त्यास, तालुका टाकून पुढें येतां येत नाहीं. तालुका हस्तगत करून पुढें यावें. तालुका, किल्ला तैसाच ठेऊन पुढें आल्यास आमची स्वारी येईल. मागाहून वरचेवर लोक येणें, रसद येणें, त्याजला अडथळा होईल. यास्तव फौज पुढें रवाना करावी. रावपंत-प्रधान याचे आमचे मुलाकात नाहीं. मुलाकात थेऊन इतफा कोणत्याचे मुल-खांत चालणें जाहलें तर चालावें. अथवा अलाहिदा अलाहिदा चालावें. त्यास, रावपंतप्रधान यांची स्वारी प्रथमतः त्यास, मुहूर्त चांगला पाहून निघाले पाहिजे, थोरली मसलत च्यार महिने कमजादा जाहल्यास चिंता नाहीं, याप्रो पत्रें पाठवावीं असा निश्चय जाहला. हे विज्ञापना.

पत्रांक ३८२ श्री १७१५ आश्विन–कार्तिक

विनंति उपरी. राजश्री गोविंदराव गाइकवाड याजकडील खंडो आवजी अथवा गणेश कासी यांचे बनतां दिसत नाहीं. फौज जमा होऊन रिकामे दिवस जातात. याजकरितां त्याचें ह्मणणें आहे कीं, आम्हांस फौजसुद्धां गुजराथेस जावयास आज्ञा करावी, जातों. उद्यां दिनशुद्धी निरोपास आहे. याजकरितां त्यास तिकडे जावयास निरोप द्यावा. किंवा कसें करावें, हें लिहून पाठवावें. हे विनंति.

सरकार* लक्षाचा आंत कोणी असल्याखेरीज हातीं गोष्ट राहणार नाहीं. येवढा संदेह. वरकड जातात हें चांगलें आहे. दोघांतून येक होता तर बरें होतें. राजश्री माधवराव यास सांगोन कांहीं तरी बंदोबस्त राही असें करून मग निरोप द्यावा.

पत्रांक ३८३ श्री १७१५ मार्गशीर्ष शुद्ध १४

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित व यज्ञेश्वरदीक्षित स्वामीचे शेवेसी:—

विद्यार्थी माधवराव नारायण प्रधान नमस्कार. विनंति. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न सदाशिव दीक्षित वाजिपेययाजी यांचा काल जाहल्यापूर्वीचें त्यांचें पत्र आलें, त्यांत आमचा माहाप्रयाण आहे असें लेहून वगैरे मजकूर लिहिला. नंतर दीक्षित यांस देवाज्ञा जाहाल्याचें वर्तमान कळलें. ऐशास, दीक्षित यांस आपलें माहाप्रयाणच आहे असें त्यांस समजोन त्याणीं लिहिलें, हें परम आश्चिर्य वाटलें. व त्यांचा काल जाहला, हे गोष्ट वाईट जाली. ईश्वरीछा प्रमाण. यास विवेकावांचून

---

* येथुन मजकूर खुद्द खाशांचा म्हणजे नानाफडणिसाच्या हातचा.

दुसरा उपाये नाहीं. याजकरितां विवेक करून चित्ताचें शांतवन करावें. रा छ १२ जमादिलावल, सुा अर्बा तिसैन मया व अलफ. *बहुत काय लिहिणें ! हे विनंति.

पत्रांक ३८४ श्री १७१५

कोलापुरवाले राजे.

श्रीमन्माहाराज राजश्री छत्र-पति स्वामीचे सेवेसीः-

विनंति सेवक दौलतराव सिंदे कृतानेक विज्ञापना. ताा छ पावेतों स्वामीचे कृपें करून मुा सुखरूप असों. विज्ञापना ऐसी जेः-स्वामीनीं आज्ञापत्र पाा त्यांत आज्ञा जेः-पत्राचा सकल माा जिनस पाा आहे, घेऊन पावलियाचें विनंतिपत्र पाा ह्मणोन त्यास आज्ञेप्रेंा याचप्रकारें सदैव परामृश करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्री

अकलकोटकर भोसले.

राजश्री राजे फत्तेसिंग भेाा गोसावि.

सकलगुणालंकरण-अखंडितलक्ष्मी-अलंकृत राजमान्य स्नेाा दौलतराव सिंदे रामराम विनंति.

श्री.

राजश्री पंतसचिव गोसावी यांसी

सकलगुणालंकरण-अखंडितलक्ष्मी-अलंकृत राजमान्य स्नेाा दौलतराव सिंदे दंडवत. विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिाा जावें. वरकड अष्टप्रधानास सकलगुणा-

---

श्री.

भामगडवाला.

राजश्री राव बरजोरसिंग गाो.

अखंडित-लक्ष्मी-अलंकृत राजमान्य स्नेाा दौलतराव सिंदे राम-राम सुा.

मंदोसर.

मीरजा गुलसेन-बेग काा पाा मंदोसर वगैरे खुषवख्त बाषद

मुज्यायत-तहवर-दस्तगाह आज दौलतराव सिंदे सुा सलाम.

---

* येथून हस्ताक्षर सवाईमाधवरावाचें

मीरजा जमालबेग खुा बाप्रद
आज दौलतराव सिंदे सलाम सुा.

नगरवाला मोंगल.

आजम सवाजे मोगल महमदखान कवीजंग बाहादर दाममोहब्बतहू.
मोहिबान–मुखालिसान–दस्तगाह आजदिल यकलास दौलतराव सिंदे सलाम आंकी येथील खैरखुसी जाणोन तुह्मी आपली खैरखुसी कलमीं करीत जावी. दीगरं खत पा तें पावलें. लिा मार.

प्रा व पा हाय देशमुख व देशपांडे.
मो आजम देशमुख व देशपांडे पा सुा.

राजश्री राज जालमसिंग गो.
अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य रामराम विनंती उपरी.

बासवाईकर कुसलसिंग.

राजश्री राणा कुसलसिंग गो
आखंडित रामराम विनंती उपरी.

मांधळेतकर.

राजश्री राव सखतसिंग गो.
अखंडित–लक्ष्मी रामराम सुा.

पुण्याचे जकातदार

विसाजी भिकाजी, जकात प्रांत पुणें व जुनर गो दंडवत सुा.

पनवेली कोंकणप्रांत.

बाबूराव हरी.

बीडकरसाहेब.

श्री श्री श्री परब्रह्ममूर्ती श्री श्री श्री कादर साो बाचे चरण सेवेसी.
दासानुदास चरणरज दौलतराव सिंदे सां दंडवत विज्ञापना. येथील कुशल ताा छ पर्यंत आपले कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष.

तीर्थस्वरूप मातुश्री लखाबाई वडिलांचे सेवेसी.
अपत्य दौलतराव सिंदे दंडवत विनंति.

श्रीमंत राजश्री देव संस्थान चिंचवड स्वामीचे सेवेसी.
सेवक दौलतराव सिंदे विनंति उपरि येथील कुशल ता। छ पर्यंत श्रीचे कृपेंकरून यथास्थित असे विशेष.

---

१ राजे मा। जगदार दी तोफखाना खुषवख्त–बाषद आज दौलतराव सिंदे सलाम सु॥ ज्यादा काय लि॥ पुढें मोर्तब किताबत नाहीं.

---

१ मे॥ मानसिंग जगदार यास सु॥.

तीर्थरूप मातुश्री लक्ष्मीबाई व भागीर्थीबाई व यमुनाबाई सिंदे वडिलांचे सेवेसी.
आपत्यें दौलतराव सिंदे चरणीं मस्तक ठेऊन सां॥ दंडवत. विज्ञापना ता। वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष.
हे॥ ती॥ केसराबाईस दंडवत विज्ञापना सदैव पत्रीं तोशवीत जावें.
हे॥ रहिमान बिबी पन्हा–बाई व जोहारबाई व सरसरुपबाई व जिनत व मुरादनबाई यांस दंडवत विज्ञापना सदैव पत्र पाठवून तोशवीत जावें.

चिरंजीव बाळास.

वरकड बा॥ प्रा॥ च तीर्थरूप मातुश्री मैनाबाई सिंदे यांस.

उभयतां आंग्रे मामा यांस तीर्थस्वरूप व दंडवत उपरी.

जैसिंग आंग्रे यांस आखांडित सु॥ सेवटीं विनंति नाहीं. बहुत काय लिहिणें. येथें मोर्तब.

लक्ष्मण जामदार यास मो॥ ह्मणोन.

गंगाधर गोविंद सागरवाले यास आखंडित विनंति उपरी तीर्थरूपाचें नांव लिहावें.

राव रंभाजी जयवंत निंबाळकर यांस सकलगुणा विनंति लि॥ जावें.

रामचंद्र नारायण सुभेदार पुणें आखंडित विनंति.

मालोजी राजे घोरपडे आखंडित व विनंति.

विनंतीवाले.

१ मातबर पागे व सिलेदार.
१ आंबाजी इंगले भावासुधा.
१ खंडेराव हरि.
१ श्रीमंताकडील संभावित का॥ दार.
१ आनंदराव बहिरव.
१ सखारामपंत बापू पानसे.
१ माधवराव रामचंद्र.
१ जगन्नाथराम व लक्ष्मण अनंत.
१ बाबूराव कृष्ण किलेदार साताऱ्याचे.
१ थत्ते.
१ गोविंदराव भगवंत.
१ माधवराव बाबर.
१ सेळूकर उभयतां.
१ माधवराव बाजी.
१ वामनाजी हरी.
१ पांडुरंग बलाळ नि॥ कवीजंग बाहादूर
१ जगदले मानसिंग व राव व खंडेराव मसूरकर.

दाभाडे तळेगांवकर.

यशवंतराव दाभाडे सकलगुणा गंगाजळनिर्मळ मातुश्री लक्ष्मीबाई दाभाडे यास.

स्नेहपूर्वक विनंति.

देहूकर.

हरिभक्तपरायेण राजश्री खंडोबा गोसावी संस्थान देहू यांसी.

स्नेहपूर्वक दवलतराव सिंदे दंडवत विनंति उपरी.

रास्ते.

राजश्री आनंदरावजी रास्ते गो॥.

छ सकलगुणा दंडवत विनंति उपरी लिहित जावें.

श्रीमंतांचे हातची चिटीचें उत्तर.

सेवेसी विनंति सेवक दौलतराव सिंदे कृतानेक विज्ञापना ता॥ छ पर्यंत स्वामीच्या कृपावलोकनें यथास्थित असे. विशेष मा॥ पत्रांतील जमेस धरून उधार लिहावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीरामदासबावा गुरुजी यांस पत्र.

श्री सच्चिदानंद परब्रम्हमूर्ति श्रीबावाजीचरणसेवेसीं दासानुदास चरणरज दौलतराव सिंदे चरणीं मस्तक ठेऊन सांा दंडवत विज्ञापना ताा छ पर्यंत श्रीकृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

सुमंत

गंगाजलनिर्मळ मातुश्री गोपिकाबाई यांस स्नेहपूर्वक दंडवत विनंति.

सुरापूरचे बेरडास.

राजश्री व्यंकट आपा नाईक बहिरी महादर, संस्थान सुरापूर गोसावी यांसी:—

छ अखंडित-लक्ष्मी विनंति उपरि.

मो हिरु व बाढण पेंढारी यास सुा

बीडकर.

१ सखाराम कृष्ण पासटे यांस अखंडित सुा स्न.

१ रामाजी अनंत व सखोरुद्र गो विनंति.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंति सेवक दौलतराव सिंदे, पुढें हातचिटी प्रेंा.

श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि स्वामीचे सेवेसीः— सेवक दौलतराव सिंदे कृतानेक विज्ञापना ताा छ पावेतों यथास्थित असे विशेष.

गुरु ली बीडकर.

श्री श्री श्री परब्रह्ममूर्ति श्री श्री श्री हबीबासाहेबाचे चरण-कमल सेवेसी. दासानुदास दौलतराव सिंदे कृतानेक सांा दंडवत विज्ञापना छ पावेतों श्री-कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे.

खाा पत्र कादर साहेबाचे नावें.

सालीक मसालीक हकीकत जाहीज-मजाहीज मारफत श्रीकादरसाहेब ज्यात-कदरहू आर्जदास्त बंदगी विनंति येथील कुशल.

सकल–गुणाचे

१ चंद्रोजी भोसले सेनासाहेब सुभा गो। लेखन करीत असावें.

१ मानाजी आंगरे कुलाबकर वजारत –माब–सरखेल गो।

१ दतराज–आज्ञा

१ नीलकंठराव पुरंदरे.

१ राजश्री गोविंदराव गाइकवाड सेना–खासखेल समशेर बाहादूर गो.

१ राजे खेमसांवत भोसले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाळ वगैरे महाला–निहाय.

यांत भोसले नागपुरवाले यांस मात्र लेखन करीत असावें, आण वरकडांस लिहीत जावें.

आजम मेस्तर कोरनेल गाडर इस्कोयर दाम–मोहबतहू

छ मकान–मुखलिसान–दस्तगाहाये आतीजादज्यादा–दोस्ता दौलतराव सिंदे बादज–पौक आंकी येथील खैरखुसी जाणून आपली खैरखुसी कलमी करीत असिले पाहिजे. दीगर.

गोवेकर प्रधान नवा आला आहे तो.

आजम जू–नेकेतान–पाचकतवार–शक्रतार–दोइस्ताद खुषवख्त–बाषद मोहिबान–मोखलिसान–

छ दस्तगाहाये आजि दौलतराव सिंदे सलाम येथील खैर–खुसी जाणोन तुह्मी आपली खैर–खुसी कलमी करीत जावी दिगर.

आजम नवाब मोहिदीनखां नजमुदौले बाहादूर दिलावरजंग दाम मोहबतहू.

छ शाहामत–आवली–पन्हा–मर्तबात व सदामत व मंजीलत–मवाकत–दस्तगाहाये आंतीजाद–दोस्तां आजी ज्यानीब दौलतराव सिंदे सलाम येथील खैरखुसी जाणून आपली खैरखुसी कलमी करीत जावी दीगर.

गोवेकर राजा गोवर्णदोर.

आजम फ्रांसिस्क–आंतोन–दावियोग–काबराल–तेनेत–जनराल–गोवर्णदोर बंदर गोवा दाममोहबतहू.

छ शाहामत–आवली–मर्तबात व हशमत मंजिलत–मवाकत–दस्तगाहाये तज्यादा–दोस्तां आजी ज्यानीबा दौलतराव सिंदे सलाम दरबात आज पानम आंकी येथील खैरखुसी जाणोन आपली खैरखुसी कलमी करीत जावी दीगर.

महमदसाहेबखान टाके दाम-मोहबतहू

छ आज-दिस येकलास दौलतराव सिंदे सलाम आंकी येथील खैरखुसी जाणून आपली खैरखुसी कलमी करीत जाणें.

सुकेलदुखमान सयादतनकावेखान दान शेराफत सयेद शाहा निजामुदीन आहामद ज्यादा कदरहू.

छ आजदिल-येकलास दौलतराव सिंदे सलाम आंकी येथिल खैरखुसी जाणून आपली खैरखुसी कलमी करीत जाणें.

शाहासाहेब आशफाम मजहरदाम मोहबतहू

छ आज दिल येकलास सलाम आंकी येथील खैरखुसी जाणून आपली आफीयेत कलमी करीत असावी दीगर.

गोवकर याचा कारभारी.

आजम सेखास्तियाव जुनेफेररवबरोकसकुतारदोईस्तापंदु ॥ बाषद.

छ मोहबत-दस्तगाहा आजी दौलतराव सिंदे सलाम आंकी येथील खैरखुसी जाणोन आपली खैर-आफीयेत हामेशा कलमी करीत जाणें दीगर.

फकीराचा माना

शाहादत पन्हा सयेद इंदरुसदाममोहबतहू

छ आजी दौलतराव सिंदे सलाम आंकीं येथील खैरखुसी जाणोन आपली खैर-आफीयेत कलमीं करीत जाणें दीगर.

काजी

शेरीयेत पन्हा दाममोहबतहू.

छ आजी दौलतराव सिंदे सलाम सुा.

नवाब आजम टिपू-सुलतान-बाहादूर-सलमहूकताला.

साहेब-मेहर्बान-करम-फर्माये-मोकलिसान बादज-षौक-मुलाकात-मसरत-आमातमषहूदजमीरइतीहादर्दीजरिबाद येथील खैरखुसी जाणून आपली शादमानी कलमी करीत असिलें पो दीगर.

गंगथडीचे कमाविसदार.

राजश्री नारायेणराव नागेश व बापूजी रघुनाथ कामदार मा हाय पा-
गंगथडी गोसावी.

छ दंडवत सुा

सवस्थान विशाळगड.

राजश्री आनंदराव प्रतिनिधी गोसावी यांसि

छ सकलगुणा

कडपेवाले पठाण

शाहामत व अली मर्तबात आलफखान बाहादूरसलामहूकताला.

छ आजी दिलये कलाम दौलतराव सिंदे सलाम आंकी येथील खैरखुसी जाणोन
आपली खैरयत कलमी करीत जावी. दीगर.

चंदीचंदावरचे राजे.

श्रीमंत महाराज राजश्री अमरसिंहजी—साहेबाचे शेवेसी.

विनंति विशेष दौलतराव सिंदे कृतानेक विज्ञापना. ताा छ पौो.
साहेबाचे कृपावलोकनें—करून वर्तमान यथास्थित असे विशेष.

हसनखान बाबा.

शाहामत व आवली—मर्तबात—भाई हसनखानदाम—मोहबतहू.

छ आजी ज्यानीब दौलतराव सिंदे बाद सलाम बजेबाद आंकी येथील खैर-
खुसी जाणून आपली खैरखुसी कलमी करीत जाणें दीगर.

देऊळगांवकर जाधव.

राजश्री रावजगदेव आनंदराव जाधवराव गोसावी यांसी.

छ अखंडित—लक्ष्मी

सातारचे दीक्षितास.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रामचंद्र दीक्षित बावा स्वामीचे सेवेसी.

सेवक दौलतराव सिंदे सां दंडवत. विनंति उपरि येथील कुशल जाणून
स्वकीय लिहीत जावें.

उजनकर खोबरे.

१ मुला कमरुदिन व सलाबुदिन सुा बापद आज दौलतराव सिंदे स-

लाम. येथील खैरखुसी जाणोन तुम्ही आपली खैर—आफियत कलमी करीत जाणें दीगर.

सुरतकर थोरले मुला.

महमद ईसफ व नजमुदीन यांसीं आखंडित ह्मणोन.

खंडाराजपुरीकर हाबसी यासी.

आजम याकुतखान दाम मोहबतहू.

छ रफायत व अवालि—मर्तबत—शोकत—मजीलत—दस्तगाहा बादज शोकमशे हूद—जमीर मुजीर गरदाजीदः मीआयदके येथील खैरखुसी जाणोन मोहिबी आपली खैर—आफियेत कलमी करीत असिलें पो दीगर आ आकारपन्हा-कडून खील फैल मोहबतनामा येऊन यकलासाचे तरीके याचा ईतम आज दाह दोस्तीचे जागां व्हाव तें न व्होतां आमुल होऊन खत खतूत न आलें यावरून ताजुब असे हामेशा मकातीब पाठऊन दोस्ती येकजहतीदीन बदीन ज्यादा होय तें नमुतत यावें ये बाब तारीख महिना सुा.

हाजी आबदुल वजीद यास.

हाकायेकआगामारीफ—दस्तगाहा शाहा हाजी आबदुल मजीद हीफ-जुला हेताला.

छ आज ज्यानीब दौलतराव सिंदे येथील खैर दीगर तुह्मी आपली खैरयत लिहीत जावें.

तो सुवर्णदुर्गचे सुभेदार

मोरो बापूजी यांसी आखंडित—लक्ष्मी विनंती.

सौा बाइजाबाई सावतवाडीकर यांसीं तीर्थस्वरूप आपले दंडवत विनंति. सेवटीं हे विज्ञप्ति.

राजश्री रंगरावआपा वेढकर

छ अखंडित विनंति उपरी.

आजम फ्रासिस्क—आंतोन—दावियोग—काबराल—गोवर्णदोरे—कपतान —जनराल रुस्तुमुलमुल्क सर्फराजुद्दौले मुस्तकीम जंगबाहादूर बंदर गोवा दाम मोहबतहू.

छ शाहामत—अवलि—मर्तबत व हशेमत—मंजलत—मवकत—दस्तगाहा—येत ज्यादा दोस्तां आजी ज्यानीब दौलतराव सिंदे सलाम आंकी येथील खैर.

श्रीगणेशायनम:

श्रीकाशीजीकेराजा वगैरेह

श्रीस्वस्ति श्री श्रीमहाराज बहादुर चेतसिंघजी जोग्य श्रीमहाराजाधिराजके दंडवत.

राजश्री बालारावभाई रामजी जोग्य कुमाउचे पाहाडचे राजाको अलकाय (त्र).

स्वस्ति श्रीमदगणित–विद्या–विनोद–कुशल–गाडगिलोप–नामक–श्रीजनार्दन भटेषु विद्यार्थिनोपमा माधवराव सिंदे कृतानेकेश: साष्टांग–नतय: समुल्लसतु शमिह श्रीमदाशिषा तत्र संतदिहामहे उदतसुमवादिय.

स्वति श्रीश्वरचरणस्मरणपूर्वक–रूप–नारायणेत्यादि–विबुध–बिरुदावलि–विराजमान–मानोन्नत–श्रीगिरिराज–चक्र – चूडामणि–श्रीमन्महाराजाधिराज–श्रीउदोतचंद्रदेवेषु सदा स्मरविजईषु.

उदेपूर.

श्रीमन्निषिल–निगदित–नीलोमारमण–चरण–शरण–श्रीमहाराजा श्रीभीमासिंह्जी एतान श्रीमहाराजाधिराज–श्री–महाराजा अलीजाह सुबेदारजी श्री माधौरावजी सिंदे केन वाच्यं अठाका समाचार भला छे अपका सदा सदा भला चाहिजे अपरं च.

बलमगडवाले.

श्रीमहाराजाधिराज श्रीमहाराजाबाहादुर आजितसिंघ जूदेव एते.

कृष्णगढ.

सिद्धिश्रीसर्वोपमा–महाराजश्रीप्रतापसिंघजी जोग्य

बेगुवाला

सिद्धिश्रीसर्वोपमारावत श्रीसवाईमेघसिंवजी–जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकमहाराजा श्रीमौहैाकसिंघजी–जोग्य.

साहपुरा

सिद्धिश्रीसर्वोपमालायक–राजाजी श्रीभीमसिंगजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकरावतजीश्रीभीमसिंघजी जोग्य.

राणाजीची माता.

सिद्धिश्रीबाईजीराज एवे आठाका समाचार भला छे. अपका सदा भला चाहिजे. अपरंच

सिद्धिश्रीअमजरासु–थानें श्रीराजसिंघजी– जोग्य.

जोधपूर मारवाड.

सिद्धिश्रीसर्वोपमाश्रीमहाराजाधिराजराजराजेराजेश्वरमहाराजाश्री विजैसिंघजी जोग्य अठाका स्माचार भला छै. राजरा सदा भला चाहिजे.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकठाकरा श्रीगोवर्धनसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमाठाकुराराजश्री–सवाई–सिंघजी–जोग्य.

विकानेर

सिद्धिश्रीसर्वोपमाविराजमानमाहाराजाधिराजमहाराजासिरोमणिश्रीसुरतसिंघजी जोग्य.

करकेडी.

सिद्धिश्रीमहाराजकुवाश्रीअमरसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकमौणोग्यानमलजी जोग्य.

सिद्धिश्रीठाकराबुधसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमामंगरीश्रीकील्याणदासजी जोग्य.

जैनगर

सिद्धिश्रीसर्वोपमाश्रीमहाराजाधिराजराजराजेंद्रमहाराजाश्रीसवाईप्रतापसिंघजी जोग्य अठाका समाचार भला छे. राजका सदा भला चाहिये. अपरंच.

सिद्धिश्रीसर्वोपमाश्रीमहारानिश्रीभामि चोंडावतजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमाजोग्यरावबहादूरश्रीसहजसिंगजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकरावचतुर्भुजजि जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकविद्यागुरुभटराजाजीश्रीजज्ञदत्तजी जोग्य.

उनियारेवाला.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकरावश्रीबिनसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमाराजाबोहरेषु–सालिरामजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकठाकुरश्रीराजसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकरायजिश्रीरतनलालजी जोग्य.

अलवरमाचाडी.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकरावराजाजीश्रीबषतावरासिंघजी जोग्य.

दुंदुवाला.

सिद्धिश्रीराजश्रीठाकुरापाहाडसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीषवासरोडाराम जोग्य.

बुंदि.

सिद्धिश्रीसर्वोपमामाहाराजश्रीरावराजाविसुनसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमामहाराजश्रीदिपसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसाहालछिरामजि जोग्य वा पचोलिथानसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रियाभाईबषतरामजी जोग्य.

कोटा.

सिद्धिश्रीसर्वोपमामहाराजश्रीमहारावउमेदसिंघजि जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकपौंडरिकजी श्रीव्यासगोपालरामजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकराजश्रीराजजालिमसिंघजी जोग्य.

भदावर.

राजा सा १८४८ सावण सुदि छ ८

सिद्धिश्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजामहेंद्रप्रतापसिंघबहादुरदेवजू.

वेदमूर्तराजश्रीअग्निहोत्रिभोलानाथजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमापुरोहितराजश्रीलक्ष्मीनाथजि जोग्य.

बुंधेलखंड

पौंडछो

श्रीमहाराजाधिराज श्रीमहाराजाश्रीराजाविक्रममाजीतजूदेव.

दतिया

श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजाश्रीरावराजासभजीतबहादुरजूदेव.

सिमथरवाले.

सिद्धिश्रीमहाराजापाहाडसिंघबहादुर जोग्य.

चंदेरी.

सिद्धिश्रीसर्वोपमामहाराजश्रीराजारामचंद्रजूदेव.

पुरवणी दतिया.

श्रीमहाराजकौमारश्रीकुवरबहादुर फत्तेसिंघजूदेव.

डंगहाई

परणेवाला

श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजाश्रीढोकलसिंघजूदेव.

श्रीमहाराजकोमारश्रीदिवानमुसाहेबकेसरसिंघज.

सिद्धिश्रीहजूरिगजासिंघजू.

श्रीवगसिहरिकृष्णदासजूश्रीमहाराजकौमारश्रीनोनेअर्जुनसिंघजूदेव एते.

पुमानसिंघकेबेटावगैरे.

चरखारि

श्रीमहाराजाधिराज श्रीमहाराजाश्रीराजाबिजेबाहादुरजूदव.

श्रीमहाराजकौमारश्रीकुवरबाहादुरदलगंजनजूदेव.

श्रीअमलसिंघकुमालुम होय.

परवानोश्रीलालामानिकचंदजोगु.

श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजा–श्रीसरनेतसिंघजूदेव.

श्रीसाम्राटवाजपेईरमापतिजू तथा पं श्रीसाम्राटवाजपेईकीरतसिंघजू.

गुमानसिंघ.

बांदेवाला.

श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजाश्रीराजासवाईबषतसिंघजूदेव.

गजसिंघ

श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजाश्रीराजागजसिंघजूदेव.

सोपर

सिद्धिश्रीसर्वोपमालायकराजाश्रीराधिकादासजी जोग्य.

गढामडल.

श्रीराजाहरिसिंघजूदेव,

षातोली.

सिद्धीश्रीषातोलिसुस्थाने जोरावरसिंघजी जोग्य.

सिद्धिश्रीसर्वोपमाठाकराश्री भोपतसिंघजूदेव.

सिद्धिश्रीसर्वोपमालायकठाकुरश्रीजोरावरसिंघजी जौग्य.

करोली

सिद्धिश्रीसर्वोपमामहाराजश्रीराजामानिकपालजी जोग्य.

वरकड साधारण राजे यांस लिहिणें तर सिद्धिश्रीअमुकसुथाने कराव अथवा राजा अथवा ठाकुर याची चौकसी करून लिहित जावें.

नाथद्वारे जे गोसावि कागद सुडाचे लिा

· श्रीमद्वल्लभकुलभूषणेपुहरिभक्तपरायणेषु श्रीगोस्वामी श्रीगिरधारिजीमहाराज एतेश्री दंडवत बंचे अपके.

काकरोलीवाले गोसावी कागद बारीक.

स्वस्तिश्रीव्रजभूषणजिगोस्वामि महाराज एतेश्री दंडवत आपके.

गावगन्नाचे जमिदार.

श्रीमंत राजश्री महाराजाधिराज आलीजाहा बाहादुर सुभेदारजिश्री दौलत रावजि सिंदे इहांके सरकारसें मौजे.

करोलिवाले कागद बारीक

सिद्धिश्रीसर्वोपमालायकराजाश्रीमाणिकपालजी जोग्य.

सिवदास उदेपूरचे कारभारी.

सिद्धिश्रीसर्वोपमासासिवदासजी.

पत्रांक ३८५ श्री. १७१६

यादी होळकर वा ऐवजाच्या वराता गाईकवाड यांसपासून घेतल्य सुा खमस सितैन

५५००० अंताजी नागेश का दार पा ढवळकें. सदरहू वरातेचे वसुलास भिकाजी पंतही पैलाडू आहेत.

२५००० गोविंदराव गाईकवाड पो सिभेर नजीक बडोदें. सदरहू ऐवजाचे वसुलास गोविंद......व मनोहर किंकर यांस....

१०००० चिंतो त्रिंबक का दार प्रा...सराई. वसुलास माणूस दिा लाडू ठेविले असे.

५००० चिमाबाई गायकवाड प्रा. कोरळे सदरहू वरात वसुलास मनोहर नाईक किंकर.

५००० केदारजी गाईकवाड कादार प्रां अंतापूर. सदरहू वरात मार निल्हेचेच हवालीं रा कृष्णाजी नाईकांनीं केली.

१०००००

सदरहू वराता रा कृष्णाजी नाईक......यांणीं हवालीं, जिकडील तिकडे केल्या आहेत.

पत्रांक ३८६ श्री. १७१६ माघ शुद्ध ३

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी:—

पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित जाणें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायणाचार्य व शामाचार्य यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे मांगलें, ताा सातवें. प्राां पनाळा, हा गांव दरोबस्त इनाम आपले वडील माधवाचार्यप्रभृति यांस श्रीमंत कैलासवासी राजाराम साहेब यांणी देऊन पत्रें करून दिल्हीं. त्यास, पांचजण भाऊ. त्यांपैा कृष्णाचार्य यांचे नातू गोपाळाचार्य ह्मणों लागले कीं, गांव आपल्यासच दिल्हा. सबब त्याचा व आमचा कलह नऊ वर्षे लागला. त्याची पंचाइत सरकारांत होऊन, गोपाळाचार्य खोटे जाहाले. तेव्हां, पांचहजार एक रुपया आह्मां जवळोन हरकी घेऊन गांव पांच जणाकडे चालवावयाविशीं सरकारचीं पत्रें दिल्हीं. त्यास, आपण कष्टमेहनत केली. याजकरितां वांटणींखेरीज दर असामिनीं सालदरसाल शंभर रुपये प्राों चारशें आह्मांस चौघां भावांनीं राजश्री माधवराव गंगाधर यांचे विद्यमानें द्यावयाचा करार करून, पत्रें करून दिल्हीं. त्याप्राों चालत असतां, अलीकडे चारशें रुपये द्यावयास दिकत करितात. येविशींची ताकीद जाली पाहिजे ह्मणून. त्याजवरून हें पत्र लिहिलें असे. तरी यांचे भावाबंदांनीं दरसाल रुपये चारशें देत जावे ह्मणोन पत्रें करून दिल्हीं आहेत. त्याप्राों चालवावयास दिकत करीत असल्यास ताकीद करणें. जाणिजे. छ १ रजब, सुाा खमस तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणें ? हें विनंती.

पत्रांक ३८७ ॥ श्री. ॥ १७१६ माघ शुद्ध ५

राजश्री दवलतराव—बाबा शिंदे गोसावी यांसीं:—

छ अखंडित—लक्ष्मी—अलंकृत राजमान्य गंगाभागीर्थी अहिल्याबाई गाइकवाड मुाा देवळाली प्राो नाशीक विनंति विज्ञापना येथील कुशल ताा माघ शुद्ध ५ पावेतों आपले कृपा—अवलोकनेंकरून यथास्थित असों. विशेष. आमचें वर्तमानः आमचे धणी कैलासवासी जाले नंतर मानाजीराव गायकवाड यांनीं पंचवीस—तीस लक्षाचें *वितें घरांत होतें तें दरोबस्त लुटून नेलें. आह्मांस एक वस्त्रानसीं एक घर लहानसें होतें तेथेंच टाकीत ठेविले. आण मानाजीराव देवलोकास गेले. तदनंतर गोविंदराव गायकवाड आले. त्यांनीं येतांच प्रथम आमची खायाखर्चाची नेमणूक दाहा हजाराची होती ते बंद

केली आण घरास खणतें लाऊन एक लक्षाचें वितें नेलें. मग तथें आमचे चुलते नारोजी देशमुख होते त्यांजपाशीं आह्मी डागिने चवलक्षाचे ठेविले आण आह्मी श्री मार्तंडाचे दर्शणास जेजुरीकडे निघालों. आमचे मागें देशमुख मजकूर यांनीं गोविंदराव–बावास सांगून डागिने चवलक्षाचे त्यांस दिल्हे आण आपण मामलत करून गेले. आह्मी ये प्रांतीं आलों. तेव्हां आह्मांस वारीस एक श्रीमार्तंड किंवा आपण आहेत यास्तव विनंति लिहिली आहे. तर, आमचा बंदोबस्त करून देविला पाहिजे. आह्मीं भेटीस यावें, तर येथें आम्हांस खर्चाची आबळ आहे, यास्तव हें पत्र लिहिलें. आपण गोविंदराव बावास ल्याहावें. आमचे धण्याचे हातची नेमणूक आहे ते आह्मांस देवावी. व हाली रावबा पुणें प्रांतीं येणार आहेत. त्यांजलाही ताकीद करावी. दुसरें: नारोजी देशमुख यांचे साठ गांव आहेत. त्यांतून तीस गांवांवर आपण जती पाठऊन, आपण आह्मांस हात उचलून खायाखर्चास द्याल, त्यांत आह्मीं राजी आहों. आपण बहूतांचें पालन केलें तैसें आमचें केलें पाहिजे. विनंतीपत्र लिहिलें आहे. हें उदास न करावी. दुसरें: आमचे धण्यास एकशेंसाठ बायका होत्या. त्यांत चौघी खाशा. गोविंदराव गायकवाड यांणीं बायका दरोबस्त काढून दिल्या आण आमची चौघींची हे गते केली. हें वर्तमान सेवेसी विनंती लिहिली आहे. तर, आमचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. आमचे धण्यानीं कोल्याणकोट पैका असोन, त्यांचें देऊळ कोणें बांधलें नाहीं, हें आपल्यास श्रुत होये. आपण पाटिलसाहेबाचे पोटीं कुलदीप आहेत. मी धर्माची बहीण जाणोन, हें कार्य केलें पाहिजे. आण हें न जाल्यास आपले पायापाशीं बोलाऊन ध्यावें. आपण शेर पीठ द्याल तर खाऊन बसूं. यादो भास्कर यांणीं सर्व बंदोबस्त करून, घरोघर लाविले. दमाजीबावाचे हातचे दोनच्यार गांव पाटिलकीचे आहेत, त्यांत सर्वपरी काल याचा आहे, आमचें कोठें चालूं देत नाहींत. आह्मांस पत्रें आणून दाखवितात कीं, आम्हांस धण्यांनीं सांगितलें. मग खरें किंवा खोटें हें नकळे. त्याजमागें मानाजी बावाचे वेळेस वाण्यांनीं उपसर्ग दिल्हा. त्याजमागें आतां तर परभूमयच जालें. सर्व कारभार सोडून बायकांस लुटितात. सेवेसी श्रुत होय. हेतूप्रमाणें भरवसा जाणून, हें पत्र कोण्हास न दाखवणें आण उत्तर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

---

* ह्या पत्रांत वितें, गते, असे दोन शब्द आले आहेत, ते वित्य (वित्त) गत्य (गती) ह्या अपभ्रष्ट उच्चारांचे अपभ्रंश आहेत. असले अपभ्रंश शूद्रादि अशिक्षित लोकांत फार. मंगलोर येथें छापलेल्या स्टेफन्सकृत खिस्तपुराणांत सते (सत्य), श्रुते (मृत्य, मृत्यु) वगैरे असेच अपभ्रष्ट उच्चार शेंकडों आहेत.

पत्रांक ३८८ श्री. (नकल.) १७१७ आश्विन शुद्ध १

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी:— पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहणें. विशेष. तीर्थस्वरुप कैलासवासी नानासाहेब यांणीं संस्थान गढेमंडळेपैकीं रेवादक्षणतीरचे सोळा माहाल कैलासवासी रघोजी भोंसले यांस करार करून दिल्हे होते. परंतु भोंसले यांचा अमल महालीं दखल जाला नाहीं. त्यास, हालीं राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब यांणीं पुण्याचे मुकामीं येऊन व दक्षणतीरचे महालांविसीं रजबद्दल केली. त्यास मशारनिले सरकारलक्षाप्रमाणें चालतात. सबब त्यास सरकारांतून रेवादक्षणतीरपैकीं, खेरीज चौरागड करून, कमाल आकाराचे माहाल रु॥ ४००००० च्यार लक्ष रुपयांचे द्यावयाचा करार ठहरला. ते महाल दक्षणतीरचे बीतपशील.

१ पा॥ बचई.
१ पा॥ बिछिया तालुके दोन.
१ पा॥ बर्गी तालुके आठ.
१ पा॥ भोवरगड तालुके तीन.
१ पा॥ सायपूर चवऱ्यागड तालुके सात.
१ पा॥ खांडेबान्हे तालुके नव.
१ पा॥ कठोठिया.
१ पा॥ पलाहो.
१ पा॥ देवरधा.
१ ता॥ मुकुंदपूर.
१ पा॥ संभलपुर.
१ पा॥ रामगड.

१२

एकूण बारा माहालपैकीं सरकार अमल ज्या माहालीं असेल त्यापैकीं किल्ले चौरागडच्या खर्चाबद्दल रुपये ५०००० पंनास हजार रुपयांचे माहाल व गांव किल्लया लगत असतील ते सरकारांत किल्लयाचे खर्चास ठेऊन, बाकी सरकारअमली माहाल सेनासाहेबसुभा यांजकडे सदरहू चार लक्षांचे यावयाचे करार करून, ते सनद तुह्मांस सादर केली आहे. तरी मशारनिलेचे दुमाला करणें. चार लक्षांचे बेरजेहून अधीक बेरीज सरकारअमली माहाली जालियास, त्याचे माहाल सरकारांत ठेवणें, च्यार लक्षांचे भरतीस अमलीं माहालपैकीं बेरीज कमी आलियास, गैरअमली माहाल आहेत त्यापैकीं भरतीस कमाल

आकाराचे बेरजेचा माहाल लावून देणें. जाणिजे. छ २९ रा वल, सुसीत तीसैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें ! हे विनंती.

पत्रांक ३८९ श्री नकल. १७१७ आश्विन शु. ३.

राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यासी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष संस्थान गढेमंडलें, खेरीज चौरागड करून, रेवादक्षणतीरचे महालपैकीं बितपशील.

१ पा बांचई.
१ पा बिछिया तालुके दोन.
१ पा बरगी तालुके आठ.
१ पा भवरगड तालुके तीन.
१ पा रायपूर चौरागड ता सात.
१ पा खांडेबान्हे तालुके नव.
१ पा पलाहो.
१ पा देवरधा.
१ पा मकुंदपूर.
१ पा संभलपूर.
१ पा रामगड.
१ पा कटोटिया.

१२

एकूण माहाल बारा पैकीं च्यार लक्ष बेरजेचे माहाल आपलेकडे द्यावयाविशीं राजश्री बाळाजी गोविंद यांसी अलाहिदा सनद सादर केली असे. तरीं ते माहाल लाऊन देतील ते घ्यावें. सदरहू माहालपैकीं ज्या माहालीं सरकारी अंमल बनला नसेल, तेथें आपण अंमल बसवून द्यावयाचा करार केला आहे. त्याचमार्णे अंमल बसवून देऊन, आपलेबराबर बापूजी लक्ष्मण कारकून दिल्हे आहेत त्याचे हवालीं करून द्यावें. दिक्कत पडूं नये. रा छ १ माहे राखर, सुहुरसन सीत तीसैन मया व अल्लफ बहुत काय लिहिणें ! लोभ आसों दीजे. हे विनंती.

पत्रांक ३९० श्री (नकल) १७१७ आश्विन शुद्ध ३.

यादी राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा याजकडील जाबसाल सुा

सीत तिसैन मया व अल्फ नबाबनिजामअल्लीखांबाहादर याजवर कालेंकरून बिघाड जाहला तर तुह्मीं शरीक असावें, हा पूर्वीचा करार. त्याजवर सरकारांतून बिघाड जाला. आह्मांस ज्या ज्याप्रमाणें इशारा केला त्याप्रों अंमलांत येऊन आमचें येणें होऊन, भेटीचा प्रकार घडून, सर्व प्रकारें शरीक जालों. नबाबाचा सलुख जाहला, त्या वेळेस नबाबाकडून कामें उगवून दिल्हीं. कलमें.

प्रांत गंगथडीचा घांसदाणा एकंदर रुपये ३५०००० साडे तीन लक्ष करार ठरले. त्याप्रों प्रांत मजकुरीं घांसदाण्याचें एकंदर माहाल तीन लक्ष अठरा हजार याचे माहाल लाऊन द्यावें. याप्रों ठरलें कलम १.

प्रांत गंगथडी येथील घांसदाण्याचा एकंदर ऐवज येणें. त्याप्रों ऐवज लावून दिल्हा. बाकी मुबलक राहिली. त्याचा ठराव रुा २९००००० तपशील.

१५००००० नक्त.

८००००० नबाबाचें येणें वराडांत सन ११८५ सालीं जालें. तेव्हां पांच लक्ष रुपये देऊन, आठ लक्ष रुा रोखा लिहून दिल्हा. तो माघारा द्यावा.

६००००० आपले भेटीस आलों तेव्हां मागांत घांसदाण्याबा ऐवज असेल, तो मामलेदारांचे रुजु(वाती)नें मुजरा देऊन, बाकी राहील तो ऐवज द्यावा.

कलम १

२९०००००

वराडांत सांप्रत नबाबाचा व आमचा अंमल चालत आहे तसा चालावा. पुढें परस्परें ज्यादा तलबी होऊं नये. याजप्रों करार जाहला आहे. कलम १.

पत्रांक ३९१ श्री १७१७ आश्विन शुद्ध ३

याद.

९ सरकार निसबती.

१ मंडले.

१ चौरागड पंन्नास हजाराची जागीर सुद्धां.

१ दस्तावेज पहिले द्यावेत.

१ गंगाथडीचे माहाल लाऊन द्यावेत.

१ किस्त नबाबाकडील बमय कलम.

” ” दरबार खर्च.

१ नबाबास थैली.

१ गोविंदराव कृष्ण यांस.

१ बुंदेले यांस ताकीदा.

१ भोपाळकरांस पत्र.

९

६ खासगत.

१ सनदा गांवच्या ३.

१ पंचवीस हजारांचे भरतीचे गांव व स्वराज्याची माफी.

२

४ खासगत जातीचे.

१ जलगांव परगण्यांत गांव इनाम वंशपरंपरा.

२ पुण्यांत.

१ हवेली राहण्यास.

१ वाडी व जमीन एक चाहूर इनाम वंशपरं.

२

१ १ असामी चिरंजिवाचे नांवें सरकारची.

४

६

पत्रांक ३९२ श्री (मसुदा) १७१७ आश्विन शुद्ध ३

राजश्री बाळाजीपंतनाना गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. आपणापासून कर्ज घेतले मुा रुपये ३००००० तीन लक्ष चांदवडी. हे रुा व सालमारीं सरकारांतून मंडले संस्थान आह्मांस दिलें त्याजबद्दल आपले कारकुनाचा ऐवज करार केला रुा ५३५००० पांच लक्ष पस्तीस हजार चांदवडी, विा नारायण बाबूराव वैद्य, यांसी मुदती.

३००००० अलाहिदा खत आहे त्याप्रों मार्गशीर्ष वद्य १

५३५००० बशर्त मंडळेयाचा अंमल बसे तोंपर्यंत नारायणराव वैद्य

यांजसी अनामत असावें. याचा फडशा पौष अखर शके १७१९ करून देऊं.

८३५०००

एकूण सदरहू दोन मुदतीस आठ लक्ष पस्तीस हजार रुा देऊं. त्यांत पांच लक्ष पस्तीस हजार रुपायाचे अलाहिदा वराड व गोंडवण येथील आह्मी आपले अंमलावर वराता लिहून दिल्या आहेत. त्याचा ऐवज पावितों तेथें उपद्रव लागणार नाहीं. याप्रमाणें दोहीं मुदतींनीं आठ लक्ष पस्तीस हजार रुा क्षेपनिक्षेप श्रीरामचंद्रजीचे शफत पावते करूं.

पत्रांक ३९३ श्री १७१७ माघ वद्य ७

मसोदा गाइकवाड यांस पत्र.

विशेष. इकडील ऐवज येणें, त्यास बहूत दिवस जाहले, अद्यापि निर्गमांत येत नाहीं. पेशजी दोन तीन पत्रें पाठविलीं, त्यांचीं उत्तरेंहि आलीं. तथापि ऐवजाचा निकाल पडत नाहीं. हालीं कारकून पाठवावयाची सिध्धता केली असतां, राजश्री नीलकंठराव अनंत व जावजी पाटील गौळी यांचें ह्मणणें कीं, येविसीं पेशजी पत्रें रवाना जाहलीं आहेत, हालीं पत्र लिहून द्यावें, आह्मी लिहितों आणि ऐवजाचा निकाल होये तें करितों ह्मणोन, त्याजवरून, आपणांस लिहिलें आहे. त्यास इतक्यावर सत्वर ऐवजाची सरबरा होऊन यावी. येथील जाबसाल मसलतसीर, ऐवजाची निकड. या प्रसंगीं लिहिल्यान्वयें अमलांत आल्यानें, परस्पर घरोबा चालत आला त्यांत अंतर न दिसोन, उत्तरोतर, ऐक्यत्वाची वृध्धि राहील. याउपरी उत्तम दिसेल तैसें घडावें. रा रावजी आपाजी व जावजी पा येथें निर्गमांत आणून देत, ऐसें तर्तूद जरूर करविली पाहिजे.

छ २० साबान, सन सीतातिसैन.

पत्रांक ३९४ श्री. १७१७

यादी सरकार भरणा यास भोंसले यांणीं ऐवज लावून दिल्हा. केशवदास याजकडून हप्ता रुा ४३३००० पैकीं.

२००००० केशवदास यांजकडून.

२८५०० किता ऐवज लावून दिल्हा त्याजबा.

१३००० हत्ती नग दोन. ८०००।५०००.

१२५०० आंगठी व बाळ्या हिऱ्याच्या रवाना खंडो मुकुंद याजबा.

३००० बाा नारायण बाबूराव यांस खर्चास.

२८५००

४६६२॥ कर्जजमा, हुंडणावळीबाा गुा विठ्ठलदास ऐवज रवाना केला त्याजबाा.

२३३१६२॥

ऐन भरणा सरकार.

१००००० जवाहीर दागीने तीन अन्याबा याजसमागमें पाा ते.

५५००० पोंहोची हिऱ्याची.

३५००० आंगठी हिऱ्याची.

१०००० स्मरणी पाचेची.

५०००० रोख हुंड्या चांदवड गुा विठ्ठलदास.

१५००००

७५००० श्रीमंत अमृतराव साहेब यांजकडे.

२०००० किाा चांदवड.

५५००० किाा शिक्का गुा विठ्ठलदास व केशवदास २५०००, ३००००

७५०००

पत्रांक ३९५ श्री. १७१७

यादी सरकारचा ऐवज हाप्त्याबाबद भोंसले यांजकडे येणें:—

४३३००० ऐन.

१५१५० ऐन हाप्ता रुा ४३३००० पौ हुजूर भरणा जवाहिर व हत्ती वगैरे १३०००० बाकी ऐवज ३०३००० याची बट्टा हुंडणावळ सरासरी दरसेंहे रुा ५ प्रों.

४४८१५०

पैकीं वसूल.

२००००० केशवदास मारवाडी याजकडून.

१००००० गोमाजी पातेदार याजकडून.

१२५०० आंगठी हिऱ्याची १०००० व बाळ्या हिऱ्याच्या २५००

१३००० हत्ती नग ३ यो ८०००,५०००
३००० बा। देणें नारायण बाबूराव यांणीं खर्चास घेतले.

———

३२८५००
बाकी ऐवज येणें ११९६५०

तपशील.

१०४५०० ऐन भरण्यापैकीं कार्तिक अखेर द्यावयाचा करार आहे तो देवावा.
१५१५० हुंडणावळ व बस्याबद्दल येणें.

———

११९६५०

———

पत्रांक ३९६ श्री १७१७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसीः—
पो बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांस बारशाचा अहेर व मुलास अलंकार व सनगें सांडणीस्वाराबराबर येणेंप्रमाणें खासगत आमचा.

सनगें.
७ अहेरास.
१ तिवट बागपुरी.
१ शेला बागपुरी.
१ किनखाफ तांबडे.
२ जामेवारे बागपुरी.
१ लुगडें पैठणी.
१ खण पैठणी.
———
७
२ मुलास सनगें बदली.
१ कुंची.
१ पेहेरण.
———
२
———
९

अलंकार मुलास दागिने.
२ मणगट्या पांच मण्यांच्या व मोत्यांच्या जोड १ यो दागिने यो शहांत.
१२ मोत्यें.
१० पांच (दाहा) मणी.
———
२२
१ पिंपळवन यो शहांत.
९ हिरे.
१२ मोत्यें.
५ लोलकास.
७ सरास.
———
१२
———
२१

२ वाळे सोन्याचे पायांतील जोड
एक १ येणेंप्रमाणें दागिने.

५

यो सनगें नऊ व दागिने मुलांस पांच. पैकीं जवाहीर दागिने तीन व सोन्याचे दोन. येणेंप्रमाणें पाठविले आहेत. प्रविष्ट करून उत्तर पाठवावें. रा छ. १ माहे जिलकाद. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंती. पो छ १२ माहे जिलकाद.

पत्रांक. ३९७ श्री. १७१८ ज्येष्ठ शुद्ध ११

तैनात–जाबता, रघु बा फिरंगोजी.

सुा सबा–तिसैन–मया व अलफ. मा निलेचा मागील इा मोहरम ता छ १० जीलकाद पावेतों हिसेबाचा फडशा करून पो छ ११ जीलकाद नवी तारीख असे बोली नवी सेर द्यावा व दरसाल रुा २७ प्रों देणेबा मानिलेकडे तारीख मांडून दिल्ही असे.

१८≈ ईा छ ११ रोज ता छ २७ रोज १५ दरमाहा २ प्रों सेर होता. छ. २८ रोजीं सेर बंद जाला.

ईा छ २८ जिलकाद ता

दरमाहा ४॥ कोरडा. सेर नाहीं.

आदा होय.

११ माहे जिलकाद वैशाख.

१० रघू घरीं जातां जंत.

१ गंगू.

११

माहे जिल्हेज, जेष्ठ मास.

१ खुर्दा पैसे ६४ शुद्ध ११

पत्रांक ३९८ श्री. १७१८ ज्येष्ठ वद्य ३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदासिवपंत अभ्यंकर स्वामींचे शेवेसी.

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार. विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदासिव दीक्षित वाजपेय यांजकडे सालाबाद सातारियाहून नेमणूक पानसुपारी व दिवटीचें तेल

व भाजी व मशालेचे पोत व शाई येणेंप्रमाणें चालत आहे. त्यास भाद्रपद मासापासून आलीकडे चालत नाहीं ह्मणोन दीक्षितांनीं लिहिलें. ऐशास किरकोळ कामाचा बोभाट नसावा. सा पानसुपारी शाकभाजी वगैरे सदरहू प्रों मुदामत चालत आल्याप्रमाणें यांजकडे देत जाणें व सातारियाचे पोतापैकीं वर्षासन दीडशें रुपये पावतात ते सन आर्बापासून पावले नाहींत ह्मणोन कळलें, ऐशास यांच्या वर्षासनाचा ऐवज दीडशें रुपये प्रों सन आर्बा व खमस व सीत तीन सालाऐवज यांचा वर्षासनाचा राहिला असेल तो देणें. रा छ १७ जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंति.

पत्रांक ३९९ श्री (नकल) १७१८ ज्येष्ठ वद्य ३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सदाशिवपंत अभ्यंकर स्वामींचे शेवेसीः—

पो बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव दीक्षित वाजपेय यांजकडे सालाबाद सातारियाकडून नेमणूक पानसुपारी व दिवटीचें तेल व भाजी व मशालेचे पोत व शाई, येणेंप्रमाणें चालत आहे. त्यास, भाद्र. मासापासून अलीकडे चालत नाहीं. ह्मणून दीक्षितांनीं लिो. ऐशास, किरकोळ कामाचा बोभाटा नसावा. सदर पानसुपारी शाकभाजी वगैरे सदरहूप्रमाणें सुदामत आल्याप्रमाणें यांजकडे देत जाणें. व सातारियाचे पोतापैकीं वर्षासन दीडशें रुो पावतात ते सन अर्बापासून पावले नाहींत, म्हणून कळलें. अैशास, त्यांच्या वर्शासनाचा ऐवज दीडशें रुोप्रमाणें सन अर्बा व खमस व सित तीनसालाऐवज यांचा वर्शासनाचा राहिला असेल तो देणें. रो छ १७, जिल्हेज बहुत काय लिहिणें ? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ४०० श्री नकल. १७१८ आषाढ शुद्ध १०

यादी संस्थान गढेमंडळसंबंधें दरबारखर्चाचे करार सुा सबा तीसैन मया व अलफ. मुा पुणें.

५००००० श्रीमंत राजश्री नाना.
५०००० गोविंदराव भगवंत.
५०००० नारायण बाबूराव.
३०००० किरकोळ दरकदार वगैरा.

पैकीं वसूल —————— रुपये ——————

३५००० श्रीमंत नानाकडे दागिना आंगठी हिऱ्याची.	७००० नारायण बाबूराव खर्चास.
३५०००	७०००

४२०००

बाकी —————— रुपये ——————

५८८०००

तपशील.

९३००० बाकी चिठी सावकार पैठणकर दिनानाथ नाईक महाजन व राजाराम नाईक लदू व बापूदेव.

४९५००० पो वराता प्रांत वराड व गोंडवण मिळोन अलाहिदा असेत.

येकूण, पांच लक्ष अठ्यायशीं हजार रु. बशर्त अंमल रुपये पुणियांत चांदवड येणेंप्रमाणें करार.

छ ८ माहे मोहरम सन १२०७

पत्रांक ४०१ श्री १७१८ आषाढ वद्य २

बेदशास्त्रसंपन्न राजश्री लक्ष्मीनारायण दीक्षित स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथिल कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावें. विशेष. सरकारांतून पालखी पाठविली आहे. तरी श्रावणमासाचे उत्साहाचे समारंभास आपण सत्वर यावें. रा छ १६ मोहरम, सुा सबा तीसैन मया व अलफ बहुत काय लिहिणें? हे विनंति.

पत्रांक ४०२ श्री १७०८ आषाढ वद्य ५

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिवदीक्षित वाजपेय याजी स्वामींचे सेवेसी.

विद्यार्थी बाळाजी जनार्दन कृतानेक सां नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहाला. वरकड मजकूर व उभयेतां चिरंजीवाचे वेतनाविसीं लिहिलें तें कळलें. ऐशास, वेतनाचा ऐवज सोईसोईनें पावेल. आह्मी बदामीचा किल्ला घेऊन, तेथिल बंदोबस्त करून, राजश्री हरीपंत तात्या यांस फौजसुधा करनाटकांत छावणीस ठेऊन, आह्मी पुण्यास आलों. नंतर हरीपंत तात्या गजेंद्रगड घ्यावयाकरितां गेले, तों किल्लेकरी यांणीं दहषत होऊन कौल घेऊन खालीं उतरले. किल्ला फते जाला. त्याजवर अदवानीकडे टिपूची फौज येऊन महसरा बसला. हें वर्तमान येतांच, चिरंजीव

राजश्री आपा बळवंत व राजश्री बाजीपंत अणा फौजसुधा पाठऊन, कुमक करून, महासरा उठविला. तुंगभद्रेस पाणी येईल याजकरितां फौजसुधा अलीकडे आले, तों दुसरे दिवशीं पाणीहि नदीस आलें. सारांश, श्रीमंताचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूवर जरब बसून फौजा अलीकडे आल्या. आपल्यास कळावें याजकरितां लिहिलें असे. रा छ १९ रमजान. *बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंति.

पत्रांक ४०३ श्री. १७१८ आषाढ वद्य १४

राजश्री नारायेणराव वैद्य गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावें. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री व्यंकटशास्त्री द्रवीड रामानुज ब्राह्मण, थोर, सत्पात्र व दक्षणी गायनकळेविर्सी निपुण, त्याणीं विनंती केली. याचे विनंतीवरून व राजश्री सदाशिव बापूजी यांचे लिहिल्यावरून, सविस्तर समजण्यांत आलें. त्यास, शास्त्री मशारनिले दक्षिणीगायनकलेंत वित्पन्न व ब्राह्मणहि थोर सत्पात्र आहेत हें समजोन, इकडेस येण्याविसीं तेथें तुह्मीं व सदाशीव बापूनीं त्यांसीं बोललाच आहां. त्यापक्षीं त्यांणीं सरकारांत येण्याचें करावें. येविसींचे मजकुराची आज्ञा जी करणें ती तुह्मांकडील राजश्री राघो धोंडदेव यांसी केली आहे. लिहितील. व राजश्री सदाशिव बापूजी यांसी लिहिलें आहे. बोलतील, त्यावरून कळेल. व शास्त्री मशारनिल्हेचेहि नांवें पत्र सरकारांतून लेहून पाठविलें आहे. रा छ २७ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ४०४

पो छ ११ रावल सबा तिसैन. श्री. १७१८ श्रावण वद्य ५

अजम व अकरम सिद्धेश्वररावसाहेब साहेब सलाम हुतालाः—

साहेब म्हेरबान मुशफक कदरदां फौज जाक्ष फौरसां अजिदील एकलास सेख हिमतअली अरब जमादार किल्ले बेळगांव सलाम बाजत सलाम मौवल करून आंकी: येथील खैर ता छ १९ सफर साहेबांचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. दरिआयाम, अलीकडे साहेबांकडून आज्ञापत्र येऊन सेवकांचा सांभाळ होत नाहीं. तर, साहेबीं वरचेवर आज्ञापत्र लेहून दिलआराम होई तें करणार आपण धणी असां. चरणांजवळ यावयाचें मानस. गुदस्तापासून विनंती लिहितच आहें. परंतु येणेंविशीं आज्ञा आली नाहीं. तर, वर्षास

---

* येथून अक्षर नानाफडणिसाचें.

साहेबाच्या चरणाजवळ एकदोन वेळां येऊन, चरण पाहिलेवर चित्त संतोष असतें. त्यास, विनंती लिहिण्यास आज्ञा येतच नाहीं. नाहींपेक्षां गणेश चतुर्थी होतांच शेवेसीं येतों. शेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.*

पत्रांक ४०५ श्री. १७१८ ज्येष्ठ—कार्तिक

मा अनाम देशमुख व देशपांडे पो लोणार यांसी:——

चिमणाजी माधवराव प्रधान. सुा सबा तीसैन मया व अलफ. परगणें मजकूर येथील निमे मोकासा व तिजाई खारकुंडा श्रीहणमंतराव दरेकर सरलष्कर याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम पेशजीपासून आहे त्याप्रमाणें करार असे. तरी, सालमजकुरापासून रा नारायणराव विश्वनाथ दिवाण व फडणीस निा सरलष्कर यांजकडील कमावीसदारांसी रुजू होऊन परगणें मजकूरचा निमे मोकासा व तिजाई खारकुंडाचा अंमल मुदामत प्रों सुरळीत देणें. सरलष्कर यांजकडे न देणें.

पत्रांक ४०६ श्री लक्षुमीकांत प्रसन्न. १७१८ आश्विन शुद्ध ९

श्रीमण महादेव आलमेल मगापति श्री त्रिमलनाथ व्यंकटेशं त्रिभुवनपंति आनंतकोटिब्रह्मांडनायेक कल्पवृक्षं चिंतामण स्वामी दयानिधि परिपूर्ण सागर परजोतिप्रकाशगहना श्रीवछेलांछेन श्रीत्रिमलनारायेण भुवनवेकुंठपति निराकार त्रिलोकनाथ माहास्थळ शेशाचळपरवंत राजेलोक व्यंकटनायेक श्रीमाहाराज व्यंकटंश चिरंजीव भक्तं राजा शाहूछेत्रपति माहाराज व श्रीमंत पेशवे मुखे प्रधान व अष्टप्रधान व राजेउमराव व कमाविसदार यांसि समस्त पारपत्यकार रघुनाथ आचार्य मुद्राधिकारी फैजदार मुकाम तीरपति सरकार चेद्रगिरी देसी आसनपति देवद्वारी संनिध बसून आज्ञापत्र आसीरवाद. उपरि ल्ह्यावया कारण आसीजे. गोविंदआया देशमुख पराडकर यार्णी हाजुरगिरीस येऊन वर्तमाण विदित केलें कीं, समुद्रापरियेत त्रिमलि याजकडे घरजमेचा यैवज थकला. वसूल होत नाहीं. त्याजवरून आज्ञापत्र रवाना केलें आहे. तर सरकारचे सिपाई देऊन, ताकीदपत्र देऊन, जेथवर त्रिमली असतील त्यास निक्षून ताकीद करून यैवज घरजमेचा गिरीस दाखल होये तें करावें. याचा फिरून बोभाट न ये तो आर्थ करावा. स्वामीची आज्ञा आहे. चिरंजीवास माझे मान्य करून स्वामीचे कार्यास ततपर आसावें ह्मणजे चिंतले मनकामना पूर्ण होईल हा स्वामीचा पूर्ण भरवसा धरावा. तुह्मास प्रसाद गंध मनोहार पाठविला आहे. सेरी वंदून घेणें हा आसीरवाद. मिती सके १७१८ जळनाम संवतसरे आस्वीन शुद्ध ९ नवमी.

---

* फारशींत दस्तखत—सही.

पत्रांक. ४०७ श्री. १७३८ आश्विन वा। १३

श्रीमहाराजाधिराज श्रीमाहाराजा आलीजाह सुवेदारजी श्रीदौलतरावबहादुर सिंदेजू. येते श्रीमहाराजधिराज श्रीमाहाराजा श्रीराजा धौकलसिंघजूदेवके वांच. आपर, उहांके समांचार सर्वदां भले चाहिजैं. इहाके समांचार आपुके करेतैं भले हैतैं. आपर पाती षलीता आवो. हकीकति जांनीया. भांति लिषिवेमें आई कै इहांके राज्यका वंदोवस्तु जलदी भयौ जातु है. फेर अपनै राज्यके कांमकौ जातुस्वालु करि जरूर निरयार करि पठवाईवेमें आइ हैं. और श्रीमाहाराज कोमांर श्रीरावप्रथीसिंघजुदेवकौं लिषी है, तासौं जांनिवेमें आइ है. ताकौ और हकीकती सब तपसीलवार श्रीरावककामुसारनलेकी याती तैं जांनी, सो भांतिभांति षातिर भई. आपुके करे तै तौ जंबूदीप भरेके काजेनकौ सुधारु होतु है. यौ राज्य तौ आपुहीकौ आई. अव हमांरे कांमकौ जरूर फैसला करि पठवाइवेमैं आवै. अब देर न होइ. जेठिनके पग वदले भाईचारे व्यौहारपर नजरि करिवेमै आवे. यौ राजु हम सब आपुहीके है. और हकीकति श्री–रावक कामुसारनलैके लिषे तैं जानिवेमैं आइ है. उहाके आनंद षुसी कीषवरे हमेस लिषवेमै आइ है. कातिक वदि १३ संवतु, १८५३ मुकांमु रींवां.

पत्रांक ४०८. श्रीरामजी. १७१८ आश्विन वा। १३

सिधि श्री सर्वोपमाजोग्य महाराजाधिराज आलीजाह माहाराजा श्रीसुबेदार दोलतिरावजी सींदे जोग्य लिषतं राव स्यंभूस्यंगकेन मुजरो बंच्या ऐंठाका समाचार भला छैं. आपका सदा भला चाहिज्ये. अपरंच. आप कृपामेहरबानी राषे छे, तींसूं विशेष राषेला. ओर दोन्यौं दरबारांको ब्योहार कदीमसूं चाल्यो आवे छे, सो दिन–बरदिन बधतो जाणेला. ओर केतायेक समाचार पंडित बालुबा तांतियाजीनें लिष्या छे, सो जाहरि करेला. ओर कृपा करि कागद–समाचार लिषाबो करेला. मीती काती बद १३ संवत १८५३ क.

माहाराजाधिराजआ. श्रीसूबेदार दोलतिरावजी सींदे जोग्य.

पत्रांक ४०९ श्रीपांडुरंगायनमः १७१८ कार्तिक शुद्ध ८

राजश्री रघुनाथराव भोंसले गोसावी यासीः—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राो

दौलतराव सिंदे रामराम विनंति उपरी येथील कुशल ता। छ ७ जमादिलावलपर्यंत मुक्काम लस्कर नजीक ग्वालियेर, येथें येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखनीं संतोषवीत असावें. तदनंतर अलीकडे पत्र येऊन वर्तमान

कळत नाहीं. तरी, सदैव पत्रीं संतोषवीत असावें.' यानंतर, किले जापानेर येथील महालासमीप आपल्याकडील फौज आपल्या माहालानिहायच्या बंदोबस्ताकरितां येऊन पडली. आहे. तेव्हां इकडील किलेमारचे माहाली गावगन्ना कहीकाबाड व घासदाणा वगैरे उपसर्ग लागतो, ह्मणोन समजण्यांत आलें. ऐसियास, परस्पर पूर्वापार स्नेह. त्यापक्षीं तिकडील महालाचा बंदोबस्त होऊन इकडील माहालीं उपसर्ग लागणें, हे अयुक्त. येविषई निक्षून ताकीद होऊन इत:पर इकडील माहलची तसनस न होय तें व्हावें. तेणेंकरून इकडूनही तिकडील माहलीं उपसर्ग व्हावयाचा नाहीं. घरोब्याचे ठाई पुरवील चालींत न्यून नसावें. ह्मणजे, स्नेहाची वृद्धी, पुरवीपासून अद्वैत, त्या अन्वयें उभयपक्षीं चालींत अंतर नसावें, हें स्नेहास चांगलें. बहुत काय लिहिणें ! लोभ असावा हे विनंति.

पत्रांक ४१० श्री १७१८ कार्तिक शुद्ध ९

यादी रघुनाथराव डुबल सावनेरीस लढाई जाहली. परसराम रामचंद्र यांचे ते समई जखमी जाले. सुा सबातीसैन मया व अलफ. विा दौलतराव लक्ष्मण कारकून. छ ८ जमादिलावल.

पत्रांक ४११ श्री १७१८ कार्तिक वद्य ४



राजश्री दौलतरावबाबा गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो अलीबहादूर रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष यशवंतराव नाईक निंबाळकर यासी व वाघेले यासी लढाई जाली. नाईक सरकारकामास आले. त्यास, इकडे आपणाकडील फौज आहे. त्याजला ताकीद कुमकेविसी यावयाविशई पूर्वीं सविस्तर लिहिलेंच आहे. त्यास, राजश्री जगन्नाथराम व आंबाजी इंगळे यांचीं पत्रें आह्मांस आलीं कीं, राजश्री माधवराव फाळके व पलटणें आह्मी कुमकेस पाठविलीं आहेत व आह्मीहि येऊन पोहचतों. ते येऊन

पोहोचले ह्मणजे मोठीच गोष्ट जाली. त्यास आह्मांस आपल्याकडील भरवसा याप्रमाणेंच होता. त्याप्रों या समयीं दिष्टीस पडला. पूर्वापार स्नेह चालत आला आहे तोच लोभ आपण राखितील. त्यास, आह्मांकडील पुरावा करावयाची काळजी आपणांस असत जावी. रा छ १७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें ! लोभ कीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

पत्रांक ४१२ १७१८ कार्तिक वा ८

श्रीमंत महाराजाधिराज महाराज आलिजाह दवलतरावजी सिंदे बाहादुर साहेबजी योग्य:—

माहाराज चेतसिंह बाहादुरकै आशीर्वाद. माहाराजके कुशलक्षेमतें इहांके समाचार भले है. आगें इहांसें षरीता सरकारमों भेजा है. सो राए ब्रजलाल वकीलने गुजराना होयगा. कृपा करकें जबाब ईनायत होयगा तद तसली होयगी. सरकारके कृपापत्र आवनेसे चित्तकोंबडा बोध रहता है. और रातदिन यही मनावते रहते हैं जो सरकारका तशरीफ ल्यावना हिंदुस्तानकों जलद होय, तो अपना दुष सब सरकारमें बिनती करैं और कामयाब होवैं. बाकी, समाचार रायमजकूर अर्ज करैगा जादा सुभ हमेशा कृपापत्रसें याद फरमाया कीजियेगा. मीती मार्गशीर्ष कृष्ण ८ मंगळवार, संवत १८५३ बहुत का लीखें. आशीर्वाद.

पत्रांक ४१३ श्री १७१८ कार्तिक वद्य १४

यादी मसुदे. पत्रें:—

जगो बापू पत्र जे. मौजे इच्छापुरी व च्यटशहापुरा आमलेप्रमाणें माडोटी जागीर तुयुल—नवाब अजीम—उल—निसाबेगम—पातशाजादी यांजकडे चालत आहे. त्यास, हालीं तेथें कमालखान याचे पुत्रांनीं हर दो गांवचा अमल बसनद करितात. येविसी जगोबा बापूकडून ताकीद पुस्तपना होऊन पेशजी चालत आल्याप्रमाणें बेगम यांजकडे गांव चालेत,

सदरहूअन्वयें एकच पत्रें दोन जगोबाबापूस व यशवंतराव यांसि जे: मौजे सिखेडा प्रा ज्यलालाबाद जागीर अलतमगा—मीर—मेहेर—अली व मीर—करमअली यांजकडे पेशजीपासून शाहा—निजामद्दीन याचे पर्यंत चालत आला. त्यास उभयतांस पत्र जे, पेशजी गांव चालत आल्याप्रमाणें मशारनिलेकडे सुदामत चालों देणें, ह्मणून पत्रें.

सुरळित होय, तें करावें. फिरोन बोभाट येऊं न देणें. अगत्यवाद धरून कार्य करीत जाणें. ह्मणून पत्र १. *सनदेशिवाय कमालखान याणें गांव दाबावयास कारण काय? तरी, सुदामतप्रमाणें बेगमेकडे चालूं करणें व दोन पत्रें देवणें.

* वाजवी असतां, जप्त करावयास कारण काय? तरी, सुदामतप्रमाणें मशारनिलेकडे देवणें. म्हणोन पत्रें द्यावीं. छ २७ जमादिलाखर.

पत्रांक ४१४ श्रीरामजी. १७१८ कार्तिक.

श्रीमद्वल्लभकुलभूषणेषु हरीभक्तिपरायणेषु श्रीगोस्वामी श्रीगिरिधारीजी महाराज एते श्रीमहाराजाधिराज श्रीमाहाराजा आलीजाह सुवेदारजी श्रीदौलतराव सिंदेके दंडवत. वांच्य इहांके स्मांचार श्री—जीके कृपासु भले हैं. आपके सदा भले चाहिजैं. अपरंच पत्र आपकों आपो. स्माचार वांच्या. आपने श्रीजीका प्रसाद वा प्रसादीवस्त्र उपाध्याय प्रद्युम्नजीके साथ पठवाया सो पोहच्यां. और सेवासंमंधी उपाध्याय—मुसारनिल्हेके कहेमाफक ईहासों ताकीदपत्र उगैरेह बंदोबस्त करवाय दीया हैं. संस्थानसो कोईका षलस न होगा. पत्र स्माचार हमेसा लीषत रहेंगे.

पत्रांक ४१५ श्री. १७१८ मार्गशीर्ष शुद्ध ७

शके १७१७ चे सालीं श्रीमंत माधवराव नारायण पंत प्रधान कैलासवासी जाले. याचें कारण ऐसीजे. श्रीमंत दादासाहेब यांचे पुत्र बाजीराव व चिमणाजीआप्पा व अमृतराव हे जुन्नरास नाना फडणीस यांणीं ठेविले होते. तेथील रखवालीस बांबोरीकर नागोराम यांचे पुत्र बळवंतराव नागनाथ यांजला ठेविले होते. त्यानें बाजीरावाशीं सख्य करून सरकारचाकरी करीत असतां बाजीरायांनीं बळवंतरायास विचारिलें कीं, श्रीमंत रावसाहेब यांचे दर्शनाची इच्छा बहुत आहे. (पण) हा हेत पूर्ण कसा होईल? त्यावरोन, बळवंतरायांनीं विनंती केली कीं, आपण ह्मणतां हें उत्तम आहे, परंतु पत्र दिल्यास एकांतीं श्रीमंतास प्रविष्ट करीन, आणि आपलें वर्तमान विदित करीन. असें बोलले. नंतर बाजीरावांनीं श्रीमंतरावसाहेबास पत्र लिहिलें कीं, स्वामीचे पाय पाहावे असें चित्तांत आहे, भेट होईल तो उत्तम दिवस. याप्रमाणें लिहून बळवंतरायापाशीं दिलें. त्यांनीं पुण्यास येऊन, एकांत श्रीमंतांस पत्र लिहून, सविस्तर वर्तमान विदित केल्यावरून, हर्षायमान होऊन, उत्तर दिलें कीं, तुमचा हेत

*ह्या मखलाशा जगोबापूच्या हातच्या.

तद्वतच आमचा हेत कीं, तुमची भेट व्हावी. त्यास थोडक्याच दिवसांत चित्तानुरूप अर्थ घडतील, चिंता न करणें. याप्रमाणें लिहून दिलें. बळवंतराव आपले घरास गेले. हें वर्तमान जवळच खिजमतगार यानें ध्यानांत आणून जाहलें वर्तमान नानाफडणीस यांस विदित केलें कीं, बळवंतराव नागनाथ यांस श्रीमंतांनीं चिठी दिली. त्याजवर, नानानीं बळवंतरायाचा कारकून बोलाऊन आणून सांगितलें कीं, श्रीमंतांनीं बळवंतरायास काय चिठी दिली ती कलमदानांत किंवा गोमुखांत असेल. तिचा शोध करून बळवंतरावास न कळतां आणून देणें. त्यानें शोध करून, बळवंतरावास न कळतां आणून दिली. चिठी घेऊन श्रीमंतांकडे नाना गेले आणि एकांतीं श्रीमंतांस विचारूं लागले कीं, आपण बळवंतरायास कशाची चिठी दिली तें सांगितलें पाहिजे. श्रीमंत बोलले कीं, आह्मीं कांहीं चिठी दिली नाहीं व त्यासी कांहीं भाषणही केलें नाहीं. मग नानांनीं शपथ घालून विचारिलें. तेव्हां शपथपूर्वक याप्रमाणेंच बोलले कीं, बळवंतरायास आह्मीं चिठी दिली नाहीं. मग नानांनीं चिठी पुढें टाकिली. ती श्रीमंतांनीं पाहून खालीं पाहूं लागले. मग नाना कांहीं उणें अधिक बोलले. तें ध्यानांत ठेऊन जरब घेतली. इकडे, बळवंतरायास नानांनीं बेडी घालून किल्ल्यास पाठविलें. घरीं चौकी बसविली. असें जाणून, श्रीमंत बहुत खिन्न झाले. नानास बोलावून सांगितलें कीं, बळवंतरायाकडे काय अन्याय आहे, जें केलें तें म्यां केलें, त्याची बेडी काढावी. तें नानांनीं कांहीं ऐकिलें नाहीं. पुढें दसरा आला. दसऱ्याचे दिवशीं श्रीमंत सीमा उल्लंघन करून आले. परंतु असंतोषीच होते. तदनंतर त्रयोदशीचे दिवशीं माडीवरून अकस्मात् उडी टाकिली. हात पाय मोडले. औषधउपाय करतां, मृत्यु पावले. तदनंतर एक दोन महिने नानांनीं राज्यकारभार तसाच चालविला. दादासाहेबांचे पुत्र त्रिवर्ग जुन्नरीं असतां, त्यांस आणून राज्यभार त्यांचा त्यांस देऊन चालवावें, तें न करितां, दत्त घेऊन रावसाहेबांचे बायकोचे मांडीवर बसवून राज्य चालवावें, या मसलतींत सिंदे, होळकर आदिकरून सरदार व मुत्सद्दी यांस, आपण करतों हें सर्वांनीं मान्य करून दत्त घ्यावा हे नानांनीं आरंभिलें. तेव्हां कोणी रुकार निखालसपणें देईनात. प्रत्यक्ष श्रीमंताचा वंश असतांना, दुसरा वंश निभणार नाहीं. बाजीरायास वस्त्रें द्यावीं आणि आपण आपले कारभार करावे असा आग्रह दौलतराव शिंदे यांचा पडला. सबब, नानाच्या व शिंद्याच्या चित्तांत विकल्प विशेष वाढून, वैरत्वास गोष्ट पडली. कारण, शिंद्याचा जोरा विशेष पडला. बाजीरायाकडे शिंद्याचें आंत्र लागलें. त्याजला शिंदे पुण्यास घेऊन येऊन गादीवर बसविणार, पुढें आपला परिणाम नाहीं, असें नानांस समजलें. तेव्हां नानांनीं परशरामभाऊ पटवर्धन यांस बोलाऊन मदत करून ठरविलें कीं, शिंद्याचे अगोदर आपण उभयतां श्रीमंत यांस बहुत सन्मान करून आणून बसवावें.

असा निश्चय केला. येविशीं परशरामभाऊनीं नानापाशीं शपत घेतली कीं, त्यास आणल्यास गादीवर बसवावें, पुढें विकल्प आणूं नये. तेव्हां नानांनीं शपथ दिली कीं, कांहीं विकल्प नाहीं, तुह्मीं जें कराल त्यांत आपण असों. असा निश्चय जाल्यावरून, रातोरात परशरामभाऊ जुन्नरास जाऊन त्रिवर्गबंधूस भेटले आणि विनंती केली कीं, आपण पुण्यास चलावें, आपलें राज्य करावें. ह्मणोन बहुत प्रकारें विनंती केली. येविशीं त्यांनींहि राजप्रकरणीं अनेक प्रकारची विकल्पना काढून बोलत गेले. तितक्यांचीं निराकर्णें परशरामभाऊनीं आंगेजणीं करून केलीं. शेवटीं, त्यांनीं शपथा करविल्या. त्याहि केल्या. दूतभाताची क्रिया केली. गणपतीच्या दूर्वा उचलून दिल्या. तुळशी दिल्या. गाईच्या शपथा केल्या. याप्रमाणें केलें. त्याप्रमाणें श्रीमंतांनींहि आपले तर्फेनें शपथा करून कूच केलें. अमृतराव तेथें राहिले. उभयतां बंधु पुण्याचे नजीक खडकीच्या मुकामास आले. इकडून नाना आदिकरून भेटीस गेले. नानांनीं विनंती केली कीं, मी अपराधी आहें. त्याचें उत्तर बाजीरायानें केलें कीं, तुमचे अपराध तुह्मांस माफ केले, स्वस्थ असावें. याप्रमाणें बोलून, मस्तकीं हात ठेऊन, अभिधान दिलें कीं, तुह्मीं आह्मांस दादासाहेबांप्रमाणें आहांत. असें जालें. पुढें विचार नानांनीं केला कीं, रात्रौ समारंभ करून शहरांत आणावें, वाड्यांत चिमणाजी आपा साहेबांस न्यावें. आणि बाजीरावांस किल्याकडे न्यावें. हें त्यास कर्णोपकर्णीं श्रुत जालें. व शिंद्याकडील पत्र आलें कीं, आह्मीं येई तोंपर्यंत आपण वाड्यांत न जावें. इकडे नानांचें व शिंद्याचें वैमनस्य, जिवबाबक्षी शिंद्याकडील मृत्यु पावल्यामुळें, पडलें होतें. सबब, गोविंदराव पिंगळे, मोंगलांचे वकील, नानाकडून शिंद्याकडे गेले होते. त्यासीं तापट भाषण शिंद्यानीं नानाविषयीं केलें. त्यावरून तें नानास भयप्रद वाटून श्रीमंताकडे निरोपास आले आणि ह्मणों लागलें कीं, शिंद्याचे चित्तांत आमचे-विर्सी विकल्प आला आहे, ते आमची स्थित ठेवणार नाहींत, त्यापक्षीं त्यांची व आमची समक्षता होणें ठीक नाहीं. याकरितां आह्मांस निरोप द्यावा. तेव्हां, श्रीमंतांनीं उत्तर दिलें कीं, आह्मीं असतां तुमचें शिंदे कांहीं करीत नाहींत, तुह्मी बेफिकीर असावें. असें बहुत प्रकारें खातरजमा केली. परंतु चित्तास चैन पडेना आणि इतबारही पुरेना. मग, पायावर डोई ठेऊन, निरोप मागितला. त्यांनीं विडे दिल्हे. ते घेऊन, त्या घटकेस कूच करून, पुरंदरास आले. तेथून फाल्गुन शुद्ध ५ निघोन, रातोरात सातान्यास येऊन राहिले. इकडे शिंदे पुण्यास येऊन श्रीमंताची भेट खडकीच्या तळावर घेतली. पुढें राज्य करण्यास शिंद्यांकडील बाळोबा पागनीस व इकडे परशरामभाऊ यांनीं एकचित्त करून, बाजीरायास वस्त्रें आणून, गादीवर बसवावें, हे मसलत सिद्ध जाली असतां, शिंद्यास समजाविलें कीं, बाजीराव नानाचा आक्षेप सोडीत नाहींत, पुढें आपला परिणाम काय ? इकडे बाजीरावास सांगितलें कीं आपण

नानास अभय दिल्हें असतां, शिंदे पारपत्य करूं ह्मणतात, हें काय ? ऐसा उभयतांत वीट पाडून, शिंद्यास सांगून, बाजीरायास कैद करविलें. इकडे चिमणाजी आपास आपण घेऊन पुण्यास आले. चिमणाजी आपा येईनात. तेव्हां बळेंच अप्रतिष्ठा करून, पालखींत घालून आणविलें. सर्वस्वें परशरामभाऊचे मांडीवर श्रीमंताची मान असतां, त्यांची हे गत केली. आणि अशास्त्र करून बाईच्या वोटयांत चिमाजी आपा घातले. दत्तविधान केलें व गादीवर बळेंच बसऊन राज्यकारभार परशरामभाऊनीं पागनीस याच्या अनुमतें चालविला. अविधीकर्म केल्यापासून सर्वांस असाध्य जालें. शिंद्याचेच लोक व आणखी सरदार शब्द ठेऊं लागले. बाजीरायानीं चिमाजी आपाचा छंद फार घेतला. उपोषणें देखील केलीं. परंतु उभयतांची भेट करीनात. बाजीरायास परस्थळीं नेऊन कैदेंत ठेवावें, असा निश्चय करून, त्यांस ह्मणों लागले कीं, तूर्त येथें बखेडा आहे, नानाचें पारपत्य जाल्याउपरी तुमची गादी तुह्मांस देऊं, तूर्त आपण चार दिवस जामगांवास जावें. त्यास, बाजीराव बोलले कीं, तुह्मीं आह्मांस आणिलें त्यापक्षीं येथेंच काय होणें तें होईल, किंवा आह्मां त्रिवर्ग बंधूंस एकत्र करून मग चित्तास येईल तेथें ठेवावें, तोंपर्यंत आह्मीं येथून सुप्रवृत्तीनें जाणार नाहीं. म्हणून मांजरीच्या तळावरी हट्ट धरून बसले. तेव्हां, यांनीं बहुत अमर्याद तगादा केला. पाणी बंद केलें. लोकमानाना सुद्धां सात उपोषणें पडलीं. तदनंतर निरुपाय म्हणून शिंद्यासीं उत्तर केलें कीं, आह्मीं मरणास सिद्ध जालों असतां तुह्मी ऐकत नाहीं, तर तुमच्या चित्तास येईल तेथें राहूं. आह्मीं सर्व सोडिलें. मग दौलतरायानीं शपथ वाहिली कीं, तुमच्या पायापाशीं दुसरा अर्थ आपला नाहीं. चार दिवस आपण जामगांवास जावें, पहिन्यापंधरा दिवसांत सर्व बंदोबस्त होऊन आपण गादीवर बसतील. ऐशीं बहुत प्रकारें खातरजमा करून, समागमें फौज देऊन, जामगांवाकडे वाटे लाविलें. इकडे, नानाकडे बापूची रवानगी केली. नानांनीं मसलत लढविली कीं, पागनीस व परशरामभाऊ यांस धरावें ह्मणजे आह्मीं येतों आणि सर्वत्र मिळोन बाजीरावसाहेब यांस राज्य द्यावें, वस्त्रें द्यावीं असा निश्चय केला. हें वर्तमान अवश्यमेव शिंद्यास होतेंच. मग दरबारास पागनीस व धोंडोबा दादा यांस बोलाऊन आणून कैद केलें. आणि आपा बळवंत यांस चिठी पाठविली कीं, परशरामभाऊस तुह्मी हुजरांत घेऊन कैद करावें. तों ती चिठी परशरामभाऊचे हातीं गफलतीनें लागली. तों इतक्यांत सावधगिरी करून वाड्यांत आले. आणि चिमाजी आपास घेऊन आपले फौजेंत आले. तों मागाहून होळकराची व मोंगलांची फौज चालत आली. गोट लुटला. परशरामभाऊ सडे दो हजारानिशीं चिमाजी आपास घेऊन जुन्नरास गेले. फौजाही मागोमाग गेल्यानें मार्गीं सांपडत गेलें तें लुटलें. तेथें शहरांत फौज ठेऊन, किल्यावर चिमाजीआपास घेऊन, परशरामभाऊ गेले. तों किल्लेदारांनीं आ-

पासाहेबांस घेतलें आणि परशरामभाऊस कांहीं घेतलें नाहीं. मग बाहेरील फौजेनीं चिमाजीआपास किल्यावरून आणून, आपणाजवळ घेतल्यावर, परशरामभाऊवर हल्ला केला. संपूर्ण लुटून फस्त केला. लोक जखमी बहुत जाहले. कांहीं पळून गेले. दोघे पुत्र व परशरामभाऊ असे धरून, रास्ते यांनीं कैद करून, आपले गोटास आणिले आणि तसेच फराट्याचे मांडवगणास पाठविलें. इकडे, जामगांवाहून बाजीराव व अमृतराव असे शिद्यांनीं पुण्यास आणिलें. श्रीमंताची भेट सर्वांनीं घेतली. तोंपर्यंत रघोजी भोंसले फौजेसुद्धां पुण्यास आले. त्यांच्याहि भेटी जाहल्या. बाजीरावसाहेबास वस्त्रें देऊन, त्रिवर्ग बंधूनीं राज्य पूर्वी कैलासवासी नाना, भाऊ व दादासाहेब यांनीं चालविलें, या अन्वयें राज्य करावें, असें सिद्ध जालें. नंतर राज्याकडील वस्त्रें सातान्याहून आणिलीं, आणि मार्गशीर्ष शुद्ध पंचमी रविवारीं तेरा घटका रात्रीं श्रवण नक्षत्रावरी बाजीरायास वस्त्रें अलंकार देऊन, दुसरें दिवशीं सोमवारीं प्रातःकाळीं शहरांत बहुत समारंभ करून, वाड्यांत आणिलें. शके १७१८ जलनाम संवत्सरे, सन १२०६ मार्गशीर्ष मास.

पत्रांक ४१६ श्रीगजानन प्रा. १७१८ मार्गशीर्ष शुद्ध ७

कृष्णगडवाले यांसी पत्र कीं, पो सामर येथील कमाविसदार याजकडील कारकून माणसें तुमचे गावीं राहून, सामरेखेरीज मारवांडवाल्याची नाव पंचभद्रा वगैरे मिठाचीं बंदरें आहेत. तेथून मिठाची भरती करून, बेपारी तुमचे प्रांतांतून जातो. त्याजपासून फौजदारीचा हासील घेतात. दरम्यान तुह्माकडोन दिकत होते. व तुह्माकडील वकीलांनीं गैरवाका समजाऊन फौजदारी बाब पदरचे कादारास नेली. ऐसियासि, सरकार–अमलापासून चालत आलें, त्यांत दिकत केल्यास ठीक नाहीं. सरकारनुकसानीचा जाब तुह्मांस करणें लागेल. तरी फौजदारीचा सरकार–अंमल सुरळीत चालेल, फिरोन बोभाट न ये, तें करणें ह्मणोन, व सदरहू–अन्वयें यशवंतराव सिवाजी, याशी, अंभेरीस पत्र.

*सदरहूअन्वयें पत्र निक्षून द्यावें. छ ६ जमादिलाखर सबा तिसैन.

पत्रांक ४१७ श्रीगजानन प्रा १७१८ मार्गशीर्ष शुद्ध ७

पो सामरचे बंदोबस्ताविषईं सरकारचीं पत्रें.

१ बुंदी व कोठेवाले यांसी कीं, बणजारा बेपारी तुमचे प्रांतांतून मिठाचे भरतीस जातात. सां, पो सामर येथील कारकून तेथें राहून बेपारीयांची पेट करून सामरेस भरतीस पाठवावे, अाणि सागरेखेरीज नावा पंचभद्राकडे मिठाचे भरती करून येतात त्यांजपासून फौजदारीचा हासील लागतो तो

* येथून हस्ताक्षर मुख्याधिकाऱ्याचें. मखलाशी.

घेतात. ऐसें चालत आलें असतां, सालमजकुरीं दरोबस्त बणजारा मारवाडवाले यांच्या बंदरास पाठविले, सामरची फौजदारी घेऊं दिल्ही नाहीं, ह्मणोन विदित जालें. ऐसियासी, ये गोष्टीनें सरकार–नुकसान ध्यानास न आणितां, काादारास न मानून बखेडा करतां. तरी, इत:पर तुह्मीं बेपारी सामरेकडे भरतीस जाऊ न दिल्यानें पाा माारचे जमेंत कसर होऊन, त्याचा जाब तुह्मांस करणें लागेल, ऐसें समजोन सरकार अमलापासून वहिवाट चालत आल्याप्रमाणें चालवणें. फिरोन बोभाट येऊं न देणें.

१ लालाजीबावास पत्र ऐसें कीं, बुंदीकोठेवरून बणजारा बेपारी मिठाचे भरतीस जातात. त्यांस सामरेकडे जाऊं न देतां, मारवाडवाले याच्या बंदराकडे पाठविले. सामरेखेरीज भरती येते त्या:जपासून फौजदारीचा हासील पाो माारचा कारकून माणसें संस्थानमाारीं असतां त्यास घेऊं न दिल्हा. रांगड्याकडून सरकार–अमलासी दिकत जाली. तरी तुह्मी त्यांस ताकीद करून सुरळित चालवावा, ऐसें न होतां, तुह्मांकडीलच कारकून रांगड्याचे तरफेचें बोलणें बोलतात. ऐसियासी, बेपारी कोणी सामरेकडे न पाठविला आणि फौजदारीचे हासीलांत दिकत केलीयानें पाो माारची जमा कैसी बसते, हें तुह्मीं ध्यानास न आणल्यानें सरकार–अमलांत सालमाारीं बखेडा जाला, ह्मणोन विदित जालें. त्यास, अत:पर फौजदारी वगैरे सरकारअमलापासून चालत आल्याप्राो हाली न चालल्यास सरकारनुकसानीचा जाब, ऐसें समजोन फौजदारी हासीलाचे वगैरे सुरळित चाले तें करावें. फिरोन बोभाट न ये तें करणें.

*सदरहूचा सारांश पाहून पत्र द्यावें. छ ६ जमादिलाखर सबा तिसैन. मेघशामराव जमे बक्षी.

पत्रांक ४१८ श्री. १७१८ मार्गशीर्ष वद्य ६

श्रीमंत राजेश्री बाबासाहेब साहेबांचे सेवेसी:—

आज्ञाधारक येशवंतराव व अमृतराव सिंदे कृतानेक रामराम विज्ञापना तागाईत छ २० जमादिलाखर मुकाम दिल्ली साहेबांचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी आज्ञापत्र पाठविलें त्यांत आज्ञा कीं श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब पंत प्रधान यांच्या व आपल्या भेटी जाहल्याचें वर्तमान लिहोन अर्जी हजरत पन्हा यासी पाठविली आहे. त्यास, तुम्ही हे अर्जी हुजूर गुजरून, याचे जबाब जलदी पाठऊन देणें; म्हणोन त्यावरून अर्जी व आज्ञापत्रें येथें येऊन पोचतांच, आज्ञेप्रमाणें अर्जी हुजूर गुजरून प्रत्योतराचे शुक्याबदल अर्जी केली. तेव्हां शुके लिहावयाचा हुकूम होऊन आज शुके लिहिले. तयार करून सेवेसी पाठविले आहेत. साहेबाचे नांवें एक

---

*येथपासून मजकूर मुख्याधिकाऱ्याच्या हातचा.

शुका, व श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब पंतप्रधान यांचे नांवें येक शुका, व श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांचे नांवे येक, ऐसें तीन शुके हुजूरून लिहिले ते हालीं डाके समागमें रवाना करून दिल्हे आहेत. प्रविष्ट जाहल्याचें प्रत्योत्तर द्यावयासी लेखनआज्ञा जाहली पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान धण्याचें पुण्यप्रतापेंकरून सर्वहि यथास्थित आहे. आम्ही अहिर्निसीं हजरतपन्हाचे खिजमतींत हाजर राहोन, मुरशदजादे आदिकरून सर्वांचें तबीयतींत किंचितहि नाखुष न होऊं पावे अशी चौकशी क्षणक्षणा करून, सरकारसेवेच्या लक्षें हरयेकविशीं कामकाजाचा बंदोबस्त राखोन आहों. चाकरीची बूझ करून सांभाळ करणार धणी समर्थ आहेत. येथील किल्यांत किलेदारीचा जिमा गुदस्तापासून रा। मानसिंग गौतम याचा होता. सांप्रतकाळीं मा।र्निल्हेचें चित्त सरकारचाकरीचे ठायीं कंपेश दिलगीर, ऐसें राजश्री जगोबाबापू यांस समजल्यामुळें, किलेदारीच्या सनदा आमचे नांवें करून पाठविल्या. त्या कालच आम्हांकडे येऊन पोचल्या. एका दो रोजांत किलेदारीची दखल घेऊन, किल्यांतील बंदोबस्त चौक्या पाहारे व दिली दर्वाजे वगैरेचा बदस्तुरी चालत आहे, त्या अन्वयें करून मागाहून सेवेसी विनंतिपत्र लिहोन पाठवितों. बहुत काय लिहूं ? कृपा निरंतर केली पाहिजे. हे विज्ञाप्ति.

पत्रांक ४१९ ॥ श्री ॥ १७१८ मार्गशीर्ष वद्य १३

मसुदा सरकारचे ताकीद द्यावयाचे डिल्लीचे सुभादार येशवंतराव सिंधे यास ताकीद लिहावेयाचे:—काशीरामराय, कमळनयन मुनसी नि। सरकार याचे पुत्र, कासीराम यास डिल्लीचे सुभाचे मुनिसीगिरी मोकरार जाहला आहे. तेथील लिहिणें–पुसणें वगैरे जाबसाल त्याजकडून घेत नाहीं, म्हणून कळलें, आणखी दुसरे चुनीलालकडून लिहिविता म्हणून समजलें. जें लिहिणें, फारसींचें लिहिणें काम काय असेल तरी सरकारचे मुनसीशिवाय दुसराकडून न घेणें. तुह्माकडील चुनीलाल यास बरतर्फ करणें. तो पहिला गुमास्ता त्या जवळ होता. हाली मुनसीसहि चुनीलालासहि बनत नाहीं, यास्तव तुह्मी त्यास बरतर्फ करणें. फारसींचें लिहिणेंचे जे कारभार असेल तरी कासीराम मुनसीचे हातीं घेत जाणें. कासीराम मुनसीस दरमाहा रुपये ५० पन्नास देत जाणें. हे रोजमराबाबत रुपये पाछाई सुभेत खर्च मुजरा आहे. दर शेकडे रुपया ·॥· आठ आणेप्रमाणें पादशाई सुभेचे मुनसीस तहरीर पादशाई महलाची आमदानीवर मोकरार आहे. हरयेक अमील यास ताकीद करून, हे रुपये कासीरामास देवित जाणें. या गोष्टीचे तकरार न होणें. याजविषईं फिरयाद सरकारांत येऊं न देणें. आणि हरसहाय ह्मणणार कमलनयन मुनसीचे नातू आहे, त्यास डिल्लीचे तैनांत महंमदीखान पलटण आहे त्या

पलटणाचे फारसीचे सिरस्तदारी सांगितलें आहे. तरी पलटणचे शिरस्तेचें काम-काज हरसहाय याजकडून घेणें. यास रोजमरा मागला सिरस्तदारीचा यास देणें. कदीम सिरस्तदारास बरतर्फ करणें. याजविषई खानमजकुरास ताकीद करणें. दुसरेचे हातें एकंदर काम पारसीचें न घेणें. काशीरामाचा राजीनामा पाठविला आहे. फिरून बोभाट न ये तें करणें.

सारांश पाहून दोन पत्रें लिहावीं. छ. २७ जमादिलखर, सबा तिसैन.

पत्रांक ४२० श्री १७१८ मार्गशीर्ष वद्य ३०

साहेबाचे शेवेसी आज्ञाधारक लक्ष्मण अनंत कृतानेक विज्ञापना विनंती ता। छ २९ जमादिलाखर मुक्काम श्रीगंगातीर, येथें महाराजाचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. साहेबीं आज्ञापत्रें पाठविलीं, त्यांत आज्ञा जे:—खातरजमेनें कोणेविसींचा आंदेशा न करितां येऊन काम-काज पूर्ववत्प्रमाणें करीत जाणें. त्यावरून आह्मीं सैन्यांत जाणेची सिद्धता करून सेवेसी विनंतिपत्रें दोनतीन पाठविलीं आहेत. प्रविष्ट जाहलीं असल्यास सेवकाकडील अभिप्राय ध्यानीं आला असेल. राजश्री जगन्नाथराम यांणीं च्यार सरदार आह्मांस न्हेणेंविसीं पाठवणें विचारिलें. त्यास, आह्मांस चौघां सरदा-रांसी प्रयोजन काय? आण—खातरजमा कशास पाहिजे? येक गोष्टीची खात-रजमा पाहिजे. मजकडील कोणी कांहीं सांगेल आगर लिहितील तर त्याची छाण धण्यांनीं करावी. छाण केल्याअंतीं दुसरेयाचें सांगणें करार पडलें, तर मग आमचे धण्यांनीं पारपत्य करावें; क्षणाचा उजूर करूं नये. आणि छाण न करितां तुफान, ऐसें धण्याचे ध्यानीं आल्यास सेवक निर्मल होईल. येद-र्थींचें मात्र पक्कें वचन साहेबाचें घ्यावें. कारण गरीबीची आबरू सेवकाची आहे. विनाइलजाम कोणाच्या सांगितल्यावर जाहाला आबरूस खत्रा न व्हावा, इतकाच संकल्प. ह्मणोन अर्ज करून वचन घ्यावें ह्मणोन, चिरंजीव देवबा यासी लिहून पाठविलें. तीं पत्रें पोंहचून चिरंजीवाकडोन साहेबाचे श्रवणीं सेवकाची विनंति आली कीं नाहीं कळेना. ऐसें असोन, सेवकाकडील हरामखोरी कोणाच्या सांगितल्यावरून धण्याचे ध्यानीं आली? ह्मणोन ऐकितों कीं हा जाऊन नवाबाच्या अमलांत बसोन आगरेच्या किल्लयाची मजबुदी केली आहे. हरामखोरीवर प्रवर्तेल ऐसें चित्तीं आलें. त्यासी नवाबाच्या मुल-कांत सैन्यांतून येणेंचा परियाय येक आबरूकरितां. तो मजकूर सविस्तर दोन तीन विनंतिपत्रीं पेशजी लिहिला आहे. पत्रें सेवकाचीं पोंहचल्यास ध्यानीं आलाच असेल. आगऱ्याचे किल्लयाची मजबुदी नवीन आज ती कशाक-रितां करावी? आगरेची जप्ती करणेंविसीं सडे फौजेंतील सरदारांस लिहून आलें असेल. त्यावरून गुलाबराव कदम आगरेस सरदारांनीं रवाना केले.

परंतु, सरकारचें आज्ञापत्र सेवकाचे नावें नाहीं. तेव्हां विनाआज्ञापत्र किल्ला स्वाधीन करून ? वा उद्यां धण्यानीं विचारिलें कीं कोणाचे आज्ञेवरून किल्ला दिल्हा ? तर उत्तर द्यावयास जागा नाहीं. लहान गढी असली त्याच्या तीन परवानग्याचा उजूर करावा लागतो. हा आगरेचा किल्ला. बिना सरकार आज्ञापत्रासिवाइ किल्ला कैसा द्यावा. जाणोन, राजश्री विश्राम अनंत यांणीं साहेबास विनंतिपत्र लिहून धरूजोडी कैलासवासी माहाराज यांचे संकेताप्रमाणें रवाना केली आहे. पत्रें पोंहचून उत्तर आलें ह्मणजे किल्ला स्वाधीन करून, कबज घेऊन, चरणापासीं यावें. ऐसें साहेबाच्या, चरणीं लक्ष असतां, गैरवाका सेवकाकडील सरकारांत ध्यानीं येतो. तस्मात ग्रहदशा ऐसी जाणोन लटिके आळ येतात. येक मजबुती आगरेच्या किल्यांत इस्मालबेग हरामखोर याची केली. कारण सेवकाचे तगीरीचें वर्तमान महशूर जाहलें. तेव्हां शिबंदीचे लोक वगैरे आपापले ठिकाणीं दिलगीर होऊन, बंदोबस्त प्रसंगीं कमी पडोन, हरामखोर निघोन गेल्यास, जाहला हरामखोरी माथां येईल, त्याकाळीं प्राण द्यावा लागेल. यास्तव आगरेत वरचेवर हरामखोराचा बंदोबस्त पहिल्यापेक्षां अधिक जपून राखणेंविसीं लिहीत गेलों. किल्याविसीं सरकारी आज्ञापत्रें येऊन किल्ला देणेंत उजूर करतों, तर मग धण्यानीं सेवकाची हरामखोरी ध्यानीं आणावयाची होती. ऐसे प्रकार लटिके धण्यास कोणी सांगू लागेल, तेव्हां सेवकाचा परिणाम काय ? त्यांस सेवकाची विनंति हेच कीं, येक वेळ चरणापासीं बोलाऊन घ्यावें, मजकडे कोण काय इलजाम सांगतील त्याचे जाबसाल मी सर्व पुरऊन देईन. इलजाम येकहि अंगीं लागल्यास ते क्षणीं पारपत्य करावें. आण साहेबाचे कृपेनें मी येकनिष्ठपणें वर्तणूक प्रतरणा न करतां केली असलेस तिलप्राय इलजाम लागणार नाहीं. त्याकाळीं धण्याची निशा जाहल्याअंतीं मग धणी कृपाळू होऊन जे सेवा सांगतील त्या सेवेंत हाजर आहे. प्रथमपासोन संकल्प, धणीकामावर ह्या शरीराचें सार्थक व्हावें, ऐसा आहे. धण्याचे प्रतापें माझा संकल्प सिद्धीस जाईल. तूर्त ग्रहदशेनें येकनिष्ठता ठेऊन लहान-मोठ्या चाकऱ्या धण्याच्या केल्या असतां, साहेबाच्या चरणाचा वियोग होऊन अरण्यवास घडला आहे. त्यासी आमची निष्ठा धण्याचे चरणीं असल्यास, धणी कृपाळू होऊन चरणाची भेट होईल. बरकड राजश्री पाटील विनंति करितील. कृपा करून उत्तराची आज्ञा जाहली पाहिजे. सेवक पदरींचा जाणोन, सांभाळ करणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ती.

पत्रांक ४२१ श्री. १७१८ पौष शुद्ध ६

यशवंतराव यांसि पत्र सरकारचें जे:—

आह्मी हजरत पातशाहा व गुरशतजादे-आफाम यांसे अर्जदास्त व

अर्जी हाजीजी याचे मार्फतीनें पाठविली. त्याजकरितां तुम्हांस वाईट लागलें. व दुसरी अर्जी श्रीमत् बाजीराव–साहेब–बहादर व बाळाजी जनार्दन फडणीस यांजविसी शुके आणवावयाविसी पा होती. त्यास, मुनशीजी यांसि लिहूं न देतां, तुम्ही मोहर होऊं देत नाहीं, याचा अर्थ काय ? तुम्ही व मानसिंग किलेदार मिळोन वारंवार हजरत पातशाहापासी अर्ज करितां जे, हाजीजीचे मार्फतीनें हुजूर अर्जदास्त न यावी, व हुजूरचा जाबसालहि न करावा, शुके दर–जबाब अर्जीचे आह्मींच पाठवून देत जाऊं. तुह्मी पातशाहासी बोलणें बोलतां, तें काय समजून, हें पुरतें समजावें. सरकारांतून मर्जीस येईल त्याचे हातून काम घ्यावयाचें. व हजरत पातशाहाहि मुख्तियार आहेत. त्यांचे मर्जीस येईल त्याचे हातें काम–काज घेतील. कैलासवासी माहाराजहि हाजीजीचे हातें दाहा वर्षे काम काज घेत आले. तुह्मीं यांत मन घालूं नये. ज्या प्रो पातशा आज्ञा करितील त्या प्रो मुनसी शुके लिहून हाजीजीचे बंधू तेथें आहेत त्याचे हवाली करीत जावें. तुह्मांस काम–काज सांगितलें आहे तितकें करून राहावें. हजरत यांसी व आह्मांसी राज्याचे जाबसाल हरएक होतात त्यांत तुमचें कारण नाहीं. या प्रो निक्षून पत्र द्यावें.

* यशवंतराव शिंदे यास पत्र कीं श्रीमंत बाजीराव–साहेब पंतप्रधान व राजश्री बाळाजी जनार्दन फडनवीस यांचे नावें शुके आणविले होते व अर्जी हुजूर केली होती. त्यास बहुत ध्यानास आणतां कळलें कीं, तुह्मी अर्जीच हुजूर पोहचविली नाहीं व शुकेहि पाठविले नाहींत. त्यापक्षीं शुके कसे येणार ? हें ठीक न केलें. येथें काम नेटाचें आणि तुमची तो नवी ज्याजबदारी. यामुळें मोठ्या कार्यास विलंब पडला. तरी, याउपरी पत्रदर्शन हुजूर अर्जी देऊन, शुके तयार करऊन, पाठवून देणें. हाली येथें हाजीजी आहेत. त्यांचे मार्फत अर्जी जात आहे. शुके त्या अन्वयें येत आहेत याची तक्रार तुम्हीं न करावी. आणखी कोण्हीकडिल काम आल्यास चौकशी करणें नीट आहे. याचे मार्फतच्या कामास उजूर पडूं न देणें. हमेशाचा शिरस्ता आहे. याचे मार्फत अर्जी जाईल. शुका यावयास विलंब न करणें म्हणोन पत्र पाठवावें. छ ५ रजब, सबा तिसैन.

पत्रांक ४२२ श्री. १७१८ पौष शुद्ध १२

श्रीमंत माहाराजाधिराज माहाराज आलीजाह दवलतरावजी सिंदे बहादुर साहेबजी योग्यः—

माहाराज–चेतसिंह–बहादुरकें आसिर्वाद. माहाराजकी कुशलक्षेम सदां भली चाहिये. माहाराजके कृपातें इहाकें समाचार भले है. अपरंच. मकंर-

---

* वरील तक्रारीला यशवंतरावाचें हें स्वहस्तें उत्तर आहे.

संक्रातके तिल शरकरायुक्त इरसाल कीये हैं, सो कृपा करकें कबूल फर्माइयेगा. और हमेंशा कृपापत्र भेजके याद फर्माया कीजिये. जादा सुभ. मीति पौष शुद्ध १३ संवत १८५३ * बहुत का लिखैं आशीर्वाद.

पत्रांक ४२३ श्री २ १७१८ पौष शुद्ध १४

श्रीमंत राजश्री बाबासाहेब साहेबाचे शेवेसी:—

* शार आहों. परंतु शाहाची फौज बहुत. त्याच्या मुकाबल्याप्रमाणें इकडीलहि फौजेचा जमाव असता, तरी चिंता काय होती ? तूर्तकाळीं सरकारच्या फौजेचा भरणा इकडे थोडा. राजश्री बापू येथून पंधरा मजलावर कालपीस आहेत. वरचेवर पत्रें त्यांजला लिहितच असतों. परंतु लवकर येऊन उपराळा करितील तो सुदिन आहे. तेथूनहि बापूस आज्ञापत्रें बहुत जलदीनें लिहून, अतिसत्वर बापू फौजेसह वर्तमान इकडे येऊन पोचत, ऐसा अर्थ केला पाहिजे. हें वर्तमान एक महिना येथें कमबेस येतें. नित्य आह्मी लस्करांत लिहितच होतों. परंतु लाहोरास आलेशिवाय सत्य-मिथ्या समजेल. कारण कीं, लाहोरा पलीकडील मुलुक त्यांचा व अटक उतरलेसिवाय इकडील इरादा समजत नाहीं. परंतु नित्य कच्चें वर्तमान लस्करांत लिहितच होतों. आतां इस्वरें याप्रमाणें प्रसंग मांडला आहे. तर धण्यांनीं सत्वर उपराळा केला पाहिजे. आह्मी तर लाखाचे पेचांत आलों आहों. ईश्वर पार पाडील. चिंता नाहीं. सर्व पुण्य धण्याचें. कागदपत्रीं लवकर उपराळा केला पाहिजे. या समयास तहसील मुलकांतील बंद होऊन पंधरा दिवस जाले. एक पैसा येत नाहीं. पातशाचा खर्च व सिबंदीसुद्धां साठसत्तर हजार रुपयांचा दरमाहा आहे. हें हिंदुस्थान ! क्षणाक्षणाची हवा घेतात ! कर्ज सुखें एक रुपया कोणी देत नाहीं. या समयास उपराळा केला पाहिजे. बहुत काय लिहिणें ? कृपा निरंतर असो दिली पाहिजे. येथील उत्तरें पातशाचीं वगैरे जीं सला करणें तीं, येथून लस्करांत लिहिलें आहे, त्याचें उत्तर येईल त्याप्रमाणें करूं. आपणहि आज्ञा करणें ती करावी व कांहीं लाख पन्नास हजार रुपयेचा ऐवज पा ह्मणजे पाताशाचा खर्च चालेल. नाहींतर, येकतर फौजेचे निकड, दुसरे, हुजूरचा खर्च न पावला तर कठीण. न जाणो, निदान असाच प्रसंग पडला, आण पातशायास येथुन काढूं ह्मटलें. लाखो रुपये खर्च पाठवायाची तजवीज करून उत्तर पत्र पावतांच पाठवायास आज्ञा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

पत्रांक ४२४ श्रीरामप्रसन्न. १७१८ पौष शुद्ध १४

राजश्री रायाजी पाटील गोसावी यांसी:—

अखंडित-लक्ष्मी-अलंकृत राजमान्य स्नो येशवंतराव व अमृतराव सिंदे

---

* येथपासून हस्ताक्षर चेतसिंघाचें.

रामराम विनंति येथील कुशल ता। छ १३ रजब आपले कृपें करून मुकाम दिल्ली वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानः—विलायत-वाला फौजबंदी करून, या प्रांतावर चढाई करून येतो, हें वर्तमान आज एक महिनापर्यंत आहे. परंतु, मुख्य आपले ठिकाणींहून निघाला नवता. दोन तीन दस्ते फौज पुढें येऊन लाहोरचे मुकामीं पडली होती. आणि प्रतिवर्षी याचप्रमाणें आवाई येत असती. याकारितां तहकीकात वर्तमान न दिसोन पक्केपणें लिहिणेंत न आलें. त्यास, आजच लखनौवाले यांची डांक विलाईतपर्यंत बसली आहे. त्यांतून एकबारीची लाल थैली आली. त्यांतील कलमी वर्तमान कीं:—छ २९ जमादिलाखरी शाहा फौजेनिशीं लाहोरास दाखल जाहाला, एक लाख फौज समागमें आहे. पुढें दरकुच लौकरच येतो. हें वर्तमान प्रांतांत लोकांनीं ऐकोन बहूत घाबरले आहेत. दिल्ली वेगली करून, तमाम शहरें-जागे पळोन गेले. लखनऊसुद्धां गडबडली आहे. दिल्लींतीलही अमलाफैला पळावयाचा ईरादा करीत आहेत. परंतु हा काल तर आह्मी दीलदिलासा देऊन खातरजमा केली आहे. परंतु, लाहोराहून त्याणें कुच करून एक मजल पुढें आल्यानंतर शहरचे लोकांचा धीर काढणार नाहीं. ईश्वरें ही गोष्ट न करावी. कदाचित जाहल्यास लाहोर येथून कच्चे दोनशें कोस त्यास यावयासी विलंब लागणार नाहीं. त्यांत हे हुजूर. संस्थानिक जागा. येथील भ्रम गेल्यासें, हिंदुस्तानचा भ्रम राहणार नाहीं. धण्याचे पुण्येंकरून ही गोष्ट होणार नाहीं. परंतु, त्याची फौज मोठी. श्रीमंत यजमान दूर राहिले. राजश्री बापू यांसहि वर्तमान वरचेवर लिहीत असतों. त्यांची स्वारी या प्रांतीं असती तर चिंता नव्हती. आपणहि तेथून बहूत निकडीनें बापू यांसी लिहोन, स्वारी या प्रांतांत अविलंबें येवून इकडील बंदोबस्त होई तें जलद केलें पाहिजे. आह्मी किल्याचा व शहर-आदिकरून बंदोबस्तानें हजरत सहवर्तमान पातशाहाजादेसुद्धां खिजमतींत चौकस राहोन सरकारनक्ष होईल तेथवर करीत आहों. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा. हे विनंति.

पत्रांक ४२५ श्री. १७१८ पौष वद्य १

(नकल)

नबाब-साहेब मेहेरबान दोस्ता आजमुल-उमदाबहादुर सलमुहुतालाः—

छ १० माहे रजबीं आपल्यासी बोलून बाणाजी व कृष्णाजी सेटे आले. त्याणीं आपला खुलासा त्रिवार वचनाचा सांगितला. तो ध्यानास आला. त्याजवर छ ११ माहे रजबीं राजश्री कल्याणराव राजेबहादुर याजबराबर कालचें बोलल्याप्रमाणें आपण रुका व जिन्नस पाठविला तो पावला. त्या अन्वयें आह्मीहि तुह्मांसी निखालस आहों, येविसी खातरजमा ठेवावी. दुतर्फा

सरलता जाली. जें होणें तें आपले आमचे विच्यारें होईल. आपण राजश्री बालाजीपंत नानाविषयीं दोन गोष्टी लिहिल्या. त्यास नानानीं कारभारांत असावें अगर नसावें याचे गुणदोष पुरतेपणें पाहून, तुह्मी आह्मी मिळोन ज्यांत श्रीमंतांचे दौलतीस चांगलें तैसें करूं. आपली आमची दोस्ती पूर्वीपासून आहे. आणि छ १ माहे जमादिलावल सन १२०६ फसलीमध्यें तहनामा जाला आहे त्याजवर आपण आह्मी कायेम आहोंतच. पुढें ज्यांत दोस्ती ज्यादा वाढेत जाये तैसें दुतर्फा वर्तणुकेंत येत असावें. रा छ १४ रजब, सुा सबातीसैन मया व अलफ.

जादा काय लिहिणें ? हे किताबत.

पत्रांक ४२६ श्री १७१८ पौष वद्य ५

राजश्री लखबादादा स्वामीचे सेवेसीः—

सां। नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें विशेष. बरवासागरेवर वरात सरकारांतून सालमजकूर, बा। राजेश्री भगवंतराव विठ्ठल मोदी यांची जाइली आहे. तिचा ऐवज पटऊन देणेंविसीं पेशजी पांचच्यार घरू पत्रांत लिहिलें असतां, हालीं तुह्मीं लिहिलें कीं, ऐवज कृष्णाजी अंबादास याचा ह्मणोन आह्मी घेऊन, नरवरचें किल्याकरितां दारूगोळी आणविली होती, त्याजबा। दिल्हे. त्यास, हें ठीक नाहीं. कृष्णाजी अंबादास याजकडून गुदस्ताच जप्ती जाहाली. सालमजकुरी वरात याची जाहाली. याजस्तव ताकीद करून ऐवज देवावा, ह्मणोन लिहिणेंत आलें. असें असोन घालमेल केली, हें ठीक न केलें. त्यास, पत्र पावतांच वरातीबा। बयाणवसेरूो गौवर्धनदास याचे दुकानीं; जमा करून देवऊन पावती पाठऊन द्यावी. येविसि फिरोन लिहिणें न पडेसें करावें. रा छ १८ रजब हे विनंति.

पत्रांक ४२७ श्री १७१८ पौष वद्य ९

पत्र दिलें.

यादी बापू शिंदे यासी सरकारचें पत्र जेः—

नबाब सिराजुद्दौला—मीरज्या—ग्यासबहादर याचे जाहागिरीविसी जगोबाबापूंनीं लिहिलें त्या अन्वयें तुह्मींहि चालवावें. येविसी फिरोन बोभाट येऊं न द्यावा. ह्मणून पत्रें.

*सदरहू मान्यपत्र द्यावें. छ २२ रजब, सबा तिसैन.

---

*अधिकाऱ्याची मखलाशी.

पत्रांक-४२८ श्री १७१८ पौष वद्य १०

यादी: भगवंतराव बल्लाळ यासी कोंकणपटीच्या बंदोबस्तास सरकारांतून रवाना केलें होतें. त्यांणीं घाटाखालीं जाऊन किल्ले विश्रामगड व किल्ले घोसाळा व किल्ले बिरवाडी, प्रांत राजपुरी, या तिहीं किल्लेयाचा सरकारचे आज्ञेप्रमाणें बंदोबस्त करून असतां, लोकसुद्धां हुजूर येणेंविशीं आज्ञा जाहली. आज्ञेप्रमाणें हुजूर निघोन आलें. मागा रा चिमाजी माणकर, मामले तळा, व बाबुराव पासलकर, तालुके अवचितगड, याणीं सरसुभाकडील लोक घेऊन किल्यास वेढे देऊन, रसद बंद केली. ते किल्ले बी तपशील.

१ किल्ले विश्रामगडास एक महिना वेढा दिल्हा. किल्लेकरी यांणीं दररोज लढाई दिल्ही. परंतु किल्यावर बेगमी दाणा—गल्ला व दारूगोळा नाहीं. लोकांस पांच सात उपोशणें जाहालीं. तेव्हां, किल्ला मामलेदार याणीं हस्तगत करून, किल्यावरील लोक व सरकारचे लोक होते त्यांस कैदेंत ठेविलें; व रघोजी बालकवडे हवालदार निा पासलकर व रामाजी गोविंद कारखानीस हे सरकार लक्षांत होते; सबब मुलामाणसांसुद्धां कैद करून हवलदार व कारखानीस यास बेड्या घातल्या; व सर्व वस्तभाव गुरांढोरांसुद्धां झाडून लुटून घेतलें. त्यास, हवालदार व कारखानीस मुलेंमाणसेंसुद्धां व लोकांची चीजवस्त ढोरगुरूदाणागल्लासुद्धां त्यांचें हवालीं करून, सर्वांस मोकळीं करून, हुजूर रवाना करून देणेंविसी सनद मामलेदार यास.

१ किल्ले घोसाळा व बिरवाडी दोही किल्ले यांचा पूर्ववत् सरकारआज्ञेप्रमाणें बंदोबस्त असतां, हाली मामलेदार याणीं किल्यास वेढा देऊन, रसद बंद करून, लढाई करितात. व किल्लेकरी यांचीं घरें कबिलेसुद्धां कोंकणपट्टींत होतीं तीं जप्त केलीं. त्यास, मामलेदार याणीं किल्लेकरी यांसी कटकट करूं नये, वेढा उठवावा, व जप्तीची मोकळीक करावी. पुढें हुजूरून आज्ञा होईल त्याप्रो वर्तणुक करावी. किल्लेकरी यांचे वाटेस येकंदर जाऊं नये. व तालुके—मजकूर पौ वसूल मामलेदार याणीं घेऊं नये. किल्लेकरी यांणीं वसूल घेऊन सिहिबंदीखर्चाचा व किल्लेयाचा बंदोबस्त करावा. व नारो गोविंद हुजूर इशम हे लोकांसुद्धां नामजादीस किल्ले बिरवाडी येथें पेशजी गेले आहेत, त्यांचेहि वाटेस न जाणें. ह्मणोन मामलेदार याचे नांवें सनद.

१ घर व मुलेंमाणसें कोंकणांत किल्ले रामगड, तालुके विजयेदुर्ग, येथें आहे. त्यास, तालुकेमजकूरचे मामलेदार यांहीं घर जप्त करून चीचवस्त सरकारांत घेतली, व मुलेंमाणसें कैदेंत ठेविलीं

व जामीनहि घेतले. त्यास, भगवंतराव बल्लाळ हे हुजूर चाकरीस असतां, त्यांचें घर जप्त करून मुलेंमाणसें कैदेंत ठेवल्याचें कारण काय? तरी, त्यांच्या मुलामाणसाची मोकळीक करून जामीनपत्रें व वस्तभाव चीजवस्त घेतली असेल ती मुतळीचा तोडा आदिक-रून माघारा देऊन, त्यांचें चिरंजीवाचे कबज घेऊन हुजूर पाठ-वणें. याजविसि गंगाधर गोविंद याचे नांवें सनद.

३

*सारांश पाहून पत्रें द्यावीं छ २३ रबज, सबा तिसैन.

पत्रांक ४२९ श्री १७१८ पौष वद्य ३०

यादी रघुनाथपंत आसेरवाले यांस पत्र जे:—पायागडचे पोतनीसीच्या आसामीचे वेतनाविसी बलवंतराव महादेव यास तगादा करितां ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्यास, तेथील वेबाट रघुनाथ रामचंद्र यांच्या हातें होत आ-ली आहे. ते येथें येणार आहेत. ते आल्यावर फडशा करून देतील. आ-सामीच्या ऐवजाविसीं बलवंतराव महादेव यास तगादा न करावा. ह्मणोन पत्र १

सदर्हूअन्वयें ताकीद द्यावी. छ २८ रजब, सबा तीसैन.

पत्रांक ४३० ॥ श्री ॥ १७१८ माघ शुद्ध २

यादी विनंति बहुलचंद जाट जोतिसी वास्तव्य पो राजकड याची. पों—मजकुरीं आमचें वर्षासन रुा ९० नवद आहे. येविसीची सनदहि आह्मा-जवळ आहे. त्याप्रमाणें वर्षासन आह्मी आपलें पावीत अस्तों. आतां सालगु-दस्तां रा प्रतापसिंग याणीं एक साला रुा नवद दिल्हे नाहींत. म्हणून ता-किदपत्र दिल्हे पाहिजे कीं, भटजी मजकूर याचे वर्षासनाचे रुा पूर्वपासोन चालत आले आहेत त्याप्रा हाली सालगुदस्ताचे राहिले ते भटजी मजकूर याचे यास देणें. फिरोन येविसीचा बोभाट येऊं न देणें. म्हणून पत्र.

सदरहू विप्राकडे पैके द्यावे. छ १ साबान, सबा तिसैन.

पत्रांक ४३१ श्री १७१८ माघ शुद्ध ४

सेवेसी सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता माघ शुा ४ जा-णोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पा विशेष. राजश्री नारोपंत आवटी यांचा कारकून धरोन किल्यास नेला, ह्मणोन वर्तमान राजश्री चिंतो वामन देशमुख चे घरीं मशारनिल्हेकडील कारकून याणीं सांगितलें. त्यावरोन देशमुखांनीं

सांगितलें कीं, दोही किल्ल्यांचा सरंजाम जप्त करावा, मागोन सनदहि देतों. याप्रों उत्तर झालें. त्यावरोन आवटी याजकडील कारकून यांणीं कोपरगांवास आवटी यांस लिहून पाठविलें. व रायगड वगैरे किल्ले येथील सिबंदी दोन हजार आणावयाकरितां जासूद पो. हें वर्तमान आह्मांस कळलें. त्यावरोन आपणांस लिहिलें आहे. तरी, मारानिलेचा कारकून धरून न्यावयास कांहीं समंध दिसत नाहीं कीं, कलीचें आकसांमुळें धरोन नेला असल्यास चिजबस्तीची पावती घेऊन कारकून यास सोडून द्यावें. यांतील कारण ह्मणाल तरी, आवटे यांची भीड यजमानांस किती आहे व अगत्य किती आहे, हें आपल्या ध्यानांतच आहे. त्याहीमधीं मशारनिले गैरसंधी कटकट करितात, हेंहि नाहीं. सरकार–सनदे–वरोन जें करणें ते करितात. त्यापक्षीं तुमचे आच्यारास दोष येईल. आपला पक्ष कमी आणी सारे कारभारी पाणी घेऊन उभेच आहेत. याजकरितां आपणास जें करणें तें सरकारांत विनंति करोन करावें, हें चांगलें. चुरस वाढऊन, कलागत केली असतां, यश येईल, असें कोणाचे विचारास येत नाहीं. येविसी राजश्री माहादाजीपंतांनीं कचा मार लिहिला आहे. त्यावरोन ध्यानास येईल. सारांश, पुर्ता विचार चित्तांत आणोन, चांगलें दिसेल तें करावें. गडकरी यांजकडे रा यशोबा कळके याचा ऐवज यावयाचा, त्याची यादी पूर्वीं पो आहे, त्याप्रों रा पाठवून द्यावे. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंति.

पत्रांक ४३२ श्रीरामजी. १७१८ माघ शुद्ध ५

अपरंच. राजश्री पंडत बालुवा–तांत्याके नामका कागद पठायो सो पोंहोचा. समाचार मालुम हुवा. तीसपर दोनो दरबारका वेव्हार सुदामतसुं चलो आयो, तीणमाफक चलो जायया, ई मुनासबहे. छडी फोजमा हे सीरदारांसुं वाकनेल डीभाईकी मारफत करार ठेरनेमें आयो. सो उणाको लिषते सीरकारमाहें आयो. जींसिवाय दुसरी बात न्ही. राजदरबारसुं करार ठेऱ्यां मुजब पुषताई रीयामें दो बुत्रफकी दुरुसताई जानोगा. हिंदुस्थानकी मुषत्यारी सरिकारसुं पंडत राजश्री जगुबाबापूकी त्रपू हे उणा हे पन सीरकारसुं लीष रेहे. सारोजु वाप उणासुं करोला. श्रीमंत राजश्री पेसवासाहिबकी सिरकारको सारीत्रहे बंदोवस्त हुवो. अव हजुरसुं सीकहुयापर सवारी हिंदुस्थान–माहे जलदी हि आवेगी.

पत्रांक ४३३ श्रीरामजी १७१८ माघ शुद्ध ५

अपरंच. पाती आई. समाचार मालूम हुये. श्रीमंत रा पंतप्रधानकै नामे दुये षलीता पठये सो मुबमुहजुरमे गुजोरो करि, लिषेमुजब हकीकति अली·

बाहादुरबाबत मुफसल जुबानीतें जाहर कीवी. श्रीमंत राजश्री रावसवाईबाजीराव पेसवाईभरेके गादीपे कायम होई. श्रीमन्माहाराज नृपतीकी तरफसे षिलत इनायत हुये. अब तमान सलतनतको बंदोबस्त जलदीही आठचारि दिनमे होतुहे. राजके लिषेमुजब सिरकारमाहें रदबदल करि बंदोबस्तको जुबाब—सवाल लिषवेमे आई, तौ पातसाइभरेमे राजको दषिनको सुबा करिजाने हैं. सो बाहीमुजब दोइतरफसु बेव्हारु चलो जातु हे. सुदामतसुं घरोबो इकलासु चलो आऊत है, तामे दुसरी बात न्ही जानवी. और समचार कुँबर बिक्रमके लिषेते जानिवेमे आई है. सिरकारी माहालमाहें छेडाछेडी न्ही करोगा. छ ४ साबान, सबा तिसेन.

पत्रांक ४३४ (कासिराज.) १७१८ माघ शुद्ध ५

अपरंच. राजके तरफसें येक पत्र आगें. दुसरा हाल योंकर दोनोही पत्र आये, सो पोहोचेके समाचार मालुम हुये. अंत:करणसे मिलाफकी उमेद हे. सों श्रीमत राजश्री पंतप्रधान गादीपर कायम होयके श्री महाराज नृपतीके तरफसें षिलत इनायत हूये. अब बिचार हिंदुस्थानहीके आवनेका हे. वस्त्र पटायेसो राय—ब्रिजलालकी मारफत पोंहोचे. हमेसां पत्र भेजकें संतोष करोगे.

पत्रांक ४३५ १७६८ माघ शुा ५

(पाटील यांचें पत्र संभुसिंघास.)

अपरंच (राजश्री बालुबातात्याके नामे)

कागद पठायो सो पोंहचा. समाचार वाचा. तीसपर दोने दरबारका बेव्हार सुदामतसे चला आया तिसीमाफक चला जाय, यही मंजूर हे. छडी फोजमे सरदारासुंवा करनेल डिभइएमार्फत करार ठेहेरे तिसमुजब अमलमे आयेसें बेव्हारकी वृध्धी जाणोगे. श्रीमंत पेसवासाहेबको दोलतका बंदोबस्त हुवा. सवारी हिंदुस्थानमे जलदीही आवेगी. हमेषा कागद लिषते रहोगे.

इहा सरकारते लिषो आयो तीसमुजब इहाकी पुषताई हे. ओर राजदरबारसूभी.

पत्रांक ४३६ १७१८ माघ शुा ५

(संभुसिंगजीस सरकारचे.)

अपरंच. कागद तुह्मारा आया. समाचार मालुय हुये. दोनो दरबारका बेव्हार सुदामतसें चला आया तिसी तऱ्हे जाणो. दुसरी बात नही. ओर समाचार राजश्री रायाजी पटेलके कागदपरसें जाणजो.

पत्रांक ४३७ श्रीरामजी. १७१८ माघ शुा ५

(जयपूर प्रकरणीं पत्रें. राजा यास सरकारचे.)

अपरंच. कागद आयो. समाचार मालुम हुये. हमेषा पत्र लिषायके संतोष करजो. ओर समाचार रावसंभुसिंघजीके कागदका जवाब राजश्री रायाजी पटेलने दीया है, तीसपरसें जाणजो.

पत्रांक ४३८ श्री. १७१८ माघ शुा ६

यादी आन्याबा जाधव यास पत्र रघुनाथराव नेरलेकर साळोंखे याचे कामाविसीं.

मौजे नेरले प्रां कराड हा गांव सदहू रघुनाथराव——————
याचे पाटीलकीचा आहे. तेथें श्रीमंत पंतप्रधान याचा अंमल बाबती वगैरे.
१२०० देशमुखी व सरदेशमुखी.
५०० इनाम जमिनीबाबत.

———

१७००

येकूण सत्रासे रुपये सालीना अंमल आहे. तो ऐवज सरकारांतून आपल्या बेहडियांत वजा घेऊन, मशारनिले यांच्या कुटुंबास नेमणूक करून द्यावयाचा करार कैलासवासी श्रीमंत पाटीलबावा यांचा आहे. त्यास श्रीमंत नाना यांच्या कानावर घालून सरकारांतून सनद करून रघोजी साळोंखे याचें नांवें घ्यावी आणि ठाणें कन्हाड येथें आमलदार यांस पत्र देऊन ऐवज दरसाल मारनिलेकडे चालवणें, म्हणोन पत्र. येकूण सनद व कमाविसदार यास एक पत्र, म्हणोन या कामाविसी आन्याबा जाधव यास पत्र.

पाा खासा रसानगी बुगाजी जामदार की,

राा नानांच्या कानावरी घालुन, गांव सरकार अंमल असेल तो आपलेकडे करऊन देवणेंविसी चिठी द्यावी.

छ ५ साबान, सबासितैन.

पत्रांक ४३९ श्री. १७१८ माघ वद्य ५

श्री.
ज्योतीस्वरुपचरणीं
तत्पर माहादजी सुत
दवलतराव शिंदे
निरंतर.

दस्तकें सरकार राजश्री दौलतराव शिंदे ता कमासदारान व ठाणेदारान व चौकीदारान व रहदारान व बाजेलोकान व जमायेत मा। सु॥ सबा तीसैन मया व अल्लफ. राजश्री रामजी पाटील सिंदे यांजकडील माणसें पो नेवासें येथून तेल तूप वगैरे सरंजाम, उंट नफर साहा भरून खेपा दोन लष्करत आणतील. त्यांस मार्गी हसिलांविसीं मुजाहीम न होतां, रात्रीं चौकी पाहारा देऊन, आपलाली हद्दपार करून देत जाणें. जाणिजे. छ. साबान. मोर्तबसूद.

पत्रांक ४४० श्रीशंकर. १७१८ माघ वद्य ११

यादी येणेंप्रो पत्रें द्यावीं.

१ हवेली उज्यन येथील कमावीसदार यांसि पत्र द्यावें कीं मौजे आजनोठी हा गांव राजेश्री राघो नीळकंठ याजकडे आहे. त्यास, तुह्मी घासलकडीविसी वगैरे उपद्रव देतां, ह्मणोन कळलें. त्यास, याचे गांवास घासलकडीविसी वगैरे उपद्रव न देणें. याचा हरयेकविसी गौर करीत जाणें. येणेंप्रों पत्र.

१ राजेश्री आंबाजी इंगले यांसि पत्र द्यावें कीं, प्रा। मुराबाद येथील फडनिसीची आसामी राजेश्री सदासीव आपाजी याची आहे. त्यासि, सालमारीं दीकत करितां, ह्मणोन कळलें. त्यास, याचे आसामीविसी दिकत न करणें. पेशजीप्रा। चालत आली आहे त्याअप्रों चालवणें. येणेंप्रों पत्र द्यावें.

२

* सदरहू अन्वयें दोन तार्कीदपत्रें द्यावीं. छ २४ साबान, सबा तिसैन.

पत्रांक ४४१ श्री. १७१८ माघ–फाल्गुन.

विशेष खबर. जमाशाहाची फौज लाहोरास आल्याची खबर आल्यामुळें

---

* मुख्याधिकाऱ्याचें हस्ताक्षर.

तुह्मीं तागायत लिा. त्यास, सिखाची जमीयेत पहिल्यापासून भारी. व मुलूक सिखा–खालीं. तो येकदांच सोडून देऊन मार्ग देतील हें कसें घडेल? गरमीचे दिवस जवळ आले. त्यापक्षीं दिल्लीप्रांतें येऊन माघारें जाणेंयास बहूत कठीण. तेव्हां दिवस राहिले नाहींत, हाही आंदेशा आहे. दिल्लीप्रांतीं छावणी करी, तर वांचेल कसा? ज्या गोष्टी मागें कधीं घडल्या नाहींत, तेव्हां आतां तर दुरोपास्थ आहेत. सबब कीं, तीस–पस्तीस पलटण आपलें व फौज व इंग्रज–नवाब–सुधा अनकूळ आपल्यास करून घेतात. हें पेशजी पामर साहेबासी तुह्मासी बोलणें जालेंच होतें. त्याचा मुलूक व जागा व दौलतीची रयासत. त्यापक्षीं त्यास काळजी कमी नाहीं. आपण मोहऱ्यावरी. यामुळें तेच तुमची खातरजमा करून अनकूल होतील. तेव्हां, आपण घाबरे होऊन त्याच्या गळा पडूं लागल्यानें सुबिकी दिसेल, याचा आंदेशा तुह्मी करून बोलणें व्यर्थ व लिहिणें तें समजून बोलावें. खानासहि दिल्लीप्रांतीं सालमजकुरीं येतो ऐसेंच नजरेस आल्यास पकेपणें लिहिणें. तेव्हां श्रीमंताच्या कानावरी घालून पोख्तच पैरवी केली जाईल. तुम्हाकडील फौजेची तारंवल आहे, त्याची खर्चाची तजवीज करणें ते करणियांत येते, असें हाली पामरसाहेबास पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करून, उत्तर घेऊन पाठवावें. त्याचा आपला सरंजाम येकत्र होऊन मसलतीस पोहचल्यावरी, शाहाचा तो मजकूर किती आहे? असो. येथील मोहिमेचें काम आटोपत आलें आहे. चिंता नाहीं. दुसरेः– येशवंतराव सिंदेयाविशी तुमच्या लिहिणेंयांत येतें कीं, अखेरसालपर्यंत त्याजकडे सालजाब असावा. ऐसियास, तुह्मास एकदोन वेळां पेशजी लिा होतें कीं त्याजकडून पातशाहाची रजावंदी होत नाहीं. त्याच्या घरांत बंदोबस्त नाहीं. पैका तुह्मी घेतला असेल तर कर्ज घेतलें असेल. पातशाही खर्चाचे नेमणूकेतून यैवज घेऊन, पातशाहाच्या खर्चांत कमती पडून, फायेदा व्हावा ऐसें तर केलेंच नसेल. त्यापक्षीं पातशाहास हैराण करणें ठीक नाहीं. बास्तव हुजूर बंदोबस्त करून, तुह्मास पत्रें लिा आहेत, त्याअन्वयें येशवंतराव सिंदे यास तुह्मी ताकीद करून, येथील बंदोबस्त करून दिल्हाप्रमाणें खुलासा करून देवणें.

पत्रांक ४४२ ॥ श्री ॥ १७१८ फाल्गुन वद्य ६

श्रीमंत महाराजैधिराज माहाराजै आलीजाह दौलतरावजी सिंदे बहादुर साहेबजी योग्यः—

माहाराज चेतसिंह–बहादुरका आसिर्वाद. अपरंच. कृपापत्र दरजवाब पत्रके पौंहचा. अत्यंत षुशी व सरफराजी हासिल हुई. इहांकी सूरत आपने करजदारी व जेरबारी अहवाल कहाँ तक विनती करै–वकत मुलाजमतके

विनती करैंगे. इन दिनौमो फौज सरकारकी दतीआसें अकबराबादको गई. सो जो सरकारसे जागीर इनायत भई है उसी रस्ते गई. गांव पायमाल हुए, जिरात समेत. सो सरकारमो विनतीपत्र यह भेजाहै. माहाराजका भरोसा हमको सब सूरतसैं है. मिती चैत्र बद ६ संवत १८५३ * बहुत का लीखै. आशीर्वाद.

पत्रांक ४४३ || श्रीरामजी ||

सीतारामजी १७१८ आश्वीन वा। ७

सिधि श्रीमाहाराजाधिराज आलीजाह माहाराजा श्रीसूबेदार दोलतीरावजी सींदे जोग्य. लिषतं. माहाराजाधिराज माहाराजा श्री सवाई प्रतापसिंहजीकेन श्री बंच्या. ऐंठाका समाचार श्री जीकी कृपासूं भला छे. राज्यकी सदा भला चाहिज्ये. अपरंच. कागद–समाचार आयां. घणां दिन हुवा सो लिषावो कराजो. ओर समाचार राव स्यंभूसिंघजीका लिष्यांसूं जाणालो. मिती काती बदि ७ संवत १८५३.

पत्रांक ४४४ श्री १७१८ फाल्गुन वद्य ५

सरकारचें पत्र राजश्री जगन्नाथराम यासी जे: पेशजी इकडे कारभारी कैद केले. त्या आवईमुळें राजश्री लक्ष्मण अनंत फौजेंतून निघून ब्रह्मवर्ती गेले. त्यास, त्याजकडे सरकारचा पैसा कांहींच नाहीं. हाली सरकारांतून त्याची खातरजमा करून आणविले आहेत. त्यांस, पहिलेप्रमाणें कामकाज तुह्मी ते मिळोन करित होतां, त्याप्रो ते लस्करांत आले ह्मणजे करीत जावें. सरकारचीं पत्रें त्यांस पोहचलीं, म्हणजे मानिले लस्करांत यावयाचा उद्योग करतीलच. त्यांस, पुढें तुह्मी जाऊन घेऊन यावें. आगऱ्याचा किला त्याजकडे पहिला होता, त्याचा बंदोबस्त त्याचा ते राखतील. सरकारांत त्याजबिसीची खातरजमा आहे. तेथील हिंदुस्थानचा बंदोबस्त पूर्ववतप्रमाणें तुह्मी व त्यांणीं मिळोन करित जावा. ते लस्करांत आल्यावर आगऱ्याच्या सनदा त्यांचे नांवें पाठवितों. तवपर्यंत किल्याची घालमेल तुह्मी न करावी. ते आल्यावर बंदोबस्त करतील. म्हणोन पत्र.

परवानगी समक्ष कृष्णाजी व धोंडीबा जामदार. छ १७ रमजान, सन सबा.

पत्रांक ४४५ श्री १७१८ फाल्गुन वद्य ५

सरकारचें पत्र जे: तुह्मी पेशजी एक दोन पत्रें सरकारांत पाठविलीं. त्यावरोन खातरजमेचीं पत्रें सरकारांतून पेशजी रवाना केलींच आहेत. हाली तुह्मी

---

* येथून हस्ताक्षर चेतसिंघाचें.

पत्रें सरकारांत व राजश्री रायाजी पाटील याचें नांवें पाठविलीं. त्यांस, पाटलाचें व सरकारचें पत्र परस्पर राजश्री धोंडीबा जामदार याचे मारफतीनें राजश्री कृष्णाजी सेटे याचे विद्यमानें मनन केलीं. त्यांत लिहिलें कीं: पहिल्या सरकारच्या पत्रांवरून लस्करांत यावयाची सिद्धताच केली होती. परंतु आगऱ्याचे किल्याची बदनजर धरली, म्हणोन येथें कोणी समजाविलें. त्यांस लोकांनीं लहानमोठ्या चाकऱ्या केल्या. त्यांस बक्षिस वगैरे मिळालें व आह्मीं सरकार चाकरी आगऱ्यास व मारवाडांत वगैरे केली व वरचेवर करित असतां, परिणामीं हरामखोरी बक्षीस प्राप्त जाहाली. व फौजेतून निघाल्यास माघे दतियेवाले यांणीं एक दोन गांव खालशाचे मारले, त्यामुळें चैन पडत नाहीं. त्याचें पारपत्य करून, पुढें दोन महिन्यानंतर हुजूर यावयास आज्ञा पाहिजे. म्हणजे समक्ष विनंति करून कितेक निखालसतेच्या गोष्टी समजावीन. पुढें सरकारांतून करणें तें करावें. म्हणोन लिहिलें. त्यांस सैन्यांतून तुह्मीं निघोन जावें, असा सरकारचा पेंच तुम्हाकडेस नाहींच. तुह्मी गेलां तेव्हां आगऱ्याचा वगैरे बंदोबस्त सरकारांतून आलाहिदा करणें पडतो. ऐसीयासी, पहिल्यापासून सरकारचाकरी तुह्मी येकनिष्ठपणें केलीच आहे. त्याप्रमाणें आतां करावी. आणि हें पत्र पोहचलें म्हणजे तुम्ही खातरजमेनसी फौजेंत येऊन सरकारचाकरी पहिल्याप्रमाणें करीत जावी. येथें सरकारचाकरीच्या उपयोगाच्या माणसाचीच गरज आहे. तेथील वर्तमान वरचेवर कच्चें धोंडीबा जामदार व कृष्णाजी सेटे यांचे विद्यमानें सरकारांत लिहीत जावें. येथें फौजेचा वेढा, तेव्हां परिणाम कसा लागेल ? तशांत, दरबारांत वशिला नाहीं, असे अंदेशे कराल. तर चिंता न करावी. येथून तुमच्या लिहिल्या अन्वयें पुरवणी होईल. आगऱ्याचें कामकाज पहिलेप्रमाणें तुम्ही लस्करांत आला म्हणजे सनदा करून पाठऊं; व राजश्री देवजी मुकुंद यासहि तुमच्या जाण्यामुळें प्रतिबंध सरकारांतून केला होता तोहि दूर होईल. या लिहिल्याची खातरजमा ठेऊन लस्करांत यावें. तुम्हाविसीं कोणी येथें हरएकविसी गैरवाका समजविल्यास येथें गैरवाका समजल्यांत येणार नाहीं. चिंता न करावी. म्हणोन पत्र.

परवानगी समक्ष कृष्णाजी व धोंडीबा जामदार. छ १७ रमजान, सन सबा.

पत्रांक ४४६ श्री (नकल) १७१८ फाल्गुन वद्य ११

यादी राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा याजकडील मतलब सुा सबा तिसैन मया व अलफ. राजश्री बाजीरावजी यांचे बरें होण्याचे मतलबसंबंधी राजश्री बाळाजीपंतनाना यांनीं माहाडास करार करून दिल्हा तीं कलमें, त्यास हाली ठरावाचीं कलमें.

मंडले आमचे नांवें देऊन सनदा आमचे नांवें द्याव्या. कलम १

मंडले रघोजी भोंसले सेनासाहेब-सुभा यांचें नांवे करार करून द्यावे. येणेप्रमाणें करार करावे. करार.

चौरागड बमय त्याजखालील सरंजाम आहे त्यासुद्धां द्यावा. कलम १

चवरागड पन्नास हजार रुपयांचा सरंजाम खालीं आहे त्यासुद्धां द्यावा, येणेंप्रमाणें करार करावें. करार.

फौज तीन हजार याणीं चाकरी करावी हा पूर्वींचा तह आहे. तो करार सेनाबाहादर यांचा होता. आतां आह्मांस कृपा करून मंडले देण्यांत येत आहे. तेव्हां फौजेची चाकरी माफ करावी. कलम. १

तीन हजार फौज सरकारांत मसलत असतां चाकरीस यावी. मसलत नसतां माफ केली जाईल. मातबर मसलतीस सेनासाहेबसुभा यांणीं खाशानीं यावें, हा करार पेशजीचा आहे तो आहेच. येणेंप्रमाणें करार करावें. करार

संस्थानिक व विसाजी बल्लाळ नवस आदीकरून अठ्ठेचाळीस हजार रुा ठराऊन मनमाने तैसे याचे परगणे अमुके द्यावे ऐसा करार करून घेतले आहेत. त्यास, येथें बाकीफगारी नव्हती. त्यास दहा बारा हजार रुपये ठराऊन आह्मांस सांगावें. म्हणजे एका परगणियात नेमणूक करून देण्यांत येईल. कलम १

संस्थानिक व विसाजी बल्लाळ व नवस आदिकरून अठ्ठेचाळीस हजार तीनसें रुा पेशजींचे करारांत आहेत त्याप्रों सरकारांत माहाल मंडले पो

तीन वर्षे फौजेचा खिसारा अतिशय जाला हें वारंवार बोलण्यांत येत होतें. त्यास, सांप्रत कांहीं देण्याचा मुद्दा घालावा असा नाहीं. लाचारी आहे. दाहा लक्ष रुपये देण्यांत येतील ऐसे बोलण्यांत आले आहे. त्याज्यानीं बेहेबुद्धी होत नाहीं. सबब पोक्त सरंजाम पाहिजे. याजकरितां खर्चापुरती बेगमी जाली पाहिजे. कलम १

मसलत संबंधें खर्चाबद्दल येतांना माहालीं आठ लक्ष रुा द्यावे व भेट जाहलियावर सातलक्ष. एकूण पंधरा लक्षांचा करार. त्यापैकीं माहाली येतांना च्यारलक्ष रुा तुह्मी घेतलें. बाकी अकरा लक्ष रुपये द्यावयाचे. हा ऐवज मंडल्याचे नजरेचा ऐवज तुम्हांकडे येणें, त्यांत मजूरा दिला असे. येणेप्रमाणें करार करावें. करार.

नबाब निजामअलीखांबहाद्दर याजकडील तह खर्ड्यांचे मुकामीं कैलासवासी रावसाहेबांनीं करून दिल्हा आहे. कदाचित् नबाबाचा व आपला तह जाला कीं, कमती करून तह करावा तर आमचे कडील जे जाबसाल ठरले आहेत ते झाडून उगऊन द्यावे. त्यांत कमती होऊं नये कलम १

आपल्याकडील नबाबासी तह ठरला आहे त्याप्रों नबाबासीं बोलून तह चालेल, येणेंप्रों करार करावें. करार.

सरकारचे माहालांत घांसदाणा घेऊं नये. त्याचेबद्दल सरदेशमुखी प्रांत वराड आहे. तहाशिवाय नबाबा

लाऊन द्यावा. येणेंप्रों करार करावें. करार.

गंगाथडीबद्दल दस्ताऐवज कैलासवासी आप्पासाहेबांचे व आमचे आहेत ते न मागतां माघारें द्यावें. कलम १

दस्ताऐवज माघारे द्यावें. सरकार माहालीं घासदाणा घेऊं नये. येणेंप्रों करावें. करार.

मंडल्याबद्दल चोवीस लक्ष रुपये, वर्तळ्याबद्दल दोन लक्ष द्यावे, ऐसा करार आहे. तेव्हां सवीस लक्ष रुा लोभेंकरून माफ करावें. कलम १

पेशर्जी मंडल्याबद्दल ऐवज घ्यावयाचा करार जाला आहे.त्ती बेरीज रुपये.
२५००००० ऐन नजर.
२००००० वर्तळ्या बाबद.

२७०००००
पौ वजा रुपये
३००००० बुंदेल्यास पेशर्जी शिबंदीबद्दल देविले आहेत ते रुपये.
११००००० हालीं मसलतीबा सरकारांतून द्यावयाचा करार रुा १५०००० पौं महालापासून घेतले ४००००० बाकी रुा.

१४००००० बाकी रुा १३००००० तेरा लक्ष रुा सरकारांत सेनासाहिबसुभा यांनीं द्यावे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

करून घांसदाण्याचा करार अधिक कसा होईल, येणेंप्रों करार करावें. करार.

मागांत येतांना सरकारचे महालांत कोठकोठें ऐवज घेण्यांत येईल. त्यास जो करार जाला आहे त्यांत मजरा घेऊं नये. कारण फौजेचा खिसारा अतिशय जाला. सर्व प्रकारें लाचारी आहे. कलम १

मसलतसंबंधें खर्चाचे ऐवजाची मखलासी सदरीं जाली आहे. त्यास सदहू कलमांची मखलाशीं उगवली असे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मौजे सिरापूर भीमातीरीं आहे. तेथें कुरण आहे. पागेचे उपयोगी असे. याजकरितां दरोबस्त गांव देवावा. कलम १

वरकड कलमें पेशर्जी परस्परें करारांत आहेत त्याप्रमाणें बहाल व हर करार. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मंडले व चौरागड सरकारांतून रघूजी भोंसले सेनासाहेबसुभा यांस दिल्हा. त्याविशीं बाळाजी गोविंद बुंदेले यांस सनद व जमीदार यांस पत्रें लागतील तीं देवावीं. देणें.

छ. २४ रमजान, सन सबा तिस्सैन मया व अल्लफ, फाल्गुन मास, मुक्काम पुणें.

पत्रांक ४४७ श्री लक्ष्मीकांत. १७१८ फाल्गुन वद्य ३०

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी:—

दंडवत विनंती उपरी. आपण चिठी पाठविली ती पावोन लिहिला मजकूर कळों आला. राजश्री बाजिराव यांचा निरोप घेऊन सातारियास आलें. येविशींचा मजकूर राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव लिहितील. प्रस्तुत कित्तेक गोष्टी अडचणीच्या दिसतात. परंतु ईश्वरकृपेनें उलगडतील. आपली दृष्ट इकडे असावी म्हणोन लिहिलें. आपलें जाणें सातारियास जालें, तेव्हां रावमशारनिलेनीं बहुतां प्रकारें खातरजमा करून निरोप दिल्हा. आपणहि बंदोबस्तानसीं आहेत, म्हणोन उभयतांचे लिहिल्यावरून कळों आलें. ऐशियास, आपले* दूरंदेशीनें लोभ संपादून सातान्यास जाणें घडविलें. येनेंकडून मसलतीचे बहुत उपयोग आहेत. इकडे द्रीष्ट असावी. याजविसींचा प्रकार पूर्वीचा रुनानुबंध आहे, तेव्हां ल्याहावें ऐसें नाहीं. पूर्वी आपल्या इशाऱ्याप्रों घडलें व पुढेंहि तैसेंच घडेल. याजविसींचा मजकूर पूर्वीपासून उभयतां आपल्यापाशीं बोलतच आहेत. व आतांही बोलतील. हिंमत बाहाळ असावी. येनेंकडून श्रीकृपेनीं सर्व उत्तमच घडेल. गा छ २८ माहे रमजान. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ४४८ श्री लक्ष्मीकांत १७१८ फाल्गुन वद्य ३०

राजश्री नारायण बाबूराव गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रा रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुम्हीं पत्र छ १६ रमजानचे तारखेचे सातारियाचे मुकामींहून पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळाजीपंतनाना राजश्री बाजीराव यांचा निरोप घेऊन श्रीमंत छत्रपती याजवळ वस्त्राचे योजने करितां आलें. समागमें मीहि आलों. मागाहून राजश्री बाजीराव वस्त्रें घेण्याकरितां येणार. आपणास बातमी असावी, म्हणोन राजश्री नानांनीं चिठी लिहून श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव यांजकडेस पाठविली असे. उभयेतां सविस्तर लिहितील. सांप्रत दिवस अडचणीचे. कैसेंही बनल्यास आपली दिष्ट इकडेस, हें वारंवार उपरोधिक काय ल्याहावयाचें आहे, म्हणोन तपसिलें लिहिलें तें विस्तारें कळलें. व राजश्री बाळाजीपंतनाना यांनीं चिठी पाठविली ती राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव यांनीं इकडेस पाठविली. याजवरून व उभयेतांचे लिहिल्यावरून सर्व समजलें. त्यास, राजश्री बाळाजीपंतनाना यांचे

---

* येथपासून खाशांचें हस्ताक्षर.

जातीशीं दुसरा भाव ठेवलाच नाहीं... त्याचा इशारा यावा त्याचप्रों घडावें, हें पहिलेंहि घडलें आहे व पुढेंहि याचे इशाऱ्याप्रमाणें घडेल. येविसीं तुह्मीं खातरजमा करावी. सर्वात्मना लक्ष राजश्री बाळाजीपंतनाना यांजकडेस आहे. प्रसंग अडचणीचे आहेत. जेथें हिम्मत बाहाल आहे, तेथें येविसींची चिंता कांहीं असत नाहीं. श्रीदयेनीं चांगलेंच घडेल. जे वेळेस राजश्री बाळाजीपंतनाना यांचा इशारा येईल, ते वेळेस त्यांचे जवळच समजावें. यांत सर्वथैव दुसरें नाहीं. यांत सर्व अर्थ आले. राजश्री बाळाजीपंतनाना यांचे चिठीचें उत्तर लेहून, राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव याजकडेस पाठविलें आहे व उभयतांसहि सविस्तर लिहिलें आहे. त्याप्रमाणें तुम्हाकडेस चिठीचें उत्तर पाठवितील व इकडिल तपसिलें अर्थ तुम्हांस लिहितील. त्याजवरून समजेस पडेल. दिवस नाजूक आहेत. तेव्हां यावेळेस वरचेवर तुमचेकडून पत्र येऊन वर्तमान कळत जावें. राजश्री नानाचे चिठीचें उत्तर तुम्हांजवळ येतांच, तुह्मीं प्रविष्ट करावें, आणि इकडीलविसींचे प्रकारहि बोलण्यांत आणावें. फार काय ल्याहावें ? सारांष हेंच कीं, राजश्री बाळाजीपंतनाना यांचे जातीशीं एक विचार ठेविला आहेत. यांतच दौलतेचें कल्याण व उपयोग आहेत. जवळ फौज किती आहे, पेंच आंगावर कैसा, हें तुम्हांसहि समजोन आहे... ...ही दूर राजश्री बाळाजीपंत नानाच करितील. ही खातरजमा पक्की ठेऊन असों. तेव्हां याचा बयान काय ल्याहावा ? तुम्हाकडून कोणते एक समजणें तें यथातथ्य समजावें. त्याजप्रों इकडूनहि घडेल. राजश्री नानाचे जातीवर कोणतेहि गोष्टीची काळजी न ठेवितां, निश्चित असों. फार काय ल्याहावें ? रा। छ २८ माहे रमजान. *सर्वात्मना लक्ष राजश्री नानाचे जातीकडे लागोन राहिलें आहे. जेथें हिंमत आहे तेथें श्रीजी सर्व उत्तमच घडवील. राजश्री नानाहि दूरदेशे आहेत. व इकडीलविसीं त्याजला अगत्यावाद आहे. व भरंवसा ठेवितात. तैसाच येथील भाव आहे. याचा तपशील पत्रांत लिहिणें लागत नाहीं. सर्व तुमचे ध्यानांत आहे. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ४४९ श्री. १७१८

यादी

१ कसबे रहिमतपूर, प्रां वाई, येथील मोकदमाची व शेटेमहाजन यांसी पत्र कीं: कारकून व हुजरे व स्वार कसबे मजकूरचे जफ्तीस पाठविले

---

* खाशाचें अक्षर येथून पुढें.

आहेत. तरी, यांसी रुजू होऊन सालमजकूरचा वसूल राहिला असेल तो पेशजीच्या जप्तीदारापासून रुजू घेऊन सुदामतप्रमाणें देत जाणें. कलम १.

पत्रांक ४५० श्री १७१८

यादी विठोजी भोईटे आरडगावकर. सुा सबा तिसैन मया व अलफ. मलजी भोईटे यास पुत्र संतान नव्हतें. याकरितां त्यांणीं आम्हांस दत्तपुत्र घेऊन आमचें लग्न केलें. हाली मलजी भोईटे मृत्यु पावले. नंतर त्याचे सरंजामाची वहिवाट करावयास लागलों. तों माहादजी भोईटे यांणीं राजश्री बाळोबा पागेनीस यास गैरवाखा समजाऊन, मलजी भोईटे याच्या हिशोबाचे सरंजाम वगैरे पौ मारी येथील अमल माहादजी भोईटे याजकडे चालवणें, पुढें मनास आणोन आज्ञा करणें ते केली जाईल, म्हणोन पत्रें सरकारचीं मशारनिलेनें घेतली. त्याजवरून सरकारांतून राजश्री नारोपंत चक्रदेव यास सांगितलें कीं, माहादजी भोईटे व विठोजी भोईटे यांचे मनास आणणें. त्याजवरून बलवंतराव नागनाथ यास उभयतांचें मनास आणण्यास नारोपंतांनीं सांगितलें. तेव्हां, विठोजी भोईटे बलवंतराव नागनाथ यांसी रुजू होऊन आपला मार सांगितला. याप्रमाणें सरकारांतून मनास आणावयास सांगितलें. तें आम्हांस माहादजी भोईटे यांणीं न सांगतां, विठोजी भोईटे यास तसदी पोचऊन आणाविलें कीं, विठोजी भोईटे यांणीं क्रियेस जावलीस राजी व्हावें. त्याजवरून विठोजी भोईटे क्रियेस राजी जाहले. माहादजी भोईटे क्रियेस सरले, म्हणोन हें पत्र सादर केलें असे. तरी, परगणे मजकूर येथील अंमल मलजी भोईटे याच्या सरंजामाचे हिश्शाचा विठोजी बिन मलजी भोईटे याजकडे देणें.

म्हणोन ———————— पत्रें

१ पौ नसिराबाद येथील हिश्शाचा अमल देणें म्हणोन पत्र.

१ देहे—हाय दरोबस्त यांस पत्र.

१ मौजे जलगांव.

१ मौजे सुनसगाव.

१ मौजे खडकी.

१ मौजे तुळसुंबे.

४

———————— पत्र

१ देहहाय येथील हिश्शाचा अंमल देणें, म्हणोन पत्र.

१ मौजे उमाळे.
१ मौजे धानवड.

२

——————————————————— पत्र

१ सुभेयास पत्र.
१ कमावीस–दार, का॥ नसिराबाद, यास.
१ देशमूखदेशपांडे, का॥ नसिराबाद, यास पत्र.
१ रघुनाथपंतआबा, किल्ले असरीचे सुभेदार, यास पत्र.
१ मौजे वाठार, पा॥ वाई, येथील हिश्शाचा अंमल देणें, म्हणोन पत्र.

८

पत्रांक ४५१ श्री. १७१८

हाजी आबदुल नि॥ वलीआहदबहादूर हुजूर आहे, याविसीची आंदेशा लिहिला. तर, शानिजामदीन याची रीत तुह्मास वाकफ जालीच आहे. येशवंतराव सिंदेयाचा प्रकार समजलाच आहे. त्यापर्क्षी येथून हाजी–आबदुल–मजीद व सरकारचे तर्फेचा मातबर कारकून नेमून दिल्हा आहे. ते उभयतां हुजूर पातशाहाचे खर्चाचे माहाल वगैरेचा बंदोबस्त राखून रजावंदी राखितील. तुह्मी त्याचा उपर राखणें. इसमाल–बेग या (स) ग्वालेरीस आणावयाचें केलें. उत्तम केलें. परंतु पलटणचौकीबरोबर बंदोबस्त पक्का राखून पोहचावणें ठीक असें. नबाब, वजीर व पामरसाहेब वगैरे पत्रें आणिविलीं. तूर्त पामरसाहेबास लि॥ आहे. तुह्मीं मनन करून, पत्र त्यास पोहचाऊन देणें. त्याचें उतर ते लिहितिल व तुह्मासी बोलतील ते सविस्तर लि॥. नबाबवजीर यास आलाहिदा लिहून विशेष आहे ऐसें नाहीं. हें तुह्मीहि जाणत नसाल ऐसें नाहीं. जो सालजाब होणें तो पामरसाहेबाच्याच विद्यमानें होईल. तुह्मी लि॥ होतें कीं, च्यार पाच किल्ले कृष्णगडसुद्धां आहेत. नेमणूक हे लक्ष्मण अनंत यांणीं कमी केली होती, त्याप्रमाणें असावी ह्मणोन लि॥ होतें. तर, तें ठीक नाहीं. पेशजीची नेमणूक आहे तेच बाहाल करून बंदोबस्त राखवणें. बेदील ठाणेयाच्या लोकास न करणें. कृष्णगडास कृष्णाजी आंबादास याजकडील कारकून पोहचलेच असतील. तुह्मापासीहि पावलेच असतील. तर, जलद त्याची दिलभरी करून, रवाना करून देणें. ह्मणजे खातरजमेनें बंदोबस्त राखतील. दिल्लीचे नजीक, आणि जागा मेवातची. यास्तव बरगुजर न करणें. लौकर काम उ (ल) गडून देणें.

पत्रांक ४५२ श्री १७१८

विज्ञापना. इकडील वृत्त. बाहादरजीची स्वारी घाटीवर पर्णयाहून साता-कोसांवर येऊन दाखल जाली, तों घाटीखालीं झाडून रांगडे जमा होऊन, पाचसात हजार पायेदळ व स्वार च्यारसे-पाचसे याप्रों जमाव करून, जमलपूरचें ठाणें उठऊन दिल्हें. ऐसी सर्व जागां सुदीखाली रांगड्यांनीं कोठी केली. याजकरितां त्याचे तोंडावर व पारपत्याकारितां राजश्री मिर्जा-गनी-बेग याजला पाठविले आहेत. परंतु त्याचा भरणा बंदुकेचा बहुत आहे. दुसरें या जिल्ह्यांत जागा आहेत त्या सर्व भयाभीत नाईक मृत्यपावल्यापासून जाले आहेत. बिथरियेवाले व भगले व बुंदले या त्रिवर्गाचें पारपत्य चांगले जाल्या खेरीज जरब बसावयाची नाहीं. फौजेंतहि गवगवा बहूत आहे. कोणी कोणाचे येकविचारांत नाहींत. ऐसा प्रकार येऊन बाजसाला काल्पीकराकडील उभयताकडूनहि येकाचीहि पागापथक येऊन पावलें नाहीं. याणीं त्यास हि लेहून पाठविलें आहे कीं, आपले सरजामानिसी येऊन दाखल होणें, आपणाकडील ऐवज काल्पीकराकडे येणें. त्याविसीं याणीं निक्षूण ताकीद काल्पीकरास लेहून पाठविली कीं, आजवर वरातीचा ऐवज पटला नाहीं, याचें कारण काये, त्यास हालीं पत्र पावतांच ऐवजाची तोडजोड लाऊन द्यावी. त्याजवरून कांहीं तोडजोड लाऊन देणार आहेत. याप्रमाणें येथें लिहिलें आलें. भोसले याजकडील येणें वकील राजश्री केशवराव आले होते. याजकडील हि तिकडे कारकून गेला होता. दोन तीन दिवस त्या वकीलास ठेऊन घेतले होतें. सिष्टाचारीकरीतां आले होते. दोन दिवस राहून येऊन, दोन वस्त्रें जातिसमई त्यांस दिलींत. तो आपले ठिकाणीं उदास होऊन गेलेत मेहरची जागा मातबर. तेथें रांगडयांनीं येऊन मोर्चे लाविले. त्यांचे बंदोबस्ताकरितां कांहीं पागे पथकें नेमलींत. परंतु लवकर जाऊन पावत नाहींत. येथून त्याचीं ठाणीं दाहाबारा कोसांवर आहेत, तीं अद्याप उठून जात नाहींत. रांगड्याची चांगली येकवेळ पारपत्यें जाल्याखेरीज जरब बसणार नाहीं. निंबाळकराकडील कारभार येथें आज्ञापासीं नित्य येतात कीं, आमचा बंदोबस्त तेथें नाइक साहेबाचे पुत्र आहेत. आपले विद्यमानें येखादा जाबसाल होऊन हिकडे त्याची येणी जाले ह्मणजे भरवसा चांगला त्यास येईल. शेवेसी श्रुत होये. हे विज्ञाप्ति.

पत्रांक ४५३ श्री १७१८

यादी. सनगे नानांचीं सुा सबा तिसैन मया व अलफ.

१ पडदाळे मखमाली २ शेले जाहनाबादी कोरे.

१ बटवा किनखापी लहान. १ पागोटें ज्याहानाबादी कोरें.

१ पायेजमा किनखापी
१ वही कोरी वर बनात हिरवी.
१ सोवळें मर्दानी जुनें.
१ अंबव्याची रेंजा हात २ दोन हात असे
१

७

१ दुपट्टा जाहनाबादी धुवट.
१ दोरव्याचे महमुदी दुमडा हात ११
१ अतीस दुमडा हात २
२

८

१५
एकूण पंधरा सनगें आहेत.

पत्रांक ४५४ श्री. १७१८

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री भगवंत रावजी स्वामींचे सेवेसीः— पो अमृतराव रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजश्री काकानीं आपल्याकडून ऐवज देविला. त्याजकरितां स्वार मुजरद पाठविला. च्यार दिवस जाले. अद्याप ऐवज आला नाहीं. तूर्त दोन हजार रुपये देविले आहेत. तरी, हालीं विळूरीहून ऐवजास स्वार आले तेच रवाना केले आहेत. तरी, लिा प्रो ऐवज आपली सिबंदीची माणसें देऊन ऐवज चापळ येथें पावता करावा. ह्मणजे पुढें विळूरीं आह्मी रवाना करूं. वरकड नवल विशेष त्यावयाजोगें नाहीं. भिल्लांचा उपद्रव, यास्तव सरंजाम येथें आला आहे. शेपन्नास भिल्ल ठार जाले. नित्य स्वारी होत आहे. आपल्याकडील सविस्तर ल्याहावें. सत्वर ऐवज व स्वार पाठवावे. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा. हे विनंति.

पत्रांक ४५५ श्री १७१८

यादी सेनासाहेबसुभा यांजकडील जाबसाल ठरले त्याची माहितगारी.
१ मागील बाकीचे ऐवजीं ठरलें ते.
८००००० पुर्जा माघारा द्यावा.
६००००० सरकारांत मसलतीस आले तेव्हां येतांना घाटेनें घेतले ते.
१५००००० नग्द द्यावे. सरकारचे हप्ते तीन येतील त्याजबराबर यावे ह्मणोन करार.

२९०००००

शिवाय उभयतां कारभारी यांस दोन लक्ष द्यावे ह्मणोन कुपिया करार आहे.

१ कायरबोरी, येदलाबाद, कवाल, उदेपूर वगैरे महालांत पेशजीं चालत आल्याप्रमाणें अमल द्यावा ह्मणोन दसकतीनिशीं करार आहे.

१ घांसदाणा याबद्दल ठरेल तें.

३१८००० नबाबाकडील माहालांत लाऊन देणें ह्मणोन करार ठरला. माहाल लाऊन देणें आहे.

३२००० उमरखेड वगैरे माहालांत पेशजींपासून घेत आले. त्याप्रो घ्यावें.

३५००००

सदरहू ऐवजाचे नबाबाकडील माहाल लाऊन द्यावे.

१ सरकारांत रेवादक्षणतीर पौ चार लक्ष कमालाचे बा। सनदा माहाल दिल्हे. त्याविसीं बुंदेले यांस ताकीद पत्रें.

पत्रांक ४५६ श्री १७१८

यादी रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा. सु॥ सबा तिसैन मया व अलफ. गुदस्तां सु॥ सीत तिसैनांत आमचे येणें जाहलें होतें. त्या वेळेस कैलासवासी रावसाहेब यांणीं रेवादक्षणतीरपैकीं, खेरीज चवरागड, चार लक्ष रु॥ आकाराचे माहाल देऊन सनदा दिल्या. बितपशील:—

१ पा। बचाह
१ पा। बिछा तालुके दोन.
१ पा। बार्गी तालुके आठ
१ पा। भोवरगड तालुके तीन.
१ पा। सोयपूर चवऱ्यागड तालुके सात.
१ पा। खांडेबाऱ्हे तालुके नव.
१ पा। कटोटी
१ पा। पलाहो.
१ पा। रामगड.
१ पा। देववर्धा.
१ पा। मुकुंदपूर
१ पा। संभलपूर

१२

सदरहू बारा माहालपैकीं, सरकारअंमल ज्या माहालीं असेल त्यापैकीं किल्ले चौरागडचे खर्चाबा। रु॥ ५०००० पन्नास हजार रुपयांचे माहाल व

गांव किल्या लागले असतलि तें सरकारांत किल्याचे खर्चास ठेऊन, बाकी सरकारअंमली माहाल सेनासाहेबसुभा यांचे दुमाला करणें. चार लक्षांचे बेरजेहून अधीक बेरीज सरकारांत अंमली असलियास सरकारांत ठेवावा, चार लक्षाचे भरतीस अमली माहालापैकीं बेरीज कमी असलियास, गैरअमली माहाल आहेत, त्यापैकीं चार लक्षांचे भरतीस कमाल आकाराचे बेरजेचे माहाल लाऊन देणें ह्मणोन बाळाजी गोविंद कमावीसदार याचे नांवें सनद व माहालानिहायचे जमीदारांस पत्रें, ऐशीं दिल्हीं आहेत. त्याप्रों सांप्रत सनद व पत्रें देविलीं पाहिजेत.

पत्रांक ४५७ श्री. १७१८

यादी संस्थान मंडले व किल्ले चौऱ्यागड राजेश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडे द्यावयाचा अलाहिदा करार आहे. त्याविशीं सनदा व पत्रें. सुा सबा तिसैन मया व अल्लफ.

१ बाळाजी गोविंद यांस सनद कीं:—

१ राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा याजकडे संस्थान मंडले पो अठेचाळीस हजार तीनसें रुा याचा सरंजाम सरकारांत ठेऊन बाकी द्यावयाचा करार. त्याप्रों हालीं सरकारांतून कारकून पाठविले आहेत. यांचे स्वाधीन अठेचाळीस हजार तीनशाचा माहाल करून, बाकी संस्थान ठाणें जातसुद्धां सेनासाहेबसुभा यांजकडील अंमलदार येतील त्याचे हवाला करून कबज घेणें, ह्मणोन.

१ किल्ले चौरागड सरंजाम सुद्धां सेनासाहेबसुभा यांजकडे द्यावा. हवालीं करून हे सनद सादर केली असे. सेनासाहेबसुभा यांजकडील अंमलदार येतील त्याचे हवाल करोन कबज घेणें ह्मणोन.

२

२ सदरहू अन्वयें शिरस्ते प्रों जमीनदारांस पत्रें.

१ संस्थान मंडले.

१ किले चौरागड.

२

४

सदरहूप्रों दोन सनदा व दोन पत्रें शिरस्ते प्रों.

पत्रांक ४५८ श्री. १७१८

यादी श्री रामचंद्र तुलसीबाग का। पुणें येथील वर्षासन का। पाटस पौ दरसाल दोनशे रुपये राजश्री दौलतराव बावा सिंदे यांजकडील नेहमीं नेमणुक आहे. त्याजपौ कमावीसदाराकडून ऐवज येणें

——————————————————————रुो

७३७॥- बाकी ता। फाल्गुन अखेर शके १७११

१४०० ई॥ सन इहिदेतिसैन ता। सन सबातिसैन सालें ७, दरसाल रुो २०० प्रो.

२१३७॥-

पौ वसूल——————————————————————रुो.

९७॥- शके १७१४ चैत्र.

२०० शके १७१६ खमस तिसैन बा.

२९७॥-

बाकी येणें——————————————————————रुो.

१८४०

पत्रांक ४५९ श्री. १७१८

याद मसुदा.

१ मल्हारजी कनसे व हनवतराव कनसे, मौजे पिपळवडी, प्रा। पयेठण. तुजकडे बहेरजी ताकपीर याचे स्वाधान. आजवास कारभार समधी जवाहर व कापड दरबाबी फितूर करून घेऊन आलास. ते सरकारी रुजू न करितां, आपले घरीं श्वस्त बसलास. हनान सरकारांतून मसाला रुो १००० हजार काये तुजवळ चीजबस्त असल ती सरकारांत घेऊन येणें.*

पत्रांक ४६० श्री १७१८

यादी कलमें.

१ दौलतीसमंधें हिसेब तीर्थरूप कैलासवासी यांचे वेळेपासून आजपर्यंतचे आहेत, त्याजवर मखलाशा करून घ्याव्या व हिसेबाअन्वयें आमचा ऐवज सरकारांत घेणें निघेल त्याचा फडशा करून द्यावा.

* हे दौलतराव शिंद्यांचे तोडचे शब्द कारकुनानें यथोच्चार लिहून काढले आहेत.

१ नगरचा किल्ला व दौलताबादचा किल्ला, महाल सरंजामी, सुदामत-पासोन आहेत. त्यासुद्धां दोन्ही किल्ले द्यावे.

१ मामले बीड दरोबस्त व प्रो पाथरी व प्रो नेवासें, हे तिन्ही माहाल दरोबस्त लाऊन द्यावे.

१ दौलतीसमधें वगैरे किरकोळ कलमें आहेत तीं उगऊन द्यावीं.

१ हालीच्या बोलण्याबाबत ऐवज येणें आहे तो झाडबाकी फडशा करून द्यावा.

५

येकूण पांचही जाबसाल कलमाप्रमाणें उगऊन द्यावें.

पत्रांक ४६१ श्री १७१८

यादी राजश्री नारायण बाबूराव वैद्य यांस राजश्री सेनासाहेबसुभा यांणीं दरबार खर्च वगैरेचे ऐवजीं कृपा करून दिल्ही. त्याचा ठराव सुा सबा तिसैन मया व अलफ.

१ तूर्त करून देण्याची.

१ प्रांत वराड येथें दोन हजार रुा तनख्याचा गांव वंशपरंपरापुत्रपौत्रादि इनाम करून द्यावयाचा करार ठरला आहे. त्याच्या सनदा करून द्याव्या.

१ चिरंजीव अन्याबा यांस पालखीसुद्धां तीन हजार रुा तैनात करून देण्याचा ठराव जाहला आहे. त्याप्रों सिलेखान्याकडून दरमहाची परवान रुा अडीचशेंची सदर देवावी. कलम.

१ पदरचे कारकून यांस आा तीन, दर दोनशांप्रों, करून देण्याचा ठराव जाहला आहे. त्याची नेमणूक करून देवावी.

३

१ बशर्त मंडल्याचा आमल बसल्यावर खातरजमा पटे ऐसी हुंमीचिठी रुा पन्नास हजारांची सावकारी अनभवावी.

२

पत्रांक ४६२ श्री १७१८

श्री महाराजाधिराज श्री महाराजा श्री राजा मर्दन-सिंघ-देव एतेश्री पंडित मुख्यप्रधान श्री माधवरावजीके आशीर्वाद बंचने. इहाके समाचार भले

है. उहाके समाचार भले चाहिये. अपरंच राजा प्रीथीसिंघजूनें काशी नरसिके तै मौजे वडा यह गांव इनायत दियोहै. सो चलत आयो है. ताको तुमने सालगुदस्तां जपती करी है. जपती उठायके मसारुनिले के बेटांप श्री व्यंकटराव काशीके तरफ गांव चलो आयो है. उत्तम माफक चलाउतो.

॥ श्री ॥

पंतश्री मुख्य प्रधान श्रीराव सवाई माधौराहज.

पत्रांक ४६३ श्री १७१८

यादी पत्रें.

५ राजश्री बाळाजी इंगळे यांस सामील जावें ह्मणोन.

१ भूपाळवाले यांस पत्र.

१ पेंढारी यांस पत्र.

१ बाळाजी इंगळे यांसि पत्र कीं, लिहिल्याप्रमाणें पत्रें पाठविलीं व णव सरंजाम ठेवणें.

१ उज्जनीस तोफखान्यांतून तोफा मोठाल्या दोन द्यावयाची परवानगी चिट्ठी.

१ इमामखान आरोणेस आले आहेत, त्यासमागमें सरंजाम आहे. त्यासहि पत्र.

५

२ राघोगडास गिराशाचा दंगा आहे. त्यास तेथें बंदोबस्तास पत्रें कीं, स्वारशिपाई तेथें पाठवणें.

१ राजे जालमसिंगजी कोटेवाले यांस.

१ राजगडास रावतसिंग व प्रतापसिंगजीस कीं, दोनशें स्वार पाठवावे.

२

१ सरकारचा कारकून पाठविला पाहिजे कीं, फौजेत हिशेब ठेवीत.

पत्रांक ४६४ श्री १७१८

मसोदा

यादी पत्रें सरकारचीं:—

१ किल्ले अकबराबाद राजश्री जगन्नाथराम याचे स्वाधीन केला आहे. त्यांस तुह्मी रुजू होऊन सरकार–चाकरी करीत जावी, म्हणोन.

१ राणोजी कदम किलेदार.

६ पागे तैनातीस आहेत त्यांस
- १ माधव बाबूराव
- १ वेंकोजीराम
- १ रामजी ताकपीर
- १ दारकोजी वाबळे
- १ राजाराम यशवंत
- १ अमरोजी शिंदे

६

७

१ विश्राम अनंत याचें नावें पत्र कीं, किले अकबराबाद सरकारांतून जगन्नाथराम याचे स्वाधीन केला आहे.

पत्रांक ४६५ श्री (मसूदा) १७१९ वैशाख शुद्ध १५

कर्जरोखा शके १७१९ पिंगल नाम संवत्सरे वैशाख शुा १५ ते दिवशीं खत लिखिते धनकोनाम राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांसीं रिणकोनाम रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा, मुा पुणें, आत्मकार्यालागीं पर्वतसंबंधें मुद्दल घेतले रुा ३००००० तीन लक्ष चांदवड छापी सुलाखी. यांस व्याज दरमहा दरशेहे रुा १ एकोत्राप्रमाणें बिनसुट. मार्गशीर्ष वद्य १ या मुदतीस मुद्दल व्याजसुद्धां, ऐवज चांदवड, पुणें याचें मुकामीं देऊं. हा रोखा लिहून दिल्हा. सर्व हस्ताक्षर खुद्द.

साक्ष.

१ नारायणराव वैद्य. १ गोविंदराव पिंगळे.
१ श्रीधर लक्ष्मण. १ कृष्णराव माधव.

पत्रांक ४६६ श्री १७१९ आषाढ शुद्ध ९

नेमणूक. सरकार राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा सुा समान तीसैन मया व अल्लफ, सन १२०७. राजश्री आनंद बाबूराव यांसीं सालीना बमय पालखी, रुपये ३००० तीन हजार याचा दरमाहा रुपये अडीचशेंप्रमाणें छा छ १३ माहे शवाल सन १२०६ पासोन सिलेखान्याकडून पावत जाईल. शिवाय कारकून आा ३ तीन, निा राजश्री नारायण बाबूराव, दर असामीस रुा दोनशेंप्रमाणें सालीना रुा साहाशें खासा स्वारी वऱ्हाडप्रांतीं गेलियावर नेमणूक करून देण्यांत येईल. सदरहू प्रों करार. छ. ७ मोहरम, सन मजकूर.

पत्रांक ४६७ श्री (नकल) १७१९ भाद्रपद शुद्ध २

राजश्री दारकोजी बावळे गोसावी यांसीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री दौलतराव शिंदे रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. पो नेमावर पंचमहालपैकीं काटाफोडा व सत्वास व पाणीबिडवाचे गांव वजा करून पो मार व तो राजोर व तो हरणगांव येथील फडणिशीची आसामी, राजश्री आपाजी मुघाजी कुळकर्णी श्रीगोंदेकर यांचे पुत्र खर्ड्यांचे लढाईंत जखमा लागोन मृत्यु पावले, ऐसें जाणून दरखी असामीची नेमणूक सालीना बारमाही वेतन रुपये ३०० एकूण तीनसें सालमजकुरापासोन देऊन ही सनद तुह्मांस सादर केली असे. तरी मारनिल्हेचे हातें दप्तरचें कामकाज घेत जाऊन सदरहू तीनसें रुपये सालमारापासून सालदरसाल वर्षपरंपरा पाववीत जाणें. पस्त्यापैकीं मजरा पडतील. शिवाय जमीन बिघे सुमारी ६० साठ इनामी व गावगनां भेटी परभारें देवीत जाऊन, फडणिशीचा कानूकायदा चालवीत जाणें. ही सनद मारनिलेस वहिवाटीस द्यावी. रवाना छ १ माहे रोावल सुा समान तिसैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ४६८ श्रीलक्ष्मीकांत. १७१९ भाद्रपद शुद्ध ७

शिक्का.

आज्ञापत्र सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा ताा मोकदम मौजे वांयगांव पाा धुगांव प्रांत वराड. सुा समान तिसैन मया व अल्लफ, सन १२०७ मौजे मजकूर हा गांव सन मजकूरचे अवल सालापासोन सरकार हिस्सा राजश्री नारायण बाबूराव वैद्य यांसीं इनाम दिल्हा असे. तरी मशारनिलेसीं रुजू होऊन सरकारहिस्शाचा अंमल देणें. जाणिजे. छ ६ माहे रोावल मोर्तबसूद. बार.

पत्रांक ४६९ श्री १९१७ भाद्रपद शुद्ध १०

राजश्री सदाशीव भाईजी व बाबाजी आबाजी कामगारी पो आंबड गोसावी यांसः—

स्नो मल्हारराव होळकर दंडवत सुा समान तिसैन मया व अल्लफ. काा व्याहामांडवे व मौजे गोंदी पो मजकूर हे दोन्हीं गांव राजश्री दादाजी गंगाधर यांजकडे आहेत. तेथें तुह्मीं स्वारप्यादे पाठवून, नख्त ऐवज व खर्चवेंच वगैरे मनस्वी पैका घेतला, ह्मणून विदित जाहलें. त्यास, मारनिल्हे सरकार उपयोगी. यांचें अगत्य जाणून, यांजकडील गांवास उपद्रव न व्हावा, येविशीं पेशजीं दोनतीन पत्रें सादर जाले असतां, मागती दंगा करितां हें नीट नाहीं.

त्यास हालीं पत्र पावतांच, याजकडील गांवाकडून नख्त ऐवज व खर्चवेंच घेतला असेल तो दरोबस्त ऐवज माघारी देऊन, पुन्हां उपद्रव न देणें. जाणिजे. छ ८ रोावल. बहुत काय लिहिणें ? मोर्तबसुद.

पत्रांक ४७० श्री १७१९ भाद्रपद वद्य १४

दस्तर सरकार श्री दौलतराव शिंदे ता

श्री.
ज्योतीस्वरुपचरणीं
तत्पर माहादजी सुत
दवलतराव शिंदे
निरंतर.

कादारान व ठाणेदारान व चौकीदारान व रहदारान व बाजेलोकान जकायत महालानिहाय. सुा समान तिसैन मया व अलफ. रा कृष्णराव महिपत साठे यांजकडील जासूद जोड्या दोन पुण्याहून पो देवास येथें जात आहेत. त्यांस मार्गीं जातांना व येतांना मुजाहीम न होतां, नदीनाला व आपलाली हद्द पार करून देणें. जाणिजे. छ २७ सफर. मोर्तबसुद.

पत्रांक ४७१ श्रीह्माळसाकांत. (नकल) १७१९ भाद्रपद वद्य १४

राजश्री महितराव भैराळ कादार प्रांत आंबड यांसीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा काशीराव होळकर. सुा समान तिसैन मया व अल्लफ. मौजे आंतरवाळी सराठी हा गांव राजश्री नागो जिवाजी यांजकडे सरकारांतून आहे. तेथील वस्तभाव घोडीं वगैरे चिरंजीव मल्हारराव होळकर यांजकडील सदाशीव भाईजी यांणीं नेलीं असतील, त्यांची ठिकाणीं लागून यांची यांसीं माघारीं पावलीं पाहिजेत. याजकरितां हें पत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं मारनिलेकडील गांवचीं वस्तभाव घोडीं वगैरे जेथें ठिकाणीं लागेल तेथून आणून यांचीं यांसीं पावतीं करणें. जाणिजे. छ २७ रोावल. बहुत काय लिहिणें मार्तब.

पत्रांक ४७२ श्रीह्माळसाकांत. १७१९ आश्विन शुद्ध ७

राजश्री पागापथके वगैरे सरकारी लोक मुा आंबड गोसावी यांसीं:—

श्रीा काशीराव होळकर रामराम. सुा समान तिसैन मया अल्लफ. राजश्रीं येशवंतराव गंगाधर यांजकडील मौजे व्याह्मा माडवें वेगोंदी परगणें मार येथें

तुह्मांकडून उपद्रव लागतो ह्मणोन हुजुर विदित जालें. त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं मारनिलेकडील गांवास काडीमात्र तोशीस न देणें. बोभाट आलिया ठीक पडणार नाहीं जाणिजे. छ ६ राखर. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक ४७३ श्रीह्माळसाकांत. १७१९ आश्विन शुद्ध ९

कपतान दि॥ मुसावस फिरंगी नि॥ सरकार गोसावी यांसीं:—

अज काशीराव होळकर. सु॥ समान तिसैन मया व अल्लफ. तुमचें हुजर प्रयोजन आहे. याकरितां हें पत्र सादर केलें असे. तरी, तुह्मीं देखत पत्र कूच करून, पलटणसुद्धां हुजूर येणें. जाणिजे. छ ८ रविलाखर. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक ४७४ श्री १७१९ कार्तिक वद्य १०

आज सुभा रा॥ दौलतराव शिंदे ता॥ मोकदमानी कसबे व्याहमांडवें, पा॥ आंबड. सु॥ समान तिसैन मया व अलफ. मल्हारजी लोखंडे हुजरे, नि॥ सरकार, यांजी ह्मैस उमाजी म्हसका खीलारी याजबरोबर, सरकारच्या म्हैसी चारणीस गेल्या त्यांत होती. कसबे मारच्या मुकामीं ती म्हैस थकली. सबब विठूजी पाटील कसबे मजकूर याच्या स्वाधीन करून, पुढें म्हैसी चारणीस घेऊन गेला. ती म्हैस पा॥मार सुदामतपणें देत नाहीं म्हणोन समजलें. त्यावरून ताकीद सादर केली असे. तरी, पा॥मार यासी ताकीद करून म्हैस याची याचे स्वाधीन करून देऊन पावती घेणें. येविषयीं फिरून बोभाट आलिया कार्यास येणार नाहीं. जाणिजे. छ २३ जमादिलावल. मोर्तबसुद.

पत्रांक ४७५ श्री १७१९ माघ वद्य ६

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें. विशेष. तुह्मी सरकारचे लक्षांत पहिल्यापासून वागत आहां. सांप्रतचा प्रसंग अडचणीचा. याजकरितां येथून विनंति होत जाईल ती माहाराजांनीं कृपा करून मान्य करीत असावी, हें करणें तुह्माकडे. येविसी राजश्री सिवराम नारायण सांगतील. रा॥ छ १९ साबान, सु॥ समान तिसैन मया व अलफ. *बहूत काय लिहिणें ? हे विनंति.

पत्रांक ४७६ श्रीह्माळसाकांत १७१९ माघ वद्य ११

राजश्री वामनाजी हरी का॥दार पा॥ आंबड गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री॥ काशीराव होळकर दंडवत. सु॥

---

* येथून हस्ताक्षर सवाई बाजीरावाचें.

समान तिसैन मया व अल्लफ. को व्याहामांडवें व मौजे गोंदी पो मजकूर हे दोन्ही गांव श्रीमंताकडून राजश्री यशवंतराव गंगाधर याजकडे आहेत. तेथें तुह्मी नगरपट्टी बाा तगादा करितां म्हणोन विदित जालें. त्यास, हरदू गांव श्रीमंताकडून मारनिलेकडे दुमाला. तेपक्षीं तेथील नगरपट्टीचा ऐवज मागणें नीट नाहीं. यास्तव, हें पत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं येविषई हरदू गांवांस मुजाहीम न होणें. जाणिजे. छ २४ साबान. बहुत काय लिहिणें ? मोर्तबसुद.

—श्री—
श्री ह्माळसाकांतचरणीं
तत्पर तुकोजीसुत कासी-
राव होळकर.

पत्रांक ४७७ श्री १७१९ फाल्गुन शुद्ध १४

आसिर्वाद उपरी. तुह्मी गेल्यापासून नागपुरास पाऊन तीन पत्रें रा गोविंदराव बापू यांचे कबजांत दोन व उलडोल यांचे गड्यासमागमें एक एकूण तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. इकडील मजकूर तरी बितपशील:—

राजश्री नाना: सिंद्याचे लष्करांत राहिल्यानंतर आह्मांस सरकार वाड्यांत बोलाऊन आणून आजपर्यंत ठेविलें. जेवणाची वगैरे सर्व सोय चांगली. श्रीमंताचा नमस्कार केल्यास होतो. घरीं चौकी बसली होती तेही श्रीमंतांनीं कृपा करून उठविली. आठ दाहा दिवस जाले. आह्मांस सर्वांबरोबर पैका सामर्थ्यापेक्षां अधिक मागतात. सर्वांची वाट पडेल तसी आह्मींहि आपली तोड पाहूं. कदाचित वेगळींवेगळीं बोलणीं ज्यांचीं त्यांनीं केल्यास, आमचेंहि उत्तर जे योजले ते तुह्मांस समजावें. सरकारांतून बाहेर निघाल्यावर तैनातेंत चार ++आहेत तीं घेऊन चाकरी करा, असें सरकारचें ह्मणणें पडल्यास, आमचे मानस सर्वात्मना आहे जे विनंती करावी. कनिष्ट बंधूचे नांवें करार करून द्यावी. ते चाकरी करितील. मीहि जवळच आहें. असें जाहलियास उत्तमच. नाहींतर ईश्वर उपेक्षिणार नाहीं. असा बुद्धीचा पक्केपणें निश्चय करून, ईश्वरावर भाव ठेऊन, स्नानसंध्या करीत सुखरूप राहूं, हाच निश्चय. कलम १

आह्मी स्नान संध्या केली असतां तुमचे नुकसान कसें म्हणाल तर,

म्हणोन लिहितों. कसें म्हणाल तर, आह्मांपाशीं पैका काय म्हणोन घेतां. जर अपराधी आहों तर जें मर्जीस येईल ते पारपत्य करावें. सरकारांत ओढ आहे. तुह्मीं सरकारचे चाकर जें मिळविलें तें द्यावें, असें म्हणूं लागल्यास, शपथपूर्वक आह्मीहि देणार. श्रम मोठाले म्हणून आविकउणें मागूं लागल्यास, आमचे जवळ द्यावयास नाहीं. कोणाचें कर्ज करावयाचें नाहीं, व मिळतही नाहीं. तेव्हां ईश्वरसत्तेनें जें दैवीं असेल तें घडो. आतां सर्वस्वदानांत मातुश्री व तुह्मी बंधू यांचे विभाग आहेत. त्याविषयीं बोलून पाहूं. नाहीं तरी, सर्वांचीहि गती एकानिमित्त अशी होणार असल्यास होऊं. येविषयीं तुमचें आमचें बोलणें जातेसमयीं झालेंच आहे. यांत जसा प्रसंग घडेल, तसें तुह्मांस लिहूं. आह्मीं सरकारवाड्यांत गेल्यावर भोंसल्याकडे येणें जाणें या नानासंबंधी काय कसें म्हणोन ऐकवलें. पुरसीस जाली. जे वास्तवीक येणें जाणें तें आह्मींहि सांगितलें. कलम १

तुमच्या तिकडील मनस्वी बातम्या येतात. तुह्मी तर कांहींच लिहित नाहीं. हें काय ? जे वास्तवीक असेल ते लिहित जावें. लिहिल्यास आंगावर येई असें करूं नये. माहितगारीनें लिहित जाणें. कलम १

तीा मातुश्री आयाबाई व सर्व येथेंच आहेत. आठ पंधरा दिवशीं बाईस रवाना करावी, असा विचार आहे. मग पाहावें. कलम १.

तुह्मीही मोठ्या लोकाचे पदरीं आहां. वडिलांनीं त्यांचा लोभ चांगला संभाळिला आहे व तेही थोर आहेत. उगीच बसलेत तरीं पोटास तुमच्या देतील, अशी आमची खातरजमा आहे. दुसरेही च्यार इष्टमित्र आहेत. समय जाणतील सर्व बरेंच आहे. कलम १.

तुह्मी येथून तेथें गेलां. मार्गानें कसे सुखरुपतेनें गेलां किंवा कसें ? भेटी कधीं कशा जाल्या ? कोणेस्थळीं आहां ? भेटीनंतर बोलणीं कशीं जालीं ? हा तपशील आम्हांस समजला नाहीं. तुम्हीं लिहावा तोही लिहिला नाहीं. आम्हांस तिकडील वर्तमान समजत नाहीं असें म्हटलें असतां, लोकांत कृत्रिम करितात असें येतें. तर जें तेथें आढळेल तें आम्हांस व सरकारांत वरचेवर लिहित जावें. याची मर्यादा येथून कोणी ग्रहस्थ कोणी कामावर जाईल तोंपावेतों कामावर कोणी ग्रहस्थ जाणार, असें आह्मीही ऐकतों. खरें असल्यास मागाहून समजेल. आम्हीं येथें अडचणींत असूं, पत्र पावतें होणार नाहीं, म्हणोन बहुदा लिहिलें नसेल, असें वाटतें. त्यांस चिंता नाहीं. सर्व लिहित जावें. पत्रें पावतील. उत्तरेंहि येत जातील. कलम १.

इकडील वर्तमान तरी बरोबरचे व पुढील चालीचे वगैरे अर्थ तुम्हास स्वारीसुद्धां बातम्यावरून व अकबारावरून समजत असेल. कलम १

आह्मीं सरकारवाड्यांत होतों. तेथें श्रीमंतांस विनंती केली. घरीं

जाण्याची परवानगी जाली आहे. जात येत असावें, चार दिवस जाले. कळावें. कलम १

इत्यादिक गोष्टी इकडील तुह्मांस समजाव्या व तुह्मांकडील आह्मांस पुढें समजत जाव्या. नाहीं तरीं, कोण करितात, हें न समजतां अनेक अंदेशे मनांत येतात. ह्मणोन तपशीलवार लिहिलें आहे. श्रीमंत पुण्यवान दयाळू आहेत. जो जशी निष्ठा ठेवील त्यास तसें फळ येईल, हें मनांत आणून जें करणें तें करीत जावें. याउपर पत्रें वरचेवर पाठवीत जावीं. रवाना छ १२ माहे रमजान. फाल्गुन शुद्ध १४ बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

शेवेसीं विसाजी बल्लाळ सां नमस्कार विनंति विशेष. लिखितार्थ परिसोन पत्राचीं उत्तरें समर्पक यावीं. कोणे गोष्टीविषयीं चिंता न करावी. श्रीरामचंद्राच्या इच्छेकरून सर्व पार पडतील. सर्वांचा सांभाळ करणार श्रीहरी आहे. विस्तार काय लिहूं ? हे विनंती.

पत्रांक ४७८ श्री १७१९

याद मसुदा.

१ मौजे खेडें, परगणे आवड, तुकोजी पाा वगैरेमुळें तुजकडे करज भवानदास मारवाडी मौजे ताडेकर याचे असतांना मागनीस येतो. त्यास तूं दंडेलीच्चा गोष्टी सांगतोस आनि पिटून लावितोस, म्हणोन मारवाडी यानें विदित केलें कीं, मजवर जबरदस्ती पाटील करितो आणि माझा फडशा सुदामत करीत नाहीं. त्याजवरून तुजला हें पत्र सादर केलें असे. तर, त्यास मशाला रुा १०० सेभर देणें. हें खतपत्र मारवाडियाचा खडशा रोखाचा बरहुकूम व्याजसुधा करून देणें. येविसचिा फुरुन बोभाट आल्यास कारयास येनार नाहीं. म्हणोन *पत्र.

पत्रांक ४७९ श्रीलक्ष्मीकांत. १८१९

राजश्री नारायणराव वैद्य गोसावी यांसीं:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो रघोजी भोंसले सेनासाहेबसुमा दंडवत उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. तेथील लिहिला मजकूर कळला. त्यास, तुह्मीं तेथील प्रसंगास आहां. तेव्हां याचप्रमाणें वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहीत जावें. वरकड येथून नवल विशेष ल्याहावें, ऐसें नाहीं. यापूर्वीं तुह्मांकडेस

---

* हें सर्व पत्र दौलतराव शिंद्याच्या हातचें आहे. भाषा शाहूमहाराजाच्या भाषेसारखी आहे.

पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचे उत्तराची मार्गप्रतीक्षा करोन असों. सांप्रतहि जो मजकूर लिहिणें, तो राजश्री सदाशिव बापूजी यांसीं लिहिला आहे. तुह्मांसी बोलतील, त्यावरून*

पत्रांक ४८० श्री १७१९

यादी भोंसले याजकडील कारभारी यांस सालमजकुरापासून गांव द्यावयाचा करार. सुा समान तिसैन मया व अलफ. रुा ३५००० यांस नांवनिशी

१४००० श्रीधर लक्षुमण मुनसी रुा १४००० यांसी गांव.

७८०६।। मौजे मुडगांव प्रांत वराड रुा

७०९६।। ऐन.

३५४८। इनाम निमे.

३५४८। सरंजाम निमे.

७०९६।।

७०९।।। सरदेशमुखी

६००० कसबे सानोल, प्रा वराड, अंमल दरोबस्त कमाल, खेरीज तनख्याप्रों सरदेशमुखीसुद्धां रुा १२००० निमे मानिल्हेस सरंजाम.

१९३।। मौजे हिंगणगांव पौ सरदेशमुखी रुा २६८। पौ.

१४०००

१४००० कृष्णराव माधव यास रुा १४००० ता। गांव कितागांव रुा

६५०० मौजे आसलगांव कमालपूर रुा

१०४६।। मौजे टाकली माहुली तनखा देखील सरदेशमुखी रुा

५४५।। मौजे पळसी वैद्य.

८०९७।।

पौ वजा मोकासी रुा १२५९

बाकी रुा ६८३२।।।-

अंतस्त वगैरे १६७।

७०००

---

* पुढील बंद गहाळ.

यासी बयान.
३५०० इनाम निमे.
३५०० सरंजाम निमे.

७०००
६००० कसबे सोनाळें निमे सरंजामास.
१००० मौजे टाकळी खार्ती २२७५॥= पौ वजा जातां मोकाशी रुा ३७४ बाकी रुा १९०१॥= पौ निमे सरंजामास रुा ९५०॥।- अंतस्त वगैरे ४९८≡

१४००० १०००
७००० रामचंद्र दादो यास ७००० रुा यासीं गांव
२३७५।= मौजे मालेगांव तनखा रुपये ३४१२।≡॥ पौ वजा मोकाशी रुा ५७० बाकी रुा
२८४२।≡॥ मौजे मालेगांव तनखा रुपये ३४१२।≡॥ वजा मोकाशी रुा ५७० बाकी रुा
२३८४। मौजे सांवरगांव तनखा रुा २८४८। पौ वजा मोकाशी रुा ४६४ बाकी रुा
१७४८ मौजे हिंगणें तनखा रुा २४१४ पौ वजा रुा
३९७॥ मोकासा.
२६८। सरदेशमुखी.

६६६
बाकी रुा
१२५।०॥ जाजती अंतस्थ वगैरे

७०००
यासी बयान.
१७५० इनाम चौथाई.
५२५० सरंजामास तीन हिसे.

७०००

३५०००

पत्रांक ४८१ श्री म्हाळसाकांत. १७२० ज्येष्ठ शुद्ध ३

(शिक्का असे.)

दस्तक सरकार राजश्री कासीराव होळकर ता। कमावीसदारान व ठाणेदारान व जमीनदारान व जकातिवाजेलोकान मो। हाय. सुा। समान तिसैन मया. राजश्री येशवंतराव गंगाधर यांजकडील कारकून लष्करांतून शिरोंजेस जात आहे. बराबर घोडीं व माणसें व उंट वगैरे आटाला. त्यांस मार्गी कोणेविशीं मुजाहीम न होतां मुा। राहतील. तेथें चौकी पाहारा देऊन, आपलाली हद्दपार करून देणें. जाणिजे. छ १ जिल्हेज मोर्तबसुद.

पत्रांक ४८२ श्रीलक्ष्मीकांत. १७२० आश्विन वद्य १

पुा। रावजी अमृतरावजी गोसावी यांस:—

दंडवत विनंती उपरी. आपणाकरितां विजयादशमीचे पोशाख पाठविले आहेत. बितपशील.

१ तिवट पैठणी लाल.
१ शेला पैठणी लाल.
१ किनखाफ छेडीदार.
१ जामेवार मलमल बंगाली.

४

राजश्री विनायकराव.

१ तिवट पैठणी आबाशी.
१ दुपट्टा पैठणी आबाशी आस्वली कांठी.
१ किनखाफ अहमदाबादी.
१ जामेवार बऱ्हाणपुरी फर्द दोन.

४

सदरहूप्रमाणें पोहचतील. रुा। छ १५ माहे जमादिलावल. हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ४८३ श्रीम्हाळसाकांत. १७२० आश्विन वद्य ११

राजश्री बाळोजी इंगळे कमाविसदार पो। सिरोंज गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री काशीराव होळकर रामराम विनंती उपरी. पो। म्हार येथील दरखदारांचे हातें दरखार्चे काम घेत नाहींत,

ह्मणोन सरकारांत विदित जालें. त्यावरून हें पत्र तुह्मांस लिा असे. तरी दरखदाराची वहिवाट व कानूकायदे पेशजीपासोन चालत आले आहेत, त्याप्रमाणें ज्याचें काम त्याचे हातें घेऊन वेतनाचा वगैरे ऐवज निर्वेध पावता करीत जाणें. येविषईंचा पुन्हां बोभाट येऊं न देणें. रा छ २५ जावल, सुा तिसा तिसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तब असे. शिक्का असे.

पत्रांक ४८४ श्री. १७२० पौष शुद्ध १२

श्रीमंत मातुश्री गंगाज्यान्हवी बयाबाई व ताई वडिलाचे सेवेसीः—

आज्ञांकित यशवंतराव धोंडदेव कोल्हटकर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता पौष शुद्ध १२ पावेतों आपले आशीर्वादें घरीं सर्व सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. फार दिवस वर्तमान तिकडचें कांहीं नाहीं, ह्मणोन काळजी वाटते. अकस्मात रा पांडोबा तात्यांनीं शहराहून पौष शुद्ध २ स सविस्तर लिहून पत्र पाठविलें. त्याजवरून आद्यंत मजकूर कळों आला. येथून दोन च्यार पत्रें श्रीमंत राजश्री आपाचे नांवें लिहून सविस्तर लिहिलें होतें, त्याजवरून सेवेसीं मजकूर अवगत जालाच असेल. तूर्त या प्रांतीं उणा आहे. परंतु बाहेरचीं वर्तमानें ऐकोन चित्तास काळजी वाटते. कोणते वेळेस काय घडेल समजत नाहीं. होळकर यांची फौज उजेनप्रांतीं दाहापांच हजार आली होती. तेथें लढाई होऊन बरोबरी जाली, ह्मणोन वर्तमान आहे. शिंदे यांचें लष्कर पूर्वस्थळावरच स्वस्थ आहे. या वेगळें इकडे नवल विशेष नाहीं. आमचेकडील कुशल व राजश्री तात्याकडे माणूस गेलाच असेल. त्याजकडचें वृत्त सविस्तर लिहून पाठवावें. सार्वकाळ पत्रोंतरीं सांभाळित असावें. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ४८५ श्री. १७२१ आषाढ शुद्ध १

राजश्री रंगराव महादेव गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा दवलतराव सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री आपाजी मुधाजी यांजपासून तुह्मीं रसदेचा ऐवज घेऊन, पो धर्मपुरा हा माहाल सांगितला. त्यास, अलिकडे राजश्री आनंदराव पवार यांचें तुमचें चित्त शुद्ध नाहीं. सा पवार यांणीं आपाजी मुधाजीकडून माहाल काढिला आणि रसदेचा ऐवज त्यांजपासून घेतला. त्याचा फडशा तुमचे विद्यमानें जाहला नाहीं, ह्मणोन विदित जाहलें. त्यावरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. तरी माहाल मारनिलेकडे कायम ठेऊन वहिवाट घ्यावी. हें न जाल्यास रसदेचा ऐवजाचा...

व्याजसुद्धां तुह्मी आपलेतर्फे फडशा ...लाऊन ऐवज ...... फडशा करावा. रा छ १७ सफर, सुा मयातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तबसुद.

श्री
ज्योतिस्वरूपचरणीं
तत्पर माहादजीसुत
दौलतराव शिंदे
निरंतर.

पत्रांक ४८६ श्री. १७२१ भाद्रपद शुद्ध ३

श्री
राजा शाहूनरपति हर्ष-
निधान बाजीराव रघु-
नाथ मुख्य प्रधान.

मा अनाम देशमुख व देशपांडे, पो आकोट, प्रांत वराड, यांस बाजीराव रघुनाथ प्रधान. सुा मया तेन व अलफ. मौजे खुडगांव, पो मजकूर येथील निमे अमल रामचंद्र दादो, दीा राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब, यांजकडे सरंजामास चालत होता. त्यास, ते मृत्यु पावले. सबब सदरहू अंमल सरकारांत जप्त करून, जप्तीची कमावीस राजश्री त्रिंबकराव अमृतेश्वर यांजकडे सांगितली आहे. ते दूर करून सालमजकुरापासून राजश्री नारायण बाबूराव मौजे मजकूरचा निमे अंमल जातीचे तैनातेंत बदल मुशाहिरा करार करून दिल्हा असे. तरी तुह्मीं मशारनिल्हेसी रुजू होऊन, अंमल सुरळीत देवणें. जाणिजे. छ १ रबिलाखर. आज्ञाप्रमाण.

लेखन
सीमा

पत्रांक ४८७ श्री १७२१ आश्विन शुद्ध ७

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हांकरितां विजयादशमीचा पोशाख.

सनगें सुमार.

३॥. तुम्हास

१ तिवट पैठणी.

१ जाफरखानी.

१ महमुदी.

·॥· किमखाप.

३॥.

३॥. यज्ञेश्वर दीक्षित यांस.

१ तिवट पैठणी.

१ जाफरखानी.

१ महमुदी.

·॥. किमखाप.

३॥·

७

येकूण सात सनगें पाठविलीं आहेत. घेऊन पावालियाचें उत्तर पाठवणें. जाणिजे. छ ५ जमादिलावल, सुा मयातैनवअलफ. बहुत काय लिहिणें ! हे विनंति.

पत्रांक ४८८ श्री. १७२१ माघ शुद्ध ५

श्री
जोतीस्वरूपचरणीं
तत्पर महादजीसुत
दवलतराव शिंदे
निरंतर.

राजश्री विश्वासराव नारायण गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे विनंति उ·

परी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें. विशेष राजश्री आपाजी रामचंद्र मालगांवकर यांचा व जोती मोरेश्वर यांचा देण्याघेण्याचा लढा आहे. त्यांस उभयतांचीं बोलणीं तुमचे विद्यमानें जालीं असतां, हाली जोती मोरेश्वर आपाजी रामचंद्र यांचे घरीं उपद्रव करीत आहे, म्हणोन विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे. तरी तुमचे विद्यमानें बोलणीं जालीं असतां, घरीं जाऊन उपद्रव करावयाचें प्रयोजन काय ? तरी त्याचीं माणसें यांचे घरीं बसलीं असल्यास, बेमुरवत उठऊन देणें आणि पुन्हां याचे घरीं उपसर्ग होऊं न देणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. रा छ ४ रमजान, सुा मयातैन व आलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

मोर्तब
सुद.

पत्रांक ४८९ श्रीगणेशायनमः १७२१ फाल्गुन शुद्ध १३

श्रीकुलदेवतायैनमः श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वत्यैनमः श्री जुगादेत्यैनमः श्रीसिद्धेश्वर व श्री विपलेश्वर व श्रीधूतपापेश्वर स्वामीचे सेवेशी:—

चरणरज सिद्धेश्वर महिपतराव चींचलकर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना तागाईत माघ बहुल सप्तमीपर्यंत स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असों. विशेष. विनंति ऐसिजे:—खासगत लग्नाचा निश्चय फाल्गुन शुद्ध त्रयोदशी सोमवारीं करून शरीरसंमंध वेदशास्त्रसंपन्न राजश्री सिद्धेश्वर दीक्षित ठकार यांसी केला आहे. ऐशास, आपण सर्व कुलस्वामी व अध्ययांनीं येऊन न्यून असेल तें पूर्ण करून कार्यसिद्धी केली पाहिजे. सर्व अभिमान आमच्या स्वामीस आहे. कळावें बहुत काय लिहावें ? सेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ४९० श्री. १७२१

यादी: शेषाद्री सिंहराज याजकडे नबाब निजाम अलीखान बाहादूर यांचे सरकारांतून इनामी गांव वंशपरंपरेनें अनुभव करावा म्हणोन सनद जाली आहे व जातीस जागीर आहे. त्यांस घांसदाणा श्रीमंत राजश्री सेनासाहेबसुभा त्यांजकडील आहे. तो सेनासाहेबसुभा यांणीं माफ करून, इनामी गांवचा इनाम वंशपरंपरेनें करून देविला पाहिजे व जातीस जागीर आहे तेथील मारनिलेचे जातीचे इनामी सनदा व जातीचे जागीरीच्या अलाहिदा सनदा द्याव्या. सुा मयातैन व अलफ. गांव तपशील:—

२ इनामी गांव पो पालीक उर्फ बेरनवट सरकार नांदेडपैकीं
　　　　１ मौजे फरकंडे
　　　　१ मौजे निंबेवाडी

　　　　———

　　　　२

५ जातीस जागीर देहेसुमार
　　४ पो च्यार ठाणे सरकारपैकीं.
　　　　१ मौजे देगांव.
　　　　१ मौजे बेरुळें.
　　　　१ मौजे सोनवटी.
　　　　१ मौजे पांढरगळें.

　　　　———

　　　　४

　　१ मौजे नांदेडखोड, पो लोहगांव, सरकार पाथरी.

——— ———

७　५

याचा तनखा रुा

२०२५ इनामी गांव दोन.
　　　　१४५० मौजे फरकंडे.
　　　　५७५ मौजे निंबेवाडी.

　　　　———

　　　　२०२५

४४०० खासगत जागीर.
　　　　३००० पो चार ठाणें पौ देहे चार याचा तनखा एकंदर
　　　　१४०० मौजे नांदखोड पो लोहगांव सरकार पाथरी देहे १

——— ———

६४२५　४४००

याजविषयीं सनदा व पत्रें सुमार.

　　५ इनामी गांवच्या इनाम वंशपरंपरेनें म्हणोन.
　　　　१ शेषाद्री सिंहराज याचे नांवें.
　　　　१ जमीदाराचे नांवें.
　　　　१ कमावीसदार घांसदाणीयांचे नांवें वर्तमान भावी पत्र द्यावें जे, पा पालीम व लोहगांव येथील घांस-

दाणीयाचा आद आहे त्या पो दोन गांवचा घांस-
दाणीयाचा ऐवज सरकारांतून मारनिलेस इनाम
करून दिल्हा आहे. त्यास, पा मारचे चुकोती-
पैकीं मजरा देऊन, बाकी ऐवज घ्यावा.

२ मुकदमाचे नांवें.

५

२ जागीरीचे गांवाविषयीं मारनिल्हेचे जातीस सरकारचा घां-
सदाणा माफ केला असे, म्हणून सदरहू अन्वयें पत्रः

७

१ शेषाद्री सिंहराज याचें नावें.

१ वर्तमान भावी कमावीसदार यांचे नांवें.

२

एकूण सात पत्रें श्रीमंतास विनंती करोन सालमजकुरीं उपद्रव व ऐवज न देणें पडे, ऐसें व्हावें.

पत्रांक ४९१ श्री. १७२१

सेवेसी सां नमस्कार विज्ञापना ता मंदवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल निरोप घेऊन आलों ते अस्तमानी पोंहोंचलों. चिरंजीव रा. नरहर बापू शहरांत भेटले. त्यांणीं सांगितलें कीं, मी कामगिरीस जातों. तेथून आल्यावर पत्र देईन. ते लष्करांतून चंद्रोदयीं निघोन नगरास गेले. फडणीस तेथें होते त्यास नेलें. बरोबर फौज आहे. हें वर्तमान श्रीमंतास आज कळलें. त्याजवरून मर्जी दिक्क आहे. रा. बाळोजीबाबा सकाळीं वाड्यांत जाऊन लष्करांत गेले आहेत. नगराहून बक्षी व बाळोबातात्यास आणावयास सांगितलें आहे. आज गोविंदराव बापू यांचे घरीं हुजरातचे लोक बसले आहेत. दोन आठवडे व येक दुमाही देतों, ऐसा करार परवां करून वाड्यांतून लोक त्यांणीं उठऊन आणिले. त्यास आठ दिवस जाहले. ऐवजाचा फडशा करून द्यावा ह्मणोन बसले आहेत. आबा शेळूकर यांस सुभ्याचीं वस्त्रें परवांचे दिवसीं जाहलीं. सातेऱ्यास कारभारास तात्या जोशी पो होते. येथें आणविले आहेत. रावसाहेब यांचा अद्याप मुक्काम आहे. कुच्य जाहालें नाहीं. बाजीपंत आणाचे लेक तात्या पळोन गेले. बाळोजीबावांनीं च्यंदनचा किल्ला महिपतराव मामास सांगितला. काल वस्त्रें दिल्हीं. यांची प्रकृति बरी आहे,

कंपूचें कुच्य होऊन हडपसरावर गेला आहे. करवीराकडे त्यास मोहीम सांगितली. याप्रों वर्तमान आहे. पिकलीं पानें पांचशें पा आहेत. केशर मागाहून घेऊन पाठवितों. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ४९२ श्री. १७२१

पुा विनंती उपरी.

करवीरचा मजकूर तरी: येथें श्रीमंत राजश्री सिंदे याजकडे तिकडील बोलणाराचें बोलणें रा सर्जेराव घाटगे वगैरे यांचे विद्यमानें पडोन राा विस्वासराव घाटगे सर्जेराव यांणीं व राजश्री जोसीराव यांणीं येथें जलदीनें यावें आणि तहाचें बोलणें बोलावें. तोंवर पंधरा रोज गोळागोळी होऊं नये. ऐसीं पत्रें सिंदे यांजकडील तेथें गेलीं आहेत ह्मणोन आइकण्यांत आहेत. शिवाय बाजारांत बोलणीं आवाया बोलतात कीं, वीस लाख रुपये करार करावे. पो तूर्त निमे दाहा द्यावे. यांत निमे सरकार व निमे सिंदे. या खेरीज कलमें काय असतलि ते असोत. परंतु चिकोडीमनोली तालुके राजमंडलाकडे राखावे, अशीं बोलणीं या आवाईत आहेत. याकरितां तुह्मांस फार कळावें, ह्मणून सूचनार्थ लिहिणें आहे. पायाशुद्ध तह जाहालियास, सर्व यथास्थित आहे. परंतु कैसें घडेल, तें पाहावें.

पत्रांक ४९३ श्री. १७२२ चैत्र शुद्ध १२

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक आपाजी पायगुडे दंडवत विज्ञापना. तागायत छ ११ जिलकाद पावेतों मुक्काम नजिक किल्ले कावनई साहेबांचे कृपाकटाक्षें पागापथकाचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष .... डोंगर कावनई ....जमा जाहलें होते यास्तव आस्वलीचे मुकामींहून कुच्य करून किल्यानजीक आलों. फौजेचे दहशतीनें कोळी डोंगर सोडून पश्याकडे गेला. छ. ७ जिलकादीं कोळी यांनीं किल्लेपश्यास येलगार केला. किल्लेकरी सावध होते. व राजश्री बापूजीपंत गार्दीसुद्धां येऊन पोंहचले. कोळीयांचे पारिपत्य थोडेंबहुत जाहलें. आम्हांस कोळ्याची बातमी लागतांच, छ मजकुरीं स्वार होऊन गेलों. मौजे खेडानजीक दक्षणेस डोंगरालगती गांठी पडली. आम्हांकडील निकड पाहून, दहशतीनें कोळी पळून पहाडांत गेले. गोळागोळी बरीच जाहली. त्याजकडील तट्टें, पथकांतील लोकांनीं दहापंधरा पाडाव करून आणिलीं. तें समयीं पाईचे बरकंदाज असते तरी कोळ्यांचें पारिपत्य जाहलें असतें. स्वारांचा इलाज अवघड डोंगरावर कळतच आहे! याप्रांतीं कामगिरी नेमल्यासारिखें सरकारकामाचा बंदोबस्त होय तें जाहलें पाहिजे.

तालुकदार यांजकडील पाईचे लोक व लढवई सामान........एक जागा जाहालों, ह्मणजे कोळी मैदानांत येत नाहीं. मागाहून सविस्तर लेहून कळऊं. रोजमरियांविशीं लिहिलें, त्याचे उत्तराची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ४९४ श्री. १७२२ चैत्र.

पौ मिती वैशाख वद्य १२ शके १७२२

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री लक्ष्मीनारायण दीक्षित स्वामींचे सेवेसीं:—

विद्यार्थी येशवंतराव महादेव सां नमस्कार. *विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. वेदशास्त्रसंपन्न राजश्री मोरेश्वर दीक्षित यांस औषधा करितां मंडूर दोन तोळे पाठवावा, म्हणोन लिहिलें. त्याजवरून दोन तोळे मंडूर माणसाबराबर पाठविला आहे. पावेल. आपल्यास औषध पाठवावयाचें तें, आठाचौं दिवशीं राजुरास जाणार आहे, तेथें गेल्यावर पाठवीन. औषध राजुरास राहिलें आहे. येथें नाहीं. वरकड राजकीय नवल विशेष लिहिणेसारिखें नाहीं. राजश्री सिद्धेश्वर महिपत म्हणोन कारकून सरकारचे हे फौज जमा करून गावड्यावर जाणार, म्हणोन म्हणतात. आणि खंडण्या घेतात. त्यासह त्याप्रांतीं येणार आहेत. बहुत प्रळय या प्रांतीं केला आहे ! तो लिहितां पुरवत नाहीं ! आपण सावध असावें. यास विचार काडीमात्र नाहीं. याजकरितां लिहिणें आहे. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ४९५ श्री. १७२३ वैशाख वद्य ९

शेवेसी विनंति सेवक कचो जनार्दन, निसबत केशो भिकाजी, कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता छ २२ माहे जिल्हेज मुा लष्कर नजीक बर्डावदा येथें शेवकांचे वर्तमान यथास्थित असो. विशेष इकडील वर्तमान छ १७ मीनहूस विनंतिपत्र लिहून मुकाम पंचगवा येथून सेवेसीं रवाना केलें आहे. त्यानंतर येणेंप्रमाणें:—

१ छ १८ मीनहूस तेथून कूच होऊन मौजे नामलीपचोर, परगणें रतलाम, येथें मुा केला. चिमाजी बुळे याचे कनिष्ट चिरंजीव गोविंदराव बुळे पाऊणसें स्वारांनिशीं येऊन भेटले. राजश्री यशवंतराव होळकर सामोरे गेले होते. समागमें डेऱ्यास घेऊन आल्यावर, ते आपले मिसलीवर गेल्यावर त्यांचे येथें सरदार गेले. त्यांणीं वस्त्रें तिवट शेला दिल्हा. कलम

---

* संक्षेपार्थ मामुली शब्द आह्मीं सोडले आहेत.

१ उज्यनींत मीरखापठाण व दुदरनेक फिरंगी, चिमाजी कृष्ण ऐसे फौजेसुद्धां गेले होते. ते, बाळोजी इंगळे व लक्ष्मण अनंत यांचा सलुख, बाळाजी अनंत पागनीस यांचीं पत्रें आल्यावर, होऊन भेटी जाल्यामुळें, ठाणें बसवायाची मसलत राहून, येथून सरदारांनीं पत्रें त्रिवर्गास पाठविलीं कीं, तुह्मीं फौजेसुद्धां महत्पुरास जावें. त्याजवरून ते महत्पुरास गेले. तेथून तुळसाजी वाघ याजवळून येवज घेऊन, सरंजाम जप्त करावा या बेतावर गेले. कलम.

१ इंगळे व लखबा एकत्र जाहाले. उखबा उदेपुराकडे गेले. इंगळे मल्हारगडाकडे आले. सरदारांस लखबाकडे न्यावें, सबब लक्ष्मण रघुनाथ फौजेसमागमें आहेत. सलूख उभयतांचा जाला नवता, तोंपरियंत यांची कूच जल्दी करून सरदारास न्यावें हे जरूर होती. आतां मतलब जाल्यामुळें जरूर नाहीं. लखबा चितोडाहून उदेपुराकडे गेले. कलम.

१ सरदार यांणीं रतलामची खंडणी चाळीस हजार रुपये घेतले. पुढें देवळेप्रतापगडास जाणार तों तेथील वकील रुजू होऊन भेटले. जाबसाल होत आहे, तों इंगळे यांणीं फौजेसुद्धां देवळेप्रतापगडावर शह दिल्हा. घांसदाणा मागतात. त्याजवरून सरदारांची मर्जी क्रूर जाली. इंगळे यांणीं होळकर यांचे गांवास उपद्रव दिल्हा, याजकरितां लढाई घ्यावी हा विचार आहे. फिरंगीमीरखा याजलाही पत्रें जलद यावयाविशीं गेलीं आहेत. सांप्रत, देवळे प्रतापगडाचा शह सरदारांनीं सोडून, छ मजकुरीं येथें मुक्काम केला. आबाजी लक्ष्मण शंभर स्वारानिशीं सरदारास मुा मजकुरीं येऊन भेटले. येतेसमई महेश्वरावरून आले. पंत मशारनिले आले आहेत. यावर काय घडेल तें पाहावें. गोवर्धन (भील ?) समागमें आहे. कलम.

१ मीरवजीर हुसेन दोनशें स्वार व पायदळ पांचशें ऐसे आपले सरंजामानसी. त्याजला महत्पुरास मागील मुक्कामाहून रवाना केलें आणि वराता महत्पुरावर लाख रुपयांच्या केल्या. ऐवज वाघाकडून घेऊन, वरातदारास देऊन, त्याजला येथें घेऊन यावें, या बेताबर रवाना केला. कलम.

१ चिमाजी बुळे यांचे चिरंजीव विठुजी याचे चिखलदे वगैरे महालच्या जप्ती राजश्री आनंदराव पवार यांजकडे सांगून, सनदा करून दिल्ह्यासिवाय पवार मजकूर याजला चाळीस हजार नक्त दिले. त्यांणीं थोरलें काम नागोपंताचें करून दिल्हें, म्हणोन बक्षीसी दिली. बुळेमजकूर कनिष्ठ येथें आले. त्यांणीं जाबसाल लावला. लाख रुपये घेऊन, महालाची सोडचिठी देऊन, मुक्त करावें, शंभर स्वारानसी चाकरी करूं, याप्रमाणें बोलणें संताजी लांबहातेचे विद्यमानें लागलें. हाली बुळ्यावर वराता करून दिल्ह्या, हशमी शिलेदाराच्या. कलम.

येणेंप्रमाणें ध्यानास येईल. उत्तराची आज्ञा होऊन खर्चाचा बंदोबस्त जाला पो. हे विज्ञापना.

पत्रांक ४९६ श्री. १७२२ वैशाख.

श्रीमंत राजश्री नानाजीसाहेब साहेबांचे सेवेसी:—

आज्ञाधारक राणूजी...पाटील व भिकाराऊत...वगैरे समस्त लहान थोर मौजे काठीपिंपळगांव अर्ज रामराम बिज्ञापना. काल लष्कराचा मार कालचें पत्रावरून कळला. व आज कही आली. आपले शिवेवरून फिरली. आपले गांवाजवळ श्रीमंताच्या पागा दाहा आहेत. गावड्यानें तमाम चिठ्या (करून) लोक जागांजागां धरून नेले. आपले गांव पागामुळें जगले. त्यास, कहीचा दंगा ह्मणोन, बायांचे खासगतहुजूरच्या बल्लम व बाणदार ऐसें रविवारीं दों प्रहरां आणले. दररोज रुो ३ शिवाय खुराक, याप्रमाणें आहे. त्यांस, याप्रमाणें आवस्ता आहे. नरसिंगचा राघोडा जाला. रुपाया दंग्यांत उठला. त्याचा तगादा. रा बळवंतराव भाऊचा स्वार आला होता. +++ हे विज्ञापना.

पत्रांक ४९७

पैा ज्येष्ठ कृष्ण २ शके १७२२. श्रीसांब. १७२२ ज्येष्ठ शुद्ध १५

श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री दीक्षित स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी बापू गोखले याचे अनेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे: आपली आज्ञा घेऊन निघालों तों गुरुवारीं पष्ठीस कान्हेरास पोहोंचलों. यानंतर राजश्री येशवंतरावजी याजबरोबर जुन्नरास आलों. ते जेष्ठ शुद्ध पौर्णिमा पावेतों आपले कृपावलोकनेंकरून आनंदायमान सुखरूप आहें. विशेष. श्रीमंत अमृतराव, बाळोबातात्या, आबा चिटणीस आणखी चक्रदेवप्रभृति *नकारमंडल सर्व एकत्र होऊन, नकारास दत्तक द्यावा, असा ठराव जाला. तो श्रीमंत बाजीरायास कळला. त्यांनीं दवलतरावास सांगून बाळोबास कैद करविला. त्यामुळें अलिकडेस उभयतां श्रीमंतांचीं चित्तें शुद्ध नाहींत. शिंदे यांचा विचार तर लखबा व अलीबहादूर, येशवंतराव होळकर, बाया सर्व एक विचारें होऊन, हिंदुस्तानांत दवलतराव यांस ठिकाण ठेविलें नाहीं. इकडेस अमृतराव व दवलतराव यांशीं चुरुस लाऊन दिल्ही आहे. कोणीही हलका झ त्यास बरेंच आहे. श्रीमंत दादाविषई आपाजीपंत यांणीं दवलतराव यांसी बोलणें करून, पंनास लक्ष रुपये द्यावे. त्यापैकीं निमे सरकार व निमे तुह्मी, असे घेऊन हिंदुस्तानांत तुह्मीं जावें. त्यानें कबूल केलें. त्यावरून मशारनिल्हे यांनीं कारकून पाठविला. जुन्नराचें प्रत्युत्तर, आमचा अदृष्टियोग असल्यास सर्व घडेल,

---

*नाना फडणीस.

आह्मांस कपर्दिक द्यावयास मिळत नाहीं. तेव्हां तो विचार राहिला. बाजीराव यांचे चित्तांतून यांस द्रव्य न पडतां घेऊन जावें. परंतु अमृतराव यांचें भाषण विचार पाहातां, तूर्त न आणावें. यामुळें सांप्रत राहिलें. यांस चांचवड किल्ला जुन्नरापासून पांचा कोसांवर दिल्हा. ३० सहस्र रुपये दिल्हे. आमचे यजमान तर बंधूचा विभाग करावा ह्मणोन येथें आले. येऊन त्यांनीं यांणीं उभयतां दादाचे पायावर हात ठेविले. आपण जसा विभाग कर्तील त्यांस आह्मीं राजी. यानंतर विभाग होतील, त्या अन्वयें सेवेसीं लिहून पाठवीन. येथील आमचा विचार तर कोण्या रीतीचा आहे तो तीर्थस्वरूप आपा आठापंधरा दिवसां घरीं आल्यावर कळेल. हें पत्र ब्रह्मभटजी जवळ देऊन वडिलांस दाखवावें. आपला पुण्यास जावयाचा बेत कसा झाला, हें लिहावयाविषयीं आज्ञा जाली पाहिजे. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

हेच पत्रीं वेदमूर्ती ब्रह्मभट व बाळकृष्णभट यांस सां नमस्कार. कृपावृद्धी लोभाची करीत जावी. हे विनंती.

पत्रांक ४९८ श्रीशंकर. १७२२ आषाढ शुद्ध ११

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी विश्वनाथ महादेव थथे सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता आषाढ शुा ११ गुरुवार पो स्वामींचे आसिर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें. तें पाहून बहुत समाधान जालें. इकडील वर्तमान तरः श्रीमंत राजश्री दादा जुनराहून निघून वद्य ३० रविवारीं राजश्री बळवंतराव वाकडे यांचे बागांत संध्याकाळीं आले. शुा १ सोमवारीं तेथून निघून गारपिरावर आले. मी भोजन करून गेलों होतों. श्रीमंत चौधे व सिंदे आले होते. भेटी मोठ्या समारंभेंकरून जाल्यानंतर, सिंदे लष्करांत गेले. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांचे खवासखान्यांत राजश्री दादा बसले होते. त्यांच्या मागें राजश्री रामरावनाना बसले. समारंभेंकरून वाड्यांत गेले. चार घटका श्रीमंतांसीं एकांत होऊन, नंतर मुरलीमनोहराचे वाड्यांत राहिले. आठ दिवस मुहूर्त वाड्यांत यावयास नवता. याजकरितां आले नाहींत. सर्व मानकरी व ग्रहस्थ मंडळीच्या भेटी, आज अका दिवस जाले, होतात. याजमुळें घटकाभर फावत नाहीं. शुा १० मंगळवारीं राजश्री सिंदे यांच्या येथें मेजवानी श्रीमंतांस जाली. अमृतराव गेले नाहींत. उभयतां व राजश्री दादा गेले होते. जवाहीर त्रिवर्गास दिल्हें. वरकड मानकऱ्यांस वस्त्रें दिल्हीं. श्रीमंतांनीं दादास आजपो सा पोषाक दिल्हे. कंठी मोत्याची व शिरपेंच दिल्हा. शिंद्याकडील कंठी व शिरपेंच आला. शुद्ध ११ बुधवारीं दाहा घटका दिवसास मुहुर्तानसीं वाड्यांत आले. ग्रहस्थ मंडळी वाड्यांत आली होती. सर्वांस विडे दिले, आपला आसीर्वाद सांगितला. मी माझें

पत्रांत लिहिलें होतें. यजमानाची स्वारी आलीच असेल. माझा आसीर्वाद सांगावा, याप्रों बोलले. आपलें पत्र यजमानास आल्यास त्यांत ल्याहावें कीं, विश्वनाथ नाईक यांचे पत्रीं आसीर्वाद लिहिला होता; तो प्रविष्ट त्यांणीं केलाच असेल. याप्रों लिहिलें असतां मजकडे लबाडी येणार नाहीं. सूचनार्थ लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री बाबासाहेब, पांच दिवस जाले, फडावर येऊन बसतात. कारभारही कांहीं मनास आणूं लागले आहेत. आपले आसीर्वादेंकरून बंदोबस्तही लवकर होईल, ऐसें दिसतें. मागाहून होईल तें लिहून पाठऊं. जेष्टाविशीं कल्पना आली आहे. बाह्य वदंता विपरीत बोलतात. अद्याप स्वस्थ आहेत. आपणास कळावें. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विज्ञापना.

तीा गंगाभागीरथी मातोश्रीबाई यांस बालकाचा साां नमस्कार. विनंती लिा परिसोन लोभ करावा. हे विज्ञापना.

पों आषाढ वाा १ शके १७२२.

पत्रांक ४९९ श्रीगजानन १७२२ श्रावण शुद्ध १३

पुा वडिलांचे सेवेसी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री येशवंतराव होळकर यांचे लष्करांत राा बाळाजी भाईजी व सदाशिव भाईजी व रामचंद्रजी लोहारेकर बोरनारे जवळ आहे. तेथील ग्रहस्थ हे होळकरांचे बहुत स्नेही आहेत. पेशर्जी मल्हारराव यांचा कारभार रामचंद्रभाईजी करीत असत. पुढें मल्हारराव यांची गर्दी जाहल्यावर उभयतां सदाशीवपंत व रामचंद्र यांस कासीराव यांणीं कैद केलें. ते दोन वर्षें कैदेंत वाफगांवचे किल्यावर होते. पुढें बाळाजी भाईजी लोहोऱ्याहून येऊन, कांहीं जिवामाफक दरबार खर्च काशीराव यांचे लष्करांत व हुजूर याप्रों करून, उभयतां बंधु मोकळे केले आणि घरीं लोहोऱ्यास गेले. त्याजकडे आमचा ऐवज साडेबारासें येणें आहे. त्यांचा आमचा स्नेह बहुत. जातेसमई दोन तीन वेळां आह्मांकडे भेटावयासीं आले होते. घरीं जाऊन, दोन तीन महिने राहून, पुढें येशवंतराव होळकर यांचे लष्करांत जावयाचा मंछबा मारानिलेचा होता. त्यास, ते घरीं जाऊन एक वर्ष जाहलें. कोठें आहेत याचा ठिकाण नाहीं. त्याचा व होळकर यांचा स्नेह येथील केवळ+++होता. त्यास या तिघांचा शोध तेथें बारकाईनें लावावा. तिघांतून एक तेथें असल्यास, आम्हांस लिहोन पाठवावें. आमचें पत्र व तुह्मी आमचें भाऊ असें कळलें असतां प्राण देऊन, तुमचे माहालांचा समस्त बंदोबस्त करितील. आणि आमचा पैसाही त्याजकडे आहे. तरी याचा शोध अगत्य लावावा. येथें असतां येशवंतराव व ते बंधू याप्रों घरोबा होता. याजकरितां लिहिलें आहे. शोध लागल्यास जलद लिहून पाठवावें. म्हणजे तुम्हांविशीं वगैरे एक पत्र पाठऊं. म्हणजे ते सर्व

बंदोबस्त करितील. हा भरंवसा जाणोन, वडिलांस लिहिलें आहे. वरकड स-विस्तर यजमान यांणीं तुम्हांस लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. आपला जीव जे गोष्टीनें सुटून देशीं येणें होई, असा विचार असेल तो करावा. स-विस्तर ल्याहावें. हे विज्ञापना. छ १२ रोवल,- श्रावण शुद्ध १३ शके१७२२ सन इहिदे मयातैन व अल्फ.

पत्रांक ५०० श्रीगणपती. १७२१ श्रावण वद्य ५

वेदशास्त्रसंपन्न राजश्री लक्ष्मीनारायण दीक्षित स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. श्रीचा उत्साह भाद्रपद चतुर्थीचा सरकारांत आहे. याजकरितां आपणास पालखी पाठविली आहे. तरी आपण सत्वर निघोन यावें. जाणिजे. छ. १८ रबीलावल, सुा मयातैन व अल्फ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पत्रांक ५०१ श्री. १७२२ वैशाख शुद्ध ९

अजम सिद्दी बिलालखां दामोबतहूं.

अज दिव्हे येकलास सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर सलाम. येथील खैरखुसी जाणून कलम ताजा करीत जावें. तुम्हीं जदीद सिदी व अरब व हिबसी याचे उमेदवारीचा मजकूर लिहिला. त्यास विलायत आरब याचा सिरस्ता दरमाहा रुपये १६ व सिदी याचा दरमाहा रुपये १३ तेरा व मालपे याचा दरमाहा रुपये ११ येणें प्रों आहे. त्यास तेथें किती लोक असतील तें पत्र पावतांच घेऊन येणें. सिवाय हिबसी व सिलेदार घेऊन येणें. घोडेमाणूस पाहून बंदोबस्त करून दिल्हा जाईल व तुमचे जातीचा बंदोबस्त येथें आल्यावर हुजूर करून देऊं. जाणिजे. छ ८ माहे जिल्हेज. ज्यादा काय लिहिणें ! हे किताबत.

पत्रांक ५०२ श्री १७२२ आश्विन शुद्ध १

श्रीमंत महाराज राजश्री बाबासाहेब स्वामींचे सेवेसी:—

विनंती सेवक नारायण बाबूराव वैद्य कृतानेक सा नमस्कार विज्ञापना ताा छ २९ जावल मुकाम नागपूर येथें स्वामीचे कृपाकटाक्षेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मजवर संकटाचा समय प्राप्त जाहला. याजकरितां आपलें वर्तमान स्वामीस समजावें म्हणोन, चिरंजीव सदाशिव लक्ष्मण जोशी यांनीं तपशिलें लिहिलें आहे. त्याचें मनन कृपा करून समक्ष होऊन माझें संकट दूर होय, अशी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. दुसरी गत पायांशिवाय नाहीं. व मीही जाणत नाहीं. ये विषयीं आर्या श्लोक:—

त्वं मम जननी जनकस्त्वमेव बंधुः कुलंच शीलंच ।
त्वयि निष्ठुरतां याते तृणमपि वज्रायते मयीशान ॥ १ ॥
फार काय लिहूं ? सेवसीश्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ५०३ श्रीनाथप्रा. १७२२ कार्तिक वद्य १४

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण दीक्षित ठकार स्वामीचे सेवेसी:—

सेवक दौलतराव सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें. विशेष. मौजे माहागांव येथील बाळोजी बिन फुरंगोजी व सुलतानजी बिन मानाजी व राणोजी बिन धोंडजी चव्हाण पाटील यांची पाटीलकी पूर्वीची असतां, अलीकडे सुलतानजी बिन मुरारजी व आपाजी बिन सुलतानजी व मुरारजी बिन सुलतानजी लाड यांणीं धटाईनें पाटीलकीचा सोळावा हिस्सा देतात. अलीकडे त्यांतही खलेल केली ह्मणोन समजलें. त्यावरून हें पत्र आपणांस लिहिलें असे. तरी आपण लाड यासी बरें वजेनें ताकीद करून चव्हाण याची पाटीलकी सुदामत पासून चालत आली आहे, त्याप्रों चालवीत, तें करावें. येविसीं पुन्हां बोभाट न ये तें करावें. रा छ २७ जमादिलाखर, सुा इहिदे मयातैन व अलफ. *बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

मोर्तब
सुद

पत्रांक ५०४ श्री १७२२ कार्तिक मार्गशीर्ष.

यादी मौजे कायगांव व मौजे कांटी पिंपळगांव पो गांडापूर हे दोन्ही गांव वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दिक्षित यांजकडे सरकारांतून इनामी आहेत. दोन्ही गांवांवर मोत्याजी गावडे यांनीं फौज सुद्धां येऊन दंगा करून जबरदस्तीनें ऐवज घेतला, बितपशील रु. २०००
मौजे कायगांव सुा मयातैन सन १२०९ चे सालीं अजमासें खर्चसुद्धां व
चे नुकमानीसुद्धां १००० मौजे कांटी पिंपळगांव सुरसन मयातैन सन १२०९

पत्रांक ५०५ श्री. १७२२ मार्गशीर्ष शुद्ध ८

आसीर्वाद उपरी येथील वर्तमान मार्गशीर्ष शुद्ध ८ इंदुवार पावेतों यथा-

---

*येथून हस्ताक्षर दौलतराव शिंद्यांचें.

स्थित असे विशेष. येथील वर्तमान तरीः मोत्याजी कालगावडा याची फौज आठ दाहा हजार पावेतों आली. टोकेंकरास खंडणीचे चार हजार रुपये पडले. शिवाय ++ आठसें रुा प्रवरासंगम येथील साडे सातसें कायेगांवचे ऐन तीन हजार सिवाय दरबार खर्चाचे रुा पांचसे सिवाय ताकीदार वगैरे मिळोन दोनसें रुापर्यंत खर्च लागले. यासी पट्टी सर्व ग्रामस्त सरकारसुद्धां साडे तीन हजार पर्यंत केली आहे. त्यांत मराठे व भिडे व थथे व नरसिंह जोशी व ऋषी यांचे खंड मात्र आहेत. तूर्त ऐवज येत नाहीं. बाकी कमकसर पट्टी वसूल येईल. ठरावांत भरणा होत आहे. लष्कराचा मुकाम आठ दिवस आहे, ह्मणून बोलवा आहे. चिरंजीव राजश्री हरभटदादा येथें आले होते. त्यांचे भेटीस बापू अमृतराव व गोपाळपंत असे आले होते. रवानगीविशीं कांहीं ह्मणत होते. परंतु गडबडीमुळें कांहीं सोय न जाली. दादा पंचमीस पैठणास गेले. बापूसुद्धां मंडळी नांदगांवीं गेली. गडबडी ++ चिरंजिव सौ मैनास व मुलीस *साताऱ्यास पाठविल्या. समागमें कापड व कांहीं दस्तें अशीं पाठविलीं. मी पंचमीस जाणार. परंतु गडबडीमुळें जाणें न जालें. वरकड आह्मी सावध आहों. टोकेंकर कांहीं ग्रहस्थ स्थलांतरास गेले! कळावें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पत्रांक ५०६ श्रीह्माळसाकांत. १७२२ मार्गशीर्ष शुद्ध ९

राजश्री मोत्याजी कालगावडे गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो काशीराव होळकर रामराम विनंती उपरी. श्रीक्षेत्र प्रवरासंगम टोंकें व कायगांव तिरस्थळी गंगातीर. तेथें तुह्मीं मनस्वी उपद्रव देऊन ब्राह्मणथोर—ज्यांस श्रीमंत सामोरे येऊन महत्व राखून बहुत दिवस चालवीत आले. येवनादिकांनींही तिळप्राय तोशीस दिल्ही नाहीं—त्यांस तुह्मीं चाप लाऊन मारहाण अप्रतिष्ठा बहुत केली. कोणाची अब्रू राहूं दिल्ही नाहीं! आणि पुढेंही उपद्रव करतां, पैका मागतां. ऐशा बोभाट्याचें पत्र सरकारांत आलें व श्रीमंतास आलें. ऐशियास, क्षेत्रींचे ब्राह्मणास कोण्ही तिळप्राय उपसर्ग देत नाहींत, रखवालीच करितात. (शिक्का) व आपलेंही सरकारांतून कोणे वेळेसही उपद्रव द्यावयाची चाल नाहीं. ऐसें असतां, तुह्मीं मनस्वी वर्तणूक आरंभिली, याचें कारण काय? याजकरितां येथून हुजरे व जासूद रवाना करून हें पत्र लिहिलें असे. तर पत्रदर्शनीं ब्राह्मण तिरस्थळीचे यांस काडीमात्र तोशिस न लावितां, जो कांहीं ऐवज घेतला असेल, तो माघारीं देऊन ब्राह्मणांचें मानमहत्व राखून, त्यांची खातरी करून, तेथें मुक्काम न करितां कूच करून जाणें. या अन्वयें न घडल्यास, परिछिन्न उप-

---

*औरंगाबाद व कायगांव यांच्या मधील दीक्षितांचे जहागीरगांव.

योगीं पडणार नाहीं. येविशीं श्रीमंतांची निक्षून ताकीद आहे. दुसरे पत्राचा आक्षेप न करितां, ब्राह्मणाचा बोभाट येऊं नये. रा छ ७ रजब.

पत्रांक ५०७ श्री १७२२ मार्गशीर्ष शुद्ध १५सिद्धेश्वर

राजश्री मोत्याजी कालगावडे गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो बाजीराव रघुनाथ प्रधान आसीर्वाद सुा इहिदे मयातैन व अलफ. क्षेत्र टोंकें प्रवरासंगम कायेगांव या क्षेत्रीं तुह्मीं ब्राह्मणास उपद्रव देऊन बेअब्रू करून खंडणीचा ठराव केला. त्यांत ब्राह्मणापासून ऐवज घेऊन बाकीचे ऐवजास श्री देवाचे डागिने घेतले आहेत, ह्मणोन हुजूर विदित जालें. त्याजवरून सरकारांतून खिजमतगार आा २ पाठऊन हें पत्र सादर केलें असे. तर टोंकें वगैरे येथील क्षेत्राचे ब्राह्मणापासून ऐवज व देवाचे डागिने घेतले असतील ते खिजमतगार यांचे गुजारतीनें माघारी देऊन पुढें तीहीं क्षेत्रींचे ब्राह्मणास व रयतीस उपद्रव न करणें. येविषई फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ. १३ रजब. आज्ञा प्रमाण. मोर्तब शिक्का.

पत्रांक ५०८ श्री. १७२२ मार्गशीर्ष वद्य १

०॥श्री॥०
श्री म्हाळसाकांतचरणींतत्पर
मल्हारजीसुत खंडेराव
होळकर.

मा। अनाम बिनसिंग मंडलोई, पो। धरणगांव, यांसी येशवंतराव होळकर. सुा इहिदे मयातैन व अलफ. राजश्री आपाजी मुधाजी यांजकडे पो। मजकूरची मामलत पेशजींपासून असतां, तुह्मीं कामाकाजाविषई दिक्कत करितां, म्हणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी पंतमारनिले यांसीं कोणेविषीं दिक्कत न करितां, काम काज मागाहून करीत आले त्यांत वेध पडूं न देणें. येविषीं पुन्हां बोभाटा न ये तें कर्णे. जाणिजे छ १४ रजब. मोर्तबसूद. (शिक्का असे).

पत्रांक ५०९ श्री. १७२२ मार्गशीर्ष वद्य २

श्रीवेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री लक्ष्मिनारायण दीक्षित यांप्रति:—

बाळशास्त्री अनेक नमस्कार. विशेष. तुमचें पत्र सोनईचा मुकामीहून मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीचें पाठविलें तें पावलें. त्यांतील मजकूर सविस्तर विदित जाला. हेंच वर्तमान श्रीमंतास विदित जालें. त्याजवरून राजश्री मोत्याजी काळगावडे यास सरकारचें ताकीदपत्रासह खिजमतदार असामी दोन पाठविले आहेत. ते आपल्याकडे येतील. आपण तिरस्थळीचे पांच पांच ब्राह्मण पुढें करून, हुजरे बराबर देऊन, काळगावडे यांजकडे पाठवावे. या दों असाम्यांचीं नांवें, बयाजी डोके व दारूकजी घुले. यांचा रोजमुरा रुपये मार्गशीर्ष वद्य प्रतीपदेस रवाणा जाले, कामागिरीस आहेत, तोंपर्यंत रोजमुरा क्षेत्रावर बरगणी घालून देणें. येक रोजमुरा रुपये १४ देऊन रवाणा करणें. पुढें कामकाज चांगलें जाहलियावर यास खुशाल करून वाटेस लावणें. हे अनेक नमस्कार.

पत्रांक ५१० श्रीम्हाळसाकांत. १७२२ मार्गशीर्ष वद्य २

राजश्री मोत्याजी कालगावडे गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रा काशीराव होळकर राम राम विनंति उपरी. क्षेत्र टोंकें आदीकरून तिरस्थळी येथें मनस्वी उपद्रव देऊन ब्राह्मणांची बेअब्रू करून ऐवज घेतला, ह्मणोन बोभाट आला. ऐशीयासीं, क्षेत्राची जागा. आजपावेतों परराष्ट्रें आलीं, त्यांनीं देखील तेथें उपसर्ग न देतां ब्राह्मणांचा बहुमानच केला. असें असोन, तुह्मीं स्वदेशी असतां यांतील विचार कांहीं न पाहतां, ब्राह्मणास मारहाण केली, ऐवज घेतला, हें चांगलें कीं काय ? यास्तव, हें पत्र लिहिलें असे. तर इत:पर तिरस्थळास कोणेविशीं उपसर्ग न करितां, ऐवज घेतला असेल तो माघारा देऊन, ब्राह्मणांचें समाधान करून, चीजवस्त ऐवज पावल्याचीं त्यांचीं पत्रें घेऊन सरकारांत पाठवणें. हें न घडल्यास येथें श्रीमंतांची मर्जी नीट न राहतां अवघड पडेल. या कामास सरकारांतून खिजमतगार आा २ रवाना केले आहेत. यांचे गुजारतीनें लिा प्रमाणें जाबसाल उरकून, तेथील ब्राह्मणांची कबज पाठाविणें. रा छ १५ रजब, सुा इहिदे मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तब सूद. शिक्का.

पत्रांक ५११ श्री. १७२२ मार्गशीर्ष वद्य ७

श्रीमंत महाराज राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी परसरामभट धर्माधिकारी व मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार विनंती विज्ञापना ताा मार्गश्वर वद्य ७ पावेतों यथास्थित असों. विशेष.

अलीकडे गांवचें वर्तमान यथास्थित आहे. काल रा. आपाभट गोखले पुण्याहून आले. त्यांनीं वर्तमान सांगितलें. श्रीमंत पुण्याहून निघून सासवडचे मुकामीं गेले. तेथून यशोदाबाई व नानाफडणीसाची बायको व उभयतांचीं कुटुंबें व प्रतिनिधी यास पुरंदरीं ठेऊन, श्रीमंत मागती सासवडचे मुकामीं आले. तेथें सखाराम घाडगे यांणीं कही खेड्यावर पाठविली. तेथें गरीबगुरबांचे पांघुरणें वगैरे भांडे नेलीं. तें वर्तमान श्रीमंतास कळलें. त्यावरून घाडगे यांस बोलाऊन आणलें. सांगितलें कीं, हें काय ? घाडगे याचें म्हणणें कीं, मला पुसून गेली नाहीं. मग श्रीमंताचे ह्मणणें पडलें कीं, हा कांहीं पुण्याचा मुकाम नाहीं, सासवडचा मुकाम आहे. अशा लबाड्या कराल तर कामास येणार नाहीं. तुझें समागमें यावयाचें काम नाहीं. तेच क्षणीं घाडगे मार यास पुण्याकडे काढ्हून दिल्हें. होळकराचा मूल घाडगे याचे स्वाधीन करावा, म्हणोन घाडग्यास समागमें नेलें होतें. शेवटीं मूलहि न देतां, या रीतीनें काढ्हून दिल्हा. पुण्यांतील लोक तमाम बाहेर जात होते, हें वर्तमान श्रीमंतास कळलें. त्यावरून बाळोजी कुंजर याकडे पुण्याबाहेर चवकीचें काम सांगितलें. त्यावरून भोंवत्या चवक्या बसल्या आहेत. पुण्यांतून माणूस चवकशीवेगळे बाहेर निघूं देत नाहीं. तमाम भाडेकरी यांच्या घरीं चवक्या बसविल्या आहेत. याप्रों वर्तमान आहे. मोत्याजी गावडे यांणीं तिरस्तलीपासून ब्राह्मणांची बेआब करून पैका घेतला, हें वर्तमान शास्त्रीबावांनीं श्रीमंतास समजावलें. त्यावरून श्रीमंताचें ह्मणणें कीं, काय करूं, माझा कांहीं उपाय चालत नाहीं. ज्या उद्देशें बाहेर निघालों, तें कार्य झाल्यास सर्व दुष्टांचें पारपत्य होईल. प्रतिनिधीचे मुलकावर घाडगे यांची जप्ती होती. तेव्हां श्रीमंतांनीं प्रतिनिधीस आज्ञा केली कीं, त्याची जप्ती उठऊन तुह्मी आपला अमल बसवा. ते जबरीस आले, तेव्हां प्रतिनिधीकडील जोर पोंहोंचला. प्रतिनिधीचे शिबंदीनें घाडगे यांचे शेंदोनसें लोक धरून, नाक कान घेऊन पुण्याकडे रवाना केले. बाळशास्त्रीचें कुटुंब व खंडरुषीचे कुटुंब पुरंदरास गेलें. काशीराव होळकरास तीन लक्ष रुपये देऊन आज्ञा केली कीं, फौज ठेऊन सत्वर सासवडचे मुकामीं बोलाविलें आहे. शिंद्याचें कुटुंब जामगांवास आलें. गोपाळरायाचा मुकाम पंधरा दिवस जामगांवींच आहे. गावड्याचें लष्कर निबरीपाचेगांवकडे गेलें. आपण गेलेत ते दिवशीं बरेंच निभाऊन गेलेत. दुसरे दिवशीं भेडाळ्याकडून तेरा स्वार आले. त्यांनीं दौलताबादकर वाणी इकडे येत होता, त्यांस भेडाळे याचे+++जवळ वाणी यांस लुटलें. त्याजपाशीं दोनशें रुपये रोख होते व पांघुरणें व आणिकही लोकांचीं पांघुरणें घेऊन नीट कळंबीनें अंमळनेराकडे गेले. शिवाजी पा याचे मळ्यापासून मागती आपले गांवाकडे आले. ते सरकारचे मळ्याखालून गंगेंत उतरले. गंगेंत घोड्यास पाणी पाजून आस्तान पाणोथावर चढ्हले, तो मारवाडी बोंबलीत आला.

त्यावरून आह्मी पांच पन्नास माणसें घेऊन मागें गेलों. तों ते निघून गेले. पुढें प्रवरासंगमापुढें चिंचा आहेत. तिकडून आपाभट गोखले व टोंकेकर दोघे ब्राह्मण येत होते. त्यांसहि लुटलें. टोंकेकराचे दोंचारशांचें वित्त गेलें. आपाभटाचे पन्नासा रुपयांचें वित्त गेलें. मग ते स्वार गोवेगावावरून सायंकाळीं जामगांवीं आले. तेथें वाटसोर लुटलें. त्यांजपाशीं दोंहजाराचें वित्त होतें. त्या प्रमाणें त्या तेरा स्वारांनीं गर्दी केली. प्रस्तुत आंधारी रात्र आली आहे. भोंवतालचे खेडे उज्याड आहेत. महारामांगाच्या हाळ्या जमल्या आहेत. त्यास, गांवांत गस्त फिरली पाहिजे. तरुत महिना पंधरा दिवस दोघे मुसलमान प्यादे ठेवावें. दिवसा वेशीजवळ राहून रात्रीं गस्त देत जातील. आपली आज्ञा होईल, त्याप्रमाणें करूं. राजश्री बाळाजी यशवंत काल गांडापुरास गेले. तूर्त लोकास कऊल देतात. मग पुढें मागती प्रथम दिवस आहेच. पेंढारी यांची आंवई उठली होती. परंतु ते गलत वर्तमान. ते तूर्त लांब आहे. लखामापूरची यात्रा तूर्त राहिली. श्रीनिवास गोसावी वारले. त्यांची स्त्री सती गेली. वरकड वर्तमान सर्व यथास्थित असे. आपलेकडील सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा जाहली पाहिजे. बहुत काय लिहिणें ! हे विनंती.

पत्रांक ५१२ श्रीमार्तंडप्रसन्न. १७२२ मार्गशीर्ष वद्य १४

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामींचे सेवेसीः—

विद्यार्थी परसरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विज्ञापना ता मार्गशीर्ष वद्य १४ पर्यंत आपले आसीर्वादें करून यथास्थित असे. विशेष. आपण आज्ञापत्र पाठविलें, त्याप्रमाणें जागलीचा बंदोबस्त केला. दोन मुसलमान चाकरीस ठेविलें. त्यांचा दरमहा दोघां मिळून ५॥ केला आहे. काल पुण्याहून राजश्री बाळशास्त्रीनीं हुजरे २ व पत्रें सरकारचे व काशीराव होळकर यांचे मोत्याजी काळगावडे यास पाठविली कीं, तिरस्थळीचे ब्राह्मणापासून बेआब करून रुपये घेतले तें माघारीं हुजरे यांचे गुजारतीनें देऊन क्षेत्रीचे ब्राह्मणाची पावती हुजूर पाठऊन देणें. ह्मणून बहुत पर्यायें करून लिहिलें. ते हुजरे काल सायंकाळीं टोक्यास आले. आज टोकेकरानीं समस्त ब्राह्मण देवळांत मेळऊन प्रवरासंगमकरांस व आपले गांवास पत्र आपले नांवें पाठविलें. त्यावरून आह्मी येथून मल्हारपंतास पाठविलें होतें. तेथें समस्ताचे विचारें निश्चय टरला कीं, तूर्त हुजरेच गावडे याकडे पाठवावे. आपले गांवचे माणूस एक एक द्यावें. तेथें हुजरे पत्र देऊन, त्याचीं प्रत्योत्तरें हुजरे यांसी कसी होतात, त्याप्रमाणें आपले माणसांनीं येऊन सांगावें. त्यांत हुजरे यांचे विचारें च्यार च्यार ब्राह्मणच जावेसें ठरलें. तर त्याप्रमाणें तिरस्तळीचे ब्राह्मण पाठवावे. तूर्त यास शास्त्रीबावांनीं लिहिल्या अन्वयें रोजमुरा द्यावा. त्यांस, एक-

माही रोजमरा रुा १४ द्याव व आपले माणसें जातील त्याबराबर हुजरे यांस व माणसास पोट खर्चास रुा १६ एकूण तीस, टोंके १० प्रवरासंगम १० आपलें गांव १० याप्रमाणें निश्चय ठरला. उदईक आमवास्या. परवां प्रतीपदेस रवाना होतील. पत्राच्या नकला करून व शास्त्रीबावाचें पत्र ऐसें पाठविले आहेत. कागदी मजकूर बराच आहे. आपली आज्ञा येईल त्याप्रों करूं. आज पुण्याहून राजश्री राघोपंत गडबोले व आणीकही पन्नास स्वाऱ्या श्रीकाशीचे यात्रेस जावयास आपले येथें मुक्कामास आले. राघोपंत तात्याचे वाड्यांत उतरले आहेत. त्यांचें ह्मणणें कीं, श्रीमंत कैलासवासी आनंदीबाईच्या आस्ती आहेत. त्या आम्हांबराबर देण्याविषयीं श्रीमंत बाजीराव साहेबांचे खासदस्तुरपत्र आपणास आहे. त्यास, भेट जाली पाहिजे. हा मजकूर सविस्तर बाळाजी नाईकानीं लिहिला आहे. त्यावरून ध्यानास येईल. अलीकडे आपण गेल्या तागाईत कांहीं एक उपसर्ग नाहीं. चोराच्या हिलाच्या वरचेवर तिरस्थळीवर होतात. परवांचे दिवशीं टोकेयास माणसें आलीं होतीं. त्यांनीं टोक्यांतून वाटसारूचा घोडा तेथें उतरला होता तो नेला. वाटसराचें ह्मणणें कीं, घोडा बनाजीशेट सोनईकर याचा आहे. ऐसें बोलून तो उठून सोनईस गेला. मग तो काय करतो न कळे ! काल यज्ञेश्वर वडेकर खंडऋषीचा नातु पुण्याहून आला. त्यानें वर्तमान सांगितलें. दौलतराव शिंदे कूच्य करून आघोलीस आले. एक कंपू अद्यापि पुण्यासच आहे. गोपाळराव जामगांवींच आहेत. याप्रमाणें आजपर्यंत वर्तमान आहे. पुढें होईल त्याप्रमाणें लिहून पाठऊं. आपलेकडील आनंदाचें वर्तमान लिहावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

स्वामीचे सेवेसी मल्हार रामचंद्र कुळकर्णी चरणावर मस्तक ठेऊन सीरसाष्टांग नमस्कार. लिखितार्थ परिसोन लोभाची वृद्धि असावी. हे विज्ञप्ती.

पत्रांक ५१३

पो पौष शुद्ध ६   श्री   १७२२ पौष शुद्ध ३

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी पराशरभट धर्माधिकारी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथिल कुशल ता। पौष शुद्ध ३ पावेतों यथास्थित असे. विशेष. श्रीमंताचें व काशीराव होळकराचें पत्र घेऊन हुजरे आले होते. ते गावड्याचे लष्करांत जाऊन त्याची भेट घेतली. त्यांनीं बोलणें केलें. त्यानें उत्तर केलें कीं, राऊत पाठऊन तिरस्थळींचें ब्राह्मणांस आणून त्यांची खातरजमा करून तुह्मांस पावती देतों. तेव्हां हुजरे यांनीं उत्तर गावड्याशीं केलें कीं, तुह्मी राऊत पाठऊन आणविणार तेव्हां ब्राह्मण भडकतील, येणार नाहींं, आह्मींच जाऊन आणितों. त्यावरून हुजरे येथें आले आहेत. तिरस्थळींचे ब्राह्मणांस चला ह्मणतात.

त्याजवरून आह्मीं काल तीर्थस्वरूप श्रीमंत रा तात्याकडे गेलों. त्यांजला हें वर्तमान विदित केलें. त्यांनीं एकच उत्तर केलें कीं, आह्मांस या कामांत कांहींच समजत नाहीं, तुह्मांस जसें सुचेल तैसें करावें. त्याजवरून आपणास विनंतीपत्र लिहिलें जातें कीं, येविशींचें उत्तर काय तें ल्याहावें. त्याप्रों वर्तणूक केली जाईल. दुसरें तीर्थस्वरूपजींचें व नकारपूर्वकाचें आज दोन दिवस खलबत होत आहे. खळ्याची चौकशी नकारपूर्वका......कुल समजाविली. मग मल्हारपंत कुळकर्णी यांजला बोलाऊन विच्यारलें कीं, खळ्याचा हिशेब समजावणें. त्याजवरून मल्हू आह्मांपाशीं आला. आह्मीं त्याजला सांगितलें कीं, तुह्मीं जाऊन सांगा कीं, पत्रकें श्रीमंत नानासाहेबापाशीं आहेत. याप्रों मल्लूस सांगितलें. त्यानें जाऊन याप्रों विनंति केली. परंतु रावजीपंतांनीं कच्चे खर्डे समजाविले, ह्मणून मल्हूनें सांगितलें. त्यानें नकारपूर्वक व कुळकर्णीमंडळी कुल तीर्थस्वरूप यांचे ममतेनें आहेत. सर्व भट का......

पत्रांक ५१४

पो पौष शुद्ध १४ सोमवार जाबसूद. श्री. १७२२ पौष शुद्ध १४

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेशी:—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता पौष शुद्ध १४ पर्वेतों आपले कृपेंकरून सर्व यथास्थित असों. विशेष. आपण मसाल्याकरितां जिनस आणविली. त्यास, एथें काहाराकडून + + + सोय पडेना, ह्मणोन दोन रुपयांची विकत वजन १८ आठरा शेर घेऊन पाठविले आहेत. पावतील. सरकारचे हुजरे व पत्रें गावडे यांणीं तिरस्तळीपासून खंड घेतला तो माघारे देण्याविषईं आले होते. तों मा पेशजीं पत्रीं आपणास लिहिलाच होता. त्यावर टोंकेकर व प्रवरासंगमकर यांणीं विचार केला कीं, पांच पांच ब्राह्मण पाठवावे. ह्यावरून जयरामपंत वगैरे टोंकेकर ४ व प्रवरासंगमकर नत्थोबा चांडाळ वगैरे ६ व आपले येथून चिरंजिव गणोबा व मल्हारपंत कुळकर्णी पाठविले होते. त्यास गोंधवणी मुक्कामीं गावडे याची भेट जाली. तिहीं क्षेत्राचे यादी लिहून घेतल्या. उपरांत ब्राह्मणास मनस्वी शिव्या देऊन उत्तर केलें कीं, तुह्मी देवाचे डागिने कां मोडले, त्यास ते डागिने द्या, तेव्हां तुमची सुटका होईल. हुजरे मुडदार! यांच्यानें कांहीं एक जरबेची गोष्ट बोलवेना! असो! मग जैरामपंतांनीं करार केला कीं, इतकी पट्टी केली तैसी आतांही गांवांत जाऊन पट्टी करून देवाचे डागिने करून देऊं. गावडे यांचें ह्मणणें कीं, श्रीमंतास लिहून पाठवा कीं, आह्मी दागिने करून देतों, याप्रमाणें लिहून द्या. मग जैरामपंतांनीं करार केला कीं, येथें लिहिलें कशास पाहिजे, आह्मी टोंकियाहूनच लिहून पाठऊं. ऐसें करार केला. तेव्हां सुटका झाली. मग रुपयाचा जाबसाल कळतच आहे! उगेच कांहीं

विशेष राहिले होते, ते आणीकही दाहा बारा रुा खर्च जाला आणि खराब जाले. याप्रमाणें जालें. मल्हारपंतास हिशेब घेऊन पौष वद्य १ प्रतिपदेस पाठऊन देतों. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. आज्ञा येईल तर एक दिवस आह्मीही येऊं. देव दर्शनही होईल व आपलीही भेट होईल व एक दिवस राहून मागती येऊं. हे विनंती. शेवेसी विनंती सेवक मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार. हिशेब घेऊन प्रतिपदेस येतों. हे विनंती.

पत्रांक ५१५ श्री. १७२२ पौष वद्य १०

विद्यार्थी गोपाळभट दामले कृतानेक सां नमस्कार विनंति विज्ञापना ताा पौष वद्य १० पो यथास्थित असो. विशेष. कृपा करून रा. अंताजीपंताबराबर रुा ५० पन्नास पाठविले ते पावले. आपण जिनस दिला तो गाडलीवर घालून शनवारीं संध्याकाळ पो येऊन पोहचेल. गावड्याचें वर्तमान ऐकिल्यांत आलें कीं, जिवाजी यशवंत याणीं गावडा लुटून घेतला. तेथून मुजरत जलकेकर पाटील आला. त्यानें वर्तमान सांगितलें, तेव्हां खरेंच आहे. पंचवीस स्वारांनशीं पळून गेला. वरकड सर्व सलतनत लुटून घेतली. राजश्री दवलतराव शिंदे याचा मुहूर्त माघ शुा ५ चा आहे. तेथून वेदशास्त्रसंपन्न परशरामभट टोंके आले. त्यांनीं वर्तमान सांगितलें, सध्यां नगरास गेले, तेथून चांभारगोंद्यास जाणार, तेथून आलियावर जामगांवींहून कूच करून याप्रांतास येणार. कळावें. परंतु सडी फौजेनशीं टोंक्यास व परशरामभट टोंके यांचे घरीं येणार, हें खचित वर्तमान आहे. वरकड सारी फऊज तोफखाना वगैरे बाभुळगांवचे मार्गें जाणार. याप्रों वर्तमान आहे. बयाजी निरमळ्याचे गाडीवर खोलगट तवा पाठविला. त्याचे पावलीयाचे उत्तर आलें नाहीं. ते ल्याहावें. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना. सेवक अंताजी धोंडदेव सां नमस्कार.

पत्रांक ५१६ श्री. १७२२ पौष वद्य १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसीः—

पोष्य गंगाधर गणेश साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ताा पौष वाा १३ पावेतों यथास्थित जाणून स्वकीयें लिहीत जावें. विशेष. तुह्मी तीा दादाची रवानगी केली. ते येथें सुखरूप पावले. आह्मी यावे. सबब माणसें गाडली ठेविली. कालपासून इकडे पेंढारी, निा शिंदे, याची आवई दाट उठली. भागानगराकडे जाणार. दहापांच कोशीं स्वार पेंढारी आढळले, अशी आवई दाट बोलतात. सबब राहिलों. दुसरेंहि काम जरूरीचें, याजमुळें गुंता जाहला. गाडली माणसें उगीच ठेवावीं, तर तुह्मी रागें भराल, जाणून माघारी पाठविली आहे. अमावास्या जाल्यावर येथूनच माणसें घेऊन येतों. तुह्मी मार्ग लक्षूं नये. आजच निघणार होतों. परंतु दोघा चौघांनीं मोडे घातले

व दुसरें काम जरूरीचें प्राप्त जालें. सबब राहिलों. तुह्मीं राग भरूं नये. थोडी-मुळें कांहीं सुचत नाहीं. तुह्मापाशीं येऊन येथें लठीकबाद कोठवर घ्यावा. तुह्मांस सर्व ठावकेंच आहे. तुह्मी तेथें घाबरूं नये. पेंढारी आपले तिकडे येत नाहीं. वरकड मार, यजमान तेथें आले आहेत. फार मर्जी संरक्षावी. राजश्री बाळाजीराव व काशीनाथराव मराठे यांचाही समाचार घ्यावा. त्यांची मर्जी खुष ठेवावी. तुह्मांस येथून सरंजाम दाळ तुरीची वजन ८।३।, हरभऱ्याची ८८१ दीडपाव, सालंमिश्री ८८८९, १ व दादानी दिला ३।। रोख, बापूबरोबर पाठविले आहेत रु. वीस हे घ्यावे. उत्तर पाठवावे. पौषआकार जाला. तुह्मांस कळावें. महारास मंगळवारचे पाहोस दिल्हे आहे. बहुत काय लिहिणें? हे विनंति. पुण्याहून राजश्री पंतांची स्वारी येणार, असें वर्तमान तुमचे तेथें आहे, ह्मणून दादा सांगत होते. यजमानस्वामींचे पत्र नाहीं. तिकडे आणखी काय वर्तमान असेल तें लिहून पाठवावें. हे विनंति.

पत्रांक ५१७ श्री. १७२२ माघ शुद्ध ११

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामींचे सेवेसीः—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल जाणून ता। माघ शुद्ध ११ पर्यंत यथास्थित असे. विशेष. परवां जिवता दळयाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. पुण्याचें पत्र पाठविलें तें तिळाच्या पिशव्या नव, मल्हारपंत कुळकर्णी यांचे माणूस पुण्यास गेले, त्याबराबर पाठविली. कळावें. रा। दवलतराव शिंदे निंबदेहरें येथें आला, ह्मणोन वर्तमान आहे. खचित आला. पुढें पुण्यस्तंभाची आवई आहे. बाहेर अफवा ऐकतों कीं, खटला राहोरीचे मुक्कामीहून पुणतांब्याकडे रवाना करून, सडा तिरस्तळीकडे येणार. ऐसें लोक बोलतात. वरकड सर्व मजकूर यथास्थित आहे. देवीचंद वाणी आपणाकडे आला आहे. राजश्री व्यंकटरावजी गांडापुरकर आपले गांवीं बावनपागेचे गर्दीपासून आहेत. ते मुलीचें लग्न येथें करितात. त्यांस राजश्री शिवरामपंत तात्याचा वाडा च्यार दिवस लग्न करावयास जागा प्रशस्त आहे. याकरतां त्याची परवाननी पाठऊन द्यावी. आ + + नारोपंतास सांगून त्याची चिठ्ठी पाठऊन द्यावी. वरकड नवल विशेष जालियास लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें? हे विज्ञाप्ती.

महाराजाचे सेवेसी मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार. लिखितार्थ परिसोन लोभाची वृद्धी असावी. हे विज्ञाप्ती.

राजश्री विनायकबापूस सां नमस्कार.

पत्रांक ५१८ श्री. १७२२ माघ वद्य १

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामींचे सेवेसीः—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम ता। माघ वद्य १ पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल पत्र आपलें आलें. लिहिल्याप्रों बेवीस रुा ब्रह्मभटजीपासून घेऊन, देवीचंद मारवाडी यास देऊन, त्याची पावती घेतली. रा। दौलतराव शिंदे देवठाणींहून कूच करून, आज कासारबारीचे मुकामास गेले. याप्रों वर्तमान आहे. वो। रा। परशरामनाना टोंके प्रवरासंगमकर यांस शिंदे यांचें पत्र आलें होतें. त्यावरून ते लष्करांत गेले. चिरंजीव गणोबाही आज शिंद्याचे लष्करांत रा। मनोहरपंतआपाच कामानिमित्य गेला आहे. एका दो रोजां तो आला ह्मणजे सविस्तर वर्तमान कळेल. त्याप्रों लिहून पाठऊं. आज वर्तमान ऐकिलें कीं, किल्ले नगर शिंद्यांनीं सरकारांत श्रीमंतास दिल्हे. कामकाज कित्याचें सरकारांतून रा। यशवंतराव सुभेदार यांकडे सांगितलें, ह्मणोन आज तिसरे प्रहरापासून वदंता आहे. मोहन तेली गांवांतून गेला ह्मणोन आपणास कळलें. त्यावरून आपण लिहिलें. त्यास, त्याचा बाप वामोरीहून आला. त्याकरतां तो बापास घेऊन देवदर्शनास सेडिवघे यास गेला होता तो काल गांवास आला. कळावें. हुर्डापेट्या ३ व टांहाळ कडपे २ पाठविले आहेत. पावतील. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञाप्ती.

सेवेसी मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार लिखितार्थ परिसोन लोभाची वृद्धि असावी. हे विज्ञाप्ती.

रा. रा. विनायक बापूस उभयतांचा नमस्कार. पांधुरणें व नवार पाठविली ते पावली. हे विनंती.

पत्रांक ५१९ श्री. १७२२ माघ वद्य ४

श्रीमंत राजश्री नानाजी दीक्षित यां प्रतिः—

परश्रामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम ता। माघ वा। ४ इंदुवासर जाणून सुखरूप असो. विशेष. श्रीमंत राजश्री बापू यांची लग्नाकरितां मूळचिठी आली कीं, अगत्य अगत्य यावें. असें लि। आहे. वो। रा। परश्राम नाना शिंद्याच्या लष्करांत गेले होते, ते गांवास आले. भेटहि निवळहि जाली नाहीं! आणीखहि दाहावीस ब्राह्मण गेले होते. त्यांस दक्षणा विठलपंत बापूंनीं देऊन वाटे लाविलें. असामीस दोन रुपये देऊन वाटे लाविलें. परश्रामभटासहि शेंपन्नास रुा मिळाले. रा। मल्हारराव होळकर सुभेदार यांचा पुत्र समागमेंच आहे. गोट, निशाण, वेगळाच चालत असतो. लष्कर दर कुच गेलें. बऱ्हाणपुरापावेतों मुकाम होत नाहीं. ++++ श्रीमंत पुणियास आले. फडक्यांचे वाड्यांत आहेत. सरकार वाड्यांत अद्यापि गल नाहींत. लष्कर गारपिरावर आहे. पुन्हां लष्करांत येणार ऐसी वदंता आहे. बाहेर स्वारी निघणार ऐसें ऐकिलियांत आलें. + ++ हे विनंति.

पत्रांक ५२० श्री. १७२२ माघ वद्य १०

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना ता। माघ कृष्ण १० पो आपले कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान बाळोजी कुंजर याचा बंधू पागे मौजे निवरी पाचेगांवचे मुक्कामीं आहे. पुढें गंगातीरास आठ पंधरादिवस कालक्षेप करणार. सिवारची कही करितो. राजश्री शिवराम जोशीबाबा पुण्याहून काल शनवारीं प्रातःकाळींच टोंके यास दाखल जाले. त्यांनीं पुण्याचें वर्तमान सांगितलें व चिरंजीव आपानीं मौजे शेवल्यास कारकून पाठविला. त्यांनीं सांगितलें कीं, श्रीमंत शिवरात्रीस भिमाशंकरीं जाणार. तेथें श्रीमंत अमृतराव साहेबही येणार. उभयतांचे भेटी होणार. आपानीं लिहिलें कीं, अमृतराव थत्ते यांचा हिशेब व पत्रें पो ते पावले. त्यावरून त्यांस तगादा केला. त्याचें ह्मणणें कीं तूर्त ऐवज नाहीं. त्यास, आह्मी पुढेंही उद्योग करीतच आहोंत. या प्रमाणें लिहिलें. लग्नासही येत होतों, परंतु कुंजराचे पागेचे गडबडीकरितां राहिलों. वरकड वर्तमान सर्व यथास्थित असे. सरकारचाकरीस सावध आहोंत. कामामुळें कितकिांस संतोषअसंतोष आहे. आमचे लक्ष स्वामींचे पायांशीं, अंतर तिळभर नाहीं, येविशीं खातरजमा आहे. आह्मीही एखादी गोष्ट करूं ती खातरजमेचीच करूं. आह्मांस पुण्यास चिरंजीव आपांनीं बोलावलें. परवां चिरंजिव यज्ञोबाची रवानगी केली. तेव्हांच बेत होता. परंतु आपली आज्ञा घेतली नाहीं ह्मणोन राहिलों. आतां शिवरात्र जाल्यावर जावें लागतें. आपली भेट जालि. यावर जाऊं. राणूजी हवालदार समक्ष आला आहे. यास रानचे रखवालीविषई ताकीद करावी. महारपोर परवानगीशिवाय आणूं न पावे. आमचा दाब ठेविल्यास सरकारचाही दाब रहातो. बहुत काय लिहिणें हे विनंती.

शेवेसी मल्हार रामचंद्र कुलकर्णी सां नमस्कार. लिखितार्थ परिसोन लोभाची वृद्धी असावी. आह्मांस सर्व आधार आपले पायाचा आहे. लिहावे असा अर्थ नाहीं. सर्व प्रकार माझे चालवणें साहेबास आहे. हे विज्ञापी.

पत्रांक ५२१

मसुदा. श्री. १७२२ फाल्गुन शुद्ध.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांसीः—

प्रती लक्ष्मीनारायण दीक्षित कृतानेक आशीर्वाद येथील क्षेम ता। फाल्गुन शुद्ध + पावेतों मुकाम औरंगाबाद येथें आपले कृपेंकरून कुशलरूप असों. विशेष. राजश्री जिवाजी यशवंत बावनपागे फौज सुद्धां कायगांवीं शुद्ध ३ रविवारीं येऊन राहिले. त्यांचे मागें पेंढार एक हजार दुसरे दिवशीं आलें. त्यांची व यांची लढाई जाली. पेंढार चारपांचशें जखमी व दोनशें ठार

बावनपागे यांणीं केले. पेंढारास तीन कोश हटविलें. मागाहून कंपू पलटणें व तोफा घेऊन आला. त्यानें तोफा सुरू केल्यावर, जिवाजी यशवंत फौजसुद्धां गंगापार उतरून गेले. नंतर कंपू व पेंढार कायगांवावर मुकाम करून, पेंढाऱ्यानें गांवात लूट केली. ब्राह्मण आदिकरून सर्वत्रांस वस्त्राहरण जालें! श्रीकृपेंकरून बायकांची आबरू व तीा रामचंद्र दीक्षित यांचा व आमचा वाडा ऐसे दोन वाडे मात्र निरोपद्रव राहिले. वरकड कायगावासच पेंढाऱ्यांनीं उपद्रव केला. हा ईश्वरीक्षोभ! असो! सर्व गेल्याची क्षीत नाहीं. आपले प्रतापेंकरून मागती सर्वत्रांस प्राप्त होईल. वर्तमान श्रुत असावें ह्मणोन लिहिलें आहे. विशेष काय ल्याहावें? लोभ असों द्यावे.

कोल्हापूर.

पत्रांक ५२२ श्री. १७२२

राजश्री येसाजीपंतआपा स्वामी गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित शिदोजी जगथाप मुकाम करवीर सां दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनास आज्ञा करावी. विशेष. आह्मांकडील वर्तमान तरः मातुश्री बाईसाहेबांचा व कागलकरांचा बिघाड जाहला. पौष शुद्ध अष्टमीस आह्मांकडील फौज तयार होऊन कागलावर गेली होती. तों कागलकरहि जमावसुद्धां बाहेर पडले. मग त्यांची आमची दृष्टादृष्ट जाहले, परंतु कांहीं झुंझ जाहले नाहीं. च्यार घटका उभें राहून फिरून कागलास गेले. त्यांचा जमाव दोनसें स्वार व च्यारसें प्यादे असें आहे. वडिलांस कळावें, ह्मणोन लिहिलें आहे. दुसरें वर्तमान, तरी शुा ८ अष्टमीस कागलकरांनीं बाईसाहेबांचा मामा? गुरूं मारून नेले. दोनसें गुरें व मेंढरें पांचसें असें नेलें. गांवातील माणसें जखमी पांचसात व ठार एक पडला. कागलकराकडीलही थोडे बहुत जाहले. आमचे प्यादे रुईस तीसपसतीस पाठऊन दिले आहेत. रुईची फार आवाई आहे. आपलें पत्र आल्यावर राजश्री भगवंतपंतासहि हटकिलें. त्यास, त्याणीं उत्तर दिलें कीं रा विसाजीपंतआपा आले ह्मणजे काय तें सांगू. वडिलीं लिहिलें होतें कीं, फौजेंत खाऊन राहायाचें प्रयोजन नाहीं. त्यास, त्याणींहि थोडें बहुत पोटास दिलें. आपण सुप्याकडील शाहे लिा त्यास, तिकडील शाह मातबर असला तर, तसेंच लिहून पाठवणें, ह्मणजे आह्मीं निकाल काहाडून येऊं. नाहींतर, चार दिवस तह ह्मणोन जरूर राहूं. बहुतकरून आण्णा आले ह्मणजे तेहि निरोप देतील. बहुत काय लिहिणें? हे विनंति.

सेवेसीं बाळाजी गंगाधर सां नमस्कार. लिा प्रसिजे. वडिलीं आशीर्वादपत्र पाठऊन परामर्श केला पाहिजे हे विनंति.

पत्रांक ५२३ श्री. १७२३ चैत्र शुद्ध ३

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री लक्ष्मीनारायण दिक्षीत स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी यशवंतराव महादेव सां नमस्कार विनंति येथलि कुशल ता चैत्र शुद्ध ३ जाणुन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहीजे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. रा जिवाजी यशवंत याचे व कंपूचे दंग्यांतून कायगांवकर यांची तसनस बहुत जाली, ह्मणोन विस्तारें मजकूर लिहिला, तो सविस्तर कळला. ऐशास, ईश्वरी क्षोभ! त्या गोष्टीस मनुष्याचा उपाय राहिला आहे, असा अर्थ नाहीं. सारांश, दंग्यापूर्वी निघोन साताऱ्यास जाऊन राहिलां ही गोष्ट फार उत्तम केली. कायगांवकर ब्राह्मणाविशीं श्रीमंत राजश्री दादांस सांगावें. साहित्य होईल तेथवर करावें, ह्मणोन लिहिलें. त्यास, सांप्रतचे दिवस सर्वांस काळजीचेच आहेत. त्यांत ही सवड पाहून सूचना करितों. चिरंजीव नारायणराव यांचें लग्नकार्य फाल्गुन वा अष्टमीस उरकून घेतलें. आपणांस कळावें. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंती.

पत्रांक ५२४ श्री १७२३ चैत्र वद्य ५

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसी:—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता चैत्र वद्य ५ भृगुवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण गेलियावर काल गुरुवारीं पेंढारी कंपूची गडबड बहुत जाली. राहोरीचे मुक्कामीं बुधवारीं होते. गुरुवारीं कूच करून खंडाळयास, नजीक पुणतांबें, येथें मुकामास गेला. कोन्ही ह्मणूं लागले कीं, आपलें गांवावरून येतो ह्मणून तिन्ही गांव बहुत घाबरले! श्रीमंत ती त्यांनीं मातोश्री माईस व आपा वगैरे मंडळीस गाणगापुरीं वाटेस लाविले होतें. पाठऊं नका ह्मटलें. परंतु त्यांचें धैर्य पुरेना, म्हणोन वाटे लाविले. मग सायंकाळीं मागती आणिलें. वाणी याचे हिशेब एकदों रोजां तयार करून पाठऊन देतों. तूर्त बेलदारांस खर्चाची फार अडचण आहे. या करतां तूर्त बाळा गुरुवाबरोबर अगत्य दहा रुपये तरी पाठवावे. अनमान न करावा. आपले वाड्याचा कडबा एकादों रोजांत वसूल करतों. तात्याकडील त्यांजकडे पोंहचवितों. साताऱ्याचा साताऱ्यास पाठऊं. कळावें. बावनपागे यांसी व जरीपटके व पानसे वगैरेसी लढाई जाली. बावनपागेचा मोड होऊन, तमाम बुणगें लुटलें. बावनपागे सडी फौज पांच सात हजारानसी निघून गेला. याप्रों वर्तमान जलें. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञप्ती.

स्वामीचे सेवेसी मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार लिखितार्थ परिसोन लोभ करावा. वाणीयाचे हिशेब व तगटाची वाटणी तयार करून पाठवितों. हे विज्ञापी.

पत्रांक ५२५ श्री १७२३ वैशाख शुद्ध १०

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नाना दीक्षित स्वामींचे शेवेसी:—

विद्यार्थी गोविंद भिकाजी गडबोले कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ता। वैशाख शुद्ध १० पर्यंत आपले कृपेकरून मुक्काम कसबें पुणें येथें सुखरूप असों. विशेष. आह्मीं पैठणाहून सडे होऊन निघ लों तो चैत्र वद्य एकादशी गुरुवासरीं सुरक्षित पावलों. मार्गीं पेंढारी वगैरे यांचे दंगे पूर्वीं होते, ते निवारण जाहले. इतक्याकरितां मार्गाची निभावणी निर्वेध जाहली. पानशे व पुरंधरे फौजेसहीत वाळकीच्या समोर होते. त्यांचा उपद्रव कहीचा मात्र वरकड किमपि नाहीं. +++ आतां दिवसेंदिवस सुबिता दृष्टीस पडत चालली आहे. पेंढार वगैरे खानदेश प्रांतीं गेलें. आतां सरकारची मात्र फौज पारनेराजवळ आहे. +++ विठोजी होळकर, येशवंतराव होळकर यांचा बंधू, हजार दोन हजारांनिशीं निराळा फुटून, मुलखांत दंगा बहुत केला. गांवचें गांव उज्याड पाडिलें. परंतु हल्लीं धोंडोपंत गोखले यांचे चिरंजीवांनीं कद्द करून पुण्यास पाठविला. त्यास मार देऊन हत्तींचे पायांसीं वैशाख शुद्ध चतुर्थीस बांधोन मारिला. वरकड मजकूर यथास्थित आहे. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांची स्वारी लौकरच जनस्थानीं निघावयाचा बेत आहे. च्यातुर्मास वास तिकडेस होईल, असा बेत आहे. शेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ५२६ श्री. १७२३ अधिक ज्येष्ठ वद्य १२

शेवेसीं विमंति. सेवक सदाशीव आपाजी चरणीं मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता। अधिक वद्य द्वादशी मु॥ अष्टें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अधिक पौर्णिमेचें पत्र स्वामीस लिहिलें आहे तें पावलेंच असेल. येथील मार तरः मिरखां याचा भाचा जमशेरखां व शामहमदखां पठाण यांणीं अका हजार रो खंडणी घेऊन आणि माहालापासून गांघ गांव खंडणी करून पंधरा वीसपर्यंत ऐवज नेला. देवीपुन्याचे जवळ जाऊन काम करून गांव जाळून टाकला. खंडणी यजंद माहालची ठरली होती, तिचा ऐवज पाठविला. शिवाय आणखीं ठेऊन घेतला असतां नेल्या आहेत, सोडूं देत नाहींत. माहालची खराबी बहुत केली. लावणीचे दिवस. एक एक या गांवचे निखुक बैल एक राहिला नाहीं. दाणा वेगळे गेले. रयतेची या वेळेस बहुत खराबी जाली. खातरजमा करीत आहेत. काय लावणी होईल ती खरी. पेंढारी यांचे स्वार त्याचे फौजेंतूनच कांहीं माहालांत रखवालीस चालीस आणिली आहेत. पेंढारी यांचे फौजेचा जमाव बहुत जाला आहे. मीरखान यांचीं व होळकराची पत्रें त्यास आणिलीं. परंतु खातरेंत पत्रें ठेविनात व धूम मनस्वी करूं लागले. याजकरितां त्यांसी बोलावयाकरितां येथून मीरजीस रो बापूजी गोविंद कमाविसदारांनीं पाठविले

होते. त्यास कांहीं ऐवज द्यावा असें ठरऊन स्वार च्याळीस माहालांत रवा-लीस आणिले आहेत. ऐवज ठरला तो आपणासीं समजला नाहीं. किती ठरला असेल तो लिहून पाठवीन. सुज्यालपुरचें वर्तमान रो बाबूराव बाबांनीं लिहिलें आहे. सविस्तर कळेल. जमशेरखां पठाण याची फौज शिकारपुर पर-गण्यांत गेली: त्या वेळेस येथून पागे, गांवशिबंदी, सवार कसब्याकडे पाठ-विलीं. पांचच्यार दिवस तेथें सरंजाम राहिला. पुढें फौज निघून देवीपुन्याकडून गेली. शेवेसीं विनंती. सेवक सदाशिवचरणीं मस्तक ठेऊन शिरसां नमस्कार विज्ञापना. शिबंदीची रवानगी अष्टयास तेथून माघारी केली. पागा दोंतीन दिवस राहिली. तेव्हांच ही रो रामराव आपाजी देईनात. ह्मणों लागले.*

पत्रांक ५२७ श्री. नकल. १७२३ ज्येष्ठ शुद्ध ३

वेदमूर्ती राजमान्य राजश्री परशरामभट नाना व समस्त ब्राह्मण क्षेत्र प्रवरासंगम स्वामींचे सेवेसीं:—

सेवक त्र्यंबकभट सभारंजक मुा वैजापूर सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा जेष्ठ शुद्ध ३ दोनप्रहरपावेतों मुकाम मजकुरीं सर्व मंडळी कुश-लरूप असों. विशेष. आपणापासून स्वार जालों ते मुा मारीं दोनप्रहरीं पावलों. यानंतर लष्करचें वर्तमान तरी फत्तेसिंग माने यांची फौज आठ हजार आंपरखुल येथें आहे. मोंगलाईत कांहीं उपद्रव नाहीं. शिंदे यांची ठाणीं उठोन आपलें ठाणें बसवितात. वेरुळाकडे दोनतीन हजार फौज ठाणें बसवा-वयासीं गेली आहे. तिचा शोध करून बनलें तर वेरुळाकडे होऊं. इकडील फौज तूर्त कांहीं आपल्याकडे येत नाहीं. वेरुळाकडील बातनी राखीत जावी. धामधूम विशेष कांहीं दिसत नाहीं. एखादें पत्र जोख्यास पाठवावें. तिकडोन बंदोबस्त जाल्यास उपयोगीं पडेल. आपल्याकडील सविस्तर वर्तमान ताा लिा पाठवणें. स्वस्थ असावें. कळावें. बहुत काय लिा ? कृपा लोभाची वृधी करीत जावी. हे विनंती.

ताा. हेंच वर्तमान टोंक्यास कायगांवीं पावतें करणें.

पत्रांक ५२८ . श्री. १७२३ आषाढ शुद्ध १

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामींचे शेवेसीं:—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल ताा आषाढ शुद्ध १ परियेंत आपले आशीर्वादेंकरून वर्तमान यथा-स्थित असे. विशेष. राा सरजेराय घाटगे जामगांवास आले. हें दृष्टीनें माणसें पाहून आलें. बहुतकरून इकडूनच जावयाचा बोलवा आहे. काल प्रवरासं-गमकरांचें पत्र आलें कीं, आमचे येथील च्यार ब्राह्मण जामगांव पावेतों जा-

---

* पुढील बंद गहाळ.

तात, तुह्मांकडील कोणी पाठवा. त्यावरून दोघां चवघांस विच्यारलें. परंतु कोणी जावयास सिद्ध होईना. मग चिरंजीव गणोबा आज पाठविले. ते आज प्रवरासंगमींच राहिले. उदईक तिरस्थळीं मिळून दाहापांच ब्राह्मण जाणार. वो शास्त्रसंपन्न रा शास्त्रीबावाही पुण्याहून उदईक जाणार. याप्रमाणें वर्तमान आहे. सरजेरायाची आवई इकडून जावयाची फार आहे. वाटेनें मोठी धूम करतो! कदाचित् इकडून आला तर च्यार रुपये खर्चवेंच पडला, तर कैसी तजवीज करावी? येथील विचारें तर सर्व ध्यानांतच आहे. त्यास, जैसी आज्ञा येईल तैसी वर्तणूक केली जाईल. श्रीमंत अमृतराव साहेबही सातळपाथळेयावर पुणतांब्याचे सुमारें आले आहेत. इकडे सुभानखाही सेवगांवचे ल (ग) त्यास आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें होईल तें लिहून पाठऊं. दुसरे पुण्याकडून जरीपटका वगैरे पांचच्यार हजार फौज गारदोंडची नदी उतरून यांचे मागें आले. श्रीमंत मोहोर्तानसीं बाहेर निघाले! डेरा गारपिरावर दिल्हे. पुढें विशेष वर्तमान आढळल्यास मुजरत लिहून पाठऊं. हे विज्ञप्ती.

पत्रांक ५२९ श्री. १७२३ आषाढ शुद्ध २

श्रीमंत राजश्री नानाजी वडिलांचे सेवेसीः—

अपत्यें विनायकाचा सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। आषाढ शुद्ध २ पो। वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. येथें सर्जेराय याचे दंग्यामुळें लोक भयाभीत * झाले आहेत. आपले पुण्यानें ईश्वर काय पार पाडील तें खरें! बहुत काय लिहिणें? लोभ करावा. हे विज्ञापना.

पत्रांक ५३० श्री. १७२३ आषाढ शुद्ध ४

विद्यार्थी गोपाळभट दामले सां नमस्कार विज्ञापना ता। आषाढ शुद्ध ४ मंगळवार पावेतों क्षेम असों. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. सरजेराव महादुष्ट! कायगांवचे मार्गें आल्यास विश्वास नाहीं! या अर्थी सातारियाहून भांडीं वगैरे आलीं तीं व कायगांवची भांडीं रा करावीं व एक मजल मागेंच आहे तों गुरें रवाना करावीं, ह्मणोन लिहिलें. ऐसियास, सरजेराव काल पावेतों जामगांवींच होता. नेवासें वगैरे महालची चुकोती सोनईस बाणाजी शेट्ये याजकडे ठरावयासी सांगितली. त्याजवरून नेवासें वगैरे माहालची खंडणी पंचवीस हजार रो ठरले ऐसें परस्परें वदंतेनें ऐकतों. गांडापुरीहून बाळाजी येशवंत यांचे कनिष्ट चिरंजीव गेले आहेत. तिरस्थळीचें बोलणें जाल्यास सोईचें पडेल. याप्रों पत्र सोनईहून कोणी गृहस्थानें प्रवरासंगमीं

---

* येथें झा आहे, जा नाहीं. झालें—ला—ली अशी अक्षरवटिका १७२३ पासून पुढें दृष्टीस पडते; तत्पूर्वी प्रायः जाले—ली—ला अशी अक्षरवटिका असे.

पाठविलें. त्यावरून टोंकेकर व प्रवरासंगमकर व आपले येथील गणोबा धर्माधिकारी सिदू गाईकवाड सोनईस गेले आहेत. तेथील बातमी आज सायंकाळपावेतों येईल. त्यावरून कूचमुकामाचें वर्तमानहि समजेल. कोणत्या मार्गें जावयाचा रोंख, हेंहि समजेल. त्याअन्वयें आज्ञेनुरूप वर्तणूक करावयासी येईल. बहुधा नेवासें व गांडापूर या माहालाची चुकोती जाली, त्या अर्थी आपलाले माहाल चुकऊन बेलापुराहून मार्ग निघाल्यास काढतील, असें भासतें. याऊपरे न कळे. + + + हे विज्ञापना.

पत्रांक ५३१ श्री. १७२३ आषाढ शुद्ध ७

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार ता आषाढ शुद्ध ७ भृगुवार प्रहरदिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असें. विशेष. काल आपणाकडे पत्र पाठविलें. त्यावर दोंप्रहरां रा सरजेराव घाडगे यांची स्वारी प्रवरासंगमीं दाखल जाली. अगोदर कंपू पुढें आला. त्याची कही प्रवरासंगमांत गेली. त्यांनीं लांकूडफांटा वगैरे फार गर्दी केली. पांचच्यार घरें झोंबाडले. दोंचव घरचीं पांघरुणें, भांडीं, वस्तभाव वरचेवर हातीं लागले ते नेली. त्यावर खासा स्वारी आलियावर, चाळीस तुरुक स्वार रखवालीस देऊन, कही मारून काहाडली. नंतर वो रा बाळंभट आपाचे भेटीस गेले. भेट घेऊन हात जोडून उभा राहिला कीं, तुमचो आज्ञा होईल तर बसेन. मग आपा बसा ह्मणाले, तेव्हां बसला. भोजन आपांचे घरींच जालें. त्यावर आपानीं सांगितलें कीं, कालेगांवास गंगा उतरावयास जावें. नांवाहि दोनच्यार तिकडेच आहेत. तेव्हां, त्यानें कबूल तर केलें. व लखमापूर, वरखेडे, कायगांव टोंके, प्रवरासंगमास पांचागांवास काडीमात्र उपसर्ग न करणें. तेव्हां त्यानें कबूल तर केलें. परंतु कंपूचा आग्रह आहे कीं, याचघांटें उतरावें. नावाहि सावखेड्यापर्यंत काल आल्या, ह्मणोन बातमी आहे. पुढें रामडोहाचे खडकावरून नाव चालत नाहीं. आज पाणीहि दोन हात उतरलें. त्यापक्षीं नाव तर खडकावर चढणारच नाहीं. मग नाववाल्यांनीं युक्तीनें चढऊन आनलियास उपाय नाहीं. परंतु बहुतकरून कालेगांवास जाईलसें दिसतें. परंतु कंपूचा आग्रह आहे. अलीकडे उतरल्यास फार खराबा करतील. काल प्रवरासंगमकरांस शंभर सो खर्च पडला. शिवाय, तुरुक स्वारास चाळीस सो पडले. ते सरजेरावानें आपले जवळून दिल्हे. पुढें येथेंच उतरावयाचा बेत जाला, तर सर्वांचें मानस कीं, दोन तुरुक स्वार आणावे. + + + आज पलीकडे सहश्रभोज्यन करणार. दोनतीन मुकाम आहेत. मागाहून नवल विशेष वर्तमान जाल्यास लिहून पाठऊं. + + + गांवातील लांकूड व......पूल तोफांस नांवेंत घालायाकरितां नेतील. धूमहि करतील. परंतु आपण चिंता न करावी. उतरणें फार करून येथें होईल,

पत्रांक ५३२ श्रीगजानन. १७२३ आषाढ वद्य ३

पैवस्ती आषाढ वद्य ५

विद्यार्थी गोपाळभट दामले सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता आषाढ वद्य ३ मंगळवार, दीडप्रहर दिवस, पावेतों यथास्थित असे. विशेष. सर्जेराव घाटगे फौजसुद्धां कूच करून आज सेंधूरवाड्यास गेले. कूच कालच होणार होता परंतु आरब चाकरीस होते, त्यांची तलब चढली होती, सबब अडून बसले. नंतर तहरह होऊन, तलबेचा फडशा करून दिल्हा आणि रुकसत केलें. याजमुळें काल राहिले. आज फौजसमेत गेले. गांवांतून बेगारी माणसें पंचवीसतीस गेले आहेत. मळ्यांतील सालवकडबल वांचलें. सर्व ईश्वरकृपेनें व कैलासवासी नानांचे पुण्यप्रतापें करून पार पडलें. जात्या दुष्टच ! याचा विश्वास आबालवृद्धांस नवता परंतु श्रीरामेश्वरकृपेनें पार पडलें ! बैल साताऱ्यास आहेत, ते उदईक चंद्रोदई तेथून रा करावयासी आज्ञा व्हावी. ह्मणजे येथें च्यार घटका दिवसास पावतील. + + + हे विज्ञप्ती.

पत्रांक ५३३ श्री १७२३ आषाढ वद्य ३

पैवस्ती आषाढ वद्य ५ बुधवार.

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसीं:—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंती विज्ञापना ता आषाढ वद्य ३ मंगळवार प्रहर दिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा सर्जेराव बापू घाटगे यांचे कूच कालच होणार होतें. परंतु कांहीं आरबांचे तंट्यामुळें काल मुकाम जाला. कालच मोठें विघ्न होतें. बावनपागे यांचे भांडण होतें. आरबांसीं व त्यांसीं कटकट लागली होती. सेवटीं आरबांनीं रुा घेऊन आपले जबरीनें रात्रीं निघून गेले. आज रा सरजेराव बापूंचेंही कूच करून सेंदूरवाधेयास मुकामास गेले. वरकड सविस्तर वर्तमान लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

पत्रांक ५३४ श्री. १७२३ आषाढ वद्य १२

यादी नारायण बाबूराव वैद्य यांस नागपुरास कामगिरीस पाठविलें. त्यास, ह्या छ २९ मोहरम सन मयातैन ता मोहरम अखेर सन इहिदे मयातैन पावेतों मारीनेलेच गुा तीची जमाखर्चाची यादी अलाहिदा आहे. त्या यादीस शिलक निघाली आहे. तें मुा इसने मयातैन व अलफ.

रुा

५८६८॥-

यासीं खर्च रुा

३३६४ बाबूराव विश्वनाथ वैद्य यांस पेशजी

नागपुरास भोंसले यांजकडे पाठविलें होतें. त्याजबराबर सरकारचे खासबरदार व उंटें वगैरे होतीं त्यांस इा छ २८ रो वल सन इहिदे तिसैन ताा छ १६ जिल्काद अखेर साल सन खमस तिसैन पावेतों खर्च जाहला तो बाा यादी देवावयाची. छ १६ जिल्हेज सन सबा तिसैन विाा परशराम रामचंद्रः—

रुाा ३४२०

पैाा वजा खासबरदार दिाा हाय यास तैनाते प्राा एक माही कापड आख पावावयाचें त्याबाा दर रुाा चार आख प्रों नक्त ल्याहावें. ते अडीचपटप्राा नक्त खर्चे लिाा आहेत त्यास, नक्त चौपट प्राा किंवा अडीचपटप्राा द्यावयाचे याचा दफ्तरचा दाखला निघेल त्याप्राा पावावयाचे. सबब वजा रुाा

१०||| ुजाजी निकम दिाा धारोजी भिकरे.
४५| दिाा सोमाजी जाधव.
११|| कृष्णाजी लोढा.
११|| लंबाजी खांडेकर.
११|| हैबतजी भोसला.
१०||| नरोजी यादव.

४५|

५६

बाकी रुाा

२५०४|| नारायण बापूराव वैद्य कामगिरीस नागपुरास पेशजीं गेले होते. त्याजबद्दल खासबरदार व उंटें सरकारांतून दिल्हे होते. त्यांस इाा छ १७ जिल्काद सन सीत तिसैन ताा छ २९ जिल्हेज सन तिसा तिसैन अखेर साल पावेतों खर्च जाहला तो

बाा याद देण्याची छ १ रो वल सन मयातैन रुा ४५३०

पैकीं रुा

५८६८॥

नारायण बाबूराव वैद्य यांस रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांजकडून ऐवज पावला. त्या पौा पांच हजार आठशें साडे आडसष्ट रुा शिलक राहिली ते जमा धरून सदरहू यादी प्रा खर्च लिहून जमाखर्च करणें.

छ २४ रो वल आषाढ मास सन इसने मयातैन. जमाखर्च करणें.

पत्रांक ५३५ श्री. १७२३ श्रावण शुद्ध ७

पो पत शुा ७ शके १७२३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री व्यंकटरावजी स्वामीचे सेवेसी:—

पो आबाजी नीळकंठ सां नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत श्रावण शुद्ध ७ पाा वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण एक दोन वेळां पत्रें पाठविलीं तीं पावलीं. गांवाविशीं लिहिलें. त्यास, राजश्री तात्याकडून अजुरदार आला. त्याजबाा पत्र येथून पाा तें पावलेंच असेल. येथून कारकून राा बाळाजी गोपाळ मुजरद संदऽयास पाठविले. त्यांणीं होळकर याची व पाराजी पंत—बाबा यांची भेट घेऊन गांवचें वर्तमान सविस्तर सांगितलें. नारोगणेश यांचे चिरंजीव यांचीहि भेट घेतली. त्याणीं उत्तर केलें कीं, हे गांव वाघाचे इनामी आहेत. राजश्री येशवंतराव होळकर यांणी तुळसाजी वाघ यांस दत्तपुत्र देऊन सरंजाम त्याचा त्याजकडे सांगावा, असा करार केला आहे. तेव्हां इनामीगांव जरी सरंजाम न दिल्हा तरी हे गांव त्याचे त्याजकडेस देणें प्राप्त. त्यांत रदकजीस नेमून भिडेस्तव.........कर यांस कर्ज लाखों देणें आहे. तेव्हां गोष्ट घडत नाहीं. गांवची मोकळीक होणें कठीण. ज्यांचे भिडेस्तव गांव दिल्हे ते पुण्यास राहिले. याप्रमाणें उत्तरें जालीं. काशीराव होळकर निघोन महेश्वरास गेले. याप्राा वर्तमान आहे. पुढें कर्तव्य तें करून कार्य होय तो अर्थ करावा. राजश्री भिकाजीपंत तात्या प्रसंगीं असते तरी कांहीं साहित्य करिते. ते पुण्यांत राहिले, तेव्हां गोष्ट विलग पडली. आह्मांकडील वर्तमान तरी: इतके दिवस शिंदे याजकडील उपद्रव होऊन माहाल लुटले गेले. त्यास हाली शिंदे याजकडील फौजसुद्धां पारनर्मदा जाहाले. सरजेरावहि तापी उतरून गेले. शिंद्याकडील उपद्रव येशवंत होळकर इकडे येऊं देत नाहीं. परंतु जिवाजी येशवंत दाहा हजार पायदळस्वारांनिशीं बोशागडाहून उतरून मोठा दंगा मांडला आहे. त्यामुळें गांवें बेचिराख, घरें दारें जाळून मोकळीं केलीं.

पुन्हां दंगा........जाईल असा अर्थ ठेविला नाहीं. असो.........
अखेर श्रावण येतों. भेटीनंतर सविस्तर कळेल कीं, पहिला आहे तोच आहे.
कळावें. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा. हे विनंति.

पत्रांक ५३६ श्री १७२३ श्रावण शुद्ध ११

पौ छ ८ जावल सन इसने मयातैन, भाद्रपद मुा कोपरगांव.

शेवेसी लक्ष्मण आपाजी सां नमस्कार विज्ञापना तागायत छ ९ रारवर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. ठाणसिंग याजबरोबर पत्रें, किल्यांत बाहेरील झाडून मंडळी लोकसुधां आंत आल्याचें वर्तमान लिहून पा, त्यावरून सविस्तर कळलेंच असेल. महत्कार्य जाहलें ! किल्ला हस्तगत होणें दुरापास्त होतें. परंतु आपले पुण्यप्रतापें कार्यसिध्धी जाहली. अलीकडील वर्तमान: जोतिबा निंबाळकर याजकडेस मोठाच अपराध. याजकरितां पायांत बेड्या घालून कैद केला. व ह्याकोजी ना नांदगीकर व गोंदजी व दादजी ना पेडणेकर, येकूण असामी तीन यांसीं बेड्या घातल्या. व लछीराम याचा भाऊ आनंदराम यास बेडी घातली. सदर्हू पांच असामींस बेड्या घातल्या. शिवाय गोपाळराव बेड्याशिवाय कैद करून ठेविला आहे. बाकी मोठ्याच अपराधाचे च्यार आा सुलतानराव, शिव सावंत, गणोजी वाघ, गणोजी बोरकर मोकळेच सध्या आहेत. त्यास, याचेपुढें कसें काय करावयाचें, त्याविशीं सरकारची आज्ञा घेऊन लिहून पाठवावें. आज्ञाप्रमाणें पुढील कर्तव्य करूं. काल श्रावण शुद्ध १० दशमीस लोकांची हजिरी घेतली. गयाळ असामी बाद घातली. व दोषी पंचवीस तीस असामी दूर केली. आणखी पंनाससाठ आा बदलावयाची आहे. ती एकदमच बाद घालूं ह्मटल्यास, ठीक नव्हे. पुढें सोईसोईनें जसें जसें दिसेल तसतसें करूं. बाहेरील सवारों लोक रायचंद, जुमारामबकस व बारगीर, गोलंदाज व किरकोळ आह्मांजवळ चौकी पाहाऱ्यास आहेत. जिभींत पंनास लोक आरबांचे आहेत. दुर्गाडींत जुमाजमादार पंचवीस लोक सुधां आहेत. बाकी शंभर लोक देहुडी व कचेरी मिळोन आठ प्रहर जवळ असतात. किल्यांतिल ब्राह्मण सरदार याचे लोक व भंडारमंडळ व सजणार्जीराव यांची अनुकूळता पक्केपणें आहे. याउपर किल्याविशीं आपण किमपि काळजी न करावी. सुलतानराव यांचें वळण * बाळाजीपंत पटवर्धन याजकडे आहे. सध्या दरबारीं चाल बाळाजी पंताची. यास्तव पारिपत्य तो मोठेंच केलेंच पाहिजे. यास्तव सरकार परवानगी घेऊन उत्तर पाठवावें. त्याप्रमाणें करूं. शेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

* पुण्यांत कवठीच्या आड्डयासमोरील पटवर्धनाच्या वाड्याचे मूळ मालक. येथें थोड्या वर्षांपूर्वी ट्रेनिंग शाळा होती.

पत्रांक ५३७ श्री १७२३ भाद्रपद शुद्ध प्रारंभ

पौ छ ८ जावल सन इसन्ने, मुा कोपरगांव.

पुा सां नमस्कार विज्ञापना. पाछापूरचें सांप्रत वर्तमानः सरजेराव घाटगे यांजकडून आपा देसाई निपाणकर याजकडे सांगितलें आहे. आपा देसाई याजकडून निळकंठराव ह्मणोन कमावीसदार आहेत. निळकंठराव, लिंगो केशव व बापू देशपांडे यांचे आप्त आहेत. देशपांडे व कमाविसदार एकलक्षानें चालतात. देशपांड्यांचे व शेखमिराचें वांकडें. तेव्हां देशपांड्यांचें राहणें पाछापुरीं होईना. यास्तव, शेखमिराचें पारिपत्य करावें हा सर्वांचा मानस. यास्तव, दोन हजार लोकांचा जमाव केला. शेखमिरास कळलियावर पहिले चारपांचशें लोक त्याजवळ होतेच. हालीं शेंदोनशें नवे ठेऊन यांची त्यांची नवी लढाई झाली! पहिले लढाईस शेखमिरा कचकरला. दुसरे लढाईस निळकंठराव कचरले. यामुळें देशपांडे मंडळी देवजीरुद्रसुद्धां पळून गोकाकेस गेला. दाहावीस माणूस ठार जाहाले. एकादोघांचीं डोकीं मारिलीं. एकास तीरमार करून मारिला. पांच साहा आा कारकून अंकल्याच्या ठाण्यांत कमावीसदाराकडून होते, ते धरून नेले. ते जिवानिशीं मारणार ह्मणून बोली आहे. मग यापुढें काय करील नकळे. सांप्रत कित्तूरकर तीनच्यार हजार जमावानिशीं शेखमिरास सानुकूळ जाहाले आहेत. तेव्हां (बंड?)++++++ मोठेंच जाहलें. दाहापांच हजार फौज व तोफा (येऊन?)+ जांबेटी व कित्तूर व शेखमिरा याचें पारपत्य करतील तेव्हां वस्ती होईल. झाडून तालुका उज्याड. पुंडावा मांडिला आहे. तुह्मी पाछापूरची सनद पाठविणार. तेव्हां सनदेनें अमल बसविणें अर्थ नाहीं. सनद निघाल्यास फौज इकडे येणार. त्यास, सरकारांतून ताकीद करवावी कीं, पाछापूरचें ठाणें खर्च न घेतां बसऊन द्यावें. नाहीं तर, उगीच सनद घेऊन सरकारचा उपकार कामाचा काय? यामागें परशरामभाऊ मिरजकर यांची फौज या प्रांतीं राहून संस्थानिकांचीं पारपत्यें सालास करीत होते. अलीकडे या प्रांतांत दाब अगदींच नाहीं, याप्रों जालें आहे. आपणांस कळावें. ह्मणोन लिा आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पत्रांक ५३८ श्री १७२३ श्रावण वद्य ५

पो भाद्रपद शुद्ध १ शके १७२३.

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न महाराज राजश्री तात्यासाहेब स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी येशवंतराव दत्तात्रय व नारायणराव बाळकृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ताा श्रावण वाा पंचमी शुक्रवार जाणून स्वामीचे आशीर्वादेंकरून स्वस्थ क्षेम असों. विशेष. कृपा करून आशीर्वाद पत्र श्रावण शुद्ध सप्तमीचें मुजरद हरकाऱ्याबराबर पाठविलें तें वद्य तृतीया बुधवारीं संध्याकाळीं पावोन दर्शणातुल्य लाभ जाला. मासलाबतखां बहादूर व सुभान-

खांबाहादूर सहसैन्य साताऱ्याचे शिवारांत उतरले आहेत. शेतांमळ्यांस व गांवास फर्मायश आदिकरून उपसर्ग फार होतो. यास्तव उभयतां सरदारांचे नांवें येथून निक्षून ताकीदा पाठवाव्या. या प्रकरणीं कृपासागर राजश्री राजे रघोत्तमराव राजेंद्रबाहादूर यांसही आपण पत्र लिहिलें. आज्ञेप्रमाणें राजेमवसुफांस समक्ष सविस्तर निवेदन करून, उभयतां सरदारांच्या नांवें निक्षून ताकीदपत्रें, यथास्थित काडीमात्र उपद्रव शिवारांत व गांवांत न व्हावा व हरएक साहिता करीत असावी. श्रीमंत पंतप्रधान याचें गुरुस्थान व याही राज्यांत यांची मान्यता विशेष आहे, ऐसें बहुत अगत्यबादेंकडून लिहिलें असे. इतःपर कोने गोष्टीचा उपद्रव होणार नाहीं. तीा रा यादवरावबाबा यांहीं पत्रीं एतद्विषयीं आह्मांस बहुत लिहिलें. ऐसियास, आह्मीं आपले आज्ञांकित प्रसंगानरूप यथानशक्त्या जे सेवा घडेल ते थोडीच जाणतों. राजेंद्रबाहादराचें पत्राचें उत्तरही सेवेसी पाठविलें असे. उभयतां सरदारांस पत्रें पाठविलीं त्यांचा मसविदा या पत्नांत पाठविला आहे. श्रवणगोचर होईल. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असो दिजे. हे विनंती.

पत्रांक ५३९ श्री १७२३ आश्विन शुद्ध १०

पौ छ ८ जावल सन इसन्ने, मुा कोपरगांव.

पुा सां नमस्कार विज्ञापना. हवालदार यांणीं पुण्यास पत्रें आह्मांकडेस माणसें विचा......कळवून पाठविलीं. परंतु पत्रें कोणाकडे आणि त्यांत मार काय, हें समजलें नाहीं. ऐकण्यांत श्रीमंतांस व मोरोबादादांस पत्रें लिहिलीं आहेत. हिंमतअल्ली जमादारास, बाळूमियास पत्रें लिहून हीं पत्रें त्याजकडे पाठवा, असें ह्मणत होते. मग, तो जाबसाल राहिला. मग त्यांनीं आपलींच माणसें पाठविलीं. त्यास, त्या पत्राचा शोध बाळूमियाकडे करावा, ह्मणजे समजेल. त्यांणीं आपल्या श्रेहितांसीं पत्रें लिहिलीं असतील. त्याचाही शोध करावा. सनगांविशीं लिहिलें होतें. त्यावरून हलीं मजुरदारावरून धोत्रजोडे पाठविले आहेत त्याची याद अलाहिदा आहे. यादीप्रमाणें पावलियाचें उत्तर पाठवावें. मातुश्री लक्ष्मीबाईकडे तीन हजारांचा नेट लाविला आहे. परंतु, उरफाट्या गोष्टी सांगतील. सोईस येत नाहीं. लक्ष्मुबाईची प्रकृत परम अवघड. आपणास परस्परें ऐकून माहितगारच आहे. आजपर्यंत किल्यांत होती. आह्मी आंत आलियावर बाहेर पुसोन गेली...तात्या व मी एकत्र होऊन ऐवजाचा साबसाल करणें, तें बाहेर गेलियावर यांचें त्यांचें बोलणें जाहलें. सर्वांच्या मतें सध्यां तीनहजार रुा बाईनें द्यावे. बाई कोणाचेंच ऐकत नाहीं! येविशींचा मजकूर पेशजींच्या पत्रीं लिहिलें आहे. उत्तर येईल त्याप्रों करीन. गांव व किल्लां गार्द्यांचा त्रास करितो. मग, त्रास कां करितात, हें न कळे.

याची चवकशी तुमची तुह्मीं करावी. आह्मांस चवकशीचें ज्ञान नाहीं. यास्तव बाईस व तात्यांस पुणियास आणविल्यास पा देतों. आपलें व त्यांचे विचारें होईल तसें करावें; व किल्याच्या बंदोबस्तास कोण विश्वासूक असेल तो पा. काम मोठें. प्रामाणिक, एकामी, जातीचा पाहून पाठवावा. त्याचे स्वाधीन किल्ला करून, आह्मी पुणियास येतों. कुसाजी पेशक हुजऱ्या पाठविलात. त्याप्रमाणें येथें येऊन आमचे रजेतलबेंत राहून सांगितल्याप्रों वर्तणूक करून कार्यसिद्धी केली. माणूस बहुत चांगला. प्रसंगानें कळतें. कुसाजीविशीं पेशजीं लिहिलेंच आहे. लिहिल्याअन्वयें हवालदारीचें काम याजकडेस जाहल्यास, दादा! बहुत सुख पावाल, ह्मणोन लिहिलें आहे. युक्तीस येईल तसें करावें. आमचा आग्रह कोणती गोष्टीचा नाहीं. गार्द्यांची चौकशी आह्मांस करा ह्मटल्यास, आह्मी साफ करणार नाहीं. मागें, अंबूनानाच्या चौकशीस आपण पाठवीत होतां, परंतु आपण कबूल केलें नाहीं. यास्तव, हालीं करणें तें समक्षच करावें. येथें कारकून मंडळी आहे. त्यांत बुधव्हेव्हार हशमनीस. कोणाच्या तंट्याबखेड्यांत व लोभांत अगदीं नाहींत. बापूराव बापट कामकाजाच्या उपयोगीं मात्र आहेत. पुढेंहि बाबूराव उपयोगींच पडावयाचे. शाहणा माणूस, दमाचा, प्रामाणिक आहे. इतर सारे रोजगारेच आहेत! रोजगार करावासा वाटतो. धन्याचें हित हो अगर अनहित हो, त्याची काळजी त्यांस नाहीं! रामचंद्र ळळतो, रामचंद्र नरसि, रामचंद्र भिकाजीपंत जवराचा (!) मेहुणा व्यंकपा च्यार असामी कोणत्याहि उपयोगाचे नाहींत. दरमहा पैका कोठून द्यावा? पैक्यास ठिकाण नाहीं. यास्तव च्यार असामीस सध्यां निरोप देण्याविशीं पत्र पाठवावें. काडीचा उपयोग नाहीं! राजश्री दाजीबा गर्दे यांचे तीन आहेत. आप्त ह्मणोन चालवावें खरें. परंतु यजमानाचें हित करावयाचें ज्ञान नाहीं. आणि बळवंतराव याजकडे जाऊन आमचेंहि अनहित इच्छितात! असो! याउपर आमचे नांवें पत्र पा कीं, दाजीबाचे स्वार सध्या पैक्याच्या वोढीमुळें दूर करावें, पुढें ठेवावयास येतील. ठेविले असतां कामास येणार नाहीं. ह्मणोन अलाहिदा पुरवणी दाखवावया उपयोगी लिहाव्या. असाम्यांची वेगळी स्पष्ट लिहून पा ह्मणजे असाम्यां बंद घालितों. याउपर पुढें बारीक......टें समजेल तें लिहून पाठवितों. उत्तर येईल, त्याप्रों करावयास येईल. मृगापासून आजपर्यंत पर्जन्य आठप्रहर नित्य पडतो. शेतें गेलीं. सध्यां धारण अडीच पायलीची च्यार महिनें जाहाली आहे. माहागाईमुळें सिबंदीचा रोजमऱ्याचा नेट विशेष होतो. त्याचाहि उपाय नाहीं. गांवांत खर्चामुळें पेशजीं पट्टी करीत होतों. परंतु बखेड्यानें गांवांतहि बखेडा होऊन पेंठ व रयत पळून गेली. तेव्हां स्थलपत्र जांबेटकरांस देऊन गांवावर आणिलें. हालीं किल्यांत बखेडखोरांस बेड्या घातल्या. हें वर्तमान कोष्टयांनीं ऐकून सलाबत खादली कीं, आह्मीं बखेडा केला होता, पुढें आमचें पारपत्य ऐसेंच करतील. यास्तव दोन च्यार असामीं

जाबिटीस गेले आहेत. आह्मी तो पट्टीचें नांव घेतलें नाहीं. किल्याप्रकरणींच बंदोबस्तास गुंतलों. त्याची त्यांणीच कांक्षा घेऊन गेले आहेत. वरकड सारे गांवातच आहेत. जाहालें वर्तमान लिहिलें आहे. याऊपर आह्मीं आपले तर्फेनें दिलदिलासा देऊन, गेले त्यांस आणवितों. सारांष.........साधन करावयास जावें तों मसक (?) साधत नाहीं. अशा गोष्टी किल्याच्या एका बखेड्यामुळें जाहल्या आहेत. कचें वर्तमान लिहिलें आहे. कळावें. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञति.

पत्रांक ५४० श्री. १७२३ भाद्रपद वद्य ५

पौ भाद्रपद वद्य ९

विद्यार्थी परशराममट धर्माधिकारी व मल्हार रामचंद्र कुळकर्णी मोजे कायगांव सां नमस्कार विनंति विज्ञापना येथील क्षेम ता भाद्रपद वद्य ५ पर्येत आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. + + + हालीं वर्तमान डाल–टन कंपू पलटण अमदानगर, याचा मुकाम आपले येथें जाला. दीडमास होत आला. त्यास अद्यापि कूच करीत नाहीं ! मनश्वी उपद्रव करितां ! सरंजामाची चिठी दुसरे वेळेस केली. त्याचा मजकूर मोहगम पूर्वींचे पत्रीं लिहिला होता. त्यानें जबरी करून चिठी प्रो सरंजाम घेतला. आह्मी पंचवीस मंडळी घेऊन लष्करांत गेलों. परंतु त्याचे गांवीं कांहींहि दया नाहीं ! रदबदलीन माणूस चिठी प्रो घ्यावा ह्मणूं लागला. + + + त्यास, आतां कसेंही करून याचे सरदार कर्नेल याचें पत्र फरंगी लिपीचें आलें तर हा कूच करील; नाहीं तर हा मासपक्ष येथून उठत नाहीं. याकरतां त्याचा हरकारा व पत्र घेऊन पाठवावें. सरकार शिंदे यांचें पत्र दाखविलें. परंतु मानीत नाहीं. याकरतां करनैलाचें पत्र आलें पाहिजे. तर शिवराची पेरणी होईल. यानें मोठी धूम केली. कुणब्याचे गरती बायकोचे आबरू एकदोघींची घेतली ! ! व गांवांत उपद्रव होतो. तो पत्रीं लिहितां येत नाहीं.+ + + + + + +

पत्रांक ५४१ श्री १७२३ आश्विन वद्य २

पैा छ ११ जावल सन सलास मयातैन, भाद्रपद मास शुा १३.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री रघुनाथ धोंडदेव गो यांसी:–

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सुा इसन्ने मयातैन व अलफ. मुंबई व साष्टी वगैरे ठिकाणीं सरकार महालांतून कसाई गुरें नेऊन दुराचरण कर्मै करितात. येविशींचे बंदोबस्तास जनाजी बिन विठोजी समले व रामराव मेघःशाम कारकून यांस हुजुरून पाठविले आहेत. तरी हे कसाई व त्यांचे मिलाफी वगैरे गुरें ता आठगांव व प्रां साष्टी येथून नेतात, त्यांची

चौकशी उभयतां करून सरकारांत समजावितील. त्याअन्वयें हुजुरून आज्ञा करणें ते केली जाईल. तुह्मी येविशीं अडथळा न करणें. जाणिजे. छ १४ जमादिलाखर, आज्ञा प्रमाण. लेखनसीमा.

पत्रांक ५४२ श्रीमार्तंड प्रा. १७२३ कार्तिक शुद्ध ५

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामींचे सेवेसी:—

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी व मल्हार रामचंद्र कुळकर्णी मोजे कायगांव सां नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल ता कार्तिक शुद्ध ५ पावेतों आपले आशिर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. डालटन कंपू कूच करून सोमवारीं वेरुळास गेला. आत्माराम बाबा वागनीस यांची फौज बेरुळास गेली. वेरुळकरांसीं यांची लढाई लागली आहेच. वैजापुराकडे शामरायाची पागा आहेच. बावनपागे इकडे येतात, ह्मणोन आवई आहे. गांवची पेरणी जाली. जोंधळे चांगले तासीं लागले आहेत. सालमारीं पर्जन्य फार; यामुळें पेरणी मागस जाली. परंतु जोंधळे चांगले आहेत. मग पुढें कसें होईल तें पाहावें. + + + हे विज्ञप्ती.

पत्रांक ५४३ श्री. १७२३ कार्तिक शुद्ध ७

राजश्रियाविराजित राजमान्यराजश्री गंगाधरपंत यांप्रति रामचंद्र दीक्षित आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता कार्तिक शुद्ध ७ रविवार पावेतों यथास्थित असों. विशेष. अलीकडे तुमचें वर्तमान पत्र येऊन कळत नाहीं व लष्करचें बातमीचें वर्तमान कळत नाहीं. इकडे लष्करचें वर्तमान कीं, मीरखान पठाण व गोपाळराव व श्रीपतराव व पेंढार ऐसें वऱ्हाणपुरीं येऊन दाखल जालें. ते इकडे येतात, ह्मणोन श्रीमंतांचे डांकेचें वर्तमान गांडापुरीं व प्रवरासंगमीं शनवारीं आलें. येणें करून चित्त चिंताक्रांत आहे. मिरखानाचे फौजेची दहशत भारी आहे. याजकरितां तिरस्थळीं घाबरली आहे. त्यास,*शहरीं फौजेचें पक्कें वर्तमान असेल तें लिहून पाठवावें. शहरीं पक्की बातमी नसल्यास शेंदुरणीस मुजरहू बातमी करितां अजुरदार पाठऊन, पक्की बातमी आणवून, कोणीकडे जातो हें सविस्तर बातमी आणवून लिहून पाठविणें. अथवा शहरीं वर्तमान पक्कें असलियास, तुमचें उत्तर लवकर पाठवावें. ह्मणजे तुमचे लिहिल्यावरून मुलामाणसांची शहरीं यावयाची तजवीज करूं हे आशीर्वाद.

पत्रांक ५४४ श्री. १७२३ मार्गशीर्ष वद्य ३

जमा माहालपोता कमावीस बाबा रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांजकडे

---

* अवरंगाबादेस.

संस्थान गढेमंडलें रेवाउत्तरतीर याजबा ऐवज सरकारात घ्यावयाचा ठरला आहे. त्यापैकीं गुा आनंदराव बाबूराव वैद्य यांणीं भिकारीदास जोहरी याजकडून देविले. ते हस्तें परशराम नाईक अनगल. चांदवड रुा

१९७०० छ १५ साबान.
१०३०० छ १६ साबान.

३००००

तीस हजार रुो चांदवड पोता जमा असेत. छ १६ साबान, सुा इसने मयातैन व अलफ.

पत्रांक ५४५ श्रीशंकर. १७२३ पौष वद्य १४

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित बाबा स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक येसाजी गायकवाड कृतानेक सां दंडवत विनंति. येथील क्षेम ता। छ २७ माहे रमजान जाणून स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. यानंतर अबदुल रजाख देशमुख पा। उडणगांव यांणीं आपले भाऊबंदी + + + जिवे मारिले. त्यास त्याच्या बाइका व मुलें श्रीमंतापाशीं फिर्याद जाली. श्रीमंत राजश्री रघुनाथराऊ दादासाहेब या प्रांतीं आले. त्यासमई भेटीस बोलाविलें. त्यास, गैरहजर होऊन, पळोन जाऊन, त्यांणीं देशमुखी जप्त करून, सेलवडेस ठाणें बसऊन झेंडा लाविला ! राजश्री नारो बाबाजी सुभेदार मााहाय याच्या स्वाधीन ठाणें केलें. त्यास, आह्मांस नेना. ह्मणून आह्मीं श्रीमंतास अर्ज केला कीं, ठाणेयांत कारकून दुसरा हुजूरचा ठेवणें. त्यास, त्याणी रा। सदाशीवपंत कारकून टेविले. देशमुखीची नजर घेऊन, यंदा गुमस्तगिरी आह्माकडे दिली. आह्मीं त्यांचे गुमास्ते पेशजीचे आहेत, तेच ठेविले. अखेरसालीं देशीं गेलियाजवर, श्रीमंत जप्ती पंचाईत करून मोकळी करतील अगर त्यांच्या खातरेस येईल त्यास गुमास्तगीर सांगतील. ते मुलखाचें खावंद. त्याणीं जप्ती केली, ठाणें बसविलें. त्यास, अबदुल रजाख मार्गे कईत. फिर्याद वतन. त्याचें ठाणें मारितां त्यास आपल्यास जाग कोठें पाहिली ! वतन जाऊन ठिकाण नाहींसें होईल. असें कर्म न करावें. श्रीमंत पुणियास आलियाजवर, त्यांसपाशीं जाऊन, हवाल सांगोन, अर्ज करून, त्यांची कृपा निर्माण जाहलियावर ते स्थापना करितील. त्यांची नालीस शहरीं केलीयानें त्यास विशाध येईल. ऐसें न करावें. तुह्मी त्यास फजित करून सांगणें कीं शहरीं नालीश कार्याची नाहीं. जर त्याणीं तुमचे नाइकिलें, नालीश केली, तरी त्यास ठिकाण नाहींसें होईल. येथें वार्ता उडाली आहे कीं, बहिर बक्षी आला आहे तो खेळवाडेवर येतो. ऐसी रोज आवई उडाली. याजमुळें पा। उडणगांव फरारी जाहला. शिवणेंहि फरारी जाहलें. बहुत धूम माजविली.

रोज पळ सुटला. सेलवाड वैराण जाहली. त्यास, साहेबीं कृपा करून नबाब शाहानवाजखांजी यांस सांगोन, सेलवाड व उडणगांव याजविशीं बारखास चिठी मोहेरेनशीं देऊन पाठवणें. श्रीमंत राजश्री जाधवराऊ आपल्या पदरचे आहेत म्हणून हे अर्ज साहेबास लिहिली. साहेबीं चित्त घालून, खामखाई बरखास चिटी घेऊन पाठविली पाहिजे. नाहीं तरीं, उडणगांव परगणा वैराण जाहला. बक्षीची दहशत भारी पडली. याजमुळें रयत फरारी जाहली. या गोष्टीचा बंदोबस्त साहेबाखेरीज होणार नाहीं. म्हणून अर्ज सेवेसीं लिहिली. विनंति लिहिली हे मान्य करून, बरखास चिठी घेऊन पाठवणें. देशमुख आपलेपाशीं राहों देणें. श्रीमंत पुणियास आलियाजवर, आमचे यजमान व साहेब मिळोन, त्याचा अर्ज करून मग जें होणें तें होईल. बहुत काय लिहिणें ! हे विनंतिलक्ष.

पत्रांक ५४६ श्रीलक्ष्मीकांत. १७२३ माघ वद्य ९

पो छ २२ सवाल सुा इसन्ने मयातैन, माघ.

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. गोसावी यांनीं खासदस्तुरचें पत्र राजश्री नारायण बाबूराव यांज समागमें पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखन—अभिप्राय अवगत जाहला, व मशारनिलेचेंही बोलण्यावरून सविस्तर समजण्यात आलें असेल. यांसीं राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव यांची विदा मुहूर्तेकडून बाहेर केली, येविशीं पेशजीं लिहिलेंच आहे. सांप्रत, उभयतां स्वार होऊन आले आहेत. त्यास, कित्येक सलाह मसलतीचे प्रकार उभयतांसीं व राजश्री नारायण बाबूराव यांसीं बोलण्यांत आले आहेत. सर्व अर्थ बोलतील, त्याजवरून कळों येतील. रा. छ ११ माहे शाबान. सुशाप्रत विशेष काय लिहिणें ! कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विनंती.

पत्रांक ५४७ श्री. १७२३ माघ वद्य १४

राजश्री नारायण बाबूराव स्वामी गोसावी यांसीः—

विनंती उपरी. राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब यांणीं सनसबा तिसैनांत दरबारखर्चाबाबत तीसहजार रुा तुमचे विद्यमानें दिल्हे. त्यापैकीं सत्राहजार सातशें पन्नास रुा खर्च होऊन, बाकी बाराहजार दोनशें पन्नास रुा शिल्लक राहिली, म्हणोन तुम्हीं इतबारें सरकारांत समजाविलें. तो ऐवज व्यवस्थेनें खर्चावयाचा. सा बा देणें ।। चिंतो वामन कारकून निा दफ्तर याजकडे रुपये १२२५० बाराहजार दोनशें पन्नास देविले असेत. तरी पावते करून,

पावलियाचें कबज घेणें जाणिजे. छ, २७ सवाल सुा इसने मयातैन व अ-लफ. हे विनंति.

बार.

लिा चिंतो वामन. सदरहू वरातेप्रो बाराहजार दोनशें पन्नास रुा चांद-वड भरून पावलों. छ ७ जिल्काद. हस्तें पांडुरंग रामचंद्र ढमढेरे. सुा इसने मयातैन. हस्ताक्षर खुद.

पत्रांक ५४८ श्री १७२३ फाल्गुन वद्य १

पौ फालगुन वद्य ३ इंदुवार प्रात:काळ जाबसुद.

श्रीमंत राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसी:--

विद्यार्थी परशरामभट धर्माधिकारी सां नमस्कार विनंति विज्ञापना ता फालगुन वद्य १ परियंत आपले आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असो. विशेष. काल मंदवारीं दों प्रहरा रात्रीं श्रीमंत तात्यांकडे पत्र सातारियाहून आलें. मार कीं, पेंढारी आजंठ्याचा घांट शुकरवारीं चढला. त्यावरून लोक फार भयाभीत होऊन गेले. ब्राह्मण मंडळी फार गेली. आतां राहतां पौ कुणबी व च्यार घरें ब्राह्मणांचीं आहेत. त्यांस धैर्य पुरत नाहीं. वस्ती फार गेली. याकरितां लोक भयाभीत होऊन, निघावयाची जलदी करीत होते. त्यास, खातरजमा केली कीं, पेंढार घांट चढ्डला अशी पक्की बातमी आली, ह्मणजे सरीसर्वत्र एकदांच निघून जाऊं. याप्रों खातरजमा केली. परंतु लोकांस धैर्य पुरत नाहीं. आपल्याकडील बातमी कांहीं कळत नाहीं. त्यास, शहरांत पक्की बातमी असेलच. त्याप्रों लिहावी. + + + हे विनंति.

पत्रांक ५४९ श्री १७२३ फाल्गुन वद्य १

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री + + जी यांसी प्रति लक्ष्मीबाईचे अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत फाल्गुन वा ३ रविवार पावेतों कायगांवीं सुखरूप असों. विशेष. तुह्मी बयाजी सोनवणी याजबराबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. इकडील वर्तमान तर: कायगांवचे कौलास आज प्रारंभ केला. दुसरें, राजश्री धोंडोपंत गोडबोले तोफखान्याचे सुभा मालेगांवीं होते. त्यांशीं व शामतखां पठाण व गायकवाड व अचवीसिंग वगैरे निा होळकर यांसीं लढाई जाली. धोंडोपंत यांनीं सिकस्त खाल्ली. याजकडील तोफा व पलटणी झाडून कापून काढिलें. जातींनिशीं धोंडोपंत आतेगांव वामळे येथें आहेत. समागमें हजारपांचशें लोक आहेत, असें ह्मणतात. परंतु सत्य मिथ्या न कळे. यांजकडील पळ दीडशें राऊत काल शन-वारीं कायगांवीं मुक्कामास होते. कांहीं उपद्रव जाला नाहीं. आज कूच करून

पुढें गेले. धोंडोपंत पुढें होते. यामुळें पठाण वगैरे यांस कांहीं प्रतिबंध होता. तो मोकळा जाला. हाल्लीं चांदवडाकडे येण्याची आवई बोलतात. घाट चढ-ल्यास ठीक नव्हे. मग श्री काय घडविणें ते घडवील. हाल्लीं बयाजी पाठ-विला आहे. तुह्मा समागमें माणूस अधिक असावें सा पाठविला आहे. बयाजीबरोबर साखर पाठविली आहे. पावेल. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

पत्रांक ५५० श्रीमार्तंड. १७२३ फाल्गुन वद्य ८

जामदारखानापैकीं सुा इसने मयातैन देणें. रघोजी भोसले सेनासाहेबसुभा याजकडून नागपुराहून दसरेयाचे पोशाख सरकारांत सांडणीस्वार घेऊन आले. त्यांस निरोपसमई इनाम साल गुा प्रो साल मजकुरीं असामी २ यास दर ४० प्रों. रखानगी याद कापड आंख ८०.

ऐशीं आंख देणें. छ २२ जिल्काद.

पत्रांक ५५१ श्रीमार्तंड. १७२३ फाल्गुन वद्य ८

पोतापैकीं सुा इसने मयातैन देणें. रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांजक-डून नागपुराहून दसरियाचे पोशाख सरकारांत सांडणीस्वार घेऊन आले. त्यांस, निरोपसमई इनाम साल गुा प्रों साल मजकुरीं आा २ एा रु. २० वीस खा देणें. छ २२ जिल्काद.

पत्रांक ५५२ श्री १७२३

यादी हैबतराव आटोळे धुरंधर समशेरबहादर विज्ञापना ऐसीजे:—

सरकारची सेवा बहुत दिवस सर लष्कर याजबरोबर करीत आलों. सुर-सन इसने मयातैनचे सालीं सरकारांतून सरंजामाची जप्ती केली. याजकरितां विनंती करावयासी कारकून हुजूर पाठविले आहेत. सरंजामाचीं गांवें व खेडीं बहुधामुळें बिलकूल उज्याड जालीं. सबब, सरदारी फार वोढींत आली. त्यास, स्वामींनीं कृपाळू होऊन, शेवाचाकरी घेऊन, सरंजामाचे मोकळिकीविशीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत.

पत्रांक ५५३ श्री १७२३ माघ वद्य ११

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारायण बाबूराव स्वामी गो यांसी:—

पो अमृतराव रघुनाथ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल लिहीत जाणें. विशेष. राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांजकडे इकडील लाख रुपयांचे वरातेपैकीं तीस हजार रुपये राहिले आहेत. त्यास, सेनासाहेब-

सुभा यांचे कारभारी पुण्यास आले असेत. तरी, सदर्हू ऐवज राजश्री विठ्ठल बल्लाळ याचे हवालीं करणें. ऐवजास बहुत दिवस जाहले. येथें खर्चाची वोढ आहे. याजकरतां ऐवजाचा उलगडा लौकर पाडून देणें. जाणिजे. छ २४ शवाल सुा इसने मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक ५५४ श्री. १७२४ चैत्र शुद्ध १३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधरपंत तात्या स्वामीचे सेवेसीः—

पो रामचंद्र रावजी सां नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम ताा चैत्र शुा १३ जाणून स्वकीय लिा. विशेष. नथू हलकारा लष्करांतून आला. बेलापुरावर दोनचार मुकाम आहेत. पुंतांबें उज्याड आहे. परंतु चवकी होळकरानें पाठविली कीं, भलताच न लुटी. मग तेच काय करतील तें करोत. बेलापूर उज्याड. परंतु त्यांजला भक्षावयास मिळतें. घरें खाणावीं. दाणा, कडबा लागतो तो नेतात. मनस्वी धामधूम करितात. तें पत्रीं लिहितां पुर्वत नाहीं. घर उकलून जाळितात. बेलापुराहून पुंतांबियासहि दोनचार मुकाम होणार, म्हणून बोलतात. ऐसें नथू मारानें जबानीं सांगितलें. खासास्वारी होळकराची बेलापुरास आली. परंतु तोफखाना राहुरीवरच आहे. मुकाम फार ऐकून येथील गरीबगुरीब भयाभीत जाले. बायकामुलें बाहेर आजच लाविलीं. परंतु फार भितात. उद्यां परवां गांव बेचिराख होईल, असें दिसतें. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञप्ति. इत्यादि.

पत्रांक ५५५ श्री. १७२४ चैत्र शुद्ध १३

पौ चैत्र वद्य १ सोमवार.

बो राजश्री ब्रह्मभट यांसीं:—

प्रति लक्ष्मीनारायण दीक्षित नमस्कार विनंति येथील क्षेम ताा चैत्र शुा १३ पावेतों मुा पुणें येथें सुखरूप असों. विशेष. मी आल्या ताा तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर वरचेबर लिहून सविस्तर कळवीत असावें. यानंतर कायगांवचें वर्तमान लुटल्याचें आइकिलें होतें. परंतु येथें आल्यावर पक्की बातमी समजली कीं, सर्व क्षेम आहेत. कांहींएक उपद्रव देखील जाला नाहीं. तुम्ही स्वस्थ असावें+++हे विनंति.

पत्रांक ५५६

पो छ ६ मोहरम शके १७२४ श्री. १७२४ चैत्र वद्य ८

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती उपरी गोसावी यांनीं खासदस्तुरपत्र पाठविलें तें पावोन

सर्ता[प] जाहला. राजश्री नारायण बाबूराव यांसीं व उभयतांसीं बोलणीं जाहला. याचा मजकूर मशारनिलेनीं लिहिला असेल. सांप्रत समक्षता व्हावयाचा विचार जो दूरंदेशीनें ठहरला तो त्रिवर्ग लिहितील. त्याप्रों परस्परें मनांत वागावा, यांत बहुत चांगलें आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. व त्रिवर्गांचे लिहिल्यावरूनहि येविशींचे सर्व भाव समजण्यांत आले. त्यांस, आपण इकडेस अंतःकरणापासून लोभ ममता ठेऊन आहेत, हें समजोन खातरजमा पहिली होती ती अधिकोत्तर जाहाली आहे. येथीलहि निःसीम भाव जातीशीं खचित आहे. हा प्रकार उभयतांनीं बोलण्यांत आणलाच आहे. तेव्हां याचा तपशील पत्रांत ल्याहवा, ऐसें नाहीं. जो बेत उभयतांनीं आपणांसीं केला आहे तो दूरंदेशीचे मार्गें फारच चांगला पोख्त आहे. तोच खचित असे. यांत येथून कदापि दुसरें व्हावयाचें नाहीं. जो बेत होईल त्याप्रोंच तेथून घडल्यास तैशा सारिखे इकडून घडेल व जैसा इशारा येऊन पोहोंचेल तदनुसार अंमलांत येईल, हे खातरजमा पुर्ती असावी. एतद्विषयींचा मजकूर उभयतांस व राजश्री नारायण बाबूराव यांसीं लिहिण्यांत आला आहे. बोलतील त्याजवरून कळों येईल. रा छ २२ माहे जिल्हेज. सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें ? कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विनंति. मोर्तबसुद.*

पत्रांक ५५७ श्री. १७२४ चैत्र वद्य १०

पो मिती चैत्र वद्य १२ गुरुवार.

सहस्रायु चिरंजीव लक्ष्मीनारायण दीक्षित यांप्रति गोविंद दीक्षित आशीर्वाद उपरी येथील क्षेम चैत्र वद्य १० तिसरा प्रहर जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. तुह्मीं दोन पत्रें पाठविलीं. तें एक दोंप्रहरीं व एक तिसरे प्रहरीं पावोन वर्तमान कळों आलें. लष्करचे गडबडीमुळें लोक भयाभीत जाले, म्हणोन विस्तारें करून लिहिलें. त्यांस राजश्री आबाजी महादेव व चिंतो विठ्ठल या उभयतांस मल्हारपंताहातीं आमचें नांवें पत्रें लिहणें. त्यांत मजकूर कीं, आपले सैन्याचा रोख तिरस्थळीवर यावयाचा आहे, म्हणोन येथील ब्राह्मण सर्व भयाभीत जाले आहेत, त्यास आपलें अभयपत्र आलियास लोक निश्चिंत राहतील. याप्रों पत्रें देऊन माणसें लष्करास पाठवावीं. तेथील उत्तर आश्वासनाचें आलें तरी उत्तमच जालें. नाहींतर, तुम्हीं इकडे यावयाचें करावें. वो बाळकृष्णभट हालीं टोकियांत आहे. त्यांजला वो नारायण जोशी यांजला भेटावयासीं सांगितलें आहे. तिकडेहि पाठऊन बंदोबस्त जेथवर होईल तेथवर करून घ्यावा. लष्कर नगराहून कूच जाहलियास तिरस्थळीचे दाहावीस ब्राह्मण पुढें पाठविणें. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

---

* हें सर्व पत्र रघुजी भोंसल्याच्या हातचें आहे.

पत्रांक ५५८ श्री. १७२४ वैशाख शुद्ध ६

अपत्य शामरावजीनें चरणावर मस्तक ठेऊन शिरसां नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत वैशाख वद्य ६ मंदवासर मुकाम मोलेगांव जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलीं आसीर्वादपत्र श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजश्री नाना दीक्षित कायगांवकर यांचे माणसांसमागमें पाठविलें तें पाऊन मार कळला. लिहिलें कीं फौजेचें वर्तमान दिनचर्येचें सविस्तर लिा पाठवणें. ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास, श्रीमंत राजश्री येशवंतराव होळकर हे आमळनेर नजीक बाहादुरपुरें येथें आहे. जाण्याचा इरादा दक्षणेस नालेगांव चांदवड इकडे यावें, व एक बोलावा कीं बऱ्हाणपुराकडेस जावें. राजश्री माणे व गणपतराव हे येरंडोल वगैरे येथील खंडणी घेऊन पाऱ्होळ्यास आले. तेथें रोखा तिनिलक्षांचा केला. तेव्हां पाऱ्होळकर लढाईस सिद्ध जाला. एक लढाई चांगली किल्यासीं जाली. माणे मागें फिरोन मुकाम ह्मसवे येथें आले. मग तह पडला. नंतर पाऱ्होळकर हे माण्याचे लष्करांत मेजवानीस गेले. वस्त्रें घेऊन आले. दुसरे दिवशीं माणें यांसीं किल्यांत मेजवानीस बोलाविलें. सैंपाक सिध करून बोलाऊं पाठविलें. तेव्हां माणे यांचें ह्मणणें पडलें कीं, दोनहजार सरंजामानिशीं किल्यांत येऊं तेव्हां पाऱ्होळकर यांचे चित्तास आलें नाहीं. पंचवीसा स्वारांनशीं मात्र यावें. तें माण्यांनीं कबूल केलें नाहीं. मग......मेजवाणीचा सरंजाम माणे याजकडेस पाठविला. तो माणे यांणीं माघारा दिल्हा. तों पाऱ्होळेकर यांनीं शेला पागोटें घेतलें होतें, तें माघारें पाठऊन दिल्हें. मग तीं माणे यांणीं तीनलक्षांचा (रोखा) केला. यांणीं उत्तर सांगून पाठविलें कीं, दारूगोळा मात्र आहे. पैकाःतर मिळणें कठीण. असें बोलणें मात्र होऊन, माणे मुकाम करून आहेत. येशवंतराव पाऱ्होळ्यास माणे यांचे कुमकीस येणार. किल्यांत पाणी नाहीं, इतक्यांणीं मात्र जेर आहे. पुढें काय होईल तें पाहावें. येशवंतराव याजकडेस गेला होता. त्याची भेटी घेऊन दरकूच ललिंगास आला. वाडी लुटली व माडीही घेतली. तेव्हां किल्लेदार तीस हजार रुपये द्यावयास सिद्ध. हें पठाणाचे मनास न आलें. लक्ष रुपये द्यावे आणि किल्ला खालीं करून द्यावा, याप्रमाणें बोलणें पडलें आहे. अद्यापि कांहीं ठरावांत आलें नाहीं. ललिंगाचा गुंता उरकला ह्मणजे पठाणांनीं मालेगांवास यावें, अशी बोलवा आहे. रोखा चौलक्षांचा केला आहे. माण्य जाल्यास उत्तम......

पत्रांक ५५९ श्रीम्हाळसाकांत. १७२४ वैशाख शुद्ध १०

०:—:०
श्रीशाहुछत्रपतिअखिल
प्रौढप्रतापपुंरदर ।
आनंदराव गायकवाड सेना
खासखेल समशेर बाहादर॥

तैनात जाबता सिलेदार जदीद एकांडे कारकून कृष्णाजी अनंत आा
१ तैनात दरमाही नक्की शिरस्ता. सुा इसने मयातैन व अलफ. रुा
६०० जातीस.
१०० शार्गिद पेशा बाा

७००

एकूण असामी एक. यास तैनात दरमाही नक्की सिा रुा सातसें करार केले असेत. पौ नाणेंबटा वगैरे व दरबार खर्च वजा होऊन, बाकी तैनातीचें शाईचे मार्गे पावलें. चाकरी इमानी इतबारें करावी. हजिरीस घोडे तीनशावर किंमतीचे लागेल. लढाईत घोडे निशाण पुढें पडित जाहाल्यास दाखला पाहून किंमत पांचाचे मतें ठरेल ती दिल्ही जाईल. लुटींत नगारा, निशाण, नौबत, ढाल, पालखी, व हत्ती, खजीना व तोफा सांपडेल ते सरकारांत दाखल करावी. चाकरीची तेरीख छ ८ साबान सन मार पासून चालू असे. जाणिजे छ ९ माहे साबान. मोर्तबसुद.

पत्रांक ५६० श्री १७२४ वैशाख शुद्ध १०

सहस्त्रायु चिरंजीव राा शामराव नाना यांसीं गणेश शिवराम आशीर्वाद उपरी येथील कुशल ताा वैशाख वाा १० मुाा केाा नेवासें येथें यथास्थित असों. विशेष. तुम्हीं श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राा नाना दीक्षित कायगांवकर यांचे मानसा समागमें शेनवारचें पत्रें पाठविलीं ते मंगळवारीं साहा घटका रात्रीस पावलीं. मार अलाहिदा तुमचें पत्र आमचें नांवें होतें, त्याजसुधां सविस्तर समजला. ईश्वरें मोठें अरिष्ट आणिलें. प्राण वांचणें कठीण जालें. याजकरितां तुम्हीं इकडील सला न पाहतां सर्व मंडळी निघालां, हें बहुत चांगलें केलें. येथें येऊन पोंहोचावें. मग पुढें श्री जसें घडवील तसें घडवो.

तेथील बंदोबस्त करून लौकर निघोन यावें. लोभ कीजे. रा। मिती वैशाख वा। ९ मंगळवार प्रथम साहा घटका रात्र हे आशीर्वाद.

राजश्री रामचंद्रपंत आपा स्वामीस सां नमस्कार विनंति उपरी चिरंजीव शामराव मंडळीसुधां निघोन येतात, त्या पक्षीं मागें मालेगांवीं आतां तुम्हींच आहां. आणि चिरंजीव असले तर विलग ! वेळ प्रसंगास तुम्हांशिवाय दुसरियाचें धैर्य काय आहे ? मुलें लकरें प्राण वांचून मात्र येतात. परंतु यजमानाकडील वस्तभाव किल्यांत आहे. त्यांची तजवीज अगोदर लिहिल्याप्रों करून माणिकपुजास रवाना करावा. तो माणिकपुजहि जागा बांकी नव्हे जाणून, तेथेंच ठेविलीं. त्यास, हें आपलें माथां मोठें अपयश आहे. बरें वाईट जाल्यास तोंड दाखवावयास जागा नाहीं. याजकरितां आतां तुमचे प्राण वस्तभाव जवळ आहे. कळेल तसें संरक्षण करून, आह्मांस वर्तमान कळवीत जावें. लोभ कीजे. हे विनंती.

पत्रांक ५६१ श्री. १७२४ वैशाख वद्य १

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नानाजी स्वामीचे सेवेसीं:—

विद्यार्थि गणेश शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। वैशाख वा। १ आपलें कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. यानंतर पत्रीं आज्ञा कीं, रा। येशवंतराव होळकर यांची बातमी थाळनेरास दाखल जाल्याची ऐकिली होती. पुनां माघारें गेल्याचें ऐकतों. येविशीं सत्यमिथ्या खचित वर्तमान आणवावयाकरितां मालेगांवीं माणूस पाठवित असों. त्यास, तुमचें पत्र पाठऊन देणें म्हणून आज्ञा. त्यास, मालेगांवीं माझे कनिष्ट बंधू चिरंजीव शामरावजी आहेत. त्यांस पत्र लिहून पा। आहे. हें मनन होऊन रवानगीची आज्ञा व्हावी. म्हणजे तेथून सविस्तर बातमी येईल. लखोट्यावर शामराव शिवराम म्हणून लि। द्यावें. आणि माणसास सांगावें, गणपतराव मोकाशी यांचे घर पुसावें ह्मणजे गुंता पडणार नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ५६२ श्री. १७२४ वैशाख वद्य १

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नानाजी दीक्षित स्वामीचे सेवेसीं:—

विद्यार्थि गणेश शिवराम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. आपण पत्र पा। तें पावलें. मालेगांवींहून तुमचें येथें पत्रें आलीं. त्यांत येशवंतराव होळकर यांचे लष्कराची बातमी काय आली ते लिहावी, म्हणोन आज्ञा. ऐशास, मालेगांवाहून श्रीमंत राजश्री गोपाळरावबापा यांचीं पत्रें परवां आलीं. त्यांत

मार येशवंतराव होळकर थाळनेरास आहेत. पंचवीस हजार फौज व पेंढार वगैरे चाळीस हजार परियंत जमाव आहे. काशीराव होळकर येशवंतराव याजपासून निघोन सेंदव्याचे किल्यांत गेले. ते तोफा फिराऊन किल्याचा बंदोबस्त करून आहेत. काशीराव आपलेपासून निघून गेल्यामुळें, येशवंतराव यांस अविश्वास होऊन, खानदेशांत माने यांज समागमें काशीराव यांजकडील आचंबेसिंग व गणपतराव नारायण दिवाण होते, त्यांस माने यांजला येशवंतराव यांणीं लिहून कायद करविलें, आणि माने अंमळनेरचे सुमारें होते व शहामतखान पठाण माचलपुरावर होता, त्यांजला निकडीनें आपले जवळ बोलाऊन नेलें. झाडून जमावसुधां येशवंतराव थाळनेरावर आहेत. एक रोख दक्षिणेवर यावयाचा व एक बेत बराणपुराकडे जावें. असे दोन बेत आहेत. बातमीस माणसें गेलीं आहेत. पुढें वर्तमान येईल तसें लिहू. या अन्वयें मालेगांवचे पत्रांत मार आहेत. स्वामीस कळावें. पुढें समजल्यासारखें विनंति लिहिल्यास, आज्ञेप्रमाणें आळस करणार नाहीं. आपण मालेगांवीं माणूस पाठविलें आहे, तें आज यावेंसें आहे. त्यांस, आलें ह्मणजे अलीकडील तिकडे काय वृत्त असेल, तें कळेल. मजलाहि पत्र आलियावर अधिकउणें कळविण्याविशीं आज्ञा असावी. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञाप्ति.

पत्रांक ५६३ श्री. १७२४ वैशाख वद्य १

पुा तीा राजश्री बाबा वडिलांचे सेवेसीं:—

......नाहींतर मालेगांवास पठाणी मोरचे लावावे. याप्रों येशवंतरायाची ताकीद. मोरचे लावले ह्मणजे येशवंतराव याणींहि मालेगांवीं यावें. याप्रों त्याची बातमी खचित. येशवंतराव होळकर याचे लष्करांतून पत्रें येथें कोणकोणास आलें. मालेगांवीं येण्याचा मोठा इरादा आहे. येथेंहि सावधच आहेत. ईश्वर काय घडवील तें पाहावें. परंतु ठीक नाहीं. पठाण येथून लर्लींगास बारा कोसांवर आहे. एका दों रोजांत मालेगांवीं शहा त्यांचा येईल. दुसरें श्रीमंतांणीं हुजरे येशवंतराव याजकडेस पाा होते. त्याजबाा एक हत्ती व पांच घोडे वगैरे नजर श्रीमंतांस, एक कारकून अगोदर देऊन, पाा आहे. काल मुकाम मालेगांवीं होता. हुजरे यांसीं किल्यांत बोलाविलें होतें. त्यांणीं वर्तमान सांगितलें कीं होळकर याची चाल कांहीं ठीक नाहीं. बहुत मुद्दे घातिले आहेत. हे मुद्दे प्रों जाल्यास, मग आह्मी कांहीं ठाणीं घेणार नाहीं व उपद्रवही होणार नाहीं. याप्रों बोलणीं जालीं. उगेच समाधानास्तव हत्ती वगैरे पाठविले आहेत. परंतु त्यांचे ध्यानांत श्रीमंत वगैरे कोणीच नाहीं. याप्रों या प्रांतांत गर्दी आहे. येरंडोल भडगांव येथें खंडणी माणे याणीं घेतली असतां पुन्हां येशवंतराव यांणीं रोखे केले. तेव्हां निरुपाय जाणून येरंडोल भडगांव उज्याड जालीं. काशीराव होळकर हे येशवंतराव यांतून फुटून सेंदव्यास

किल्यांत जाऊन बसले आहेत. शिंदे याजकडील फौज गोपाळरावभाऊ बऱ्हाणपुरास अलीकडे एक मजल आले आहेत. सरजेराव वगैरे हेहि बऱ्हाणपुरावर आहेत. मालेगांव वगैरे येथील गुंते उलगडून मग बऱ्हाणपुरास जावें. याप्रों बेत आहेत. मग काय घडेल तें पाहावें. आणिक नवल विशेष ल्याहावयायोग्य नाहीं. जिवाजी येशवंतहि येशवंतराव होळकर यांजपाशींच आहेत. सेंदुर्णी वगैरे महालांत ठाणीं जिवाजीचींच आहेत. कोणी महाल वस्तीस राहिले नाहींत. ऐसें आहे. कळावें. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

पत्रांक ५६४ श्री. १७२४ वैशाख वद्य ४

वो श्रीमंत राजश्री नाना दीक्षित नाना स्वामीचे सेवेसीः—

पो शामराव शिवराम सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता छ १८ मोहोरम पावेतों पेठ मालेगांव यथास्थित असों विशेष. आपण तीा राजश्री गणेश शिवराम यांचें पत्र नेवासियाहून पाठविलें तें पावलें. त्यांत मजकूर कीं, लष्करचें वर्तमान होळकराकडील वगैरे दिनचर्येचें सविस्तर लिहून पाठवावें. त्याजवरून तीर्थस्वरूपजीचे नांवें पत्र लिहून पाठविलें आहे. त्याजवरून आपले ध्यानास येईल. अलाहिदा पत्र र्तीा स लिा आहे. तो लखोटा नेवासियास पावता करावा. बहुत काय लिहिणें ? लोभाची वृद्धी करावी हे विज्ञप्ति.

पत्रांक ५६५ श्री (नकल) १७२४ वैशाख वद्य ७

राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आपणाकडे संस्थान गढेमंडळे रेवाउत्तरतीर याजबाबत ऐवज पेशजीं सरकारांत घ्यावयाचा करार केला आहे. त्यापैकीं, बद्दल देणें, नारायण बाबूराव वैद्य यांचे गुजारतीनें कंठी मोत्यांची एक सालमजकुरीं सरकारांत खरेदी केली. त्याची किंमत रुपये ११९००० एक लक्ष एकोणिस हजार रुा देविले असेत. तर पावते करून पावलियाचें कबज घ्यावें. रा छ २१ मोहरम, सुा इसन्ने मयातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंति. सिका बार.

पत्रांक ५६६ श्रीसांब. १७२४ वैशाख वद्य ९

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री लक्ष्मीनारायण दीक्षित स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी बापू गोखले यांचे अनेक सां नमस्कार विज्ञापना विशेष. ता

वैशाख वैद्य ९ पावेतों आपले आर्शीर्वादेंकरोन श्रीसमीप खुशाल असों. विशेष. आपण पत्र व बर्फी पाटविली ती पोंहचती केली. त्याचें प्रत्योत्तर आणोन आपणाकडे पाठवावें, त्यांस प्रविष्ट केल्यावर दुसरे दिवशीं ज्वर येऊन अस्वस्थ पडलों. त्यावर, पोर्णिमेअनंतर स्नान केलें. आतां शरीर स्वस्थ जालें. त्यास, हालीं जाऊन कागदाचें प्रत्युत्तर पाठविलें आहे. पावेल. अणखी वो चिंतु जोशी कायगांवकर आले होते. त्यांनीं श्रीमंताची भेट बर्कभटद्वारा घेतली. परंतु मोरोपंत गोडबोले यांच्या बंधूची भेट उत्तम झाली होती. याचा विचार काय असेल तो यावरून ध्यानास येईल. तथापि भेटीनंतर श्रीमंत वो हरिहर दीक्षित सातार्‍यास असतात. सांप्रत ते आपल्या भेटीस येणार ह्मणोन सांगितलें. त्याजवरून रा विसोबा नाईक थत्ते यास विचारिलें कीं हरिहर दीक्षित कोणते ? तेव्हां विसोबानाईक यांणीं सांगितलें कीं, श्रीमंत रा वो रामचंद्र दीक्षित तात्या यांचे बंधू. ते बहुत थोर आहेत. पुण्यास त्यांचे येणें बहुत नाहीं. स्नानसंध्या बहुत करतात. सातार्‍यास असतात. याचा विचार काय असेल तो लिहावा. मलाहि पुसलें कीं, त्यांचा संप्रदाय बोलावण्यावांचून यायाचा नाहीं. त्यास, श्रीमंत वो नानाजी यांस लिहून काय विचार असेल तो समजवावायाकर्ता लिहिलें आहे. आणीक चिरंजीवानीं पत्र पाठविलें आहे. त्यास, तेंहि आपल्याकडे पाठविलें आहे. हालीं वर्तमान तरः पुण्याकडील सखाराम घाटग्या नगरास दो चौ दिवसीं येतील. पुण्यांत नाकेबंदी श्रीमंताची बसली. हालीं कारभार श्रीमंतच स्वतां करतात. कळावें. कांहीं दिवसीं विदुराचें पारपत्य होईल. कळावें. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना.

रा बाबा गोळे यांनी याद पाहून अर्धेली मागारी दिल्ही. यादहि मागोन पाठऊन देतों. हे विज्ञापना.*

पत्रांक ५६७ श्री. १७२४ वैशाख वद्य ११

यादी खिजमजगार निा शागिर्दपेशा स्वारी राजश्री पंत प्रधान. सुा इसने मयातैन. कामगारीस येशवंतराव होळकर यांजकडेस जातात. सबब रोदुमाही छ १ सवालचा रुा

५ सकोजी बिऱ्यारा.

६ शिदोजी सावंत.

११

---

* हें सर्व पत्र बापू गोखल्यांच्या हातचें असून बालबोधींत आहे.

११ छ १ जिल्हेजचा रोजमुरा दुमाही.

२२

दोन खिजमतगार येशवंत होळकर यांजकडे कामगिरीस जातात. सबब, रोजमुरे दुमाही दोन एा बेवीस रुपये देणें. (पो) छ २४ मोहरम, वैशाख सन इसने मयातैन. चिठी लिहिणें.

पत्रांक ५६८ श्री १७२४ वैशाख वद्य ११

(फारशी शिक्का आहे.)

ताा मोा मौजे कायेगांव प्रो गांडापूर. सुा इसन्ने मयातैन व अलफ. तुह्मी फौजेचे दहशतीकरितां हवालदील जालांत, म्हणोन राजश्री नारो बल्लाळ यांनीं हुजूर विदित केलें. त्याजवरून कौल सादर केला असे तर, तुह्मीं खातरजमा राखोन मौजे मजकुरीं आबाद राहणें. फौजेचा उपसर्ग तुह्मांकडे कांहीं लागणार नाहीं. रा छ २४ मोहरम. मोर्तबसूद.

पत्रांक ५६९

पौ जेष्ट वद्य १३ श्री १७२४ वैशाख वद्य ११

इकायेक व नारफ अगाह नाना दीक्षित सलामतः—

अजतरक शाहमादखां बहादर बाद बंदगी आंकी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. आपण फौजेचे दहशतीकरितां हावलदिल जालांत, म्हणोन राजश्री नारो बल्लाळ यांनीं सांगितलें. त्याजवरून आपणास पत्र लिहिलें असे. तर, आपण फौजेचा वसवास चित्तांत न आनितां खातरजमा राखोन मौजे कायगांवीं स्थिता करावी. आपणाकडेस कांहीं उपसर्ग लागणार नाहीं. बहुत काय लिा ? रा छ २४ मोहरम हे किताबत.*

पत्रांक ५७० श्री १७२४ वैशाख अखेर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधरपंत तात्या स्वामीचे सेवेसीं:—

सेवक लक्ष्मुमण उमाजी मुा सोलेगांव रामराम विनंती उपरी तुह्मी महादूबराबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. लष्करचें वर्तमान तरः बंगस याचा मुा मौजे काठीपिंपळगांवावर होता, अशी बातमी होती. परंतु, सतेमिथे हें कांहीं पुरतें कळलें नाहीं. दुसरें श्रीमंत येशवंतराव होळकर याचा मुकाम पुनतांब्यावरच आहे. त्याचा रोख वैजापूरचा दिसतो. ऐसें पत्र मेसीभालगांवचें सोलेगांवकरी यांसी आलें. मेसीपासून खंडणी बागसानें रुा

---

* फारशी चौकोनी ढबू पैशा एवढी मोहोर आहे.

तीनसें घेतली. परंतु मोंगलाई गांवचाही धीर......भामगांवास आले. का। सेंदूरवदें हेंही पळतें. ऐसें वर्तमान आहे. आह्मी बुधवारीं कायगांवास जाऊं. आपले गांवचे दरोबस्त गुर्हेगांवाकडे गेलें. आपणास कळावें. इ. इ.

पत्रांक ५७१ श्री. १७२४ वैशाख अखेर

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री दीक्षित बाबा स्वामीचे सेवेसीः—

रमाबाई जाधवराव दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाले. पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास, ऐसें नसावें. सदैव येणाराबरावर पत्रद्वारें आनंदवीत असावें. यानंतर होळकर यांजकडील फवजा बहुत देशीं घांट चढून आल्या, यामुळें बहुत चिंता लागली आहे. कांठीपिंपळगांवावर पठाण यांची फवज आली, ह्मणोन वर्तमान ऐकतों. त्यास, येविशींची बातमी आपल्यास पक्केंपणें असेल. त्यास पठाण कोठें आला आहे, पुढें कोण्हीकडे जाणार, खंडण्या घेतात, किंवा लूटलबाडी करितात, हें सविस्तर वर्तमान लिहून पा। व खासा होळकर यांचे लष्करची बातमी असल्यास तेही ल्याहावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

पत्रांक ५७२ श्री. १७२४ वैशाख

श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नानाजी दीक्षित स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थि गणेश शिवराम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथें आज वर्तमान दाट ऐकण्यांत आहे कीं, येशवंतराव होळकर यांची धुळ्यावर खासा स्वारी आली त्याजवरून आपणास लिा। लें आहे. तरी मालेगांवीं आपला गडी गेला तो कालच याधासा आपलें लिहिण्यांत काल होतें. त्यास, माणूस आलें असल्यास, तेथील काय पत्र आलें असेल, तें पाठवावें. अथवा मालेगांवचें माणूस आलें नसल्यास, आज आलियावर सविस्तर कळविण्यास आज्ञा असावी. येथें आज वर्तमान ऐकतों. येविशींचे आपलें ऐकण्यांत कसें आहे, तेंहि लिा। लें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ५७३ श्री १७२४ वैशाख.

विशेष. राजश्री येशवंतराव होळकर याजकडील फौजा या प्रांतीं येतात. याजमुळें तिरस्थळीं क्षेत्रस्थ ब्राह्मण भयभीत जाले. परंतु सर्व ब्राह्मणांची काळजी आपणासच. याजमुळें येविशींचा बंदोबस्त जालाच आहे. येणेंकरून रा। फत्तेसिंगराव माने व नबाब अमीरुद्दौलाबहादर यांणीं उपसर्ग दिल्हा नाहीं. परंतु अमीरुद्दौला यांचें ठाणें का। बीड किनगांव वगैरे पै। पैठण येथें आहेत. ते तेथून का। सातारेंनजीक औरंगाबाद येथें स्वारासमागमें टाणेदार चिटी

पाली जे, नबाब यांनीं आह्मांस बरात कायगांवसातारे हरदू गांवावर दिल्ही आहे. त्यास, कमरखुलाई वगैरे रुा ६०० देऊन बरातीचे जाबसालास येणें. याप्रों चिठी घेऊन स्वार सातान्यास गेले. त्यांनीं तेथें उपद्रव विशेष दिल्हा. याच अन्वयें चिठी मीा मारीं कायगांवीं आली. क्षेत्रास उपसर्ग होऊं नये, याप्रों आज्ञा निश्चुन आहे. असें उभयतां सरदार यांचेंहि सांगणें पडलें. परंतु या संस्थानाकडे काा सातारे पाा मार व पाा गांडापूर पाा कायगांव व कांठेपिंपळगांव व पो नेमसे पौ मौजे जोलकें ऐसें च्यार गांव सरकारांतून सदावर्तांचें बेगमीस देणें आहे. यास्तव, सदरहू च्यारी गांव व त्र्यस्थळीं क्षेत्रास उपसर्ग हरएकविषयीं देऊं नये. याप्रों माने व अमीरुद्दौला यांस पत्रें असावीं. या अन्वयें सख्त आज्ञा आहेच. परंतु पत्रें असल्यास विशेष बचाव होईल. संस्थानाचा अभिमान सर्वोपरी आपणासच, त्याअर्थी विशेष लिहा-वेसें नाहीं.

पत्रांक ५७४ श्री १७२४ वैशाख.

विशेष. आपण खासा स्वारी, फौजसुद्धां, खानदेश प्रांतीं आल्याचें वर्तमान ऐकून बहुत संतोष जाहला. पुढें राजश्री फत्तेसिंगराव माने वगैरे फौजा या प्रांतीं रवाना जाल्या. जनवार्ता सैन्याचा उपद्रव. याजमुळें तिरस्थळीं क्षेत्रस्थ ब्राह्मणांस भय उत्पन्न जालें. सालगुदस्तां क्षेत्र कायगांव पेंढारी यांनीं लुटलें. त्या भयामुळें अधिक भय प्राप्त जालें! परंतु फत्तेसिंगराव माने क्षेत्र पुणतांबें येथें आले. त्या मुकामीं त्र्यस्थळीं क्षेत्रस्थ ब्राह्मण श्रीफल घेऊन गेले. त्यांनींही अभय दिल्हें जे, आह्मांस येविशींची सुभेदारांची आज्ञा आहे जे, क्षेत्रास उपसर्ग देऊं नये. त्याजवरून सर्वांस संतोष जाला. हालीं नबाबअमी-रुद्दौलाबहादुर फौजेसुद्धां काा नजीक कायगांव गांडापूर येथें आले. त्याज-कडीलही किमपि उपसर्ग क्षेत्रास लागला नाहीं. त्याजवरून माने यांचें सांगणें पडलें त्याप्रों ताकीद आहे, हें सर्वांस अनुभऊन संतोष जाला. तो पत्रीं कोठवर ल्याहावा? पूर्वापार आपले सरदारींत या संस्थानचा अभिमानच आहे. तदनुसार हालीं आपणासही अभिमान आहे, हें दृष्टोत्पत्तीस आलें. या संस्थानाकडे पाा गांडापूर पो कायगांव व काठेपिंपळगांव व कसबें सातारें पाा मार व मौजे जोळकें पाा नेवासें हे चार गांव सदावर्ताबद्दल इनामी आहेत. त्यास, साहा वर्षें या प्रांतीं शिंदे वगैरे फौजा होत्या. त्याचे उपसर्गामुळें एक पैसा नाहीं. सालगुदस्ता शिंदे हिंदुस्थानांत गेल्यापासून कांहीं वस्ती जाली. प्रस्तुत अमीरुद्दौलाबाहादर पो आंबड येथें गेले. त्यांचे मागें ठाणें बिडकी किन-गांवींहून ठाणेदार यांणीं सातारेयास चिठी पाठविली जे, मौजे कायगांव सातारे दोन्ही तनखा दिल्ही आहे, त्यास कमरखुलाई व मसाला ६० देऊन जाबसालास येणें. त्याजवरून अमीरुद्दौला याजकडेही कोणी

पाठविले आहेत. बहुतकरून आपली सख्त ताकीद आहे त्याजवरून निवारण होईल. परंतु वारंवार उपद्रव लागतात, त्याचा विस्तार पत्रीं काय लिहावा ? सा, रा फत्तेसिंगराव माने व अमीरुद्दौला यांस व आणखी पागे व पथके यांस सदरहूप्रों निक्षून ताकीदपत्र असल्यानें ठीक पडेल. पूर्वीपासून या संस्थानाचा अभिमान आपले सरदारींत आहे. त्याप्रों आपण चालविल्यास श्रेयस्कर आहे. एक अभयपत्र तिरस्थळीं क्षेत्रस्थ समस्त ब्राह्मणांस असावें.

पत्रांक ५७५ श्री. १७२४ वैशाख.

विशेष. आपण स्वारीसुद्धां खानदेशांत आलां. पुढें या प्रांतीं फौजसुद्धां येणार हें वर्तमान ऐकिल्यावर बहुत संतोष जाहला. राजश्री फत्तेसिंगराव माने वगैरे फौजासुद्धां पुढें याप्रांतीं रवानगी जाली. जनवार्ता जे, उपद्रव आहे याजमुळें तिरस्थळीं क्षेत्रस्थ ब्राह्मण भयाभीत जाले. परंतु सर्वांचे मनांत कल्पना आली जे, मुख्य ठिकाणाहून क्षेत्रास उपसर्ग होऊं नये, अशी ताकीद असेल. असें जाणून माने यांजकडे तिरस्थळी क्षेत्रस्थ ब्राह्मण श्रीफळ घेऊन गेले. तेथें गेल्यानंतर ब्राह्मणांचा सन्मान करून आपलें नांवें सर्व ब्राह्मणांस अभयपत्र दिल्हें जे, स्वस्थपणें स्नानसंध्यां करून राज्याचें अभीष्टचिंतन करून असावें. त्याजवरून परम समाधान जालें. आणि लौकिकांत ऐकिल्यांत आहे जे, ब्राह्मणांविषयीं बहुत ताकीद भक्तिपुरःसर आहे. त्याप्रों अनुभवहि दृष्टोत्पत्तीस आला. पूर्वापार आपले सरदारींत व संस्थानाविषयीं आस्थाच आहे. तेणेंकरून ईश्वरें सर्वोपरीं फत्तेच केलीं. प्रस्तुत, आपणाकडील फौजाचीहि वर्तणूक पूर्वसांप्रदायानुरूप होईल. येथील संस्थानाकडे पा गांडापूर माहालचे मौजे कायगांव व कांठेपिंपळगांव व जोगळें पो नेवासें असें गांव आहेत. त्यास, पागेपथके यांचा उपसर्ग हरएकविशीं न व्हावा, येविशीं ताकीद आहेच. परंतु याअन्वयें ताकीदपत्र असावें. या तिरस्थळीस, शिंदे या प्रांतीं होते तों पावेतों, बहुत छळणा जाली. हालीं मीरखान पठाण वारीसिंगचे येथें आले. येथें गंगा उतरावयासीं येणार, ऐसें ऐकितों. त्याजवरून तिरस्थळी बहुत भयाभीत जाली. त्यास या क्षेत्राविषयीं मीरखां यांस निक्षुन ताकीदपत्र * असावें.

पत्रांक ५७६ श्री. १७२४ ज्येष्ठ शुद्ध ४

राजश्री नारायण बाबूराव स्वामी गोसावी यांसीः—

विनंति उपरी. तुह्मीं छ २ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. येशवंतराव होळकर याची चाल हिकडे, याप्रों वर्तमान चहूंकडून आहे. येविशींचा वि-

---

* हा मसुदा आहे.

चार करणार स्वामी समर्थ आहेत, ह्मणोन लिहिलें. त्यास, या मजकुराचें रा बाळोजी कुंजर यांजकडून काल पत्र आलें. त्याचें उत्तर सविस्तर लिहून पाठविलें आहे. त्यांत तुह्मांस व रा निंबाजी भास्कर यांस घेऊन विचार करावा. असें लिहिलें आहे. तें तसेंच करतील. दुसरा मजकूर तुह्मीं नाजुक लिहिला व नांवनिशीची याद अलाहिदा पाठविली ती पावली. संगतवार मजकूर चांगला लिहिला तो हुजूरचेहि मनास प्रशस्त वाटला. नांवनिशीं लिहिली त्यांत एकाघे ठिकाणीं एकाधा गुण मिळतो, एकाधा मिळत नाहीं. यांजकरितां आणखी नांवें, बावास व तुह्मांस सुचतील तीं या कामास योग्य अशा माणसांचीं लिहून पाठवणें. जाणिजे. छ ३ सफर. हे विनंती.

पो छ ४ सफर ज्येष्ठ शुद्ध ६ शुक्रवार शके १७२४

पत्रांक ५७७ श्री. १७२४ ज्येष्ठ शुद्ध ११

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नाना दीक्षित स्वामीचे सेवेसीः—

विद्यार्थी धोंडो बाजीराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ ११ माहे सफर पर्यंत यथास्थित असे. विशेष. येथून सडी फौज तयार होऊन पठाण नि॥ होळकर यांचे फौजेवर गेली. यांची त्यांची लढाई जुंपली आहे. श्रीहरी कृपा करून यश येईल तेव्हां खरें. परंतु फौजेस खर्चास पाठविलें पाहिजे. याजकरितां रोजगुदस्तां शिदूजी पा॥ आपणाकडोन येथें आलें होतें, त्याशींहि समक्ष बोललों होतों. त्याणीं आपणास निवेदन केलेंच असेल. आणि विनंतिपत्र लिहिलें आहे. तरी, कांहीं ऐवज पाठऊन द्यावा. एथें ऐवज येऊन दाखल जाहल्यास चिठी लेहून पाठऊं. परंतु, या प्रसंगीं स्वामी महाराजांनीं आनमान केल्यास आपल्यास युक्त दिसणार नाहीं. भरवंसा जाणून विनंतिपत्र लिहिलें आहे. अव्हेर न करितां पांचहजार पर्यंत सरबराई करून पाठवावी व गांडापूरचे वाणीउदमी निघोन कायगांवास आले आहेत. त्यांस ताकीद करून येथें पाठऊन द्यावें. आणि कांहीं दोन खंडीची कणिक व दाहा पंधरा मण तांदूळ व डाळ तुरीची एक खंडी व तुपाच्या जोड्या एक दोन बैलांवर घालून पाठऊन द्यावे. येविशी तिळमात्र आणमान होऊं नये. तेथून सरंजाम न आल्यास कायगांवास येईल. नंतर आपण दोष ठेवितील. जाणून सरंजाम जलद पाठऊन द्यावे. व ऐवजावीशी अनमान न करितां ऐवज हरतरवीज करून पाठऊन द्यावा. या प्रसंगास सरबराई केलियास, तीर्थस्वरूप राजश्री मल्बादादा याजवर बहुत उपकार आहे. शेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ५७८ श्री. १७२४ ज्येष्ठ शुद्ध ११

स्वामींचे सेवेसीं: सेवक धोंडो बाजीराव कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथून फौज लासुरावर पठाणाचे फौजेवर जाऊन लढाई घेतली. तोफा वगैरे इस्तगत जाहल्या. खासा पठाण व मान्या शेंदोनशें लोकांनिशीं लासुरास गेला आहे. गांवचा आसरा करून जीव लपविला. आपले कृपेंकरून प्रहरादोनप्रहरांत तोही इस्तगत होईलसें दिसतें. ईश्वरत्र्यस्थळीचे आशीर्वादें फत्ते जाहली. आपणास कळावें, म्हणोन विनंती लिहिली आहे. आगाऊ ऐवजाविशीं विनंतीपत्र लिहिलें आहे. तरी, या प्रसंगास तूर्त दोन हजार रु॥ पाठऊन द्यावे. येणेंकडून स्वामींचा लौकीक होऊन मलबादादा यांजवर बहुत कृपा केलीशी होईल. आणि उपकाराचा अर्थ बहुत दिवस आठव आहे. वाणीयास ताकीद करून जिन्नस रवाना करून द्यावा. भरंवसा जाणून विनंतिपत्र लिहिलें आहे. तरी, अगत्यरूप ऐवजाची सरबराई करावी. येवेळ अनमान करूं नये. अणमान केलियास तुह्मांस श्रीची शपत असे. शेपत घालून लि॥ म्हणोन रागास न यावें. जरूर जाणून विनंती शेपतपुरस्कर लि॥ आहे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ५७९ श्री. १७२४ ज्येष्ठ शुद्ध १३

वेदमूर्ती राजमान्य राजश्री हरभटबाबा व सखारामबापू स्वामीचे सेवेसी:- विद्यार्थी सखाराम सदाशीव करद्वय जोडून सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता॥ जेष्ट शुद्ध १३ मुकाम लष्कर नजीक पुण्यस्तंब येथें आपले आशीर्वादेंकरून यथास्थित असों. विशेष. आपण कृपा करून आशीर्वादपत्र पा॥ तें पावलें. लिहिला मजकूर कीं, श्रीमंत रा॥ येशवंतराव होळकर यांच्या फौजा घांटाखालीं उतरल्या आहेत. त्यांचे दहशतीनें त्रिस्थळींचे ब्राह्मण भयाभीत जाले. हें ऐकून ब्राह्मणमंडळी येवल्याचे मुकामीं आली. ते समयीं रा॥ बाबांची भेट करून सरदारांचें अभयपत्र दिल्हेंच होतें. हालीं गांडापूर प्रांतीं रा॥ बापू माणे आले. त्यांजला व पागेपथके येतील त्यांजला एक ताकीदपत्र घेऊन पा॥ द्यावें. ऐशियास, आपलें पत्र आलें तें बाबास दाखऊन सकारचीं पत्रें दोन व रा॥ बाबाचें एक एकूण येणेंप्रा॥ सेवेसीं पा॥ आहेत. पावतील. लष्करचा करभार. आणि वर आस्तवस्त फार. आपल्यास उपद्रव लागल्यास बाबास पत्र लिहीत जावें. ते बंदोबस्त करितील. चिंता नाहीं. इ. इ. इ.

पत्रांक ५८० श्री १७२४ ज्येष्ठ शुद्ध १३

वेदमूर्ती राजमान्य राजश्री हरभटबाबा व सखारामभट स्वामीचे सेवेसी:- सेवक रामराव बगाजी कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ ज्येष्ठ शुद्ध १३ मुकाम लष्कर नजीक पुण्यस्तंब जाणोन स्वकीय कुशल

लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. (सर) कारी फौजा गंगातीरीं आल्यामुळें तिरस्थळींचे ब्राह्मण बहुत भयाभीत जाहले आहेत. त्यावरून पत्र पाठऊन, क्षेत्रींचे ब्राह्मणांची खातरजमा करून, फौजेकडील सरदारांकडूनही कोणेविशीं उपसर्ग न लागे, तो अर्थ करावा. म्हणोन विस्तारें लेखन केलें. त्यावरून राजश्री फत्तेसिंगराव माने यांजला पेशजीं सांगून खातरजमाचीं पत्रें दिल्हींच होतीं. हालीं आणखी सांगून सरकारीपत्र व कोणी हरामी यांचे नांवें चिठी असें पाठविले असेत. येथूनही ताकीद करावयाची तितकी करीतच आहोंत. सरकारीपत्र तुमचे क्षेत्राचे नांवें व स्वारप्यादा यांचे नांवें ताकीदपत्र दिल्हें आहे. तें ठेऊन घेऊन, जो कोणी येईल त्याजला दाखऊन, आपले जवळ ठेवींत जावें. उपद्रव लागणार नाहीं. येविशीं रा बाजीकडीलही ताकीद आह्मांस पहिल्यापासून आहे. परंतु आमचें चालेल तेथवर आळस होणार नाहीं. आपलेंही सर्व ध्यानांतच असेल. बहुत काय लिहिणें ! लोभ करावा हे विनंती.

पत्रांक ५८१

पौ जेष्ट वद्य १३   श्री   १७२४ ज्येष्ठ वद्य ११

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नानाजी स्वामींचे सेवेसीं:—

विद्यार्थी नारो बल्लाळ चितळे चरणावर मस्तक ठेवून सां नमस्कार विज्ञापना ता जेष्ट वा ११ मंदवार मुा लष्कर नजीक वैजापूर येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र रा धोंडोपंत याजबा पाठविलें तें पावलें. व जबांनीं मारनिलेनीं सांगितलें त्यावरून वर्तमान कळलें. लष्करचा दंगा बहुत, ह्मणून तिरस्थळीस भय फार जालें. तुमचें खातरजमेचें पत्र आलें म्हणजे आह्मी स्वस्त राहूं ह्मणून आज्ञा. त्यास, आह्मी येथें आपले सेवक आहों. त्यापेक्षां आपणास कोणे गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं. त्यावरून भाईशामतखांसाहेबापाशीं बोलून आपणास एक पत्र व गांवकरी यासीं कौल पठाणाचा पा आहे. पत्रांत आपली फार खातरजमा करून पत्र खांसाहेबांनीं स्वामीस लिा आहे. त्याप्रों स्वामींनीं गांवातून बाहेर कोठें न जावें. मी येथें आहें, तेव्हां खातरजमा असों द्यावी. आपण म्हणतील कीं, कालचें पत्रीं सूचना लिा. त्यास येथें आम्हीं खांसाहेबांशीं पक्की खातरजमा आपलेविशीं करून वचन घेतलें. तेव्हां आमचीहि खातरजमा जाली. त्यावरून धोंडोपंताबरोबर पत्रें पा आहेत. पावतील. व जबानी मारनिल्हे विनंति करितील. त्यावरून कळेल. लष्कर बहुतकरून तिकडे येऊं देणार नाहीं. दाहापांच कोशीं जाणार. जवळ लष्कर आलें ह्मणजे ताकीददार व कारकून गांवास पा. मौजे काठीपिंपळगांवींचा कौल पा,

तो गांवास पा। द्यावा. तेथेंहि ताकीददार पा. दोन रुख लष्करचे आहेत. मग पाहावें. + आपण स्वस्थ असावें, बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पत्रांक ५८२ अलीफ. १७२४ आषाढ शुद्ध १२

साहेब मेहेरबान दोस्तां बापूराव सलामहू.

अजतर्फ सैद जाफरअलीखां बाहादूर बादजसलाम आंकी येथील खैरयत जाणोन तुम्हीं आपली खयरखुषी कलमी करून दिल आराम करीत जावें. दिगर मजकूर. बादमुदत खत पाठविलें तें नेकशायेत पोहोंचून कमालखुषी हांसल जाली. खतांत मजकूर कीं येशवंतराव होळकर यांजकडील फौजा घाट चढोन मीरखां पठाण वगैरे आले म्हणोन वर्तमान ऐकिलें. त्यावरून आपल्यास लिहिलें असे. तरी मीरखां कोठें मुकाम करून आहेत, व जावयाचा रोख कोण्हीकडे आहे, फौज व पेंढार वगैरे जमाव किती असे, म्हणोन लिहिलें. ऐसीयास, खासे होळकर तर नंदुरबार, सुलतानपुरावर आहेत. मीरखां पठाण नागडे वल्हेगांवचे दरम्यान मुकाम आहे. फौजहि आठ दाहा हजार, हिंदुस्थानीं जावयाचे बेत दोन आहेत. एकतर आंबाडाकडे जावें; एक गंगा उतरून पार व्हावें. येणेंप्रों. मग पहावें, कोण्हीकडे जातात. शाहमतखां सिंद्रवर आहेत. नाशिकास खंडचा रोखा आहे. मान्याचें वर्तमान आपणास समजलेच असतील. तुम्हीं आपलें वर्तमान हरवख्त कलमी करीत जावें. रा। छ ११ माहे रबिलाखर. ज्यादासें लि। प्यार मोहबत असो दीजे हे कितावत.

पत्रांक ५८३ श्री. १७२४ आषाढ शुद्ध १४

यादी. नाना पुरंधरे व बाळोजी कुंजर यांजवळ ठरलें तें. सुा सल्लास मयातैन व अलफ, माहे रबिलावल छ १२ रोज बुधवार.

दाहा हजार व पागा मिळोन दरमाहा रुा २५००० यांची हजीरी.

४००० करोल.

६००० आडहत्यारी वगैरे.

१००००

शेरा सरासरी रुा २५ प्रों तसलमात लिहून द्यावे. लोकांत शेरा जो आहे त्याची घालमल होऊं नये. याप्रों बोलणें आहे.

गाडद व तोफखाना वगैरे पुरंधरे यांचे विचारें तोफा ठरतील त्यांत माजीब तोफा पंधरा व पांच हजार गाडद व दोन हजार फौज यांचा बंदोबस्त अलाहिदा गोविंदराव परांजपे यांणीं करावा. त्यांचा दरमाहाचा आकार गोविंदराव यांचे विद्यमानें ठरला आहे त्याप्रों.

हुजूर फौज ठेवावयाची धोंडोबा वगैरे जे ठरले आहेत त्याप्रों राहावें.

सरंजामी जे आहेत व येतील त्यांची रवानगी व्हावी.

१ आंगरे.
१ प्रतिनिधी.
१ मानकरी व सरंजामी पथकें विंचूरकर वगैरे.
१ चिंतामणराव.
१ गोखले.

नानापुरंधरे यांणीं तोफखान्याकडील पानशे वगैरे यांपैकीं जो ठरेल ते बरोबर *न्यावें.

पत्रांक ५८४ श्री. १७२४ आषाढ कृष्ण ४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री येशवंतराव याप्रति--

लक्ष्मीनारायण दीक्षित अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम ता आषाढ कृष्ण चतुर्थी रविवार पावेतों कायगांवीं यथास्थित असे विशेष. बहुत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन कुशल मजकूर समजत नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तरी असें नसावें. सदैव पत्रद्वारें कुशलवृत्तलेखन करून तोषवीत असावें. यानंतर आह्मांकडील वर्तमान तों, या प्रांतीं फौजा आहेत. त्यांचें वर्तमान परस्परें कळेतच असेल. फत्तेसिंग माने यांनीं तिरस्थळीवर हा काळ पावेतों कृपा केली आहे. पुढील न कळे ! मीरखां पठाण दाहा हजार हिंदुस्थानी, शिवाय पेंढार ऐशा जमावानिशीं वारीसिंगवे येथून वीस कोशांवर आहे. गंगा उतरावयास टोंक्यास येणार ऐसी वंदता आहे. त्याजवरून महद्धोर उत्पन्न झाला. श्री लज्या रक्षील ते खरी. असो. परस्परें सदैव पत्रद्वारें कुशलवृत्त कळवीत जावें. आह्मांस मंडूराची जरूर आहे. त्यास, दोन तोळे मंडूर कोणी सोईचा येईल त्याज बरोबर पाठवावा. बहुत काय लिहिणें! लोभ करावा. +++++ हे आशिर्वाद.

पत्रांक ५८५ श्री. १७२४ आषाढ वद्य ६

अज नवाब अमीरतदौला बाहादर ता कमावीसदारान जमीदारान मौजे कायगांव सुा सलास मयातैन व अलफ. स्वारी याप्रांतीं नजीक आली. आपले गांवास उपसर्ग होईल. सबब, अमरसिंग हलकारा पाठविला आहे. हा गांवचा बंदोबस्त आपणास सांगेल त्याप्रों करणें. च्यार स्वार ठेऊन, बाकी स्वारांस रवाना करणें. गांव घाबरें न होय, लोक जनांत आह्मांवर निमित्य न ये, तें करणें. आह्मांस सरकारआज्ञा कीं गंगातीरीचीं गांवें यांसीं

---

* यापुढील बंद गाहाळ आहे.

मुजाहीम न होणें. येविशीं आज्ञा ह्मणोन लिा असे. खातरजमेनें गांवचा बंदोबस्त ठेऊन राहणें. रा छ १९ मोहरावल मोर्तब सुद.

पत्रांक ५८६ श्री. १७२४ आषाढ वैद्य अखेर.

तुह्मी छ २६ रावलचीं विनंतिपत्रें पा तीं पावलीं. रा येशवंतराव होळकर याची तुमची भेट होऊन तुह्मी सरकारचें आज्ञापत्र त्यांस दिल्हें व उत्तरें प्रत्योत्तरें जालीं, तो मजकूर लिा तो समजला. ऐशास येशवंतराव होलकर यांची तुमची भेट जाली व सरकारचें पत्र देऊन बोलणें जालें. उत्तम आहे. तुह्मी आज्ञा घेऊन जाते वेळेस जें बोलणें त्याची आज्ञा समक्ष जालीच आहे. त्या अन्वयें बोलून जसें ठेरेल तसें वरचेवर विनंति लिहून पाठवणें. मजकूर वरचेवर समजत जावा ह्मणोन तुमच्या लिा प्रों डाक बसावयाची आज्ञा जाली आहे. कळावें.

पत्रांक ५८७ हू. १७२४ श्रावण शुद्ध १

भाई नबाब अमीरउद्दौला बाहादर महफुज बाषंद:—

अजिदिल एकलास पाराशर दादाजी व गोपाळराव गोविंद सलाम आंकी, येथील खैरखुषी जाणोन, आपकी खैर हमेशा कलमें करीत असावें. दिगर: आपलेकडील ठाणें कसबें गांडापूर येथें आलें आहे, तेथून क्षेत्र कायगांव येथें स्वार पाठविले आहेत, म्हणोन क्षेत्रींचे ब्राह्मणांचे सरकारांत बोभाट आलें. तेव्हां श्रीमंतांनीं आम्हांस आज्ञा केली. त्याजवरून आपणास लिहिलें आहे. तरी ठाण्यांत कोण असेल त्याजला निक्षूण ताकीद पाठऊन, स्वार पाठविले असतील त्यांस मनाई पाठऊन, एक पैसा खर्च न घेतां, उठऊन न्यावे. व क्षेत्र टोंक व प्रवरासंगम व कायगांव ह्या तीहीं क्षेत्रींचे ब्राह्मण माहान समर्थ यजमान साहेबांचें कल्याणच इच्छून आहेत. त्यांस उपद्रव जाल्यानें कल्याणदायक नाहीं. व यजमानसाहेबांचेंहि सांगणें आपल्यास आहे. त्यापेक्षां आपल्याकडून क्षेत्रास उपद्रव होणार नाहीं. परभारें आपल्यास न समजतां उपसर्ग होईल. तरी क्षेत्रास हरएकविशीं उपद्रव न लागतां रखवाली होय तें करावें. क्षेत्रींचे ब्राह्मण आपल्याकडे येतील. त्यांस अभयपत्र देऊन, ब्राह्मणांचें समाधान व श्रीमंतांच्या मर्जीचा संतोष, व आपले यजमानाच्या कल्याणावरतीच गोष्ट ह्यावी. आपण सुज्ञच आहां. त्यापक्षीं विशेष काय लिहावें ? रा छ २९ रविलावल ज्यादा काय लिहिणें ? प्यार मोहबत असों दीजे. हे किताबत.

पत्रांक ५८८ श्री. १७२४ श्रावण शुद्ध २

श्रीमंत सौभाग्यवती वज्रचुडेमंडित मातुश्री चिटकाबाई बया यांसीं:—

प्रति भास्कर विठ्ठल पटवर्धन सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल

ता। श्रावण शुद्ध २ मंदवार पावेतों मु॥ काळसूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. मान्ये यांचा रोखा कान्हुरावर होऊन वीस हजारांचा खंड जाला. त्याचे वसुलास स्वार आले ते वाड्यांत राहून दंगा बहुत केला आहे. तो पत्रीं कोठवर ल्याहावा ? ऐवजाचा भरणा होत नाहीं. पुढें काय होईल तें तें पाहावें. आपणाकडून सावजी गायकवाड आला. त्याणें आपल्याकडील सविस्तर...प्रसूत होऊन कन्या जाली, पंधरावीस दिवस जाहले, पठाणाचा मुकाम कापशी वडगांववर होता, तेथून स्वार रोखा घेऊन कायगांवीं आले आहेत, म्हणोन सांगितलें. त्याजवर कांहीं समजत नाहीं. यामुळें चिंता बहुत लागली आहे. याजकरितां घमाजी ठवळे मुजरत पा॥ आहे. तरी कायगांवास कांहीं उपद्रव लागला किंवा निवारण जालें, येविशीं सविस्तर लिहून पाठवावें. आपण सध्याकाळीं कोठें आहेत तेंहीं ल्याहावें. खासा होळकर चांडवडास दाखल जाले, व पठाणही पैठणाकडे जाणार, म्हणोन इकडे वर्तमान ऐकण्यांत आहे. मान्ये यांणीं खंडण्या घेतल्या, त्या गांवापासून फिरोन पठाणाच्या खंडण्या होतात किंवा कसें आहे, हें सविस्तर लिहून पाठवावें. यजमान स्वामी उभयतां मुलांमाणसांसुद्धां पुण्यास सुखरूप आहेत. + + + हे विनंती.

पत्रांक ५८९* श्री. १७२४ श्रावण वद्य मध्य ७।८

यादी. रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित कायगांवकर. सु॥ सल्लास मयातैन व अलफ, उर्फ श्रावण वा॥ ५ स मीरखान पठाण नि॥ रा॥ येशवंतराव होळकर याची फौजसुद्धां मु॥ मौजे कायगांवीं आला. तेव्हां गांवांत त्यांणीं दंगा केला. त्याचे पुरवी एक दिवस आह्मीं फौजेचे भयामुळें मुलेंमाणसेंसुद्धां गांवातून निघोन सातारियास गेलों. तेथें राहन्याचा धीर पुरवेणा, ह्मणोन औरंगाबादेस आपल्या वाड्यांत मुलेंमाणसेंसुधां जाऊन राहिलों आणि सुभ्याची भेट घेऊन त्यास वर्तमान सांगितलें. त्यांणीं बहुतप्रकारें आमची खातरजमा केली, तुह्मांस कोणतेहि गोष्टीची तोशिस लागणार नाहीं, तुह्मीं आपले घरांत स्वस्त राहाणें. त्याजवरून आह्मीं घरांत स्वस्त राहिलों. इकडे कायगांवीं पठाणांनीं उपद्रव करून, गरीबगुरीब ब्राह्मण गांवामध्यें सांपडे त्यास धरून, बहुत मारहाण केली. त्यांत च्यार ब्राह्मण मेले. गावच्या

---

* ह्या पत्रांतील खोडाखोडीवरून हें पत्र मसुदा म्हणून लिहिलेलें असावें पुष्कळ ठिकाणीं खोडलेलें असून आजूबाजूनेंहि शोध घातले असल्यामुळें ह्या पत्रास वैश्वदेवांतील बलिहरणाची उपमा देण्यास हरकत वाटत नाहीं. वर पत्रांत ज्या शब्दांवर आंकडे घातले आहेत त्या शब्दांपुढें जे शब्द खोडलेले आहेत ते पुढें दिले आहेत १. पठाणांनीं गांवांत दंगा केला. त्यास. २. बहुत उपद्रव केला. गांवांतील घरें उघडून चीजवस्त उकरून नेऊन घरांस

ब्राह्मणांस[३] व आमच्या मातुश्रीस धरून लश्करांत नेऊर गांवचे मुकामीं घेऊन गेले. गांवची खंडणी पस्तीसहजार रुपये करून व गांवकरी मिळून वसूल देऊं लागले. कांहीं वसूल दिल्हा. बाकी दाहाहजार रुपये राहिले. तेव्हां गांवकरी दोन ब्राह्मण पठाणाकडील दोन प्यादे घेऊन, औरंगाबादेस आम्हांकडे आले. आमची त्यांची गांठ पडली. ब्राह्मण आम्हांस म्हणूं लागले कीं, दाहा हजार रुपये पठाणाचे देणें राहिले आहेत त्यांची तजवीज जाली पाहिजे. आमचे वाडे उभयतांचे लुटले. नंतर मातुश्रीस लष्करांत घेऊन गेले. नंतर पठाण यांणीं विच्यार करून त्यांचीं घरेंहि खानलीं आणि मातोश्रीस आणावयाचें प्रयोजन काय, हें समजून मातुश्रीस सोडून दिल्हें. नंतर आपण कूच करून गेला. मातुश्री गंगेचे कांठीं येऊन बसली. तेव्हां सुर्तवाले याचा वकील पठाणाचे लष्करांत होता. तोहि तेथें आला. मातुश्रीची त्याची वाटेस नेउरगांवीं गांठ पडली. तेव्हां मातुश्री कायगांवास घेऊन आला. मातुश्रीची व सुरतवाल्याकडील वकिलाची नेवरगांवीं गांठ पडली. तेथें वकीलयाणीं तसदी केली कीं, तुम्हांस एकवीस हजार रुपये करार करून सोडविलें असें. तेव्हां मातुश्री बोलिले जे, सोडावयाचें कारण नव्हतें, पठाण समागमें नेते तरी जातें ! तेव्हां तसदी करून मातुश्रीपासून वाटेमध्ये रोखा रुा साडेएकवीस हजारांचा लिहून घेऊन कायगांवास घेऊन आला. तेथेंहि[५] पैक्याकरितां तसदी केली. पैसा निघेना, सा दुसरे दिवशीं शहरास घेऊन जाऊन परभारें पंधरा दिवस अट-

---

खात्या लाविल्या—कांहीं. ३. हें वर्तमान शहरास आलें. बायकामुळें सुद्धां. ४. आणि गांवची खंडणी पस्तीस हजार रुा केली. त्याचा वसूलहि त्यांणीं बहुतकरून घेतला. हजार दोन हजार रुपये बाकी राहिली त्याजवरून आमचे वाडे उभयतांचे लुटले आणि मातुश्रीस लष्करांत घेऊन गेले. ५. तेथेंहि तसदी मातुश्रीस रुा विशीं केली. त्यांनीं उत्तर केलें कीं, मजपाशीं रुा नाहीं. तेव्हां दुसरे दिवशीं मातुश्रीस घेऊन आवरंगाबादेस आला, आणि कोठऱ्यांत कैद करून ठेविली. हें वर्तमान आम्हांस समजल्यानंतर आह्मी छपून राहिलों. सुभ्याकडे जाऊन बोलणें बोलावें, त्यास आम्हांसहि कैद करतील हें मनांत आणून त्यांजकडे गेलों नाहीं. तेव्हां तीवारांनीं त्यांनीं मातुश्रीस सोडून घरास आणून घातल्या त्या संधींत सुभ्यानें पठाणाचें नांव करून सातारियांत वाडे तीन होते ते लुटून गाड्या भरून शहरास आणिल्या. या प्रों वर्तमान असे. हें सर्व ध्यानास आणून आम्हांपासून व मातुश्रीपासून रोखे लिहून घेतले आहेत व सातारे येथील वाड्यांतील चीजवस्त नेली आहे ती माघारी देवावी व सातारियास हरएक विशीं उपद्रव होतो तो होऊं नये असें जाहलें पाहिजे. (शेवटच्या टिपेंतील मजकूर खोडलेला नाहीं. एका बाजूस अलग लिहिला आहे.)

केंत ठेविलें. आम्हांस आश्रय कोणाचाच नाहीं. ज्याचा आश्रय केला तोच आम्हांस मारतो ! असें समजलें म्हणून तेथून निघोन धण्याच्या पायांजवळ आलों. पठाणाचे प्यायां समवेत बसलों आहों, तों इतकियांत सुरतवाले याजकडील पन्नास माणूस येऊन आम्हांवर दगा केला. आम्हीं तोंड चुकविलें. तेव्हां घरांतील बायका नेऊन लष्करांतील बाजारांत बसविल्या. तेव्हां आम्हीं गुलामहुसेन, सुभ्याकडील कारभारी, याजकडे गेलों आणि मजकूर सांगितला. आम्हांस म्हणूं लागला कीं, तुम्हीं सरकारांत पांच हजार रुा देणें व हजार रुा आम्हांस अंतस्थ देणें, एकूण सा हजार रुा देणें, म्हणजे तुमची मुलेंलेंकरें व चीजवस्त जी गेली असेल ती आणून देतों. त्याजवरून आम्हीं कबूल करून सा हजारांची चिठी बशर्त मुलेंलेंकरें व चीजवस्त आणून दिल्हा तर आम्हीं देऊं, म्हणोन लिहून दिल्ही. नंतर बायका बसल्या होत्या त्या सुटोन घरास आल्या. पठाणाचे दोन प्यादे आले होते. त्यांणीं दोघां ब्राह्मणास घेऊन कायगांवीं गेले. च्यार ब्राह्मण व आमची मातुश्री यांस आणि आमचे दोनी वाडे लुटून खणून चीजबस्त घरांतील घेऊन गेले.

पत्रांक ५९० श्री. १७२४ श्रावण शुद्ध १३

श्रीमंत राजश्री जनार्दनपंत दादा स्वामींचे सेवेसीः—

सेवक शिवराम कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल श्रावण शुध त्रयोदशींपर्यंत आपल्या कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस जाले, पत्रीं परामर्ष न जाला. सेवक पदरींचा, सांभाळ करावा. आपणास विदित असे. यानंतर आपणाकडे जोडी गोवर्धन यांजकडील आली. त्याबरोबर माझें पत्र चिरंजीव चिटकोपंतास पा होतें. त्यांत चिठी आहे. ऐशियास, तें पत्र पुणेंस पोचोन प्रत्योत्तर आपणापाशीं येईल तें करावें. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ असों दीजे हे विनंति.

हो राजश्री दादोपंत स्वामींचे सेवेसी. सां नमस्कार. लोभास अंतर न होय, तें करावें. लोभ कीजे हे विनंति.

पत्रांक ५९१ श्री म्हाळसाकांत. (नकल.) १७२४ श्रावण शुद्ध १३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो येशवंतराव होळकर दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. खानदेशप्रांतीं खासा स्वारी आल्यावर, पुढें राजश्री फत्तेसिंगराव माने वगैरे फौजा याप्रांतीं रवाना जा-

ल्या. जनवार्ता सैन्याचा उपद्रव ! यामुळें कायगांव, टोंकें, प्रवरासंगम तिरस्थळी क्षेत्रांची जागां ब्राम्हणांस भय उत्पन्न जालें. सालगुा क्षेत्र कायगांव पेंढारी यांनीं लुटलें. त्यामुळें भय अधिक उत्पन्न जालें. त्यावरून क्षेत्रस्थ ब्राम्हण श्रीफल घेऊन मान्याच्या भेटीस पुण्यस्तंभीं गेले. त्यांनींहि अभय दिल्हें जे, आम्हांस येविशीं सुभेदार साहेबांची आज्ञा आहे जे, क्षेत्रास उपसर्ग देऊं नये. त्यावरून सर्वांस संतोष जाला. हाली राजश्री नबाब अमीरउद्दौले फौजेसुद्धां कसबे गांडापूर येथें आले. आंबडाकडे स्वारी जाणार. त्यांजकडील उपसर्ग क्षेत्रास किमपि लागला नाहीं. माने थांणीं खातरी केली, त्याप्रों अनुभवास सर्वांच्या आलें. पूर्वापार कैलासवासी थोरले सुभेदारांपासून या स्थळाचा अभिमान आहेच. त्याप्रमाणें सांभाळ करालच. आम्हांकडील गांडापूर परगण्यांतील तीन गांव व नेवास परगण्यांतील एक गांव, ऐा च्यार गांव आहेत. आज पांचसाहा वर्षें पायमालीनें खराब जालीं. त्यांस, त्यांचें व तिरस्थळींचें संरक्षण घडावें, याकरितां नबाबास पत्र दिल्हें पाहिजे, म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास, तुम्हांकडील लक्ष्मण उमाजी यांजबरोबर राजश्री अमीरुद्दौले यांजला पत्र पाठविलें आहे. हें त्यांजकडे पावतें करावें. गांवांस उपद्रव देणार नाहींत. सर्वदा पत्र पाठवन संतोषवीत जावें. रा छ ११ रबिलाखर, सुा सलास मयातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. मोर्तबसुद. सिक्का.

पत्रांक ५९२ श्री (नकल.) १७२४ श्रावण शुध १३.

राजश्री केसो गंगाधर साठे गोसावी यांसीं:—

सुा सलास मयातैन व अलफ. राजश्री येशवंतराव होळकर याची नजर सरकारावर वांकडी दिसोन, मान्येपठाण वगैरे फौजा जांबगांव पावेतों आल्या. सरकारांतूनही होळकर यांचे मनांतील वांकडेपणा समजोन फौजा तोंडावर पाठवावयाची तजवीज करून, पुरंधरे व पानसे बाहेर काहाडले. दहापंधरा हजार फौज व पांचसात हजार माणूस पायचें जमा करून, मानेपठाण यांस तंबी पोंचावी हा विचार केला आहे. पांडवगडचे मसलती......ध गेला आहां तर जेथपर्यंत जवळ......(फौजे) निशीं देखत चिठी गारदवंड येथें जाणें आणि लिहून पाठवणें. या कामास हुजुरून रा बापू विठ्ठल व हुजरे आा २ पों आहेत. तरी विलंब न करणें. आरब माणूस शिपाईगिरीस चांगलें. होळकराची फौजकही, तेथें, योजना तशांचीच जाहली पाहिजे. तरी, लौकर जाणें. पांडवगडचा शह सुटल्यास चिंता नाहीं. किल्याचा कद फारसा नाहीं. रा वेंकटराव दंवडेस पोंचोन, रा बाळाजी रामचंद्र व लक्ष्मण महादेव व खंडो धोंडदेव यांजपाशीं हजीरी देऊन, याचे गणतीचें पत्र हुजुर पाठऊन देणें. जाणिजे. छ. ११ रा खर.

पत्रांक ५९३ श्री १७२४ श्रावण.

लक्ष्मी नारायण दीक्षित.

हरतर्फ एखलास चांदसाहेब दुवा आंकी. तुम्ही खत पाठविलें तें पावलें. गांडापुरीं ठाणें घेऊन आलां, म्हणोन ऐकिल्यावरून बहुत खुषी जाली. तुम्हीं आहां यांजवरून गांवास खातरजमा जाली. तुमचे भरवशियावर आहों. गांवची काळजी तुम्हांसच आहे. जानवी जोड १ पाठविला आहे. स्वार आा ५ माघारे पाले आहेत. काळे ढालाईत येथें ठेऊन घेतले. स्वारास तुमचें लिो प्रों दाणा व पोटास सिदा दिल्हा. मीरखां पठाण कोणीकडे जाणार हें ल्याहावें. कायगांवची सर्वोपरीं तुम्हांस काळजी आहे. ज्यादा काय लिहिणें ? सिद्दोजी पाठविले आहेत. जबानीं सांगतां कळेल. हे कितावत.

पत्रांक ५९४ श्री. (नकल.) १७२४ भाद्रपद

यादी श्रीमंतांस विनंति करावयाची निरउपाय जाणोन. १ येथें आजपर्यंत आमचें राहणें श्रीमंताचे प्रतापेंकरून बहुत दिवस. त्या लौकिकाप्रमाणें वागणें प्राप्त. त्याकाळीं आम्हांसही येथें फारसा खर्च लागत नव्हता. याचें कारण काय म्हणाल तर, आम्हीं येथें सडेच राहणार. त्याजमुळें व काम पडल्यास कोठेंहि दहापांच हजार उसने मिळत होते. ते सांप्रत हिकडे पेंढारी वगैरे ह्यांचा दंगा व राजकीय ही कित्येक उपद्रव, याजमुळें कांहीं खराबी व ज्यापासीं असेल तोही छपून वागतो. अशी अवस्था. याजमुळें हजार पांचशांचा मोबदला होऊं सकत नाहीं. सांप्रतकाळीं काशीयात्रेचाही मार्ग हाच पडला. चार देशांतील ओळखी भेटतात त्यासंबंधें यात्रा जातां येतां आगतस्वागत मिळून तीन हजार रुपये खर्च लागतो. व लग्नकार्याचे दिवस आले असतां, येथील सरकारी व संभावित स्नेही ग्रहस्त मंडळीच्या येथें कार्यें जाहालीं असतां अहेर करणें प्राप्त. परत अहेर करण्याचा सांप्रदाय नाहीं. तेव्हां त्यासंबंधी दोन हजार रुपये खर्च लागतो. याजकडून पंधरा हजार रुपये मिळतात. परंतु ओढीमुळें चार सहा महिने हातास येत नाहीं. त्याजपुरती घरबेगमी घोडी सिबंधी वगैरे व भोंसले यास मेजवान्या भोजनखर्च वगैरे मिळून, त्यांत कांहीं न रहातां, तीन चार हजारपर्यंत अधिकच लागतात. शिवाय, आला गेला याचा उपद्रव. याजमुळें दिवसेंदिवस खर्च अधिक वाढला, हें ध्यानांत यावें, म्हणोन तपाशिलें लिहिलें आहे. सरकारची गांवखेडीं सरंजामास आहेत. तेथील ऐवज तुम्हांस व खंडोपंतास पुरत नाहीं. याजमुळें तेथून हुंड्या करितात तें वेगळें. याचे साक्ष तुम्हींच आहां.

देशापेक्षां हिकडे सवंगाई, व नारायणराव आमचे तेथें रोजगारी सरकांतून आहेत, असें म्हणून जांवई व मामा, मावसबंधु आप्तविषई, चार इष्ट-

मित्र, भिक्षुकब्राम्हण बहुतां दिवसांचे आश्रित तेथें आले आहेत. तेव्हां इतक्यांचा निरवाह करणें प्राप्त. व आपला विषय तो असा आहे !

मी पुण्यांत असतां, कोणीएक सावकारास काम पडलें. तेव्हां, श्रीमंतांनीं त्याचा आब न जावा, याकरितां रात्रीस दोन लाख रुपये दिल्हे. दुसरे दिवशीं त्या गोष्टी निघाल्या. तेव्हां आज्ञा जाहली कीं, जो माझा आहे तो समक्ष असतां त्याचे जसें चालवावयाचें तसें चालत आहे. परंतु तो दूर देशीं असतां व त्यास संकट पडलें असें मजला समजलें असतां, असेल तेथपर्यंत अशाची उपेक्षा करणार नाहीं. त्या गोष्टीची आठवण मजला वारंवार होते. व तेथेंही स्मरण व्हावें म्हणोन ही गोष्ट लिहिली आहे. सावकार कोणता तें ध्यानांत येईलच. सांप्रत तसा प्रसंग प्राप्त जाहला आहे. तो कसा म्हणाल तर, काशीयात्रेचें देणें तसेंच आहे. व नित्यनैमित्य ज्या काळीं जें प्राप्त होतें त्याप्रमाणें खर्च करून आला दिवस लौकिकाप्रों कंठावा लागतो. येथील जन्मापासून स्थाई परस्परे सोयरेधायरे त्यांस देखील कर्जवाम मिळत नाहीं. तेव्हां आह्मी परकीय आह्मांस कर्जवाम कसा मिळेल ? तेव्हां हाही उपाय राहिला. भोंसले यांस तो दैन्य दाखवावयाचें नाहीं. येथील चार इष्टमैत्र म्हणावे तरी, दरबारीयांचें घराऊ सुख दुःख सांगावें, असें नाहीं. अशा चहूंकडोन अडचणी जाणोन याची तोड मनांत आणिली कीं, श्रीमंत सर्वज्ञ, धणी, वडील, आम्ही अज्ञान, त्यांचीं लेंकरें, तेव्हां तेच संकटांतून पार पाडतील. असें समजून, पंचवीस हजार रुपये खासगीकडून कर्ज घ्यावे आणि त्याच्या हुंड्या तुम्हीं तेथून करून पाठवाव्या. याची फेडीविषई जशी आज्ञा येईल तसें करावयास येईल. त्याप्रों कांहीं काशिस पाठवीन. म्हणजे उसार खावयास जागा होईल. आजपर्यंत सालाबाद बारा महिन्याचे बेगमीप्रों दोन महिन्यांची बेगमी शपतपुरस्कर नाहीं. तेथून असा उपराळा जाहला असतां उपयोग होईल. माझी उपेक्षा समक्ष होणार नाहीं. मग परकी स्थळीं असतां कशी होईल ! हा भरवंसा जाणोन लिहिलें आहे. परंतु तुह्मांकडून पत्रें दाखविण्यास व विनंती करावयास आळस जाहल्यास उपाय नाहीं. तेथें विनंती केल्यावर जशी आज्ञा होईल तसें करावें.

खर्च वाढला असे. कालदेशवर्तमान पाहून, कर्जास भेऊन, बंधू वेगळे निघावें अशा बेतांत आहेत. वेगळे जहाल्यास निर्वाह कसा करावा, हाही अंदेशा वागवून आहेत. मग पाहावें. आमची सोय सरकारांतून काढावयाची कल्पना कोणती म्हणाल तर, पंचवीस तीस घोडीं घरचीं आहेत. व आणखी पंचवीस घोडीं घरचीं करून, पंनास घोड्यांची पागा व त्यास हरकोठें बेगमी पुरते चार गांव वराडांत वगैरे लावून दिल्यास, बंधू हुजूर राहून चाकरी करितील. येणेंकरून त्याची सोय निघाली. वहिवाटयास पडलेसें होतील. येविशीं

त्यांची इच्छा बहुत आहे जे, नांव लौकिक करावा. आण मीही घोड्या माणसांचे खर्चांतून मोकळा होईन. मग वडिलांची मर्जी असेल तसा निर्वाह करोत.

१ पेशजीचा संग्रह काय आहे, तोही तुम्हांस माहीत आहे. त्याजवर साल गुदस्ता चिरंजीव बंधूचें लग्न केलें. त्याचें कारण, आम्ही उभयतां बंधूंपैकीं पुत्रसंतती एकासही नाहीं. चार उपाय करणें ते केले. तसा हाही उपाय सर्वानुमतें करावा असें जाहालें. सबब, त्यासही नांव लौकिकाप्रमाणें वस्तवानी वगैरे खर्च केला पाहिजे. हात तर कोठें चालेना. सबब, मातुश्री व भावजई वगैरे बायकांची वस्तभाव घेऊन नवरेमुलीची भरती मात्र केली.

१ शिवाय, पाटण परगणेंयासी सालदरसाल पेंढारी यांचा दंगा जातां येतां, व होळकराकडील नागो जिवाजी व बंडवाले राजेरजवाडे वगैरे यांचा, व हालीं मीरखान याचा दंगा, याजमुळें प्रांतांत खराबा. तेव्हां ठाणें राखावयासंबंधीं व बंडवाले यांच्या खंडण्यासच ऐवज कर्ज काढून घालावा लागतो. हें पहिलेपासून तुम्हांस माहित आहेच व हिशेबही तेथें गेलेच आहेत. त्याजवरून समजलेंच असेल.

श्रीमंताच्या कृपेकरून नांवलौकिकासही आलें व चार पैसे मिळवून संसारासंबंधीं जीं जीं सुखें तीं सर्व भोगलीं. हें गृहकृत्य गौप्य असावें यास्तव सूचना लिहिली आहे. तुम्हीं विनंती करितां अशीच करावी, व तेथूनही घडेल, ही खातरजमा आहे.

पत्रांक ५९५ श्री. १७२४ भाद्रपद शुद्ध १

स्वामिचे सेवेसी. विनंति सेवक मल्हार रामचंद्र कुळकर्णी सां नमस्कार विनंति विज्ञापना ता भाद्रपद शुद्ध परियंत आपले कृपेकरून यथास्थित असें. + + + अलिकडे वर्तमानः—डालटन साहेब याचा मुख्य सरदार दीपन साहेब बऱ्हाणपुराकडून आला. भाद्रपद शुद्ध १ आपले गांवीं आला. त्यानेंहि बहुत गर्दी केली. शिवरामपंत तात्याची हवेली उघडून राहावयास येऊं लागला. मग मोठे प्रयासें अंबादासपंत सेंदुरणीकर यांणीं बाहेर अभ्यंकराचे वाड्यांत उतरविला. मोठी मारामार केली. ब्राह्मणांची आब ठेविली नाहीं. सदाशिव दिक्षितांचे आंगणांत घोडे बांधून माहाराची राहोटी दिली. मग, मोठ्या प्रयासें दुसरे दिवशीं तो माहार काहाडला. त्यानेंहि दोन हजार कडबा घेतला. कडबा कोठें मिळेना. उशीर लागला ह्मणोन, परसरामभटाचा हात बांधला, व मकवा होडले ! दाहापंधरा चाबूक मारले. अंगुठा पिरगाळला. तो अद्यापि नीट जाला नाहीं. मग काल मंगळवारीं दीपनसाहेब सडा उतरोन पुन्यास आला आहे. अंबादासपंतहि त्यासमागमेंच आहे.

आपले गांवीं कंपू उतरला. यानें अगोदर चंदी वगैरे घेतलें. तो मार

सविस्तर पत्रीं लिहिलाच आहे. त्यावर, त्यानें आणखी चिठी मनश्वी सरंजामाची केली. आजमास चिठीचा पाहतां, दोनशें रुपये होऊं लागले. मग बहुत प्रयत्न केला. अंबादासपंतांनीं बहुता प्रकारें प्रयत्न केला. परंतु तो ऐकेना. अंबादासपंतासीं त्यानें करार केला कीं चिठी माफ करतों. अंबादास पुन्याकडे आला. दुसरे दिवशीं नेहमीं शिपाई पाठवून साहिंकाळपरियंत मला बसविलें. साहिंकाळीं दाहापांच ब्राह्मण तेथें पाठविले. तो मनश्वी बोलूं लागला. सेवटीं चिटीपौ कांहीं जिन्नस घेतली. बाकीहि उदईक द्या ह्मणतो. याप्रमाणें मोठी धूम केली. पुढें कूचहि करित नाहीं. राण फार तुडविलें. तरी बाजरी तमाम बैलांस तोफेच्या चारलें. याप्रमाणें आजपरियंत गर्दी केली. पुढें काय करील, हें नकळे. + + + हे विनंति.

पत्रांक ५९६ श्री. १७२४ भाद्रपद

यादी रामचंद्र दीक्षित व लक्ष्मण नारायण दीक्षित कायगांवकर यांचा फडच्या निजाम व नवाजजंग यांजकडून होणें:—

कायगांवीं पठाणाची फौज येऊन ब्राह्मण गांवांतील धरून मारहाण क(रून) पैका मागूं लागले तसदी बहुत होऊं लागली.........घेतले; आणखी दाहा मागों लागले. घरें खणों लागले. सबब सुभ्यास मार सांगिला. सुभे यांणीं करार केला कीं, पांच हजार रुपये, व एक हजार रुो दरबारखर्च ऐो साहा हजार रुो द्यावे. पठाणाची तोड आह्मी पाडितों. तुह्मांस कांहीं तोशिस न लागतां कूच करवितों. याप्रमाणें ठरून साहा हजार रुो चा दस्तऐवज सुभे यांणीं घेतला. तेव्हां, पठाणाकडील आह्मांस एक पैसा न पडतां त्यांणीं कूच करून जावें, कायगांवचे ब्राह्मण वोलीस पठाणापाशीं होते ते सुभे यांणीं आणून अवरंगाबादेस आह्मांपाशीं पावते (करावे), तें कांहीं एक केलें नाहीं. पठाणांनीं मारहाण ब्राह्मणास करून * लष्करांत गेले.

पत्रांक ५९७ श्री. १७२४ भाद्रपद शुद्ध ७

अमीरतद्दौला बाहादर:—

खां साहेब मुशाफक मेहेरबान मीर कमोयनुद्दीन अलीखां बाहादूर यांसी लक्ष्मीबाई व सौ मैनाबाई दीक्षित पाटणकर व परशरामभट व लक्ष्मणपंत मौजे कायगांव आशीर्वाद. उपरी. नबाब यांचे खंडणी पौ रुा २०५०० अक्षरीं वीस हजार पांचसें राहिले. त्यास, सदरहू ऐवज त्यांचे सरकांत तुह्मांकडोन देविला असे. हा ऐवज शहरीं गेलियावर चौवथे दिवशीं दाहा हजार

---

* फुल्यांच्या ठिकाणीं पुढील शब्द खोडले आहेत:—"पैका मनश्वी घेतला; वाडे लुटोन नेले; सिवाय मातोश्रीस घेऊन."

रुपये आपलियास देऊं. व पुढें आठवे दिवशीं साडे दाहा हजारांचा भरणा करून देऊं.सदर बाइग्राप्रो झाडा करून देऊं हा करार लिहून दिल्हा. सही दस्तुर लक्ष्मण रावजीचा असे. सके १७२४ दुंदुभीनाम संवत्सरे * भाद्रपद शुद्ध ७

साक्ष रतनगीर बोवा गोसावी.

पत्रांक ५९८ श्री. (मसूदा) १७२४ भाद्रपद शुद्ध ८

जगंनाथपंत यांचे नांवें पत्र पाटणास लिा दिल्हें.

विशेष. सीतलगीर गोसांवी का पाटण येथें राहत होता. त्यास सागरवाले यार्णी संस्थान घेतलें त्यावेळेस गोसावी मजकूर परागंदा होऊन श्री काशींत वीसबेवीस वर्षे राहिले. हालीं संस्थान सागरवाले यांजकडोन राजश्री सेनासाहेबसुभा यांजकडे सरकारांतून देविलें. तेव्हां पाटण माहाल सरकारांत ठेविला. हें वर्तमान गोसावीमारं यानें आइकिलें. त्याजवरोन काशीहून निघोन पाटणास तुमची भेट घेऊन आला. यासी, येऊन आह्मांस भेटला. आपलें वर्तमान सांगितलें. त्यावरोन गोसावी तेथील स्थाईक आणि सरकार-उपयोगी, तेथें राहिल्यानें हरएक कामीं पडतील, ऐसें जाणोन, गोसावीमार याची खातरी करून तुह्मांकडे पाठविला आहे. त्यास का पाटण येथें

१ का मारीं मठ बांधावयासी जागा नेमून द्यावी. महिना पंधरा दिवस दाहा पांच बेगारी लागल्यास द्यावे. याचें बोलणें कीं, तीन बागा कसब्यामध्यें आपले गुरूच्या हातच्या आहेत. त्यांची चौकशी करून त्यांतिल एक बाग यांस द्यावा. गरीबगीर गोसावी याचा मोठा बाग द्यावा. कलम १.

१ पो मारीं गोसावी याची सावकारी बीज व नगदी वगैरे येणें आहे. त्यास, रयत रजावंतीनें सरकार-नुकसान न होतां, जसें ज्यापाशीं निघोन असामी कायम राहील, अशा तऱ्हेनें हे मागतील. येविसीं तुह्मीं ताकीद रयतेस वगैरे करावी.

१ वस्तींत राहिल्यानंतर नवी देवघेव करितील. येविशींचा तुमचा पक्ष असावा.

१ गोसावीमजकूर कसब्यांत मठ बांधून राहणार. तेव्हां दाहा पंचवीस याजपाशीं अतीत राहातील. त्यांचा योगक्षेम चालला पाहिजे, व सरकारचे उपयोगाचे आहेत, याजकरितां यास पड जमीन पडली आहे. त्यापैकीं तीनशां रुपयांची कामारीं अगर हरएक गांवीं पाटणचे माहालांत चला बांधोन सरकारची सनद करून द्यावी.

---

* हें पत्र भीतीनें गांगरून जाऊन अगदी कांपत कांपत लिहिलेलें आहे. पत्राच्या मथळ्यावर कोपऱ्यांत फारशी मजकूर आहे.

१ गोसावीमार तेथें राहणार, तेव्हां याचे किती बन्यावर व किती वाईटावर असतील. याचें लक्ष तुह्मीं ठेऊन, हरएकविसीं याची गौरसी करीत जावी.

सदरहू कलमें ५. गोसावीमार तुह्मांजवळ आल्यानंतर लिाप्रमाॅ त्याची खातरी करून याचा पुस्तपाना करीत जावा. फिरोन बोभाट येऊं न द्यावा. राछ ७ जावल, सुा सलास मयातैन व अलफ.

पत्रांक ५९९ श्री. १७२४ भाद्रपद

याद रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित कायगांवकर यांचा फडच्या निजाम नवाजंग याजकडून होणें ताा:—

१ दीक्षित यांजपासोन रोखा (सा ह–)जार रुपयांचा घेतला. शाहा... ....(मा)णसें लष्करचे बाजारांत नेऊन......स प्यादे पाठऊन वाड्यांत दंगा करून बायकांस धरून नेलें. सबब, ...यासी बशर्थ रोखा हरएक उपद्रव होणार नाहीं. कलम.

१ कायगांवचे वाडे लुटून पठाणांनीं नेले आणि मातुश्रीस धरून लष्करांत नेऊन गांवचे मुकामीं नेलें. तेथून पठाणांनीं मातुश्रीस माघारें पाठविलें. तेव्हां मार्गांत वकिलांची गांठ पडून, तसदी करून, वाटेंत रोखा नेऊरगांवीं साडेएकवीस हजार रुपयांचा घेतला आहे. कलम.

१ सातारें येथील वाडे तीन पठाणांचें नांव करून लुटून गाड्या भरून शाहरास नेल्या. चीजबस्त वगैरे सर्वहि गेले. त्याचा फडशा होणें. कलम.

एकूण तीन कलमांचा फडशा करून देवणें. पुढें उपद्रव न व्हावा. तपसीलाची याद.........पाहावी.

पत्रांक ६०० श्री. (मतलब.) १७२४ भाद्रपद

यादी मतलब सीतलगीर गोसावी पो पाटण प्रांत गढेंमडलें.

१ पो पाटण येथें आमची लेवादेवी वडिलांपासोन गला व नगदी दीन वगैरे लोकांकडे येणें आहे. त्याचा तगादा आह्मीं करूं. जसें जेथून निघेल, असामीची अबादी राहून, तसें घेऊं. येविसीं सरकारचा पक्ष असावा. कलम.

१ मंडल्याचें संस्थान जेव्हां राज्याकडे होतें तेव्हां पामजकूरची मामलत आह्मांकडेच होती. ते वेळेस आमचा मठ वगैरे राहाणें गढींतच होतें. नंतर संस्थान सागरवाले यांणीं घेतलें. त्या वेळेस आह्मीं निघोन काशीस गेलों. तें आज वीसपंचवीस वर्षें तेथेंच आहों. संप्रत पाा सरकारांत आला हें ऐकून एथें आलों. त्यास, कसबें पाटण येथें आमच्या मठाची योजना करून, जागा बांधावयास परवानगी द्यावी. दोन तीन बाग आमच्या वडिलांचे हातचे आहेत. ते आमचे आह्मांकडे देवावे. कलम.

१ वस्तीमध्यें आह्मीं राहिल्यावर चार रुपये व नाजपाणी देणें घेणें करूं. येविशीं सरकारचा पक्ष असावा. कलम.

१ कसबें मजकुरीं आह्मीं राहिल्यावर, दाहा पंचवीस अतीत आम्हांजवळ राहतील. तेव्हां सरकारांतून कांहीं निर्वाहा आमचा चालावा. आह्मीं सरकारचे उपयोगाचे आहों. हरएकविशीं चाकरी सांगितल्यास करूं. कलम.

१ आमचे राहणें कसब्यांत जाल्यावर च्यार सुष्ट आहेत व च्यार दुष्ट आहेत. आपलेकडील कमावीसदार तेथें आहेत. त्यास आमचे प्रतिपाळाविशीं निक्षून आज्ञा असावी कीं, हरएकविशीं यांचा सांभाळ करावा, कोणाचा उपद्रव वगैरे वाजवी लागूं नये. म्हणून कलम.

पत्रांक ६०१ श्री. १७२४ आश्विन शुद्ध.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव गोविंद स्वामी गो यांसी:—

पो बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. बळवंतराव माधव, माधवराव अनंत रास्ते यांचे पुत्र, पुण्याहून निघोन जाऊन होनवाडास जमाव करीत आहेत. सबब, त्यांचे पारिपत्यास डफळे व थोरात व वागमारे व पोळ यांस फौज व पायदळ जमा करून एकत्र होऊन जावयाची आज्ञा केली असे. तरी तुह्मीं पत्र पावतांच फौज व पायदळ जमा करून, सारे एकत्र होऊन, बळवंतराव माधव यांस हस्तगत करणें आणि हुजूर पोंहोंचाऊन देणें. जाणिजे छ ५ जमादिलावल, सुा सलास मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें ! हे विनंति.

श्री
राजा शाहूनरपति हर्षनिधान बाजीराव रघुनाथ मुख्य प्रधान.

पत्रांक ६०२ श्री. १७२४ आश्विन शुद्ध १२

सेवेसी नारो कृष्ण दोन्ही कर जोडून सां नमस्कार विज्ञापना ता आश्विन शुद्ध ११ पर्यंत मुा मौजे काराठी सुखरूप असों. विशेष. आपण आज्ञापत्र

माहाराजाबरोबर पाठविलें तें पावलें. लिा सविस्तर कळलें. मौजे मजकूरचें वर्तमान तरः गांवचीं शेतेंमळें तमाम, लष्करें नजिक होतीं, त्यांणीं कापिलीं. बहुत नाश जाला. हालीं लष्करें येथून कूच करून जळगांवांवर गेलीं. बुधवारीं दोन प्रहरा रात्रीं कूच्य करोन, बारामती व मेंढघ्याचें मधें बुणगें ठेऊन, सड्या फौजा पुढें बारामतीचे नजीक काठेवाडीवर गेल्या. माने यांचे फौजेस व सरकारचे फौजेस दोन कोसांचें अंतर आहे. त्यांचीहि जमात वीसपंचवीस हजारपर्यंत आहे, म्हणोन वदंता आहे. येथें चीजबस्त आहे. त्यास, बहुतेक गांव उज्याड जाहलें. येथील मार तरः च्यार रुा सिलक जवळ बाळगोन राहणें तेव्हां ठीक व गांवचाही बंदोबस्त राहील. त्यास, सिलक तो मजजवळ नाहीं. व गांवांत पट्टी करावी. हरएक पीक अगदींच गेलें. पुढे दुसरे पिकावर च्यार रुा तुह्मापासोन घ्यावे तर गांवची वस्ती होणें कठीण. त्यास, गांव राहे तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. येविशींचें विनंतिपत्र गांवकरी यांणीं लिहिलें आहे. त्याजवरून श्रुत होईल. दंगा बहुत आहे. त्यास, छत्राकडील भाडीं वगैरे येथें आहेत. त्यास, येविशींची आज्ञा यावी. वरकड मार अधिकोत्तर नाहीं. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञप्ति.

पत्रांक ६०३ श्री. १७२४ आश्विन शुद्ध १२

चिरंजीव राजश्री विसाजीपंत नाना यांसीं बापूजी गणेश साठये आशीर्वाद उपरी येथील क्षेम ताा आश्विन शुद्ध १२ येथें सुखरूप असों. विशेष. तुह्मांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. समाचार घेत नाहीं. तरी असें नसावें. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत जावें. इकडील मार गांवच्या पत्रावरून कळेल. होळकराकडील मान्या व श्रीमंतांची फौज यांस च्यार कोसांवर अंतर आहे. सरकारची फौज बुनगे बारामतीस येऊन, पुढें सड्या फौजा होऊन गेल्या आहेत. बारामतीस वस्ती आहे. गांव दहशतीनें उज्याड जाहलें. हा गांव उज्याड होणार. मुलें माणसें सुद्धां येथें आहों. छत्राकडील काम आम्हाकडे सांगितलें आहे. लष्करचा भरंवसा नाहीं. घरांत भांडें व चीजवस्त आहे. ती गेली ह्मणजे कठीण. याजकरितां यजमानास विनंती करून अगर तुमच्या विचारास येईल त्याजप्रों उत्तर पा. तीा राजश्री दादा कोठें आहेत ते लिा. बहुत काय लिा ! लोभ करावा. हे आशीर्वाद.

हेंा पत्रीं हावलदार व नारोपंत यांस साां नमस्कार सांगावा.

पत्रांक ६०४ श्री. १७२४ आश्विन शुद्ध १२

सेवेसीं बापूजी गणेश साठ्ये दोन्ही कर जोडून शिरसाां नमस्कार विज्ञापना. ताा आश्विन शुा १२ पावेतों सुखरूप मौजे कराठी येथें असों विशेष. स्वामीकडून अलिकडे पत्र येऊन सेवकांचा सांभाळ होत नाहीं. तरी असें

नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळीत जावें. यानंतर इकडील वर्तमानः मान्याच्या दहशतीनें भोंवरगांव उजाड जाहाले आहेत. जरीपटका व मान्यास च्यार कोसांचा अंतर आहे. काराठी पासून नऊ कोस आहेत. आज उद्यां तोंड लढाईचें लागणार. गांव तजावजा जाहला आहे. गांवकरी यांनीं अर्जदास्त पाठविली आहे, त्याजवरून कळों येईल. ब्राह्मण नित्य येत असतात. आज्ञेप्रमाणें भोजनाचा बंदोबस्त करीत आहें. व पेशजीं यमाजी भोसला यानें वर्तमान विदित केलेंच आहे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

पत्रांक ६०५ श्री. १७२४ आश्विन शुद्ध अखेर.

श्रीमंत राजश्री वैद्यबोवा मोकाशीसाहेब, साहेबाचे सेवेसी:—

अर्जदास्त अर्जदार बंदेगी शरीकर मोकदम मौजे कराठी प्रां सुपें दंडवत अर्ज विनंति विज्ञापना कीं, मौजेमारचें वर्तमान तरः शेतमळे झाडून लुटले गेले. कांहीं एकदोन मळे राहिले होते. गणपतराव पानसे यांच्या मुकामामुळें तेहि नवमीचे दिवशीं कूच करून गेले नंतर दसऱ्याचे दिवशीं झाडून कही आली. त्याही मळ्याचा फडशा जाला. खरीफाचीहि अवस्ता तींच जाली. रब्बी पेरावी तर प्रजंने नाहीं. यामुळें दोन्ही पिकांची निराशा जाली. मान्याचे लष्कर पूर्वेस बारामतीचे खालते सा कोसांवर आले. जरीपटकाही आज एकादशीस कूच करून बारामतीवर गेले. मान्याचे धास्तीनें गांव झाडून वस झालें. आपल्याभोंवते लोणीमोरेश्वर येथील वस्ती आहे. याजवेरान शेवेसी अर्जविनंति लिहिली. गांवचा धर सुटला आहे. आपली आज्ञा तर, गांव वस करूं नये. त्यास, खंडनीचे रोखे मान्या मनसरी करितो. पैसा द्यावयास ताकत नाहीं. गांव वसवा, तर जाळतो. ऐसें संकट प्राप्त झालें आहे. येविषईची आज्ञा येईल, त्याप्रों वर्तनूक करूं. येथें तर घटकेचा भरवंसा नाहीं. कळावें. सेवेसी अर्जविज्ञापना. दहाकाचा[1] बंदोबस्त करावा. दोनसे स्वों गांवच्या बच्यावाकरितां कृपा करून रा नारोपंत नाना यांसी पाठवावे. वितके दिवस गांवच्या बच्यावाचा लौकिक जाला. आतांही आमचा संकटाचा प्रानअवस्ताचा[2] दिवस आहे. साहेबीं ये येळेस कृपावंत होऊन दोंशां रुपयाचें काम करावें, म्हणजे श्रमाचे पाडाऊं[3] होऊं. निआधारी[4] झालों, याकरितां संकटाची अर्जदास्त पाठविली आहे. हे अर्जविनंति.

पत्रांक ६०६ श्री. १७२४ आश्विन वद्य २

राजश्री नारायणराव गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंगरे वजारतमाब सवाई

---

१ धाकाचा. दहशतीचा. २ प्राणावस्थेचा. ३ गुलाम. ४ निराधार.

सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. तुह्मीं पत्र राजश्री ज्यगंनाथपंत यांजबराबर छ ५ राखरचें पाठविलें तें छ १३ जमादिलाखरीं पावलें. गांव व मडीविसीं मार लिहिला, त्यावरून व राजश्री बळवंतराव नेने यांणीं पत्र पाठविलें त्यावरून, कळों आला. ऐशास तुम्हांकडून बहुत दिवस पत्रें येऊन कांहींच मजकूर समजल्यांत नव्हता. त्यास हाल्लीं मारनिल्हेनीं मुखोत्तर सांगितलें, त्यावरून अवगत जालें. ऐसेंच हमेषा पत्र पाठऊन आनंदवीत असावें. गांव व मडीविसीं लिहिल्यांत, त्यांस तुमच्या स्नेहापुरता दुसरा अर्थ काय आहे? घडोन येईल. वरकड मार मशारनिल्हे लिहितील त्यावरून कळेल. रा छ १५ माहे जमादिलाखर बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति. श्री मोर्तबसुद.

० श्री ८

राजा शाहु नरपती चरणीं
सादर येसाजीसुत बाबूराव
आंगरे वजारतमाब सवाई-
सरखेल निरंतर.

पत्रांक ६०७ श्री. १७२४ आश्विन वद्य २

विज्ञापना ऐसीजे. राजश्री व्यंकटराव याची भेट जाहाली. तिकडीलइडील सर्व भाव समजलें. श्रीमंताच्या चिठ्या चहूंकडे जातात. दाहा पांच जण मध्यस्त पडले आहेत. एवंच अद्याप जें आहे तेंच आहे. रा बाजीराव बरवे व पाराजीपंत यांणीं मोठे प्रातःकाळीं होळकराकडे जावें आणि खातरजमा करून घ्यावी, ऐसें श्रीमंतांचे विचारें ठरलें. तेव्हां पाराजीपंतांनीं याजकडे सांगून पा। कीं, याप्रों तेथून चिठ्या आल्या, आतां माझा उपाय नाहीं, तुमचा गृहस्थ गेला त्याचें उत्तर कळावें, प्रहर दिवसपर्यंत वाट पाहतों. त्याजवरून राहिले आहेत. त्यास, अझूनहि पहिलेसारखी व्यवस्था जाली म्हणजे कोणतेहि घडत नाहीं. मातबर मध्यस्ताचे हातें समेट जाहल्यास फार उपयोग. दादा ! काय कोठवर ल्याहावें ? नगरावर फौज रवाना होणार. होळकरानें हा कालमर्याद श्रीमंताचे पायासीं अमर्यादा केली नाहीं. जेव्हां अंबाऱ्या दृष्टीस पडल्या तेव्हां घोड्याखालीं उतरून नमस्कार केला. फौजेस ताकीद केली कीं, कोणी श्रीमंताचे फौजेकडे जाऊं नये. मीं आपलें तोंडास काळें लाऊन

घेणार नाहीं, माझा अव्हेरच केला तर मी लाच्यार आहें वगैरे बोलणीं व चाली पत्रांत कोठवर लिहूं ? सारांष, समेट करून घ्यावी, हे सलाह. पक्षपात कोणाचाही करूं नये. दौलतीवर लक्ष, ज्या गोष्टीनें दौलतीचें कल्याण. सर्व प्रजा आशीर्वाद देईल. समेट करून घेतली असतां, श्रीमंतांची चाकरी होळकर करून दाखवील, ऐसें आहे. गणोबा अद्याप आला नाहीं. वाट पाहतात. राघोपंत रात्रीं पावला. वेंकटराव यांणीं चिठी वडिलांस लिहिली आहे, त्याजवरून कळेल. ज्यास्थळीं आहां तेथून अन्यत्र स्थळीं जावयाचा विचार मसलतगार यांचे विचारें दिसतो. त्यास असें जाहलें म्हणजे सर्वहि गोष्टी बिघडल्या. पक्केंपणें मनांत यावें. मग कोणाच्यानेंच कोणताच विचार घडावयाचा नाहीं. इतके दिवस मसलतगारांनीं मसलत दिल्ही. त्यांतून हे निघाले. पुढें अणीक असें घडल्यास ईश्वरेच्छा म्हणावी. मग मनुष्याचा उपाय राहिला. पुढें कोणास आपण दोष ठेऊं म्हटल्यास, दोष घेणार नाहीं. इतःपर मर्जी. कालचे चिठीचें व या चिठीचें उत्तर मनन होऊन लवकर यावें. अज्ञानपणें मांझे लिहिणें पडत असलें, तर विचार करून विनंति करावी. रा। बुधवार, प्रातःकाळ, प्रहर दिवस हे विज्ञापना. इ. इ.

पत्रांक ६०८ श्री. १७२४ आश्विन

यादी रामचंद्र दीक्षित व लक्ष्मण नारायण दीक्षित कायगांवकर यांचा फडच्या निज्याम व नवाजजंग यांजकडून होणें:—

१ कायगांवीं पठाणांची फौज येऊन गांवांतील ब्राह्मण धरून मारहाण करून पस्तीस हजार रुपये खंड ठराऊन निकड मांडिली. गांवकरी यांणीं गांवांत पट्टी करून पंचेवीस हजार रुा दिल्हे. दाहांस जागा नाहीं. सबब दोघे ब्राह्मण पठाणाकडील दोन माणसें समागमें घेऊन आवरंगाबादेस आले. ब्राह्मणांचें वर्तमान ऐकून विचार केला कीं, इतःपर जो पैसा देणें तो मातबर मध्यस्ताच्या विद्यमानें देऊन, घरें, वाडे जगऊन पुढें उपद्रव लागूं नये. या भावीं सुभे यासीं बोलावें. ऐसी योजना करीत असतां, इतक्यांत सुभ्याकडील पांचपंन्नास जमाव येऊन घरावर दंगा करूं लागले. दरवाजे बंद करून, सुभे याजकडे बोलावयास ग्रहस्त पाठविले. तेव्हां, सुभे यांणीं सांगितलें कीं पांच हजार रुा ऐन व एक हजार दरबारखर्च, एकूण साहा हजार रुा द्यावें. पठाणाचें कूच करीवतों, ब्राह्मणं त्याणें धरले आहेत ते आणून आवरंगाबादेस तुमचे हवालीं करतों. याप्रों बोलणें नेमांत येत आहेच, तों तेच समई इकडे वाडियावर सुभेयाची जमीयत आली होती त्यांनीं बायका बाहेर काढून चावडीपुढून लष्करचे बाजारांत नेल्या. हें वर्तमान आनंदराव नाि लक्ष्मणराव पेपकर यांजला समजलें. त्यांणीं सुभे यासीं बोलून बायका सोडऊन आणवून घरीं पाठविल्या. सुभे यांणीं साहा हजार रुाचा दस्तऐवज लिहून

घेतला. त्यांत लिहून दिल्हें आहे, बशर्थ बंदोबस्त कायगांवचा. तें पत्र पाहिलें असतां मार ध्यानास येईल. अस्तु ! सुभे यांजकडून पठाणाचा बंदोबस्त कांहीं एक जाला नाहीं. आह्मीं सुभ्याच्या भरोंसियावर बेफिकीर बसलों. तिकडे पठाणांनीं वाडे लुटोन, लाखों रुपयांची चीजवस्त नेली. ब्राह्मण व मातुश्रीबाईस धरून घेऊन गेले. बाईपाशीं कांहीं नाहीं समजोन, ब्राणह्मसहित बाईस पठाणांनीं सोडलें. इकडे सुरतवाले यांणीं जमीयत पाठऊन सातारियास वाडे लुटून चीजवस्त गाड्या भरून पैठणदरवाज्यानें शहरांत आणिल्या. तिकडे बाई लष्करांतून येतांना सुरतवाले यांचे वकिलांनीं अडविलें कीं, तुमचे सुटकेनिमत्य पठाणांसीं एकवीस हजारांचा करार करून हवाल्यांत आलों ते द्यावे. ऐसी निकड करून एकवीस हजार रुपयांचा दस्तऐवज करून घेतला आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. त्या प्रकरणीं त्याजकडून फडच्या व्हावा.

१ साहा हजारांचा दस्तऐवज माघारा यावा.
१ एकवीस हजारांचा दस्तऐवज माघारा यावा.
१ * + + + चीजवस्त कुल माघारी यावी.

२

१ डुकरखोरा पहाड सातारियाचे राणांत आहे. तेथें आमचा रमणा आहे. येविशीं सरकारची सनद असतां, हालीं औरंगाबादेकडील आहे, ह्मणून आपण घेतात. आह्मांस गवत घेऊं देत नाहीं. त्याविशीं ताकीद होऊन पूर्ववतप्रमाणें चालावें.

पत्रांक ६०९ श्री. १७२४ आश्विन

भाई नाना दिक्षितः--

पंडत साहेब बिसियार मेहेरबान अजतरफ महमदशाहखां सलाम नियाज आंके तुह्मी खातरजमेनें येथें येणें. तुमचे व आमचे मध्यें कुरान व गंगाजी आहे. कोनेहि विशई दगाफटका होणार नाहीं. व जे रुा आमचे बाकी राहिले, त्याचा बंदोबस्त करून पाठविणें. व तुह्मी जरूर जरूर येथें येणें. मागती औरंगाबादेस जाणें असलें तर जावें. खातरजमेनें यावें. कांहीं वसवास न करावा. व ज्या वेळेपासोन हें लष्कर येथें आलें किती बंदोबस्त घराचा व गांवचा कराखाकी लोक व कोनीहि तुमचे असबाबास हात लावित नाहीं. मा ऐवज बाकीचा द्यावा. नाहींतर मुखत्यार आहांत. तुह्मी येथें आले, म्हणजे ऐवज तनखाचा आमचा वसूल होईल तो घेऊं, व पेहेरे वगैरे अवघे

---

* फाटलें आहे.

उठून घेऊन जाऊं, व पुढेंहि मानसें रखवालीस गांवच्या ठेऊं, व हरएकाची खातरजमा करुन देऊं. व अगर तुह्मी हाजर न व्हाल व रा। न पाठवाल, तर तुमचा अंमल गांवांत बसणार नाहीं व आतां ज्या पैस्याचा करार लक्ष्मण बापू याणें केला तो पैसा आह्मी घेऊं कळावें हे कितावत.

पत्रांक ६१० श्री शंकर. १७२४ आश्विन–कार्तिक

श्रीमद्गुरुवर्य राजमान्य राजश्री दीक्षितबावा वडिलांचे सेवेसी:—

विद्यार्थी रावजी खमलाखर कृतानेक सां। नमस्कार विनंति उपरी. आपण कृपा करून आशीर्वाद पत्र पो तें पावलें. सैन्याचे, पठाणाचें वर्तमान तर: या प्रांतीं संवत्सरवारीं पो रोखे खंडणी घेतली. करंजगांव सायखेडें करून, येथें ब्राह्मणांची विपत्ती फार केली. नायगांवीं मुकाम आहे, असें ऐकितों. येथें तो मान्याचें ठाणेंच आहे. इकडे येत नाहीं. कोल्हारचें वर्तमान कांहीं समजलें नाहीं. आज्ञेप्रमाणें आल्यागेल्याचा वर्तमान लिहित जाईन. येथील वर्तमान तर: पूर्वीं आबांचे पत्रीं लि।च होतें. त्यावरून समजलेंच असेल. बहुत काय लिहिणें ? हे विज्ञापना. इ.

पत्रांक ६११ श्री. १७२४ कार्तिक शुद्ध १

राजश्री नारायण रावजी वैद्य स्वामीचे सेवेसी:—

पो सदाशीव रंगनाथ वानवळे सां। नमस्कार विनंति येथील कुशल, ता। का। शु। १ बुधवार मु। चिखलगांव, नजिक किल्ला रोहिडा, येथें स्वस्तक्षेम असों. विशेष. गांवांतून स्वारी निघाली तें समई घरीं भोजन करीत होतों. नंतर निघोन स्वारी टेंकडीवर होती तेथें आलों. नमस्कार करून पाठीमागें टेकडीखालें उभा होतों. तेथें गडबड जाली. सा।, मागें अंबराईत आलों. तेथें उभा होतों. तों तेथें रा। श्रीपतराव मैराळ व राजश्री दाजीबा आले. त्यांणीं सांगितलें, येथें उभें राहूं नये, मागें गर्दी जाली. मी श्रीमंताजवळ होतों. स्वारी तेथून निघाली. कोणिकडे गेले हें समजलें नाहीं. तुह्मी येथें उभे राहूं नका, आमचे बराबर चला. ते व मी दोन कोस बराबर होतों. पुढें त्यांची आमची चूक पडली. आह्मीं सोमवारीं रात्रीं तोरणा किल्यानजिक किल्यांत राहिलों. तेथून दुसरे दिवशीं आंबवड नागनाथाचे येथें आलों. तेथून आज बुधवारीं मु। मारीं येऊन, एका ब्राह्मणाचे घरीं राहून, श्रीमंत यजमान साहेबांस विनंति लिहिली व आपल्यास हें पत्र लिहिलें आहे. तर, स्वारी कोठें आहे हें कळावें, ह्मणजे सेवेसीं येऊन पोहोंचतों. वेळेस तेथें गडबडीमुळें स्वारी अंतरली. त्याणें अशा फेऱ्यांत पडलों. जवळ पाणी पिण्यास पात्र देखील नाहीं. अशी अवस्ता आहे. तर, देखतपत्र उत्तर यावें, जेथें

आपण व श्रीमंत माहाराज यजमान साहेब असतील, तेथें येतों. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिजे. हे विनंति.

पत्रांक ६१२ श्री. १७२४ कार्तिक शुद्ध ९

राजश्री नारायण राव गोसावी यांसीः--

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंगरे वजारतमाब सवाईसरखेल रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. राजश्री येशवंतराव होळकर यांसी लढाई जाल्याचा मजकूर परस्परें तुह्मांस समजलाच असेल. फौजेंतील सरदार उपाय नाहीं तेव्हां निघाले. नंतर आह्मीं पांच चार स्वारानसीं निघोन छ ३ मीनहूस जजीरे कुलाबा येथें येऊन दाखल जालों. राजश्री राऊ पंडितप्रधान घांट उतरून कोंकणांत आले. समागमें तुह्मी आहां ह्मणोन समजल्यावरून, येथून राजश्री दिनकर नारायण याची रवानगी केली आहे. येऊन तुह्मांजवळ बोलतील. राजश्री राऊपंडित यांसी विनंति करून, पुढें कर्तव्य असेल तसें लिहिण्यांत यावें. सरकारचाकरीस सिद्धच असों. रा छ ७ माहे रजब. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे विनंति. मोर्तबसुद. (शिक्का.)

पत्रांक ६१३ श्रीलक्ष्मीकांत. १७२४ कार्तिक शुद्ध ११

राजश्री नारायणराव वैद्य गोसावी यांसीः--

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें. विशेष. तुमचे नातवास देवआज्ञा जाली, हें वर्तमान सरकारांत ऐकून चित्तास फारच वाईट वाटलें. तुह्मांस तो महत दुःख जालें. ही ईश्वरीइच्छा. त्याची सत्ता बलोत्तर! यास कोणाचा उपाये नाहीं. तो जसें ठेवील तसें राहणें प्राप्त. त्याजला मुख्य विवेकच प्राधान्य.........तुह्मी सारे गोष्टीस समजतां...............तुह्मांस कोण्ही सांगावें?.........करून शांतवण करावें. येविशीं सरकारांतून ल्याहावें ऐसें नाहीं. रा छ ९ माहे रजब. बहुत काय लिहिणें? हे विनंति.

पत्रांक ६१४ श्री. १७२४ पौष वद्य ७

राजश्री बाबूराव आंगरे वजारतमाब सवाईसरखेल गोसावी यांसीः--

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो बाजीराव रघुनाथ आशीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री खंडो मुकुंद सरकारांतून बडोद्यास जात आहेत, त्यास मार-

निल्हे तुमच्या तालुक्यांत आल्यावर यांजसमागमें लोक पंचवीस देऊन कल्याणास पोंहचवून द्यावें. रा छ १९ रजब, सुा सलास मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

पत्रांक ६१५ श्री. १७२४ कार्तिक वद्य ७

छ १९ रजब सन सलास मयातैन, कार्तिक.

विशेष. खासा स्वारी माहाडास आली. तुह्मांकडून सरकारचें जाबसाल उगवावयाचे ह्मणून खंडो मुकुंद यांची रवानगी केली आहे. सविस्तर बोलतील, त्या अन्वयें उलगडा होऊन मारनिलेची रवानगी लौकर करावी.

पत्रांक ६१६ श्री. १७२४ कार्तिक वद्य ८

छ १९ रजब सन सलास मयातैन कार्तिक.

याद खंडो मुकुंद यांस बडोद्यास जावयाचे मार्गांचे विभागणीविशीं. सुा सलास मयातैन व अलफ.

पत्रें.

१ बाबूराव आंगरे यास पंचवीस लोक देऊन कल्याणास पोंचवून द्यावें.
१ कल्याणचे मामलेदारांनीं पंचवीस लोक देऊन अर्जुनगडास पोहोंचवावें.
१ अर्जुनगडवाल्यांनीं लिा अन्वयें माणसें देऊन मांडवीस पोंचवावें.
१ मांडवी.........स्वार बराबर देऊन बडोद्यास पोंचवून द्यावें.
१ रहदारीचें दस्तक.

५

सदरहू अन्वयें पत्रें देण्याविशीं आज्ञा. सदरहू अन्वयें पांच पत्रें देणें. छ १९ रजब सलास मयातैन, कार्तिकमास.

१ आनंदराव गायकवाड.
१ रावजी आपाजी.

२

सदरहू अन्वयें दोन पत्रें देणें.

छ २० रजब सलास मयातैन, कार्तिकमास.

पत्रांक ६१७ श्री. १७२४ कार्तिक वद्य ९

राजश्री नारायणराव गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंगरे वजारतमाब व सवाईसरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल

लिहित असावें. विशेष. तुह्मी छ १६ रजबचें पत्र पाठविलें तें छ २० मिनहूस पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. त्यास, इकडील राजश्री दिनकर नारायण तेथें आहेत. बोलतील. त्याप्रों जाबसाल होऊन वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. या प्रसंगीं अधिकआगळें ल्याहावें, तर सर्व ध्यानांतच आहे. सारांश, बंदोबस्त होऊन येई तीच मसलत करावी. विस्तार ल्याहावें असें नाहीं. रा छ २१ रजब. बहुत काय लिहिणें? हे विनंती. श्री मोर्तबसुद.

पत्रांक ६१८ श्रीलक्ष्मीकांत. १७२४ कार्तिक वद्य १४

राजश्री नारायणराव वैद्य गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहीत जावें. विशेष. यापूर्वीं तुह्मांकडेस पत्राची रवानगी छ ६ माहे रजबची तारखेस दसऱ्याचे पोशाखाचे डबाबराबर केली आहे व राजश्री सदाशिव बापूजी यांसींही लिहिलें. तीं पत्रें पोंचून सविस्तर समजलें असेल. त्यास सरकारचें लक्ष सारें तुह्मांकडेस आहे. प्रसंगोपात जसें तुह्मीं सुचवीत जावें, त्याच पायांनीं चालधारणा आपली ठेवावी, हेंच मनांत वागत आहे व ...... स्तवी वारंवार लेहूनही पाठविले आहेत. ही तुमची तुह्मांस खातरजमा आहेच. येविशींचा तपशील फार काये ल्याहावयाचा आहे? सांप्रत, राजश्री सदाशीव बापूजी यांसीं लिहिलें व राजश्री राघो धोंडदेव लिहितील त्याजवरून कळेल. वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहीत जावें. रा छ २७ माहे रजब. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

पत्रांक ६१९ श्री. १७२४ कार्तिक

श्रीमंत राजश्री नाना दीक्षित साहेबाचे सेवेसीं:—

आज्ञाधारक त्र्यिंबकजी डेंघळे सां दंडवत विज्ञापना ऐसीजे. आपण पत्र पाठविलें, तें पावोन मार समजला. राजश्री नरसोपंत तात्या, दोनतीन रोज जाहाले, टोक्यास गेलेत. दुसरें, श्रीमंत आण्णासाहेब यांची पागा नेवासियास होती. त्यासी फत्तेसिंग मान्याचे स्वार येऊन, धामधूम करून, काशिनाथ हरी व आपली पागा ऐसे लष्करांत नेले, व पठाण कोल्हारावर आला, म्हणोन वर्तमान ऐकिलें. त्यांसी पठाण कोल्हारावर कांहीं आला नाहीं. उगीच बाजारआफवा आहे. कलमीं वर्तमान नाहीं. नेवासें माहालचा खंडपणास हाजार जाला, म्हणोन ऐकिलें. साहेबास कळावें. बहुत काय लिहिणें? कृपालोभ करीत जावा हे विज्ञापना. खंड होऊन पागा सुटावी, ऐसें आहे. इतक्यावर ईश्वर इच्छा.

पत्रांक ६२० श्रीलक्ष्मीकांत. १७२४ पौष शुद्ध २

राजश्री नारायण वैद्य गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहित जावें. विशेष. तुमचीं पत्रें सरकारांत जीं आलीं, त्यांचीं उत्तरें यापूर्वींच पाठविण्यांत आलीं. त्यांत जें ल्यहावयाचें तें लिहिलेंच आहे. त्याजवरून समजलेंच असेल. सांप्रत राजश्री सदाशीव बापूजी याजकडून पत्रें आलीं त्याचीं उत्तरें मशारनिल्हेस लिहून पाठविलीं आहेत. त्याजवरून मजकूर तुमचेहि समजण्यांत येईल. तुमचे मुलांमाणसांसमागमें सरंजाम जो द्यावयाचा तो देऊन, त्याची रवानगी करून दिली. त्याजला जाऊन सात आठ दिवस जाले. हा मजकूर तुह्मांकडील मंडळी लिहून पाठवितील. त्याजवरून कळेल. वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहीत जावें. रा छ ३० माहे रमजान. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ६२१ श्री. १७२४ पौष वद्य २

राजश्री नारायेणजी देसाई, घनदेवी, गोः—

सेवक निंबाजी भास्कर नमस्कार विनंति उपरी मुा वसई जाणून स्वकीये कुशल लिा जाणें. विशेष. राजश्री नारायेण बाबूराव यांची रवामगी सरकारांतून जाली आहे. त्यास, हे घनदेवीस मुकामास राहतील. तर, यांचा समाचार हरएकविसीं घ्यावा आणि भूमिये मनुष्यें मार्गाचीं देऊन पावतें करावें. रा छ १४ रमजान. हे विनंति.

पत्रांक ६२२ श्री. १७२४ पौष वद्य २

राजश्री रस्तुमजी देसाई को नवसरी गोसावी यांसीः—

श्रो निंबाजी भास्कर रामराम विनंति उपरी मुा वसई येथें यथास्थित असों. विशेष. आह्मी श्रीमंतासमागमें मुा मारीं आहों. हें वृत्त परस्परें तुह्मांस कळलेंच असेल. यानंतर, राजश्री नारायेण बाबूराव यांची सरकारांतून रवानगी जाली आहे. त्यास, हे नवसर येथें मुकामास राहतील. तर यांचा हरएकविसीं समाच्यार घ्यावा आणि मार्गाची भूमीये मनुष्यें द्यावीं. रा छ १४ रमजान हे विनंती.

पत्रांक ६२३ श्री. १७२४ पौष शुद्ध ७

राजश्री नारायणराव गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंगरे वजारतमाब सवाई

सरखेल रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. राजश्री राऊ पंडित पंतप्रधान यांची स्वारी रेवदंडीयाहून वसईस गेल्या तागाईत, अलिकडे तुम्हांकडून पत्र येऊन तिकडील कांहीं समजत नाहीं. रेवदंडेचे मुकामीं भेट जाहली. तें समई कित्येक बोलणीं चालणीं जालीं होतीं. त्यांतून तेथें गेल्यावर कोणकोणते बंदोबस्त कोणे तऱ्हेचे कसे जाहले ते सविस्तर तपशील लेहुन कळवावें. त्यासारखें येथें विचार केले पाहिजेत. राजश्री राऊपंडित यांस पत्र लिहिलें आहे. त्याचेंही उत्तर घेऊन सत्वर पाठवावें. रा छ ५ माहे रमजान. बहुत काय लिहिणें ? लोभ किजे. हे विनंति. मोर्तबसुद. शिका.

पत्रांक ६२४ श्री. १७२४ पौष वद्य ७

दस्तक सरकार राजश्री पंत प्रधान ता। कमावीसदारान व चौकीदारान व रहदारान व बाजेलोकान व मोकदमानी देहाय. सु॥ सलास मयातैन व अलफ. राजश्री खंडो मुकुंद सरकारांतून बडोद्यांस जात आहेत. बराबर घोडीं रास सात व म्याना एक व माणसें असामी च्याळीस असेत. तरी मार्गी कोणेविशीं मुजाहीम न होतां जाऊं देणें. ज्या गांवीं वस्तीस राहतील, तेथें चौकी पाहारा करून आपलाली हद्दपार करणें. जाणिजे. छ १९ रजब. आज्ञाप्रमाण.

पत्रांक ६२५ श्री. १७२४ पौष वद्य ७

राजश्री आनंदराव गायकवाड गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. खासा स्वारी माहाडास आली. तुम्हांकडून सरकारचे जाबसाल उगवावयाचे. याजकरितां राजश्री खंडो मुकुंद याची रवानगी केली आहे. सविस्तर बोलतील. ह्या अन्वयें उलगडा होऊन मारानिलेची रवानगी लौकर करणें. जाणिजे. छ १९ रजब, सु॥ सलास मया तैन व अलफ. बहुत काय* लिहिणें ?

पत्रांक ६२६ श्री. (नकल.) १७२४ पौष.

यादी नाना फडणवीस यांस मंडल्याबद्दल भोंसले यांजकडून दरबारखर्चाचा करार, विा। उभयतां कारभारी व नारायण बाबूराव, रुा। ५००००० पौ। घजा ऐवज वसूल यावा. करितां रुा। १०१००० बाकी रुा। ३९९०००

---

* हेंच पत्र गायकवाडच्या कारभारी रावजी आपाजी यांचे नांवें लिहिलें आहे.

तपशील.

८४००० गंगथडी प्रकरणीं दरबारखर्च कबूल केला, बा याद. पौ दागिने पावले २ त्या बा काम गंगथडी प्रकरणीं जालें नाहीं.

३१५००० मा केशवदास मारवाडी यांजकडून वसूल आले.

३९९०००

याचा भरणा.

८४००० नाना फडणवीस असतां पावले दागिन्याबा.

१६५००० श्रीमंताच्या खासगीकडे नानांनीं देविले, बा हुंड्या ७५०००, ७५०००, १५०००.

२४९०००

बाकी रुा १५००००

पैकीं वसूल रुा

२५५००० हस्तें खंडो मुकुंद जवाहीर.

१०००० आंगठी हिऱ्याची.

२५०० बाळ्या हिऱ्याच्या.

१२५००

१३००० हत्ती नग २

८००० यात्रा सुंदर.

५००० खुदाबक्ष.

२५५००

१५०० हत्तीचा सरंजाम गाषे व चरिंदा वगैरे यांस खर्च बा याद.

३००० दुकान खर्च दरसेंहे रुा २ प्रों.

३०००० हुंडी गुा द्वारकादास नामें हरदास याजबा रवाना केली ते ऐवज आला नाहीं.

२५००० कित्ता हुंडी नारायण बाबूराव याणीं आणिली. ती हस्तें विठोजी गायकवाड सासवडास जातां.

१००० हुंडणावळ खर्च सरासरी पंचवीस हजार वगैरे.

११००० भागटीक हीरे याचा लोलकास मोत्यें व हिरे व पाचेचे लोलक.

५००० धर्मदाव बापूभट लेले.

४५००० नाणें अजमासें हिशेब जवळ नाहीं. सबब चूकभूल मजुरा द्यावी.

१४७०००

बाकी रुा ३०००

नारायण बाबूराव यांस बक्षीस रुा तीन हजार करून, सदरहु ऐवजाचा जमाखर्च समजाविल्याप्रों मजुरा असे. छ ६ रमजान सलास मयातैन, पौषमास.

पत्रांक ६२७ श्री लक्ष्मीकांत. १७२४ माघ वद्य १

राजश्री नारायणराव वैद्य गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोंसले सेनासाहिबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावें. विशेष. यापूर्वीं तुम्हांकडील पत्रांचीं उत्तरें वरचेवरी व रांगडे माणसासमागमें जीं पाठवावयाचीं तीं पाठविलीं आहेत. पोहोंचून सविस्तर समजण्यांत येईल. राजश्री सदाशिव बापूजी याणीं तेथील ऐकिलें जें वर्तमान तें लिहिलें होतें. हें समजोन त्याचेंहि पत्राचें उत्तर पाठविलें आहे. व प्रसंगींचें वर्तमान राघो-धोंडदेव लिहितां कळेल. वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहित जावें. रा छ १४ माहे शवाल. बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ६२८ श्री. १७२४ माघ वद्य ५

राजश्री माधवराव गोसावी यांसी:—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चत्रसिंग राजे भोंसले दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. बाबाजी शिवराम येथून जाऊन काा वांईत राहिला आहे. त्यास घेऊन येण्याविशई राजश्री व्यासराव इंब्रीर यांस लिहिलें आहे. त्याप्रमाणें बंदोबस्त करून घेऊन येतील. त्यास, काा मजकुरीं हर कोण्ही दिक्कत घेऊन अडथळा केल्यास, आपण ताकीद करावी. रा छ १८ सवाल बहुत काय लिहिणें ? हे विनंति. लेखन सीमा.

श्री
श्रीराजाशाहूछत्रपती
चरणकमलाविनत
चतरसिंह राजे भोंसले
अविरत.

पत्रांक ६२९ श्री. १७२४ माघ वद्य १२

राजश्री नारायेणराव दादा गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्यो गुजाबा गुजर दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. त्यास, त्याचप्रमाणें वरचेवरीं पत्र पाठऊन कुशल वृत्त लेहून पाठवीत जावें. येणेंकरून संतोष असे. जीं पत्रें तुमचेकडून येतील त्यांचींहि उत्तरें येथून पाठवण्याचें घडत जाईल. वरचेवरी तुह्मांकडून पत्रें येत असावीं. प्रेम व लोभार्थ आहे तो दिवस वृद्धी पावावा, हाच येथील संतोष. त्याविसीं ल्याहावें ऐसें नाहीं. रा छ २६ माहे शवाल. बहुत काय लिहिणें ! हे विनंती.

पत्रांक ६३० १७२४ माघ.

++ विले आहेत. ते सरंजाम सुध्धां मौजे विंचूर परगणें उत्राण येथें येऊन पोंहचलें. सरंजाम थोडा ह्मणून त्यांणीं हिंमत धरून आणखी स्वार व पाव लोक जदीद ठेविले आहेत. त्यासुद्धां त्यांचा सरंजाम दीड हजार स्वार व दीड हजार गाडदी यो तीन चार हजारांचा भरणा त्यांचा आहे. लौकरच येऊन पोंहोंचतील. यानंतर राजश्री गोपाळराव राजेबाहादर मालेगांवास येऊन महिनादीड महिना जाला, राहिले आहेत. म्हणोन त्याजकडे सरसुभाहून पत्रें पाठविलीं कीं, पठाण वगैरे यांचे पारपत्याविषयीं सरकारांतून आज्ञा जाली आहे, तरी सरंजाम सुध्धां येऊन पोंहोंचवावें व राजश्री नरसिंहराव यांणींहि सदरहूअन्वयें पत्रें पाठविलीं. त्याचें उत्तर चैत्र शुद्धांत येतों, ऐसें आलें. परंतु अद्याप आले नाहींत. त्यास सरकारांतून आज्ञापत्र सादर जालें पाहिजे. ह्मणजे सरंजामसुद्धां येतील. सारांश पठाण व पेंढारी वगैरे यांणीं प्रांतांत जागाजागा धामधूम मनश्वी केली आहे व हालींहि बारा तेरा हजार फौजेनसीं आपले जागा मजबुदीनें आहेत. यास्तव त्यांचे मुकाबल्यास आपलेकडील फौजेचा जमाव जाला ह्मणजे स्वामीचे प्रतापेंकरून त्यांचें पारपत्य लौकर होऊन येईल. वर्तमान कळावें, ह्मणून सेवेसीं विनंति लिहिली असे. कृपा करून, ध्यानास आणून आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पत्रांक ६३१ श्री. १७२४

यादी टप्पे डांकेचे पुणियापासून नामपूरमोराव्यापर्यंत बसवावयाचे सुा सलास मयातैनः—

१ सुा पुणें.
१ मौजे धाणोरे पुण्यापासून कोस ३
१ मौजे चरोळी नदी इंद्रायणी कोस २॥

१ मौजे पिंपळगांव नदी भीमा कोस ३
१ कसबे केंदूर कोस ३
१ मौजे लोणी कोस ४
१ मौजे सिंगवे, पारगांव घोडनदी कोस ३
१ मौजे गांजेवाडी कोस ३
१ मौजे बोरी, सिरोळी, नदी कुकडी कोस ३
१ का। आळें कोस २॥
१ मौजे बोटें कोस ३
१ मौजे आंबें धारगांव नदी मुळखडी ३
१ मौजे करजुलें कोस ३
१ मौजे पाझोली चमापूर हणमंतबारी ३
१ का। संगमनेर नदी प्रवरा कोस ३
१ मौजे मलदास कोस ३
१ मौजे जिमोन कोस ४
१ का। देपूर कोस ४॥
१ मौजे खंडागळी व डांगळी कोस ३॥
१ मौजे साडले ताराचें कोस ३
१ मौजे नांदूर मधमेश्वराचें नदी गंगा कोस २
१ मौजे सोनेवाडी कोस ३
१ मौजे सिरसाळें कोस ४॥
१ मौजे शेळू कोस ३॥
१ मौजे रामेश्वर कोस ३
१ का। लाहोनेरटे गोडे कोस ४
१ मौजे पिंपरी कोस ४
१ मौजे आजमेर सवधाणें कोस ३
१ मौजे खोडे कोस ३
१ का। नामपूर कोस ३

३० ९३

पार्सी जासूद आ.
६० डांकेस टप्पे ३० यो

२ कोतल.

३ कारकुनाजवळ.

१ कारकून २ जासूद.

६५

पत्रांक ६३२ श्री १७२४

यादी साहेबराम कुंमदान. सु॥ सलास मयातैन व अल्लफ. सरकारांतून मनोहरगीरबावा गोसावी यांस एक पलटणची भरती करावयासी सांगितली. त्यास, आह्मीं बावांचे पलटणची भरती बारार्शे लोकांची केली. पलटण जमऊन च्यार वर्शे पावेतों सरकारचाकरी केली. तेव्हां गोसावीबावांची व आमची कांहीं जिकीर जाहली. मग, आह्मी निघून वेगळे जाहलों. घरास गेलों. घरीं एक वर्श राहून येथें आलों. नंतर राजश्री आबा काळे यांणीं आह्मांस श्रीमंतांपाशीं नेऊन भेटविलें. मग, सरकारांतून आह्मांस दोनसें लोक जेजालबारदार ठेवावयासीं आज्ञा जाहली. आह्मीं पंनास लोकांची हजीरी दिल्ही. आजपो सरकारचाकरी केली. खर्चास एक पैसा सरकारांतून पावला नाहीं. पदरचे हजार रुपये खर्चून खराब जाहले. त्यास, हालीं जितकी नवी भरती करावयाची आज्ञा करतील तितकी भरती करीन. याप्रों माझा बंदोबस्त सरकारांतून करून दिल्हा पाहिजे हे विनंति.

पत्रांक ६३३ श्री. १७२४

यादी गारदी दिंमतहाय नि॥ आपाजी बहिरट व आपाजी कोडे सु॥ सलास मयातैन व अलफ. दोनी पलटणें लष्करांत जावयाविशीं आज्ञा जाहली. त्यामध्यें बंदोबस्ताचीं कलमें:—

१ लष्करांत जावयाचें त्यास, चाकरी घेऊन पैका कोणी द्यावा? त्यास पत्रकीं, यांची हजीरी घेऊन पेस्तर माहापैकीं खर्चास द्यावें.

१ दारू, गोळी, बाण, व बाणदार देवावयाची आज्ञा.

१ तोफा तीन द्यावयाच्या त्या कोणीकडून घ्याव्या? त्याचे दरोग्याचे कारकून ज्याचे ते बरोबर असावे किंवा कसे? ते आज्ञा.

१ आमचें बोलणें हरएकविशीं गोविंदराव बोलतात. हालीं लष्करांत जावयाची आज्ञा. त्यास, येथें बोलणें त्याजवळच बोलावें किंवा कसें? ते आज्ञा असावी.

१ रबिलाखरपौ च्यार हजार रुपये देविले ते अद्यावत् पटत नाहीं.

आठां–चौंहों दिवसांचे मुदतीनें वरात देविल्यास मोबदला करा-
वयासीं येईल.

५

पत्रांक ६३४ श्री. १७२४

यादी निा बाळोजी कुंजीर. सुा सलास मयातैन.

१ ताो सुवर्णदुर्ग.
१ ताो रायगड.
१ किल्ले सातारा.
१ किल्ले घनगड.
१ किल्ले चंदन.
१ किल्ले वंदन.
१ पाो सुपें.
१ पाो बाहादूरपुरा.
१ किल्ले पुरंधर.
१ किल्ले वडना गड.
१ पाो एकोंडी ताा धारवाड.
१ पाो कोकुसा सामली.

पत्रांक ६३५ श्री. १७२४

यादी गुलाम बदीयुदीखान किल्ले पेमगिरी. आमचे सरंजामाचे गांव च्यार गुदस्तां सरकारांत घेतले. याजमुळें खर्चाची वोढ जाहाली. किल्ले दोन स्वाधीन आहेत. होळकराकडील फौज किल्यानजीक आली. कोणे समई कसा प्रसंग येतो, याचा भरंवसा नाहीं. खर्चावांचून किल्यांतील लोक हवाल-दील. खर्चाची तारांबळ. याजकरितां सेवेसी विनंतीपत्र पाठविलें. त्याजवरून, गांवाविशींचा मजकूर राजश्री चिंतोपंत यांजपाशीं बोलावा, म्हणून आज्ञा जाली. नंतर देशमूख यांणीं राजश्री भाऊ सरंजामी यांस बलावून आणून, सरंजाम पाौ किल्याकडे नेमणूक काय व जातीकडे किती, याची चवकशी केली. जातीस व किल्यास मिळोन वरात सरंजाम गांव मोघम आहे. आमचे वडिलांकडे मोंगलाईतून सदरहू सरंजाम व किल्ले होते. ते अलीबाहादूर यांचे मातोश्रीचें लग्न जाहालें, तेव्हां सदरहू सरंजाम व किल्ले सरकारांत दिल्हे. नंतर सरकारांतून किल्ले पेमगिरी व सोनगड दोन किल्ले व सरंजाम गांव व इतलाख वरात मोघम आमचे वडिलांस दिल्हेत. आजपर्यंत सरका-

रांतून कृपा करून चालविलें. त्याप्रों साहेबांनीं कृपा करून गांव आमचे आह्मांकडे देववावयाची आज्ञा होऊन पूर्ववतप्रों चालविलें पाहिजे.

पत्रांक ६३६ श्री. १७२४

राजश्री येशवंतराव होळकर यांस पत्र कीं, प्रो देवासें निा राजश्री तुकोजी पवार व आनंदराव पवार यांजकडे सरंजामास सरकारांतून आहे. त्यास, तुह्मां-कडील पठाण यांणीं माहालीं मोठा प्रळय करून लाखो रुपये खंडणी, खेरीज खर्च, मनस्वी घेतला. त्याखेरीज माहालची तसनस बहुत केली. महालचे रयतीची कांहीं स्थित राहिली नाहीं. दोन सालांचा वसूल रुो अनर्थ करून नेला. तुह्मांस राजश्री खंडेराव होळकर यांचीं पत्रेंहि गेलीं असतां, मनाई जाली नाहीं. तुह्मी श्रीमंतांचे घरचे असतां सरकारचे सरदार यांचे माहालास उपद्रव द्यावा, सरदार यांणीं चाकरी कशावर करावी, हा अर्थ ध्यानांत न आणितां, ऐसा अर्थ घडला. या उपरी देवासें माहालावर तुह्मांकडोन को-णेविशीं उपद्रव होऊं नये. येविशीं आपले सरदारांस निक्षूण ताकीद करून, बंदोबस्त करून, पत्राचें उत्तर पाठविणें.

पत्रांक ६३७ श्री. १७२५ चैत्र वद्य ६

रााविराजित राजमान्य राा गंगाधरपंत तात्या यांप्रति शुभचिंतक पर-शराम बापू धर्माधिकारी आशीर्वाद उपरी. तुह्मांकारणें खरबुजें दिलीं मण, व घडे, शेवद व डांगेर, ऐसीं तरकारी गाडा एक भरून पाठविली आहे. ते घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. बेलापुरीहून यशवंतराव होळकर यांचें कूच होऊन पुणतांब्यास गेले, ह्मणून वाटसरांनीं सांगितलें. खचीत बातमी आलियावर मुजरद लिहून पाठऊं. गांवचें वर्तमान आज ताा यथास्थित कड-वल लोकसुद्धां. असें बाजारवदंता ऐकितों कीं, माने वगैरेंस फिरंगियानें अड-विलें, सबब होळकर माघारा जाणार, ह्मणून ऐकिली वार्ता लिहिली. सत्य-मिथ्या देव जाणे. खरबुज वगैरे तुह्मीं आपले घरींहि कांहीं द्यावीं. वरकड सर-कारांत द्यावीं. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद. चैत्र वाा ६

सेवेसी राणूजी हवालदार याचे रामराम. लिा परिसोन कृपा निरंतर असों द्यावी. हे विनंति.

स्नो रामचंद्र रावजी सां नमस्कार विज्ञापना ऐसिजेः लष्करची गडबड अमळशी स्वस्थ जाली ह्मणजे, चिरंजीव शेवेसीं येतील. पुणतांब्याहून कूच जाइलें, ह्मणजे घोर वारेल. तों पावेतों तिरस्थळीचे लोक भयाभितच आहेत. श्रीकृपेनें सर्व उत्तमच घडेल. कळावें हे विनंति.

ता कलम. कागद कोरा अगदीं येथें मिळत नाहीं. अर्धा दस्ता तरी अगत्य पाठवावा. हे विनंती.

श्रीमंत मातुश्रीस सां नमस्कार.

पत्रांक ६३८ श्रीलक्ष्मीकांत. १७२५ आषाढ वद्य २

राजश्री नारायणराव वैद्य गोसावी यांसीः——

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुह्मी एकदोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. व राजश्री सदाशिव बापूजी यांचे लिहिल्यावरून व राघो धोंडदेव यांचे विनंतीवरूनहि सविस्तर समजण्यांत आलें. त्यास, येथील प्रकार वरचेवरी राजश्री सदाशिव बापूजी यांसी लिहिण्यांत येत आहे. त्याजवरून तुम्हांस समजतच आहे. व हालीही कित्तेक प्रकार मशारनिलेस लिहिण्यास बाकी ठेविली नाहीं. तेहि तुम्हीं समजोन घ्यावेत. व राघो धोंडदेव यांसीहि सर्व प्रकार सांगण्यांत येत असेत. ते लिहीत असतील व लिहितील, त्याजवरून समजण्यांत येईल. तुम्हीहि चांगलें मनन करून व तेथेंहि बोलावयाचें तें बोलून, जी सलाह असेल ती लेहून पाठविणें. तुम्हांसी येथील दुसरा प्रकार आहे, ऐसें नाहीं. तेव्हां हाच भरंवसा आहे कीं, जें घडणें तें समजोन घडेल. व चांगलेंच समजण्यांत येईल. व तुम्हीं सुचविण्यास कमी कराल ऐसें नाहीं. पुढील विचार तुमचे ध्यानांत नाहींत, ऐसें नाहींत. तेव्हां बरें वाईट चांगलें पाहून, जी सलाह तेंच ल्याहावें. येथील लक्ष तो एकच आहे, ही खातरजमा पुर्ती असावी व आहेच. तेव्हां तपशील ल्याहावा, ऐसें नाहीं. पत्राचीं उत्तरें अति सत्वर यावींत. व त्याजवर येथील लक्ष राहावें, हेंच चित्तांत लागून आहे. आपले कडूनहि सुचतें तें लिहिण्यांत कमी करीत नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. हे सर्व प्रकार लिहिल्यावरूनच लक्षांत येतील. वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहित असावें. रा छ १६ माहे रबिलावल. बहुत काय लिहिणें ? हें विनंती. मोर्तबसुद. शिक्का.

पत्रांक ६३९ श्री. १७२५ आषाढ वद्य ४

० श्री
मार्तंड चरणीं तत्पर
बाळोजी कुंजीर
निरंतर

अज दिवाण किल्ले सातारा ता मोकदमाजी, मौजे माहागांव व सा निंब प्रांत वाई. सुा अर्बा मयातैन व अल्फ. तुम्ही वैद्याचे उपद्रवामुळें तजावजा जाहाला, म्हणोन विदित जालें. त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी, मौजे–मारीं येऊन किर्दमाहामुरी करणें. हर कोणाचा साहूकरी वगैरे उपद्रव जाहाल्यास समजोन घेऊन ताकीद केली जाईल. जाणिजे. छ १८ रबिलावल. मोर्तब सुद.

मोर्तब
सुद

पत्रांक ६४० श्री. १७२५ आषाढ वद्य ११

सेवेसी जिवाजी निराजी कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना ता आषाढ वा ११ गुरुवार पावेतों मुकाम पागा कुंभारगांव वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें, तें पावलें. पत्रीं आज्ञा केली जे, गारदौंड येथें शामसिंग कंपू आहे. त्यास, इंदापुरी राजश्री धुळोजी हुजरे याजकडील विठलपंत आहेत. त्यांनीं दोन वेळां येथील खंडणी घेऊन, मागती स्वार पाठऊन, येथील चौगुला यमाजी बुमाल नेऊन बैसविला आहे. नित्य स्वारांचे खर्च घेतात. त्यास, मनाईचें पत्र घेऊन पाठवितों, ह्मणून लिा. त्यास, अद्याप पत्रें आलीं नाहींत. येथें तों नित्य उपद्रव आहे. आणि अलीकडे, राजेम्हमद तोफखानां आहे, त्याचा चुलतबंधू इभ्रामखान जितींत आहे, त्याजपाशीं पागा आहे. त्यांनीं येथील मोकदमाचे नांवें चिठी लिहून, तमाम कुरण जसी आपल्याकडे आहे, कुरणांत पागेचीं घोडीं वगैरे उपसर्ग न देणें, ऐसें लिहून पाठविलें आहे. तें व जिन्नस पत्र पाठविलें आहे, याचे बंदोबस्त लवकर करून पाठवावे. आह्मी येथून जितीस सगुभाईस बोलावयास

पाठविला होता. तो पागा घेऊन इभ्रामखान करकंभोसें येथ गेला आहे. त्याचे कारकून होते त्यांनीं सांगितलें कीं, भोसेंकडून चिठी आली कीं, तमाम कुरणें जप्ती करणें. त्याजवरून चिठी पाठविली आहे. नागपंचमीस गांवास येणार आहे. तुह्मी येऊन बोलावें, आह्मांकडे गुंता नाहीं, ऐसें सांगितलें. आपण तेथें सर्व बंदोबस्त करून, लवकर पत्रें घेऊन पाठवावीं. पाऊस थोडा बहुत पडला आहे. कुरणाची रखवाली करविली आहे. गवत आठपंधरा दिवसांनीं होईल. हाल्लीं घोड्यांस कडवल मका घेऊन चारितों. चरावयास घोडीं सोडिलीं आहेत. कंपूकडील गारदौंडाहून चिठ्या होऊन, तमाम आसपास कडबा म्हणोन खंडणी घेतात. त्याचेहि लवकर बंदोबस्ताविशीं पत्र पाठवावें. राजेमहमद याचे नांवचें पत्र इभ्रामभाईस मनाई व धुळोजी हुजरे यांजकडील विठलपंत कारकून इंदापुरीं आहे त्यास चिठी पाठवावी कीं, दोन वेळ घांसदाणा घेतला असतां, मागती मुंगीचे राजाचे खंडणी देणें ह्मणून स्वार पाठऊन यमा चौगुला धरून नेला आहे तो सोडून द्यावा. एकंदर गांवास उपद्रव न देणें, म्हणोन धुळोजी हुजरे याचें पत्र घेऊन पाठवावें. खिलारी याचे उपद्रव भारी आहे. दों चौं रोजांनीं सगुभाईस राक्षसभुवनास ऐवज वसूल करून आणावयास पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ६४१ श्री. १७२५ भाद्रपद शुद्ध १०

सेवेसी विनंती. सेवक बाळाजी रघुनाथ कृबस्नेक सां नमस्कार विज्ञापना तागायत भाद्रपद शुा १० मंदवार पावेतों मुकाम नागपुर वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नाहीं. तेणेंकरून चित्त उदास आहे. तरी, ऐसें नसावें. सदैव......पत्रीं सांभाल करीत जावें. यानंतरः आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते मौजे आकुळनेराकडून पैठणास आलों. तेथें वर्तमान ऐकिलें कीं, सरकारचीं वस्त्रें व जवाहीर व हत्ती श्रीमंत मन्याबापूपाशीं सेनाधुरंधर या पदाची घेऊन, नागपुरास सदाशिवराम गुणे यांस रवाना केलें होतें. त्यांस, का। आंबडापुरीं पूर्वीं शरीरीं समाधान नव्हतेंच, कामारीं वायूचा उपद्रव होऊन स्वस्तिवडेगांवीं आले. तेथें उपाय केले. परंतु गुणावर न पडतां देवआज्ञा जाहाली. हें आपणांस कळलेंच असेल. त्याहावें ऐसें नाहीं. पैठणाहून दरमजल वर्धा उतरून सारवाडीस आलों. तेथें राजश्री मल्हारजी नाईक जासूद भेटला. त्यास विचारिलें की, तुह्मी पुणें पाहून निघाल्यास फार दिवस जाले असतां मार्गींच! तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, सदासिवपंताचा काळ वडेगांवीं झाला. हें वर्तमान पुणेयास श्रीमतांस लिहून पाठविलें. त्याचें उत्तर येई तोंपावेतों वडेगांवींच होतों. उत्तर आल्यानंतर, हत्ती वगैरे कारखाना घेऊन, नागपुरास जाणें. मागाहून लिहिण्यांत येईल तसें करणें. याजवरून सरंजाम घेऊन जातों.

आम्हांस त्यांणीं विचारिलें; त्यास सांगितलें, त्याप्रांतीं पांच रुा येणें आहेत त्यास फार दिवस जाले, जाऊन उद्योग करावा. नंतर निघोन नागपुरास श्रावण शुा २ स दाखल जालों. राा सेनासाहेबसुभा यांची व मुछदीमंडळी वगैरे यांची भेट घेतली. पत्रें दिलीं. भाषणें ममतेचींच जाहालीं. आपल्याठायीं लोभच दिसतो. कळावें. राा माहादाजी हरी यांणीं पेशजी कटकची सुभेदारी केली होती. ती हल्लीं राजश्री राजारामपंत करितात. मारानिलेस येथें मागील गोसावी व सावकार यांचा पेंच व अलीकडे पोटास वगैरे घेतलेयाचा गवगवा. नित्य उठोन धरणेंपारणेंयांसी संबंध. याजमुळें श्रीमंत बापूसाहेब कृपाळू होऊन, फडनिशीचीं वस्त्रें वैशाखमासीं दिल्हीं. त्यापासून जातच आहेत. अद्याप पावेतों तेथील नेमणूक व कागदपत्र हातास आला नाहीं. त्यास, आतां चहूं दिवसांत येऊन निघोन जातील, ऐसें दिसतें. मीहि त्यांस ऐवजाविशीं जें बोलणें तें बोलिलों. त्यांणीं सांगितलें कीं, जो प्रकार आहे तो कोणताहि लोपला नाहीं, दृष्टीस पडतच आहे. सांप्रत पैसा निर्माण व्हावयाचा दिसत नाहीं. राा अनंतभट चितळे यांजवर सरकारचा पेंच आला आहे म्हणोन रोहिले यांच्या पाहाऱ्यांत आहेत, त्याजकडूनहि सध्यां कांहीं येतां दिसत (नाहीं). मामलती संबंधें पेंच आहे, तो उरकल्यानंतर जें घडेल तें खरें. उरकण्यास वर्ष साहा महिने पाहिजेत. याच अन्वयें सर्व ज्याकडे आपले पांच रुपये यांची दशा कांहीं चांगली नाहीं. मनुष्यमात्र खराबींत आहेत. त्याहि मध्यें या प्रांतींचा ऐवज वसूल विनादाबा शिवाय होत नाहीं. त्यास श्रीनें कृपा केली आणि श्रीमंत नाना व तात्या यांची कृपा संपादून घेतली, आणि वकीलीचें काम करून घेतलें, आणि पूर्ववत्प्रमाणें चालिलें ह्मणजे पांच रुा सहजांत वसूल होईल, येविशीं पुणेंयास विनंतिपत्रें दोन चार लिहिलीं आहेत, तेथें सविस्तर लिहिलें आहे. आपणांस कळलेंच असेल. कळावें लोभ किजे हे विज्ञप्ति.

पत्रांक ६४२ श्रीलक्ष्मीकांत. १७२५ भाद्रपद वद्य १

राजश्री अमृतरावजी गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपणाकरितां विजयादशमीचा पोशाग्व पाठविला आहे. याची यादी अलाहिदा असे. त्याप्रमाणें घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. रवाना छ १५ माहे जमादिलावल. बहुत काय लिहिणें ! लोभ असों दीजे. हे विनंती. मोर्तबसुद. शिक्का.

पत्रांक ६४३ (नकल) १७२५ आश्विन शुद्ध १०

दौलतराव शिंदे यांस कीं: कैलासवासी पाटीलबावा तेरा वर्षे हिंदुस्तान प्रांतीं राहून, श्री मारुती प्रमाणें महापराक्रम करून, प्रभुदर्शनास आले. त्या समई होमहवन करून, विध्युक्त भेटी तें विपरीत जालें ! परंतु, पाटीलबावा श्री नरसिंहासारिखा विलोकन करित बसला आहे आणि श्रीमंत कैलासवासी माधवराव नारायण मुख्य प्रधान आमचे जगत्पिते हे कोणी मेले ह्मणतात. आह्मी तों कलेवर दहनच केलें. कोणी जिवंत ह्मणतात. याचा निश्चय मजला होईना. आपलें त्यांचें परम ऐक्य होतें. निरोप जात येत होते. मीं जाण आहे. आणि पाटीलबावा महाज्ञानी, देशीं आले. त्यास, पत्रें भविष्याचीं श्री जगद्गुरूचीं प्रसादपूर्वक आलीं असतां, कारभारी यांणीं पावो न दिलीं. याची रुजुवात हावी तर त्यांतील कोणी आहेत नाहीं हेंहि न कळे ! परंतु राजश्री कल्याणराव कवेली बापू सांगतां ध्यानास येईल. आपण नातु होता. तें पुत्रत्व पावलां. खर्ड्यांची स्वारी फत्ते जाली, याजपासून मेळविलें किती, हारविलें काय, याचा विचार दीर्घदर्शी यांणीं करीत असावा. तसा केलीया अधिकार चिरकाळ ज्याचा तेच करतील. मी वृद्ध, श्री महायात्रेस श्री भानूस बाळअर्पण परम संकटीं केलें. त्या घेऊन जावयाकरितां भाा शुद्ध १३ शुक्राचे अस्तापूर्वी प्रस्थान केलें. त्या रवानगीची तर्तूद सेनापतीकडे व गृहस्थाकडे ऐवज येणें त्याचा हिशेब करून पैकीं निमे तूर्त रवानगीस देवऊन, बाकी सोई सोईनें घेऊं. बहुत दिवसांचा कारभार. सरदारीस कधीं ओढ नाहीं, असें पाहिलें ना ऐकिलें. परंतु अगत्य मात्र पाहिजे. आणि ज्याचें वाजवी देणें तें दिल्यानेंच बरें, हें अंत:करणीं असावें. या पत्रांचें उत्तर पुण्यांतील वकीलासह मजला असावें. वरकड अकरा वर्षांचे मजकुराची माहितगारी प्रचीतपूर्वक चिरंजीव राजश्री सदाशीराव बल्लाळ आपले पाग्ये होते (त्यास) कौतुकानें विच्यारिलें असतां विनंति करीत जातील. माझीं कामें त्रिवर्गांनीं चित्तावर घेतल्यास केवळ सुलभ आहेत. हिशेब मात्र वाजवी रितीनें करावयासी आज्ञा व्हावी. ऐवज सोईवार दाखवून घेईन. सरकारनुकसानी करावयाची नव्हे, एकादा शब्द अयोग्य लिहिण्यांत आला, तरी मी वेड्यासारिखा. केश, नखें, वाढविलींच आहेत. त्याचे बोलण्याचा व लिहिण्याचा राग कोणासही घेऊं नये. मार्गाचें दस्तक आणि उत्तर यावें. ह्मणजे सोबत पाहून दर्शनास येईन. मर्जी नसिल्यास वसईस माझें घर. वसई घेतल्यापासून वसईच आहे. तेथें भेटावयासी जाईन. तेथून सुरतेवरून श्रीनर्मदातीरीं शुक्रतीर्थीं केश नखें श्रीत्यपापें आहेत, ती टाकून पायागडाकडून उज्जनीस माहाकाळ पाहोन पुढें जाऊं. पत्र १

पत्रांक ६४४ (नकल) १७२५ आश्विन शुद्ध १०

दौलतराव शिंदे यांस पत्र कीं: कैलासवासी पाटील बावा तेरा वर्षें हिंदुस्तान प्रांतीं राहून श्री मारुती प्रों महापराक्रम करून प्रभुदर्शनास आले त्यासमई होमहवन करून विध्युक्त भेटी व्हाव्या तें विपरीत जालें. परंतु पाटीलबावा श्रीनृसिंहासारिखा विलोकन करीत बसला आहे. आणि श्रीमंत कैलासवासी माधवराव नारायण मुख्यप्रधान आमचे जगत्पीते कोणी मेले म्हणतात. आह्मी तों कलेवर दहनच केलें. कोणी जिवंत म्हणतात. याचा निश्चय मजला होईना. आपलें त्यांचें परम ऐक्य होतें. निरोप जात येत होते. मी जाण आहें, आणि पाटीलबावा महाज्ञानी देशीं आले. त्यास पत्रें भविष्याची श्री जगद्गुरूचीं प्रसादपूर्वक आलीं असतां, कारभारी यांणीं पावीं न दिलीं. याची रुजवात हावी तर त्यांतील कोणी आहे नाहीं हेंहि नकळे. परंतु, राजश्री कल्याणराव कवेली बापू सांगतां ध्यानास येईल. आपण नातु होतां ते पुत्रत्व पावलां. खर्ड्यांची स्वारी फत्ते जाली. त्यापासून मेळविलें किती, हारविलें काय, याचा विचार दीर्घदर्शी यांणीं करीत असावा. तसा केलिया अधिकार चिरकाल ज्याचा तेच करतील. मी वृद्ध, मी माहायात्रेस भानूस बाल अर्पण परम संकटीं केलें. त्यास घेऊन जावयाकरितां भाा शुा १३ शुक्राचे अस्तापूर्वीं प्रस्तान केलें. त्या रवानगीची तर्तूद सेनापतीकडे व ग्रहस्थाकडे ऐवज येणें. त्याचा हिशेब करून पैकीं निमे तूर्त रवानगीस देवऊन बाकी सोईसोईनें घेऊं. बहुत दिवसांचा कारभार. सरदारीस कधीं वोढ नाहीं, असें पाहिलें ना ऐकिलें ! परंतु अगत्य मात्र पाहिजे. आणि ज्याचें वाजवी देणें तें दिल्यानेंच बरें. हें अंत:करणीं असावें. वरकड अकरा वर्षांचे मजकुराची माहितगारी प्रचीतपूर्वक चिरंजिव राजश्री गोपाळराव हरीबापू व चिरंजीव राजश्री सदाशीवराव बल्लाळ आपले पाग्ये होते. (त्यास) कौतुकानें विचारलें असतां विनंति करीत जातील. माझीं कामें त्रिवर्गांनीं चित्तावर घेतल्यास केवळ सुलभ आहेत. हिशेब मात्र वाजवी रीतीनें करावयासी आज्ञा व्हावी.

पत्रांक ६४५ १७२५ आश्विन शुद्ध १०

रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांस (पत्र) कीं: बहुत दिवस जाले. दर्शनाभाव म्हणून चातकन्यायें मार्गप्रतीक्षा करीत असतां, पूर्वेकडून हस्तनक्षत्रास वायु घेऊन अमृतवृष्टी करीत असतो. हा स्वभाव. तसेंच श्रवणांत आलें. तेणेंकरून परम संतोष जाहला. त्यांत अठराभार वनस्पतीसह जलचरस्थळचरखेचरांसह आनंद जाला. त्यांत मी एक चातक बहुत दिवसांचा तृषार्त. तो तृप्त कसा न होय ? यानंतर उभयपक्षीं हितकारक विजयादशमीचे मुहूर्तें कागद सैन्यांत रवाना केले. त्यांत पांच कलमांची पुा सेनासाहेब सुभा यांस कार्याचा अवसार जाणून अलाहिदा पुरवणी लिहिलीच आहे. त्यांत

सामान्यांचा स्वभाव, आपलें कार्याचें स्मरण असावें, दुसरेयाचें विसरावें. तसें आपण न व्हां. उदार चित्तानां तु वसुधैव कुटुंबकं, असें जाणून विस्तारें लिहिलें आहे. श्रवण करून, मागील श्रवणाचें मनन करून, श्री महायात्रेंत जावयाचे साहित्यांत तूर्त दस्तक व पत्राचें उत्तर पाठवावयासी आज्ञा होऊन पत्रदर्शन मजला होईल तोच चंद्रचकोरासम आनंद होयसें केलें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? लोभाची वृद्धी करीत असावें. हे विनंती. ये विशींचें उत्तर आपले कडील वकील पुण्यास असतील त्यांस खोलून ल्याहावें. ह्मणजे मजशीं बोलून समजाऊन उत्तरें दाखवीत असें व्हावें. हे विनंति. पत्र १

पत्रांक ६४६ १७२५ आश्विन शुद्ध १०

रघोजी भोंसले यांस पुरवणी पांच कलमाची लिहून पाठविली त्याची नकल.

१ खर्ड्याची स्वारी फते होऊन आलियावर गारपिराचे मुकामीं साडे साहा सुश्लोकें करून लिहून पत्र दिलें होतें. त्यांत सारांशः——हा छळवाद. त्या छळवादें करून अयादवी पृथ्वी जाली. तेथें ईश्वरास माधवाचा पाड काय ? त्याच पत्राचें आश्वासनावरून श्रावणी पौर्णिमेस चंद्रग्रहणीं वृष्टी जाहली, हें विश्व जाणतें. भेटीनंतर ध्यानास येईल. तो विवाद वृंदाकृष्णाचा कूटरूपें लिहिला आहे. त्याणीं आमचें शासन केलें. तसेंच श्रीद्वारकेच्या बेटावर टोपीवाले यांनीं तोफा मारिल्या. त्या रागें स्त्रीपुरुषांनीं ऐकून मुंबईचे घरास अग्न लाविला. हें विश्व पाहत होतें. तस्मात् अपराध ज्याचा त्याजकडून ईश्वर करवित असतो. त्याजवर पुन्हां सोंगाचे संपादनीस मोठी मजल करून वाघोलीचे मुकामीं एकादशीस आलां. तेथें मी भट पुढें येऊन, प्रथम भेटोन, खानसमई सांगोन, या स्वारीचा तीर्थोपाध्या मीच आहें, म्हणोन बोलोन, मागील पत्राचा मजकूर पुसिला. तों नागपुरास राहिले. ह्मणून उत्तर जालें होतें. संगमानजीक साहा महिने मुकाम जाला होता. त्यांत पांच सात वेळां दर्शनास कांहीं गुप्त कांहीं प्रगटपणें कार्यकारण जाणोन आलों. त्या समई पूर्वपत्राची नकल दाखविली. ते अमात्यासह रामचंद्रपंत वकील वृद्ध यांणीं पाहोन, कांहीं आश्चिर्य कांहीं कौतुक मानिते जाले. त्या समई सिकारी प्रकर्ण दाखविलें व बोलिलों. त्यांत तात्पर्यः——मोठे मोठे शूर शूर सरदार लोक शिकारीस जात असतात. त्यास ज्याणें हेर दाखविली तो बक्षीस मागतो व प्रथम ज्याणें हतियार लाऊन सावज जखमी केलें, लंगडें जालें असतां मागाहून हुताशनीचे खेळासारखें आलें, त्याजवळ विभाग मागता. ह्मणून फिर्याद श्रीनगरीं अमरांचा सेनापतीसमान षण्मुखी सेनासाहेबसुभा, समवेत धिटूर सर्व राजनीत जाणते, चतुर, पंडित तिहीं समुद्रींचें एकवटलें. ते राजर्सी व छत्रपती व नाना नरेंद्राचेच वंशाचे. इच्छा करणें तें कांहीं मनास

आणून जें ज्यांचें उचित तें त्यांचें त्यास देवऊन आपलाले नगरास जाणें उचित. नाहीं तरी, अपराजितमुद्रा सुमुहूर्तें जाहालेली जारीच आहेत. माधवाची माधवांस माधवांत माधवासहित वडिलांचा मान बहु. सचिवाचे रीतीप्रों द्यावयाचा होता तें विपरीत कां जालें ? व घोडा प्रासादिक नजरेचा आला, तो नजरेनें पाहून शिष्यांचेच हवालीं केला. त्याचा खर्च पागेचेच अन्वयें येईल तसा येईल. टोळ पतंगासारिखे अनंत पूर्वेकडून येऊन समुद्रास भेटूं गेले. त्याचा प्रश्न केला होता. तेच हे माघारी द्वारकानाथानें पा. उभयदळीं प्रचित. सत्यमिथ्या दर्शनांतीं खातरजमा होईल. सांप्रत, वैशाखमासीं गोविंदराव दिवाण वैष्णव यांची भेट भांबवडेंयास जाली. सहज बोलतां, श्रीद्वारकेचें प्रकरण निघालें. त्यांत, त्यांचें धन्याचें नांव पुसतां, साहेब वसली ह्मणतां सहज येऊन फसली, असें श्रीगुरुमुखांतून वर्ण निघाले, त्यास साक्ष उभय आहेत. समय विशेषें भेटोन कळवितील. व सिकारी प्रकर्ण लिहोन दिल्हें. तें पाहोन कोठें ठेविलें. परंतु मालोजी घोरपडे, आमचे सरकाचे मानकरी, त्यांचे घरीं उभयतां बंधू मेजवानीस गेलां. घोडा मर्जीस न आला. ते खूण. त्या समईं सिकारीप्रकर्ण दोन बंद लेहून दिल्हे आहेत. प्रयोजन ज्यास आहे तें पाहूं. परंतु प्रसन्नतेनें बोलणें. किंवा तरह तुह्मी रामभक्त असतां न मिळाला. मी जोसी पातडें घेऊन बहु दिवस फिरलों. त्याचें सार्थक होण्यास लवहि नलगे. परंतु पांथिकाचे छायेचीं झाडें गेलीं. त्यांस बहुकाळ लागेल.

१ श्री माहायात्रेस जावयाचा मजकूर पत्रीं लिहिलाच आहे. त्यांत पितरांसह देवत्रयांस ज्याणीं निरपराध गांजिल्याचे दस्तऐवज ज्याचे असतील त्याजकडील संसर्गहि लागों नये. तरच कळयावर.

१ गयावर्जनाच्या साहा असामीं निपुत्रीकी. त्यांची नांवनिसीः--

फडके तीन ३. त्यांत पुत्र असोन आचार नाहीं आणि दत्तपुत्राचा अर्थ विश्व जाणतें. त्यापेक्षां धर्मपुत्रच बरा.

भानू सतेज होता. त्याचे जाल्यास पुन्हां सतेज होईल.

त्रिंबक नारायण मनोहर सुभा अहमदाबाद, ज्याणीं कोटी तुळशी श्रीद्वारकेचे देसास अर्पण करावयाचा संकल्प केला.

श्रीमंत माधवराव नारायण, आमचा जगत्पिता.

हे चैन पडों देत नाहीं. त्यामुळें मोठी उत्कंठा लागली आहे. घटी युगासम जाते. मी वृद्ध आणि परम संकटीं ! भानूस शिशु अर्पण केलेलें. अतिलालनपालन करीत नेलें. पैा, त्यास सुखासनीं बसोन शीतउष्णक्षुधातृषासह सर्व समृध्धी. भयाची बाधा न होतां, मार्गीं जातां जातां कालक्षेपार्थ ज्याची जे आवड ते पुरविली पाहिजे जे.

१ वृद्धास रागी, बागी, पारखी, नाडी, और न्याय ! उस पंचको गुरु है उमजत अंग सुभाव ॥ १ ॥

१ बाळास नाना प्रकारचे खेळ पाहिजेत.

१ बुद्धीमुळें समक्ष परोक्ष खेळणारें.

१ नरदा चहूं रंगाच्या च्यार च्यार. परंतु दोन बाजू समान. त्यांत जूग न करितां एकटे निर्बळी सांपडलें तरी घेऊन खेळ जमवावा.

१ गंजिफा. चंगा राणी कोण होती ? तिणें कल्पना केली ती मोठ्या मोठ्यांनीं मान्य केली. तितक्या सर्व पानावर नजर टेऊन आपली आगळीक.

१ ढाल तरवार, सर्व शिलेखाना अश्वासह असिर्षे.

या खर्चास पैका ज्याचा त्यांणीं ठेविला आहे. समजाऊन देईन. त्यास ताकीद मात्र जाली पो. ह्मणजे सव्याज देतील.

१ परसराम नो अनगल सातारकर यांचें कर्ज आपले वडिलांचे वडिलांकडे येणें बाा खत. त्यांस त्यांचें घर पुण्यांतील माझें कर्जांत गुंतलें आहे. त्यांणीं शिक्यानिशीं आपलें खत दाखविलें. आणि त्यांचे चिरंजीव सदाशीवनाईकही गयावर्जनाकरितां येणार. त्यास, खतांपैकीं आदा जाला असेल, तो वजा करून बाकी लेखाबाा हिशेब होईल तो दिल्या. उभयतां स्वर्गगामी होतसें करावें. श्रीमंत कैलासवासी थोर माधवराव बल्लाळ मुख्यप्रधान स्वामी यांणीं कर्जाचा हिशेब चहूं पिढ्यांचा पाहून, त्यांचा हवाला रामचंद्रनाा परांजपे यांचा देवऊन, फेरिस्ताप्रमाणें खतें पाहून, फाडून टाकून, सर्वांचा निरोप घेऊन रमासहगमन करून, कीर्ती मोटी संपादिली ! त्या काळीं जानोजीबावा थेऊरास आले होतेसें वाटतें. त्यांणींच खत लेहून दिल्हेलें पाहिलें आहे. उदार हात तर पुण्य आणि पुरुषार्थाची सत्कीर्ति लोक गातील. सरदारीस वोढ कधीं नाहीं, ऐसें ऐकिलें ना पाहिलें !

हीं पंच कलमें. यांत प्रचीतीहि आहेत. ती राजश्री होळकर सुभेदार यांहीं पाहिल्या उपयोगीं. आणि तिघे एकरूप जाले असल्या कल्याणदायक आहे. आश्विन शुा १० शके १७२५.

पत्रांक ६४७ श्री. १७२५ आश्विन शुद्ध १०

विजयमहामुहूर्ते पत्रें लष्करांत रवाना केलीं त्यांतील मजकूर स्मरणार्थः-

१ येशवंतराव होळकर सुभेदार यांस कीं, फाा बहुल ४ मंदवारीं कोतवालाचे तळ्यानजीक मुकाम होता. तेव्हां रात्रीं चंद्रोदई श्रीमहागणपतीचा उत्साह ब्रह्मांडभर त्यामुहुर्ते पांच गजांसह भेटीचा योग श्रीजगद्गुरूंचे शिष्यांचा व श्रीमार्तंडाचे भक्तांचा जाहला. प्रसाद व पत्र मस्तकीं वंदून कित्तेक संतोषाचें शब्दरत्नेंकरून परस्पर भूतभविष्यादि वर्तमान श्रवण होऊन, समस्या पूर्ण जाल्या. नंतर, पंचमीस आज्ञेनुरूप होळकरांनीं होळीचा खेळ समाप्त करून, श्रीमं-

तांचे वाड्यांत जाऊन, आमची माता सीतादेवी वनवासाहून आली, त्यांचें दर्शन घेऊन समाधान करून, बहुमानाचीं वस्त्रें घेऊन, स्वार जाहला. रंगअविशिष्ट पुरुष स्वस्थानीं नाहीं, म्हणून राहिला. तों अलीकडे श्रीरामनवमीस ज्याचा जन्म, पितापुत्र एक राशीं एकासनीं बसल्या जनकौतुक ! पाटीलबावा रंग खेळतां पाहिलें. परंतु, गोटापर्यंत जाऊन उपहार बहुमानपूर्वक होणें राहिला. त्याचे हेतूपेक्षां शतगुणित होऊन, विश्व पाहून, सत्कीर्ति दिगंतरी जावी हे इच्छा. तें करणेंकरून श्रवण होतील. आपली स्वारी गेल्यामागें तवाई मोठी गुजरली, ते श्रीहरिहरानें राखिली ! त्या संधींत लहान शिशु होतें तें श्रीभानूस अर्पण केलें. त्यास घेऊन श्रीमहायात्रेस जावयाकारितां भा शुा १३ सोमवारीं श्रवण नक्षत्रीं वृश्चिक लग्नीं आठां ग्रहांचें बल जाणोन, प्रस्थान केलें. त्याचे तर्तुदीस आपण मनावर घेऊन, अल्पविषय आहे तो, वडिलांचे आज्ञेप्रों हिशेब करून, द्यावयाचा निश्चय केला, असें समजल्यावर इतर आपोआप देतील. त्यांस सूचना मात्र व्हावी. यादी अलाहिदा लिहिली आहे. त्या प्रों कोणास संज्ञा सांगोन पा। दूरच्यास पत्र असावें तसें पा. म्हणजे सोबत पाहून, दर्शनास येऊन, नेक सला ज्या मार्गाची असेल तिकडून जाऊं. मर्जी नसल्यास, आमचें घर वसई मांडोन घेतली त्या दिवसापासून वसईच आहे. तिकडे सर्वांस भेटावयासीं जावेंच लागेल. तिकडूनच परभारें सुर्तेवरून श्रीनर्मदा शुक्रतीर्थाजवळ उतरोन, केशनखें पापाश्रित्य आहेत त्यांतें टाकून, पायागडावरून महेश्वर उजवें सोडून श्रीउज्जनी महाकाळाचें दर्शन घेऊन, पुढें विचार दिसेल तसें करूं. येविशींचे उत्तर पा. आणि वकिलासहि आज्ञा असावी. त्याप्रों ते व आह्मीं वर्तणूक करावयासी येईल.

पत्र १.

पत्रांक ६४८ श्रीलक्ष्मीकांत. १७२५ कार्तिक शुद्ध १

पुा राजश्री नारायेणराव वैद्य गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. कारभारी यांचे प्रकर्णी सरकारचे मनांत येऊन, राजश्री नारायेण येशवंत यांणीं लिहिलें, हें फार चांगलें आहे. यांतून पुढेंमागें उपयोगहि आहेत. ईश्वरें सर्वज्ञता दिल्ही आहे. याजवरून, मी आपले जागीं खातरजमा पक्की ठेऊन आहें. यांतील कित्तेक तपशील मशारनिलेस लिहिला आहे, ते विनंती करतील, म्हणोन लिहिलें तें कळलें. व मशारनिलेनींहि तुमच्याप्रमाणें तपसीलेंकडून विनंती केली. त्यास, जैसे तुमच्या लिहिण्यांतील बेत होते, त्याचअन्वयें एकएक प्रकार उगवण्यांत आला आणि उत्तरें समर्पक लिहिलीं आहेत. तुमचे लिहिण्यांत कोणते एक उगवण्यांत गुंता ठेविला नाहीं. काय अडचणीचे प्रकार आहेत ते आपले आपल्यास सोसून, माणसाचे आबताब राखून, आपलें करणें द्रिष्टीस पडावें. व या करण्यांतून ऐसा

फायेदा, हा लौकिकीं दिसावा. याचे पोटांत सर्व कांहीं समजतील. व अहो-रात्र काळजी या गोष्टीची बाळगून आहों, ती दूर होईल. व असें करण्यांतून उपयोग मार्गेपुढें आहेत. हेंच जाल्यावर, सहजच आपलें करणें सर्वांचे नजरेस आलें. मग, या संतोषाएव्हडा दुसरा संतोष नाहीं. अहोरात्र हीच विवंचना व साहस करून असों. तुह्मी या वागणुकींतील. तेव्हां इतकेंहि करून दाखवाल याच अर्थी ऐशा रीतीनें परस्परें हा योग आपले बुद्धीकडून ठेविला आहे. ईश्वर तैसा दिवस सर्वांस समजावयाजोगा कधीं आणील! कारभारी यांसी आजवर जीं जीं बोलणीं जालीं, व ते जे जे प्रकार बोलले, व उपयोग करून देण्याचें ह्मटलें, ते ते सर्व तुमच्या ध्यानांत आहेत. येथून कोणताएक गुंता व लिहिण्यास बाकी ठेविली नाहीं. आतां एवढें करण्यांतून काय उचित असेल तें करून दाखवावें. ही कळकळ तुमची तुह्मांस असावी. येविर्सींचे मजकुराची आज्ञा व संभाषण जें करावयाचें तें राजश्री नारायेण येशवंत यांसीं केलें आहे. त्याप्रमाणें तें तुम्हांस लिहितील, त्याजवरून कळेल. व राजश्री सदाशिव बापूजी यांसी जे जे प्रकार लिहिले आहेत त्यांचें मनन होऊन त्यांचीं उत्तरें समर्पक यावीं. हें सर्व तुह्मांकडेस आहे. येविशीं+त्याहावें, ऐसें नाहीं. रा छ २९ माहे जमादिलाखर. हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ६४९ श्री. (मसूदा.) १७२५ मार्गशीर्ष वद्य ५

श्रीमंत राजश्री पंत प्रधान यां प्रतिः--

रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित कृतानेक आशीर्वाद. येथील क्षेम ता मार्गशीर्ष कृष्ण पंचमी पावेतों क्षेत्र कायगांव येथें खुशाल असों. विशेष. माधवराव त्र्यंबक दीक्षित पटवर्धन याचा काळ जाल्याचें वर्तमान ऐकून चित्तास खेद जाला. ईश्वरेच्छा प्रमाण! देवाब्राह्मणांचें संस्थान आणि आपले पदरचे. त्यापक्षीं त्यांचा अभिमान आपणांसच आहे. संगोपान करून संस्थान चालविलें पाहिजे. बहुतां ब्राह्मणांचें हें ठिकाण आहे. आह्मीं पूर्वापार पुणियास येतों तेव्हां या स्थळाव्यतिरिक्त कोठें राहत नाहीं. वर्षदोन वर्षपावेतों राहणें जालें, तरी आतिथ्य आदर औपचार येथेंच होतो. ऐसें बहुत विप्रमंडळीचें स्थळ आहे. यांची स्त्री गरोदर आहे. बहुत ब्राह्मणांचे आशीर्वादें पुत्रच होईल. तथापि ब्रह्मसूत्र प्रमाण. धर्मसंस्थापना कृपाळु होऊन केली पाहिजे. सारांश, हें देणें आह्मां ब्राह्मणांस दिलें पाहिजे. बहुतां दिवसांपासोन धर्माचें स्थान आपलें आहे. देवब्राह्मणाचे संस्थानाचें संरक्षण करणार आपण आहेत. कारभारी बहुत दिवसांचे. त्र्यंबकराव दीक्षित यांजपासून चांगलेच आहेत. दीक्षितांचा काळ जाला. तें समईं माधवराव दीक्षित पांच वर्षांचे होते. त्या दिवसापासून कारभारी यांनीं अकृत्रमी सेवा करून व्यत्र-

हार चालविला. हें सर्वश्रुत असेलच. प्रस्तुतहि तेच कारभारी आहेत. निर्वाहा करणें आपल्याकडे आहे. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

पत्रांक ६५० श्रीलक्ष्मीकांत. १७२५ पौष शुद्ध २

पो छ ३ माहे रमजान सन १२०४ मुा विचरणी.

राजश्री बाबूराव विश्वनाथ गोसावी यांसी:—

दंडवत विनंती उपरी. मंडले व नबाबाकडील जाबसाल दोन आम्हांकडील करून घेन्याचे आहेत. याचे बोलनें दरबार खर्चाचे वेगळें वेगळें जेव्हां ठहरले ते मुख्त्यारीनें ठहरवावें. मंजूर असे. याचा अंदेशा हरगीज न कर्नें. येविसी उभयतां तुम्हांसी बोलतील ते मनांत ठेऊन मुख्त्यारीनेंच कर्नें. रा छ १ माहे रमजान. हे विनंती*

पत्रांक ६५१ श्री. १७२५ पौष शुद्ध ४

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजांचीं व यांचीं बोलणीं होऊन निश्चयांत आलीं *कलमें विा—

वरधेपलीकडे जो प्रांत तो तुमचा तुह्मांकडे असावा कलम १.

मंडले संस्थानाविशींचे आह्मी बोललों असतों. परंतु तुह्मीं राजश्री पंतप्रधान यांची नुकसानी केली नाहीं. सबब तेहि तुह्मांकडे असावे १

फरासिस अथवा इंग्रज कोणी तुह्मांपाशीं आल्यास त्यास नोकर ठेऊं नये. कलम १.

आह्मांवितिरिक्त राजकारण कोणीकडे तुह्मीं ठेऊं नये. कलम १.

कटक व वराड आह्मीं घेतलेंच आहे तें माघारें द्यावयाचें नाहीं. कलम १.

गावेलगड व नरनाला यांचे सरंजामाचा प्रांत इतकें तुम्हांस दिल्हें. हे तुह्मांकडे असावे. १.

आमचे द्वेषी असतील त्यांची साथ तुह्मीं करूं नये. कलम १.

आमचा वकील तुह्मांपाशीं व तुमचा आह्मांपाशीं असावा. कलम १.

सदर्हूप्रमाणें निश्चयांत आलें, ऐसें ऐकिलें. त्याजवरून विनंती लिा आहे. याशिवाय आणखी काय असेल तें समजेल तसें लिहून पाठऊं. शेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

* हें सबंध पत्र रघोजी भोंसल्याच्या हातचें आहे.

* ह्यांनाच इंग्रज लोक देवगांवचा तह म्हणतात.

पत्रांक ६५२ श्रीलक्ष्मिकांत. १७२५ पौष शुद्ध १४

राजश्री नारायेण बाबूराव गोसावी यांसी:—

दंडवत विनंती उपरी. तुह्मी चिठी पाठविली ती पावली. लिहिला मजकूर कळला. त्यास, आंग्रजांसीं तह दारमदार करून जाला. त्यांजकडून आतां आगळीक व्हावी, ऐसें राहिलें नाहीं. पलटणें चाकर होतील, हा संशय तुह्मांस होता. त्यास, श्रीदयेनें तो प्रकार जाला नाहीं व आह्मी केला नाहीं. तहाचा तपशीलहि, तुह्मांकडील ग्रहस्थ येथें आहेत, त्यांचे लिहिल्यावरून कळेल. मसलतीचे प्रकर्णीं तुह्मीं व राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव ऐसे त्रिवर्ग. त्यांत कृश्णराव माधव याचा प्रकार श्रीजीनें तैसा केला ! आतां राहतांना तुह्मीं उभयतां आहां. तुमचे मनांत जो जो अंदेश होता, तो कोणताहि एक नाहीं. पुढें धैर्य धरून चालणें आहे. ज्या स्थळीं तुह्मीं जाण्याचें योजिलें होतें, त्याप्रों जाणें तों जालें असेल. परंतु, तुमची भेट जालियानंतर हे सर्व प्रकार बोलण्यांत येतील, तेव्हां सविस्तर समजण्यांत येईल. धैर्य व विचार तुह्मांसारखियांनीं सोडूं नये. जैसें लिहून पाठविलें तैसें मनांत तुह्मींही ठेऊन असावें. रा छ १२ माहे रमजान *नारायेण रावजी ! तुह्मांस माझें लिहिनें हेंच कीं, जें कर्नें तें काळावर नजर देऊन केलें. त्यास, आतां सर्व माझे तुह्मी. जे जे सोबती आहां त्यांहींनीं धैर्य व मसलत चुकूं नये. हे तुमचीं व माझीं व उभयतांचीं बोलणीं जाहलींच होतीं. याप्रमानें उद्योग असावा. तिघांनून एकाचा प्रकार तैसा जाहला. यासीं श्रीसत्ता प्रमान ! परंतु तुह्मी उभयेतां आहां. तेव्हां धैर्य व मसलतीस न चुकतां वरचेवर इतला देत जावा. व भेटहि एखादे तऱ्हेनें सत्वर होईलच फार काय लिहूं ? बहुत काय लिहिणें ? हे विनंती. मोर्तबसुद.

पत्रांक ६५३ श्रीलक्ष्मीकांत प्रा. १७२५ माघ शुद्ध १

वेदमूर्ती राजश्री अनंत भटजी दाजी व केसोपंत स्वामीचे सेवेसी:—

पो बाजी विठ्ठल सां नमस्कार विनंति येथील कुशल ता माघ शुद्ध १ मुा देऊळगांव, पो लोहगांव, नजीक गंगातीर, जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावें. ऐशियासि, आपण येथून कूच करून मजलदरमजल फौजेसमागमें श्रीमंत पंतप्रधान यांजकडेस जात असों. दुसरें राजश्री नरहरपंत सुभेदार यांणीं पत्रें सरकारची ताकीदी वगैरे वैद्याचे वकिलीची वगैरे दिल्हीं आहेत. ते पावतील. परंतु, यांतहि जीव नाहीं. असों. तुह्मी आपले मालमतीचा गुंता जैसा जाणाल तैसा उगऊन घेणें. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे. हे विनंति.

---

* येथपासून अक्षर व भाषा सुरू रघोजी भोसल्याची.

पत्रांक ६५४ श्री. १७२५ फाल्गुन वद्य १३

साहेबांचे सेवेसीं विनंती सेवक निळकंठराव राम......कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना ता छ २७ जिल्काद पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून मुा पालेर, प्रौं भांडेर, नजीक झांसी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडोन बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सदैव आज्ञापत्र सादर होऊन सेवकाचा सांभाळ जाला पाहिजे. यानंतर स्वामीचे हातची चिटी छ २४ रजबची सादर जाली ते छ २७ साबानीं पावली. पत्रीं आज्ञा जे, मागाहून लवकरच ग्रहस्थ पाठऊन बंदोबस्त कर्ण्यांत येईल. त्यास, तीन महिने होत आले. व आज......माझा कोणताहि बंदोबस्त न जाला. आज इतके......टंबा. सागरवाल्यानीं सावकारास आमचे नांवें खत देऊन व्याजमनोति घेऊन, पंधरा हजार रुा दिल्हे. तदनंतर आह्मीं कूच करून झांशीकडे जाण्याचे विचारांत होतों. इतक्यांत राजश्री आंबोजी इंगळ्याची फौज व पलटणें सागरास आलीं. खटला करून पैका घ्यावा किंवा ठाणें बसवावें, हा बेत त्यांचा. तेव्हां सागरवाल्यानीं आम्हांस स्वारीखर्च पंधरा हजार रुपये देऊन ठेऊन घेतलें. त्याजवरोन इंगळे यांची काबू चालली नाहीं. ते निघोन गेले. आह्मी तेथेंच होतों. वरातेऐवजीं पैसा दिल्हा नाहीं. तें समई रा...कालपीवाले यांचीं पत्रें आलीं जे, कूच करून इकडे यावें, सर्व बंदोबस्त होईल. त्यांजवरोन आह्मी झांसीकडे आलें. तों रो शिवराम हरी हे इंग्रजासीं सलख करून त्यांजवळ आहेत. त्याजकडे वरातेचे ऐवजाकरितां कारकून पाठविला होता. शिवराम हरीनें कारकूनास सांगितलें जे, वरातऐवजीं पैसा मिळावयाचा नाहीं. कूच.........ह्मणोन ऐवज मागतां, आह्मीं कोठून द्यावा.........ह्मणोन जाब दिला. जेव्हां कारकुनांनीं............सांगितली. त्याजवरून पांच हजार रुपये मोठ्या कृता.........आह्मांजवळ दाहा पंधरा हजार फौजेची जमियत जाली आहे. खर्चास पैशाची जागा नाहीं. फौजेचा खर्चाचा बखेडा होऊन नित्य धरणीं चाललीं आहेत. येविसीं नित्य इंग्रजाकडे वकील पाठऊन बोलणें लावलें जे, आमची रवानगी श्रीमंतांनीं या प्रांतीं केली आणि आपलेंहि येणें सरकारआज्ञेनीं जालें. सर्वत्रांचा बंदोबस्त आपण केला. आमचा बंधेज कांहींच न जाला. त्यास, आपला व श्रीमंताचा एक विचार असतां आमचा बंदोबस्त न व्हावा, हें आपणास योग्य नाहीं. त्याजवरोन त्याचें बोलणें पडलें जें, डंगाई वगैरे जागा श्रीमंतांनीं आह्मांस दिल्हीं. तुमचा जावसाल येथें काय होणें आहे ? तुह्मीं या जिल्हेस राहूं नये. तुमचा बंदोबस्त श्रीमंतास करणें असता, तरी इंग्रजकुंपणीबहादूर यांस ताकीद जाली असती. तरी आह्मांस लिहिलें येईल तेव्हां तुमचा बंदोबस्त श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणें वर्षदीडवर्ष जालें. श्रीमंतांनीं काय बंदोबस्त करून पाठविलें ? तुमचें अगत्य सरकारास नाहीं. तशांत कांहीं बंदोबस्त

करून द्यावा, ऐसें एका दोघांजवळ बोलले होते. परंतु शिवराम हरी यांनीं इंग्रजास सांगितलें जे, यांचा इरादा डंगाई वगैरे जाग्याचा आहे, श्रीमंतास यांचें अगत्य फार आहे, याचा बंदोबस्त लवकरच होऊन येणार, तों पावेतों आपण खर्चास दिल्यास याचे पाय या जाग्यांत रुपले, मग तुम्हांस व आह्मास वगैरे जाग्यास हे जरब देतील, या प्रांतांतील हकीकत सर्व श्रीमंतास लेहून आह्मांस मसलत भारी पाडतील. यास्तव यांचा जाबसाल कांहीं एक न करावा, ह्मणजे आठ च्यार रोजांत निघोन जातील. ऐसा कित्तेक प्रकारें कुपाट समजाऊन, आमचा बिघाड करितात. अंतर्गत दातियावाले वगैरे रांगड्यासीं सुचवून दोन ठाईं आह्मांवर लढाई पाडली. परंतु स्वामीचे प्रतापें आपलेकडील हर्हर होऊन, दातियावाल्यांचें पारपत्य होऊन, त्याजकडिल दोन तोफा सरकारांत आल्या. माझी रवानगी स्वामींनीं इकडेस केली ते समईं मी विनंती केली जे, आजपर्यंत स्वामीच्या पायास अंतर पडलें नाहीं, आतां आज्ञेस उजूर करावा तरी मर्जी रुष्ट होईल. ऐसें जाणोन आज्ञेप्रमाणें केलें. ते समईं स्वामींनीं मला आज्ञा केली. ते स्वामीचे ध्यानांत असेलच. ऐसा दुर्लौकिक माझा झाला नव्हता. ग्रहदशेस उपाय नाहीं. स्वामींनीं सत्वर बंदोबस्त करून पाठविला पाहिजे. इंग्रजास स्वामींनीं छत्तीस लक्ष सोळा हजारांची जागा डंगाई पो। दिल्ही. हे तनख्या बरहुकूम दिल्ही किंवा वसुली दिल्ही हें न कळें. वसुली दिल्ही असल्यास बाकी चार लक्षांची जागा राहाती. तनख्याबरहुकूम दिल्ही असल्यास, साटसत्तर लक्षांची जागा राहाती. यापैकीं हिंमतबाहादर गोसावी याजकडे पंचवीस सव्वीस लक्ष तनख्याची जागा आहे. परंतु गोसावी सरकारउपयोगीं नाहींत. यांचीं कृत्यें अनन्वित आहेत. स्वामीचें ध्यानांतच आहे. सरकारी माहाल भांडेर व कोंचअरुण व शाहाडवरा व भेलसा व खुजरया व मोडव भीतरवर जागा वगैरे यांची याद......... पाठविली आहे. श्रुत होईल. हाल ही जागा खालीं पडोन, इंग्रजांचें अनुमतें मवास खातात. समशेर बाहादुर यांणीं इंग्रजासीं सुताचें बोलणें लाऊन, आपला समेट करून घेतला. चार पांच लक्षांची जागा वसूली डंगाई पैकीं द्यावी, कोणाचा उपद्रव लागूं नये, ऐसें इमानप्रमाण होऊन भेटी जाहाल्या. आकलकोटकर भोंसले याजकडील रा। नरसिंगराव अनंत पतकसुद्धां व रा। पिराजी नाईक निंबाळकर आह्मांजवळच आहेत. नरसिंगराव अनंत पतकसुद्धां सरकारलक्ष राखोन हरएक कामाचे उपयोगीं आहेत. त्याजवर स्वामीचें लक्ष असावें. बरवकर व पलांडे हे समशेरबाहादर यांजजवळच आहेत. येण्याविसीं लिहिलें. परंतु येत नाहींत. दिवाणही तेथेंच आहेत. त्यांस ताकीदपत्रें आलीं पाहिजेत. इकडील जाग्यापैकीं बंदोबस्त सेवकाकडे होऊन आला पाहिजे. ह्मणजे सरकार किफायत लवकरच होऊन येईल. मी फक्त स्वामीस जाणतों. माझा अभिमान घरच्याप्रमाणें पार पाडणें स्वामीकडेसच आहे. कालपीवाले इंग्रजाजवळच आहेत.

त्यांचे समेटीचें बोलणें लागलें आहे. परंतु कालपी इंग्रज सोडीत नाहींत. हे कालपीशिवाय समेट करीत नाहींत. ऐसें दिसून येतें. जें काय ठरेल, तें मागाहून शेवेसी विनंती लिहीन. सर्व आधार स्वामींचे चरणाचा आहे. विनंतीप्रों पत्रें द्यावीयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पत्रांक ६५५ श्रीसीताकांत. १७२५ फाल्गुन वद्य १३

राजश्री खंडो मुकुंद गोसावी यांसीः—

स्नो व्यंकोजी भोंसले सेनाधुरंधर दंडवत. सुरसन खमस मयातैन व अलफ. गुदस्ता तुम्हीं गेल्या तागाईत दोन तीन पत्रें पाठविण्यांत आलीं. त्याचीं उत्तरेंहि येत गेलीं. त्यांस येथिल आह्मांस सर्वत्रांच्या चालीरीती वगैरे गृहकृत्यास पूर्वीपासून पूर्तेपणें तुह्मीं वाकीफ आहां. तेव्हां तपसिलें ल्याविसें नाहीं. सांप्रत, या चहूं महिन्यांत येथें जो ग्रंथ जाला तो परस्परें तुमचे समजण्यांत आला असेल. आणि राजश्री नारायणराव बाबूराव यांचे लिहिण्यावरूनहि समजलें असेल. इकडून तुम्हांस न कळविण्यास कारण जे, पुर्तेपणें सर्व गोष्टीस व चालीस रावमारनिले माहीत आणि पेशर्जी आश्वीन मासीं इकडून यांतील कांहीं एक संकेताचे पोटीं खास दस्तुरें लेहून परभारें तुमचेकडील मुख्यास इतला करण्यांत आला. त्याचें उत्तर तों आलें नाहीं. परंतु निरोप मात्र आला जेः तेथें रावजी आणि येथें खंडो मुकुंद आहेत, तेच समजून घेतील व तुम्हांसी बोलतील. त्याजवरून येथें रावजी तो सर्वोपरी वाकीबच आहेत. यास्तव आजपावेतों इकडून तुम्हांकडे लिहिण्यांत न आलें. अस्तु. यांतील कच्चे तपशीलाचे अर्थ सर्व भेटी अंतीं परस्परें खुलून समजतील. सांप्रत परभारें कळण्यांत आलें जे, तुमचें येणें इकडे होणार. त्याजवरून फार संतोष वाटला. तर, आजपर्यंत कित्तेक वेव्हारमार्ग पडद्याचे पोटीं चालले. परंतु याउपर आम्हांकडील येथें कांहीं एक वेव्हाररीत वगैरे पुढें सुधे विचारें चालावें असें राहिलें नाहीं. हें सारें रावजीसहि कळून आहे. तुमचेहि भेटीनंतर साकल्य कळण्यांत येतील. याजवर आमचा विचार तो हाच आहे जे, श्रीक्षेत्रवास करावा. परंतु हें ठीक नाहीं. यास्तव लिहिण्याचें कारण जे, येथील सांप्रदाय पहिलेपासून चालला आहे. कांहीं एक विचाराची सूचना तेथें होत आसावी, नंतर कोणी एक मार्ग चालावा. अस्तु. तुह्मी तो तेथील सर्व इकडील वगैरे मजकुराचा शोध घेऊनच निघाल, हा भरवसा पक्केंपणें येथें आहे. चिंता नाहीं. परंतु, आजपावेतों गौप्यांत चाललें. पुढें आह्मीं आपला मनोधर्मच करावा किंवा कशा रीतीनें राहावें, येविशीं ल्याहावें ऐसें नाहीं. हे खातरजमा पक्केंपणें येथें असे. आम्हांस तो; त्याज वेगळा दुसरा धर्मच नाहीं. हे तुम्हांसहि कळून असे. याजकरितां सूचना लिहिली असे. यांतील मनन पुर्तेपणें करणें. आणि या पत्रांतील उद्गार इकडे कोणाएकास हरगीज न स-

मजावा. या पत्राचें उत्तर सत्वर यावें जाणिजे. छ २७ माहे जिल्काद. बहुत काय लिहिणें ?

पत्रांक ६५६ श्री. १७२५

विज्ञापना ऐसीजे. आपल्या पत्राचे आज्ञेप्रमाणें विनंती केली. उत्तर जाहलें कीं, जो पूर्वी संकेत केला होता तोच त्या मासपक्षांत सिद्ध करावयाचा होता, तो न जाहला. अवधीवर टाकलें. त्यांतून हे निघाले. त्यास, सत्तरुषीस जाणें जाहलें. त्यासमई तोरे न्यावे. समागमें होते. चिंता नव्हती. केवळ शिंदे चालून जाते, असें घडतेंना. अविचारें करून जाते, तर तेंहि ठीक नाहीं. या मार्गानें तोरे ठेऊन गेले हें चांगलें. त्यास, त्याजपाशीं आज सर्व आहे. जें जाहतील तें पूर्वी करीत आले व पुढेंहि करितील, हा भरंवसा सर्वांस आला आहे व पुढेंहि येईल. त्यास, आतां, याच्या तीन तोडी:—एक तोड हेच कीं, पडीचा मोहरा खाऊन सर्वांचा उत्कर्ष जिरवणें असिल्यास ज्या स्थळीं आहेत तेथेंच राहून त्यांस सरंजाम काय असावा याची योजना करावी. वरकड कितीक दिवस प्रांतांत राहून काय करितात व कोणाची धांव कोठवर येत आहे, हेहि समजेल. परंतु यांतून मुलखाची खराबी आहे. गोष्ट सिद्ध गेलियावर संजोगणी हावयास बहुत दिवस लागतील. यांतील बारीकमोठे अर्थ सर्वज्ञता जेथें आहे त्याच्या ध्यानांत आहे.

दुसरें: उभयतांचे मध्यस्तीस कोणी मातबर याणें यावें. त्यांणीं त्यांस यांस चार गोष्टी उत्तम प्रकारेंच्या, दाबाच्या, जरबेच्या सांगोन, रसायण करून द्यावें.

तिसरें: फौज जमा पोक्त करावी, द्रव्य आशा सोडावी, आणि आपलीशी करून दाखवावी. ज्याच्या चित्तांत विषमता आली असेल, त्याणें आपल्या सरंजामानिशीं रेवापार बऱ्या वाटेनें गेल्यास उत्तम. न गेल्यास जोरबरजोर करून लावावें. यांत दाब नक्ष सर्व आहे. आमचें म्हणाल तर, गादीस जो अधिकारी होईल, त्याची भेट आमची होणें ते तुमच्याच गृहस्थाचे हातून घेऊं. तेंच चांगलें. आह्मीं आजपावेतों दोघांस जाणत होतों. त्यास एक, तर सर्वांची आशा ठेऊन गेले. आतां आहेत त्यांच्याठाईं दृढनिश्चय धरून आह्मी आणि आमची बाणेगारी सर्वस्वें वाहतात. तेव्हां आमच्याकडून त्यांच्या वचनास अमान्य होणार नाहीं. ही खातरजमा त्यास आली आहे व पुढें आणवून देऊं. त्यांनीं पडीचा मोहरा खाल्ला, तर आह्मी येथेंच राहू. त्यांचा लेख आला, तर येऊन मध्यस्ती करून, रसायण त्यांचे मर्जीप्रमाणें उतरूं. जमावसुद्धां येण्याचें पत्र आलें, तरी सिद्ध आहों. जो पक्ष धरिला तोच सिद्धीस नेऊं. आमचा ओढीचा प्रकार हा, त्यांच्या लक्षांत आहे. *राजश्री.

---

* पुढील बंद गहाळ.

पत्रांक ६५७ श्री. १७२५

यादीः यांचा वकील इंद्रप्रस्थानास त्यांनीं बोलाविला. खलिता तेथील व आपले सरकारचें खेपोरमुलकाचें पत्र येथें पाठविलें. वकील तेथें गेला. तो वकील याचे बहुत मनोधारणा केली. आणि हा तहनामा करून दिल्हा आहे. पारसी आहे. त्याचा अन्वय.

१ कंपनी आंगरेज बहादर आणि राजे हरबलासपाल याची हामेशा दोस्ती कायम राहील. कलम.

१ महाराज याचे मुलकाची चौकसी कंपनीचे जिंमे आहे. कलम.

१ महाराज हरबलासपाल कंपनीचे सरकारचे व माबरदारी आणि रफाकत राखील आणि कोणासी सालजाब, विना कंपनीचे मरजी वेगळा, करणार नाहींत. आणि कोणासी खलस करणार नाहींत. कदाचित कोणासी खलस जाला, तर त्याचा न्याय कंपनीचे घरीं करतील. कलम.

१ आणि माहाराज–मजकूर आपले मुलकांत हुकूम करतील. त्यांत आदालत न होय ती. कलम.

१ जो मामला महाराज श्रीमंत याजला देत आहेत, तो पेशवे–साहेब यांणीं कंपणीचे सुपूरत करून दिहला आहे. सों, मामला महाराज याजला माफ केला आणि महाराज याची जमेत बोलाऊं तेव्हां हजर होणी. कलम.

सदरहु पांच कलमें दिल्लीवाले याजपासून यांनीं तहनामा करून, यांचा लेख त्याजवळ त्यांचा लेख याजवळ असें जालें आहे.

पत्रांक ६५८ श्री. १७५८

तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला व राजश्री खंडो मुकुंद यांणीं विनंति केली त्यावरून सविस्तर समजलें राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा व राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबाहादुर (यांनीं) एक विचारें नेट धरावा. इकडील खबीरी कायम आहे.

पत्रांक ६५९ श्रीगजाननप्रसन्न. १७२५–२६

यादी मथुराहेजागा करोलीयेथील. पैकीं मामलापेशजी सुदामतपासोन शके १६४८ चे सालीचे सालीं श्रीमंत कैलासवासी बाजीराव साहेब यांची स्वारी दिल्लीस येऊन ज्याकाळीं हिंदुस्थानचे संस्थानचे मामले उरले, तेव्हां कैलासवासी पिलाजी जाधव वाघोलकर, हे पूर्वी करोलीकर राजे जाधव यांचे वंशांतील, त्यांणीं श्रीमंतांस विनंती करून, राजे गोपाळसिंग संस्थान मजकूर वाले यांस अभयेंपत्र सरकारचें करून दिलें.

तेव्हांपासोन वरकड संस्थानचा ऐवज सरकारांतून सरंजामी सरदारांस लाऊन दिला. परंतु करोली संस्थानचा ऐवज सरकारांतच ठेऊन, सरकारचा कामदार पाठऊन वैवाट होत गेली. ज्याकाळीं मामला ठरला, तेव्हां करोलीचे पेटियांत सरकारपट्टा जाला. तेव्हां राजे गोपाळसिंग यांणीं करोली मंडरायल व झरीसीर मथरासुद्धा ठराव करून मामला ठरविला. त्याप्रमाणें शके १६८३ चे सालपर्यंत वैवाट चालत आली. सरिम मथराकर पांच मोठे मामल्याचे देणें तें करोलीत सरकारतर्फेनें कामदार दादो सखदेव सुपेकर देशपांडे यांजला देत होते. नंतर तेच सालीं पाणिपतची स्वारी. सर्वत्र जागाचा अंमल उठला. भरतपुरकर जाठाचा उत्कर्ष जाला. तेव्हां आगऱ्यांत जाठाचा अंमल बसला. आगऱ्याखालीं जागा धोलपुरची वैवाट होऊं लागली. ते समई जबरी करून खालीं सीरमथराचा ऐवज आपलेकडे लाऊन घेत गेले. ती जाठाकडेच वैवाट चालली. नंतर, जेव्हां कैलासवासी रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण स्वारीस आले ते काळीं, भरतपूरकर जाठ नवलसिंग यांची लढाई गोवर्धनावर मारून त्रिवर्ग सरदार सरकार होळकर सिंदेसुद्धां मामला जाठांचा साठ लक्षांचा ठरला. तेव्हां, त्याच मामल्यांत सिरमथरेचा आख निराख करून मामला घेतला. नंतर देशीं श्रीमंत कैलासवासी माधवरावसाहेब यांस देवाज्ञा जाली. तेव्हां स्वारी विसाजी कृष्ण, शिंदे, होळकर देशीं गेले. उपरांत दिल्लींत पातशापाशीं नज्याबखा पठाण यांस ठेऊन गेले. त्यांचें प्राबल्य जालें. त्याणें सरकारचे कामदार आंतरवेदींत होते ते सारे उठऊन, आपलाच अमल सर्वत्र जागां केला. नंतर जाठाचें तमाम राज्य भ्रष्ट केलें. तेव्हां जाठाचा अंमल आगऱ्यांतून उठला आणि नज्यबाचा अंमल आगऱ्यांत जाला. तेव्हां अमलाखालींच सीरमथरा येथिल मामला घेत गेले. उपरांत कैलासवासी महादाजी शिंदे ग्वाल्हेरचे स्वारीस आले. त्याणीं गोहदकर जाठांचें पारपत्य करून ग्वालेर गोहोद घेऊन नज्यबाचें पारपत्य करून अमदानी कैद केला. तमाम हिंदुस्तानांत सरकारचा अमल बसला. तेव्हां श्रीमंत पाटील बावांस सिरमथरेविशीं सरकारचीं पत्रें आलीं व सदाशिव दिनकर वकील, निसबत नारो शिवदेव भावे, यांणीं विनंती केली तेव्हां, करार सिरमथरा सोडून देऊं. परंतु त्यांणीं सोडली नाहीं, सिरमथरेचा मामला खालींच वैवाटूं लागला. त्यांस माहादजी शिंदे यांणीं मामला परभारें घेतला, तत्रापि सरकारांतच गेला. त्यास आतां सांप्रतकाळीं तो मामला आगऱ्याखालीं इंग्रजाकडे जात आहे. त्यांस, पूर्वीपासोन सिरमथरेचा मामला सरकारचा असतां, दुसरेकडे न जावा. यांजकरितां पूर्वप्रमाणें सरकारची जागा सरकारांत असावी, येविशीं पुण्यांत वकील इंग्रजाकडिल आहेत, त्यांस आज्ञा होऊन, त्यांजकडोन कलकत्यास लिहून कलकत्तेकर यांजकडोन ताकीद दिल्लीस मुखत्यार आहे त्यास जाली असतां,

दिल्लीकर गोहदकर जाठाचा जाहागिरबडीचा परगणा आहे त्यास ताकीद करितील कीं, सिरमथरेचा मामला श्रीमंताचे सरकारचा पूर्वीपासोन आहे, त्याप्रमाणें श्रीमंताकडील कादार संस्थान करोलीस आहे ते घेतील. तुह्मी मुजाहीम न व्हावें. ह्मणजे सिरमथराकर पुर्ववत्प्रमाणें रुजू होऊन ऐवज सरकारांत देतील. सांप्रत, जेव्हांपासोन सिरमथराचा मामला परभारें गेला, तेव्हांपासोन संस्थानचा करोलीचा मामला आहे. त्यांत सिरमथरेचा ऐवज मजरा घेऊन बाकीचा ठराव जरब पडती तेव्हां करतात. याजकरितां विनंती कीं, तो मामला लागू जाला ह्मणजे संस्थानपुर्ता ऐवज सरकारांत जरबेचे पोटी येईल. येविसीं प्रयेत्न.

पत्रांक ६६०　　　　　श्री.　　　　　१७२६

यादी श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व रामचंद्र दादो दिा राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा विज्ञापना ऐसीजे. बहुत दिवस सरकार लक्ष राखून सेवा करीत आलों. यास्तव कृपा करून सरंजाम व इनाम देऊन चालवावयाचा करार. त्या प्रो हल्लीं गांव लाऊन द्यावयाची आज्ञा:—

१५००० कैलासवासी रावसाहेब यांचे कारकीर्दीस खर्ड्यांचे लढाईत देविले ते.

२५००० माहाडास करार केले ते.

४००००

तुह्मीं सरकार लक्षांत राहून वर्तणूक करितां. सबब खर्ड्यांचे स्वारीस कैलासवासी राव यांणीं पंधरा हजाराचे गांव देण्याचा करार व माहाडास पंचवीस हजाराचे गांव देण्याचा करार. एकूण चाळीस. पौ हाल्लीं पस्तीस हजाराचा करार ठरला. त्यापैकीं चौथाई इनाम व तीन हिस्से जागीर एकूण पस्तीस हजारांचे गांव दरएक जागीं लाऊन. (पुढें लिहिलें नाहीं.)

पत्रांक ६६१　　　　　श्री.　　　　　१७२७ वैशाख शुद्ध २

रवाना ता छ १ माहे सफर सन १२०५ दाखल छ ९ माहे जमादिलावल. श्रीमंत माहाराजे बाजीरावसाहेब पंडितप्रधानबहादर माहाराजांचे सेवेसी:—

बगदादचे बादशाह यांजकडील सैद मुस्तफा यांनीं पारसी पत्र लिहिलें त्याची हिंदवी नकल: आमचे चुलत्याची लेक नबावमीरअलम मरहुम यांस दिल्ही आहे. त्यास, सांप्रत बादशाहबगदाद यांजकडून नबाबमुनीरलमुल्कबाहादूर यांजकडेस जावयाकरितां हुकूम जाला. त्याजवरून बंदर मुंबईस येऊन गवनरबाहादुर यांची भेट घेतली. त्यांनीं बहुत लोभ करून, आमचा

हरएकविशीं सन्मान राखला व आमची इच्छा श्रीमंत महाराजांची दर्शनाची आहे. येथून पुण्यास पोंचूं तोंपरियंत दोन पाहरे वगैरे साहित्य देऊन कंपनीची सरहदपावेतों बंदोबस्त राखतील. गवरनरबाहादुर यांनीं हरदु सरकारची दोस्ती जाणून सांगितलें कीं, सरकार श्रीमंत पेशवासाहेब बाहादुर यांचे सरकारची व कंपनीचे सरकारची दोस्ती बहुत, यास्तव तुह्मांकडील मजकूर लिहिला आहे, तरी हैदराबादेस पाहरे वगैरे देऊन करून देवितील. हरदु सरकारची दोस्ती दृढतर आहे, याजकरितां उमेद आहे कीं, मी सेवेसीं येऊन दर्शनें कृतार्थ होईपावेतों विनंतीपत्र लिहिलें आहे. हें प्रविष्ट होऊन, कृपापत्र लिहावयास आज्ञा करणार सरकार समर्थ आहेत.

पत्रांक ६६२. श्री. (नकल) १७२८ मार्गशीर्ष वद्य ९

राजश्री महिपतराव कचेश्वर गोसावी यांसी:—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो येशवंतराव होळकर दंडवत सुा सबा मयातैन व अलफ राजश्री लक्ष्मणराव शिवराम यांची वरात पेशजीं तुह्मांवर पांच हजार रुपयांची जाली आहे. त्या प्रो एक हजार रुो मारनिलेस पावले. बाकीचा ऐवज न देतां, घटाईचे जाबसाल करितां, म्हणून मारनिलेनीं हुजूर विदित केलें. ऐशीयास, माहाल श्रीमंताकडील; त्यांचे हे आप्त; माहालसंबंधीं आज पावेतों तुह्मांकडून श्रीमंतास आदा पावती काय, हाहि अर्थ केवळ विचार केला असतां ध्यानांत न यावा अशांतील नाहीं. यास्तव हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी दुरंदेशीनें समजून पत्र पावतांच पांच हजार रुो बाकी राहिले ते यांचे पदरीं घालून वरातीवर भरपाई करून घेणें. या उपरीं दिकत करून बोभाट नये तें करणें. जाणिजे छ २२ सवाल. बहुत काय लिहिणें. मोर्तब्य असे. शिक्का.

पत्रांक ६६३ श्री. १७२८

यादी नारायण दीक्षित व यज्ञेश्वर दीक्षित ठकार यास सरकारांतून सालीना नेमणूक श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांणीं आपले हातचे करार करून दिल्हे आहेत. सुा सबा मयातैन व अलफ. नेमणूक—

रुो

७५००

ताा

३५०० नारायण दीक्षित,

४००० यज्ञेश्वर दीक्षित.

७५००

येणेंप्रों पूर्वीपासून दरसाल ऐवज पावत आला. अलीकडे झाडा जाहला नाहीं. मध्यें च्यारपांच वेळ आह्मीं पुण्यास आलों, ते समईं नेमणूक ऐवजीं मोघम ऐवज पावला-- रुा

२५००० कैलासवासी श्रीमंत दादासाहेब याणीं.

३५००० कैलासवासी श्रीमंत माधवरावसाहेब याणीं.

२५००० कित्ता.

१०००० कित्ता.

३५०००

७०००० कैलासवासी धाकटे माधवरावसाहेब याणीं.

१०००० कित्ता

१५००० कित्ता

४०००० कित्ता

२५००० १५०००

५००० कित्ता.

७००००

१३००००

कित्ता नेमणूक सालीना पावत आली रुो.

५६५ खुद्द निा.

२८० शागिर्दपेशा असामी ५

२२५ कारकून असामी २

६० बारगीर असामी १

५६५

४०५ वर्षासनें ब्राह्मणास आा ८

२१६ चिटकंभट अध्यापक आश्रित

११८६

कापड आंख

४१५८ सालीना

१२०० पालखीचे एक साला आड.

विजयादशमीस पोषाग्र २ पुणियाहून सातारा पावत आले सनगे सुमारे ७

आंख

४००

पत्रांक ६६४ श्री. १७२९ पौष शुद्ध ४

स्वस्ति श्री राज्याभिषेक–शके १३४ प्रभवनाम संवत्सरे पौष शुद्ध चतुर्दसी भोमवासेर क्षत्रियकुलावंतस श्रीराजा .शिव छत्रपति स्वामी यांणीं वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायेण दीक्षित व यज्ञेश्वर दीक्षित ठकार यांसि आज्ञा केली यैसीजे:–स्वामीनीं तुह्मांकारणें मकर संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त येसाजी तोडकर सरुपजी साळोखे हुजुर असामी दोन या समागमें पाठविले आहेत. घेऊन पावलियाचें विनंतिपत्र पाठवणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें ?

मर्यादेयं
विराजते.

पत्रांक ६६५ श्री. १७३१ कार्तिक शुद्ध ७

शेवेसी नारो त्र्यंबक भाव्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत कार्तिक शुद्ध ७ सप्तमी मुक्काम लष्कर, नजीक अजमेर, येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मला येथें येऊन च्यार पांच महिने जाले. पेशजीं दोन च्यार पत्रें पाठविलीं होतीं तीं पावलीं न पावलीं, हें कांहीं कळत नवतें. त्याजवरून काळजी लागली होती. त्यास आपण पत्र मला लिहिलें होतें. तें श्रावण शुा ५ पंचमीचे दिवशीं पावलें. त्यांत राजश्री आपा चिटणीस यांचे नांवें त्याच्या तीर्थरूपाचें व राजश्री सर्जेरावबापूस देशमुख यांचें होतें कीं, सरकारांतून मामलत श्रीमंताकडून आपल्याकडे करोलीची आहे, तेथें जप्तीस राजश्री गोविंदराव रामचंद्र गेले आहेत, त्यास उठवून न्यावें, आणि आपले कारकून तेथें आहेत त्याचा अंमल करून द्यावा, व सरकारांतून फिरंगीयासी ताकीद जाली. त्यावरून चकती येथें राजश्री महिपतरावजीकडे पाठविली आहे, व जय किसन ब्राह्मण परभारा लष्करांत कागद घेऊन येईल, त्याजवरून वर्तमान कळेल असें लिा. त्यास येथील वर्तमान: पहिला जाबसाल साहा पावेतों ठरत होता. परंतु आपली खात्री होईना. याजकरितां राजश्री बापू सिंदे व तात्या सिंदे यांच्या मारफतीनें दिलं. पण जाबसाल करावा, पुढें मागें

आलटपालट जाबसाल होऊं नये, याजकरितां त्याच्या विद्यमानें जाबसाल केला. हजार पांचेंस रुपये जाजती कबूल करणें प्राप्त जालें. कागदपत्र, सनदापत्रें तयार होऊन द्यावीं; इतक्यांत फिरोन बदमामलीस आले कीं, सरकारचें बोलणें पडलें कीं, आमच्याकडून मामलत महिपतराव याणीं कबूल करावी, कची जमा कसी काय आहे ती समजावून द्यावी, मग त्यास काम सांगूं, त्याजकडे मामलत ठेवीत नाहीं असें बोलणें पडलें. त्याजवरून आह्मीं जाबसाल सोडिला. मग राजश्री बापू सिंदे यांणीं सरकारांतून बारा हजार रुपये ठरविले. त्यांत साहा हजार रुपये रोख सरकारांत दिल्हे. साहा हजार रुपये आपल्या चाकरींत ठराविले, आणि सनदा करून घेतल्या. आह्मांस ह्मणों लागले कीं, आमच्याकडून हजारा करणें. तरी करावा. आह्मीं आपल्याकडे काम करून घेतलें. राज्याचे त्यांचे एक विचार, भाईच्यारा, राजा, त्यास सानकूल जबरदस्त फौजबंद. आपला उपाय नाहीं. साठ वर्षांचा अंमल. आपली जागा येकवेळ हातांतून गेल्यावर फिरोन येणें कठीण. आपली दाद कोठें लागेना. सरकार बदमामली लोथापुढें कोणाचें आइकत नाहीं. सागरवाले व सिवाजी विठल व नारोशंकर व पवार व जाधव वगैरे तमाम सान्यापासून आम्हीं पैसा घेतों व जागा जप्त करितों. आम्हीं श्रीमंतांसीं जाबसाल करूं. चिंता नाहीं. एक साला आम्ही तुम्हापासून पैसा घेऊं असें बोलणें पडलें. त्याजवरून चवदा हजार रुपये ठराविलें. आठ हजार रुपये शारीत व उदारीवर साहा हजार रुपये. याप्रमाणें ठराऊन, निशा आठ हजारांची सावकारी घेऊन, सनदा, आपल्या नांवें पूर्ववत्प्रमाणें मामलत यांची याजकडे काईम आहे असें करून दिली. गोविंदराव रामचंद्र उठून आले. राजेयानें गांवांतून आठ हजार रुपये वसूल करून घेतले. पांच हजार रुपये दाडबदार, व माल पैकीं तीन हजार चकती येथें जाबसाल ठरल्यावर मजजवळ येऊन पावली. पुण्याकडील तीन मास मार्गप्रतीक्षा करीत होतों. तिकडोन कागद पत्र देखील न आला. मग करणें प्राप्त जालें. त्याचें कारण दूरदेशीं सरकारांतून पत्रें येऊन हिमाइत होते, तो येथें मधींच खाऊन टाकितात. प्रमाण कोणत्या गोष्टीचें राहिलें नाहीं. गरीब पाहून मारितात. राजेयानें आठ हजार रुपये घेतले आहेत. त्याचें पारिपत्य होत नाहीं. स्वामीच्या पत्रांत मजकूर कीं, घाबरे होऊन जाबसाल करावयाचा नवता, तेथें रुपये देणें पडलें आहे, आपल्यास सरकारांत ऐवज देणें लागतो, त्याचें कसें होईल, ठीक केलें नाहीं. त्यास, येथें आपला अंमल उठवून राजेयानें बापूस पैसा द्यावयाशी कबूल जाले. मग काय करावें ? तीन च्यार महिन्यांत त्यानें आठ हजार रुपये घेतले. पुढें शारीचा अंमलही तोच घेणार होता. बरें, जागा आपल्याकडे राहिली असतां, पुढें तरी आशा असावी. याणीं बदमामली न केली तरी, आतां फिरंग्यास चकती दाखविले. उत्तर मागि-

तलें. त्याणें सांगितलें कीं, आह्मी आपल्या डाकेंत लिहून पाठऊं. जाबसाल द्यावयाची रीत आमची नाहीं. आठ हजार रुपयाकरितां राजयाचे नांवें खलिता फिरंग्याचा घेऊन पाठविला आहे आणि सहा हजार रुपये उदारीचे आपल्यास न लागावे. येथून ताकीद सिंदेसाहेब यासी व्हावी, ह्मणोन सांगितलें आहे. पुढें अंमलांत गोष्ट येईल ती खरी. राजश्री महिपतरावजीचींही पत्रें आहेत व मी लीा आहेत, त्याजवरून कळेल. तेथून वरचेवर फिरंग्याकडून परभारें लिहिलें यावें कीं, याचे रुपये घेतले असतील ते माघारे द्यावे. व राजयाकडे आपलें कर्ज व बाकी मामल्याची येणें तीं ताकीद करून राजयाकडून फडशा होई असें लिहिलें पाहिजे. व सिंदेसाहेब फिरोन पुढें कोणे गोष्टीविशीं उपद्रव न करी तें जालें पाहिजे. सर्जेराव बापू याचें वर्तमान आइकिलेंच असेल. सरकारची इतराजी जाली, तेव्हां मारले गेले. आतां येथें देवबाबापू सरकारचे हुजरे आहेत, तेच सारे कामकाज करीत असतात. आतां वर्तमान अधिकोत्तर पुढें होईल तें वरचेवर लिहून कळवीन. पहिले चाल, कोणी फौजबंद सरदार असत ते अगोदर मामलतीचा बंदोबस्त करून देत असत. आतां याप्रमाणें विचार आहे. शेत वाय खात्यें मग उपाय नाहीं. सरदार फौजबंद. आपला जाबसाल तोंडाचा करावयाचा तितका करून बरदस्त करूं लागल्यास, आपला उपाय नाहीं. चिरंजीव राजश्री आपाभटजी भाव्ये यांसी पत्र लीा आहे तें प्रविष्ट करून उत्तर आलें पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

00045699